शैलीकार यशवंतराव

प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख



४५

4 Y.C.P 923.60954/DES G00972 LIBRARY

प्रा. डॉ. शिवाजीराव मारुती देशमुख
एम. ए. पीएच्. डी., मराठी विभाग,
रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद

पीएच. डी. प्रबंधाचा विषय
'यशवंतराव चव्हाण : व्यक्ती आणि वाङ्मय'

१९९० पासून श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचलित तुळजापूर, उस्मानाबाद, पाचगणी येथे मराठी विषयाचे अधिव्याख्याता म्हणून काम केले.

रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात मराठी विभागात कार्यरत,

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे विविध समितींवर सदस्य म्हणून सक्रिय सहभाग.

मराठी भाषेचे डोळस अभ्यासक.
वाङ्मयीन नियतकालिकांमधून सातत्याने लेखन.
संशोधनपर लेख अनेक मासिकांतून प्रसिद्ध.
अनेक राज्य व राष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग व शोधनिबंध वाचन. एम्. फील. व पीएच्. डी. च्या विद्यार्थ्यांना संशोधन मार्गदर्शन.
विविध दैनिकांमधून दर्जेदार संशोधनात्मक लेखन.
लोकसाहित्याचे व्यासंगी अभ्यासक.
समकालीन व ग्रामीण साहित्याचा प्राधान्याने अभ्यास. समाजाभिमुख चिंतनशील व्यक्तिमत्त्व.
साहित्यासोबतच मराठी संस्कृती, समाज, राजकारण, प्रशासन इ. विषयी विशेष रुची.
विद्यापीठ अनुदान मंडळाची टीचर फेलोशिप प्राप्त.

शैलीकार यशवंतराव

प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख

923.6094

Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CALL NO.
A 600972
D 02.12.09

कौसल्या पब्लिकेशन, सोलापूर

शैलीकार यशवंतराव

प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख
भ्रमणध्वनी : ९४२३०६७२८०

■

प्रथमावृत्ती
अक्षय्य तृतिया, २७ एप्रिल २००९

■

प्रकाशक
प्रा. सौ. कौसल्या शिवाजीराव देशमुख
कौसल्या पब्लिकेशन
४/१८, विद्यानगर हौसिंग सोसायटी क्र. २, सिव्हिल हॉस्पिटलजवळ,
सोलापूर ४१३००३. फोन : ०२१७/२३१९२४९

■

© प्रा. सौ. कौसल्या शिवाजीराव देशमुख

■

मुखपृष्ठ
रविमुकुल

■

अक्षर जुळणी व मांडणी
सदाशिव जंगम

■

मुद्रक
योगेश जंगम
जंगम ऑफसेट प्रा. लि., २५/१० नांदेड फाटा, सिंहगड रोड,
पुणे ४११ ०४१. फोन : २४३९२७५९

■

किंमत : ३०० रुपये

माझ्या संशोधनातील

आणि

अध्ययन-अध्यापनातील मार्गदर्शक,

शिक्षणक्षेत्रातील माझे आदर्श प्रेरणास्थान

माजी प्राचार्य डॉ. अशोकराव जगताप,

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

आणि

प्राचार्य डॉ. रमेश दापके (देशमुख)

रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद

यांना

प्रेमादर व कृतज्ञतापूर्वक अर्पण !

शुभेच्छा!

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतील प्रा. डॉ. शिवाजी मारुती देशमुख यांनी मा. यशवंतराव चव्हाणसाहेब यांच्या जीवनातील घडामोडी, जडणघडण, त्यांच्या व्यक्तिमत्त्वा-वरील संस्कार, साहित्यनिर्मिती, प्रासंगिक भाषणे यांचा संशोधनात्मक पद्धतीने विचार करून 'शैलीकार यशवंतराव' हा ग्रंथ सिद्ध केला आहे, याबद्दल मी डॉ. देशमुख यांचे अभिनंदन करतो.

मा. यशवंतराव चव्हाण हे जनताभिमुख लोकनेते, साहित्य, कला, संस्कृती यांचे उत्तम जाणकार होते. ते जीवनभाष्यकार होते. माणूस हा यशवंतराव चव्हाण यांच्या चिंतनाचा विषय होता, तोच त्यांचा लेखनविषय होता. समाजातल्या सामान्य माणसावर मायेची पखरण घालणारे मा. चव्हाणसाहेब हे सुसंस्कृत राजकर्ते होते. साहित्य, कला राजकारण यामध्ये समन्वय साधणारे एक साहित्यिक म्हणून व साहित्यप्रेमी म्हणून मा. चव्हाणसाहेब यांचे योगदान मोठे आहे. शब्दांच्या सामर्थ्यावर त्यांचा नितांत विश्वात होता. विचार, भावना आणि कल्पना यांच्या बळावर त्यांनी सकस ग्रंथनिर्मिती केली. त्यांचे 'सह्याद्रीचे वारे', 'युगांतर', 'कृष्णाकाठ', 'भूमिका' यासारखे ग्रंथ सामाजिक, राजकीय, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याला दीपस्तंभासारखे मार्गदर्शक आहेत.

मा. चव्हाणसाहेबांच्या जीवनकार्याच्या प्रकाशझोतात राहून राजकीय क्षेत्रातील अनेक नेत्यांनी वाटचाल केली. त्यांच्या स्वप्नातील महाराष्ट्र घडवण्याचा प्रयत्न केला. मा. चव्हाणसाहेबांनी महाराष्ट्रातील गोरगरिबांची उन्नती व्हावी, शेती उद्योगधंद्यात प्रगती व्हावी म्हणून राजसत्तेचा वापर लोककल्याणाकरिता केला. महाराष्ट्रात त्यांनी पायाभूत आणि मूलभूत स्वरूपाचे कार्य केले.

मा. चव्हाणसाहेबांच्या चार प्रेमाच्या शब्दांतून लोकांना जे मिळायचे त्याचे मोल कुठल्याही पदापेक्षा मोठे होते. जे नेते केवळ सत्तेसाठी उभे असतात, त्यांची

सत्ता गेली की ते मोकळे झालेले दिसतात. खरे तर सत्ता नसते, तेव्हाच नेता, कार्यकर्ता नात्याची परीक्षा होत असते. कै. यशवंतराव चव्हाणसाहेब, कै. वसंतदादा पाटीलसाहेब, शरद पवारसाहेब या तीन्ही नेत्यांना अनेकवेळा पदापासून दूर रहावे लागले, पण त्या काळाचा वापर त्यांनी नाती दृढ करण्यासाठी करून घेतला. पद, खुर्च्या बाजूला गेल्या तरी नात्याची वीण पक्की झाली. म्हणूनच जनमानसातील त्यांचे नेतेपण कायमच अढळ राहिले आणि लोकमानसातील त्यांचे स्थान अधिकच आदरणीय झाले.

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या एकूणच जीवनाकडे पाहताना त्यांची उपक्रमशीलता, त्यांची मानवतावादी वृत्ती लक्षात येते. भाषा, कल्पनाशक्ती, वाङ्मयनिर्मिती व जीवन-तत्त्वज्ञान यांचे परस्परांशी असणारे नाते आणि त्यांचा संस्कृतीशी असणारा अनुबंध डॉ. शिवाजीराव देशमुख यांच्या 'शैलीकार यशवंतराव' या ग्रंथाच्या निमित्ताने जाणून घेता येईल.

''यशवंतरावांचा पिंड ललितलेखनाचा होता. त्यामुळे त्यांनी केलेले गद्यात्मक लेखन लालित्याचा धर्म घेऊन येते. त्यांच्या वैचारिक गद्य लेखनात त्यांच्या सकस आणि संपन्न विचाराचे दर्शन होते. यशवंतरावांचा साहित्य संसार समाजप्रबोधन आणि समाजचिंतन या अंगाने जात असल्यामुळे त्यांच्या ललित लेखनातदेखील समाजचिंतनच आढळते. अनुभव कथन व आत्माविष्कार ही प्रेरणा स्वीकारून त्यांचे लेखन झाले आहे.'' प्रस्तुत ग्रंथात डॉ. देशमुख यांनी यशवंतरावांच्या साहित्याच्या संदर्भात असे विचार नोंदवले आहेत. त्यातून त्यांच्या लेखनातील प्रगल्भता लक्षात येते.

मा. चव्हाणसाहेबांच्या भाषणात आणि लेखनात समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेला गती देण्याचे विलक्षण सामर्थ्य आहे. या सामर्थ्याचा शोध घेणे हे

संशोधकांनासुद्धा एक आव्हान आहे. कारण त्यांचे साहित्य वर्तमानकाळाशी निगडीत असले तरी त्यात भूतकाळाचे अनेक संदर्भ असतात आणि उज्ज्वल भविष्यकाळाची दृष्टी दिसते. या ग्रंथाच्या रूपाने त्यांच्या साहित्यिक जडणघडणीचा एक वैचारिक ठेवा आपल्या हाती पडत आहे, ही अतिशय आनंदाची बाब आहे. वाचक आणि अभ्यासक या ग्रंथाचे स्वागत करतील अशी मला आशा आहे. या पुढील काळात राजकारणातही नवी मूल्य देणाऱ्या आदर्श राजकर्त्यांच्या भाषणावर त्यांच्या साहित्यावर, साहित्यकृतीवर विविध संशोधकांनी प्रकाशझोत टाकला पाहिजे, अशी अपेक्षाही मी व्यक्त करतो. डॉ. शिवाजी देशमुख यांच्या या ग्रंथास मी मन:पूर्वक शुभेच्छा देतो.

आर. आर. पाटील (आबा)

माजी उपमुख्यमंत्री, गृहमंत्री महाराष्ट्र राज्य

अध्यक्ष : श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

प्रस्तावना

डॉ. शिवाजीराव देशमुख हे मराठी साहित्याचे प्राध्यापक, अभ्यासक व संशोधक आहेत. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे कार्य व व्यक्तिमत्त्व हा त्यांचा अभ्यासाचा विषय आहे.

शैलीकार यशवंतराव हा प्रा. देशमुखांचा पहिलावहिला ग्रंथ आहे. त्यात त्यांनी यशवंतराव चव्हाणांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा वेध घेतला आहे. यशवंतरावजी चव्हाण हे एक शैलीकार वक्ते व लेखक होते. वाग्विलासीनी शारदा त्यांच्यावर प्रसन्न होती. ते धुरंधर राजकारणी तर होतेच होते, पण कला-साहित्य-संस्कृतीचे ते मर्मज्ञही होते. त्यांच्या सार्वजनिक जीवनाला साहित्यकारणाची जोड मिळाली होती. वाङ्मयीन संस्कृतीचे ते उपासक होते. यशवंतराव चव्हाणांची साहित्यनिर्मिती ही मराठी माणसाच्या मर्मबंधातली ठेव आहे.

यशवंतरावजींचा शब्दसामर्थ्यावर फार मोठा विश्वास होता. ते एका ठिकाणी म्हणतात, ''मी शब्दांना फार मानतो. त्यांच्यात अस्त्रांचे सामर्थ्य आहे, तसेच प्रकाशाचे तेज आहे. एखादा शब्द कोणी, अशा वेळी उच्चारतो की, त्यामध्ये एक विलक्षण सामर्थ्य येते. गांधीजींनी 'क्विट इंडिया!' हे शब्द उच्चारले. केवढे सामर्थ्य या दोन शब्दात होते.''(शब्दांचे सामर्थ्य, सं. राम प्रधान, पृ. २४९)

यशवंतरावजींनी शब्दांची आयुष्यभर पूजा केली, आराधना केली. शब्दांचे त्यांना अपार आकर्षण होते. शब्दांतील सौंदर्य त्यांना मोहवीत असे. त्यांचे मन संवेदनशील व कलासक्त होते. खरे तर शब्द हे माणसाला प्राप्त झालेली कवच कुंडलेच असतात. शब्द त्याला अभय देतात. यशवंतरावजींना आपल्या राजकीय जीवनात शब्दसामर्थ्याचा फार मोठा फायदा झाला. त्यांनी जनसामान्यांशी जे नाते जोडले ते शब्दांच्या माध्यमातून. शब्दांच्या माध्यमातून त्यांनी हजारो

लोकांच्या स्पंदनांना स्पर्श केला. वक्तृत्वाच्या माध्यमातून त्यांनी लोकांशी अर्थपूर्ण संवाद साधला.

यशवंतराव चव्हाण हे शैलीकार लेखकही होते. त्यांची भाषणशैली व लेखनशैली सारखीच होती. त्यात कुणाचेही अनुकरण नव्हते. स्वत:ची स्वतंत्र अशी शैली त्यांनी विकसित केली होती. Style is the man ! शैली ही लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची जणू राजमुद्राच असते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगळेपण हे त्यांच्या शैलीतून व्यक्त होते, शैली म्हणजे लेखकाची ओळख, त्याची अस्मिता आणि त्याचे स्वत्व !

यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वातला सर्व गोडवा त्यांच्या शब्दांतून व्यक्त झाला आहे. त्यांचे मन अतिशय तरल व पारदर्शक होते. ते ऋजुतेने काठोकाठ भरलेले होते. छोट्या छोट्या वाक्यातून त्यांनी किती तरी मोठा आशय व्यक्त केला आहे. सुभाषितवजा वाक्यांची पेरणी त्यांनी आपल्या भाषणातून व लेखनातून केली आहे.

नवोदित लेखक एखाद्या प्रथितयश लेखकाचे अनुकरण करतो. चालत चालतच त्याला स्वत:ची वाट सापडते. स्वत:ची चालही सापडते. यशवंतरावजींना अनेक लेखक आवडत होते. पण कुणाचेही अंधानुकरण त्यांनी केले नाही आणि म्हणून मराठी साहित्याच्या शिवारात त्यांनी स्वत:च्या पाऊलखुणा निर्माण केल्या. मराठी भाषा, साहित्य व संस्कृतीला सुजलाम्, सुफलाम् करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

यशवंतराव चव्हाणांचा पिंडच मुळात एका दर्दी साहित्यिकाचा होता. अमृताशी पैज लावू शकेल असे त्यांचे साहित्य आहे. प्रकाश आणि माधुर्य यांचा सुरेख संगम त्यांच्या साहित्यात आढळतो. सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वात प्रकाश व माधुर्याचे मीलन असते. यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व सुसंस्कृत होते. त्या

व्यक्तिमत्त्वाला मोगऱ्याची उपमा देता येईल. त्यांच्या शब्दाशब्दातून तो उमलला, फुलला व दरवळला आहे.

यशवंतरावजींनी आपली हयात राजकीय क्षेत्रात घालविली नसती तर त्यांनी विपुल असे साहित्य निर्माण केले असते. सर्वच वाङ्मय प्रकार त्यांनी हाताळले असते. ललित लेखक म्हणून त्यांनी मराठी साहित्यात स्वत:चे स्थान निर्माण केले असते. कथा-कादंबरीकार म्हणून ते गौरवास पात्र ठरले असते. त्यांना नाटकाचे देखील मनस्वी वेड होते. गडकरी, खाडीलकर, देवल, किर्लोस्कर यांची नाटके त्यांनी पाहिली व वाचली. ते नाटककारही होऊ शकले असते. त्यांच्या हातून जे काही वैचारिक लेखन झाले ते वाचल्यानंतर त्यांच्या वाङ्मयीन सामर्थ्याचा प्रत्यय आपल्याला येतो. त्यांच्यात निश्चितच एक कवी दडलेला होता. अलिखित कवितांचे ते कवी होते. त्यांचे साहित्य वाचित असताना मला नेहरूजींची हमखास आठवण येते. इंग्रजीत नेहरूंना लेखक म्हणून जे स्थान प्राप्त झाले तेच स्थान यशवंतरावजींना मराठीत प्राप्त झाले. इंग्रजीत नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वाचा गुलाब जसा फुलला, तसा मराठीत यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाचा मोगरा फुलला.

यशवंतरावजींनी आयुष्यभर काव्य-शास्त्र-विनोदांतून विरंगुळा प्राप्त केला. शालेय जीवनातच त्यांना वाचनाची गोडी लागली होती. कादंबऱ्या वाचण्याचा जणू छंदच त्यांना जडला होता. हरिभाऊ आपटे यांच्या ऐतिहासिक तसेच सामाजिक कादंबऱ्या त्यांनी वाचल्या. नाथ माधवांच्या कादंबऱ्या त्यांनी वाचल्या. कालीदासाची नाटके वाचली. कॉलेजमध्ये असताना त्यांनी साहित्याचा मनसोक्त आस्वाद घेतला. ते ना.सी. फडक्यांचे विद्यार्थी होते. फडक्यांच्या कादंबऱ्यांनी तरूण-तरूणींच्या मनावर भुरळ घातली होती. या लेखकाच्या ललित साहित्यावर

मराठी वाचक बेहद फिदा झाला होता. यशवंतरावांच्या मनावरही त्याने मोहिनी घातली होती. 'जादूगार' व 'दौलत' ह्या दोन कादंबऱ्या यशवंतरावांना खूप आवडल्या होत्या.

ना. सी. फडक्यांच्या बरोबरीने वि.स. खांडेकरांनी महाराष्ट्रात आपला वाचकवर्ग तयार केला होता. खांडेकर हे आदर्शवादाचा पुरस्कार करणारे थोर लेखक होते. गांधीवादाचा त्यांच्या मनावर पगडा होता. 'दोन ध्रुव' व 'पांढरे ढग' ह्या त्यांच्या कादंबऱ्यांनी यशवंतरावांच्या मनावर आदर्शवादाचे संस्कार केले. पुढे कितीतरी वर्षांनी खांडेकरांची 'ययाति' ही कादंबरी प्रकाशित झाली. तिला ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाला. त्याबद्दल यशवंतरावांच्याच हस्ते त्यांचा कोल्हापुरात सत्कार झाला. याप्रसंगी यशवंतरावांनी 'कृतज्ञतेचे भाषण' केले. भाऊसाहेब खांडेकरांच्या व्यक्तिमत्त्वाची अनेक रूपे त्यांनी उलगडून दाखविली. हा प्रकाशकाचा लेखक आहे असे त्यांनी या महान लेखकाचे वर्णन केले. ललित साहित्यावर केलेले त्यांचे भाष्य अप्रतिम आहे.

ना.सी. फडके हे कलावादी लेखक होते. खांडेकर हे जीवनवादी लेखक होते. ह्या दोन्हीही मराठी लेखकांचा यशवंतरावांच्या मनावर विद्यार्थीदशेपासून प्रभाव होता. 'कलावाद विरुध्द जीवनवाद' या विषयावर महाराष्ट्रात त्याकाळी खूप खल झाला. कुणाची बाजू घ्यायची? कुणाचा पुरस्कार करायचा? यशवंतराव चव्हाणांनी जीवनवादाचे समर्थन केले. जीवनवाद हा सामाजिक जाणिवांचा स्रोत आहे. ज्या सामाजिक स्तरातून यशवंतरावजी पुढे येत होते तो जीवनवादाशी जवळीक साधणारा होता. ना.सी. फडके व वि.स. खांडेकर यांच्यातील वाङ्मयीन वादाच्या ताण्याबाण्यातून मराठी साहित्याचे वस्त्र विणले जात होते एवढे मात्र खरे. यशवंतरावांची वाङ्मयीन दृष्टीही जीवनवादी होती. त्यांची साहित्य

समीक्षाही जीवनवादाचा पुरस्कार करणारी आहे.

यशवंतराव चव्हाणांचे ग्रंथप्रेम व वाचनवेड फार मोठे होते. आयुष्यभर त्यात कधी खंड पडला नाही. त्यांच्या प्रतिभेला सतत पालवी फुटत राहिली ती यामुळेच. धकाधकीच्या राजकारणात वावरताना देखील त्यांनी हातातील पुस्तक खाली कधी ठेवले नाही. एकाच वेळी वेगवेगळ्या विषयांवरील चार-पाच पुस्तके ते वाचीत. कथा-कविता-कादंबऱ्यांनी त्यांना आयुष्यभर साथ दिली. आशा-निराशेच्या क्षणी ग्रंथांनी त्यांना आधार दिला. त्यांना प्रेरणा दिल्या. मनावर संस्कार केले.

यशवंतरावांना शब्दांचा लळा लहानपणापासूनच लागलेला होता. आई विठाईच्या जात्यावरील ओव्यांनी त्यांना शब्दसृष्टीत नकळत ओढले. आई विठाई ही त्यांची गीताईच होती. तिचे बोट धरून ते आयुष्याच्या वाटेवर चालत राहिले. शाळेत असतानाच त्यांना वाचनाचा व लेखनाचा छंद जडला. त्यांनी तो आयुष्यभर जपला. शब्दांनी त्यांना साथ दिली आणि सामर्थ्यही दिले.

यशवंतराव चव्हाणांनी कथा-कविता-कादंबऱ्या लिहिल्या नाहीत. ललित साहित्याची निर्मिती त्यांनी केली नाही. त्यांच्या हातून निर्माण झाले ते वैचारिक साहित्य. त्यांच्या हातून जो काही शब्दप्रपंच झाला तो वैचारिक व समीक्षात्मक स्वरूपाचा आहे. त्यांची साहित्यसमीक्षा ही 'आस्वादक समीक्षा' या सदराखाली मोडते. कलाकृतीच्या आकलनाशिवाय तिचा आस्वाद घेता येत नाही. समीक्षालेखन हे साहित्याचे रसग्रहण असते. समीक्षकाच्या अंगी गुणग्राहकता असल्याशिवाय साहित्यकृतीचा आस्वाद कसा घेता येईल? साहित्याची रसवत्ता हीच त्याला वाङ्मयीन गुणवत्ता व अधिसत्ता प्राप्त करून देते. त्याचेच रसग्रहण आस्वादक समीक्षक करीत असतो. यशवंतरावांची वाङ्मयीन अभिरूची अभिजात

स्वरूपाची होती. साहित्यातले कांचनकण टिपण्याची सवय त्यांच्या डोळ्यांना लागली होती. ललित साहित्याचे ते दर्दी वाचक होते. साहित्य सोनियाच्या खनी त्यांनी आयुष्यभर धुंडाळल्या.

संवेदनशील वाचक हा लेखकाशी व त्याच्या कलाकृतीशी संवाद साधतो, तादाम्य पावतो. लेखकाच्या वेव्हलेंथशी वाचकाची वेव्हलेंथ जुळली तरच त्याच्या कलाकृतीशी तो एकरूप होऊ शकतो. वैचारिक तसेच भावनिक पातळीवर वाचकाला लेखकाशी समरस होता आले तरच त्याच्या कलाकृतीचा आस्वाद घेता येतो. अभिरूचीसंपन्न वाचक हा साहित्य समीक्षक असतो.

साहित्याने यशवंतराव चव्हाणांच्या व्यक्तिमत्त्वाची श्रीमंती वाढविली होती. सर्वच साहित्य प्रकारातील उत्तमोत्तम ग्रंथ त्यांनी वाचले होते. काही पुस्तके केवळ चवीसाठी असतात. काही पुस्तके वैचारिक व भावनिक पोषणासाठी असतात. माणसाचे वैचारिक व भावनिक जीवन परिपुष्ठ होते ते अशा ग्रंथावर. अशा पौष्टिक ग्रंथांच्या संगतीत यशवंतरावांनी आपल्या कामाचा व्याप सांभाळून आपले आयुष्य घालविले. इतिहासाचे त्यांना ज्ञान व भान होते. ते नाटकवेडे होते. काव्याचा आस्वाद त्यांनी घेतला.चरित्रे व आत्मचरित्रे त्यांनी आस्थेने वाचली. विविध क्षेत्रांतील व्यक्तींची चरित्रे व आत्मचरित्रे त्यांनी त्यांच्या अंतरंगात शिरून वाचली. चरित्रांना व आत्मचरित्रांना इतिहासाचे मोल प्राप्त झालेले असते. माणसाचे आकलन झाले की त्याच्या समाजाचे व संस्कृतीचे आकलन होते. त्याच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण कशी झाली ते लक्षात येते. यशवंतरावांनी चरित्रवाङ्मय अतिशय आस्थेने वाचले. स्वत: त्यांनी अनेक व्यक्तींच्या कार्यकतृत्वावर जिव्हाळ्याने लिहिले देखील. म. गांधी, लो. टिळक, पं. जवाहरलाल नेहरू, डॉ. राजेंद्र प्रसाद, नाना पाटील, लालबहादूर शास्त्री,

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन इ. महापुरुषांवर त्यांनी लिहिले. भाऊसाहेब वर्तक, उध्दवराव पाटील, भाऊसाहेब बांदोडकर, एस.एम. जोशी, काकासाहेब गाडगीळ अशा राजकारणी मंडळींवर त्यांनी लिहिले. वसंतराव नाईक, किसन वीर, यशवंतराव मोहिते, मधुकरराव चौधरी, वसंतदादा पाटील अशा सहकाऱ्यांवर त्यांनी लिहिले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, न.चि. केळकर, नाट्याचार्य काकासाहेब खाडिलकर, वि.स. खांडेकर, ह.न. जोशी, ग.दि. माडगुळकर, ग. त्र्यं. माडखोलकर, कवी यशवंत, वा.सी. बेंद्रे अशा लेखक विचारवंतांवर त्यांनी लिहिले. कर्मवीर भाऊराव पाटील, राजर्षी शाहू महाराज, म. विठ्ठल रामजी शिंदे, तुळशीदास जाधव, शंतनुराव किर्लोस्कर, धनंजयराव गाडगीळ अशा व्यक्तिमत्त्वांचाही त्यांनी वेध घेतला.

एखाद्या ग्रंथावर लिहावे तसे त्यांनी अनेक व्यक्तींवर लिहिले. यशवंतरावांचा शब्दप्रपंच अतिशय नेटका होता. गुणग्राहकता, गुणगौरव करण्याची वृत्ती त्यांच्या अंगी भिणलेली होती. त्यांच्या शब्दाशब्दातून परिमळ सतत दरवळला. त्या शब्दांना अविट गोडी प्राप्त झाली होती. 'हा रस अद्‌भूत निरूपम' या शब्दांत त्याचे वर्णन करावे लागले. राजकारणात आयुष्य घालवूनही त्यांनी रसभंग कधी केला नाही. 'गुण गाईन आवडी' या पध्दतीने साहित्यिकांचा गौरव त्यांनी केला. अनेक साहित्यिकांशी त्यांचा ऋणानुबंध होता. त्यांच्या साहित्याचा त्यांनी चोखंदळपणे आस्वाद घेतला होता. अनेक साहित्यिकांशी त्यांची मैत्री होती. त्यांच्या मित्रपरिवारात सर्वच क्षेत्रातील कर्तबगार व्यक्ती होत्या. कृष्णा-कोयनेच्या काठावर ते वाढले. या दोन्ही नद्यांच्या पाण्याने त्यांना काही छंद लावले व काही श्रध्दा दिल्या. ते सर्व 'ऋणानुबंध' मध्ये व्यक्त झाले आहे. त्यांनी आपला अनुभव लालित्यपूर्ण शब्दांत व्यक्त केला आहे. त्यांच्यात लपलेल्या भावविश्वाने ललित रूप धारण केले.

आपण साहित्यिक आहोत असा दावा त्यांनी उभ्या आयुष्यात कधी केला नाही. एका साक्षेपी रसिक वाचकाची भूमिका त्यांनी घेतली. ते जे काही बोलले आणि त्यांनी जे काही लिहिले ते उत्तम दर्जाचे साहित्यच आहे. ते विचारप्रधान आहे आणि भावनाप्रधानही आहे. त्यांनी केलेले प्रत्येक भाषण आणि त्यांनी लिहिलेला प्रत्येक लेख म्हणजे शब्दशिल्पच ! ते सर्व वाचल्यानंतर वेरूळ-अजिंठ्याच्या लेणी पाहिल्याचा आनंद वाचकाला होतो. ज्या शब्दांतून असा निखळ आनंद मिळतो त्यालाच तर अभिजात साहित्य आपण मानतो.

शब्दातून चित्र उभा करणे ही गोष्ट सोपी नाही. यशवंतरावांना ती साध्य झाली होती. त्यांना नक्षत्राचे देणे लाभले होते. 'कुलसुमदादी' हे एकच उदाहरण पुरेसे आहे. काळाच्या पडद्यावर रेखाटलेले ते एक म्यूरलच आहे. कुलसुमदादी ही सगळ्यांची दादी होती. तिच्या प्रेमात यशवंतराव न्हाऊन निघाले होते. या दादीला यशवंतरावांच्या रूपाने दीदार भेटला.

यशवंतरावांनी एका ठिकाणी म्हटले आहे, ''संस्कारक्षम मन असणे ही देणगी नियतीची !'' नियतीने उदार मनाने ही देणगी यशवंतरावांना दिली होती. संस्कारक्षम मनाबरोबर प्रतिभाही त्यांना प्राप्त झाली होती. त्यांच्या शब्दांना ललितरूप मिळाले त्याचे कारण हेच आहे. कथा-कादंबऱ्यांमध्ये लालित्य नसेल तर ? आणि लालित्य हे केवळ शब्दातच असते का? ते म्हणतात, ''ललित लेखनाचा आत्मा केवळ शब्दलालित्यात नाही. विचारांच्या पार्श्वभूमीवर भावविश्वात न्हाऊन निघालेली जिवंत अनुभूती व्यक्त होताना ललितरूपच घेते. मग ही अनुभूती कोणत्याही क्षेत्रातील का असेना !'' (ऋणानुबंध, पृ. अकरा-बारा). यशवंतरावांनी या शब्दात साहित्य म्हणजे काय हे सांगितले आहे.

यशवंतराव चव्हाणांचे ललित साहित्यावरचे चिंतन अतिशय मोलाचे आहे.

भाऊसाहेब खांडेकरांचा दाखला देऊन त्यांनी ललित साहित्याविषयी म्हटलं आहे, ''ललित साहित्य अनंत व गंभीर अशा समुद्रासारखे आहे. सागर केव्हा, कशी रूपे घेतो, हे कळत नाही. कधी ओसरलेला असतो, तर कधी ऊफाळलेला असतो, तर कधी शांत, तर कधी रौद्ररूप धारण केलेला. पण त्याच्या पोटात काय असते? पोटात कधी रत्ने असतात, तर कधी शार्क मासे. पोटात तळाशी तेलही असते. रत्ने असतात, म्हणून त्याला रत्नाकर म्हणतात. अशा अनेकविध रूपात तो असतो.'' (शब्दांचे सामर्थ्य, पृ. २५०)

साहित्य हे मानवी जीवनाचे प्रतिरूप असते हेच खरे. ललितलेखक त्याची अथांगता शोधायचा प्रयत्न करतो. यशवंतराव म्हणतात, ''ललित लेखकाजवळ भवितव्याचा वेध घेणारी प्रतिभा असली पाहिजे, ज्याला ही वेध घेणारी दृष्टी नाही, त्याला लेखक कसे म्हणायचे? हा खरा प्रश्न आहे.'' (शब्दांचे सामर्थ्य, पृ. २५१) ललित साहित्य ही कला आहे. पण ती जीवनासाठी असली पाहिजे. कला ही जीवनाभिमुख असली पाहिजे. साहित्याला सामाजिक आशय असेल तरच ते प्रबोधनाचे साधन व माध्यम होऊ शकते. साहित्यिकाची प्रज्ञा समाजाभिमुख असली पाहिजे. साहित्यिकाची प्रज्ञा समाजाभिमुख असली पाहिजे. लेखक संवेदनशील देखील असला पाहिजे, साहित्य हे थर्मामीटरमधील पाऱ्यासारखे संवेदनशील असते, असे त्यांनी एका ठिकाणी विधान केले आहे. यशवंतराव चव्हाणांनी दलित साहित्याचे स्वागत केले ते त्याचसाठी. कराड साहित्य संमेलनात स्वागताध्यक्ष म्हणनू केलेले त्यांचे भाषण हे साहित्यावरचे आशयगर्भ भाष्य आहे, असे मी मानतो. साहित्यिकाची बांधिलकी समाजाशी असली पाहिजे. ती उत्स्फूर्त असली पाहिजे. बांधिलकी ही कलम करता येत नाही. बीजातूनच ती अंकुरली पाहिजे.

राजकारणात वावरतांना यशवंतरावांनी साहित्याकडे पाठ फिरविली नाही. प्राचीन व समकालीन कवी-लेखकांचे साहित्य हा त्यांच्या वाचन-मनन-चिंतनाचा विषय होता. भाऊसाहेब माडखोलकरांच्या राजकीय कादंबऱ्या असोत वा ग.दि. माडगूळकरांचे काव्य. माडखोलकरांना ते सारस्वताचा 'रत्नकोश' मानीत. ग.दि. माडगूळकर हे शब्दसृष्टीचे ईश्वर होते. त्यांची शब्दसिध्दी हा यशवंतरावांच्या कुतुहलाचा विषय होता. 'पराधीन आहे जगती, पुत्र मानवाचा', ही गीतरामायणातली ओळ त्यांना अंतर्मुख करीत असे. ग.दि. माडगूळकर गेले तेव्हा त्यांना अपार दु:ख झाले. 'पापण्यात गोठविली मी नदी आसवांची' ही ओळ त्यांच्या थरथरत्या ओठांवर आली.

यशवंतरावजींच्या बोलण्यातील व लिहिण्यातील लय सारखीच होती. त्यातली शब्दयोजना (Syntax) सारखीच आहे. जणू ते बाह्यजगताशी संवाद करीत आहेत. 'भाषण म्हणजे संवादच' अशी त्यांची धारणा होती. लेखन म्हणजे देखील संवादच. त्यांचा तो विविध पातळ्यांवरचा संवाद असायचा. 'आपुलाचि संवाद आपुल्याशी', असे स्वरूपही त्याला प्राप्त व्हायचे. त्यांच्या संवादात लय व लालित्य होते. साहित्याचा आस्वाद म्हणजे सोने लुटणेच ! यशवंतरावांचे सहज बोलणे म्हणजे देखील साहित्यच ! त्यांची शैली अप्रतीम ! तिच्यावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची मुद्रा ठळकपणे उमटलेली होती. Style is the man हे खरेच आहे.

आत्मचरित्रातदेखील लेखक आणि त्याची शैली या दोन्ही गोष्टींचे दर्शन घडते. यशवंतराव चव्हाणांचे आत्मचरित्र 'कृष्णाकाठ' (१९८४) हे मराठी साहित्याचे लेणे आहे. ते एका कालखंडाचे लालित्यपूर्ण चिंतन आहे. तीन खंडात त्यांना ते लिहावयाचे होते. पण एकच खंड प्रसिध्द झाला. त्यांच्या आयुष्याची जडणघडण कशी झाली याचे उत्तम चित्रण 'कृष्णाकाठ'मध्ये आहे.

'नका बाबांनो, डगमगू
चंद्र-सूर्यावरील जाई ढगू...'

असा आशावाद त्यांच्या आईच्या ओवीतून त्यांना आयुष्यभर मिळाला. कृष्णा-कोयनेने त्यांच्यावर संस्कार केले. विठाई व कृष्णाई या दोन मातांच्या संस्कारांनी ते घडले. या आत्मचरित्रात अभिनिवेश नाही. उत्कटता मात्र आहे. मनाची संवेदनशीलता आहे. नकळत या हृदयीचे त्या हृदयी घालण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे. यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वात एक कवी दडलेला आहे. तो 'कृष्णाकाठ'मध्येही व्यक्त झालेला आहे. वाचनीयता हे या आत्मकथेचे वैशिष्ट्य आहे आणि वाचनीयता हेच तर उत्कृष्ट साहित्याचे व्यवच्छेदक लक्षण असते.

आत्मचरित्र हा वाङ्मय प्रकार ललित साहित्यात मोडत नाही. त्याचा समावेश वैचारिक साहित्यात होतो. काल्पनिकतेला त्यात मुळीच थारा नसतो. वास्तव हाच त्याचा आत्मा असतो. यशवंतरावांनी 'कृष्णाकाठ'मध्ये आपले भावविश्व ओतले आहे. या आत्मकथेचा आरंभ व शेवट हे दोन्ही लक्षात घेतले तर आपण कादंबरी वाचीत आहोत असे वाचकाला वाटेल. या आत्मकथेचे लावण्य जितके तिच्यातील शब्दलालित्यात आहे, तितकेच ते तिच्यातील आशयलालित्यातही आहे. तिचा आरंभ उत्कंठा वाढविणारा आहे, तर शेवट उत्कटता वाढविणारा. ललित साहित्याचेच हे गुणविशेष आहेत.

यशवंतराव चव्हाणांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते. राजकारण, समाजकारण, अर्थकारण, साहित्यकारण व संस्कृतीकारण अशा पंचकारणांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला समृद्धी दिली होती. 'आलो याचि कारणाशी' हेच जणू त्यांना सांगायचे होते. सत्यम्-शिवम्-सुंदरम्चा शोध त्यांनी साहित्याच्या माध्यमातून आयुष्यभर घेतला. शेवटी कला-साहित्याचा आस्वाद तरी दुसरे

काय असतो? कशासाठी असतो? सत्यम्-शिवम्-सुंदरम्चा शोध म्हणजेच कला-साहित्याचा आस्वाद! त्याच्या आस्वादातून देखील एक प्रकारची अनुभूती प्राप्त होते. यशवंतरावांनी ही अनुभूती आपल्या शब्दांत जीव ओतून व्यक्त केली आहे. त्यांना जे भावले व स्पर्शून गेले ते त्यांनी व्यक्त केले. तोही एक प्रकारचा आविष्कारच आहे. साहित्य निर्माण होते ते अशा प्रकारच्या आविष्कारातून. त्याच्यावर इंद्रधनुष्याची दाट सावली पडलेली असते.

यशवंतरावांचे लेखन जितके आशयगर्भ व लालित्यपूर्ण आहे, तितकीच लालित्यपूर्ण व भावस्पर्शी त्यांची भाषणेही आहेत. त्यापैकी अनेक भाषणे लिखित स्वरूपात आज उपलब्ध आहेत. 'सह्याद्रीचे वारे', 'युगांतर', 'भूमिका' आदी ग्रंथात ती संग्रहित आहेत. त्यांचा टवटवीतपणा आजही कायम आहे. ती वाङ्मयमूल्येप्रचूर आहेत. रंग, रूप, रस व गंध यांनी ती अलंकृत आहेत. खरे तर भाषण हा देखील स्वतंत्र असा एक वाङ्मयप्रकारच आहे. त्याला तशी मान्यता मिळायला हवी. यशवंतरावांच्या भाषणांमध्ये सौंदर्याचा प्रचूर प्रमाणात आविष्कार झालेला आढळतो. त्यातले शब्दसौष्ठव लक्षवेधक आहे. त्यातली रसवत्ता प्रत्ययकारी आहे. त्यातली रंगछटा आजही विरलेली नाही. ललित निबंधांचे स्वरूप त्यांना प्राप्त झालेले आहे. ज्या ज्या वेळेस त्यांनी ती केली त्या त्या वेळेस त्यांनी श्रोत्यांच्या मनाचा ठाव घेतला. आजही ती वाचीत असताना वाचकांच्या मनाचा ठाव ती घेतात. शब्दसामर्थ्यातून वक्तृत्व सिद्ध होते. Rhetoric means words in action. यशवंतरावांच्या लेखनात अभिनिवेश नाही. भावस्पर्शी उत्कटता मात्र त्यात आहे. त्यांच्या भाषणातही अभिनिवेश नाही. त्यात आशयगर्भ उत्कंठा मात्र आहे. या हृदयाने त्या हृदयांशी केलेला तो अर्थपूर्ण संवाद आहे. अशी भाषणे म्हणजे साहित्यच. रससिद्धान्तातल्या निकषांवर ती उतरतात.

यशवंतराव चव्हाणांची भाषणे जेवढी विचारप्रधान आहेत तेवढीच ती भावस्पर्शीही आहेत. यशवंतराव हे रसिकाग्रणी होते. त्यांचा पिंडच मुळात एका अभिजात साहित्यिकाचा होता. मोहळातून मधाचे थेंब ठिबकावेत असे त्यांचे वक्तृत्व होते. तो अनुभव मी घेतला आहे. साहित्याच्या निकषांवर त्यांच्या भाषणांची समीक्षा केली पाहिजे. 'अभ्यासें प्रगट व्हावे' असा हितोपदेश समर्थ रामदासांनी केला आहे. भाषण हे अशा प्रगटीकरणाचे माध्यम असते. यशवंतरावांनी त्यांचा प्रभावीपणे वापर केला आहे.

पत्रलेखन हा देखील एक साहित्य प्रकारच ! यशवंतरावजींच्या पत्रलेखनाची त्याद्दष्टीने समीक्षा करावी. त्यांनी वेणुताईना लिहिलेली पत्रे वाङ्मयीन मूल्यांनी परिपूर्ण आहेत. 'विदेश-दर्शन' हा त्या पत्रांचा संग्रह आहे. देशाटन, पंडित मैत्री आणि सभेत संचार या तीनही गोष्टींचा लाभ यशवंतरावांना झाला होता. 'नित्य नूतन हिंडावे। उदंड देशाटन करावे।' समर्थांचा हाही हितोपदेश त्यांनी पाळला.

'विदेश-दर्शन' हा प्रवासवर्णनात मोडणारा पत्र-संग्रह आहे. देशाचे संरक्षणमंत्री, अर्थमंत्री, गृहमंत्री व विदेशमंत्री या नात्यांनी यशवंतरावांना अनेक देशांचा प्रवास करावा लागला. त्या त्या देशातील साहित्य, संस्कृती, लोकजीवन, राजकारण, निसर्ग, नाट्यकला आदी गोष्टी त्यांच्या अवलोकनात आल्या. विविध देशातील शहरांमध्ये त्यांनी वास्तव्य केले. शहरे ही संस्कृतीची केंद्रे असतात. त्यातील वस्तुसंग्रहालये त्यांनी पाहिली. ग्रंथालयांना भेटी दिल्या. उत्तमोत्तम ग्रंथांची खरेदी केली. त्या त्या देशातील इतिहासाचा मागोवा घेतला. नाटके पाहिली. राजकीय नेत्यांच्या गाठीभेटी घेतल्या. या सर्व गोष्टी वेणुताईना लिहिलेल्या या पत्रांत आहेत. ते बहुश्रुत, प्रज्ञावंत मुत्सद्दी होते. रसिकमनाने त्यांनी अनुभव टिपले. त्या अनुभवाचे प्रगटीकरण या पत्रांमध्ये आहे. पती-

पत्नीतले नाते हे अतिशय नाजूक ! त्याचा सुगंध या पत्रांना लाभला आहे.

यशवंतराव चव्हाणांना मराठी भाषा व मराठी साहित्याचा खूप अभिमान होता. माय मराठीनेच त्यांना एका संवेदनशील साहित्यिकाची अस्मिता दिली. ती अस्मिता त्यांनी आपल्या शब्दांतून फुलवली.

'शैलीकार यशवंतराव' हे डॉ. शिवाजीराव देशमुख यांचे पुस्तक साहित्यिक यशवंतराव चव्हाण समजून घेण्यासाठी अतिशय उपयुक्त ठरणार आहे. खरे तर हा ग्रंथ मुळातच त्यांच्या पीएच. डी. च्या संशोधन प्रबंधावर आधारलेला आहे. तो सिद्ध करण्यासाठी त्यांनी खूप परिश्रम घेतले आहेत. मराठी साहित्याच्या विद्यार्थ्यांना, अभ्यासकांना, प्राध्यापकांना, संशोधकांना आणि सर्वसामान्य वाचकांना हा ग्रंथ निश्चितच उपयोगी पडेल यात कसलीच शंका नाही. डॉ. देशमुख अभिनंदनास पात्र आहेत.

मा. खा. डॉ. जनार्दन वाघमारे
माजी कुलगुरू स्वामी रामानंदतीर्थ विद्यापीठ, नांदेड

लातूर, दि. २७ मार्च २००९

पुरस्कार

डॉ. प्रा. शिवाजीराव देशमुख हे माझे पीएच.डी. चे विद्यार्थी मित्र !

त्यांनी त्यांच्या पीएच.डी. पदवीच्या संशोधनासाठी महाराष्ट्राचे सह्याद्री, माजी उपपंतप्रधान मा. यशवंतरावजी चव्हाण या अतिशय मोलाच्या विषयाची निवड केली, त्याचे कारण ते स्वत: यशवंतरावजी चव्हाणांचे आजोळ देवराष्ट्र व कर्मभूमी विटा, कराड यांच्यापासून जवळच असलेल्या अमरापूरचे राहणारे ! बालपणापासूनच कै. यशवंतरावांच्या एकूणच व्यक्तिमत्वाबद्दल, कार्याबद्दल त्यांना नितांत आदर व आकर्षण होते. त्या मातीच्या संस्काररूपी सुगंधाने डॉ. देशमुखांचे अंतरंग दरवळले होते. त्यांच्या ऋणात राहूनच कै. यशवंतरावांचे समग्र आकलन वाङ्मयीन भूमिकेत मांडावे ही त्यांची अभ्यासक म्हणून असलेली भूमिका मला विशेष भावली, आणि प्रा. डॉ. देशमुख इतरांपेक्षा नक्कीच या विषयाला अधिक चांगला न्याय देवू शकतील म्हणून मी तात्काळ हा विषय मान्य केला.

डॉ. देशमुख यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची फेलोशिप मंजूर झालेली होती. त्यांनी बलभीम महाविद्यालयातील मराठी विभागाच्या संशोधन केंद्रात राहून माझ्या मार्गदर्शनाखाली अभ्यास केला, हा अगदी केवळ योगायोग ! अगदी एकनिष्ठेने, तन्मयतेने व चिकाटीने अभ्यास करून केवळ अडीच वर्षाच्या कालावधीत प्रबंध पूर्ण करून विद्यापीठास सादर केला. ''यशवंतराव चव्हाण व्यक्ती व वाङ्मय'' या त्यांच्या प्रबंधास विद्यापीठाने मान्यता देऊन पीएच.डी. पदवी बहाल केली. हा प्रबंध काही दुरुस्त्यांसह, काही नव्या मांडणीसह वाचकासमोर लवकरात लवकर यावा असे माझ्यासह अनेक जाणकारांचे मत होते. आज हे स्वप्न साकार होत आहे. दोन स्वतंत्र ग्रंथात प्रबंधातील विचारविश्व रसिक वाचकांसमोर मुद्रांकित झाले

आहे. एका व्रतनिष्ठाचा आदर्श या निमित्ताने आपल्या समोर देखण्या स्वरूपात रूपांकित झाला आहे. ही अत्यंत आनंददायक घटना आहे.

खरे तर पीएच.डी. अध्ययनाच्या निमित्ताने विद्यापीठास प्रतिवर्षी कितीतरी प्रबंध सादर होतात, ते मान्यही होतात. परंतु त्यातील फार क्वचित अभ्यासकांचे प्रबंध प्रकाशित होतात. कित्येक प्रबंध विद्यापीठाच्या ग्रंथालयात कुलूपबंद स्थितीत पडलेले असतात. त्यातील ज्ञानाचा समाजाला काहीच उपयोग होत नाही. वास्तविक विद्यापीठातील हे प्रबंध लोकार्पण होणे सामाजिक अभिसरणासाठी नितांत निकडीचे आहे, ही खुद्द यशवंतरावांचीच भूमिका होती. यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचेच नव्हे तर अवघ्या भारतीयांचे दैवत आहे. त्यांची राजकीय उंची तर,

''हिमालयाला आग लागली, सह्याद्रीची चोरी झाली''

या शब्दात कवीने कथन केली आहे. उत्तुंग हिमालय संकटग्रस्त झाला असता, त्याच्या मदतीला हा सह्याद्री धावून गेला. हा इतिहास आहे. परंतु यशवंतराव एक माणूस म्हणून कसे घडले, त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर कोणाकोणाचे संस्कार झाले, त्यांचे व्यक्तिमत्त्व कसे आकाराला आले याचा शोध प्रबंध लेखकाला घ्यावा वाटला. यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पदर, परिमाणे आहेत. त्यांच्या राजकीय प्रभावी परिमाणाप्रमाणेच एक साहित्यिक वलय देखील तेवढेच तेजस्वी आहे. माणूस आणि साहित्यिक हे अभिन्न असतात. यशवंतराव हे जन्मजात स्वयंभू साहित्यिक होते. त्यांचे मन एका कला-निर्मिकाचे मन होते. त्यातून सहज वाङ्मय फुलत गेले, बहरत गेले. मात्र हे मन समाजाशी घट्टपणे अभिन्नपणे बांधलेले होते. प्रबंध लेखकाने यशवंतरावांच्या पारदर्शी समाजसंवादी

मनाचा शोध घेतला. त्यांच्या वाङ्मयीन विशेषांचा वेध घेतला. यशवंतराव हे एक अजब रसायन होते. थोर व्यक्तींच्या जीवनात नुसते डोकावून पाहिले, तरी एखाद्या सखोल पाण्याचा जसा आपणाला अंत लागत नाही, उलट त्यातील गहनतेने आपण विस्मित होतो तशी आपली स्थिती होते.

यशवंतरावांचे बालपण त्यांच्या आजोळीच व्यतीत झाले. जवळजवळ एक शतकापूर्वीचा जिवंत इतिहास अभ्यासून डॉ. देशमुख यांनी यशवंतरावांवर देवराष्ट्राचे कसे संस्कार झाले, तिथल्या माणसांशी, शिक्षकांशी तसेच कौटुंबिक नात्यातील व्यक्तींशी त्यांचे अनुबंध कसे होते हे मांडले आहे. कौटुंबिक नात्यात त्यांच्या आईचा प्रभाव विशेष दिसतो. बालपणातील विठाबाई यांची शिस्त आणि प्रेम ही पुढील आयुष्यात कशी कामी आली हे 'कृष्णाकाठ'मध्ये यशवंतरावांनी सांगितलेलेच आहे. शालेय जीवनाप्रमाणेच महाविद्यालयीन जीवनाचा व त्यातील महत्त्वाच्या प्रसंगांचा वेध लेखकाने घेतला आहे. कविवर्य माधव ज्युलियन, प्रा. ना.सी. फडके यांसारखे साहित्यिक त्यांना प्रोफेसर म्हणून लाभले. सत्यशोधकी चळवळीचा व छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्याचा त्यांनी जवळून अनुभव घेतला. हीच प्रेरणा पुढील आयुष्यात त्यांना दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरली. हे लेखकाने नमूद केले आहे. वाङ्मयातून माणूस घडतो हे त्यांचे ब्रीद वाक्य होते. त्यांनी थोरामोठ्यांची चरित्रे वाचली. कथा कादंबऱ्या, नाटके यांचे अध्ययन केले. छत्रपती शिवाजी, म. गांधी यांचे आदर्श त्यांनी अंगी बाणले. लेखकाने त्यांच्या कौटुंबिक स्थितीगतीचा घेतलेला वेध अत्यंत वेधक आहे.

यशवंतरावांनी आत्मनिष्ठ, चरित्रपर, स्फुट, व्यक्तिचित्रात्मक, प्रवास वर्णन, पत्रात्मक असे विविध प्रकार हाताळले. त्या सर्वांचा वाङ्मय निकषावर परामर्श

घेण्याचे काम डॉ. देशमुख यांनी केले आहे.

यशवंतरावांच्या जीवनावर, कार्यावर प्रकाश टाकणारी असंख्य पुस्तके आजवर प्रकाशित झाली आहेत, होत आहेत, यापुढेही होतील. परंतु त्यांच्या वाङ्मयीन उत्तुंगतेचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी व त्यांच्या जडणघडणीचा त्यांच्या वाङ्मय निर्मितीशी पौर्वापर्य जुळवून एक सुंदर अभ्यासपूर्ण ग्रंथ प्रसिद्ध करण्याचे श्रेय डॉ. देशमुखांना द्यावेच लागेल. डॉ. देशमुख यांनी सादर केलेला हा अभ्यास कौतुकास्पद नव्हे, तर अनुकरणीय व अनुसरणीय आहे. एवढे नमूद करून या ग्रंथाचे रसिक अभ्यासक स्वागतच करतील असा पूर्ण विश्वास वाटतो. या ग्रंथाला आदरणीय माजी उपमुख्यमंत्री व गृहमंत्री आर. आर. पाटील (आबा) यांच्या शुभेच्छा लाभल्यामुळे तर ग्रंथाचे मोल शतपटीने वाढले आहे, हे निराळे सांगण्याची गरज नाही.

यशवंतराव चव्हाण हे स्वयंभू साहित्यिक होते. त्यांची वाङ्मयीन अभिरुची व रसिकता, बहुश्रुतता व अभ्यास यामुळे परिणत झाली होती. 'सह्याद्रीचे वारे', 'कृष्णाकाठ', 'युगांतर', 'ऋणानुबंध', 'शिवनेरीच्या नौबती' इ. वाङ्मयीन कृतीतून त्यांचे साहित्यिक म्हणून असलेले मोल लक्षात येते.

डॉ. शिवाजी देशमुख यांनी यशवंतरावांच्या वाङ्मयनिर्मितीचे केलेले मूल्यमापन अत्यंत विलक्षण आहे. यशवंतरावांचे साहित्य हे आपल्या काळाशी व कालखंडातील परिस्थितीशी नाते सांगणारे आहे. त्यांना सभोवतालचे असणारे वास्तवभान, कालभान अत्यंत महत्त्वाचे आहे.

यशवंतरावांचे लेखन रंजक असू शकत नाही. कारण वाङ्मय निर्मितीची त्यांची भूमिका व समज ही समाजसापेक्ष आहे. समाजाचे हित व समाजासहित असे त्यांचे साहित्य शब्दाचे प्रतिपादन आहे. ललित साहित्यांची निर्मिती सामाजिक

बांधिलकीतून झाली पाहिजे व तिने सामाजिक आशयच प्रतिपादन केला पाहिजे अशी ठाम भूमिका ते घेतात.

यशवंतरावांची प्रखर जीवननिष्ठा त्यांच्या लेखनातून प्रकटते. त्याचा शोध लेखकाने बारकाव्यासह घेतला आहे.

डॉ. देशमुख, त्यांचे प्राचार्य डॉ. रमेश दापके, मुद्रक सदाशिव जंगम व मित्र मंडळ व सौ. कौसल्याताई देशमुख वहिनी यांचे मन:पूर्वक आभार....

माझी या क्षेत्रात फारशी योग्यता नसतानाही केवळ योगायोग म्हणून मिळालेल्या मार्गदर्शकास डॉ. देशमुख यांनी गुरुस्थानी मानले, यात त्यांचाच मोठेपणा अधिक आहे. त्यांच्या आग्रहास्तव हे दोन शब्द लिहिले.

पुनश्च धन्यवाद व शुभेच्छा....

डॉ. विद्यासागर पाटंगणकर
उपप्राचार्य, प्रपाठक व मराठी विभाग प्रमुख
बलभीम महाविद्यालय, बीड.

मनीचे गूज...

हे पुस्तक म्हणजे मुळात पीएच. डी. पदवीसाठी लिहिलेला प्रबंध आहे. (यशवंतराव चव्हाण : व्यक्ती व वाङ्मय) हा प्रबंध मी २००२ साली सादर केला आणि आज २००९ साली आवश्यक ते संस्कार संक्षेप करून पुस्तक स्वरूपात प्रकाशित होत आहे. यानिमित्ताने मला आनंद होणे स्वाभाविक आहे.

श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या साहित्याचा अनेकांगी अभ्यास येथे सादर करण्यात आलेला असला तरी तसा तो सर्वांगीण अभ्यास नाही याची प्रस्तुत लेखकाला जाणीव आहे. यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाचा महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक जीवनावर वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटलेला आहे. ते राजकारणात गेले नसते तर एक जाणते साहित्यिक झाले असते. त्यांच्या लेखनात सातत्याने विपुल आणि विविध साहित्य गुणांचा अंतर्भाव झाला आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्याचा विविध दृष्टिकोनातून अभ्यास होणे शक्य आहे. त्याचप्रमाणे या ग्रंथात प्रकट झालेल्या दृष्टिकोनाविषयी देखील काही प्रमाणात मतभिन्नता होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वाङ्मयाच्या अभ्यासात हे अपेक्षिच असते. इतकेच नाही तर आवश्यकही असते. या ग्रंथातील प्रमेये मांडताना प्रस्तुत लेखकाने शक्य तेवढी तटस्थता राखण्याचा प्रयत्न केलेला असला तरी शेवटी त्याच्या विशिष्ट दृष्टीचे प्रतिबिंब त्यात पडले नसेलच असे म्हणता येत नाही.

मूळ प्रबंधात पृष्ठसंख्या अधिक असल्याने तो आहे तसा प्रसिद्ध करणे केवळ अशक्य होते. त्याचा संक्षेप करीत तो दोन भागात पुस्तक रूपाने प्रसिद्ध होत आहे. यशवंतराव चव्हाण हे केवळ राजकीय व्यक्तिमत्त्व नसून ते मूलत: एक साहित्यिक होते. ते साहित्यप्रेमीच नव्हे तर साहित्यिक प्रेमी, साहित्यनिर्माते आणि जीवनभाष्यकार होते. त्यांच्या साहित्याला समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेला गतिमान करण्याची ताकद लाभली आहे. 'शैलीकार यशवंतराव' हेच केंद्रस्थानी ठेवून प्रबंधाचे

पुनर्लेखन केले आहे. पुनर्लेखन करीत असताना संदर्भजडता कमी करून एक सलग, ओघवते असे विवेचन राहील याची दक्षता घेतली आहे.

प्रस्तुत पुस्तक म्हणजे श्री. यशवंतराव चव्हाण यांचे फक्त चरित्र किंवा त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांचा आढावा नव्हे तर यशवंतराव यांनी व्यक्ती म्हणून सिद्धहस्त साहित्यिक, राजकारणी, झंझावाती वक्ते, रसिक, लेखक अशा विविध रूपात अंत:करणातील कलावंत जिवंत ठेवला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील या विविध पैलूंचे साहित्यातील स्थान निश्चित करण्याचा हा एक अल्पसा प्रयत्न आहे.

माननीय श्री. यशवंतराव चव्हाण व्यक्ती म्हणून बालपणापासून मला परिचित होतेच. कारण त्यांचे आजोळ देवराष्ट्र, शिक्षणभूमी व कर्मभूमी कराड, विटा ही गावे माझ्या 'अमरापूर' गावापासून अत्यंत निकट आहेत. त्यामुळे शालेय शिक्षण घेत असताना एक नेता म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाशी माझा परिचय होता. शालेय शिक्षण संपल्यानंतर श्री. यशवंतराव चव्हाणसाहेबांचा साहित्यिक क्षेत्रातील दबदबा जाणवू लागला. एक राजकारणी व्यक्ती साहित्यिक असते किंवा पुस्तक लिहू शकते ही बाब मला अचंबित करणारी होती. हीच माझ्या लेखनाची प्रेरणा. त्यानंतर पुढील शिक्षण घेत असताना 'मराठी' या विषयाचा विद्यार्थी व पुढे मराठी विषयाचा अधिव्याख्याता म्हणून त्यांच्या ग्रंथाचा सखोल अभ्यास केला आणि त्यांच्या लेखनातील वैशिष्ट्ये ग्रंथरूपात मांडावी असे वाटू लागले. प्रस्तुत ग्रंथात एखाद्या संवेदनशील व्यक्तिमत्त्वाची जडणघडण कशी होते, त्यांचे शब्द कसे आकार घेतात यासंबंधी स्वतंत्र प्रकरणातून साकल्याने विचार मांडला आहे. यशवंतराव चव्हाण यांचे साहित्य लेखन, प्रासंगिक लेख, भाषाप्रभू लोकाभिमुख कलावंत आणि नेता म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख, त्यांची भाषणे व साहित्यातील भाषिक मूल्य, चरित्रात्मक, आत्मचरित्रात्मक, ललित स्वरूपातील लेखन, त्यातील

देशीयता, नागरता, पत्रात्मक लेखन या सर्वांचा प्रस्तुत पुस्तकात विचार करण्यात आला आहे. तसेच श्री. यशवंतरवांचा पिंड आणि त्यांची वाङ्मयनिर्मिती याचा परस्परानुबंध अधोरेखित केला आहे. हे लेखन करत असताना थोडीशी पुनरावृत्ती झालेली असली तरी मांडणीची गरज म्हणून ती झालेली आहे.

यशवंतराव चव्हाण यांच्यासंबंधी अनेक मान्यवर लेखकांनी लिहिलेल्या ग्रंथांचा या लेखनासाठी संदर्भ म्हणून उपयोग केला आहे. तसेच यशवंतराव चव्हाणांच्या लिखित व अलिखित भाषणांचा आम्हास या ग्रंथलेखनासाठी अमूल्य उपयोग झाला आहे. पुणे व शिवाजी विद्यापीठाने दिलेल्या डॉक्टर ऑफ लॉज व डॉक्टर ऑफ लेटर्स या पदव्यांचा या ग्रंथात समावेश करण्यात आला आहे. तसेच त्यांचे फोटो व वेगवेगळ्या ठिकाणी त्यांना मिळालेले मानसन्मान याचाही यथोचित योग्य ठिकाणी उल्लेख केलेला आहेच. हे करण्याचा आमचा हेतू त्यांचे शैक्षणिक कार्य व विचार तरुण पिढीला माहिती व्हावेत हाच आहे. या सर्व संस्थांचा व महनीय व्यक्तींचा मी अतिशय आभारी आहे.

प्रबंधाचे लेखन करत असताना अत्यंत जिव्हाळ्याने सतत प्रेरणा देणारे बलभीम महाविद्यालय, बीड येथील मराठी विषयाचे विभागप्रमुख डॉ. विद्यासागर पाटंगणकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाशिवाय या कार्याची सिद्धता होऊच शकली नसती. केवळ त्यांच्यामुळेच माझ्यातील लेखक आकारला गेला. किंबहुना मला साहित्यिक दृष्टी देऊन गुरुवर्यांनी माझ्याकडून जे लेखन करून घेतले त्याचेच फलित म्हणजे प्रस्तु ग्रंथ होय. या पुढेही मला त्यांचे मार्गदर्शन मिळावे. माझी साहित्य-क्षेत्रातील वाटचाल गतिमान होण्यासाठी त्यांच्या मार्गदर्शनाची गरज आहेच. म्हणून त्यांचे औपचारिक आभार मानून बाजूला होणे मला योग्य वाटत नाही. मी त्यांच्या ऋणातच राहू इच्छितो.

माझ्या या लेखनासाठी अनेकांनी मला मदत केली. श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे व आमच्या रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. अशोकराव जगताप यांनी अनेकदा माझ्या मनावरील उदासीनतेचे मळभ दूर करून मला संशोधन कार्यास प्रवृत्त केले. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नवव्या योजनेअंतर्गत मला 'टीचर रिसर्च फेलोशिप' मिळवून देण्यात मा. कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, माजी आमदार जी. एल. ऐनापुरे यांनी मार्गदर्शन व सहकार्य केले. तसेच माजी प्राचार्य उत्तमराव देशमुख, माजी प्राचार्य अनंतराव पाटील, प्राचार्य यशवंत पाटणे, प्रा. डॉ. आर. जी. पाटील यांचे वारंवार मार्गदर्शन मिळाले. त्यांचे ऋण मी व्यक्त करतो. आमच्या संस्थेच्या उपक्रमशील सचिव सौ. शुभांगीताई गावडे यांनी दिलेल्या आत्मबळाबाबत त्यांचा मी मन:पूर्वक आभारी आहे. संस्थेचे सहसचिव माझ्या महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. रमेश दापके यांच्या सुयोग्य मार्गदर्शनामुळेच हा ग्रंथ सिद्ध होऊ शकला. माझ्या लेखनाचा हा पहिला प्रवास त्यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्यामुळे व कौतुकामुळे सफल झाला. हा ग्रंथ सिद्ध करण्यात त्यांची जी मोलाची मदत झाली व जे प्रोत्साहन मिळाले ते आभार मानण्यापलीकडचे आहे. त्यांच्या ऋणात राहण्यातच मला जास्त समाधान आहे.

या ग्रंथलेखनाच्या वेळी मला अनेक परींनी अनेकांची मदत झाली. श्री. भारत गजेंद्रगडकर व प्रा. आनंदा जाधव यांच्याशी केलेल्या चर्चेचा मला उपयोग झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. प्रल्हाद जी. लुलेकर यांनी केलेले मार्गदर्शन व त्यांच्याबरोबर झालेल्या चर्चा उपयुक्त ठरल्या. त्यामुळे लेखनाची दिशा निश्चित झाली. ग्रामीण साहित्यिक प्रा. भास्कर चंदनशिव, सोलापूर विद्यापीठचे माजी संचालक डॉ. रामराव पाटील, प्राचार्य जयसिंगराव देशमुख यांच्याशी झालेल्या चर्चेचा मला खूप उपयोग झाला.

लेखनाचे महत्त्व आणि गरज पटवून देऊन या सर्वांनी मला लेखनासाठी प्रेरित केले. माझे सहकारी प्राध्यापक व मित्र यांनी केलेल्या सूचना मोलाच्या ठरल्या. या सर्वांचा मन:पूर्वक आभारी आहे.

माणूस समाजात वावरत असताना एखादी गोष्ट कानावर पडते. तीच गोष्ट घरातही सतत कानावर पडली तर त्या ध्येयाच्या दृष्टीने वाटचाल करण्याची कल्पना माणसाच्या मनाला भुरळ घालू लागते. घरातूनही मी लेखन करावे म्हणून सदैव पाठपुरावा करणारे माझे सासरे इतिहास संशोधक मा. गोपाळराव देशमुख यांना हे श्रेय द्यावे लागेल. स्वत:मधील साहित्य संस्काराची ज्योत आमच्यात तेवत ठेवण्याचा त्यांचा सदैव प्रयत्न असतो. माझ्या कुटुंबातील आईवडिल व इतर कुटुंबियांनी लेखन काळात मोलाचे सहाय्य करून मला कौटुंबिक ऋणात बांधून ठेवले आहे. त्यांचे ऋण शब्दातीत आहे.

प्रबंधाचा अभ्यास ज्या मित्रांच्या व संस्थेच्या साक्षीने झाला त्यामध्ये विवेकानंद कॉलेज कोल्हापूर येथील ग्रंथपाल संभाजी मोरे, रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्रीयुत नेताजी पाटील, सहग्रंथपाल सी. ए. कवडे, हिराचंद नेमचंद वाचनालय सोलापूर, वेणुताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट कराड, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, विभागीय केंद्र कराड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथील ग्रंथालय यांनी योग्य ते ग्रंथ उपलब्ध करून दिले. त्यांचेही मी मन:पूर्वक आभार मानतो.

माझी पत्नी प्रा. सौ. कौसल्या देशमुख हिने माझ्या कामात मोलाची मदत केली. मूळ हस्तलिखित प्रत मुद्रणासाठी तयार करणे, संदर्भ सूची तयार करणे इ. कामात मला तिची मदत झाली. शिवाय उत्कट प्रेरणा देऊन ग्रंथ कार्यसिद्धीस नेण्यासाठी प्रोत्साहन दिले. माझ्या दोन कन्या कु. शिवानी व कु. शर्वरी यांचाही

पुस्तकनिर्मितीत खारीचा वाटा उचलला, त्यांचे आभार कसे मानू?

श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी उपमुख्यमंत्री, गृहमंत्री मा. आर. आर. पाटील (आबा) माझ्या पुस्तकास शुभेच्छा देऊन माझे मनोबल वाढविले त्याबद्दल त्यांचा मी अतिशय आभारी आहे.

स्वामी रामानंदतीर्थ विद्यापीठ, नांदेडचे माजी कुलगुरू मा. खासदार डॉ. जनार्दन वाघमारे यांना आम्ही फोनवर संपर्क साधून, तसेच समक्ष भेटून प्रस्तावना लिहिण्याच्या केलेल्या विनंतीला प्रतिसाद देऊन अतिशय कार्यमग्न असतानांही या ग्रंथाला विस्तृत प्रस्तावना लिहिली. त्याबद्दल त्यांचा मी मन:पूर्वक आभारी आहे.

कौसल्या पब्लिकेशनच्या प्रकाशिका यांनी माझ्या पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारली. हे पुस्तक म्हणजे त्यांच्या प्रेरणेचे फळ आहे.

जंगम ऑफसेटचे मालक सदाशिव जंगम, त्यांचे चिरंजीव महेश जंगम, योगेश जंगम यांनी कमी वेळातच सुबक व आकर्षक स्वरूपात पुस्तकाची छपाई केली. सुप्रसिद्ध चित्रकार रविमुकुल यांनी अल्पावधीत या ग्रंथाचे कलापूर्ण मुखपृष्ठ तयार करून दिले. त्यांचे मन:पूर्वक आभार.

यशवंतराव चव्हाणांचे अभ्यासक, वाचक हा ग्रंथ त्यातील उणिवांकडे दुर्लक्ष करून स्वीकारतील, या माझ्या पहिल्या वहिल्या ग्रंथाचे वाचक, रसिक स्वागत करतील अशी आशा बाळगतो.

प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख
४/१८, विद्यानगर हाऊसिंग सोसायटी,
सिव्हिल हॉस्पिटलजवळ, सोलापूर

दि. १२ मार्च २००९

लेखानुक्रम

१. भूमिका - ३३
२. नात्यातील जिव्हाळा - ४६
३. चिरा चिरा हा घडवावा.... - ५९
४. आदर्शाची प्रभावळ - ७२
५. घरातील नाते-बंध - ८२
६. नेतृत्वाची उभारणी - १०६
७. महाराष्ट्राच्या सहकार चळवळीचे वारकरी - ११४
८. शैलीकार सह्याद्री - १२०
९. कृष्णाकाठची स्मृतिशिंपले... - १३८
१०. बंध-अनुबंध - १६२
११. काही जीवनादर्श - १६९
१२. भावलेल्या व्यक्ती - १९२
१३. केल्याने देशाटन - २०८
१४. ये हृदयीचे ते हृदयी... - २२२
१५. विचारशिल्प - २३७

भूमिका

व्यक्तिजीवन परिस्थिती सापेक्ष असते. परिस्थिती व्यक्तीला घडवते. व्यक्ती ही परिस्थितीला आकार देते. चौकटीत जसे चित्र शोभून दिसते तशी परिस्थितीच्या कोंदणात एखादी व्यक्तिरेखा उठून दिसते. अशीच व्यक्तिरेखा होती यशवंतरावांची ! त्यांचा वैचारिक पिंड मुख्यत: १९३० ते १९४० या काळात घडला. हा काळ महाराष्ट्राच्या जीवनातील वैचारिक संघर्षाचा कालखंड होता. या काळात महाराष्ट्रामध्ये वेगवेगळ्या विचारप्रणाली निर्माण झाल्या. गांधीवाद, समाजवाद, साम्यवाद, रॉयवाद यांची चर्चा एका बाजूला सतत चालू होती तर दुसऱ्या बाजूला सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रात म. गांधी, डॉ. आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विचारांची चर्चा सुरू होती. महाराष्ट्रात टिळक, आगरकर, रानडे, फुले, महर्षी शिंदे यांच्यामध्येही अशा वैचारिक लढाया होत होत्या. अशा काही प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे यशवंतराव प्रभावित झाले. त्यामुळे त्यांच्या जीवनाला भक्कम वैचारिक अधिष्ठान मिळाले. यशवंतरावांच्या राजकीय राजवटीमध्ये त्यांचा प्रभाव इतका मोठा होता की स्वातंत्र्योत्तर काळात तेवढा प्रभाव भारतातल्या कोणत्याही मुख्यमंत्र्याला पाडता आला नाही. पुढे ते दिल्लीला गेले. राष्ट्रीय नेते बनले. तरीही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव कायम राहिला. अशा या सर्जनशील नेतृत्वाचे वेगळेपण सर्वांच्या मनात नवा विश्वास निर्माण करणारे होते. अशा व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणे महत्त्वाचे वाटते.

यशवंतराव चव्हाणांनी अनेक उच्चपदे भूषविली. या पदावरून त्यांनी जे समाज प्रबोधन केले ते महत्त्वाचे आहे. ''राष्ट्रीय ऐक्यभाव, एकात्मतेची गरज, सामाजिक समता, आर्थिक विषमता, अस्पृश्यता आणि जातिभेद, साहित्य, शिक्षण व संस्कृती, कृषीक्षेत्र, औद्योगिक क्षेत्र व समाजरचना इ. संबंधींची त्यांची विचारसरणी मार्गदर्शक स्वरूपाची आहे. त्यांचे 'विचारधन' हा एक अभ्यासाचा स्वतंत्र विषय होऊ शकेल.

अशी जाणीव श्रीमंत छ. राजमाता सुमित्राराजे भोसले यांनी करून दिली आहे. यशवंतरावांच्या चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाचे अनेकांनी वेगवेगळ्या पद्धतीने वर्णन केले आहे. त्यांच्या कार्यावर भाष्य करणारे लिखाण भरपूर झाले आहे. पण तरीही यशवंतरावांच्या सर्व स्मृती सामान्यांपर्यंत पोहोचल्या आहेत असे म्हणता येणार नाही. म्हणूनच त्यांच्या कार्यपद्धतीवर व मोठेपणावर काही प्रकाश या पुस्तकाद्वारे पाडणे हिताचे वाटते. यशवंतरावांचे कितीतरी प्रसंग त्यांच्या आत्मचरित्रातून, आत्मकथनातून वाचवयास मिळाले. यशवंतरावांचे विचारमंथन या पुस्तकातून प्रकट करण्याचा हेतू आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्येही जाणून घेण्याचा माझा प्रयत्न आहे. त्यांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी व व्यक्तिमत्त्वाची वैचारिक प्रगल्भता या पुस्तकाच्या माध्यमातून वाचकांच्या समोर येणे महत्त्वाचे वाटते.

वक्तृत्व व कर्तृत्व यांचा संगम यशवंतराव चव्हाणांच्या सौजन्यशील व्यक्ति-मत्त्वात आपणास पाहावयास मिळतो. त्यांचे भारदस्त व्यक्तिमत्त्व त्यांच्या सहवासात येणाऱ्यास आकर्षून घेणारे होते. विरोधकांशीसुद्धा ते कधी फटकून वागले नाहीत. मोठ्या सन्माननीय व्यक्तींबद्दल आदर बाळगत असतानाच लहानांना सुद्धा सन्मानाने वागविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. माणसांना ओळखून त्याप्रमाणे काम देण्याची कला, साऱ्या जाती-जमातींना एकत्र घेऊन चालण्याची धडपड, यातून त्यांची लोकशाही वृत्ती दिसून येते. त्यांनी लोकशाही जोपासली. ते कोणत्याही प्रसंगी भावनेच्या आहारी जात नसत. योग्य वेळ आल्यावर आपले मत स्पष्ट मांडत. कुणाचाही मुलाहिजा ठेवत नसत. असे हे व्यक्तिमत्त्व अभ्यासू व विचारी वृत्तीचे होते. तसेच ते शांत स्वभावाचे होते. त्यांच्या स्वभावात सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची प्रवृत्ती होती. राजकारणाच्या धबडग्यात राहूनही स्वत:च्या चारित्र्याला जपणारा, सुसंस्कृत मनाचा हा साहित्यिक होता. हा माणूस स्वत:च्या कर्तृत्वाने जनतेच्या हृदयसिंहासनावर त्यावेळी आरूढ झाला होता.

यशवंतराव चव्हाणांनी अनेक छंद जोपासले. तरुणपणात हे छंद जोपासण्यासाठी राजकारणाच्या रगाड्यात वेळ मिळत नसला तरी माणसे जोडणे, त्यांना घेऊन पुढे जाणे यामध्ये मात्र ते यशस्वी झाले. मुद्दाम एखाद्याला दु:ख द्यावे, कोणाचा हेतूपूर्वक अपमान करावा असे त्यांच्या स्वभावात नव्हते. किंवा एखाद्याचे विनाकारण शत्रुत्व स्वीकारावे असे त्यांना वाटत नव्हते. ''मैत्रीचा भाव जिथे असेल तिथेच माझे मन रमते, अभाव असेल तर दु:ख होते. मैत्रीच्या वातावरणातच काम करायला मला आनंद वाटतो - आणि काम हे महत्त्वाचे असल्याने मैत्री राखण्यात माझा नेहमीच कटाक्ष असतो'' असे विचार यशवंतराव एके ठिकाणी व्यक्त करतात. म्हणनूच यशवंतरावांना त्यांच्या हयातीत लोकांचे अलोट प्रेम लाभले. माणसाला माणूस जोडत जाण्याची

विलक्षण हातोटी त्यांच्याकडे असल्याने साहित्यिकांचा व त्यांचा संबंध दृढ होई. ज्येष्ठ साहित्यिकांबद्दल त्यांना मोठा आदर वाटत असे. नवोदित लेखकांबद्दल त्यांच्या मनात कुतूहल निर्माण होई. संगीत साहित्याच्या मैफलीत ते रसिकतेने समरस होत असत. अशा व्यक्तींमध्ये अनेक नामवंत व्यक्ती होत्या. साहित्यिक, राजकारणी, लेखक, समाजसेवक, पत्रकार, सरकारी नोकर, सामान्य जनता इत्यादी. यातील काही मान्यवर व्यक्तींचा फक्त उल्लेख त्यांनी त्यांच्या साहित्यात केला आहे. विविध क्षेत्रांशी संबंधित अशा लोकांचे त्यांचे म्हणून असे एक स्वतंत्र सखोल, सर्वसमर्पित मत यशवंतरावांनी प्रकट केले आहे.

यशवंतरावांना साहित्यिकांबद्दलही आस्था होती. प्रसिद्ध साहित्यिकांपासून अगदी नवोदित साहित्यिकांपर्यंत आपले अभिप्राय स्वत:च्या हस्ताक्षरात त्यांनी कळविले आहेत. लोकमान्य टिळकांच्या नंतर अखिल भारतीय पातळीवर महाराष्ट्राचे स्थान निर्माण करणारा त्यांच्यासारखा महाराष्ट्रीयन नेता अपवादानेच आढळेल. केवळ महाराष्ट्राच्या नव्हे तर अखिल भारतीय समाज जीवनाच्या संदर्भात सर्वांगीण विचार करणारे असे हे एक थोर व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या धोरणातील समतोल, त्यांच्या साधेपणात भरलेले आकर्षण, सदैव कार्यक्षम असलेले मन आणि मराठी मातीचे आकर्षण, हे त्यांचे गुण महत्त्वपूर्ण आहेत. यशवंतरावांच्या दीर्घ तपश्चर्येचे यथार्थ दर्शन पुस्तकाच्या माध्यमातून मराठी वाचकांना घडवावे या प्रबल विचाराने प्रेरित होऊन मी हे पुस्तक लिहिण्याच्या कार्यास प्रारंभ केला. यशवंतराव चव्हाणांनी त्यावेळी विविध विषयांवर जे मूलगामी व साहित्यिक विचार अनेक प्रसंगांच्या निमित्ताने व्यक्त केले आहेत ते चिरंतन स्वरूपाचे आहेत. लोकजीवन समृद्ध करण्यासाठी चांगल्या साहित्य निर्मितीची गरज आहे. याची त्यांना खात्री होती. समाजाची सांस्कृतिक जडणघडण करण्याची जबाबदारी त्यांनी साहित्यिकांवर टाकली होती. कोणत्याही देशाची ओळख पटते ती तेथे निर्माण होणाऱ्या साहित्यकृतीमुळे ! भारत देश ओळखला जातो तो वेद, गीतांजली, ज्ञानेश्वरी, भगवद्गीता या महान ग्रंथांमुळे. या गोष्टींवर त्यांचा पक्का विश्वास होता. १ मे १९६० ला महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर मराठीला ज्ञानाची भाषा बनवण्याचे, देशात सामाजिक, सांस्कृतिक ऐक्य निर्माण करण्याचे काम त्यांनी साहित्यिकांवर सोपवले होते. त्यावरून त्यांचा साहित्यावरील आणि साहित्यिकां-वरील अपार विश्वास प्रत्ययास येतो. तुलनेने आजचे चित्र तेवढे समाधानकारक नाही. एक राज्यकर्ता असूनही त्यांनी साहित्यिकांना जे मानाचे स्थान दिलेले होते ते उल्लेखनीय आहे.

यशवंतराव चव्हाणांच्या सर्वस्पर्शी जीवनाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणारी

साहेबांची स्वलिखित पुस्तके, आठवणी, आत्मचरित्र विविध ठिकाणी त्यांची झालेली भाषणे यांनी माझ्या मनात एकच गर्दी केली आणि त्यातूनच त्यांच्यातील साहित्यिकाने मला आपोआप आकर्षित केले. इतकेच नव्हे तर त्यांच्या साहित्यविचारांनी मला मोहित केले. मराठीच्या वाङ्मयउद्यानात विहार करणाऱ्या या साहित्यिकाबद्दल व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल मला उत्सुकता निर्माण झाली. त्यांच्या गतकाळातल्या अविस्मरणीय स्मृती, त्यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान यांचे अभ्यास करणे गरजेचे वाटू लागले. भारताला ललामभूत ठरलेले श्री यशवंतराव चव्हाण यांचे यथार्थ दर्शन घडून त्यांच्यापासून प्रचलित तरुण पिढीस प्रेरणा मिळावी असे मला वाटते. यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत संपन्न, सुसंस्कारीत रसिक, अभिजात होते. अशा व्यक्तिमत्त्वांचा शोध घेणे महत्त्वाचे वाटते. यशवंतरावांच्या साहित्याचा तरुण पिढीला अभ्यास व संशोधन करण्यासाठी उपयोग व्हावा म्हणून माझ्या मनात यशवंतरावांच्या कार्याचा, त्यांच्या साहित्याचा अभ्यास करण्याची उर्मी निर्माण झाली. यशवंतरावांचे राजकारण, साहित्यकारण व सामाजिक कार्य यावर अनेक अंगांनी समग्रतेने अभ्यास करण्याची गरज आहे. तसेच यशवंतरावांच्या जीवनातील विविध अंगांवर प्रकाश टाकताना काही उणिवा जाणवत गेल्या किंवा जेथे एकांगी विचार मांडला गेला तोही अभ्यासकाच्या भूमिकेतून मांडणे महत्त्वाचे वाटते. यशवंतरावांच्या समग्र साहित्याच्या वाचनानंतर जे आकलन झाले ते विषयवार मांडणे महत्त्वाचे वाटते. त्यांच्या विचारांचा, साहित्याचा आधार घेऊन त्यावर चिंतन करण्याची गरज वाटते. या लेखनामुळे त्यांच्या विचारसरणीची दिशा कळू शकेल. समाज हेच त्यांच्या विवेचनाचे मुख्य सूत्र असल्याचे सर्वप्रथम जाणवल्याशिवाय राहात नाही. एक अभ्यासू, वैचारिक व्यक्तिमत्त्व वाचकांशी हितगुज करत असल्याचे निदर्शनास येईल. कलावंताचे हात असलेला असा हा साहित्यिक विचारांची शिदोरी घेऊन वाचकांसमोर येतो. त्यांचे व्यक्तिमत्त्व संवेदनशील असल्यामुळे त्यांनी साहित्यविषयक आपली निश्चित मते मांडली आहेत. मानवी जीवनातील प्रत्येक अंगावर साहित्याने प्रकाश टाकला पाहिजे. साहित्य हे देशाला मोठे करणारे असले पाहिजे. साहित्यिकांनी राष्ट्रीय जीवनाशी एकरूप व्हावे अशी त्यांची भावना होती. भारतीय विविधतेचा शोध घेऊन त्यातून भारतीयत्वाचा शोध घ्यावा व तो लोकांच्यापर्यंत पोचवावा अशी त्यांची साहित्यिकांकडून अपेक्षा आहे.

गेल्या ५० वर्षांत वैचारिक निबंध वाङ्मयात फार लक्षणीय भर पडली नाही. पण स्वातंत्र्योत्तर काळात या साहित्यात विचारांच्या लाटा आल्या. राजनीती, सामाजिक संस्था, धर्म व अर्थ नाना प्रकारचे जीवनविषयक प्रश्न इ. विषयांवर स्वतंत्र रीतीने व्यासंगपूर्ण लेखन साहेबांनी केले. निबंध व वैचारिक गद्य हे साहित्य प्रकार स्वातंत्र्योत्तर

काळात दुर्लक्षित होत चालले असतानासुद्धा असा एखादाच विचारवंत लेखक आपल्या स्वयंतेजाने झळकताना दिसतो. कारण वैचारिक साहित्य लेखनाला आवश्यक असणारी चिंतनशीलता आणि जीवनदृष्टी, व्यासंग व नवनवीन प्रश्नांची आव्हाने पेलण्याची उत्सुकता हे गुण त्यांच्याकडे होते. त्यांचे साहित्य अभ्यासताना या गोष्टी लक्षात येतात. या लेखकाच्या कसदार, सामाजिक जाणिवांतून, ध्येयदृष्टीतून या गद्य वाङ्मयाला स्वत:चा असा एक ताठ कणा मिळाला. समाजऋण जाणणारे व समाजात मिसळणारे हे लेखक असल्यामुळे त्यांच्या वैचारिक साहित्याला अनुभवाचे अधिष्ठान मिळाले. त्यांनी विचार प्रधान साहित्यात फार भरीव कामगिरी केली. स्वातंत्र्योत्तर काळात विचारवंतांची एक नवी पिढी उदयाला आली.

राष्ट्रीय वृत्ती आणि ज्ञाननिष्ठा यांची दीक्षा तरुणांना दिली पाहिजे. हा आग्रही विचार त्यांनी सतत मांडला. यावेळी जीवनवादी विचार कणखरपणे मांडलाच पाहिजे ही भूमिका त्यांनी घेतली. विचारनिष्ठ गद्यलेखन गंभीर प्रकृतीचे असले तरी त्याच्यातही लालित्य असते. तार्किक सुसंगती, खंडन मंडनाची उर्मी, शैली, अलंकारिकता, यामुळे त्यांच्या वैचारिक लेखनालाही वेगळे असे वैशिष्ट्य लाभले आहे. गेल्या पन्नास वर्षांत ललित गद्यात पुष्कळच लेखन झालेले दिसते. या वाङ्मयप्रकारात मुख्यत: प्रवास-वर्णनपर लेख, व्यक्तिचित्रे, ललितलेखन, आठवणी, अनुभव, लघुनिबंध आणि 'मी' च्या अनुभवांचे दीर्घलेखन इ. चा एकत्र विचार केला जातो. यशवंतराव चव्हाणांनीसुद्धा 'ऋणानुबंध' मध्ये बालपणात, तारुण्यात, गतआयुष्यात अगर राजकीय जीवनाच्या क्षेत्रात घडलेले अनेक प्रसंग, अनेक अनुभव इथे आठवणींच्या स्वरूपात सांगितले आहेत. एखादा विशेष लक्षात राहिलेला, वैशिष्टपूर्ण, जीवनात विशेष परिणाम करून गेलेला, नव्याने प्रथमच अनुभवाला आलेले प्रसंग किंवा घटना ते घेतात. ती घटना घडत असताना मनात कोणत्या प्रकारच्या भावना निर्माण झाल्या, प्रतिक्रिया कशा झाल्या, त्या अनुषंगाने कोणते विचार आले, त्याचा जीवनावर कोणता परिणाम झाला या संबंधीचे वर्णन त्यांच्या या पुस्तकात आलेले दिसते.

'ऋणानुबंधातील' एक एक ललित लेख म्हणजे यशवंतरावांचे आत्मगत होय. तो एक निवडक लेखांचा स्मृतिग्रंथ होय. आठवणींची सुरेख वीण त्याला आहे. आपल्या विविध अनुभवांचे, भाषणांचे, सहवासात आलेल्या व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाचे, वाचनाच्या आवडीचे रेशीमधागे जुळवून सुरेख असे जरतारी महावस्त्र विणले आहे. यात उल्लेखलेली माणसे, स्थळे, भावना, विचार यांच्याशी त्यांचा एक प्रकारचा ऋणानुबंध निर्माण कसा झाला ते स्पष्ट आठवणींच्या रूपात सांगितले आहे. असे लेखन करणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व समृद्ध आहे. ते राजकीय जीवनात मुरलेले आहे.

अनेक मोठमोठ्या व्यक्तींच्या घनिष्ठ सान्निध्यात ते आलेले आहेत. त्यांच्याशी ते बरोबरीच्या पातळीवर वागलेले आहेत. राजकीय क्षेत्रातील अनेकविध अनुभव अनुभवलेले आहेत. आपणास आलेल्या अनुभवांकडे तटस्थपणे, विनोदाने, गंभीरपणे, भावगर्भतेने पाहण्याची त्यांची वृत्ती आहे. या लेखांची भाषाही वैशिष्ट्यपूर्ण आहे. ती खास मराठी मनाचे प्रतिबिंब असलेली आहे. यशवंतराव त्यांच्या या आत्मपर लेखांनी वाचकांना मोहरून टाकतात तर प्रवास लेखांनी वाचकांना फेरफटका मारून आणतात. चिंतनपर लेखांनी वाचकांना विचारप्रवण बनवतात.

शब्दांच्या सामर्थ्यावर व सौंदर्यावर त्यांचा नितांत विश्वास होता. शब्द हे साहित्यिकाचे प्रमुख शस्त्र आहे असे ते म्हणत. एकूण विचार व चिंतन यांचा सुरेख व लालित्यपूर्ण असा पट या विविध स्वरूपाच्या लेखांतून गुंफलेला आहे. या सर्वच प्रकारच्या ललित लेखांतून यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्त्व साकार होत जाते. जीवनातील अनुभवांचा आविष्कार हीच या लेखकाची भूमिका आहे. समुद्रात आढळणाऱ्या लाटांप्रमारे क्षणोक्षणी नित्यनवे रूप घेण्याचे व त्या नव्या रूपांचे जीवनाच्या संदर्भात अर्थ शोधण्याचे नवीन अनुभव येथे दिसतात. त्यामुळेच त्यांचे लेखन बहुतेक आत्मनिष्ठ स्वरूपाचे आहे, असे म्हटले जाते. तसेच विचार, कल्पना, आठवणी यांचा सुंदर विकास आणि विलास त्यांच्या साहित्यात झालेला आपणास दिसून येतो. बालपणात आणि गतआयुष्यात रमणारी प्रकृती दिसते. वर्तमान, वास्तवाचे, सामाजिकतेचे भानही जाणवते. त्यांचे साहित्य वाचल्यानंतर चव्हाणसाहेबांचे राजकीय आणि साहित्यिक व्यक्तिमत्त्व मनावर ठसत जाते. यातील ललित लेखांचे जसे आकलन होत जाते तसे यशवंतरावांच्या मनाचा मागोवा, अनुभवांचा, भाषणांचे व त्यांच्या साहित्यिक मूल्यांचा शोध घेता येतो. यशवंतराव हे साहित्याचे भोक्ते होते. मराठी भाषेवर प्रेम करणारे लेखक होते. महाराष्ट्राच्या मराठी साहित्यात गौरवास्पद ठरावी अशी विविधरंगी कामगिरी त्यांच्या लेखणी, वाणीने केली. त्याचाही अभ्यास करणे गरजेचे वाटते.

आत्मचरित्र हा वाङ्मयप्रकार अव्वल इंग्रजी कालखंडात निर्माण झाला. हा वाङ्मयप्रकार कादंबरीइतकाच लोकप्रिय आणि महत्त्वाचा असा आहे. हा वाङ्मयप्रकार चरित्रापेक्षाही मोठा चैतन्यमय, चित्तवेधक आहे. या वाङ्मयप्रकारात आत्माविष्काराला अधिक वाव असतो. आयुष्यातील घटनांचे आविष्करण वास्तवाच्या पातळीवरून अभिव्यक्त करण्याच्या पद्धतीतून आत्मचरित्र या वाङ्मयाची निर्मिती होते. लेखकाने आपल्या व्यक्तिगत जीवनाची स्वत:च्याच शब्दात सांगितलेली कहाणी म्हणजे आत्मचरित्र असे स्थूलपणे म्हटले जाते. आत्मचरित्रामध्ये लेखक स्वत:ची कहाणी

स्वत:च सांगत असतो. त्यामुळे या वाङ्मयप्रकारात मानवी स्वभावाचे दर्शन घडवण्याचा प्रयत्न असतो. कारण त्याचे जीवनाचे अनुभव स्वत:च घेतलेले असतात. त्यामुळे माणसाला आपले दु:ख, आपले सुख कुणालातरी सांगण्याची इच्छा होते. अंतर्मनाच्या गाभाऱ्यात कुठल्यातरी कप्प्यात खदखदत असणारे, उन्मळून, उचंबळून येणारे, बाहेर पडण्यास आतुर असलेले आपले सुखदु:ख सांगितले पाहिजे असे वाटते. याचा व्यापक अर्थाने विचार करावयाचा झाल्यास कुणाच्याही जीवनाचा आणि अनुभवांचा स्वलिखित वृत्तांत आत्मचरित्र या सदरात बसू शकेल. त्यामुळे अनुभवाची तीव्रता इतर कोणत्याही वाङ्मयप्रकारापेक्षा आत्मचरित्राने अधिक असते. ''व्यक्तीच्या जीवनाचा, व्यक्तिमत्त्वाचा व कर्तृत्वाचा त्याने स्वत:च लिहिलेला इतिहास म्हणजे आत्मचरित्र.'' म्हणजेच आत्मचरित्रकारात सिंहावलोकनाच्या भूमिकेने जीवनातील विशिष्ट अशा कालखंडाचे किंवा कधी कधी संपूर्ण जीवनाचे निवेदन करावे लागते. जीवनानुभवाचे जिवंत दर्शनही आत्मचरित्रातून प्रकट झालेले असते. आपली जीवनानुभूती कलाकृतीमधून कलावंत प्रांजळपणे व्यक्त करतो.

लेखकाचे घर, त्याच्या कुटुंबातील मंडळी, सभोवतालचे वातावरण, परिसर, शाळा, शिक्षक मित्रमंडळी याचा कळत नकळत असा परिणाम लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीवर होत असतो. प्रत्येक मानवी कृतीचा जन्म माणसाच्या आत्मविषयक जाणिवेतून होत असतो. या जाणिवेला आणि स्वत:ला विसरून स्वत:कडेच तटस्थपणे पाहत गतजीवनातील स्मृती, आठवणी आणि त्याचवेळी त्यांचे कलात्मक लेखनही करणे महत्त्वाचे आहे. हे लेखन तटस्थ आणि आत्मप्रदर्शनपर होत असल्याने त्याला कलाकृतीचा घाट प्राप्त होतो. यातून वर्तमानाचे साद पडसादही व्यक्त होतात. म्हणून एखाद्या कालखंडाची साक्ष म्हणूनही आत्मवृत्त उपयोगी ठरू शकते. शिवाय मानवी व्यक्तिमत्त्वाचा शोध घेण्यासाठी आत्मचरित्राचा विविधांगी उपयोग होऊ शकतो. शिवाय हे वाङ्मय त्याच्या समाजाचे, संस्कृतीचे प्रतिबिंब असते. आत्मचरित्रातून एखाद्या साहित्यिकाच्या साहित्यकृतीचा अन्वय आणि आकलन अधिक सुलभ होऊ शकते. म्हणून यशवंतरावांसारख्या एखाद्या राजकीय नेत्याचे 'कृष्णाकाठ' सारखे आत्मचरित्र वाचताना त्याचा सखोल अभ्यास व्हावा अशी अपेक्षा आहे. यशवंतरावां-सारख्या एखाद्या नेत्याने वास्तव जीवन जगलेल्या आपल्यासारख्या हाडामांसाच्या माणसाची त्याने स्वत: सांगितलेली ती जीवनकथा असते. ती अस्सल असते, त्याला काल्पनिकतेचा स्पर्शही नसतो. त्यामुळे आत्मचरित्र वाचनातून मानवी स्वभाव आणि अनुभव यांच्यापर्यंत पोहोचण्याचा नवा अनुभव वाचकाला मिळत असतो.

यशवंतराव चव्हाणांनी जो विदेशी प्रवास केला तो जेव्हा ते केंद्रीय मंत्री होते तेव्हा

केला. (१९६३ ते १९७८) या प्रवासामध्ये विदेशातून त्यांनी जी पत्रे सौ. वेणूताईंना लिहिली त्या पत्रांचा संग्रह वाचल्यानंतर यशवतंरावांचे समृद्ध व्यक्तिमत्त्व लक्षात येते. त्यांचे व्यक्तिमत्त्व राजकीय जीवनात मुरलेले होते. त्यामुळे राजकीय जीवनाच्या क्षेत्रात घडलेले अनेक प्रसंग, घटना, अनेक अनुभव त्यांनी पत्ररूपाने सौ. वेणूताईंना सांगितले आहेत. अनेक मोठ्या व्यक्तींचे घनिष्ठ सान्निध्य त्यांना लाभले होते. त्यांच्याशी ते बरोबरीच्या पातळीवर वागलेही. त्यांनी अनेक राजकीय अनुभव घेतले. आपणास आलेल्या अनुभवांकडे मिस्किलपणे, तटस्थपणाने, भावगर्भतेने, गंभीरपणे पाहण्याची त्यांची वृत्ती कशी होती हे या पत्रसंग्रहावरून लक्षात येते. आशिया, आफ्रिका, युरोप, अमेरिका आणि अन्य छोट्या देशांना दिलेल्या भेटी, स्थळे, प्रसंग, घटना यांच्या नोंदी तर येतातच पण या विदेश यात्रांमध्ये राजकारणाबरोबरच त्यांची तत्त्वचिंतनशीलताही दिसून येते. त्याचबरोबर त्या पत्रांना साहित्यिक मूल्यही प्राप्त झाले आहे. त्यात साहित्य विलासही दिसतो. साहित्यनिर्मितीही साधली आहे. तसेच त्यांची जवळ जवळ सर्वच प्रवास वर्णने छोट्या काव्यात्म प्रवास लेखांनी बहरलेली आहेत. त्यात एक प्रकारची विविधता दिसून येते. एक प्रवासलेख दुसऱ्या प्रवास लेखासारखा असेल असे नाही. त्यामुळे त्यांच्या या प्रवास लेखाची गोडी वाढत जाते. त्यांचे हे प्रवासलेखन मराठी वाङ्मय प्रकारच्या वाटचालीतील एक मोठा 'दीपस्तंभ' आहे असे गौरवाने म्हणावेसे वाटते. यशवंतराव चव्हाणांच्या प्रवास लेखामध्ये तेथील जीवन, माणूस, त्याचा धर्म, कला, निसर्ग यावर ते सहज भाष्य करतात. त्यामुळे त्याच्या रंगरूपाला एक विशेष आगळेपण येते. सर्वच विषयांवर भाष्य करण्यासाठी असा वाव मिळणे किंवा संधी सापडणे ही बाब याच वाङ्मयप्रकारात घडू शकते. दुसऱ्या साहित्यप्रकारातून त्याची संभाव्यता कमी असते. कारण लेखकाने कमी वेळेत हे सर्व पाहिलेले असते. त्यात अनुभव विश्वाचा आगळेपणा असतो आणि हा आगळेपणा त्याला एक वेगळे वाङ्मयीन रूप देण्यास कारणीभूत होतो.

साहित्यकार आपल्या अभिव्यक्तीसाठी वेगवेगळी माध्यमे शोधत असतो. आणि या माध्यमांमध्ये शब्दचित्र किंवा व्यक्तिचित्र हे एक प्रभावी माध्यम आहे. १९४० नंतर मराठीमध्ये हा वाङ्मयप्रकार प्रचलित झालेला दिसतो. शब्दचित्र, व्यक्तिचित्र, स्वभावचित्र इ. पर्यायी शब्द प्रचलित आहेत. हा वाङ्मयप्रकार प्रभावशाली व सांकेतिक आहे. कारण त्याच्यामध्ये थोड्याशा शब्दांत पुष्कळ काही सांगण्याची शक्ती असते. शब्दचित्र हे प्रथम शब्दांनी काढलेले चित्र असते. व्यक्तिचित्र आणि आठवणी यांचा संबंध अत्यंत निकटचा आहे. जीवनातील एखाद्या प्रसंगावर किंवा घटनेवर व्यक्तिचित्र लिहिले जाऊ शकते. मराठीतील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ साहित्यकारांनी या वाङ्मयप्रकारात

मोठ्या कौशल्याने भर घातली आहे. त्यांच्या प्रतिभेचा मनोज्ञ आविष्कार त्यांनी रंगवलेल्या व्यक्तिचित्रणामधून झालेला आढळतो. यशवंतरावांनी व्यक्तिचित्रणामध्ये जी माणसे चित्रित केली आहेत. ती जीवनाच्या विविध क्षेत्रांतील आहेत. त्यामध्ये साहित्यिक, प्रकाशक, नाटककार, समाजसुधारक यांचा समावेश आहे. राजकीय नेते, इतिहासातील काही व्यक्ती आहेत. महाराष्ट्रास चिरपरिचित असलेल्या अनेक थोरा-मोठ्यांची व्यक्तिचित्रे यशवंतरावांनी रेखाटली आहेत. यशवंतरावांनी रंगवलेल्या व्यक्तिचित्रणामध्ये सर्वाधिक प्रभावी असलेले व्यक्तिचित्रण म्हणजे त्यांची आई विठाई आणि पत्नी वेणूताई. ज्यांची व्यक्तिचित्रे यशवंतरावांनी रेखाटली ती अखेर माणसेच होती. याची त्यांना पूर्ण कल्पना होती. त्यामुळे त्या व्यक्तींच्या गुणांबरोबरच त्यांचे दोष किंवा त्यांच्या मर्यादा ओळखून ते तितक्याच स्पष्टपणे सांगतात. माणसे समजून घेण्यासाठी हवा असणारा मनाचा मोठेपणा आणि हळुवारपणा साहेबांच्या जवळ होता. बाह्य सौंदर्यासोबत व्यक्तीच्या अंतरंगाचे सौंदर्य न्याहाळून, संवेदनशील व चिंतनशील वृत्तीने ही शब्दचित्रे साकारली आहेत. कधी गौरवाने, कधी मित्रत्वाच्या प्रेमाने तर कधी त्या व्यक्तीच्या अलौकिक गुणांनी दिपून जाऊन तर कधी कौतुकाने ही व्यक्तिचित्रे साकारली आहेत.

यशवंतरावांनी गांधी, नेहरू, राधाकृष्णन, काकासाहेब गाडगीळ, धनंजयराव गाडगीळ इ. समकालीनांविषयी लिहिले आहे. साहित्यिकांमध्ये खाडीलकर, केळकर, खांडेकर, माडखोलकर, यांच्याबद्दलच्या आठवणी लिहिल्या आहेत. या राष्ट्रीय पुरुषां-बद्दल यशवंतरावांनी मोजक्या शब्दात चरित्र लेखन केली. छत्रपती शिवाजी, लोकमान्य टिळक, रविंद्रनाथ टागोर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छ. शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे इ. विषयी प्रसंगानुरूप त्यांनी लेखन केले आहे. कांही कार्यक्रमांतून त्यांनी जी व्याख्याने दिली आहेत. त्यातून या थोर विभूतींवर प्रकाश टाकला आहे. विविध क्षेत्रांशी संबंधित अशा लोकांचे त्यांचे म्हणून असे एक सखोल सर्वस्पर्शी मत यशवंतरावांनी प्रकट केले आहे.

यशवंतरावांच्या समाजजीवनावरच विविध विचार प्रवाहांचा आणि व्यक्तींचा प्रभाव पडला आहे. यशवंतरावांच्या वाङ्मयीन प्रकृतीची जडणघडण विविध लेखक कवींच्या वाङ्मयीन वैशिष्ट्यातून झाली असली तरी काही राजकीय व्यक्तींच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर झालेला दिसतो. यामध्ये म. गांधी, पं. नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, लालबहादूर शास्त्री, मोरारजी देसाई, यतिंद्रनाथ दास यांच्यासारख्या देशप्रेमी व्यक्तींचा, आई विठाबाईचा व आजोळची माणसे यांच्या संस्काराचा आणि विचारांचा फार मोठा वाटा आहे. यशवंतरावांचा जन्मच ग्रामीण कुटुंबात झाल्यामुळे त्यांच्यावर धार्मिक-

सांस्कृतिक संस्कार झालेले आहेत. भजन, कीर्तन, पोथ्या, पुराण इ. चे श्रवण त्यांनी बालवयातच केले आहे. साहजिकच त्याचा परिणाम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो. खेड्यात जन्मलेल्या यशवंतरावांनी ग्रामीण जीवनाच्या प्रगतीचा विचार सातत्याने पुढे मांडला. ग्रामीण जीवन, तेथील माणसे, त्यांच्या जीवन जगण्याच्या पद्धती, रीति-रिवाज व परंपरा यांच्या सदैव निरीक्षणातून समर्थ विचार देत राहिले. बालपणातील हे संस्कार आणि सातत्याने केलेले वाचन यातून त्यांचा पिंड घडला. मराठी संत परंपरा, थोर पुरुषांची चरित्रे, सुधारकांच्या परंपरा, लोककलेच्या परंपरेचा वारसा यांसारख्या अनेक गोष्टी यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाला पोषक ठरल्या. यशवंतरावांच्या पुढील वाटचालीत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, एम्. एन्. रॉय, विठ्ठल रामजी शिंदे, आचार्य भागवत, राम मनोहर लोहिया, प्रा. ना.सी.फडके, ह. रा. महाजनी, प्राचार्य बाळकृष्ण यांच्या सहवासाचा त्यांना फार मोठा लाभ झाला. त्यातून त्यांचा वैचारिक पिंड घडला. हा कालखंड यशवंतरावांच्या उमेदीचा कालखंड होता. तर राजकीयदृष्ट्या स्वातंत्र्यचळवळीचा होता. साहित्यिक दृष्ट्या फडके, खांडेकर व रविकिरण मंडळ यांचा कालखंड होता. हाच कालखंड त्यांच्यावर सामाजिक व साहित्यिक संस्कार होण्यास प्रेरणादायी ठरला. अभिजात रसिकवृत्ती निर्माण होण्यास योग्य ठरला. याच काळात त्यांचा नाट्य, संगीत, विविध कला यांच्याशी संबंध आला. स्वातंत्र्य चळवळ त्यांच्या जाज्वल्य देशनिष्ठेला उपकारक ठरली व 'बहुआयामी' असे व्यक्तिमत्व तयार झाले. बहुश्रुत, धुरंदर, अभ्यासू राजकारणी, मितभाषी, प्रभावी वक्ता अशा सर्व प्रांतात त्यांनी लौकिक मिळवला.

यशवंतरावांना मार्क्सवादी विचारांच्या प्रभावाची जाणीव होती. समाज-परिवर्तनासाठी त्यांना त्याची आवश्यकता वाटे. पण मार्क्सची कडवी बांधिलकी त्यांनी स्वीकारली नाही. समाजवादानेही ते विशेष प्रभावित झाले नाहीत. साम्यवाद, समाजवाद आणि पुढे आलेला गांधीवाद या विचारप्रवाहांचा यशवंतरावांच्यावर प्रभाव पडल्यामुळे त्यांनी नकळत या सर्व मतमतांतरांचा तुलनात्मक विचारही केला आहे. व्यक्तिविकासासाठी त्यांना गांधीवाद सुसंगत वाटतो. गांधीवादाचे महत्त्व व ममत्व वाटते. फ्रॉइड बाबतही असाच विचार केला आहे. पण गांधीजींच्या विचारांचे ते अनुयायी झाले. यशवंतरावांच्या वैचारिक भूमिकांचा अभ्यास करताना एक गोष्ट लक्षात येते की ते कोणत्याही वैचारिक भूमिकेचे चिकित्सेने सर्वांगीण निरीक्षण करतात आणि त्यात काय नाही यापेक्षा काय आहे आणि त्याचा मानवी जीवनाला कोणता उपयोग होईल या दृष्टीने विचार करतात. यामुळे त्यांच्या विचारात कुठेही एकांगीपणा दिसत नाही. तद्वतच ते सर्व पातळीवरून विचार करतात. जीवनाचा, समाज-जीवनाचा आणि

देश, काल, परिस्थितीचा विचार तेथे अपरिहार्य ठरतो.

यशवंतरावांचे कौटुंबिक जीवन, वैवाहिक जीवन आणि त्यांचे राजकीय जीवन हे परस्परांत मिळून गेले आहे. अनेक संकटांना पार करीत अविचल निष्ठेने संघर्ष करीत त्यांनी महाराष्ट्राचे पुरवठा मंत्री म्हणून सुरूवातीस पदभार स्वीकारला. पुढे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून ते भारताच्या उपपंतप्रधानापर्यंत मजल मारली. त्यांच्या व्यक्तिगत जीवनाचे चढउतार आणि त्यांच्या जीवनातील निवडक आठवणी यांतून चव्हाणांच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीचा परिचय करून घेणे आवश्यक होते. कारण त्यांच्या लेखनाला आणि भाषणाला जी सामुग्री मिळाली त्याची पाळेमुळे त्यांच्या प्रत्यक्ष जगण्यात रुतलेली आहेत. राजकारण आणि साहित्य यांचे नाते कसे जवळचे आहे हे दाखविण्यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. साहित्यिकांच्या मतांचा आदर केला व आपले साहित्यिक मनही जपले. साहित्यप्रेमी म्हणून त्यांनी आपली प्रतिमा निर्माण केली.

ललित लेखन हा यशवंतरावांचा आवडता वाङ्मयप्रकार आहे. हा वाङ्मयप्रकार आत्मनिष्ठ स्वरूपाचा असतो. ललित लेखन या वाङ्मयप्रकारात त्यांनी आत्म-लेखनात्मक, प्रवासवर्णनपर, स्फुट, व्यक्तिचित्रणात्मक आठवणी, स्फुट चरित्रात्मक लेख, वैचारिक लेखन, पत्रात्मक वाङ्मय इ. स्वरूपातील लेखन केले आहे. त्यांच्या 'कृष्णाकाठ', 'ऋणानुबंध', 'युगांतर', 'भूमिका', 'शिवनेरीचे नौबती', 'विचारधारा', विदेशदर्शन', 'यशवंतराव चव्हाण - शब्दाचे सामर्थ्य', 'सह्याद्रीचे वारे' इ. ग्रंथातून त्यांच्या ललित प्रकृतीचा आपल्याला परिचय होतो. त्यांचे ललित लेखन हे वृत्तपत्रे, नियतकालिके पुरवण्या, दिवाळी अंक, विशेषांक, स्मरणिका, अभिनंदनपर ग्रंथ, इत्यादीतून प्रसिद्ध झालेले दिसते. यशवंतरावांनी ललित लेखनात साचेबद्ध स्वरूप न ठेवता मुक्तपणे लेखन केले आहे. त्यात विविधता आहे. त्यांच्या सानिध्यात आलेल्या व्यक्तीवरील त्यांचे लेख आस्वाद्य आहेत. त्या व्यक्तीच्या निमित्ताने एखादा विचार, एखादे तत्वही ते सांगतात. यशवंतरावांचा जनसंपर्कही किती मोठा होता हे या निमित्ताने कळते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा मुक्त आविष्कार हे त्यांच्या ललित लेखनाचे वैशिष्ट्य आहे. हीच त्यांची भूमिका आहे. त्यांच्या ललित लेखनाला भावनेची डूब असल्यामुळे ते लेखन काव्यात्मकतेकडे झुकले आहे. त्यात लालित्य आहे. जीवनावरील प्रेम आहे. डोळसपणे सर्व अनुभवाला सामोरे जाणे, स्वत:विषयी प्रांजळपणे व मोकळेपणाने बोलण्याची वृत्ती इत्यादी वैशिष्ट्ये त्यांच्या ललित लेखनात आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील चिंतनशीलता, काव्यात्मकता, निखळ सौंदर्यदृष्टी, अंतर्मुखता इत्यादी गुण ललित लेखनात उतरले आहेत. मात्र 'सागरतट', 'यमुनाकाठ' हे त्यांचे संकल्पित

आत्मचरित्राचे खंड मात्र अपूर्ण राहिले. 'कृष्णाकाठ' ने त्यांचे बालजीवनापासून ते प्रौढजीवनापर्यंतचा पट साकारला आहे. आत्मचरित्र निर्मितीसाठी प्रतिभाशक्तीची, स्मरणशक्तीचा, कल्पकतेचा व संवेदनशील शक्तीचा परिपूर्ण वापर केला आहे. जीवनातील विविध प्रसंग अचूक आणि मार्मिक शब्दात शब्दांकित केले आहे. त्यामुळे ते प्रसंग, घटना जिवंत साकारलेल्या आहेत. आत्मनिष्ठा, व्यक्तिनिष्ठा, वस्तुनिष्ठा, विचारचिंतन याचे स्थान, व्याप्ती त्यांनी आपल्या 'कृष्णाकाठ' मध्ये जागोजागी निश्चित करून त्यासंबंधी तारतम्य ठेवलेले आहे. यातील लेखनाची शैली यशवंतरावांच्या लालित्य व नम्रता या गुणांनी समृद्ध आहे.

यशवंतरावांचे चरित्रात्मक लेख आकाराने छोटे आहेत, पण त्यात अनेक गुण दडलेले आहेत. या चरित्रांमधून त्यांच्या बुद्धीची असामान्य साहित्यिक चमक प्रत्ययास येते. त्यांच्या भाषणात हे चरित्र लेखन ओघानेच येते. त्या त्या व्यक्तीचे समग्र जीवन दर्शन घडवावे असे त्याचे स्वरूप नसून त्या व्यक्तीसंबंधीची माहिती आणि आठवणींचा उल्लेख करून त्या व्यक्तीच्या जीवनाचे अधोरेखन केले आहे. एक-दोन मार्मिक वाक्यातून ते त्या व्यक्तीच्या गुणवैशिष्ट्यावर प्रकाश टाकतात. त्यासाठी त्यांना वाक्यांचा आणि शब्दांचा डोलारा उभा करावा लागत नाही. नेमक्या शब्दात एखाद्या व्यक्तीतील गुण हेरून ते सांगण्याची कला त्यांच्याकडे होती. चरित्रात्मक लेखनातून त्यांनी विविध व्यक्तींचा त्यांच्या वैचारिक वैशिष्ट्यांसह मागोवा घेतला आहे. उदा. छ. शिवाजी महाराज, छ. शाहू महाराज, लो. टिळक, रविंद्रनाथ टागोर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित नेहरू, लालबहादूर शास्त्री, कृ. प्र. खाडिलकर, वि.स. खांडेकर, ग.त्र्यं. माडखोलकर, ग.दि. माडगूळकर आदींचा उल्लेख आवर्जुन केला पाहिजे. चरित्र लेखनातून घटना प्रसंगांच्या सहाय्याने मोजक्या शब्दांच्या चरित्रामधील मानव्याचा शोध घेतला आहे.

यशवंतरावांनी आपल्या साहित्यात स्थलवर्णन, प्रसंगवर्णन, व्यक्तिचित्रण व चरित्रलेख यांचा समावेश केला आहे. आई विठाबाई, आचार्य भागवत, कुलसुमदादी, कृष्णा धनगर, आत्माराम पाटील यांसारख्या अनेक उठावदार व्यक्तिचित्रांचा त्यात समावेश आहे. त्यांच्या संपर्कात आलेल्या विविध व्यक्तींचे मनोज्ञ दर्शन त्यांनी घडविले आहे. या सर्व व्यक्ती वास्तवातील असून त्यांचे शब्द, रूप, आविष्कार म्हणजेच यशवंतरावांची व्यक्तीचित्रे होय. यशवंतरावांनी केलेल्या व्यक्तिचित्रणामध्ये लहानथोर असा भेदभाव नाही. केवळ श्रेष्ठ व्यक्ती प्रमाण मानून त्यांनी त्यांची व्यक्तीचित्रे रेखाटली नाहीत. तर सामान्य व्यक्तींचाही त्यात समावेश होतो. व्यक्तिचित्रणामध्ये त्या व्यक्तींचे रागलोभ, स्वभाव इ. सह अनेक कंगोरे सूक्ष्मनिरीक्षणाने चित्रित केले आहेत.

यशवंतरावांनी साहित्याच्या अनेक अंगांना आपल्या लेखणीने स्पर्श केला आहे. त्याचप्रमाणे प्रवासवर्णन हे क्षेत्रही सुटलेले नाही. 'प्रवासवर्णन' या वाङ्मयप्रकाराची तत्वचिंतनात्मक बाजू वाढवून आपल्या प्रगल्भ व्यक्तिमत्वाचा आविष्कार त्यांनी जागोजागी केला आहे. तसेच 'केल्याने देशाटन', 'शांतिचितेचे भस्म' या प्रवासवर्णनात्मक लेखातून त्यांचे जीवनचिंतन प्रकटते. प्रवासवर्णनात्मक लेखामधून प्रदेश आणि प्रवृत्ती यांचा समन्वय साधून त्यांनी केलेले लेखन मोलाचे वाटते. प्रवासवर्णनात त्यांची रसिकता, चिंतनशीलता दिसते. 'विदेशवर्णन'मधील त्यांचे लेखन पत्ररूपाच्या चौकटीमध्ये अधिक बसणारे आहे. प्रवासवर्णनामध्ये राजकीय आशयाचे रंग भरण्याचा व साहित्यिक दृष्टीने प्रवासवर्णन लिहिण्याचा यशवंतरावांचा प्रयत्न लक्षणीय असाच आहे. प्रवासवर्णनात राजकीय वृत्तान्तांचा ऊहापोह करणारी आणि आपल्या प्रवासवृत्ताला पत्ररूपाने उजळ करणारी त्यांची भाषाशैली त्यांचे वेगळेपण दर्शवून जाते.

यशवंतरावांच्या समग्र साहित्याचा अभ्यास करताना त्यांच्या पत्रात्मक लेखनाचा विचारही प्रस्तुत पुस्तकामध्ये केला आहे. त्यांच्या पत्रांना साहित्यसृष्टीत व जनमानसात विशेष असे महत्त्व आहे. त्यांच्या पत्रलेखनातून नितळ विचार, उत्कृष्ट पण विवेक नियंत्रित भावना, अंत:करणातील जिव्हाळा, पुरोगामी विचारसरणी, त्यांचे निर्व्याज व निरागस मन, सौंदर्यदृष्टी, तत्कालीन राजकारणाबद्दलचे अल्पशब्दातील मत, एखाद्या हिडीस गोष्टीबद्दलची त्यांना वाटणारी चीड याचे प्रतिबिंब त्यांच्या पत्रलेखनात पाहावयास मिळते. तसेच अंतरंगातील भावनांचाही प्रत्यय येतो. त्यांनी खाजगी पत्रातून अनेक वाङ्मयीन चर्चा व मतमतांतरे व्यक्त केली आहेत. यशवंतरावांसारखा एखादा रसिक वाचक जेव्हा एखाद्या प्रथितयश लेखकास वाङ्मयीन मते पत्राद्वारे कळवतो तेव्हा त्या पत्रांना वाङ्मयीन महत्त्व आपोआप प्राप्त होते.

यशवंतरावांचा पिंड ललित लेखकाचा होता. त्यामुळे त्यांनी केलेले गद्यात्मक वैचारिक लेखन लालित्याचा धर्म घेऊन येते. त्यांच्या वैचारिक गद्यलेखनात त्यांच्या सकस आणि संपन्न विचारांचे दर्शन घडते. या वैचारिक लेखनामध्ये राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक विचारांचा समावेश होतो. या लेखनाचे स्वरूप प्रामुख्याने गंभीर, वैचारिक आणि चिंतनपर असल्यामुळे त्यांच्या वैशिष्ट्यांचा स्वतंत्रपणे विचार करावा लागेल. यशवंतरावांच्या वाङ्मयात एवढी विविधता आहे की कधी कधी हे वाङ्मयप्रकार परस्परात कधी मिसळून गेले हे कळत नाही.

○ ○ ○

नात्यातील जिव्हाळा

ज्या ठिकाणी भव्य व दिव्य घडते अशाच ठिकाणी आदरणीय व वंदनीय महापुरुष जन्माला येतात. तशी या महाराष्ट्राला संतपुरूषांची आणि वीरपुरूषांची परंपरा आहे. या भूमीत हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी भारतीय जनतेस स्वातंत्र्यसूर्याचे दर्शन घडविले. याच महाराष्ट्राच्या भूमीत मराठी वीरांनी आपल्या प्राणाची आहुती देऊन नवा इतिहास घडविला. याच भूमीत म. ज्योतिराव फुले यांनी सामाजिक विषमतेविरूद्ध सर्वांगीण सुधारणेचे रणशिंग फुंकले. सत्यशोधकी विचार गोरगरिबांपर्यंत आणि सामान्य जनतेपर्यंत पोहचविण्याचे कार्य राजर्षी शाहू महाराजांनी या भूमीत केले. ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळवणारच ...!'' हा मंत्रही लो. टिळकांनी याच भूमीत दिला. शिक्षण हा सर्व सुधारणांचा पाया आहे. हे कृतीने कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सिद्ध करून दाखविले. अशा या कर्मभूमीतच अत्यंत संयमी पण कणखर छाती असलेले, अभ्यासू व विचारी वृत्ती असणारे, अतिशय शालीन व स्वभावात गोडवा असलेले, काळ, वेळ व परिस्थिती पाहूनच वागण्याची कसोटी असलेले, शासन दरबारी सर्वांना बरोबर घेऊन काम करण्याची प्रवृत्ती बाळगणारे, स्वत:च्या चारित्र्याला जपणारे, सुसंस्कृत मनाचे, कलाविषयी आवड असणारे व कलावंताविषयी आदर व प्रेम बाळगणारे, नीरक्षीर विवेक असलेले, सत्तेचा ताठा न बाळगणारे असे अभ्यासू वृत्तीचे, शांत स्वभावाचे, व्यक्तिमत्त्व म्हणजे यशवंतरावजी चव्हाण होय !

पूर्वीच्या सातारा व आजच्या सांगली जिल्ह्यातील तत्कालीन खानापूर व सध्या नवीन झालेल्या पलूस तालुक्यात यशवंतरावांचा जन्म झाला. यशवंतरावांच्या जन्मतारखेबाबत त्यांच्या चरित्रकारांनी दोन वेगवेगळ्या नोंदी केलेल्या दिसतात. ''यशवंतराव चव्हाण' या चरित्रपर ग्रंथात लेखक अनंतराव पाटील यांनी यशवंतरावांचा

जन्म त्यांच्या आजोळी देवराष्ट्र येथे १२ मार्च १९१३ रोजी झाला असे नमूद केले आहे. तर ''यशवंतराव चव्हाण चरित्र दर्शन'' या ग्रंथामध्ये लेखक डॉ. पंजाबराव जाधव यांनी त्यांच्या जन्मतारखेची नोंद पुढीलप्रमाणे केलेली आहे....

''बळवंतराव यांना ज्ञानदेव, गणपतराव व यशवंतराव असे तीन मुलगे व राधाबाई ही एक मुलगी होती. यशवंतरावांचा जन्म ता. १२ मार्च १९१३ साली देवराष्ट्र या त्यांच्या आजोळी झाला. त्यांचे मामा दाजी घाडगे हे तेथे शेती करून उपजीविका करीत असत. त्यांच्या प्रेमळ छायेतच यशवंतरावांचे बालपण गेले.'' या जन्मनोंदीला आणखी दुजोरा देणारे मत ''यशवंतराव - राष्ट्रीय व्यक्तिमत्त्व'' संपादक - भा. कृ.केळकर या संपादित ग्रंथात तर्कतीर्थ लक्ष्मण जोशी यांनी सातारा जिल्ह्यातील मागासलेल्या ग्रामीण भागात म्हणजेच देवराष्ट्र या लहानशा गावात १२ मार्च १९१३ ला, अत्यंत गरीब शेतकरी कुटुंबात श्री. यशवंतराव चव्हाणांचा जन्म झाल्याचे नमूद केले आहे. 'यशवंतराव चव्हाण' या चरित्र ग्रंथात लेखक बाबूराव काळे यांनी उपरोक्त मताला छेद देणारी, त्यांच्या जन्मतारखेची नोंद केली आहे. ती पुढीलप्रमाणे ..... ''विट्यास तीन चार वर्षे नोकरी झाल्यावर बळवंतरावांची बदली कराड कोर्टात झाली. त्यांना ज्ञानोबा व गणपतराव हे दोन मुलगे व राधाबाई ही मुलगी. अशी तीन खेळती मुले होती. यशवंतराव हे सर्वात लहान, फार तर वर्ष-दीड वर्षाचे असतील. यशवंतरावांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी त्यांच्या आजोळी देवराष्ट्र या गावी झाला. असं हे पाच-सहा माणसांचं लहान मुलांनी गजबजलेले कुटुंब कराडला येऊन स्थिरस्थावर होते न होते तोच प्लेगची मोठी साथ सुरू झाली व त्या रोगानेच बळवंतरावांची आहुती घेतली.'' 'इतिहासाचे एक पान' या राम जोशी लिखित चरित्र ग्रंथांमध्ये..... सूर्यास्ताची वेळ, अजून कडूसं पडलं नव्हतं. सागरोबाच्या मंदिरातील घंटा मधूनमधून घणाणत होती. शिरस्त्याप्रमाणे सायंकाळच्या दर्शनासाठी सागरोबाच्या - शंभु महादेवाच्या मंदिरात लोक यायचे. ''ॐ नमो: शिवांय'' चा नाद अशा वेळी मंदिराच्या गाभाऱ्यातून दऱ्याखोऱ्यात पसरू लागायचा. त्या लहरी मग गावापर्यंत पोहचत, गावाच्या पलीकडे झुळझुळणारा सोनहिरा ओलांडून त्या लहरी पलीकडे जात. रानात चरायला गेलेली जनावरे सोनहिऱ्याच्या वाळवंटात हुंदडत असायची. गुराख्याच्या हातातल्या काठीवरील घुंगरांचा आवाज ऐकला की, मग वाळवंट सोडून गावातल्या गोठ्याकडे जाताना रस्त्यावर त्यांची गर्दी होऊ लागे. अशाच एका संध्याकाळी 'यशवंतराव' या बालकाचा देवराष्ट्र या गावात जन्म झाला. ता. १२ मार्च १९१४ या दिवशी!''

'कृष्णाकाठ' या आत्मचरित्रात लेखक यशवंतराव चव्हाण यांनी स्वत:च्या जन्मनोंदीचा उल्लेख पुढील शब्दात केला आहे. ''माझा जन्म १९१३च्या १२ मार्च रोजी झाला शाळेचे सर्टिफिकेट एवढाच त्याचा पुरावा आहे. मी माझ्या आईचे पाचवे किंवा सहावे अपत्य असल्यामुळे माझ्या जन्माची नोंद कोणी ठेवण्याची काळजी घेतली नाही.'' अशा विविध मतांचा परामर्ष घेतल्यानंतर आपणास असा निष्कर्ष काढता येईल की, यशवंतरावांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजीच झाला. यास सबळ पुरावा म्हणून मी प्रत्यक्ष ते ज्या टिळक हायस्कूल कराड येथे शिकत होते तेथे जावून हजेरीपट नोंदवही पाहिली असता त्यांची जन्मतारीख १२ मार्च १९१३ हीच आहे. यास आणखी पुरावा द्यायचा तर कराड नगरपालिका व कराड तहसील कार्यालय येथेही हीच नोंद आढळते. यावरून त्यांच्या जन्म-तारखेच्या विवादावर पडदा टाकायला हरकत नाही. कारण बाबूराव काळे, राम जोशी यांच्या यशवंतरावांच्या जन्मनोंदीच्या मताला फारसा दुजोरा मिळत नाही. शिवाय लेखक यशवंतराव चव्हाण यांनी ''कृष्णाकाठ'' मध्ये ...स्वत:च्या जन्मनोंदीबाबत उल्लेख केलेलाच आहे.

काही कौटुंबिक संदर्भ

यशवंतरावांचे मूळ गाव खानापूर तालुक्यातील ढवळेश्वर. भारतीय ग्रामीण जीवन स्वातंत्र्यापूर्वी व आजही मागासलेले आहे. अशाच खेडेगावातील हे मूळचे चव्हाण कुटुंब. अशा ग्रामीण भागात त्यावेळी फारसे बदल घडत नव्हते. एखादी उमेद निर्माण होईल; दु:खावस्थेच्या कचाट्यातून बाहेर पडता येईल अशी सुतराम शक्यता नव्हती. विकासाचा स्पर्श त्यावेळी फारसा कोठेही नव्हता. अशा ग्रामीण जीवनात यशवंतराव चव्हाण यांचे कुटुंब पिढ्यान् पिढ्या जीवन कंठीत होते. अशातच सावकारांच्या फसवणुकीमुळे ढवळेश्वरचा जमीनजुमला नाहीसा झाला. पुढे विट्याला या कुटुंबाने वास्तव्य केले. जीवनातील सर्व तऱ्हेच्या प्रतिकूल परिस्थितीला या कुटुंबाला सामोरे जावे लागले. मोठ्या धैर्याने व खंबीर मनाने या सर्व प्रतिकूल परिस्थितीवर या कुटुंबाने मात केली. आणि १९१२ च्या सुमारास यशवंतरावांचे कुटुंब विट्यास राहावयास आले. वडील बळवंतराव यांना विटा कोर्टात बेलीफची (चतुर्थश्रेणीची) नोकरी जज्जसाहेबांच्या ओळखीने मिळाली. विट्यास तीन-चार वर्षे नोकरी झाल्यावर त्यांची बदली कराड कोर्टात झाली. १९१८ च्या प्लेगच्या साथीमध्ये त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला आणि वयाच्या चौथ्या वर्षी वडिलांच्या प्रेमाला ते पारखे झाले. आजी व मामांचा त्यांना आश्रय होता. त्यामुळे यशवंतरावांचे प्राथमिक शिक्षण आजोळीच

झाले. माध्यमिक शिक्षण होईपर्यंत दिवाळीच्या व उन्हाळ्याच्या सुट्टींत ते देवराष्ट्राला जात. त्यांचे थोरले बंधू सतरा-अठरा वर्षांचे असताना त्यांना बेलीफचीच नोकरी मिळाली. तीही वडिलांचे एक शिंगटे नावाचे मित्र यांच्या प्रयत्नानेच.

समकालीन वातावरण

यशवंतरावांच्या जन्मापासून महाराष्ट्रात व देशात विविध घटना घडत होत्या. स्वातंत्र्याच्या चळवळीने उग्र स्वरूप धारण केले होते. पहिले महायुद्ध १९१४ ला सुरू झाले. लो. टिळकांची मंडालेच्या तुरुंगातून सुटका याच काळात झाली. जालीयनवाला बागेतील हत्याकांड याच काळात झाले. बालकवी (१९१८) गोविंदाग्रज (१९१९) ना.वा टिळक, रेंदाळकर हे महत्त्वाचे कवी याच काळात दिवंगत झाले. १९१९ मध्ये ना.ह. आपटेंचा मृत्यू झाला. १९२० नंतर गांधी युगाला प्रारंभ झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दलित मुक्ती चळवळीचे कार्य याच काळात सुरू झाले. १९२७ साली झालेल्या महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाने चळवळीला गती प्राप्त झाली. समाजवाद, जीवनवाद, मार्क्सवाद, नवमतवाद असे नवीन विविध वाद त्या काळात निर्माण झाले. तसेच प्रवाह साहित्यातही आले. एकूणच वातावरण या विचारांनी भारले गेले.

याच काळात टिळक, आगरकर पर्व समाप्त झाले. मराठी साहित्यातही बरीच स्थित्यंतरे झाली. १९२० नंतरच्या काळात साहित्यात नवविचारांचे पेव फुटले. डॉ. केतकर, वा.म. जोशी, ना.सी.फडके, वि.स.खांडेकर, भा.वि. वरेरकर, ग. त्र्यं. माडखोलकर इ. मान्यवर कादंबरीकार निर्माण झाले. त्यांनी आपला स्वतंत्र वाचक वर्ग निर्माण केला. रविकिरण मंडळाची स्थापना १९२३ साली झाली. माधव ज्यूलियन, कवी यशवंत, ग्रेस यांनी काव्यप्रांतात भरीव कार्य केले. नाट्यवाङ्मयात वरेरकर, अत्रे, म.ना.जोशी, श्री. व.वर्तक अनंत काणेकर, मो.ग. रांगणेकर यांनी मराठी रंगभूमीला नव्याने जीवदान दिले. कथावाङ्मयात सुद्धा फडके, खांडेकर, य.गो.जोशी, बोकील यांनी नावीन्यपूर्ण कथा लिहून वाचकाला खूष केले तर निबंध वाङ्मयात श्री. म.माटे, पु.ग.सहस्रबुद्धे, द.के.केळकर, शेजवलकर, डॉ. आंबेडकर यांनी भरीव कार्य केले. या साहित्य वाङ्मयप्रकाराचा असा परिणाम झाला. लोकशाही राज्यव्यवस्था, समाजवादी समाजरचना, प्रातिनिधिक शासन, सार्वत्रिक शिक्षण प्रसाराला दिलेले महत्त्व इ. गोष्टींचा साहित्यजगतावर प्रभाव पडू लागला.

या काळात राजकीय, सामाजिक, वैचारिक आंदोलने निर्माण झाली. सुखवादाला

विशेष महत्त्व प्राप्त झाले. भांडवलशाहीचा प्रसार होऊ लागला. कामगारांच्या आणि शेतकऱ्यांच्या चळवळी निर्माण झाल्या. १९१७ मध्ये रशियन क्रांती घडून आली. 'जगातील कामगारांनो एक व्हा' अशा घोषणा होऊ लागल्या. भांडवलदार व उद्योगपतींचा वर्ग निर्माण झाला. बुद्धिजीवी पांढरपेशा वर्गही निर्माण झाला. एकीकडे सुखवादी मध्यमवर्ग तर दुसरीकडे क्रांती किंवा अपरिवर्तक किसान व कामगार वर्ग अशी आर्थिक दृष्टीने कमकुवत असलेल्या वर्गांची स्थिती होती. १ ऑगस्ट १९२० ला गांधींच्या असहकार चळवळीला सुरुवात झाली. अशा खडतर प्रसंगांचा व घटनांचा परिणाम यशवंतरावांच्या बालमनावर कळत नकळत होत होता. बालपणातील त्यांचे वाचन, मनन आणि चिंतन यातूनच त्यांची जडणघडण होत गेली. यातूनच देशप्रेम, देशसेवा, ध्येयनिष्ठा, साहित्य कलांची आवड निर्माण झाली. साहित्याची जाणीव, वाचनाचा छंद, कलेची आवड निर्माण होण्यास त्या काळची परिस्थिती कारणीभूत होती. पुढे रसिक म्हणून जो त्यांचा उल्लेख केला जातो त्याची सुरुवातच अशा अवती भोवतीच्या घटनांतून झालेली दिसते.

यशवंतराव आपल्या लहानपणाची आठवण सांगताना म्हणतात, ''माझे लहानपण इतर लक्ष्यावधी गरीब घरातील मुलांच्याप्रमाणे गेले आहे. खेड्यात राहणाऱ्या छोट्या व गरीब शेतकऱ्यांची संख्या त्यावेळी सगळीकडे पुष्कळ होती. अशा एका कुटुंबातील मी एक म्हणून माझ्या जीवनामध्ये इतरांपेक्षा फार काही विशेष होते असे नाही. सर्वसामान्यत: अडी-अडचणी आणि गरिबी यालाच तेव्हा जीवन असे नाव होते असे म्हटले तरी चालेल.'' यशवंतराव चव्हाणांच्या बाल-पणापासून त्यांच्या मनावर झालेल्या संस्कारांमुळे त्यांचे संस्कारसंपन्न व्यक्तिमत्त्व आकाराला आले. लहानपणापासूनच ते परिस्थितीचे सिंहावलोकन करीत. तिच्याशी जुळते घेऊन सतत पुढे जाण्याचा प्रयत्न त्यांनी जाणीवपूर्वक केल्याचे दिसते. बालपणी अनेक व्यक्तींच्या सहवासामुळे त्यांना विशाल मानवतावादी विचारांची दृष्टी लाभली. सभोवतालच्या परिस्थितीशी जुळते घेत त्यांनी पुढील वाटचाल केली. आपण एका सामान्य कुटुंबातील आहोत याची त्यांना जाणीव होती. तसेच आजोळी लहानपणी यशवंतरावांनी वेगवेगळ्या स्तरांवरचे जीवन जगत असणारा व वेगवेगळी संस्कृती असणारा छोटासा समाज पाहिला होता. त्याच्या काही आठवणीही लेखक यशवंतराव चव्हाण यांनी शब्दबद्ध केल्या आहेत. ग्रामीण विरुद्ध नागरीकरण हे प्रश्न एकमेकांत इतके गुंतलेले आहेत की, एकाच्या सुखाचा दुसऱ्याच्या दु:खाशिवाय आपणाला विचार करता येत नाही. खेडे आणि शहर यांची सुखदु:खं अशी परस्परांशी भिडलेली, परस्परांत मिसळलेली आहेत. याबद्दल यशवंतराव चव्हाण आपल्या बालपणातील

आठवण अशी सांगतात. ''देवराष्ट्रातले बालपण मागे टाकून विटे आणि नंतर कराडला आलो होतो. दारिद्र्याचे चटके तिथे तीव्रतेने जाणवत होते. देवराष्ट्रात सारेच गरीब, त्यातलेच आम्ही. पण विट्याचे आणि कराडचे वातावरण वेगळे होते. सरमिसळीचे होते. कमालीचे दारिद्र्य आणि अज्ञान हे या वातावरणात विशेष जाणवणारे होते. समोर दिसणारी माणसे आणि त्यांची घरे, राहणी काही सांगत होती. मी शाळेत शिकत होतो. खेडी आणि शहर यातील फरक हर घडी जाणवत होता.'' याच पार्श्वभूमीवर आणखी ते पुढे म्हणतात- ''पण या गरिबीच्या पार्श्वभूमीवर राहणारी माणसे ही माणुसकीला पारखी झाली नव्हती ही त्यातली मनाला ऊब देणारी गोष्ट आहे.'' गरिबांबद्दल कणव व हरिजन गिरिजनाबद्दलची आत्मीयता त्यांना लहानपणापासूनच निर्माण झाली होती. कष्टकरी, शेतकरी, कामगार, यांच्याबद्दल त्यांना आस्था या ग्रामीण पार्श्वभूमीवरून वाटू लागली. अशा कित्येक गरिबांची कुटुंबे पिढ्यान् पिढ्या परिस्थितीच्या कचाट्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न त्यावेळी करत होती. यशवंतरावांचे कुटुंबही अशापैकीच एक होते.

देवराष्ट्राचे संस्कार

यशवंतरावांचे मामा दाजी घाडगे हे यशवंतरावांना लहानशा पण सुसंस्कृत वातावरण असलेल्या खेडेगावात घेऊन गेले. त्यांचे आजोळचे घर हे गावातल्या एका सामान्य शेतकऱ्याचे घर होते. या कुटुंबास त्यांचे पालनपोषण करण्याइतकीही जमीन नव्हती. त्यामुळे इतर एखाद्या जोडधंद्याशिवाय गत्यंतर नव्हते. असे असूनही चव्हाण कुटुंबियांना जेवढी मदत करता येईल तेवढी मामांनी केली. यशवंतरावांसंबंधी त्या काळातील आठवण सांगताना लेखक रामभाऊ जोशी लिहितात, ''यशवंतरावांचा जन्म देवराष्ट्रात झाला होता, आणि आता पाच वर्षांनी जगण्यासाठी यावं लागलं तेही आजोळीच. जन्म आणि बालपण (सागरोबाच्या) सोनहिऱ्याच्या संगतीत घडावं असाच जणू संकेत असावा. यशवंत देवराष्ट्राला पोहोचला आणि दाजीबाने मग त्याला तिथल्या प्राथमिक शाळेत दाखल केलं.'' यशवंतरावांना लहानपणापासूनच प्रत्येक गोष्टीची उत्सुकता होती. प्रत्येक बाब जाणून घेण्याची त्यांना सवय होती. लहानपणापासून देवराष्ट्राशी सतत संबंध आल्याने तेथील सामाजिक परिस्थिती, माणसे, आलेले अनुभव हे त्यांच्या जीवनाचाच एक अपरिहार्य भाग बनले. तेथे त्यांना लाभलेली सर्व स्तरांतील लोकांची संगत आणि निकटचा सहवास यामुळे त्यांच्या मनात समाजाविषयी कायमची आपुलकी निर्माण झाली.

यशवंतराव चव्हाण आपल्या आजोळच्या काही आठवणी सांगताना त्यांच्या शिक्षणाची सुरुवात कशी झाली याबद्दल म्हणतात .....''माझी पहिली शाळा देवराष्ट्राची आहे. पश्चिमेला उंचशा पठारावर एका तळ्याच्या काठी असलेली दोन-तीन खोल्यांची शाळा मला आजही प्यारी वाटते. पहिला श्रीगणेशा मी तेथे शिकलो. ते शिकवणारे माझे पहिले शिक्षक बंडू गोवंडे यांना मी आजही स्मरतो.'' यशवंतरावांचे बालपण देवराष्ट्र येथेच गेले व तिथेच त्यांनी प्राथमिक शिक्षण घेतले. शाळेत त्यांचा रुबाब पहिलवानी थाटाचा होता. अभ्यासातही तसे तल्लख म्हणून त्यांना ओळखले जात होते. तसे ते हुशार होते; पण घरची संस्कृती अशिक्षित होती. लहानपणी ते गणपतरावांप्रमाणेच धोतर, सदरा व फेटा बांधत असत. सर्वसाधारणपणे खेड्यातून एखादा माणूस शहरात आला की, त्यांना पटकेवाला समोर नकोसा होतो. परंतु यशवंतरावांची गोष्ट मात्र वेगळी होती. पुढे साहेबांचा पोषाख बदलत गेला. तशी साहेबांची शरीरयष्टी फार उंच नव्हती आणि धिप्पाडही नव्हती. त्यांच्या शेवटच्या काळात पोट थोडे मोठे झालेले जाणवत होते. बांधा मध्यम स्वरूपाचा होता. रंग सावळा, रुंद चेहरेपट्टी, भव्य कपाळ आणि जबडा मोठा, नाक काहीसे मोठे, पांढरेशुभ्र दात, भुवईच्या खाली लखलखणारे चमकदार टपोरे डोळे, पांढरेशुभ्र धोतर, सैलसा पांढरा अंगरखा आणि पांढरीशुभ्र अणकुचीदार टोपी. कधीमधी जॅकेट वापरत. हाच त्यांचा पोशाख पुढे कायम राहिला. त्यांच्या या व्यक्तिमत्त्वाने अनेकांना लळा लावला.

यशवंतरावांना शालेय जीवनापासून अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. तशी कोणतीही गोष्ट वडिलोपार्जित म्हणून मिळालेली नव्हती. सर्व काही स्वकष्टार्जित होते. साहित्यिक, पुढारी होण्यासाठी जे वातावरण, पैसा वगैरे गोष्टी पोषक ठरतात ते काही यशवंतरावांच्या वाट्याला त्याकाळी आले नाही. त्यांनी परिश्रमपूर्वक व हेतुपूर्वक आपल्या व्यक्तिमत्त्वाची उभारणी केली. चौथीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण देवराष्ट्रास पूर्ण करून १९२७ मध्ये यशवंतराव कराडच्या टिळक हायस्कूलमध्ये दाखल झाले. यशवंतराव देवराष्ट्रसारख्या खेड्यातून आले होते. पण कराडला आल्यानंतर ते खेडवळ राहिले नव्हते. अभ्यासाव्यतिरिक्त अन्य वाचन यात ते गढलेले असत. त्यावेळी टिळक हायस्कूलचे द्विवेदी नावाचे शिक्षक होते. ते राष्ट्रीय वृत्तीचे होते. यशवंतरावांचे वाचन वाढत होते. कृष्णा-कोयनेच्या संगमावर त्यावेळी होणाऱ्या सभा विद्यार्थी दशेत ते ऐकत होते. सभेत व्यक्त होणारे विचार समजावून घेत होते. त्या विचारांवर चिंतनही करत होते. वाचनाला आणि विचाराला अनुभवाचं कोंदण लाभलं होतं. ज्ञानार्जन हाच शिक्षणामागचा हेतू होय हे त्यांनी ओळखले

होते. तसे यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व हळवे आणि सुजाण होते.

आईचा प्रभाव

यशवंतरावांच्या जडणघडणीत त्यांच्या आई विठाबाई यांचा खूप मोठा वाटा आहे. विठाबाईंच्या संस्कारामुळे बाल यशवंतरावांचे मन सुजाण, सुसंस्कारित झाले. त्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख त्यांनी वारंवार केला आहे. गरीब कुटुंबातील ही माता मनाने, संस्काराने, स्वभावाने मात्र अतिशय श्रीमंत होती. ही श्रीमंती आपल्या मुलावर बिंबवण्याचा तिचा नेहमी प्रयत्न असे. यशवंतराव आत्मकथनपर एका लेखात म्हणतात...'फरक होता तो घरच्या संस्कारांचा...! संपत्तीने नसली तरी संस्काराने आई श्रीमंत होती आणि ती श्रीमंती आम्हा मुलांपर्यंत पोहचविण्याचा तिचा सततच प्रयत्न होता. 'ईश्वर आपल्या पाठीशी आहे,' ही तिची निष्ठा होती आणि या निष्ठेनेच तिने जीवनभर संकटांशी सामना केला. हिंमत सोडू नये असा उपदेश करताना ती म्हणत असे....

नका बाळांनो, डगमगू । चंद्र-सूर्यावरील जाई ढगू ॥

अशा प्रकारे यशवंतरावांना अनेक संकटांना तोंड देण्यास बालपणीच आईने शिकवले होते. विठाबाई नेहमीच त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या. त्या जरी अशिक्षित असल्या तरी समज विद्वानांना लाजवील अशीच होती. आपण अर्धपोटी राहावे, आल्या गेलेल्यांना पोटभर जेवण घालावे अशी त्यांची धारणा होती. देवाधर्मावर त्यांची श्रद्धा होती. शिक्षण ही शक्ती आहे. ती मिळवलीच पाहिजे आणि मुलांचे शिक्षण पूर्ण केले पाहिजे असा विठाईचा शिक्षणविषयक दृष्टिकोन यशवंतरावांच्या जीवनास दिशा देण्यास कारणीभूत ठरला. यशवंतराव त्यांच्या बालपणाची आठवण सांगताना म्हणतात - ''माझी आई ही आम्हा सर्वांची शक्ती होती. आम्ही काय वाचतो आणि काय बोलतो हे ती ऐकत असे. पण तिला त्यात भाग घेता येणे शक्य नसे-!'' यावरून त्यांच्या आईचे तिन्ही मुलांवर किती प्रेम होते हे दिसून येते. तिने यशवंतरावांना कोणत्याही परिस्थितीत राहण्याची, परिस्थितीशी जुळवून घेण्याची शिकवण दिली. प्रतिकूल परिस्थितीशी ज्या व्यक्तीला जुळवून घेता येते ती व्यक्ती आयुष्यात यशस्वी होते. यश-अपयश पचवण्याची ताकद त्या माणसात येते. ही मोलाची शिकवण त्या माऊलीने त्यांना दिली. त्याचा पुढे राजकारण व समाजकारणात त्यांना चांगला उपयोग झाला. कौटुंबिक वातावरण बिघडू नये म्हणून यशवंतरावांना व कुटुंबातील अन्य व्यक्तींना तिने नेहमी मार्गदर्शन केले. यशवंतरावांची आई त्यांच्या लहानपणी शिक्षणाबद्दल व वागणुकीबद्दल कोणता मौलिक संदेश देत होती, ते प्रत्यक्ष यशवंतरावांच्या शब्दांत,

''बाबा तू वाचतोस, हिंडतोस, फिरतोस हे सगळे चांगले आहे. पण कुणा वाईटाच्या नादाला लागू नकोस. आपण गरीब असलो तरी आपल्या घराची श्रीमंती आपल्या वागण्या बोलण्यात आहे, रीतीरीवाजात आहे. ती कायम ठेव. तुला कोणाची नोकरी चाकरी करायची नसली तर माझी हरकत नाही. मी कष्ट करून तुझे शिक्षण पूर्ण करीन, पण तू शिक्षणामध्ये हयगय होईल असे काही करू नकोस. तुम्ही शिकलात तर तुमचे दैव मोठे होईल.''

यशवंतरावांच्या आईने एक प्रकारे जीवनाचे तत्त्वज्ञानच सांगून टाकले आणि आपल्या जीवनाचे दर्शनही करून दिले. प्रतिकूल परिस्थितीत, आर्थिक कुचंबणेत आणि कौटुंबिक अडचणी असतानासुद्धा स्वाभिमानाचा संदेश दिला. यशवंतरावांच्या आंतरीक व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत त्यांच्या आईच्या संदेशाचा मोठा वाटा आहे. तसे ते जीवनानुभवच आहेत. यशवंतरावांनी 'कृष्णाकाठ'मध्ये आईवरील अलोट प्रेमाचा वारंवार उल्लेख केला आहे. विठाबाईंनी आपली मुले घडविली. यशवंतराव तर पुढे सर्वांचे साहेब झाले. महाराष्ट्राचा कोहिनूर झाले. या कोहिनूर हिऱ्याच्या प्रत्येक पैलूला विठाईच्या विशाल हृदयाचा स्पर्श झालेला आहे. यशवंतरावांनी पुढे त्यांच्या आईबद्दल ठिकठिकाणी गौरवोद्‌गार काढलेले आहेत. ''तिच्या अंत:करणाच्या अवकाशात मी स्थिरावतो, प्रशांत मनोभूमीवर पहुडतो, आत्मतेजाने तेजाळू लागतो, प्रेमामृताने ओलाचिंब होतो आणि श्वासात श्वास मिसळून जातो.'' अशा प्रकारे यशवंतरावांनी आईचे थोरपण रेखाटले आहे. तशी यशवंतरावांची बुद्धी लहानपणापासूनच तल्लख होती, विस्तृत वाचन होते. आईंनी लहानपणापासूनच त्यांच्याकडून भरपूर वाचन करून घेतल्याने व संस्कार केल्याने एक हुशार विद्यार्थी म्हणून ते ओळखले जात. विद्यार्थीदशेच्या या काळात यशवंतरावांनी भौतिक दारिद्र्याशी संघर्ष देतच बौद्धिक श्रीमंती वाढविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी मोठ्मोठ्या लेखकांचे, विचारवंतांचे लेखन वाचण्यास, भाषणे ऐकण्यास जाणीवपूर्वक सुरुवात केली. निरनिराळ्या विषयांच्या वाचनाने त्यांचा वैचारिक पिंड तयार झाला. वाचनाने मन प्रगल्भ होते, विचार करू लागते, याचा प्रत्यय त्यांना शालेय जीवनातच आला. यावरून त्यांच्या बुद्धीची झेप आपल्या लक्षात येते. वाचनाच्या वेडाने झपाटलेले त्यांचे मन जे हातात मिळेल ते वाचत गेले. याचा परिणाम म्हणूनच ते पुढे मोठे साहित्यिक व राजकारणी झाले. यशवंतराव पुढे जे एक लेखक, राजकारणी व सामाजिक कार्यकर्ता म्हणून ओळखले जाऊ लागले त्याची बीजे त्यांच्या विद्यार्थी दशेतच पेरली गेली होती. त्याला खतपाणी घालण्याचे काम पुस्तकांनी आणि त्यांच्या मातेनेही केले होते. आणि ती रुजत आहेत हे लक्षात आल्यावर त्यांनी ती शिस्तशीरपणे वाढविली होती. यशवंतरावांच्या अंगच्या

जन्मजात प्रतिभेचा विकास आणि आविष्कार समजून घेताना एक गोष्ट आपल्या लक्षात येते की त्यांनी शिस्तीचा गुण कधी सोडला नाही.

माणूस कितीही दु:खीकष्टी असला तरी त्याला उत्तेजन आणि सहानुभूती यांचे खतपाणी मिळाले की त्याची कोमेजलेली जीवनवेल टवटवीत होते. यशवंतरावांच्या आईने अशी कोमेजलेली फुले टवटवीत करण्याचा सदैव प्रयत्न केला. यशवंतरावांना त्यांच्या प्रेमळ सहवासात आयुष्यातली काही संस्मरणीय वर्षे व्यतीत करण्याचे सद्भाग्य लाभले. त्यांच्या अनेक थोर स्मृती यशवंतरावांच्या अंत:करणात चिरकाल राहिल्या.

यशवंतरावांना आईच्या मनाचा मोठेपणा आणि अंत:करणाचा दिलदारपणा, त्याचबरोबर सहानुभुतीचा प्रत्यय वारंवार येत होता. आईच्या स्वभावाविषयी ते म्हणतात, ''आयुष्यातली बरीच वर्षे दु:खाशी सोबत करूनही दिलदारपणा राहणे हे देणे देवाचे असावे लागते. माझ्या आईचे जीवन मला नेहमीच दीपज्योतीसारखे वाटले. दिवा जळत असतो, त्याच्या प्रकाशात माणसे वावरत असतात. पण आपण लोकांच्या उपयोगी पडत आहोत हे त्या ज्योतीला, त्या प्रकाशाला माहीत नसते. ते दीपज्योतीचेच जळणे आईचे होते.'' यशंवतरावांच्या या उद्गारांवरून त्यांच्या आयुष्याला आकार देण्याचे काम त्यांच्या आईनेच केले आहे हे लक्षात येते. आईबद्दल त्यांनी अनेक ठिकाणी कृतज्ञता व्यक्त केली आहे. त्यांची आई हीच त्यांची गुरू होती. आई मार्गदर्शक झाली. तिने आधार दिला. तिच्या जात्यावरच्या ओव्यांमधून त्यांना संदेश मिळाला होता. यशवंतरावांनी आपल्या निरक्षर, भोळ्या मातेचे ऋण अनेक प्रसंगी जाहीरपणे व्यक्त केले. नागपूर येथे एका सत्काराला उत्तर देताना एके ठिकाणी ते म्हणतात, ''त्या माझ्या म्हाताऱ्या आईची आज मला आठवण येत आहे. तिची पुण्याई, तिचा साधेपणा, तिचे प्रेम, तिने शिकवलेले छोटे छोटे गुण हेच माझ्या जीवनामध्ये मला उपयोगी पडले आहेत.'' माता आणि माती यांच्याविषयी अधिक ओढा असलेला हा नेता आपल्या आईच्या प्रेमात किती एकरूप होतो ते पुढील काही ओळींवरून लक्षात येते. ते म्हणतात, ''तीर्थतुल्य मातेच्या दर्शनाने माझे अष्टसात्विक भाव जागे होतात. अंतर्मन निथळू लागते. पौर्णिमेच्या चंद्रातून अमृतबिंदू ठिबकावेत, तशी तिची प्रेमळ दृष्टी माझ्यावर वर्षाव करते आणि नकळत पायगत झालेल्या पापण्या, हृदयाच्या चौफाळ्यावरील पावले धुंडाळू लागतात.'' (कित्ता १२२) विठाईच्या व्यक्तिमत्त्वाने यशवंतरावांच्या जीवनाला कुठे ना कुठे सोनेरी स्पर्श झालेला आहे. आणि तो त्यांनी आपल्या हृदयाच्या पेटीत जपून ठेवला आहे. विठाईच्या व्यक्तिमत्त्वाने यशवंतराव प्रभावित तर झालेच; परंतु तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या अलौकिक गुणांनी दिपून जाऊन त्यांनी अनेक वेळा कौतुकाने आईचा उल्लेख केला आहे.

बंधूंचा प्रभाव

यशवंतरावांच्या बालपणी कौटुंबिक संस्कारांमध्ये जसा त्यांच्या आईचा मोठा वाटा आहे तसाच त्यांचे भाऊ गणपतराव यांचाही मोठा वाटा आहे. बंधू गणपतराव यांची प्रेरणा आणि प्रोत्साहन त्यांना सदैव लाभले. यशवंतरावांचा पिंडच विचारी व विवेकी असल्याने त्यांच्यावर त्यांच्या भावांच्या विचारांचाही परिणाम झाला. जे मंगल, भव्य, दिव्य असेल ते घेण्याची त्यांची लहानपणापासूनची प्रवृत्ती होती. गणपतरावांना परिस्थितीमुळे फारसे शिक्षण घेता आले नाही. पण यशवंतरावांनी खूप शिकावे असे त्यांना वाटत असे. त्यामुळे त्यांचे आपल्या धाकट्या भावाकडे अधिक लक्ष असे. गणपतराव व यशवंतराव यांच्या वयात तसे फार मोठे अंतर नव्हते. त्यामुळे ते गणपतरावांना नावाने हाक मारत. ते दोघेही बरोबरीच्या नात्यानेच वागत असत. गणपतराव तसे महत्त्वाकांक्षी होते. त्यांच्याकडे दूरदृष्टी होती. आपण आपल्या परिस्थितीवर मात केली पाहिजे असे ते सांगत. लहानपणी यशवंतरावांना ते तालमीत घेऊन जात असत. त्यांना कुस्त्यांची आवड निर्माण झाली. आर्थिक हलाखीमुळे हायस्कूलचे शिक्षण पुरे करता आले नाही. पण आपली अपूर्ण इच्छा त्यांनी यशवंतरावांच्या माध्यमातून पूर्ण केली. आधुनिक इंग्रजी शिक्षणाचा लाभ यशवंतरावांना केवळ गणपतरावांच्या दूरदृष्टीमुळे झाला. तसे ते सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते होते. सत्यशोधकी विचार गणपतराव लहानपणीच यशवंतरावांना समजावून देत आणि त्याचे पडसाद त्यांच्या बालमनावर उमटत होते. महाराष्ट्रात जेधे बंधू, जवळकर, भास्करराव जाधव हे सत्यशोधक चळवळीचे कार्य करीत होते. कऱ्हाडमध्ये भाऊसाहेब कळंबे गुरुजी हे काम करीत होते. त्यांच्या 'विजयाश्रमात' सत्यशोधकी संस्कार करत होते. गणपतराव तेथे नियमितपणे जात होते. पुढे ते सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते बनले. नव्या इंग्रजी शिक्षणाचे रहस्य त्यांना उमगले होते. मोठ्या सामाजिक परिवर्तनाचा आदेश हे कार्यकर्ते देत असत. त्यातूनच सामाजिक क्रांतीचा मूळ विचार विकसित झाला. यशवंतराव लिहितात, ''नाही म्हटले, तरी सत्यशोधकीय व ब्राह्मणेतर चळवळीचे संस्कार मनावर नकळत होतच होते.'' यशवंतरावांवर त्यांचे बंधू गणपतराव यांच्यामुळे सामाजिक संस्कार झाले हे यशवंतरावांनी मान्य केले आहे. बंधू गणपतराव यांनी यशवंतरावांना महात्मा फुल्यांचे चरित्र वाचायला दिले. महात्मा फुल्यांचे विचार मूलगामी आहेत असे त्यांना वाटू लागले. म. फुल्यांच्या विचारांचे महत्त्व यशवंतरावांना पटले. शेतकरी समाजाची होणारी पिळवणूक, दलित समाजावर होणारा अन्याय आणि शिक्षणापासून वंचित राहिलेला समाज व स्त्रिया यांचे प्रश्न सोडविल्याशिवाय देशाचे कार्य होणार नाही असे विचार त्यांच्या मनात येऊ लागले. गणपतरावांच्या प्रतिभाशाली

व्यक्तिमत्त्वाची छाया यशवंतरावांवर पडली होती. सत्यशोधकीय विचारांची परखड वृत्तपत्रे त्यांना त्यांच्यामुळेच वाचायला मिळाली. 'विजयी मराठा', 'राष्ट्रवीर', 'मजूर', 'श्रद्धानंद' इ. काही वृत्तपत्रे व साप्ताहिकांमुळे त्यांच्यावर अधिक व्यापक स्वरूपाचे संस्कार झाले. यशवंतरावांना वाचनाची आवड निर्माण करण्यापाठीमागे वृत्तपत्रांचा मोठा वाटा होता. कारण ही सहज उपलब्ध होत असत. ही वृत्तपत्रे सत्यशोधकीय 'विजयाश्रमात' मिळत असत. याबाबत बोलताना यशवंतराव म्हणतात, ''परंतु त्यावेळी जी वृत्तपत्रे मला वाचायला मिळत असत, ती म्हणजे पुण्यात प्रसिद्ध होणारा 'विजयी मराठा' आणि बेळगावहून प्रसिद्ध होणारा 'राष्ट्रवीर' ही ब्राह्मणेतर चळवळीचा पुरस्कार करणारी होती.'' त्यावेळी यशवंतराव मराठी सातवी इयत्तेच्या वर्गात शिकत होते. म्हणजेच लहानपणापासून वाचनाची आवड निर्माण करण्यापाठीमागे खरे तर त्यांच्या भावाचे मोठे मार्गदर्शन व सहकार्य त्यांना मिळाले. ते लिहितात, ''यासाठी वाचन केले पाहिजे, अधिक समजून घेतले पाहिजे, अशा भावनेने प्रयत्नशील राहिलो.'' यशवंतराव चव्हाणांच्या एकूण व्यक्तिमत्त्वावर त्यांच्या भावाचा फारच परिणाम झालेला होता. 'कृष्णाकाठ' या त्यांच्या आत्मचरित्रात आपल्या बंधूंचा ते वारंवार आपुलकीने व जिव्हाळ्याने उल्लेख करतात. ते लिहितात, ''माझ्यासाठी त्यांनी आपल्या शिक्षणाचाही पुढे त्याग केला. आणि माझे शिक्षण पूर्ण व्हावे, म्हणून प्रयत्न केला.'' पुढे प्रपंचाची धुरा गणपतरावांच्या खांद्यावरच आली. तरीही ते सार्वजनिक कामात पुढाकार घेत असत. त्यांचा मित्रपरिवार नेहमी घरी येत असे. ते सर्वजण अनेक विषयांवर चर्चा करत. या सर्व चर्चा यशवंतराव सुरुवातीस ऐकत. पण नंतर त्या चर्चेत ते सहभागी होऊ लागले. गणपतरावांचे व्यक्तिमत्त्व भारदस्त असल्याने माणसांशी ओळख करण्यात व त्यांच्याशी मैत्री करण्यात ते तरबेज होते. त्याचेच अनुकरण यशवंतरावांनी केले. तो लाघवीपणा त्यांनी उचलला. पुढे त्यांना त्यांच्या सार्वजनिक जीवनात त्याचा खूप उपयोग झाला. बालपणात झालेल्या या सर्व संस्कारांनी त्यांचा पिंड घडला. यशवंतरावांनी सुसंस्कार घेतले ते त्यांचे घराणे, इतिहास आणि निसर्ग यांपासून. तोच वारसा सांभाळण्यात आणि त्यात भर घालून तो समृद्ध करण्यात त्यांनी पुढील सर्व आयुष्य खर्च केले. यशवंतरावांचा स्वभाव संस्कारशील आणि मन संवेदनशील होते. पाऱ्यासारखे मन दिसेल, भेटेल, आढळेल ते टिपत राहिले. जीवन समृद्ध आणि वृत्ती, प्रवृत्ती झुपकेदार बनत गेल्या. पोहणे आणि व्यायाम याची आवडही त्यांना गणपतरावांमुळेच निर्माण झाली. गणपतराव त्यांना सांगत, ''दुसरे काही करत नाहीस, निदान पोहत तरी जा.''

गरिबीतून मार्ग काढण्यासाठी गणपतराव इंदूर संस्थानातील 'मरोठ''म्हणून एका गावी शेती करण्यासाठी जात असत. तिकडे जाण्यास त्यांच्या आईचा विरोध होता. तिने गणपतरावांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. पण गणपतरावच उलट तिची समजूत काढताना म्हणतात, ''असे रखडत जीवन काढण्यापेक्षा अशा प्रकारचे काहीतरी नवीन धाडस केले पाहिजे. हे धाडस जर आम्ही आता केले नाही, तर आपण आहो असेच राहू. किती दिवस तू आमच्यासाठी कष्ट उपसत राहणार? आम्हालाच काहीतरी केले पाहिजे.'' या त्यांच्या उद्‌गारावरून गणपतरावांचा धाडसी निर्णय कसा होता याची प्रचिती येते. यामधून यशवंतरावांना परिस्थितीची जाणीव झाली. गरिबीतल्या, दु:खातल्या परिस्थितीला सामोरे जाण्यातच कर्तृत्व आहे हे गणपतरावांनी कृतीने सिद्ध करून दाखवले होते. विछिन्न संसार सांभाळण्यासाठी रिकाम्या पोटाने काम करण्याची त्यांची तयारी व धडपड पाहून यशवंतरावांवर त्यांच्या या कृतीचा चांगलाच ठसा उमटला होता. त्यामुळे समस्यांचे आव्हान स्वीकारणे व त्या समस्या सोडविणे हा त्यांच्या जीवनाचा क्रम बनला. पुढे आयुष्यात येत गेलेल्या विलक्षण कठीण समस्यांचा मुकाबला यशवंतराव करू शकले. गृहमंत्री असताना कित्येक कठीण प्रसंग आले तरी यशवंतरावांनी मनाचा तोल ढळू दिला नाही. बालपणीचे संस्कार उत्तरायुष्यात व्यक्तिमत्त्वाचा तोल सांभाळत राहिले.

○ ○ ○

चिरा चिरा हा घडवावा....

यशवंतराव आईच्या प्रेमळ, संजीवन छत्राखाली वाढत होते. घडत होते. विठाई तशी अत्यंत सोशिक, काटकसरी स्वभावाची, शांत, गंभीर माऊली होती. तिने पतीच्या निधनाच्या दु:खातून स्वत:ला सावरले. आपले दु:ख विसरून मुलांना दिलासा दिला. इतकेच नव्हे तर स्वत: कष्ट करून चार-सहा महिने तिने मुलांना धीर दिला आणि जगविले. पण अशी परिस्थिती येऊनसुद्धा ती माहेरी फार दिवस राहिली नाही. अडचणीच्या काळातही तिने मुलांचे शिक्षण पूर्ण करण्याचा ध्यासच घेतला होता. शिक्षण ही एक शक्ती आहे असे समजून तिची धडपड चालू होती. पुढे यशवंत मोठा होऊ लागला तेव्हा त्यांच्या शिक्षणाचा प्रश्न तिच्या समोर उभा राहिला. एकीकडून चव्हाण कुटुंबाचे जीवन कष्टमय धडपडीतून जात असताना परिस्थितीचे दाहक चटकेही त्यांना बसत होते. आर्थिक विवंचनेचा एक काळा ढग त्यांच्या डोक्यावर तरंगत असे. पण एवढ्या लहान वयात व अशा परिस्थितीतही यशवंतराव कधी दु:खी, नाराज झालेले दिसत नाहीत. उलट भोवतालच्या लोकजीवनाचे निरीक्षण करण्यात आणि त्या लोकजीवनात समरस होण्यात त्यांना आनंद होता.

यशवंतराव चव्हाणांचे आजोळ देवराष्ट्र. देवराष्ट्रामध्येच त्यांचे बालपण गेले. बळवंतरावांच्या मृत्यूनंतर विठाईने यशवंतरावांना आपला भाऊ दाजी घाडगे यांच्याकडे पाठविले. ते शेती करून आपली उपजीविका करत असत. त्यांच्या प्रेमळ छायेतच यशवंतरावांचे बालपण गेले. यशवंतरावांचे मराठी चौथीपर्यंतचे शिक्षण देवराष्ट्र येथील प्राथमिक शाळेत झाले. तसे हे गाव त्यावेळी म्हणजे सुमारे ८० वर्षांपूर्वी आधुनिक नागरी संस्कृतीपासून दुरावले होते. अशा गावी त्यांचे बालपण गेले. चव्हाण कुटुंबाला जी काही थोडी फार मदत करता येईल ती घाडग्यांनी केली. गुरुंनी लहान वयात दिलेले प्रेम आणि त्यांनी लावलेली शिस्त ही त्यांना त्यांच्या जीवनात कामी आली. म्हणूनच

त्यांना या देवराष्ट्राच्या शाळेबद्दल व गुरुजींबद्दल एक वेगळा जिव्हाळा होता. या गावाबद्दल आपल्या आठवणींना उजाळा देताना ते म्हणतात,''सज्जनांचा जिव्हाळा आणि सरस्वतीचे सौंदर्य या भूमीला जसे लाभले आहे, तसे तिच्या सद्‌गुणाला चांगुलपणाचे तेज आहे. भव्यत्व आणि दिव्यत्व यांनी इथे परिसीमा गाठली आहे.'' अशा प्रकारे यशवंतरावांनी बालवयातील मंतरलेल्या दिवसांच्या आठवणी सांगितल्या आहेत. सध्या सांगली जिल्ह्यातील खानापूर, वाळवा व तासगावच्या सीमेवरील आताच्या नवीन पलूस तालुक्यातील देवराष्ट्र छोटेसे गाव. सोनहिऱ्याच्या काठावर वसलेले. मेघराजावर अवलंबून असणारे कृषिजीवन असलेले गाव. बालपणी यशवंतरावांना 'सोनहिरा' या ओढ्याचे विलक्षण वेड होते. अमृताच्या स्पर्शाने मातीतून सोने पिकवणारा हा 'सोनहिरा' आणि त्याच्या काठावरील माणसेही तशीच, अशी त्यांची श्रद्धा. ते आजोळी असताना या ओढ्यात पोहायला जात. काठावर खेळ मांडत असत. बागेतल्या चिंचा, आवळे तोडून बालपणाचा आनंद लुटत असत. रस्ता शाळेचा पण सहवास मात्र मिळे 'सोनहिऱ्याचा'. यशवंतराव देवराष्ट्र व सोनहिऱ्याच्या आठवणी अनेक ठिकाणी सांगतात. तेथील माणसांच्याबद्दल ते म्हणतात,''उत्तम जमिनीत बी पेरले म्हणजे चांगले फोफावते, तशी इथली माणसे आणि मने! त्यांच्यात द्वेषाची धग नाही.'' अशा बालपणीच्या आठवणी यशवंतरावांनी पुन्हा पुन्हा आळविल्या आहेत. त्यांच्या बालपणातील हे स्वच्छंदी दिवस त्यांच्यातील निर्व्याज, साहित्यिक संस्कारास कारणीभूत ठरले. ते थोडे दिवसच तेथील प्राथमिक शाळेत शिकले पण तेवढ्या अल्पकालावधीतील सुंदर आठवणी त्यांच्या 'कृष्णाकाठ' व 'ऋणानुबंध' या आत्म-कथनपर पुस्तकातून सांगितल्या आहेत. त्यातून यशवंतरावांच्या कोवळ्या बालमनाचे सुंदर दर्शन घडते.

राजकारण, समाजकारण, धर्मकारण यातील मतमतांतराच्या गलबल्याचा हा कालखंड होता. असहकार, सत्याग्रह, कायदेभंग, मार्क्सवाद, गांधीवाद अशा विचारांना हादरून सोडणाऱ्या तोफा समाजाच्या अवतीभोवती गडगडत होत्या. या कालखंडामध्ये साहित्यात कारागिरीलाच अधिक महत्त्व दिले जात होते. तरी नव्या लेखकाला प्रेरणा आणि प्रोत्साहन देणारा असाच तो काळ होता. अशा कालखंडात यशवंतरावांसारख्या तरुण विद्यार्थ्याने देवराष्ट्रातून कराडसारख्या नागरी जीवन असलेल्या टिळक हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. यशवंतराव चव्हाण खेड्यातून आलेले होते. पण ते खेडवळ राहिले नव्हते. कराडमध्ये टिळक हायस्कूलला प्रवेश घेतल्यानंतर तेथे त्यांच्या मनोभूमीला चांगलेच खतपाणी मिळाले. तेथे नामवंत असे शिक्षक त्यांना लाभले. दत्तोपंत पाठक, शेणोलीकर, हायस्कूलचे मुख्याध्यापक द्विवेदी इ. शिक्षक लाभले.

त्यांच्याकडून चांगले धडे मिळाले. त्यामुळे त्यांची मनोभूमिका समृद्ध झाली. यशवंतरावांबद्दल या गुरुजनांच्या मनात जिव्हाळा होता. त्यावेळची टिळक हायस्कूलमधील मंडळी ध्येयवादी, आदर्शवादी व राष्ट्रवादी विचारांनी प्रेरित झालेली होती. त्यांचा प्रभाव यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वावर पडला होता. यासंदर्भात यशवंतराव चव्हाण म्हणतात, ''या सुमाराला मी माझी मराठी सातवी इयत्ता पास करून कराडच्या टिळक हायस्कूलमध्ये एका वर्षात तीन इयत्ता पास करण्याचा कोर्स पुरा करून हायस्कूलचा विद्यार्थी बनलो. एक वेगळे क्षेत्र, वेगळी माणसे आणि एका वेगळ्या वातावरणात मी आलो.'' यशवंतरावांना तेथे वाचनाचा नाद लागला. वाचनाने आणि विचाराने यशवंतरावांचे भाषाज्ञान सतर्क बनले. टिळक हायस्कूलमध्ये त्यावेळी निबंध व वक्तृत्व स्पर्धा दरवर्षी घेतल्या जात असत. टिळकांचे विचार आणि आयुष्य यासंबंधी विद्यार्थ्यांना माहिती मिळावी असा या स्पर्धांचा हेतू होता. यशवंतराव या स्पर्धांत भाग घेऊ लागले. त्यामुळे यशवंतरावांना वक्तृत्व कलेची आवड निर्माण झाली. लेखनाचाही छंद लागला.

महाराष्ट्राच्या सामाजिक मनाचे शिल्पकार गोपाळ गणेश आगरकर हे कराडजवळील टेंबू गावचे. त्यांची त्यागबुद्धी आणि हरिभाऊ आपटे यांची विदग्ध साहित्यसृष्टी अंगिकारून यशवंतरावांनी आपल्या जीवनाची वाटचाल केली. त्याचबरोबर गोविंदाग्रजांच्या साहित्याचा यशवंतरावांच्या मनावर विद्यार्थी दशेत खूपच परिणाम झाला. या लेखकांच्या पुस्तकांनी त्यांच्या भोवतीच्या परिस्थितीचा तसेच दु:खाचा अर्थ लावायला शिकवले. सामाजिक प्रबोधनाचे एक साधन म्हणून साहित्याच्या शक्तीवर त्यांची श्रद्धा बसत गेली. त्यावेळी काय वाचावे किंवा कसे वाचावे हा प्रश्न नव्हता. कारण निवड करून वाचण्याची संधीच नव्हती. मग मिळेल ते व मिळेल तेथून पुस्तके घेऊन वाचनाचा सपाटा त्यांनी सुरू ठेवला. म्हणूनच पुढे ख्यातनाम वक्ते, प्रभावी व्याख्याते म्हणून ते प्रसिद्ध झाले. ग्रामीण संस्कृतीचा साक्षात आणि सखोल संस्कार आणि त्याच्या जोडीला हे चौफेर वाचन यातून खेड्यातल्या एका तरुणाचे रूपांतर एका हुशार विद्यार्थ्यात झाले. वाचनाने चांगले संस्कार मनावर झाले. 'विजयी मराठा', 'राष्ट्रवीर', 'मजूर', 'श्रद्धानंद' इ. वृत्तपत्रे आणि साप्ताहिके ते वाचत होते. केळकरांचे 'छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र', शि.म.परांजपे यांचे 'काळ' मधील निबंध, पंढरी पाटील यांचे 'म.ज्योतिराव फुले' हे चरित्र, टिळकांच्या संबंधित काही पुस्तके हायस्कूलमध्ये असताना वाचनात आली. या दोन राष्ट्रपुरुषांबद्दल यशवंतराव लिहितात, ''स्वराज्याचा विचार टिळकांनी सांगितला आणि गरिबांची शिक्षणाने प्रगती झाली पाहिजे व समाजात समानता निर्माण झाली पाहिजे हा विचार म. ज्योतिराव

फुल्यांनी सांगितला. हे दोन्ही विचार महत्त्वाचे, म्हणून दोन्ही माणसे आपल्या दृष्टीने मोठीच आहेत, या निर्णयाला मी आलो.'' इ.स. १९३० च्या असहकार चळवळीत विद्यार्थी दशेत त्यांनी भाग घेतला. त्यावेळी त्यांना तुरुंगात जावे लागले. वयाच्या २१ व्या वर्षी ते मॅट्रिक पास झाले. इ.स. १९३४ मध्ये त्यांचे माध्यमिक शिक्षण संपले. जूनमध्ये परीक्षेचा निकाल आला व त्यांच्या पुढे आता काय करायचे असा प्रश्न उभा राहिला. विचारांती कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये जाण्याचा त्यांनी निर्णय घेतला.

महाविद्यालयीन जीवन

यशवंतराव १९३४ मध्ये जून महिन्यातील तिसऱ्या आठवड्यात उच्च शिक्षणासाठी कोल्हापूरला गेले. कोल्हापुरातील शिवाजी पेठेतील बाबुअण्णा कोठावळे यांच्या जागेतील दोन खोल्यांत ते राहू लागले. पहिले वर्ष ते तिथेच राहिले. कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजची आठवण सांगताना ते म्हणतात,''शहराच्या मध्यभागी असलेल्या जुन्या राजवाड्यात आमचे हे राजाराम कॉलेज होते. उत्तम शिक्षक वर्ग, मोकळे वातावरण, समृद्ध लायब्ररी एवढा सर्व संच असल्यामुळे शिक्षणसंस्थेला महत्त्व का येणार नाही?'' त्यावेळी राजाराम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळकृष्ण हे होते. अत्यंत विद्वान, सुंदर वक्तृत्व व उत्तम प्रशासक या गुणांमुळे ते विद्यार्थ्यांत प्रिय तर होतेच शिवाय कोल्हापूर शहरातही त्यांना मान होता. यशवंतराव या प्राचार्यांच्या बाबतीत आठवण सांगताना लिहितात,''त्यांचा माझा हा जो गुरुशिष्य स्नेहाचा आणि जिव्हाळ्याचा संबंध होता. तो पुढे चार वर्षे कायम राहिला. मला अधून मधून जरूर पडेल, तेव्हा मी त्यांना भेटत असे, तेव्हा ते आपुलकीने चौकशी कशी करत आणि जरूर तेव्हा मार्गदर्शनही करत.'' यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वावर अशा अनेक थोर माणसांच्या सहवासामुळे व मार्गदर्शनामुळे प्रभाव पडला. त्यातून त्यांचे व्यक्तिमत्त्व लोभस बनले. इ.स. १९३४ ते ३९ पर्यंतचा काळ मोठा वैचारिक संघर्षाचा आणि धामधुमीचा काळ होता. अनेक चांगल्या वाईट घटना या काळात घडल्या.

महाविद्यालयाचे शिक्षण पूर्ण होईल का या साशंक वृत्तीने यशवंतराव कोल्हापूरला गेले. तेथे राहणे, जेवणे, शुल्क, पुस्तके व इतर खर्च इ. सर्व खर्चाची तरतूद त्यांनी केली. तेथे त्यांना उत्तम प्राध्यापकवर्ग भेटला. त्यामध्ये प्राचार्य बाळकृष्ण इतिहास शिकवत. त्यांना यशवंतरावांबद्दल प्रेम वाटू लागले. आर्थिक अडचणीमुळे सहा सहा महिने त्यांना फी भरता येत नसे. पण प्राचार्यांनी त्यांची अडचण लक्षात घेऊन त्यांना सवडीने शुल्क भरण्याची सवलत दिली. एक प्रसंग असा घडला की परीक्षा शुल्कासाठी

आणलेले पैसे चोरीस गेले. मित्र गौरीहर सिंहासने यांनी शुल्क व परीक्षा फी भरून तो प्रसंग निभावून नेला.

यशवंतरावांना 'अर्धमागधी' हा विषय डॉ. उपाध्याय नावाचे प्राध्यापक शिकवत होते. तर्कशास्त्रासारखा अवघड विषय प्रा. ना.सी.फडके शिकवत होते. अवघड विषय सोपा करून सांगण्याची हातोटी त्यांना होती. जवळजवळ तीन पिढ्यांचे मनोरंजन करणारे थोर कादंबरीकार, कथाकार प्रा. ना.सी.फडके यांचा जबरदस्त प्रभाव त्यांच्यावर पडला. लेखनाला बोली भाषेने नटविणाऱ्या ह्या साहित्यिकाने यशवंतरावांच्या पिढीला प्रेम आणि श्रृंगार यांचे धडे दिले. प्राध्यापकाच्या पेशावर त्यांचे मनापासून प्रेम होते. ते तरुण विद्यार्थ्यांत मिसळत असत. अध्यापनातील कौशल्यामुळे त्यांनी यशवंतरावांसारख्या अनेक विद्यार्थ्यांना वश करून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला वळण लावले. त्यामुळे विद्यार्थिदशेतच 'जादूगार' व 'दौलत' सारख्या कादंबरीचे ते उत्तम वाचक झाले. त्यांची साहित्यिक अभिरुची दिवसेंदिवस वृद्धिंगत होत गेली.

मराठी, इतिहास व तर्कशास्त्र हे त्यांच्या आवडीचे विषय होते. 'माधवराव पटवर्धन', 'माधव ज्युलियन' उत्तम इंग्रजी कविता शिकवत असत. त्यांच्याबद्दल यशवंतराव सांगतात,''मात्र फडके जसे लोकप्रिय होते तशा तऱ्हेची लोकप्रियता माधवरावांना नव्हती. पण ते प्रवृत्तीने विद्वान आणि प्रकृतीने गंभीर होते. इंटरमिजिएटच्या वर्गामध्ये ते आम्हांला इंग्रजी कविता शिकवत असत.'' डॉ. बोस हे इंग्रजीचे प्रोफेसर यशवंतराव बी.ए. च्या वर्गात असताना शिकवत असत. राजाराम कॉलेजमध्ये अशा थोर साहित्यिक व प्राध्यापक व्यक्तीचा प्रभाव यशवंतरावांच्या कॉलेजजीवनावर निश्चितच पडला. त्यांच्याकडून घेतलेले सुसंस्कार हे त्यांना सतत प्रेरणादायी व प्रेरक ठरले. वाचन, मनन, चिंतन या सवयी यशवंतरावांना लागल्या. त्याचा खूप फायदा त्यांना झाला. कोल्हापूरातील वास्तव्यात त्यांनी छत्रपती शाहू महाराजांचे बहुमोल कार्य प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिले. सत्यशोधकीय चळवळीचा अनुभव जवळून घेतला. कोणत्याही भाषिक वादात न गुरफटता अव्याहतपणे व चिरतरुण मनोवृत्तीने ते वाचन करीत होते. अफाट वाचनातून, निरीक्षणातून त्यांनी स्वत:मधला लेखक जागता ठेवण्याचा प्रयत्न केला. मराठीतील सर्व वाङ्मय प्रकारांवर त्यांचे नितांत प्रेम होते. तसा त्यांना कोणताही विषय वर्ज्य नव्हता. त्यांचे वाचन हे शोधक दृष्टीचे होते. म्हणूनच सभोवतालच्या घटनांकडे ते पुढे सूक्ष्म दृष्टीने पाहू लागले. त्यातली जीवनविषयक विसंगती शोधत सहजतेने लेखन व भाषण करू लागले. वाचनाच्या वेडाने झपाटलेले त्यांचे मन जे हातात मिळेल ते वाचत गेले. कॉलेजची आठवण सांगताना ते म्हणतात, ''कोल्हापूरची उच्च शिक्षणाची ही चार वर्षे माझ्या आयुष्यातील पायाभूत आणि गतिमान अशी वर्षे

आहेत. गेल्या तीन वर्षांच्या राजकीय अनुभवानंतर मी आता सर्व परिस्थिती व विचारांतील भेदाभेदांकडे काहीशा तटस्थ वृत्तीने पाहू शकत होतो.'' यशवंतराव कोल्हापूरच्या महाविद्यालयामध्ये शिकत होते. परंतु आठवड्यातील तीन दिवस ते सातारा जिल्ह्यातल्या संघटनेच्या कामासाठी खर्च करत राहिले. वर्षातील सात आठ महिने राजकीय जागृतीचे काम ते करत असत. शेवटचे दोन महिने अभ्यास करून परीक्षा देत असत. कॉलेज जीवनातच त्यांनी भावी राजकीय जीवनाचा पाया भक्कम केला. येथील वास्तव्यामुळेच त्यांना अनेक कलांचा छंद जडला. साहित्याची आवड निर्माण झाली. के.डी.पाटील, आनंदराव चव्हाण, नानासाहेब अयाचित सारखे अनेक मित्र लाभले. विद्यार्थी, छोटा कार्यकर्ता म्हणून यशवंतराव महाविद्यालयामध्ये ओळखले जाऊ लागले. अखेर १९३८ मध्ये त्यांनी बी.ए. ची पदवी संपादन केली.

पदवी प्राप्त झाल्यानंतर एल्.एल्.बी.चे शिक्षण घ्यायचे असा विचार त्यांच्या मनात आला. सुरुवातीला आपण शिक्षकी व्यवसायाकडे वळावे किंवा एखादी शिक्षणसंस्था काढावी किंवा एखादे वृत्तपत्र काढून संपादकाचे काम करावे असाही विचार त्यांच्या मनात आला. परंतु मित्रांच्या सल्ल्यानुसार हा विचार बाजूला गेला. त्या संदर्भात आपल्या मित्रांचे मनोगत नोंदवताना ते म्हणतात,''तुला शिक्षक वा संपादक व्हायचे असले, तरी कायद्याचे ज्ञान काही तुझ्याआड येणार नाही. कायद्याची परीक्षा देऊनही तू त्या मार्गाने जाऊ शकशील. फक्त पदवीधरच राहिलास, तर अर्ध्यावर लोंबकळत राहशील.'' त्यामुळे यशवंतरावांनी कायद्याचा अभ्यास करण्याचा निर्णय घेतला. दोन वर्षांच्या खर्चासाठी म्हणून त्यांनी विट्यात जी वडिलोपार्जित शेती होती ती विकली. आणि पुण्याला लॉ साठी जाण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी त्यांना त्यांचे मित्र आत्माराम बापू पाटील यांचे खूप सहकार्य लाभले. सुरुवातीस ते त्यांच्या घरी राहू लागले. नंतर शुक्रवार पेठेतील श्री. स.आ. जोगळेकर यांच्या माडीवर ते राहू लागले. व नित्यनियमित कॉलेजला जाऊ लागले. पुण्यामध्ये अनेक वाङ्मयीन मंडळे, सभा, संमेलने यास हजर राहू लागले. अनेक अभ्यास मंडळात ते सहभागी झाले. त्यामुळे विचारांची प्रगल्भता वाढू लागली. अभ्यासाशिवाय त्यांचे लक्ष इतर क्षेत्रांकडे आकर्षित झाले. त्याचा परिणाम असा झाला की १९३९ च्या कायद्याच्या पहिल्या परीक्षेत ते नापास झाले. १९४० चे वर्ष संपत आले. कायद्याच्या दुसऱ्या वर्षाचा अभ्यास ते करू लागले. पूर्वी आलेल्या अनुभवाची पुनरावृत्ती होऊ नये असा विचार त्यांच्या मनात येतच होता. आईनेही तसाच सल्ला दिला. या काळात समाजकारण व राजकारण सोडून देऊन यशवंतराव मन लावून अभ्यासाला लागले. या संदर्भात ते लिहितात, ''अभ्यास करू लागल्यानंतर विषयामध्ये रस निर्माण होतो. आणि मग त्यातील सौंदर्य स्थळे लक्षात यायला

लागतात.'' कायद्याच्या परीक्षेचा निकाल लागला आणि ते उत्तीर्ण झाले. १९४० मध्ये ते वकील झाले. त्यांनी काही फौजदारी खटले चालविले. त्यात थोडेफार पैसे मिळू लागले. कराडला ते प्रॅक्टिस करू लागले. कराडमध्ये गुरुवार पेठेत कोळेवाडीकर देशपांडे यांच्या घरी ते भाड्याने राहू लागले. एक वर्षभर त्यांनी वकिलीचा व्यवसाय केला. फौजदारी न्यायदानाचे विलक्षण काम पाहून ते अस्वस्थ झाले. या धंद्यामध्ये असणारी विलक्षण स्पर्धा पाहून ते खिन्न झाले. या संदर्भात ते म्हणतात, ''लॉ कॉलेजच्या लायब्ररीत बसून कायद्याच्या तत्त्वांचा अभ्यास आणि हायकोर्टाच्या निर्णयांचा केलेला व्यासंग यांचा दैनंदिन कामाशी कुठे संबंध येतो आहे असे मला दिसेना.'' पुढे त्यांच्या मनास असा विचार स्पर्शून गेला की,''जर आपले सगळे आयुष्य या वातावरणात असेच जाणार असेल , तर माझ्या ज्या आशा व आकांक्षा मनामध्ये धरून मी शिक्षण पुरे केले, ते एका अर्थाने व्यर्थ आहे.'' यशवंतराव या व्यवसायापासून दूर झाले आणि सामाजिक कार्यात व राजकारणात ते पूर्ण वेळ रस घेऊ लागले.

ग्रंथ हेच गुरू

यशवंतराव विद्यार्थीदशेत वेगवेगळ्या क्षेत्रात वावरत होते. त्यावेळी वेगळी माणसे आणि वेगळ्या वातावरणामुळे त्यांच्या अनुभवात भर पडत होती. वाचनाने आणखी चांगले संस्कार मनावर होऊ लागले. त्यांचे बालपण जरी खेड्यात गेले असले तरी वाचनाची आवड लहानपणीच निर्माण झाली होती. लहानपणी यशवंतराव आईबरोबर रामायण, महाभारताची पारायणे तसेच कीर्तन ऐकण्यास जात असत. कधीकधी आई या ग्रंथांतील कथा सांगे. त्यामुळे त्यांच्या मनाला नवीन जाणिवांचा लाभ होई. या कथावाचनाचा उपयोग त्यांनी स्वत:चे जीवन घडविण्यासाठी केला. यातून त्यांच्या मनाला उर्मी मिळाली. लहानपणापासून त्यांना विद्वानांचे व त्यांच्या थोर साहित्याचे आकर्षण होते. या विद्वानांपासून व साहित्यापासून आपण काहीतरी घेतले पाहिजे असे त्यांना वाटत असे. त्यांना शिकण्याची तृष्णा होती. त्यामुळेच त्यांना वाचनाचा आणि ग्रंथांचा लळा लागला. मुळात लहानपणापासून ते बुद्धिमान होतेच. पण बुद्धिमान असले तरी जिज्ञासेचा अभाव असून उपयोगी नाही. जिज्ञासेपोटी ज्ञान मिळते. यातूनच त्यांना वाचनाचा छंद लागला. ग्रंथवाचन हाच त्यांच्या जीवनाचा पुढे व्यासंग बनला. त्यामुळे विचार करून, अनुभवातून प्रतिक्रिया व्यक्त करावयाची हा त्यांचा स्वभाव बनला. अनुभवाला वाचनाचे आणि विचारांचे कोंदण लाभले.

विठाईची देवावर श्रद्धा होती. रामायणाच्या कथेबद्दल तिला आदर होता. त्या कथा

ती बाल यशवंतास सांगत असे. पुढे यशवंतराव लिहू वाचू लागल्यानंतर ती यशवंतरावांकडून साखरेबुवांची 'सार्थ ज्ञानेश्वरी' वाचून घेत असे. या ग्रंथाचा सारांश आईस विचारला असता ती म्हणते ''कृष्णदेव अर्जुनाला सांगतात, की तू आपला 'मी' पणा सोड आणि जे तुझे काम तू केले पाहिजेस, ते तू करीत राहा.'' गीतेचा एवढा साधा आणि सरळ अर्थ आईने सांगितला. त्यातून त्यांना स्वावलंबनाचे धडे मिळाले. यशवंतराव उन्हाळ्याच्या सुट्टीत आजोळी देवराष्ट्राला विश्रांतीसाठी जात. तसे ते त्यांचे आवडते ठिकाण होते. या ठिकाणी त्यांनी 'मेघदूत' काव्याचे अधिक पाठांतर केले. या संदर्भात 'ऋणानुबंध' या पुस्तकात त्यांची आठवण अशी सांगतात, ''देवराष्ट्रात शेतावर जाताना मी 'मेघदूत' घेऊन जायचो. शेताच्या कडेने झुळझुळ वाहणारा 'सोनहिरा', आंब्याची गर्द आंबराई, चैत्र-वैशाख ज्येष्ठाचे ते दिवस, आंब्यावर कुठेतरी बसलेली कोकिळा कुहूकुहू करायची आणि 'आषाढस्य प्रथम दिवसे' माझे पाठांतर चालू असायचे.'' देवराष्ट्र परिसरामुळे त्यांची वाचनाची गोडी वाढली. देवराष्ट्राला जाताना मित्राकडून व वाचनालयातून ते वाचण्यासाठी पुस्तके घेऊन जात. बरोबर आणलेली पुस्तके आंबराईच्या त्या निसर्गरम्य ठिकाणी बराच वेळ बसून ते वाचत. सुरुवातीला हरिभाऊ आपट्यांपासून जी काही पुस्तके मिळाली ती वाचण्याचा सपाटा त्यांनी चालू ठेवला. तसा त्यांच्या वाचनाचा छंदच मुळी कादंबरी वाचनापासून सुरू झाला. त्यांच्या वाचनाच्या छंदाबद्दल ते म्हणतात, ''हरिभाऊ आपटे यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या वाचून झाल्यानंतर त्यांच्या सामाजिक कादंबऱ्या मी वाचल्या. नाथमाधवांच्या बहुतेक कादंबऱ्या वाचून झाल्या होत्या. या वर्षी मी येताना माझ्याबरोबर 'पण लक्षात कोण घेतो' व 'मी' या हरिभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्या आणि केतकरांची 'ब्राह्मणकन्या' ही कादंबरी आणली होती.'' वाचनाची आवड निर्माण झाली पण त्यामध्ये काय वाचावे व काय वाचू नये अशी त्यांच्या मनाची द्विधा अवस्था त्यावेळी झाली. जे हाताशी येईल, जे आवडेल ते वाचत राहिले. यशवंतरावांची सुरुवातीची अवस्था थोडी गोंधळलेली होती. वाचनातील नेमकेपणा त्यांना उमगत नव्हता. तरीही ते वाचत राहिले. विषयाची आवड नि निवड ही त्या त्या वाचकाच्या व्यक्तिमत्त्वाचा एक अविभाज्य भाग असतो. तरीही इतिहास, राजकारण व वाङ्मय हे त्यांच्या आवडीचे विषय होते. या विषयाच्या पुस्तकांची आवड असल्याशिवाय त्या विषयाचा जिव्हाळा निर्माण होत नसतो. तसे साधारणपणे त्यांना सर्वच साहित्य प्रकार आवडत होते.

यशवंतरावांनी इंग्रजी साहित्यसुद्धा मोठ्या आवडीने वाचले. इंग्रजी भाषेमध्ये विषयाची विविधता व ग्रंथांची विपुलता जास्त आहे असे त्यांच्या लक्षात आले. पाश्चिमात्य विद्येने मिळणारे ज्ञान नव्यानव्या उपक्रमांसाठी, नव्या सामर्थ्यासाठी,

समाजाच्या एकूण भरभराटीसाठी अत्यंत आवश्यक आहे अशी त्यांची ठाम समजूत होती. विद्यार्थी दशेतच नेपोलियन, मॅझिनी, गॅरीबाल्डी, डी. व्हॅलेरा यांची चरित्रे त्यांनी वाचली होती. तसेच बी.ए. ला असताना यशवंतरावांनी लिटन स्ट्रॅची लिखित 'क्वीन व्हिक्टोरिया' यांचे चरित्र अभ्यासले होते. एच. जी. वोरा यांच्या 'आऊटलाईन ऑफ हिस्टरी' या ग्रंथाचे वाचन त्यांनी केले. बर्नार्ड शॉ च्या नाटकांच्या प्रस्तावना वाचल्या. तसेच फ्रेंच लेखक व्हिक्टर ह्युगो यांची 'लॉ मिझरा ब्ल' व एक दोन कादंबऱ्या त्यांनी वाचल्या. 'डिप्लोमसी फॉर अ क्राऊडेड वर्ल्ड' हे जॉर्ज बॉल यांचे पुस्तक किंवा ब्रेझेझिन्स्की चे 'अमेरिका इन अ होस्टाईल वर्ल्ड' सारखे लेख ते आवडीने वाचत. तसेच निराद चौधरी यांनी लिहिलेले जर्मन पंडित मॅक्समुलर यांचे 'स्कॉलर एक्स्ट्रॉऑर्डीनरी' सारखे चरित्र किंवा हेरगिरीवरील 'बॉडीगार्ड ऑफ लाईफ' हे अँथनी ब्राऊन यांचे पुस्तक त्यांनी वाचले. तसेच 'रूट्स' हे ॲलेक्स हॅली यांचे पुस्तक वाचून ते एखाद्या रसाळ कादंबरीसारखे आहे असे सांगितले. इंग्रजी साहित्यात पारमार्थिक जीवनापेक्षा ऐहिक जीवनावर जास्त भर दिला आहे. ऐहिक जीवन समर्थपणे जगले पाहिजे हा विचार मांडला आहे. या विचारांचा प्रभाव यशवंतरावांवर पडला. ''ज्या ज्ञानाने इतर लोकांनी आपल्यावर सरशी केली ते ज्ञान आपण धिक्कारू नये'' असे त्यांचे मत बनत गेले. विद्या म्हणजे ज्ञान. जेणेकरून मनुष्य निर्मळ होतो, विचारी होतो, समर्थ होतो हा विचार सदैव मनी बाळगून त्यांनी इंग्रजी वाचन केले.

यशवंतरावांचे पुष्कळ वाचन प्रवासातच होत होते. प्रवासात ते दैनंदिन कामाबरोबरच साहित्याचे वाचनही करत असत. सर्वच पुस्तके सुरुवातीपासून शेवटपर्यंत वाचणे त्यांना जरी शक्य नसले तरी आवडणारी पुस्तके चिंतनशील वृत्तीने ते वाचत. एके ठिकाणी ते म्हणतात,''कोठलाही विचार हा क्रियाशील होण्यापूर्वी तो भावनेने समजून घ्यावा लागतो. आणि जर भावना अपुरी असेल किंवा चुकीची असेल तर त्यातून येणारा निर्णय, त्यातून येणारा विचार हा अपुरा आणि चुकीचा असण्याची शक्यता असते आणि म्हणून 'अवेअरनेस' ची अतिशय आवश्यकता आहे.'' म्हणूनच भक्ती आणि बुद्धी हे यशवंतरावांच्या विचारांचे एक महत्त्वाचे अंग होते. त्यांच्या या विचारात एक निश्चित दृष्टेपणा दिसतो. त्यामुळे त्यांच्या या विचारांचा प्रभाव केवळ त्यांच्या काही समकालीनांवरच नव्हे तर महाराष्ट्रातील पुढच्या पिढ्यांमध्ये अनेकांवर पडला. परंतु हे विचारधन अंगी निर्माण करण्यासाठी त्यांनी खूप वाचन केले. मन, वाणी आणि कृती यात एकवाक्यता आणली. म्हणूनच शाश्वत विचार मांडण्याचे सामर्थ्य त्यांच्या बोलीला प्राप्त झाले.

लोकमान्य टिळक हायस्कूलमध्ये शिकत असताना लो. टिळकांचे चरित्र आणि विचार समजून घेण्यासाठी यशवंतरावांना पुस्तके वाचावीच लागत. त्या हायस्कूलमध्ये दरवर्षी लो. टिळकांच्या जीवन आणि कार्यावर निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा घेतल्या जात. तेथील शिक्षक, मुख्याध्यापक राष्ट्रीय वृत्तीचे असल्यामुळे त्यांच्यात देशातील राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीसंबंधी चर्चा चालत असे. तसेच त्यावेळी कराडमधील व्यापारी लाड यांच्या दुकानात 'विविध वृत्त व ज्ञानप्रकाश' यांसारखी वर्तमानपत्रे येत असत. त्यामध्ये देशात घडत असलेल्या घटनांविषयी विस्ताराने माहिती मिळे. त्यामुळे यशवंतरावांचा कल गंभीर वाचनाकडे वळला. केळकरांचे छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र तसेच शि.म.परांजपे यांचे 'काळ' मधील निबंध त्यांनी वाचून काढले. एकाच वेळी चार पाच प्रकारच्या पुस्तकांचे ते वाचन करत. ते म्हणतात, ''गंभीर, विचारप्रधान ग्रंथ, चरित्र वा आत्मचरित्रे, कथा-कवितासंग्रह आणि कादंबरी अशी या प्रवाहाची वाटणी प्रसंगानुसार असते. गंभीर, विचारप्रधान ग्रंथात माझे आवडीचे विषय राजकारण आणि इतिहास हे आहेत. चरित्रे व आत्मचरित्रे मी वाचतो. अर्थात चरित्रनायक कोण आहे, याच्यावर निवड निश्चित अवलंबून असते.'' यशवंतरावांनी अगदी अलीकडच्या काळातील प्रकाशित झालेली आत्मचरित्रे वाचलेली दिसतात. हंसा वाडकर, आनंदीबाई शिर्के, स्नेहप्रभा प्रधान, आनंदीबाई विजापुरे, आनंद साधले, गजानन जागिरदार इ. काही उदाहरणे सांगता येतील. पंडित जवाहरलाल नेहरुंचे आत्मचरित्र प्रकाशित होताच पाच-सहा मित्रांनी एकत्र येऊन वाचल्याचे ते सांगतात. काकासाहेब गाडगीळांचे पथिक, आचार्य अत्रेंचे 'कऱ्हेचे पाणी', 'मी कसा झालो', ना.सी. फडके यांचे 'माझ्या साहित्य सेवेतील स्मृती' इ. आत्मचरित्रे वाचून त्यावर त्यांनी आपले अभिप्राय तर नोंदवलेच शिवाय आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराबद्दल आपल्या विचारांच्या काही नोंदीही केल्या आहेत.

साहित्याचे बाळकडू घेऊनच ते साहित्यक्षेत्रात आले. फुल्यांच्या चरित्रापासून त्यांनी वाचनाला सुरूवात केली. त्यांनी कवी गोविंद आणि कवी गोविंदाग्रजांच्या कविता वाचल्या. गडकऱ्यांची नाटके वाचून ते भारावून जात. 'राजसंन्यास' या त्यांच्या नाटकातील काही संवाद त्यांना तोंडपाठ होते. तुरुंगात असताना आचार्य भागवतांशी त्यांचा परिचय झाला. गांधीवादी आचार्यांनी त्यांना कालिदास तर सांगितलाच पण सावरकरांचे राजकारण, त्यांच्या कविताही सांगितल्या. सावरकरांचे 'कमला' व 'गोमान्तक' ही काव्ये वाचावयास सांगितली. या वाचनाचा त्यांच्या मनावर परिणाम झाला. त्यांचे मन संवेदनशील होते. त्यामुळे वाचलेल्या साहित्यातील विचार ते लगेच आत्मसात करत असत. यामधून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार येत होता. वाचनामध्ये

आवडनिवड होत होती. चांगले वाईट कळत होते. फडके, खांडेकर, माडखोलकर यांच्या समकालीन काळात यशवंतरावांचे विद्यार्थिजीवन असल्याने साहित्य वाचनाचा छंदच त्यांना लागला. या काळात मध्यमवर्गीयांचे चित्रण करणाऱ्या अनेक कादंबऱ्या त्यांनी वाचल्या. माडखोलकरांच्या कादंबरीने या काळात राजकीय कादंबरीला सुरुवात झालेली होती. खांडेकरांची 'दोन ध्रुव' ही कादंबरी त्यांनी कोल्हापूरच्या भुसारी वाड्यात कशी वाचून काढली हे त्यांच्या शेवटपर्यंत स्मरणात होते. महाविद्यालयीन जीवनामध्ये अभ्यासविषयक पुस्तकांपेक्षा इतर अधिक सखोल वाचन करण्याचा प्रयत्न केला. मूलत:च असलेली वाचनाची हौस अधिकच वाढली. अभ्यासक्रमाने त्यांच्या वाचनाला शिस्त लावली. विचारांची शुद्धता राखण्याची कला ते शिकले. अभ्यासवाचन, सदैव ग्रंथ सहवास, आत्मविश्वास, आटोकाट प्रयत्न या त्यांच्या अंगभूत गुणांमुळेच पुढे त्यांनी नेत्याची भूमिका वठवली व त्यांचे कर्तृत्व फुलत गेले.

राजकारणाच्या रामरगाड्यात सारे आयुष्य वेचूनही यशवंतराव सुसंस्कृत, समंजस आणि अभ्यासकांचे सन्मित्र राहिले. याचे सारे श्रेय त्यांच्या पुस्तक प्रेमाला द्यायला पाहिजे. साहित्यावर त्यांचे मनापासून प्रेम होते. भेटवस्तू म्हणून कोणी पुस्तक दिले तर त्यांना आवडायचे. कुठलेही दैनिक, साप्ताहिक, नियतकालिक त्यांच्याकडे आले की त्यातील पुस्तक परीक्षणाचे सदर ते आवर्जून वाचत असत. बहुचर्चित मराठी, इंग्रजी पुस्तके ते दरमहा आणून घेत. त्यांच्या कागदपत्रांच्या बॅगेत नेहमी दोन-तीन पुस्तके असत. प्रवासात ते भरपूर वाचायचे. दिवसभर वाचन झाले नाही तर रात्री १२ नंतर वाचीत बसायचे. यशवंतरावांच्या या वाचन छंदाबद्दल प्रसिद्ध समाजवादी कार्यकर्ते नानासाहेब गोरे लिहितात, ''यशवंतरावजी चव्हाणांना साहित्याची मनापासून आवड होती. राजकारणाच्या घिसाडघाईत त्यांना फुरसत मिळाली असती तर त्यांनी भरपूर वैचारिक व ललितलेखन केले असते. त्यांचा ग्रंथसंग्रह फार मोठा होता. ते भरपूर वाचन करीत व वाचलेले विचार रवंथ करून आपली धोरणे ठरवीत. त्यात दिखाऊपणाचा लवलेशही नव्हता. कादंबरी असो, काव्य असो, इतर कोणतेही साहित्य असो त्यात ते अभ्यासपूर्वक रस घेत.''

ग्रंथवाचनाची त्यांची हौस दांडगी होती. त्यांच्या सहवासात असलेल्या असंख्य लोकांनी याची नोंद घेतली होती व त्यांच्याबद्दलच्या आठवणी नमूद करताना सांगितलेही आहे. त्यांचे स्वत:चे ग्रंथालय होते. इंग्रजी किंवा मराठी पुस्तके प्रसिद्ध झाल्याबरोबर ते खरेदी करत व ग्रंथालयात ठेवत. त्यामुळे त्यांचे ग्रंथालय अद्ययावत व सुसज्ज बनले होते. सरकारी कागदपत्रांच्या फाईली रात्री जागरण करून ते पूर्ण करत. त्यानंतर दोन

तास वाचन आणि नंतरच झोप हा त्यांचा रोजचा कार्यक्रम असे. संतवाङ्मयाचीही त्यांना गोडी होती. अनेक साहित्यिकांशी त्यांची खास मैत्री होती. साहित्यकारांच्या मेळाव्यात ते सहभागी होत असत. विनोद, कोट्या करत असत. मराठी इतकेच हिंदी आणि इंग्रजीवरही त्यांचे प्रभुत्व होते.

वाङ्मयातून माणूस घडतो, संस्कृती घडते हे यशवंतरावांनी ओळखले होते. म्हणूनच त्यांनी अनेक गुणांबरोबर साहित्यिक गुणांची जोपासना केली. साहित्यिकांबद्दल त्यांना आदर होता. त्यांचा सन्मान करण्यात त्यांना आनंद वाटत असे. ग.दि.माडगूळकर, ना.धों. महानोर सारख्या साहित्यिकांना त्यांनी आमदारकी दिली. रणजित देसाई, शिवाजी सावंत, आनंद यादव, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांसारख्या साहित्यिक विद्वानांच्या चर्चेत ते भाग घेत. त्यांच्या साहित्याबद्दल आपले अभिप्राय देत असत. त्यांची वाचनाची शैली मात्र वेगळीच होती. एकाच वेळी पाचसहा पुस्तके हाताळत व त्यातील काही पाने चाळत असत. राम खांडेकर त्यांच्याबद्दल सांगतात, ''यशवंतरावांना दोन गोष्टींची फार चीड होती. एक - ते सरकारी काम करण्यास बसले असताना कोणी अडथळा आणला तर व दुसरे वाचन चालू असताना कोणी आले तर.'' उत्तरोत्तर यशवंतरावांचे ग्रंथप्रेम वाढतच गेले. यशवंतरावांनी मूलभूत ग्रंथप्रेमाची आवड कधीही कमी होऊ दिली नाही. तसे संस्कार त्यांच्यावर कॅम्प जेलच्या १२ नंबरच्या बराकीत झाले होते. तेथे आचार्य भागवत, रावसाहेब पटवर्धन, मामा गोखले, एस.एम्. जोशी यांसारखी समविचारी माणसे एकत्र येऊन वाचन करीत. तेथेच खऱ्या अर्थाने त्यांचा वैचारिक पिंड जोपासला जात होता. आचार्य भागवतांनी त्यांना बुद्धी आणि मन संस्कारित करण्याचा सल्ला दिला होता. याच काळात कालिदासाचे शाकुंतल, मेघदूतसारख्या संस्कृत वाङ्मयाचे त्यांचे अध्ययन सुरू होते. त्यांनी शेक्सपिअरची नाटकेही अभ्यासली. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढून वाचनाची खोली वाढली. तेथे भेटलेली माणसे, वाचलेली पुस्तके, झालेल्या चर्चा, त्यातून आलेली नवी जाण या सर्व गोष्टी यशवंतरावांच्या जीवनाला पोषक ठरल्या.

यशवंतराव केंद्रीय मंत्रिमंडळात गेल्यानंतर त्यांच्या कामाचा व्याप वाढला तरीही त्यांनी ग्रंथ वाचन कमी होऊ दिले नाही. स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रात राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक स्थित्यंतरे झाली. त्यामुळे नवनिर्मित साहित्य लेखकांना चालना मिळाली. अशा अनेक लेखकांनी त्यांच्या आकृतिबंधावर यशवंतरावांनी टीकाटिप्पणी करावी, प्रस्तावना लिहावी अशी आग्रही भूमिका धरली. यशवंतरावांनी त्यातील साहित्यपणा हरवू न देता त्यातील साहित्यविचाराच्या मर्मबंधाला स्पर्श

केला. त्या कलाकृतीच्या आकलन-आस्वादनाचे मूल्यमापन करून नवलेखकांना योग्य ती दिशा, स्फूर्ती, दृष्टी तर दिलीच शिवाय जिज्ञासाही वाढवली. मग त्यामध्ये 'श्री जगजीवनराम : व्यक्ती आणि विचार' (डॉ. प्रकाश माचवे), 'भूमिपुत्र' (राजा मंगळवेढेकर), 'अमृतपुत्र', 'हिरोशिमा' (भा.द.खेर), 'माझ्या आठवणी व अनुभव' (महर्षी विठ्ठल रामजी शिंदे), 'छत्रपती शिवराय'(महाराष्ट्र कवी यशवंत) लोकसाहित्य, 'साजशिणगार' (संपादिका डॉ. सरोजिनी बाबर, डॉ. सरोजिनी वैद्य, शांता शेळके), 'स्वर' (सुधांशु) 'युगवार्ता' (सविता भावे), 'राजर्षी शाहू- काळ, विचार आणि कार्य' (संपादक डॉ. एस्. एस्. भोसले) इ. काही पुस्तकांचा उल्लेख करता येईल. अशा कित्येक विविध प्रकारच्या ग्रंथांना, ललितलेखनाला मोजक्या शब्दात मौलिक अशा प्रस्तावना त्यांनी लिहिल्या. संबंधित ग्रंथांचे अभ्यासपूर्ण वाचन करून त्या कलाकृतीच्या अनुषंगाने आपले अभिप्रायही त्यांनी नोंदविले. शिवाय कथा कादंबऱ्यांबरोबरच वैचारिक ग्रंथांची निर्मिती व्हावी यासाठी विचारवंतांनी जाणीवपूर्वक विचार करण्याची गरज असल्याचे सुतोवाचही त्यांनी केले आहे. काही इंग्रजी आणि हिंदी पुस्तकांवरही अभ्यासपूर्ण वाचन करून त्यांनी प्रस्तावना व आपले मत प्रगट केले आहे. यातून त्यांच्या ठिकाणी असणारी उच्च दर्जाची अभिरुची, रसिकता, ग्रंथप्रेम व वाचनवेड पाहावयास मिळते. २६ एप्रिल १९७४ मध्ये परदेशी दौऱ्यावर असताना कौलालंपूर (हिल्टन) येथून सौ. वेणूबाईंस जे पत्र लिहिले आहे त्या मध्ये ते लिहितात, ''परवा येथे येताना मी अगदी शेवटच्या घटकेला वाचण्यासाठी जे पुस्तक उचलले ते मी बरेच दिवस राखून ठेवले होते. आवडीने खावयाचा पदार्थ जसा चाखूनमाखून खावा, शेलकी चांगली वस्तू जशी राखून सावरून वापरावी तसे हे पुस्तक थांबत थांबत, त्याची रुची घेत घेत सावकाशीने वाचावे असे ठरविले होते.'' यावरून त्यांच्या ग्रंथप्रेमाची प्रचिती येते.

○ ○ ○

आदर्शांची प्रभावळ

यशवंतरावांना लहानपणापासूनच प्रत्येक गोष्टीविषयी उत्सुकता होती. प्रत्येक गोष्ट जाणून घेण्याची त्यांना सवय होती. संस्कारशील मनोवृत्तीची आई, शाळेतले शिक्षक, मोठे भाऊ, महान नेते, चळवळीतील कार्यकर्ते आणि सहकारी या सर्वांमुळे त्यांचे मन संस्कारसंपन्न बनत गेले. व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होत गेली. यशवंतरावांनी जेव्हा सार्वजनिक काम प्रत्यक्ष करण्यास सुरूवात केली. तेव्हा त्यांचा वेगवेगळ्या क्षेत्रांतल्या लोकांशी संबंध आला. या आदर्श व्यक्तींच्या विचारांनी व कार्याने ते प्रभावित झाले. तर कधी यशवंतरावांना त्यांचे मार्गदर्शन मिळाले. तर कधी ते सहकारी बनून यशवंतरावांना मदत करत राहिले. यशवंतरावांच्या जीवनप्रवाहात या सर्वांना मोलाचे व महत्त्वाचे स्थान आहे.

यशवंतराव चव्हाण शालेय शिक्षण घेत असताना एकाच वेळी सामाजिक आणि राजकीय चळवळीचा परिणाम त्यांच्या मनावर होत होता. त्याचवेळी वाचनामुळे त्यांच्या मनावर आणि विचारांवर काही चांगले संस्कार होत होते. बंधू गणपतरावांनी म. ज्योतिराव फुले यांचे दिलेले छोटेसे चरित्र त्यांच्या वाचनात आले तेव्हा म. फुल्यांचा विचार मूलगामी आहे आणि तो काही नवीन दिशा दाखवितो आहे हे त्यांच्या लक्षात आणून दिले. शेतकरी समाजाची होणारी पिळवणूक, दलित समाजावर होणारा अन्याय आणि शिक्षणापासून वंचित ठेवलेला बहुजन समाज व स्त्रियांचे प्रश्न सोडवल्याखेरीज देशाचे कार्य होणार नाही हे म. फुले यांनी मांडलेले विचार त्यांच्या मनावर बिंबले गेले. त्यांनी म. फुल्यांची प्रशंसाच केली आहे. गांधी, नेहरू, राधाकृष्णन, काकासाहेब गाडगीळ, धनंजय गाडगीळ इ. समकालीन व्यक्तींबद्दल त्यांच्या मनात आदरभाव तर होताच, परंतु त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा प्रभाव यशवंतरावांवर दीर्घकालीन होता. खाडिलकर, केळकर, फडके, माडखोलकर वगैरे लेखकांच्या साहित्याबद्दल त्यांनी

प्रसंगोपात्त लिहिले. त्यांच्या साहित्य कलाकृतीने त्यांना मोहित केलें. एवढेच नव्हे तर त्यांना विचारशील बनवले. त्यामुळे या साहित्यिकांच्याबद्दल त्यांनी आदरयुक्त विचार व्यक्त केले आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रभावामुळे यशवंतराव वाचक व रसिक बनले. राष्ट्रपुरुष शिवाजी महाराज, राजर्षी शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विठ्ठल रामजी शिंदे या वंद्य विभूतींविषयी यशवंतरावांनी प्रसंगानुसार लेखन व भाषण केलेले दिसते. यावरून या महान राष्ट्रीय व्यक्तींचा प्रभाव त्यांच्यावर किती होता हे लक्षात येते. लो. टिळकांसंबंधी त्यांनी खूप वाचन केले होते. टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचा जबरदस्त प्रभाव त्यांच्यावर झाला होता. त्याबरोबरच जाती जमातीचे जे प्रश्न आहेत, काही राष्ट्रीय स्वरूपाचे प्रश्न आहेत त्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे असे त्यांना जाणवू लागले. फुले आणि टिळक या दोघांचेही साहित्य त्यांनी वाचले. तेव्हा त्यांना त्यात कुठेही साम्य दिसले नाही. पण त्यांनी तुलनेचा विचार बाजूला ठेवून एक गोष्ट मनाशी निश्चित केली की दोघांनी सांगितलेले विचार महत्त्वाचे आहेत. म्हणून फुले आणि टिळक या दोघांनाही त्यांनी मोठे मानले. तसे यशवंतरावांचे मन हळुवार आणि सुजाण होते. यशवंतरावांच्या राजकीय प्रवासातही अनेक व्यक्ती आल्या. बाळासाहेब खेर, मोरारजी देसाई, नाना पाटील, अच्युतराव पटवर्धन, सरदार वल्लभभाई पटेल, पं. जवाहरलाल नेहरू, लालबहादूर शास्त्री या प्रमुख व्यक्तींशिवाय इतर अनेक छोट्या मोठ्या व्यक्ती त्यांच्या जीवनात आल्या. या व्यक्तींनी त्यांचा राजकारणी पिंड घडवला.

यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाची अशी जडणघडण होत असतानाच काही राजकीय क्षेत्रांतल्या घटनांचाही प्रभाव त्यांच्या मनावर झालेला दिसतो. यतींद्रनाथ दास यांचे आमरण उपोषण ही त्यातलीच एक अविस्मरणीय घटना होय. राजकीय कैद्यांना गुन्हेगारांसारखी वागणूक इंग्रज सरकार देत होते. या गोष्टींचा सात्विक संताप यतींद्रांना आला आणि त्यांनी उपोषण सुरू केले. लाहोरच्या तुरुंगात भर दुपारी एकच्या सुमारास त्यांनी प्राणाहुती दिली. या घटनेचा यशवंतरावांच्या बालमनावर खोल परिणाम झाला. आणि देशात घडणाऱ्या घटनांचे अर्थ समजावून घेण्याचा ते प्रयत्न करू लागले. आपण जीवनात देशकार्यासाठीच धडपडायचे असे त्यांनी मनात ठरवून टाकले.

म. गांधीजींच्या जीवनाचा व विचारांचा परिणाम यशवंतरावांवर झालेला दिसतो. तेवढीच निष्ठा नेहरूंच्यावर होती. गांधींच्या व्यक्तिमत्त्वावर निष्ठा, पंडित जवाहरलाल नेहरूंच्या विचारासंबंधी एक नवी जवळीक त्यांच्या मनात निर्माण झाली होती. या नेत्यांनी स्वातंत्र्याचे विचार दिले. गांधी, नेहरू या यशवंतरावांच्या प्रेरणा होत्या. म. गांधी व पंडित नेहरूंबद्दल यशवंतरावांनी अनेक ठिकाणी गौरवोद्‌गार काढले आहेत.

'ऋणानुबंध' या पुस्तकातील स्वातंत्र्याचा पहिला दिवस या लेखात शेवटी ते म्हणतात, ''पण त्याच वेळी म. गांधी, पं. नेहरु यांच्या नेतृत्वाचा आधार वाटत होता. स्वातंत्र्ययुद्धाचे हे सेनानी, ज्यांनी राजकीय बदल घडविला, ते आर्थिक व सामाजिक बदल घडविल्याशिवाय राहणार नाहीत, असे मनोमन वाटत होते. तोच दिलासा होता, तेच सामर्थ्य होते. आतापर्यंतच्या निराशेच्या ढगातून प्रकाशाची रुपेरी कडा या दोघां नेत्यांच्या स्मरणातून मनात चमकून गेली आणि मनाला थोडी स्वस्थता मिळाली.'' यशवंतरावांवर अशा अनेक थोर व्यक्तींच्या चरित्राचा प्रभाव पडला आहे. त्यातूनच त्यांचे सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व साकार झाले आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा, व्यक्तिमत्त्वाचाही त्यांचे व्यक्तिमत्त्व घडविण्यात फार मोठा मोलाचा वाटा आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या चरित्रातील समाजपरिवर्तनाच्या त्यांच्या कार्याने यशवंतराव भारावून गेले होते. असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. अशा थोरांच्या कार्यापासून नवीन पिढीने बोध घ्यावा ही अपेक्षा असते. थोरांच्या चरित्रापासून संस्कारित व्यक्तिमत्त्व घडत असते. यशवंतरावांच्यावर सुद्धा महाराष्ट्रातील अशा थोरांचा प्रभाव पडला हे त्यांचे भाग्यच म्हणावे लागेल.

छत्रपती शिवाजी महाराजांना मानबिंदू मानणारे यशवंतराव शिवछत्रपतींचे भक्त होते. छत्रपती शिवाजीमहाराज हे त्यांचे भक्तिपीठ होते. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपूर्वी आणि निर्मितीनंतर त्यांना राजांचे स्मरण वेळोवेळी झाले. त्यांच्यासमोर राजांची आदर्श राज्यव्यवस्था होती. कारण शिवरायांनी गाजविलेले शौर्य, केलेले कर्तृत्व आणि राज्यस्थापना हे मराठी मनावर कायमचा परिणाम करून गेलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व त्यांच्या कार्याचा प्रभाव यशवंतरावांवर पडलेला होता. त्यांच्याविषयी यशवंतरावांनी अनेक वेळा आदर व्यक्त केला आहे. आंबेडकरांची तत्त्वप्रणाली, त्यांनी दिलेले आदेश, विशिष्ट परिस्थितीतील त्यांचे वागणे, त्या त्या वागण्यातून निर्माण होणारे दृष्टिकोन या सर्वांचा यशवंतरावांवर प्रभाव होता. यामुळे सर्वांच्या पुढे जे प्रश्न निर्माण झाले आहेत ते सोडविण्यासाठी त्यांच्या जीवनाकडे पाहण्याचा, मदत व मार्गदर्शन घेण्याचा माझा प्रयत्न अगदी विद्यार्थ्यासारखा असल्याचे ते एका आंतरिक तळमळीने बोलत. यशवंतरावांनी काही आत्मपर, काही प्रवासवर्णनात्मक, काही चिंतनशील काही आठवणींच्या स्वरूपाचे तर काही व्यक्तिमत्त्व साकार करणारे ललित लेख लिहिले आहेत. या लेखांमध्ये काही थोरांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध त्यांनी घेतला आहे. या थोरांच्या चरित्राचाही यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व घडवण्यात फार मोठा वाटा आहे.

काही काळ यशवंतरावांचा एम्.एन्. रॉय यांच्याशी संपर्क आला आणि त्यांच्या

एकूण ध्येय धोरणामुळे यशवंतराव प्रभावित झाले. त्यांच्यावर रॉय यांच्या व्यक्तिमत्त्वाची अधिक छाप पडली. पण ही छाप दीर्घकाळ टिकू शकली नाही. यशवंतराव एके ठिकाणी स्वत:च म्हणतात, ''रॉय यांचा आपल्यावर प्रभाव झाला, तो केवळ बौद्धिक व तात्त्विक पातळीपुरताच सिमीत होता. त्यापेक्षा अधिक खोलवर तो जाऊ शकला नव्हता.'' रॉय यांच्या विचारसरणीतून समाजवादाचे खूप संस्कार झाले असे त्यांच्या पुढील राजकारणात दिसत नाही. त्यांना रॉय यांचे जे आकर्षण होते ते बौद्धिक असण्यापेक्षा भावनिक होते. याचवेळी यशवंतरावांचे जवळचे मित्र आत्माराम बापू पाटील, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, भय्याशास्त्री वाटवे, ह.रा. महाजनी, वामनराव कुलकर्णी यांच्यावरही रॉयवादी विचारांचा पगडा होता. त्यांचे विचार त्यांना पटत होते. त्यामुळे यशवंतरावांच्या मनाची द्विधावस्था झाली होती. यशवंतराव म्हणतात, ''मनाची अशी द्विधावस्था झाल्याशिवाय विचारांचा विकास होत नाही.'' यशवंतरावांचे मित्र रघुअण्णांमुळे ते समाजवादाकडे ओढले गेले होते. पण तेही समाजवादाच्या शहरी विचारांचा प्रभाव यशवंतरावांवर पाडू शकले नाहीत. पण पुढे एस्.एम्. जोशी, ना.ग.गोरे या समाजवादी नेत्यांचा थोडाफार प्रभाव यशवंतरावांवर पडत होता हे त्यांनी कबूल केले आहे. या काळात यशवंतरावांच्या मनावर दोन्ही विचारांचे प्रभाव एकाच वेळी संस्कार करत होते. याचबरोबर म. गांधी, पं. नेहरू व मानवेन्द्रनाथ रॉय यांच्या राजकीय तत्त्वज्ञानाच्या लाटा त्यांच्या भावजीवनाला कशा ढवळून काढत होत्या त्याचे चित्रण ते असे करतात, ''गांधींच्या व्यक्तिमत्त्वावर निष्ठा, पंडित जवाहरलाल नेहरुंच्या विचारासंबंधी एक नवी जवळीक ..... आणि मानवेन्द्रनाथ रॉय यांच्या विचारांकडे पाहण्याचा दृष्टिकोन, अशा एका वैचारिक त्रिकोणात मी या वेळी उभा होतो.''

अशा अनेक नोंदीमधून त्यांच्या वैचारिक जीवनातील आंदोलने आणि त्यांच्या भावजीवनातील काळोख यांचे मोठे प्रभावी दर्शन घडते. त्यावेळच्या प्रसिद्ध व्यक्तींच्या वैचारिक जीवनाचा आदर्शही त्यांच्यासमोर कसा होता हेही यावरून स्पष्ट होते. असे विविध प्रकारचे चांगले वाईट अनुभव, आघात-प्रत्याघात यशवंतरावांच्या जीवनावर होत होते. त्यामुळे भावनांचा कल्लोळ उडत होता आणि या साऱ्या रसायनातून एक नवी आकृती घडत होती. ती आकृती म्हणजेच यशवंतराव होय.

संपर्कातून उदयास आलेले व्यक्तिमत्त्व

यशवंतरावांच्या जडणघडणीमध्ये जसा थोरामोठ्यांचा आदर्श होता त्याचप्रमाणे त्यांच्या काही समकालीन मित्रांचा, काही राजकीय पुढाऱ्यांचा, शिक्षक गुरुजनांचाही

वाटा मोठा आहे असे त्यांनी नमूद केले आहे. अहमद कच्छी सारखा वर्गमित्र बुद्धिमान असून भोवतालची परिस्थिती जाणून घेण्यासाठी तो कसा उत्सुक असे, त्यातून त्यांचे सुसंस्कृत मनाचे प्रतिबिंब यशवंतरावांना पाहावयास मिळाले. उथळे, श्री. निकम, श्री. तांबवे यांची व्यक्तिमत्त्वेही त्यांच्या मनावर खोल ठसा उमटवून गेली. मसूरचे राघुअण्णा लिमये हे यशवंतरावांचे निकटचे मित्र होते. त्यांचे बोलणे अगदी मुद्देसूद व स्पष्ट विचार व्यक्त करणारे असे. त्यांच्या बोलण्यातून स्वातंत्र्याविषयीची तळमळ त्यांच्या शब्दाशब्दांतून व्यक्त होत असे. यशवंतराव अशा व्यक्तिमत्त्वामुळे प्रभावित झाले. स्वत: जाऊन त्यांनी त्यांची ओळख करून घेतली. राघुअण्णांमुळे यशवंतरावांना सावरकरांना भेटण्याची संधी मिळाली.

यशवंतरावांचे येरवडा तुरुंगातले पंधरा महिन्यांचे जीवन म्हणजे त्यांच्या आयुष्यातला एक उत्तम काळ होता. तेथे असताना त्यांना चांगले विचारवंत व आदर्श व्यक्ती जवळून पाहण्याची संधी मिळाली. त्यांमध्ये रावसाहेब पटवर्धन आणि आचार्य भागवत या दोन महत्त्वाच्या व्यक्ती होत्या.

आचार्य भागवत हे गांधीवादी होते. शिवाय अनुभवी आणि विवेकसंपन्न होते. त्यामुळे त्यांचा संपर्क व सांनिध्य लाभणे हे यशवंतराव स्वत:चे भाग्यच समजत. रावसाहेब पटवर्धनांच्या उत्तम इंग्रजी ज्ञानाचा प्रभाव दीर्घकाल त्यांच्यावर राहिला.

डॉ. राम मनोहर लोहिया हेही यशवंतरावांच्या राजकीय जीवनातले एक महत्त्वाचे मार्गदर्शक होते. त्यांचे भाषण यशवंतरावांनी ऐकले होते. त्यामुळे त्यांना भेटण्याची व विचार ऐकण्याची उत्सुकता त्यांना होती. त्यांच्या भेटीमुळे 'लोकनेता' कसा असावा याचे मूर्तिमंत चित्रच त्यांच्या रूपाने त्यांनी पाहिले. पुढे अनेक चळवळींत त्यांचे यशवंतरावांना मार्गदर्शन लाभले. अशा व्यक्तींच्या संपर्कामुळेच यशवंतरावांमध्ये धैर्य व त्यागवृत्ती निर्माण झाली व ती पुढे वाढत गेली. त्यांच्यामुळे यशवंतरावांचे नेतृत्व व व्यक्तिमत्त्व सतत विकसित होत गेले.

माणसे जोडावी कशी आणि त्यांची मने सांधावी कशी याची कला यशवंतरावांना चांगलीच अवगत होती. खेळकरपणाने वागायचे व आपलेपणाने बोलायचे ही त्यांची वृत्ती होती. लोकांमध्ये राहण्याची त्यांना हौस असे. जनतेच्या उन्नतीकडे त्यांचे लक्ष असे. सामान्यांची सुखदु:खे, त्यांच्या अडचणी, त्यांच्या भावना याची त्यांना जाणीव होती. लोकांचे विचार व गाऱ्हाणी ऐकण्याचा त्यांनी कधी कंटाळा केला नाही. गरिबांकडे अधिक लक्ष द्यायचं हा त्यांचा स्वभाव होता. निष्कपट प्रेम कसं करावं याचं दर्शन ते स्वत:च्या वागणुकीतून घडवित असत. त्यामुळे विविध क्षेत्रांतील मंडळींचा सहवास व संपर्क त्यांना लाभला. त्यामध्ये अडाणी शेतकरी, कामगार, विद्वान, शास्त्री पंडित,

सनातनी, महिला, कलावंत, व्यापारी, नोकरदार, डॉक्टर, इंजिनीअर, राजकारणी, उद्योगपती, मुत्सद्दी, अर्थतज्ज्ञ, समाजधुरीण, साहित्यिक, कवी यांचा समावेश होता. त्यांचं म्हणणं ते प्रसन्नपणाने ऐकत असत. मानवी मूल्यांवर, गुणांवर, माणसांच्या चांगुलपणावर, माणसांच्या चांगल्या विचारांवर, शब्दांवर आणि प्रत्यक्ष कृतीवर यशवंतरावांचा विश्वास होता. महाराष्ट्रात आणि देशात विविध क्षेत्रांतील लोकांचे विचार ऐकण्याची संधी यशवंतरावांना मिळाली. त्याचं मार्गदर्शन लाभलं. त्याचा उपयोग त्यांना त्यांच्या व्यक्तिगत जीवनामध्ये खूप झाला. आपले व्यक्तिमत्त्व सर्वांगाने समृद्ध व संपन्न करण्यासाठी त्यांनी आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण सार्थकी लावला. लोकांशी सतत ठेवत असलेला संपर्क, त्यांच्याविषयी असलेला जिव्हाळा व चौफेर अभ्यासाची सवय यामुळे लो. टिळकांनंतर महाराष्ट्रात उदयास आलेले यशवंतराव हे एकमेव नेतृत्व मानले जाते.

यशवंतरावजी ज्या पद्धतीने व ज्या द्रष्टेपणाने हे लोकसंग्रहाचे कार्य त्या काळात करत होते त्याचा निश्चितच उपयोग त्यांच्या नेतृत्वास व जडणघडणीस झाला. त्यांचा संपर्क बहुजन समाजाबरोबर अन्य धर्मीयांशीही होता. ब्राह्मण, मुस्लिम, जैन, दलित आदी समाजातील विविध व्यक्तींना जवळ करण्यात ते यशस्वी ठरले. त्यांच्या घरचे नोकरही विविध धर्मीय आणि प्रांतीय होते आणि ते सर्वजण या दांपत्याबरोबर एकाच कुटुंबातल्यासारखे राहात असत. हिंदू धर्माप्रमाणेच इतर धर्मांवरही त्यांची श्रद्धा होती. सर्वांच्या सुखदुःखात ते समरस होत. सर्वांना समजून घेत. आपण कोठे आहोत याचाही शोध घेत. सामाजिक आणि राजकीय चळवळींमध्ये काम करताना ते अनेक सहकाऱ्यांच्या सहवासात गेले. त्या सहकाऱ्यांच्या, कार्यकर्त्यांच्या, साहित्यिकांच्या सांनिध्यामुळे ते प्रभावित झाले. त्यांच्या विचारांनी व कार्याने ते कार्यप्रवण झाले. त्यांनी कधी मार्गदर्शन केले तर कधी त्यांचे सहकारी बनून त्यांना मदत करत राहिले. यशवंतरावांच्या जीवनप्रवाहात या सर्वांना फार मोलाचे महत्त्वाचे स्थान आहे. साने गुरुजी, ना.सी.फडके, आनंदराव चव्हाण, बाळासाहेब देसाई, डॉ. देशपांडे, यशवंतराव पार्लेकर, राजाजी, के.डी.पाटील, भुस्कुटे, विठ्ठलराव पागे, व्यंकटराव ओगले, सदाशिव पेंढारकर, अशा काही लोकांचा उल्लेख करता येईल. या लोकांचे विचार समजून घेऊन सुरुवातीच्या काळात ते जीवनाची वाटचाल करत राहिले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या व्याख्यानातून ओसंडणारे बुद्धिमत्तेचे प्रखर तेज तर काकासाहेब गाडगीळ यांनी टेबलावर चढून केलेले भाषण हे सारे सारे महत्त्वाचे होते. यशवंतरावांच्या दृष्टीने अविस्मरणीय होते. यातील काही मंडळी वयाने वडील तर काही समकालीन होती. यशवंतराव मोठ्यांच्या वडिलकीचा वसा जपत, त्यांचे प्रेमसंबंध कायम टिकवत, त्यांचे श्रेष्ठत्व न

विसरता मराठी मनावर आपला पगडा बसवू शकले. माणसं जोडणं, माणसांचा संग्रह करणं आणि प्रत्येकातील दुर्गुणांकडे दुर्लक्ष करून त्याच्यातील सद्‌गुणांचा उपयोग करून घेणं हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य बनले. त्यामुळे ते अनेक लोकांच्या संपर्कात राहू शकले. जननिष्ठा आणि पक्षनिष्ठा या दोन संज्ञा चव्हाणांसाठी समानार्थीच होत्या. जनसामान्यांची नाडी त्यांना अचूक सापडली होती. त्यामुळेच राष्ट्रसभेच्या स्वतंत्र आंदोलनापासून त्यांच्या नेतृत्वाची पायाभरणी झाली होती. १९४१ च्या लोकल बोर्डाच्या निवडणुकीच्या वेळी तरुण माणसे जोडून जनमानसात आपल्या कार्याचा पाया अधिक खोल व मजबूत केला होता. येथूनच खऱ्या अर्थाने त्यांनी सक्रीय राजकारणास प्रारंभ केला. या जनसंपर्कामुळे समतोल विचारवंत आणि व्यवहारी प्रज्ञावंत, सुसंस्कृत राजनीतिज्ञ आणि वैचारिक वसा जपणारा रसिक राजकारणी म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली.

अभिजात रसिक

यशवंतरावांच्यात अनेक गुण एकवटलेले होते. प्रत्येक गुण जोपासणारा लोकसंग्रहही होता. यशवंतराव नाट्यवेडे होते म्हणून नाट्यक्षेत्रातील लोकांशी त्यांचा संबंध होता. साहित्यिक होते म्हणून लेखक आणि कवींच्यातही त्यांचे मन रमून जाई. संगीतक्षेत्राची त्यांना जाण होती म्हणून पं. भीमसेन जोशींसारख्या जाणकारांशी संबंध तर होतेच पण उदयोन्मुख कलाकारांशीही त्यांचे संबंध होते. त्यांना ते प्रोत्साहन देत. एखाद्या राज्यकर्त्याच्या ठायी जे गुण असावयास पाहिजेत ते सर्व त्यांच्यात होते. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व अभ्यासताना 'झाले बहु, होतील बहु, आहेतही बहु, परंतु यासम हा' असे म्हणावेसे वाटते. त्यांच्या आठवणी सांगताना सर्व क्षेत्रांतील माणसांनी मनापासून त्यांच्या सहवासातील क्षण टिपले आहेत व वर्णन केले आहेत. ते सर्व पाहता त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अथांगपणा लक्षात येतो.

यशवंतरावांचे चारित्र्य स्वच्छ होते. तळागाळातील समाजाविषयी त्यांना आत्मीयता होती. त्यांच्यावर झालेले संस्कार आणि त्यांनी केलेले अभिरुचीसंपन्न वाचन याचा हा परिणाम असावा असे वाटते. यशवंतराव केवळ राजकारणी कधीच नव्हते. त्यांचे व्यक्तिमत्त्व अष्टपैलू होते. बालपणापासून त्यांनी अनेक छंद जोपासले. नाटके पाहण्याचा, पुस्तके वाचण्याचा छंद त्यांना होता. तसेच कोयनेत डुंबण्याचा आणि कुस्ती पाहण्याचाही छंद त्यांना होता. नंतर धकाधकीच्या राजकारणातही त्यांचे हे छंद सुटले नाहीत. ते प्रतिभावंत लेखक होते. साहित्य विश्वात त्यांना मानाचे स्थान होते. त्यांच्या वाणीने साहित्याची सेवा केली. हेच त्यांचे वेगळेपण आहे. त्यात त्यांनी

आपल्यातील रसिक व साहित्यिकही जपला, जोपासला. राजकारणात असे व्यक्तिमत्त्व अभावानेच आढळून येते.

यशवंतरावांना बालपणापासून साहित्य, संगीताची आवड होती. एवढेच नव्हे तर ते एक अभिरुचीसंपन्न रसिक होते. प्रत्यक्ष लोकांच्यामध्ये जाऊन लोकनाट्याची मौज लुटणे, नाटक पाहणे, क्रिकेटची मॅच पाहणे, कुस्त्यांची दंगल अवलोकणे, यातील मौज वेगळीच असल्याचे ते सांगतात. नाटकाची गोडी त्यांना लहानपणापासूनच होती. 'माईसाहेब' नाटकात तर त्यांनी कामसुद्धा केले होते. अशा रीतीने एखाद्या दुसऱ्या प्रयोगात त्यांनी चेहऱ्याला रंग फासून कामही केले होते. त्यांनी लहानपणीच कोल्हापूरला जाऊन 'प्रेमसंन्यास'' हे नाटक पाहिले होते. यावरून त्यांची नाटकाची आवड लक्षात येते. या छंदाच्या बाबतीत यशवंतराव 'कृष्णाकाठ'मध्ये लिहितात, ''नाटक कंपनीची नाटके मी मोठ्या हौसेने पाहत असे. 'आनंद विलास नाटक मंडळी' ही आमच्या कराडला वर्ष, दीड वर्षाने भेट देत असे. मास्टर दीनानाथ मंगेशकर व रघुवीर सावकार या प्रसिद्ध नटांच्या नाटक कंपन्यांची नाटकेही कराडला होत. पिटातल्या स्वस्त तिकिटांच्या जागेत बसून मी ती सगळी नाटके मनमुराद पाहिली आहेत.'' जुने नाटक पाहताना पेटीचे किंवा सारंगीचे सूर कानावर पडताच एका वेगळ्या जगात आपण जातो. आपल्या भावना दोलायमान होतात. याचे वर्णन शब्दांत करता येत नाही असे यशवंतरावांना वाटते. गावोगावच्या उत्सवाच्या निमित्ताने होणारी नाटके सतत तीन चार वर्षे पाहिल्यामुळे त्यांना नाटकातील बरेवाईट हळू हळू कळू लागले होते. कोठल्याही पूर्वग्रहदूषित अशा भावना मनामध्ये न ठेवता डोळस दृष्टिकोनातून अध्ययन आणि रसग्रहण करावयाचे आणि मनन करावयाचे ही त्यांची कार्यपद्धती होती. यशवंतराव चव्हाण म्हणतात,''केशवराव दाते यांच्यासारख्या कसलेल्या नटांच्या भूमिका आणि जुन्या काळांतील ती भरदार नाटके, यांच्या आठवणीदेखील किती सुखद वाटतात. रसिक समुदायामध्ये बसून नाटकांची गोडी चाखणे किंवा तमाशांच्या फडांची मौज लुटणे अशा जीवनातल्या कितीतरी गोष्टी आहेत की, ज्यांपासून मी अक्षरश: मनसोक्त आनंद लुटला आहे. बडे गुलामअली खाँ, भीमसेन जोशी, हिराबाई बडोदेकर, ह्यांच्यासारख्या सुप्रसिद्ध कलाकारांचे गायन म्हणजे जीवनातील आनंदाचा उच्चांक होय.'' विविध कलांनी मानवी जीवन समृद्ध होते असे त्यांचे ठाम मत होते. संगीत, स्वर, सूर, शब्द या तिन्हींवर आणि त्यांच्या निर्मात्यावर यशंवतरावांचे प्रेम होते. ते कलाप्रेमी होते. रसिक होते. तेवढं प्रेम, रसिकता आपणास अन्य राजकारणी मंडळीत क्वचितच आढळते.

यशवंतरावांना महाराष्ट्रातील लोककलांची आवड होती. महाराष्ट्राच्या शहरी

रंगभूमीइतकीच ग्रामीण रंगभूमी त्यांना आवडत असे. शास्त्रीय गायनाइतकीच शाहिरी व लावणीही त्यांना आवडत होती. या वाङ्मयात मराठ्यांच्या चालीरीती, मराठ्यांचे गुणदोष, मराठ्यांचा स्वाभिमान, मराठ्यांचे विचार, मराठ्यांचा इतिहास याचे प्रतिबिंब पाहावयास मिळते. एकूणच मराठी राज्याची आणि साम्राज्याची चढती, उतरती कळा त्यात प्रतिबिंबित झालेली आहे. त्यामुळे यशवंतराव अगदी रसिकपणे या साहित्याचा आस्वाद घेत होते. हे एकप्रकारे त्यांच्या अभ्यासू वृत्तीचेच द्योतक आहे. यशवंतराव लावणी वाङ्मयाच्या संदर्भात म्हणतात, ''ग्रामीण तमाशातले बरेचसे यश हे त्यातल्या लावणी म्हणण्याच्या लकबीवर, नाचणाऱ्या बाईच्या वा पुरुषांच्या लावण्यावर, हावभावावर अवलंबून असते.'' त्यांच्या रसिक वृत्तीबद्दल एका लेखकाने असे म्हटले आहे, ''जीवनाच्या प्रवाहाकडे स्थिर व तटस्थ नजरेने पाहणाऱ्या प्रेक्षकाची भूमिका त्यांनी कधीच घेतली नाही. याउलट जीवनातील रस शोधू पाहणारा, त्याचा अर्थ लावणारा अन् त्यात अर्थ नसेल तर अर्थ ओतणारा यशवंतराव हा एक रसिक वृत्तीचा कलासक्त कलाप्रेमी आहे.'' लोकांच्या समोर अशा अभिजात कला आल्या पाहिजेत, त्यांचे उन्नयन झाले पाहिजे अशी त्यांची धारणा होती. लोककला, लोकनाट्य, सभ्य स्त्री पुरुषांसमोर झगझगीत प्रकाशात सादर करा म्हणजे त्यातील अश्लील, अनैतिक बाबी नष्ट होतील असे ते म्हणत. त्यांच्या या आग्रहातूनच महाराष्ट्रात तमाशाचे लोकनाट्यात रूपांतर झाले.

यशंवतराव लहान असताना कराडला शिवजन्मोत्सव साजरा केला जात असे. गावोगावचे भजनाचे अनेक फड या निमित्त कराडला येत. तेव्हा या कार्यक्रमाला संगीत ऐकण्याच्या ओढीने ते भजनी मंडळात जात होते. या संगीत भजनासाठी ते रात्र रात्र जागत. या निमित्ताने यशवंतराव विविध ठिकाणी हिंडले. टाळ वाजवले. भजने म्हटली. अशा प्रकारे यशवंतरावांना बालपणातच टाळ आणि मृदंग यांच्या साथीचे संगीत भजन हा एक नवा प्रकार अनुभवायला मिळाला. या संदर्भात ते आठवण सांगतात, ''मला हे सगळे नवीन होते. गाण्याचा कान मला होता आणि आहे; परंतु ही संगीत भजने इतकी लोकप्रिय असतील असे मला वाटले नव्हते.'' स्वत:ला आलेला अनुभव त्यांनी आपल्या साहित्यातून असा व्यक्त केला आहे. लहानपणापासून अशा केलेल्या विविध व्यासंगामुळे, सातत्याने केलेल्या आत्मचिंतनामुळे जे दिव्य भाव त्यांच्या अंत:करणात उत्कटपणे उत्पन्न झाले ते त्यांनी शब्दरूपाने आपल्या साहित्यात मांडले.

यशवंतरावांनी कला, क्रीडा, संगीत, साहित्य क्षेत्रात रसिकपणे जसे हसू पाहिले तसेच दु:खही पाहिले. जसा आनंद अनुभवला तशीच आसवंही पाहिली. जसे हुंकार ऐकले तसेच हुंदकेही ऐकले. सौंदर्य आणि कुरूपताही पाहिली. थोडक्यात विरोधाभासाचा

अनुभव त्यांनी घेतला. असा हा तत्त्वचिंतक आणि अभिजात रसिक यांचा सुरेख समन्वय त्यांच्या व्यक्तिमत्त्वात पाहावयास मिळतो. त्यांच्या या गुणांमुळे त्यांच्या जीवनाला नवे वळण लागले. जीवनातील सुखदु:खांना सामोरे जाताना ते डळमळले नाहीत. त्यांचे व्यक्तिमत्त्व समंजस बनले. सर्वांना घेऊन चालण्याची कुटुंब प्रमुखाची, कुटुंबवत्सल माणसाची भूमिका त्यांनी पार पाडली. महाराष्ट्राचे धार्मिक, राजकीय आणि सांस्कृतिक नेतृत्व करण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण झाली.

राजकारणात असताना यशवंतरावांनी अनेक परदेश दौरे केले. अनेक स्थळांना, अनेक देशांना, कित्येक तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या. या भेटींमध्ये त्यांनी जे अनुभवले, पाहिले, तेही रसिक वृत्तीने. तेथील निसर्ग, ऐतिहासिक स्थळे, वस्तुसंग्रहालये, रंगमंदिरे, त्या त्या प्रदेशातील नृत्य, नाट्य, संगीत, गायकी यामध्ये ते रंगून जात. आस्वादक व रसिक या भूमिकेतून ते वेध घेतात, याचे कारण संवेदनक्षम व्यक्तीला आवश्यक असणारी निरीक्षणशक्ती यशवंतरावांना लाभलेली होती.

यशवंतरावांच्या या परदेश दौऱ्यांमध्ये वेचक दृष्टीची विलक्षणता दिसते. डोळसपणाने पाहता येईल तेवढे पाहावे, ऐकावे अशी त्यांची वृत्ती होती. आणि जे स्वत:ला दिसले, स्वत: ऐकले किंवा ऐकावे लागले, जाणवले ते सारे त्यांनी रसिकतेने अनुभवले. जीवनातील जे जे उत्तम असेल ते पाहण्याचा त्यातील बारकावे समजून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. यशवंतराव ताश्कंदला गेले असताना तेथे त्यांनी ऑपेरा पाहिला. त्यासंबंधी त्यांचा अभिप्राय असा आहे, ''उझबेके भाषेतील ऐतिहासिक प्रेमकथेवर आधारलेले हे नाट्य भव्य होते. संगीत उत्तम होते. परंतु एक गायिका इतकी जाडजूड होती की तिला सुंदर कसे म्हणावे हेच समजत नव्हते. मीही अनेक वेळा रशियात गेलो आहे. माझा असा ग्रह झाला की रशियन तरुणांच्या डोळ्यांना सडपातळ आणि जाडजूड या फरकाचे काही महत्त्व वाटत नाही.तारुण्य व लावण्य असले की खूप खुश होतात.'' या त्यांच्या वरील विवेचनावरून त्यांची रसिक वृत्ती तर दिसतेच त्याचबरोबर एखाद्या कलाकृतीबद्दल, कलाकाराबद्दल अभिप्राय देण्याची खुबीही लक्षात येते.

○ ○ ○

घरातील नाते-बंध

महाविद्यालयीन शिक्षण संपवून यशवंतरावांनी कायद्याच्या अभ्यासासाठी पुणे येथे प्रवेश घेतला. लॉ कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यानंतर ते पुण्याच्या शुक्रवार पेठेतून सायकलवरून लॉ कॉलेजला जात होते. १९४१ साली कायद्याची परीक्षा उत्तीर्ण झाले, त्यावेळी त्यांच्या आईंना व कुटुंबातील सर्वांना आनंद झाला. त्यांनी कराड येथे वकिलीस सुरूवात केली. कायद्याचा अभ्यास, विचारात आलेला रेखीवपणा, चांगले वक्तृत्व, मित्रमंडळींचा भरपूर पाठिंबा त्यामुळे वकिली व्यवसायात जम बसवण्यात ते यशस्वी झाले. त्याकाळी त्यांना या व्यवसायात महिना ४०० ते ५०० रु. मिळत होते. पण वकिली व्यवसायात त्यांचे लक्ष लागत नव्हते. वकिलीपेक्षा राजकारणातच त्यांचा जास्त वेळ जात असे. या व्यवसायामध्ये त्यांना बरेच काही अनुभवयास मिळाले. मनुष्य स्वभाव, न्यायदानाच्या पद्धती, पोलीस खात्यातील भ्रष्टाचार वगैरे गोष्टी त्यांनी बारकाईने पाहिल्या होत्या. हा काळ १९४२ चा होता. यावेळी यशवंतरावांच्या मनात वकिली व्यवसाय करायचा कि स्वातंत्र्य लढ्यात सामील व्हायचे असे द्वंद्व निर्माण झाले होते. शेवटी देशभक्तीचा विजय झाला व यशवंतराव स्वातंत्र्य लढ्यात सामील झाले.

वकिलीच्या व्यवसायात अवघ्या सहा महिन्यात जम बसतो न बसतो तोच त्यांच्या आईने यशवंतरावांनी लग्न करावे अशी इच्छा प्रकट केली. आईच्या इच्छेला मान देऊन मे महिन्याच्या सुरुवातीस मुलगी पाहिली. या संदर्भात आठवण सांगताना यशवंतराव चव्हाण म्हणतात, ''वधू पसंतीचा माझा एक दृष्टिकोन होता. माझ्या घरात आणि विशेषत: माझ्या आईशी जमवून घेईल, अशा संस्कारांतील मुलगी पाहिजे अशी माझी धारणा होती.'' याच दरम्यान फलटणचे रघुनाथराव मोरे यांची कन्या वेणूताई यांचा प्रस्ताव आला. ते मूळचे फलटणचे. पण वास्तव्य मुंबईस होते. ते सधन शेतकरी होते. वेणूताईंच्या लग्नापूर्वी एक वर्ष अगोदरच रघुनाथरावांचे

निधन झाले होते. यशवंतरावांच्या आंतरिक व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत त्यांना देवराष्ट्र, विटा, कराड, कोल्हापूर मध्ये आलेले जीवनानुभव जसे महत्त्वाचे आहेत तसे पुण्यात असताना स्वातंत्र्यपूर्व काळातील भारावून टाकणारे वातावरणही महत्त्वाचे आहे. त्यांच्या बालपणी झालेले संस्कार, निसर्गसौंदर्य आणि तेथील दरिद्री जीवनाचे त्यांनी अनुभव घेतले. प्रतिकूल परिस्थितीची, आर्थिक कुचंबणेची आणि कौटुंबिक अडचणीची त्यांना जाणीव होती. त्यामुळे नववधूबद्दल त्यांच्या काही कल्पना होत्या. नववधू कशी असावी याबद्दल ते म्हणतात, ''शिक्षित पण एकत्र कुटुंबात रमून जाईल अशी वधू मला पाहिजे होती. साताऱ्यात यादो गोपाळ पेठेतील त्यांच्या नातेवाईकांच्या घरी मी वेणूबाईला प्रथम पाहिले. काही प्रश्नोत्तरे झाली. मी वकील असलो, तरी राजकीय कार्यकर्ता आहे, हे मी स्पष्ट केले. तिच्या चेहऱ्यावर मला विलक्षण सौम्य प्रसन्नता दिसली. दिव्यासारखे लखलखणारे तिचे मोठे डोळे पाहून माझ्या मनाने होकार दिला.'' शेवटी २ जून १९४२ रोजी यशवंतराव यांचा वेणूताईंशी कराड येथे विवाह संपन्न झाला. चव्हाण कुटुंबास व यशवंतरावांना लग्नानंतर फार चांगले सुखाचे दिवस लाभले नाहीत. या विवाहानंतर पाच सहा वर्षांच्या काळात अनेक छोटे मोठे प्रसंग, घटना घडत गेल्या. त्यामुळे यशवंतरावांना या प्रसंगांना सामोरे जावे लागले. येथून त्यांच्या आयुष्याच्या नव्या पर्वाला सुरुवात झाली.

यशवंतराव व वेणूताई यांच्या विवाहाची आठवण सांगताना रामभाऊ जोशी म्हणतात, ''सौ. वेणूताईंच्या मेव्हण्याचे निकम आडनावाचे एक मित्र होते. त्यांच्याकडून कराडच्या चव्हाणांचे स्थळ समजले. सौ. वेणूताई या फलटणच्या. आईवडील एक दोन वर्षांखाली निवर्तले होते. चार बहिणी आणि एक भाऊ असा फलटणच्या मोरे यांच्या घरातील परिवार. दोन बहिणींचे विवाह झाले होते. मोरे यांच्या तिसऱ्या मुलीचे स्थळ पाहण्यासाठी के.डी. पाटील या मित्रासमवेत स्वत: नवरदेव सातारला दाखल झाले. मुलगी पाहिली. शिक्षणाची आवड वगैरे प्रश्न के.डी. पाटील यांनीच विचारले. मग पसंती झाली आणि लग्न ठरले. विवाह सोहळा झाला तो कराडला आणि माप ओलांडून कु. मोरे सौ. चव्हाण बनून चव्हाणांच्या कुटुंबात दाखल झाल्या. ती तारीख २ जून १९४२. माहेरचं नाव वेणू. सासरचंही तेच सौ. वेणूताई !'' ते दिवस स्वातंत्र्य संग्रामाचे होते. भूमिगत यंत्रणेच्या कामात ते सतत गुंतून राहिले होते. कार्यकर्त्यांना भविष्यात कोणत्या पद्धतीने काम करायचे आहे त्याविषयी त्यांना माहिती व कल्पना देण्यासाठी यशवंतरावांना भूमिगत जीवन जगावे लागले. अनेक ठिकाणी मोर्चे, आंदोलने, निदर्शने, झेंडे लावणे असे प्रयत्न सुरू

झाले आणि जनआंदोलनाने उग्र स्वरूप धारण केले. याचा परिणाम असा झाला, यशवंतरावांना पकडण्यासाठी इंग्रजांनी एक हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले. भूमिगत चळवळ चांगल्या प्रकारे कार्य करू लागली. रोज कुठे ना कुठे धाडीसत्र सुरू झाले आणि त्यात सरकारचे लोक अयशस्वी झाल्यामुळे लोकांचा छळ करू लागले. यशवंतराव चव्हाण सापडत नसल्यामुळे पोलिसांनी त्यांच्या कुटुंबीयांना अटक करण्यास सुरुवात केली. १४ जानेवारी १९४२ लाच संक्रांतीच्या दिवशी कराड पोलिसांनी सौ. वेणूताईंना अटक केले. त्यांना कराड जेलमध्ये ठेवले. या घटनेमुळे यशवंतरावांना खूप वाईट वाटले. या संदर्भात ते लिहितात,''पोलीस येथपर्यंत जातील, अशी माझी अपेक्षा नव्हती. आणि त्यातल्या त्यात तिच्या लग्नानंतरच्या पहिल्या संक्रांतीच्या दिवशी माझ्या गैरहजेरीत तिला या प्रकारे जेलमध्ये जावे लागले, हे काही मला फारसे बरे वाटले नाही.'' अशा रीतीने जवळजवळ सहा आठवडे कराड आणि इस्लामपूर येथील जेलमध्ये त्यांना ठेवण्यात आले. पण त्या कोवळ्या वयात सौ. वेणूताईंनी कठीण प्रसंगाला धाडसाने तोंड दिले. यशवंतराव हजर होत नाहीत म्हणून वारंवार त्यांचा पत्ता, ठावठिकाणा मागण्यासाठी सौ. वेणूताईंना पोलिसांच्या छळाला सामोरे जावे लागले. मृदू मनाच्या वेणूताईंना ते सहन झाले नाही. मानसिक ताण वाढल्याने त्यांना फिट्स येऊ लागल्या. प्रकृती अशक्त बनली. त्यामुळे थकलेल्या शरीरावर क्षयासारख्या रोगाने आक्रमण केले. त्या टी.बी. ने आजारी पडल्या. पुढे याचा परिणाम असा झाला की एका आठ दिवसाच्या संतती प्राप्तीनंतर सर्व आयुष्य संततिसुखाशिवाय काढावे लागले. भूमिगत चळवळीचा आघात अशा प्रकारे यशवंतरावांच्या कुटुंबावर हळूहळू पडू लागला. थोरले बंधू गणपतराव यांनाही पोलिसांनी अटक केली. त्यांना विजापूरच्या जेलमध्ये ठेवण्यात आले. या घटनेमुळे तर घरातील सर्वांच अस्वस्थ होते. आवाळूच्या ऑपरेशनच्या निमित्ताने बंधूची सुटका केली. पण जखमेत सेप्टिक होऊन त्यातच न्यूमोनियाचा ताप भरून त्यांचा अंत झाला.

यशवंतरावांच्या सुखी कौटुंबिक जीवनाचे श्रेय सौ. वेणूताईंना द्यावे लागेल. त्यांच्या संदर्भात अनेकांनी श्रद्धाळू, पतिपरायण, आदर्श, कर्तव्यदक्ष गृहिणी असा उल्लेख केला आहे. तो अगदी सार्थ आहे. सौ. वेणूताईंच्या सोज्वळ, नम्र, सखोल आणि काहीशा करारी व्यक्तिमत्त्वाचे यशवंतरावांच्या समाजकारणात व राजकारणात नेहमीच सहकार्य मिळत गेले. कराड, मुंबई, दिल्ली या ठिकाणी वास्तव्यास असताना त्यांच्या घरी माणसांचा राबता मोठा होता. त्यांचे निवासस्थान नेहमी गजबजलेले असे. एवढेच नव्हे तर वेणूताई आजारपणातून बऱ्या झाल्यानंतर साहेबांच्या दोन बंधूंच्या संसाराची

जबाबदारी त्यांच्यावर पडली. पुतणे लहान होते. माहेरची भावंडे लहान होती. सासर माहेर सांभाळत यशवंतरावांना संसाराच्या सुखदु:खाची जाणीव कधीच होऊ दिली नाही. सौ. वेणूताई यशवंतरावांच्या जीवनात सखीच्या भूमिकेत वावरत होत्या. या संदर्भात 'अबोलीचा यशवंत संसार' या लेखामध्ये सौ. वेणूताईंच्या आठणींची नोंद अशी आहे, ''श्री. यशवंतराव हे सतत राजकारणाच्या आणि इतर सार्वजनिक कामात गढलेले असतात आणि मी संसाराच्या कामात. मी माझ्या आणखी कामांचा ससेमिरा त्यांच्या मागे लावीत नाही. त्यांना वेळ नसतो. पण केव्हातरी कुठे जाऊ म्हटलं तर त्यांची तयारी असते. नाटक, संगीत याची आम्हाला दोघांनाही आवड आहे. एकदा एका दिवाळीला आम्ही खरेदीला जायचे ठरवले आणि प्रत्यक्षात गेलो सुद्धा. खरेदी केली ती रविशंकर वगैरे कलावंतांच्या रेकॉर्डसची, संगीताची, बस्स तेवढीच.'' असे या दांपत्याचे जीवन सर्वस्पर्शी होते. त्यांच्या सद्गुणालाही अनेक पैलू होते. ते अभिजात व शास्त्रीय संगीताचे जसे रसिक होते तसेच ते भावगीतांचे प्रेमी होते. नाट्याचे तर त्यांना वेडच होते.

स्वातंत्र्यपूर्वकाळात यशवंतरावांची मन:स्थिती काही घरगुती प्रश्नांनी व्यापून गेलेली असे. आणि याचा परिणाम कुटुंबातल्या लोकांच्या प्रकृतीवर होई. सौ. वेणूताईंच्या बाबतीत तसेच घडले. स्वत:चा तुरुंगवास, दीर गणपतरावांच्या स्थानबद्धतेचा धक्का व मोठे दीर ज्ञानोबांचा मृत्यू. गणपतरावांची आजारपणात केलेली सेवा, अशातच यशवंतराव घरात नसायचे. त्यावेळी जीवाला बैचेन करणाऱ्या गोळीबाराच्या बातम्या रोज येत होत्या. त्यामुळे मानसिक ताण वाढला. स्वत:च्या प्रकृतीकडे वेणूताईंचे दुर्लक्ष झाले. प्रकृती अधिकच ढासळत गेली. वेणूताईंना माहेरी नेऊन औषधपाणी करण्याचे ठरले. पण प्रकृती अधिकच ढासळत गेली आणि एक दिवस अतियश गंभीर बनली. अनेक डॉक्टरांना दाखवून त्यांचे निदान होईना. त्या अशक्त होत चालल्या. ''पत्नी मरणोन्मुख अवस्थेत फलटणला आहे, असा त्यांना निरोप मिळाला आणि पतीला अखेरचे पाहावे अशी वेणूताईंची इच्छाही समजली. हा निरोप मिळताच मग यशवंतरावांनी फलटणला जाण्याचं ठरवलं आणि पुण्याहून निघून रात्रीच्या वेळी एक दिवस ते फलटणला पोचले.'' यशवंतराव फलटणला पोहोचले असतानाच सातारा जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांनी प्रतिबंधक स्थानबद्धता कायद्याचे वॉरंट त्यांच्यावर बजावले. आणि त्यांना पुन्हा पकडण्यात येऊन येरवड्याच्या तुरुंगात रवानगी करण्यात आली. अशा विविध घटनांमुळे लग्नानंतरच्या काही वर्षांत सौ. वेणूताईंची कुठलीही अपेक्षा ते पूर्ण करू शकले नाहीत. पती म्हणून तिच्या आजाराची काळजी घेतली पाहिजे या जाणिवेने ते अधिक अस्वस्थ झाले होते. त्यानंतर यशवंतरावांची प्रकृती

ढासळली होती. औषधपाणी केले आणि त्यांना पुण्यात न राहता एखाद्या गावी जाऊन राहण्यास सांगितले होते. एका शेतकऱ्याच्या घरी एक दोन आठवडे ते घोडनदीला राहिले. अशा प्रकारे स्वातंत्र्य संग्रामात भूमिगत राहून यशवंतरावांनी देशासाठी सर्वस्व पणाला लावून कार्य केले. त्याचा त्यांच्या कौटुंबिक जीवनावरही फार मोठा परिणाम झाला होता.

त्यानंतरच्या काळात १९५१ नंतर यशवंतरावांना कौटुंबिक व सामाजिक स्थैर्य लाभू लागले. त्यावेळी मात्र यशवंतरावांच्या घरात सौ. वेणूताई अगदी सावलीप्रमाणे त्यांच्याशी वागत होत्या. अगदी सकाळपासून ते रात्रीपर्यंत साहेबांच्या सर्व आवडी-निवडींकडे त्या लक्ष देत असत. या संदर्भात राम खांडेकर म्हणतात, ''सकाळचा चहा, नाश्ता, यशवंतरावांनी ऑफीसमध्ये घालून जायचे कपडे, स्वयंपाकात आवडीनिवडीचे पदार्थ, औषधपाणी, डॉक्टर वगैरे गोष्टी वेणूताईच पाहावयाच्या. यशवंतरावांच्या कपड्यांची, जोड्यांची निवडही वेणूताईच करीत असत.'' मुंबईतील सह्याद्रीतील प्रवेश दिवसापासून ते 'वन रेसकोर्स रोड' या दिल्लीच्या वास्तव्यात त्यांनी चव्हाणसाहेबांच्या व्यक्तिमत्त्वास प्राधान्य दिले. आपल्या वागणुकीचा परिणाम साहेबांना भोगावा लागला तर आपले जिणे व्यर्थ अशा सावधानतेने त्या वागत होत्या. यशवंतरावांच्या राजकीय आणि सरकारी कामात त्यांनी कधीच हस्तक्षेप केला नाही. आपले कार्य त्यांनी बंगल्याच्या चार भिंतीतच ठेवले. मात्र यशवंतरावांच्या राजकीय जीवनाबद्दल त्या अज्ञानी होत्या असे मात्र नाही. यशवंतराव घरगुती गोष्टींप्रमाणे तासन्तास राजकारणावरही वेणूताईंशी गप्पा मारत. वेणूताईंनी कधीही साहेबांच्या पुढे पुढे केले नाही किंवा मोठेपणा मिरवला नाही. साहेबांनी बोलाविल्याशिवाय त्या बेडरुमच्या बाहेर आल्या नाहीत. अगदी त्यांच्या माहेरची माणसेही काही कामासाठी यशवंतरावांकडे आल्यास वेणूताई स्वत: बाहेर येत नसत. घरात येणाऱ्या माणसांचे आदरातिथ्य मात्र त्यांनी आयुष्यभर केले. हाताखाली नोकर होतेच. पण कधी कधी त्यांच्यात भांडणे झाल्यास किंवा कोणी आजारी असल्यास घरी येणाऱ्यांकडे वेणूताई स्वत: लक्ष देत. त्यामुळे यशवंतरावांची प्रतिमा अधिक उजळली.

६ नोव्हेंबर १९६२ साली यशवंतराव चव्हाण यांना पं. नेहरुंचा फोन आला. फोनवर बोलणे सुरू होते. महत्त्वाचे, गुप्त बोलायचे असल्याने कोणी समोर असता कामा नये. कोणी असेल तर त्यांना थोडावेळ बाहेर पाठवा. देशाचे संरक्षणमंत्री म्हणून तुम्हास महाराष्ट्र सोडून दिल्लीस यावे लागेल. 'हो किंवा नाही' एवढेच उत्तर हवंय. यशवंतराव चव्हाणांनी आदबीने सांगितले की एका व्यक्तीशी बोलावे लागेल. संमती घ्यावी लागेल. 'कुणाची ?' नेहरुंनी विचारले. 'माझ्या पत्नीची,' यशवंतरावांनी उत्तर

दिले. आणि यशवंतराव चव्हाण सागरतट सोडून यमुनातटी गेले. एवढ्या मोठ्या निर्णयात सामान्य पत्नीला काय कळेल आणि तिच्या सल्ल्यावरून मी राजकारण करतो असे त्यांना कधीही वाटले नाही. सौ. वेणूताई ही त्यांची खरी साथीदार होती. तीच त्यांची स्फूर्तिदेवता व सल्लागार आहे हे मानण्यात त्यांनी कधीही कमीपणा मानला नाही. वेणूताईही खूप मोठ्या होत्या. त्यांनी यशवंतरावांना समर्थपणे साथ दिली. सत्तेवर आल्यानंतर यशवंतरावांनी सुखी जीवनाचा पहिला मूलमंत्र सांगितला तो म्हणजे आपल्या इथे काम करणाऱ्यांना खायला प्यायला द्यायचे. त्यांना दुजाभाव करता कामा नये. त्यामुळे सुरक्षा अधिकारी व इतर सर्व कनिष्ठ नोकरवर्ग, झाडू-वालेसुद्धा त्यांना आपल्याच कुटुंबातील माणसे वाटत. 'सर्वर' नावाच्या एका खाजगी नोकराला तर त्यांनी अतिशय प्रेमाने वागविले. त्याचे लग्न आपल्याच खर्चाने मोठ्या थाटामाटात केले. पुढे त्याच्या मुलाला तर आपल्या नातवाप्रमाणे खेळवले. सर्वरही तेवढाच निष्ठावान होता. बंगल्यातील नोकर चाकराप्रमाणे त्यांच्याकडे असलेले वैयक्तिक सरकारी कर्मचारी हेही त्यांच्या कुटुंबाचे भाग होते. चव्हाण दांपत्याचा जिव्हाळा व प्रेम त्यांना सदैव मिळत होते. या दोघांनाही मोठेपणा, दिखाऊपणा आवडत नसे. उलट त्यांच्या मनाच्या मोठेपणाचा अनुभव अनेकांनी घेतला आहे.

यशवंतरावांचे वैवाहिक जीवन हे असे होते. या संदर्भात आठवण सांगताना एक लेखक म्हणतात, ''डॉ.यशवंतराव चव्हाण यांच्या पत्नी सौ. वेणूताई ह्या घरी त्यांची खाण्यापिण्याची चांगली काळजी घेतात. ही पतिपत्नी समाधानात असलेली दिसतात. तथापि सौ. वेणूताई अधूनमधून आजारी पडतात. त्यामुळे साऱ्या राज्याची चिंता वाहात चोहोकडे भटकणाऱ्या यशवंतरावांचे चित्त घराकडे वेधणारा प्रेमरज्जू त्यांना परत ओढून आणीत असलेला दिसतो. ह्या दांपत्याला आज मूलबाळ नाही, सौ. वेणूताईंना एक मुलगी झाली होती पण ती आज हयात नाही, तथापि दोघांच्याही भावांची मुलेबाळे त्यांच्याकडे सतत असल्याने आणि नसती चिंता वाहाण्याचा वेडेपणा त्यांच्या ठायी नसल्याने ही दोघे तशी आनंदाने कालक्रमणा करीत आहेत.'' मूलबाळ नसले तरी आपला आनंद ते हरवत नसत. ज्यावेळी या दांपत्यास कळले की आपल्याला आता अपत्यप्राप्ती होणार नाही तेव्हा त्यांना वाईट वाटले. तथापि सौ. वेणूताईंनी यशवंतरावांना दुसरे लग्न करण्याचा सल्ला दिला. मात्र यशवंतरावांनी त्यास नकार दिला. या संदर्भात संभाजी थोरातांनी सांगितलेली आठवण पुढीलप्रमाणे आहे. यशवंतराव आणि वेणूताई यांना जेव्हा डॉक्टरांनी सांगितले की येथून पुढे सौ. वेणूताईंना अपत्यप्राप्ती झाल्यास त्यांच्या जीवाला धोका आहे. तेव्हा ते दोघेही अतिशय निराश झाले. त्यानंतर थोड्यावेळाने वेणूताईच धक्क्यातून सावरल्या.

त्यावेळी त्यांचे यशवंतरावांशी झालेले संभाषण पुढीलप्रमाणे आहे. वेणूताई यशवंतरावांना म्हणाल्या, ''झाले, आपल्या वैवाहिक जीवनाचा एक अंक संपला. मला व तुम्हालाही मूल हवे होते. पण डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे आता मूल होणे आपणाला परवडणार नाही. तसे धाडस केले तर मूल लाभण्याऐवजी मीच दगावणार. मला मरणाची भीती वाटत नाही, पण तुमच्या दृष्टीने मी जिवंत असायला हवी व मलाही तुम्ही आणि तुमचा उत्कर्ष बघत दीर्घकाळ जगण्याची इच्छा आहे. तुम्ही असे करा, आता झाले गेले विसरून एखादी अनुरूप मुलगी पाहून तिच्याशी लग्न करा. माझ्या नशिबी मूल नाही त्याला इलाज नाही, पण तुम्ही त्या आनंदापासून वंचित राहू नका.'' यावर यशवंतरावांनी दिलेले उत्तर त्या दोघांचे एकमेकांवर असलेले अतूट प्रेम दर्शवते. यशवंतराव म्हणाले,''नाही, नाही. वेणूताई, मी तुला अंतर देणार नाही. कदापिही ते शक्य नाही. माझ्या हृदयसिंहासनावर देवाब्राह्मणा-समक्ष तुझी सन्मानाने स्थापना केली आहे. माझ्या अंत:करणात फक्त तुझ्या एकटीसाठीच जागा आहे. तुला बाजूला सारून अगर उचलून फेकून देऊन त्या जागी मी दुसरीला आणून बसवणार नाही. कदापिही ते शक्य नाही. अनेक लोक अपत्यहीन जीवन जगतात, अपत्यहीन अवस्थेत मरतात. मला मूल झाले नाही म्हणून काय पृथ्वी दुभंगणार आहे की हिमालयाचा पहाड कोसळणार आहे? माझ्या पुत्रावाचून काय देशाचा, जगाचा गाडा अडून राहणार आहे. नाही मी दुसरे लग्न मुळीच करणार नाही. तुझ्याप्रमाणेच मीही आजन्म अपत्यहीन राहीन. माझ्या पत्नीपदी फक्त वेणूताई हीच स्त्री अखेरपर्यंत राहील.'' यशवंतरावांचे हे उद्‌गार त्यांच्यातील माणुसकी दाखवतात. त्यांच्यातील आदर्श पतीचे रूप दर्शवतात. त्यांचे पत्नीवर असलेले उत्कट प्रेम यातून सूचित होते आणि दोघांनी एकमेकांसाठी केलेल्या त्यागाचीही कल्पना येते. त्यानंतरही यशवंतरावांच्या मातोश्रीने विठाबाईंनी त्यांना अपत्यासाठी दुसऱ्या विवाहाचा सल्ला अप्रत्यक्षपणे दिला होता. पण यशवंतरावांनी तो मानला नाही. ते आपल्या निर्णयावर ठाम राहिले तरीही या दांपत्याचे जीवन सुखी होते. शेवटपर्यंत हसतमुखाने त्यांनी संसार केला, हसतमुखाने एकमेकांची मने सांभाळली व लोकांच्या समोरही तसेच आले.

देवांवर त्या दोघांचीही श्रद्धा होती. फत्तेपूर सिक्री येथील सलीम चिस्तीच्या समाधीचे दर्शन तसेच देवघरातील साईबाबांच्या मूर्तीची पूजा केल्याशिवाय ते घराच्या बाहेर पडत नसत.

दोघे प्रवासात असताना मुक्कामाच्या आजूबाजूला प्रसिद्ध देवस्थान असेल तर तेथे गेल्याशिवाय रहात नसत. महाराष्ट्रातील अनेक देवस्थानांना ते वेणूताईंबरोबर अनेकदा

गेले आहेत. काशीचे विश्वनाथ, हरिद्वाराची 'हरी की पावडी', गंगोत्री येथे जाऊन केलेली शंकराची पूजा, अजमेर, निजामुद्दीन दर्ग्याचे दर्शन अशा अनेक तीर्थक्षेत्रांना त्यांनी भेटी दिल्या आहेत.

यशवंतरावांनी पत्नीचा नेहमीच आदर केला. चारचौघांसमोर कधी त्यांनी वेणूताईबद्दल अपशब्दसुद्धा काढले नाहीत. दोघांचे वागणे सामंजस्याचे होते. आचरणाने व स्वभावाने एक होते. एकमेकांपासून दोघांनी कधीच काही लपविले नाही. त्यामुळे त्या दोघांचे कौटुंबिक जीवन अधूनमधून येणाऱ्या वादळातही सुखाचे व समाधानाचे राहिले.

सौ. वेणूताई दोनचार दिवसांच्या आजारपणात जून १९८३ ला निर्वतल्या. या काळात यशवंतरावांच्या मनावर चोहोबाजूंनी संकटांची मालिका सुरू होती. या काळात कौटुंबिक संकटेही खूप आली. त्यांचा डॉक्टर असलेला पुतण्या राजा (विक्रम) चव्हाण याचे अपघातात निधन झाले. पत्नी वेणूताई यांचा मृत्यू. स्वीय सचिव श्रीपाद डोंगरे यांचेही निधन झाले. त्यामुळे ते मनाने खूप खचले. पुढील वाक्यांवरून यशवंतरावांची त्यावेळची मन:स्थिती आपल्या लक्षात येईल. त्यांच्या निकटवर्तीयांनी सांगितलेल्या आठवणीतून ते स्पष्ट करता येईल. ''उभ्या आयुष्यात कशाचीच मागणी न करणारी माझी पत्नी मला सोडून गेली. मी पोरका झालो आहे. आयुष्याच्या चढउतारावर तिने माझी फक्त सेवाच केली. सावलीप्रमाणे माझ्यासमवेत ती नेहमी राहिली. माझे आयुष्य तिनेच घडविले. आपत्काली मला तिने सावरून धरले. तिच्याविना माझी ही जीवननौका भरकटू लागलीय. लवकरच ती काळाच्या भोवऱ्यात सापडणार अन् संपणार.'' आपले जीवन वेणूताईविना अपुरे आहे हे त्यांना कळून चुकले होते. याबाबत ना.धों. महानोर यांच्या यशवंतराव चव्हाण या पुस्तकात पुढील संदर्भ सापडतो. ''वेणूताई वारल्या. यशवंतरावांचं त्यानंतरचं सगळंच जीवन पार बदलून गेलं. त्यांचे कशातच लक्ष लागेना. त्यांनी फार मनाला लावून घेतलं होतं आणि ते साहजिक, नैसर्गिक होते. आयुष्यभर फार मोठमोठ्या जबाबदारीच्या ठिकाणी असताना सावलीसारख्या वेणूताई त्यांच्याबरोबर राहिल्या.'' या काळात यशवंतरावांच्या मनाची फारच द्विधा अवस्था झाली. वेणूताईंनी यशवंतरावांसाठी केलेला त्याग, पाळलेली पथ्ये, त्यांना पुन्हा पुन्हा स्मरणात येत होती. आता कुणाकरिता आणि कशाकरिता जगायचे असा विचार ते बोलून दाखवू लागले. त्यामध्ये ॲड. ग.नी.जोगळेकर, ना.धों. महानोर, रामभाऊ जोशी, रणजित देसाई, सौ. माधवी देसाई अशा कितीतरी जीवाभावाच्या माणसांच्या जवळ ते आपले मन मोकळे करत. वेणूताईंच्या नंतरचे दिवस उदास, कंटाळवाणे

जात होते, असेही ते सांगत. त्यांना कशातच रस वाटत नव्हता. वेणूताईंच्या मृत्यूनंतर सार्वजनिक समारंभासही यशवंतराव फारसे जात नव्हते. नंतर पुढे हळूहळू त्यांनी स्वत:ला सावरण्याचा प्रयत्न केला. पण त्यातून मुळी ते सावरले नाहीत. थोड्याच दिवसात त्यांच्या मृत्यूची बातमी आली. २५ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांचा मृत्यू झाला. देशवासियांना अतीव दु:ख झाले. पण जोपर्यंत जगण्यात काही आहे तोपर्यंतच मरण्यात मजा आहे, असे गडकऱ्यांच्या उक्तीप्रमाणे त्यांनी आपले जीवन संपविले असेच म्हणावे लागेल.

असे हे दांपत्य. करता येईल तेवढे आपले जीवन मंगलमय करण्याचा प्रयत्न त्यांनी निश्चितच केला. सभ्यपणे, माणुसकीने, एकमेकांना समजून घेऊन, नम्रपणे सुसंस्कृत जीवन जगले. त्यांच्या सर्वज्ञपणाची, जाणतेपणाची, सूज्ञपणाने स्वीकारलेल्या त्यागाची, प्रचिती येते. यशवंतरावांनी 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्र ग्रंथांची अर्पणपत्रिका सौ. वेणूताई यांच्या स्मृतीस अर्पण करताना पुढील भावपूर्ण शब्द वापरलेले आहेत. 'आईच्या पाठोपाठ माझ्या जीवनाला आकार आणि आशय देणारी माझी प्रिय पत्नी' यशवंतराव चव्हाण व वेणूताई यांच्यामधील स्नेहाचा प्रीतीचा गोडवा कसा होता हे या अर्पणपत्रिकेवरून निश्चित लक्षात येते.

जीवनातील काही निवडक प्रसंग

यशवंतरावांच्या जीवनातील प्रत्येक क्षण हा सुवर्ण क्षण आहे. पण त्या सुवर्णाला अनेक दिव्यांना सामोरे जावे लागले आहे. त्यांचे जीवन म्हणजे एक नवलकथा आहे. त्यांचा हा जीवनप्रवास अद्‌भुत आहे. या प्रवासात त्यांना अनेकजण भेटले. त्यात कौटुंबिक लोकांचा जसा समावेश आहे तसाच अनेक राजकीय, सामाजिक, साहित्यिकांचा समावेश आहे. त्यांना अनेकांचे प्रेम मिळाले. कित्येकांनी त्यांच्यावर चिखलफेक केली. आरोप प्रत्यारोप केले. तरीही या अग्निदिव्यातून अध्ययनाच्या अलंकारांनी त्यांच्या बुद्धीला तेज आले. त्यांची बुद्धी चिकित्सक बनली. विचार वैभवाचा ठसा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर उमटत राहिला. माणसातील माणूसपण शोधण्यासाठी ते वेडे बनले. जीवनात काही महत्त्वपूर्ण, आशानिराशेचे, परीक्षेचे क्षण आले पण आपल्या मूलभूत विचारतत्त्वांचा तोल त्यांनी कधीच जाऊ दिला नाही. जिद्द, संयम आणि आत्मविश्वास या बळावर त्यांनी संकटांशी सामना केला.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून त्यांनी अनेक चढउतार पाहिले. तसे पाहिले तर स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांना अनेक बिकट प्रसंगांना तोंड द्यावे लागले. जीवनातील कडू व गोड अनुभव त्यांनी तेवढ्याच रोचकतेने घेतले. व्यक्तिगत विकासाच्या

वैभवावर माणूस विराजमान झाला की अनेकांचे अनेक वादविवाद, समज-गैरसमज होतात. त्यामुळे काही प्रसंग निर्माण होतात. व्यक्तिगत जीवनामध्ये काही घटना घडतात. तरीही त्यांनी सदाचार, सद्भावना आणि सुविचार यांचा समतोल कधीही ढळू दिला नाही. जीवनाच्या प्रवाहाकडे स्थिर नि तटस्थ नजरेने पाहणाऱ्या प्रेक्षकाची भूमिका त्यांनी कधीच घेतली नाही. या उलट जीवनातील रस शोधणारा एक माणूस म्हणून त्यांच्या जीवनातील काही ठळक घटना व प्रसंगांच्या नोंदी सांगता येतील.

देवराष्ट्रातलं बालपण मागे टाकून विटा आणि नंतर कराड येथे त्यांनी टिळक हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. त्यावेळी पुणे येथे वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली होती. त्या स्पर्धेत यशवंतरावांनी भाग घेतला. 'खेड्यांचा विकास' या विषयावर हा पाचवीतला विद्यार्थी बोलला. १५०/- रु. चे पारितोषिक मिळाले. यशवंतरावांच्या दृष्टीने ते जीवनातील पहिले पाऊल होते. ह्या यशामुळे त्यांच्या लौकिकात भर पडली व आत्मविश्वास वाढला. पण या मिळालेल्या बक्षिसाचा त्यांनी प्रपंचासाठी उपयोग केला नाही. कारण त्यांनी पुढे राष्ट्रीय चळवळीत भाग घेतल्यामुळे त्या काळच्या सरकारने दंड केला. त्यासाठी त्यांनी हे बक्षिसाचे पैसे दिले. यशवंतराव म्हणतात, ''मनाने या विषयाला पकडलं आणि ध्येयाच्या वाटेवर नकळत एक पाऊल पडले.'' यशवंतरावांच्या जीवनाचा प्रारंभिक कालखंड कौटुंबिक दुःखातून, गरिबीतून वाटचाल करीत होता. स्वातंत्र्यासाठी झिजणाऱ्या यशवंतरावांची ही आठवण स्मरणात राहण्यासारखी आहे.

यशवंतरावांच्या बाणेदारपणाची आणखी एक आठवण येथे नमूद करता येईल. टिळक हायस्कूलमध्ये शिकत असताना एकदा शेणोलीकर गुरुजी वर्गात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना विचारले की तुम्ही कोण होणार? ते कागदावर लिहून द्या. त्यावेळी यशवंतरावांनी सांगितले,''मी यशवंतराव चव्हाण होणार.'' त्यावेळी यशंवतराव सातवीपर्यंतचे शिक्षण संपवून नुकतेच इंग्रजी शाळेत हायस्कूलमध्ये गेले होते. त्यांना स्वत:बद्दल किती आत्मविश्वास होता याची झलक येथे आपणास पाहावसाय मिळते. त्यांचे ते उत्तर त्यांनी खरे करून दाखवले. त्या उत्तरामध्ये फार मोठा अर्थ सामावलेला होता. मूल जेव्हा दुसऱ्या कोणाचे तरी अनुकरण करण्याचा प्रयत्न करते तेव्हा ती गोष्ट वेगळी असते. पण येथे या मुलाने इतरांना स्वत:चे अनुकरण करण्याइतके मोठे व्यक्तिमत्त्व उभे केले.

हायस्कूलमध्ये असताना यशवंतराव मिठाच्या सत्याग्रहात सामील झाले होते. त्यावेळी त्यांचा एक मित्र राघुअणा लिमये यांच्याबरोबर ते भूमिगत चळवळीतील

कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी बिळाशीला गेले. तेथून पुढे कोकणात रत्नागिरीला जाण्याचा त्यांनी बेत केला. रत्नागिरीला येण्यात त्यांची दोन उद्दिष्टे होती एक म्हणजे समुद्र पाहणे व दुसरे म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकरांना पाहणे व त्यांचे मार्गदर्शन घेणे. त्यावेळी 'श्रद्धानंद' मध्ये प्रसिद्ध होत असलेली त्यांची 'माझी जन्मठेप' ही काळ्या पाण्याच्या शिक्षेची आत्मकहाणी त्यांनी वाचली होती व ते प्रभावित झाले होते. राघुअण्णा लिमयेंच्या ओळखीमुळे रत्नागिरीला यशवंतरावांनी सावरकरांची भेट घेतली. सावरकरांना यशवंतराव हायस्कूलमध्ये शिक्षण घेत आहेत व आपले दर्शन घेण्यासाठी एवढ्या दूर आले आहेत याचे आश्चर्य वाटले. सावरकरांनी त्यांना सदिच्छा दिल्या. योगायोगाने यशवंतरावांनी समुद्रही पहिल्यांदाच पाहिला. अशा प्रकारे समुद्र आणि सावरकर यांच्या भेटीचा प्रसंग ते पुढे आयुष्यभर विसरले नाहीत.

विद्यार्थिदशेत यशवंतरावांची परिस्थिती नाजूक होती. त्यामुळे फी भागवण्या-इतपतही पैसे त्यांच्याकडे नसत. एकदा ते कऱ्हाड येथील एका मोठ्या मराठा सद्‌गृहस्थाकडे गेले आणि हायस्कूलमध्ये नादारी मिळावी म्हणून 'गरिबीचे शिफारसपत्र द्या' असे म्हणाले. पण त्या गृहस्थाने त्यांची ही साधी मागणी मान्य तर केली नाहीच पण उलट त्यांचा अपमान केला. आशा निराशेच्या प्रसंगांना धीराने सामोरे गेले.

यशवंतरावांच्या जीवनामध्ये खऱ्या अर्थाने १९३० पासून राजकीय कार्यास सुरुवात झाली. असहकाराच्या चळवळीत भाग घेऊन वयाच्या १६ व्या वर्षी त्यांनी राजकीय कार्याला सुरुवात केली. पुढे इ.स. १९३२ मध्ये गांधीजींच्या सत्याग्रहामध्ये तुरुंगवासाची शिक्षा झाली. १९४२ च्या 'भारत छोडो' या चळवळीत भूमिगत राहून मोलाचे कार्य केले. या काळात त्यांच्या जीवनामध्ये अनेक छोटेमोठे प्रसंग आले.

जतींद्रनाथांच्या बलिदानाचा यशवंतरावांवर फार मोठा परिणाम झाला होता. तेव्हा ते शालेय शिक्षण घेत होते. या संदर्भात ते म्हणतात, ''वर्तमानपत्रात त्यावेळी येणारी वर्णने चित्तथरारक होती. का, कोणास ठाऊक परंतु जतींद्रनाथांच्या उपोषणाने मला घायाळ केले होते. शेवटचे वीस दिवस तर जतींद्रनाथांची प्रकृती क्षणाक्षणाला घसरत असल्याचे वृत्त येऊ लागले. धडधडत्या अंत:करणाने मी ते वाचीत होतो.'' या घटनेतून राष्ट्रीय मनोभूमी तयार होण्यास मदत झाली. मनाला विचार प्रवृत्त करणारे कितीतरी प्रसंग घडले. जतिंद्रांचे बलिदान ही एकच घटना त्यांच्या बालमनावर चिरकाल परिणाम करणारी ठरली. झेंडावंदनाचा कार्यक्रम केल्यामुळे

विद्यार्थी दशेतच यशवंतरावांना अटक झाली होती. त्यावेळी त्यांना मातोश्री विठाबाई तुरुंगात भेटायला गेल्या होत्या. साहजिकच आईच्या डोळ्यांत पाणी आले. बरोबर आलेल्या शिक्षकांनी दोघांचे सांत्वन केले. शिक्षकांनी सांगितले की फौजदार साहेब दयाळू आहेत. माफी मागितलीस तर सोडून देतील असे म्हणताच यावेळी त्यांच्या आईने काढलेले उद्‌गार फार महत्त्वाचे आहेत. ''काय बोलता तुम्ही मास्तर? माफी मागायची? माफी मागायचे काही एक कारण नाही. तब्येतीची काळजी घे; म्हणजे झाले. देव आपल्या पाठीशी आहे.'' आईच्या या स्वाभिमानी प्रसंगाचा ठेवा अंत:करणात जतन करून ते कोठडीतून परत आले.

सातारा जिल्ह्यातील प्रतिसरकार (पत्रीसरकार) १ जून १९४३ पासून १३ जून १९४६ पर्यंत म्हणजे जवळपास तीन वर्षांहून अधिक काळ कार्यरत होते. सरकारला त्रास देणे, सरकारी कचेऱ्या, बंगले, रेल्वेस्टेशन जाळणे, तारा तोडणे, गाडी लुटणे असे प्रकार घडत होते. डिसेंबर १९४२ पासून सरकार भूमिगत यशवंतरावांना पकडण्यासाठी प्रयत्न करत होते. त्यासाठी १०००/- रु.चे बक्षीस जाहीर झाले होते. पण यश येत नव्हते. त्यांचा ठावठिकाणा सांगावा म्हणून पोलिसांनी त्यांच्या कुटुंबीयांना त्रास द्यायला सुरुवात केली. यशवंतरावांचे मधले भाऊ गणपतराव यांना पकडून विजापूरच्या तुरुंगात पाठवले. १५ जानेवारी १९४२ रोजी सौ. वेणूताईंना अटक केली. यशवंतरावांचे थोरले भाऊ ज्ञानदेवही मृत्यूमुखी पडल्याचे दु:खद वृत्तही शांताराम इनामदारांकडून त्यांना कळाले. आपल्या दु:खी आईच्या भेटीला जावे असा विचार त्यांच्या मनात आला. पण पकडले जाण्याचा धोका दिसत असल्यामुळे तो विचार त्यांना सोडून द्यावा लागला. वेणूताई आजारी होत्या. त्यांना माहेरी फलटणला पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली. यशवंतराव वेणूताईंना भेटण्यासाठी फलटणला गेले. आणि तेथेच १७ मे १९४३ रोजी त्यांना अटक झाली. त्यांना सहा महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली. ''तुरुंगातून सुटल्यानंतर जवळजवळ एक महिन्यानंतर भारत संरक्षण कायद्याखाली त्यांना येरवड्याच्या तुरुंगात डांबण्यात आले आणि १९४५ साली त्यांची मुक्तता करण्यात आली.''

याच काळात यशवंतरावांच्या थोरल्या बंधूंच्या पाठीचे आवाळूचे दुखणे विकोपाला गेले. त्यांचे ऑपरेशन करावे लागले आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. ज्या वडील बंधूने स्वत: अधिक शिक्षण न घेता नोकरी पत्करून कुटुंबाच्या पोषणाचा भार स्वीकारला त्या बंधूंच्या मृत्यूच्या वेळी यशवंतराव तेथे उपस्थित नसल्याने त्यांना फार वाईट वाटले.

१९४५ च्या अखेरीस ज्या निवडणुका झाल्या त्या निवडणुकीमध्ये यशवंतरावांचे

मित्र श्री. के.डी.पाटील हे कामेरीत निवडून आलेले होते. त्याच गावचे माजी आमदार चंद्रोजी पाटील यांचा खून ऑक्टोबर १९४६ मध्ये झाला आणि वर्ष पूर्ण होण्यापूर्वीच के.डी. पाटील यांचा ऑक्टोबर १९४७ मध्ये खून झाला. अर्थात दोघेही एकाच गावचे भाऊबंद होते. आमदार चंद्रोजी पाटील यांच्या खुनामध्ये यशवंतरावांचा हात असावा असा आरोप त्यांच्यावर केला गेला. त्यावेळी यशवंतराव म्हणतात,''मी त्यावेळी गृहखात्याचा उपमंत्री होतो. श्री. के.डी. पाटील यांच्यावर आमदार चंद्रोजी पाटीलांच्या खूनाचा आळ येऊन सगळीकडे काहूर उठले होते. काही मतलबी मंडळींनी या प्रकरणात मलाही बदनाम करण्याचा प्रयत्न केला.'' या प्रकरणात यशवंतरावांच्या जीवालाही धोका निर्माण झाला होता. बराच काळ त्यांना संरक्षण घ्यावे लागले. याच काळात त्यांचे मधले बंधू गणपतराव क्षयाने आजारी होते. त्यांना भेटण्यासाठी कराड स्टेशनजवळ कल्याणी बिल्डिंगमध्ये ते आले होते. यशवंतरावांची थोरली बहीण व भाऊ गणपतराव यांच्याबरोबर बोलणी झाल्यावर स्टेशनबाहेरचा सिग्नल पडताना त्यांनी पाहिला आणि क्षणभरसुद्धा येथे न राहण्याचा निर्णय घेतला. ते म्हणतात, ''कारण त्या रात्री दोनच्या सुमारास सहा जवान ठासलेल्या बंदुका, भाले, कुऱ्हाडी घेऊन कल्याणी बिल्डिंगवर चाल करून आले. दारावर धक्के मारून दार फोडण्याचा प्रयत्न झाला.'' यशवंतराव जर तेथेच थांबले असते तर तो प्रसंग मात्र धोकादायक होता. त्यामुळे त्यांना वाचविण्यासाठी लाल सिग्नल हा 'नियतीने दाखविलेला हात' वाटला, इशारा वाटला. अशा प्रकारे त्यांच्या जीवनात या योगायोगाच्या प्रसंगांनी कशी साथ दिली हे या प्रसंगावरून लक्षात येते.

एप्रिल १९४६ पासून सहा वर्षे यशवंतरावांनी गृहमंत्री मोरारजीभाईंचे पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून काम केले. त्यानंतर १९५२ साली ते मुंबई विधानसभेमध्ये कराड मतदारसंघातून निवडून आले आणि त्यांना मुंबई राज्याचे पुरवठा मंत्रीपद मिळाले. मोरारजीभाईंच्या मुख्यमंत्र्यांच्या काळात ऑक्टोबर १९५६ पर्यंत एक वजनदार कॅबिनेट मंत्री म्हणून त्यांनी काम केले. या काळात प्रशासनाचा उत्तम अनुभव त्यांना मिळाला. ते अत्यंत कार्यक्षम अशा कारभार यंत्रणेच्या सहवासात आले. शासन यंत्रणेचा अनुभव मिळाला. पण अजूनही यशवंतरावांच्या मागची संकटपरंपरा संपलेली नव्हती. १९४५ मध्ये यशवंतरावांची तुरुंगातून सुटका झाली. १९४७ च्या ऑगस्टमध्ये स्वातंत्र्य मिळाले. परंतु ६ महिन्याच्या आतच महात्माजींची हत्या झाली. ब्राह्मणांविषयीची चीड आणि त्यातून निर्माण झालेला उद्रेक यांना तोंड देण्याचे काम गृहखात्याचा चिटणीस म्हणून त्यांना करावे लागले. १९४८ मध्ये दुसरे बंधू गणपतराव यांचा मृत्यू झाला. १९५१ मध्ये गणपतरावांच्या पत्नीचे क्षयाने निधन

झाले. तिच्या मुलांचा भारही शेवटी यशवंतरावांवर पडला. अशातच १ डिसेंबर १९५५ मध्ये दुसरे एक संकट यशवंतरावांवर आले. या दिवशी फलटण येथे सातारा जिल्हा काँग्रेस कमिटीच्या सभेत उपोषण, संप, राजीनामे हे संयुक्त महाराष्ट्र मिळविण्याचे मार्ग नव्हेत असा ठराव मंजूर झाला. महाराष्ट्रापेक्षा नेहरू श्रेष्ठ आणि संयुक्त महाराष्ट्र मिळविण्याच्या प्रयत्नात यापुढे शंकरराव देव यांचे नेतृत्व स्वीकारण्यास मी तयार नाही अशी घोषणा यशवंतरावांनी केली. ''पुढे त्यांनी पत्रकारांना सांगून टाकले की मला मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व पं. नेहरुंचे नेतृत्व या दोघातून एकाची निवड करण्याची पाळी आली तर मी नेहरुंचे नेतृत्व स्वीकारेन.'' त्यामुळे सेनापती बापट, एस्. एम्. जोशी, आचार्य अत्रे, कॉ. डांगे यांच्यासारख्या समर्थ नेत्यांच्या टीकेस त्यांना सामोरे जावे लागले. महाराष्ट्राने तेव्हा १०५ बळी देऊन एकजुटीच्या बळावर महाराष्ट्र प्रांत मिळविला परंतु या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत यशवंतरावांना अनेक समस्यांना व टीकेला तोंड द्यावे लागले. त्यावेळी १ नोव्हेंबर १९५६ पासून यशवंतरावांनी विशाल द्वैभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून सुत्रे स्वीकारली होती. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची उत्साही वातावरणात स्थापना व नवीन राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथविधी झाला. ते मुख्यमंत्री असतामाच १९६२ मध्ये भारतावर चीनचे आक्रमण झाले. २३ नोव्हेंबर १९६२ रोजी चव्हाणांची केंद्र सरकारात संरक्षण मंत्रीपदावर नियुक्ती झाली. आणि त्यांच्या राजकीय जीवनातील नव्या पर्वाला प्रारंभ झाला. हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावला, हे शब्द त्या घटनेला उद्देशून रूढ झाले आहेत. मे १९६४ मध्ये पं. जवाहरलाल नेहरूंचे निधन झाले. पुन्हा पंतप्रधानपदासाठी लालबहादूर शास्त्री की मोरारजी देसाई असा प्रश्न निर्माण झाला आणि लालबहादूर शास्त्री पंतप्रधान झाले. १९६५ मध्ये पाकिस्तानने भारतावर आक्रमण केले.

यावेळी यशंवतरावांवर दुसरे एक संकट आले. १९६५ साली त्यांच्या मातोश्री विठाबाई यांचा मृत्यू झाला. त्यावेळी ते दिल्लीत होते. भारतपाक युद्ध चालू असताना त्यांचा अंत झाला. आईच्या आठवणी सांगताना ते लिहितात, ''तिच्या अस्थी घेऊन पुढे मी अलाहाबादला गेलो. गंगेत उभा राहिल्यावर माझ्या हातातून जेव्हा तिच्या अस्थी सुटल्या, तेव्हा भूतकाळाचा एकमेव धागा झटदिशी तुटला असे मला वाटले. घरातला मी मोठा झालो, या कल्पनेने काहीसा गोंधळलो. कारण जगातले मोठेपण चालते, पण घरातले लहानपण फार मोठे असते; हा माझा अर्धशतकाचा अनुभव होता.'' असा हा काळ सुख आणि दु:खाच्या हिंदोळ्यावरच हेलकावे खात होता. यशवंतरावांच्या

आई मुंबईत वारल्या. यशवंतराव दिल्लीहून मुंबईस आले. त्यांना त्यावेळी खूप वाईट वाटले.

४ जानेवारी १९६६ रोजी शास्त्री-अयुबखान बोलणी ताश्कंदमध्ये सुरू झाली. यशवंतराव चव्हाणही त्यांच्याबरोबर होते. ताश्कंद करारावर सही केल्यानंतर दुसऱ्या दिवशी ११ जानेवारी १९६६ रोजी हृदयविकाराने शास्त्रीजींचा मृत्यू झाला आणि पुन्हा पंतप्रधानपदाचा प्रश्न निर्माण झाला. जीवनामध्ये आणखी कसोटीचा क्षण आला. काही प्रसंगी त्यांच्या कर्तव्यकठोर व्यक्तिमत्त्वाने ती-ती कसोटी पार पाडली तर काही प्रसंगी त्यांचे अंदाज चुकले. त्यावेळी पंतप्रधानपदासाठी यशवंतरावांचे नाव पुढे आले. तेव्हाचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी त्यांचे नाव सुचवले. परंतु चव्हाणांनी स्वत:च इंदिरा गांधींना सांगून टाकले, ''आपण प्रधानमंत्रीपदासाठी निवडणूक लढवणार असाल तर माझा आपल्याला संपूर्ण पाठिंबा आहे. या पाठिंब्यामुळे चव्हाण स्पर्धेतून दूर झाले. इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या. यशवंतरावांनी आयुष्यातील एक चांगली संधी नाकारली. यशवंतरावांनी संघटनात्मक राजकारणात ज्या भूमिका स्वीकारल्या त्याबद्दल दुर्दैवाने काही ठिकाणी गैरसमज निर्माण झाले. त्यांच्यावर गुंडगिरी, संधीसाधू वृत्ती आणि दुटप्पी धोरणांनी वावरणारा नेता म्हणून आरोप केले. पण त्यात फारसे तथ्य नाही. त्यांची प्रतिमा नेहमीच वादळातून तयार होत गेली हे मात्र उघड सत्य आहे.

अखेरच्या काळात त्यांना मनाविरुद्ध काही गोष्टी कराव्या लागल्या. यशवंत-रावांच्या अनुयायांच्याही मनात संभ्रम निर्माण झाला. त्या प्रसंगीही आपली भूमिका स्पष्ट अशा शब्दांत मांडण्याचे नीतीधैर्य दाखवून यशवंतरावांनी आपले नेतेपद सिद्ध केले. राष्ट्रपती झाकीर हुसेन यांच्या निधनामुळे सिंडिकेटने नीलम संजीव रेड्डी यांची उमेदवारी जाहीर केली. पण श्रीमती गांधींचा याला विरोध होता. त्यांनी अचानक जगजीवनराम यांचे नाव पुढे केले. परंतु रेड्डी बहुमतांनी निवडून आले. यशवंतरावांनी रेड्डींना पाठिंबा दिला होता. श्रीमती गांधी या बंगलोर अधिवेशनाच्या अगोदर हैद्राबादेत झालेल्या अधिवेशनापासूनच यशवंतरावांवर नाराज होत्या. त्यात आणखी भर पडली. त्यामुळे संघटना काँग्रेस आणि सत्तारुढ काँग्रेस असे दोन गट पडले. या सर्व घटनात यशवंतरावांची परिस्थिती दोलायमान व धरसोडीची राहिली आणि या प्रसंगात इंदिरा गांधी व यशवंतराव यांच्यात दुरावा निर्माण झाला आणि १९७८ मध्ये संजीव रेड्डी काँग्रेसमध्ये दाखल झाले. चरणसिंगांच्या जनता पक्षीय राजवटीत १९७९ मध्ये ते उपपंतप्रधान झाले. पण ते सरकार अल्पावधीत कोसळले. नव्याने निवडणुका झाल्या. यशवंतरावांना पंतप्रधानपद मिळू द्यायचे नाही या दृष्टीने

इंदिराजींनी हालचाली केल्या. चरणसिंग आणि यशवंतराव यांच्या मंत्रिमंडळातील काही लोकांनी एकाच वेळी दगा दिला.

१९८० च्या निवडणुकीला इंदिरा गांधींचा पक्ष प्रचंड बहुमतांनी विजयी झाला. त्यांनी आपले मंत्रिमंडळ बनवले. तथापि या मंत्रिमंडळात त्यांचा मंत्री म्हणून समावेश केला नाही. परंतु १९८२ मध्ये इंदिरा गांधीनी काँग्रेसमध्ये परतल्यावर त्यांना आठव्या वित्तआयोगाचे अध्यक्ष केले. या काळात त्यांच्यावर चारही बाजूंनी संकटे येत होती. राजकारणात शेवटी ते एकाकी पडले. गैरसमजांचे हलाहल त्यांनी पचवले. मर्मभेदक टीकेचा प्रहार त्यांना सहन करावा लागला. संकटांचे आघात सोसावे लागले. तरी कधीही त्यांनी आपला समतोल कधी ढळू दिला नाही. त्यांनी राग, लोभ गिळला होता. अनेकांनी त्यांच्यावर टीका केली. आरोप केले. दगडफेकही केली. तरीही त्यांनी मनाची शांतता व संयम ढळू दिला नाही.

यशवंतरावांवर या काळात कौटुंबिक संकटे कोसळली. १९८१ पासून १९८४ नोव्हेंबरपर्यंत यशवंतरावांच्या मनाची कुचंबणा, स्वत:ची परवड झाली. याच काळात वेणूताई गेल्या. या घटनेचा उल्लेख करताना ते म्हणतात, ''माझ्या अंत:करणातल्या पवित्र नंदादीपाची ज्योत कायमची निमाली आणि हातात उरली ती फक्त चिमूटभर राख..... जीव कासावीस करणारी काजळी.'' या घटनेमुळे पहाडासारखा असणारा हा माणूस अंतर्बाह्य कोसळला. ऑक्टोबर १९८४ मध्ये इंदिराजींची निर्घृण हत्या झाली. यावेळीही त्यांची मानसिक अवस्था बिकट झाली. यावरून यशवंतराव किती मृदू मनाचे होते हे दिसून येते. २५ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांनी पण इहलोकीची यात्रा संपवली. ज्या अवस्थेत मृत्यूने त्यांच्यावर झडप घातली ती अवस्था त्यांच्यासारख्या जुन्या, जाणत्या नेत्यावर यावी हा दैवदुर्विलास होय. यशवंतरावांचा आजार एकाएकी वाढला आणि दिल्लीच्या हॉस्पिटलमध्ये योग्य आणि तातडीच्या उपचाराअभावी त्यांनी जगाचा निरोप घेतला.

यशवंतरावांच्या आयुष्याचा अखेरचा कालखंड निराशा आणि दु:ख यांनी भरलेला दिसतो. अपयशामागून अपयश येत गेले. कौटुंबिक जीवनातही एका पाठीमागून एक अशा आपत्ती आल्या. पण या प्रतिकूल परिस्थितीच्या खाचखळग्यात न कोलमडता, स्वत:च्या मनोधैर्याच्या बळावर त्यांनी आपले जीवन सावरण्याचा प्रयत्न केला. आत्मविश्वासाची नवी संजीवनी देण्याचा प्रयत्न केला. संकटकाळात भावनावेगात वाहून न जाता विचारपूर्वक घेतलेल्या भूमिकेवर दृढ राहून शत्रू-मित्रांनी केलेली जीवघेणी टिंगलटवाळीही निर्धाराने सहन केली. त्यांच्या आयुष्यातील शेवटची ५-१० वर्षे वादग्रस्त आणि महत्त्वपूर्ण प्रसंगांनी युक्त अशीच गेली. तरीही संस्कारक्षम नीतीमत्तेमुळे

ते कधी विचलित झाले नाहीत. आलेल्या प्रसंगांमुळे कधीही तापट वृत्तीने वागले नाहीत. त्यांच्या जडणघडणीतील काही स्फूर्तिदायक प्रसंग नव्या पिढीस निश्चितच स्फूर्ती व प्रेरणा देणारे आहेत.

व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये

यशवंतरावांसारखे सर्वसमावेशक व्यक्तिमत्त्व त्यांच्यानंतर महाराष्ट्रात दुसरे झाले नाही असे म्हणणे फार धाडसाचे ठरेल असे नाही. यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाचे काही पैलू होते आणि ते लहानपणापासूनच दिसून येत होते. तसे पाहिले तर गवयाचे मूल सूरातच रडते या उक्तीप्रमाणे यशवंतरावांना राजकारणाचे किंवा साहित्याचे बाळकडू मिळालेले नव्हते. त्यांची अशिक्षित आणि गरीब कौटुंबिक पार्श्वभूमी पाहता अवघ्या त्रेचाळिसाव्या वर्षी त्यांना मिळालेले मुख्यमंत्रीपद ही एक आश्चर्याची बाब वाटते आणि या पार्श्वभूमीवर त्यांचे व्यक्तिमत्त्व खूलून दिसते, मोठे वाटते.

यशवंतरावांच्या राजकीय जीवनाला सुरुवात झाली ती वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी, जेव्हा त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यसमरात उडी घेतली. परंतु त्याआधीही त्यांचे जे स्वभावगुण होते ते त्यांनी स्वत: जोपासले होते. त्यात उल्लेखनीय वैशिष्ट्य किंवा गुण म्हणजे त्यांचे साहित्यप्रेम आणि त्या निमित्ताने त्यांनी केलेले वाचन. वयाच्या मानाने त्यांचा वाचनाचा आवाका मोठा होता. आणि त्यातून आलेली विचारांची खोलीही जास्त होती. घरात कोणीही हे वाच, ते वाच असे सांगणारे नसतानासुद्धा त्यांनी थिल्लर पुस्तकांचा वाचनात कधीच समावेश केला नाही. म्हणजेच ही सुद्धा त्यांची उपजत बुद्धीच होय. माणसाच्या व्यक्तिमत्त्वावर त्याने वाचलेल्या ग्रंथांचा फार मोठा परिणाम होतो. त्याने वाचलेल्या व्यक्तिरेखा, वाचलेले विचार यातील आपल्याला काय भावेल, आवडेल त्याप्रमाणे वागण्याचा माणूस प्रयत्न करतो. यशवंतरावांच्या बाबतीत कदाचित तसेच झाले असेल. वाचनामुळे लहान वयातच त्यांच्या मनाचा पाया भक्कम बनला असेल आणि त्यातून त्यांचे निर्भीड व्यक्तिमत्त्व जन्माला आले असेल. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची निर्भीडपणाची चुणूक त्यांनी टिळक हायस्कूलमध्ये शिकत असतानाच पुढे 'मी यशवंतराव चव्हाण होणार' या विधानाने दाखवली होती.

बहुजन समाजातील गरीब शेतकरी कुटुंबातील जन्म, अत्यंत प्रयासाने हाल-अपेष्टा सोसूनही शिक्षण घेण्याची तळमळ, भोवताली चाललेल्या राष्ट्रीय व जागतिक घडामोडी जाणण्याची तीव्र जिज्ञासा इ. गोष्टींमुळेच यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्यपूर्ण घडण झाली आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात असलेल्या इतरांबद्दलच्या

जिव्हाळ्याचे मूळ हे त्यांना लहानपणी भोगाव्या लागलेल्या हाल-अपेष्टांमध्ये असावे. जे प्रसंग आपल्यावर आले ते बिकट प्रसंग आपल्या सांनिध्यात आलेल्या इतरांवर येऊ नयेत या मनोभूमिकेतून माणूस इतरांना मदत करतो, यशवंतरावांनी हेच केले. त्यामुळेच त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्याबद्दल आत्मीयतेने, जिव्हाळ्याने आठवणी सांगणारे लोक आजही भेटतात. त्यांच्या आठवणींवर मोठमोठे ग्रंथ प्रसिद्ध होतात. यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल लिहिताना या माणसांना शब्द अपुरे पडतात.

यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व सौजन्यशील होते. त्यांनी शिकत असतानाच समाज जाणला, राष्ट्र जाणले आणि स्वातंत्र्याची महती ओळखली. परकीय चाकरीचा मोह त्यांना आकर्षित करू शकला नाही. सौजन्यशील हा त्यांचा स्थायीभाव होता. त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रथमपासूनच अभ्यासू होते. त्यांची वृत्ती चिंतनशील होती. यशवंतराव तीव्र बुद्धिमत्तेचे होते. स्वत:च्या विचारांनी चालणारे होते. इतरांच्या दबावाखाली सहसा ते येत नसत. त्याचवेळी इतरांचे म्हणणे झुगारून लावताना त्यांचे मन न दुखवण्याची काळजी ते घेत. बेजबाबदारपणे ते कधीही विधाने करत नसत.

मराठी भाषेशिवाय इंग्रजी, हिंदी, गुजराथी, उर्दू या भाषांचेही त्यांना ज्ञान होते. अकरावीच्या निरोपसमारंभाच्या वेळी त्यांनी विद्यार्थ्यांतर्फे इंग्रजीतून केलेले भाषण हे प्रमुख पाहुण्यांच्या भाषणापेक्षाही सरस ठरले होते. म्हणजे कुमारवयापासूनच त्यांचे वक्तृत्व चांगले होते. तसेच सभाधीटपणाही होता. म्हणूनच त्यांचे मित्र द.र.कोपर्डेकर त्यांच्या आठवणी सांगताना लिहितात की यशवंतराव राजकारणी झाले नसते तर साहित्यिक झाले असते. वाचनाच्या व्यासंगामुळे मोजक्या शब्दांत परिणामकारकता कशी साधावी याचे कौशल्य त्यांनी आत्मसात केले होते. यशवंतराव अनेक सभासंमेलनांना हजर राहिले. पण प्रत्येक ठिकाणी वक्तृत्वात ते कधीही कमी पडले नाहीत. त्यांचे कुठल्याही व्यासपीठावरचे भाषण कधीच रूक्ष व सत्वहीन झाले नाही. राजकीय व सामाजिक व्यासपीठापेक्षा साहित्यिक व्यासपीठावर ते अधिक रंगून जात. वेळेचे अचूक अवधान, आपले विचार अभ्यासूपणाने पण दिलखुलासपणे मांडण्याचे त्यांचे स्वत:चे असे एक सूत्र होते. त्यामुळे त्यांची भाषणे मनाला सहजस्पर्श करीत. ऐकणाऱ्यांच्या हृदयाला भिडत. अभिजात साहित्यिकाचं रसिक मन यशवंतरावांच्यात बालपणापासूनच होतं. विविध ग्रंथ वाचून लहान वयातच त्यांनी जातीयवादाच्या प्रश्नाचा अभ्यास केला होता. कारागृहात असताना त्यांनी 'कास्ट सिस्टिम अँड इट्स इकॉनॉमिक ॲस्पेक्टस्' हा एडवर्ड ब्लँट यांचा ग्रंथ वाचून पूर्ण केला होता. त्यांचे वाचन चौफेर होते. पण वाचून फक्त 'पुस्तकातला

किडा' न राहता त्यांनी त्या वाचनाचा उपयोग प्रत्यक्ष जीवनात केला. समाजातील प्रश्नांची उकल करण्यासाठी केला. माणसांची मने ओळखण्याकरिता व मने सांभाळण्यासाठीही केला. त्यांचे स्वत:चे ग्रंथालय होते. प्रत्येक नवीन पुस्तक ते वाचत असत. ग्रंथालयात इंग्रजी, हिंदी, मराठी, गुजराती इ. भाषेतल्या एकाहून एक ग्रंथांचा समावेश होता.

त्यांचे ग्रंथप्रेम तर सर्वश्रुत आहेच पण त्याचबरोबर ग्रंथ लिहिणाऱ्या साहित्यिकांवरही त्यांनी तेवढेच प्रेम केले. त्यांना आदराने वागवले. ना.धों. महानोर, डॉ. सरोजिनी बाबर, माधवी देसाई, रणजित देसाई, कवी सुधांशु, शिवाजी सावंत, सौ. शैलजा राजे, यदुनाथ थत्ते यांच्याशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. राजकारणापेक्षा थोडेसे जास्तच ते साहित्यक्षेत्रात रमत असत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. नवोदित साहित्यिकांनाही त्यांनी सतत प्रोत्साहन दिले. त्यांना रोज येणाऱ्या पत्रांमध्ये नवोदित कवी, कवयित्री व लेखक-लेखिका यांच्या पत्रांचा समावेश फार मोठ्या प्रमाणावर होता. त्यात हिंदी साहित्यिकांचाही समावेश होता. हे लोक नवीन कविता, नवीन लेख, नवीन प्रकाशित झालेली पुस्तके यशवंतरावांना पाठवत असत. यशवंतरावही सवड काढून त्यांचे लेख वाचत असत आणि आवर्जून त्यांना पोच पाठवत असत. साहित्यिक हे महाराष्ट्राचे वैभव आहेत यावर त्यांचा विश्वास होता. खात्री होती. कित्येक कवयित्री तर अशा होत्या की त्यांनी आपल्या ग्रामीण बोली भाषेत कविता केल्या, त्या दुसऱ्यांकडून लिहून घेतल्या व अंगठा उठवून त्यांनी यशवंतरावांना पाठविल्या. जणू यशवंतरावांजवळ आपली मने त्यांनी मोकळी केली. त्यांना पोच द्यायलाही यशवंतराव विसरले नाहीत. म्हणजेच राजकारणाप्रमाणेच साहित्यक्षेत्राचेही यशवंतराव राजे होते. प्रवाह बदलल्यामुळे त्यांना लिहायला सवड मिळाली नाही. पण जे लिहित होते त्यांना दाद दिल्याशिवाय ते राहिले नाहीत. आजच्या काळातील साहित्याची आणि साहित्यिकांची चाललेली फरफट, त्यांचे चाललेले अवमूल्यन पाहता यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाचा हा पैलू आणखीनच चमकू लागतो.

यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व हे स्वयंभू होते. स्वकष्टार्जित होते. त्यांच्या घराण्याला कोणतीही परंपरा नव्हती. साहित्याची परंपरा नव्हती, राजकारणाची नव्हती, संगीताची परंपरा नव्हती. त्या काळात त्यांचे घराणे म्हणजे बडे प्रस्थ होते असाही भाग नव्हता. ते मोठे जमीनदार होते, वतनदार होते असेही नव्हते. पण लहानपणापासून प्रत्येक गोष्टींचा अभ्यास करून, स्वत:च्या दारिद्र्याची तमा न बाळगता व बहुजन समाजात आपण जन्मलो याचा अभिमान बाळगत, प्राप्त

परिस्थितीला टक्कर देत देत त्यांनी आपले व्यक्तिमत्त्व प्रतिष्ठित बनवले असे आवर्जून म्हणावे लागेल. घरात गायकी नसतानाही त्यांना संगीताची आवड होती. ते त्यातले दर्दी होते. संगीत त्यांना समजत होते. गृहमंत्री असताना त्यांनी दिल्लीत किशोरी आमोणकरांचे गाणे रात्री एक वाजेपर्यंत ऐकले होते. म्हणूनच यशवंतराव आणि पं. भीमसेन जोशी यांच्यात एक रसिक आणि एक कलावंत यांचे नाते निर्माण झाले होते. गाणे गाण्यासाठी गाणाऱ्याला आणि ते ऐकण्यासाठी ऐकणाऱ्याला कोणत्या प्रकारची मन:स्थिती लागते, वातावरण लागते, शिस्त लागते याची यशवंतरावांना चांगली जाण होती. नागूपरला झालेल्या सरकारी संगीत महोत्सवाच्या वेळी यशवंतरावांनी स्वत:साठी पं. भीमसेनांचे गाणे थांबवले होते. नंतर कार्यक्रमाला उशीर झाला म्हणून आलेले लोक गाणे ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हते. कोणी झोपलेले होते तर कोणी लोळत होते. तेव्हा यशवंतरावांनी स्वत: त्या सर्व लोकांना उठवून शिस्तीत बसवले व नंतर गाणे सुरू झाले. पं. भीमसेनांचे गाणे ऐकण्याची त्यांना किती उत्कट इच्छा होती हे यावरून कळते.

तरुणपणी कराडहून कोल्हापूरला जाऊन पिटात बसून त्यांनी नाटके पाहिली. म्हणजेच ते जसे संगीतवेडे होते तसेच नाट्यवेडेही होते. म्हैसूरकर महाराज, भागवतबुवा, बाबा आळतेकर यांची संगीत भजने व औंधच्या दाजी गुरवाचा पखवाज ऐकण्यात त्यांनी अनेक रात्री घालवल्या. पुढे केंद्रात गेल्यावरही वेळात वेळ काढून अगदी ठरवून ते तिथल्या नाट्यगृहांना भेट देत असत व नाटके पाहात असत. करमणूक म्हणून नाटक पाहणे त्यांच्या स्वभावात नव्हते. तर नाटकाचे कथानक, त्याचे मूळ कशात आहे ? त्यातील कलाकारांनी घेतलेले परिश्रम या सर्व गोष्टींकडे त्यांचे लक्ष असायचे. इंग्रजी साहित्याचा अभ्यास चांगला असल्यामुळे त्यांना परदेशातील नाटकांच्या मुळाशी सहजपर्यंत पोचता यायचे. तेथील संगीत, नाटक यांची आपल्या नाटकांशी, संगीताशी, कलाकारांशी तुलना करायचे. साम्य व भेद शोधायचे. यावरून प्रत्येक गुण, प्रत्येक आवड, यशवंतरावांच्यात किती मुरलेली होती हे लक्षात येते. केवळ प्रतिष्ठा म्हणून त्यांनी संगीत, नाटक, साहित्य या आवडी जोपासल्या नव्हत्या हे खरे.

यशवंतरावांचा व्यासंग चांगला होता. बोलण्यातही ते वाकबगार होते. मितभाषी होते. सर्वात कमी बोलणारे नेते होते. दुसऱ्या व्यक्तीविषयी फारसे बोलणार नाहीत. बोलले तरी कुचेस्टेने, निंदा किंवा मूल्यमापनात्मक बोलणार नाहीत. आक्रस्ताळेपणा त्यांच्या स्वभावात नव्हता. प्रांजळपणा, मृदू, गोड भाषा. बोलतानादेखील दुसऱ्यांच्या अडचणी विचारीत, त्यांच्या पाठीवर हात फिरवत, मायेने दुसऱ्यांच्या मनाला ऊब देत.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये स्वाभिमान आणि शालीनता यांचा सुरेख संगम झालेला

होता. त्यांच्या या व्यक्तिमत्त्वामुळे महाराष्ट्रात एक नवीन आदर्श निर्माण झाला. ते एक श्रेष्ठ दर्जाचे विचारवंत होते. त्यांच्या विचारात सामान्य माणसाबद्दल आस्था होती. त्यांच्या प्रज्ञेला करुणेचे अधिष्ठान होते. त्यामुळे प्रज्ञा, करुणा व ज्ञान यांचा सुरेख मिलाफ त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसतो. तसेच बदलत्या काळाच्या प्रेरणा ते अचूकपणे ओळखत असत.

माणसांना प्रेमाने आपल्याकडे वळविण्याची कला त्यांनी आत्मसात केली होती. निष्कपट प्रेम कसं करावं याचं दर्शन ते स्वत:च्या वर्तनातून घडवीत. शब्दांच्या वारेमाप उधळपट्टीपेक्षा यशवंतरावांनी कृतीला महत्त्व दिले. शब्दांची अचूक फेक करणारे ते एक वक्ते होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व सर्वस्पर्शी होते. त्यांच्याकडे असलेल्या वक्तृत्व गुणांमुळे ते श्रोत्यांवर सहज छाप पाडत असत. त्यांच्या आवाजात फारसे माधुर्य नव्हते. पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला शोभणारे ओज त्यात भरपूर असे. आवाजात एक विशिष्ट लय असल्याने त्यांचे भाषण कधी कंटाळवाणे होत नसे. ते मार्मिक व सूत्रबद्ध बोलत. त्यांच्या बोलण्यात जितका जिव्हाळा तितकाच प्रेमळपणा तर प्रसंगी तेवढाच खंबीरपणा होता. याचा उपयोग त्यांनी समाजप्रबोधनासाठी केला.

यशवंतराव चव्हाण हे अत्यंत हुशार, तडफदार तसेच अत्यंत धोरणी, व्यवहारकुशल होते. त्यामुळेच त्यांनी आपल्या हातातील सत्ता संयमाने, विनम्र भावाने वापरली. त्यांच्यामुळे देशात नवा आदर्श निर्माण झाला. सामान्य माणसांच्या जीवनात त्यांना आदराचे व प्रेमाचे स्थान होते. यशवंतराव म्हणजे माणुसकीचे मूर्तिमंत रूप. माणुसकी व जिव्हाळा या पैलूंना त्यांनी अधिक स्थान दिले.

यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व मनाला मोहविणारे होते. कलावंतांच्या कलेचा ते रसिकतेने आस्वाद घेत. जीवनाच्या प्रारंभापासूनच संघर्ष करत करत ते घडत गेले. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व सामान्य माणसाच्या आशाआकांक्षांचे प्रतीक बनले. माणसांची पारख करण्याची विलक्षण हातोटी त्यांच्याकडे होती व कोणता माणूस कोणत्या कामाला घ्यावा याची योजकताही होती. जास्तीतजास्त कार्यकर्ते त्यांनी जमवले. सवंगड्यांशिवाय राजकारण नाही. जवळ असलेल्या माणसांना त्यांनी कधीही तोडले नाही. एखाद्याशी त्यांची मैत्री झाल्यावर ती सहसा तुटत नसे. उलट स्नेह वाढत जाई. बेरजेचे राजकारण त्यांनी केले. कोणत्याही मोहापेक्षा कर्तव्य श्रेष्ठ आहे असे त्यांनी मानले. भावनाप्रधान असूनही ते भावनेच्या आहारी गेले नाहीत. मानवतेवर आणि मानवतावादावर त्यांची श्रद्धा होती. त्यांचा वाचनाचा व्यासंग मोठा होता. संगीत, साहित्य, नाट्यकला, शिक्षण, यांचे ते चाहते होते. कलात्मक सौंदर्याचे त्यांना आकर्षण होते. त्यामुळे त्यांचे मन मोहरून जात असे.

योजकता हा यशवंतरावांचा सर्वात मोठा गुण होता. या गुणामुळे अनेक माणसे जवळ आली. यामध्ये हरतऱ्हेची माणसे असणे स्वाभाविकच होते. आयुष्यातील कसोटीच्या वेळेला अनेकांनी त्यांच्यावर टीका केली. अपमानित केले. पण अशा लोकांना कटुतेची वागणूक द्यायची नाही हे त्यांचे व्रत होते. ते त्यांनी अखेरपर्यंत पाळले. त्यांच्याविषयी कठोरपणे बोलणाऱ्यांना आणि वागणाऱ्यांनाही त्यांनी सन्मानाने वागवले. याचे एकच कारण होते ते म्हणजे बोलणाऱ्या किंवा लिहिणाऱ्या माणसांपेक्षा देशहित त्यांना महत्त्वाचे होते. मनाची शांतता ढळू दिली नाही. शांत व गंभीर वृत्ती ठेवून शुद्ध विचारांचा त्यांनी सतत पाठपुरावा केला. व्यक्तिगत गुणवत्तेचा दर्जा, सचोटी, प्रामाणिकपणा, चारित्र्य आणि स्वीकारलेल्या कार्यावरील निष्ठा, विनम्रता आणि शिष्टाचार इ. गुणवैशिष्ट्यांमुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला वेगळ्या प्रकारची झळाळी प्राप्त झाली. संघर्ष टाळून समन्वय कसा साधावा हे यशवंतरावांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य होते.

यशवंतराव तसे धट्ट मनाचे नेते होते. त्यांच्या अंतर्मनात डोकावणे कठीण. तसे ते कमालीचे मुत्सद्दी आणि अत्यंत सावध. विचारांनी समृद्ध व आचाराने निष्कलंक. म्हणून त्यांचा अनेकांनी उल्लेख केला आहे. विचारांची संस्कारक्षमता, भावनेची कोमलता आणि बुद्धीचे औदार्य यांचा समन्वय त्यांच्या व्यक्तिमत्त्वात झालेला होता. ते सर्वांशी मिळतेजुळते घेत. मुद्दाम कुणाला दु:ख द्यावे, कोणाचा अवमान करावा हे त्यांच्या स्वभावात नव्हते. कटुता न ठेवणे आणि कटुता नसणारे वातावरण निर्माण करणे हाच त्यांचा स्वभावधर्म बनला होता. या स्वभावाला अनुसरूनच त्यांचे वागणे आणि बोलणे होते. पक्षामध्ये डावे नि उजवे यांचा सुवर्णमध्य साधण्याचा त्यांनी प्रयत्न केला. आयुष्यभर त्यांनी विवेकाने वागण्याचा प्रयत्न केला. अनेक संकटे आली पण विवेक सुटू दिला नाही. दुसऱ्यांचे विचार कमीत कमी वेळात समजावून घेण्याची कला त्यांनी चांगलीच अवगत केली होती. एवढेच काय एखाद्याचा एकदा परिचय झाला की ते चिरकाल आपल्या टवटवीत स्मृतिकमळात साठवून ठेवत. या त्यांच्या गुणग्राही स्वभावामुळे त्यांनी अनेक टीकाकारांनाही आपले मित्र बनवले. त्यांच्या खेळकर, मनमोकळ्या अन् मिश्किल नम्र विनोदातून हास्याची कारंजी निर्माण होत असत. आणि टीकाकारांच्या त्या टीकेच्या पिचकाऱ्या त्या कारंज्यात अदृश्य होत असत. लोकांमध्ये राहण्याची त्यांना हौस असे. लोकांपासून दूर जायचे, त्यांची पर्वा करायची नाही, असे त्यांना कधीच वाटले नाही. एखादी गोष्ट त्यांच्या मनाला पटली नाही व नाईलाजाने करावी लागली तर ते बैचेन होत असत. असा हा माणुसकीला जपणारा 'माणूसवेडा'' माणूस होता. एखाद्यावर भरभरून स्नेह

करणारा, त्याला त्या वर्षावात चिंब भिजवणारा, हवाहवासा वाटणारा अत्यंत चारित्र्यवान माणूस होता.

यशवंतरावांची शरीरयष्टी फार उंच आणि धिप्पाड अशी नव्हती. बांधा मध्यम प्रकारचा होता. त्यांची प्रकृती फार स्थूलही नव्हती आणि फारशी सडपातळही नव्हती. रंग सावळा, रुंद चेहेरेपट्टी, भव्य कपाळ आणि जबडा मोठा होता. नाक काहीसे मोठे, पांढरे शुभ्र दात, आणि भुवयांच्या खाली लखलखणारे चमकदार टपोरे डोळे असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. पांढरे स्वच्छ धोतर, सैलसा पांढरा अंगरखा आणि पांढरीशुभ्र अणकुचीदार टोपी असा त्यांचा पोशाख होता. अधूनमधून ते जाकीट वापरत असत. विदेशात मात्र कोट, सूट, पँट असा पोशाख असे. सुरुवातीस मात्र अंगरखा, धोतर व पटका असाच त्यांचा पोशाख होता. थंडीच्या दिवसात तंग तुमान आणि अचकन वापरत असत. त्यांच्या पोशाखात भपकेबाजपणा किंवा डामडौल अजिबात नव्हता. परंतु स्वच्छ व नीटनेटके कपडे त्यांना आवडत असत.

त्यांना सिगारेट ओढण्याचा छंद होता. नंतर काही दिवसांकरिता त्यांनी हे व्यसन बंद केले. अन्य दुसरे कसलेही व्यसन त्यांना नव्हते. सुरुवातीला त्यांचा स्वभाव तापट होता. पण नंतर या स्वभावाला त्यांनी मुरड घातली. त्यांची घरची राहणी साधीच होती. त्यामध्ये बडेजावपणा, भारदस्तपणा अथवा खानदानीपणाचा आव अजिबात नव्हता. उलट दु:खितांच्या अंत:करणात डोकावण्याचा छंद त्यांनी मनाला लावून घेतला.

व्यक्ती समाजात कशी वावरते यावरून तिचे व्यक्तिमत्त्व ठरवता येत नाही कारण काही व्यक्ती घरात एक व बाहेर एक चेहरा धारण करतात. पण यशवंतराव जसे बाहेर होते तसेच घरातही. सगळीकडे स्वच्छ पारदर्शकता, मनही पारदर्शक. वेणूताई व यशवंतराव दोघेही देवावर श्रद्धा ठेवणारे होते. आंघोळ झाल्यानंतर देवघरात जाऊन देवाला व साईबाबांच्या मूर्तीला नमस्कार केल्याशिवाय ऑफीसला जायचे कपडे घालत नसत. देव्हाऱ्यात जवळपास सर्व चांदीचे देव होते, आणि देवघरात सर्व लहानथोर मृत नातेवाईक व जिव्हाळ्याच्या लोकांचे फोटो होते. कोणत्या व्यक्तीचे स्थान कोठे आहे याची त्यांना पूर्णपणे जाणीव होती. रोज रात्री जेवणानंतर ९:३० च्या सुमारास सरकारी कागद पाहून झाल्यानंतर ते एखादे पुस्तक हातात घेत. घड्याळाकडे लक्ष न देता वाचन चालू असे. डोळे थकले म्हणजे वाचन बंद करीत. यशवंतराव कृष्णकाठचे रहिवासी. त्या भागातील माणसे कशी मराठमोळी रांगडी. तिखट जेवण पसंत करणारी. त्यामुळे ज्वारीची भाकरी आणि कांदेवांग्याची भाजी हे त्यांचे आवडते जेवण. मांसाहारही त्यांना आणखी जास्त पसंत होता. गोड कमी आवडत असे. भात हा त्यांच्या आवडीचा

पदार्थ. मुंबईत असताना ते चहा पीत असत. दिल्लीला आल्यापासून कॉफी. त्यांना खेळाची आवड होती किंवा नाही याचा फारसा उल्लेख कुठे आढळत नाही. पण लहानपणी व्यायाम मात्र करीत असत. पुढेपुढे राजकारणाच्या व्यापामुळे फक्त चालण्याचा व्यायाम घेत, तोही घरात. यशवंतराव निसर्गवादी आणि मानवतावादी होते. देवावर विश्वास होता. पण देवभोळे नव्हते. वयाच्या चाळीशीनंतर दिवसातील काही क्षण ते प्रार्थनेत व्यतीत करत असत. मातापित्यानंतर त्यांनी म. गांधींना स्थान दिले. म्हणून म. गांधी हे त्यांचे दुसरे श्रद्धास्थान. ते स्वत: गांधीवादी जीवन जगले आणि इतरांनाही गांधीवादाचे धडे त्यांनी दिले.

लहान मूल ज्याप्रमाणे कुतूहलाने जगाकडे पाहते, त्याच्या परीने जग समजून घेण्याचा प्रयत्न करते, नजरेत अफाट कुतूहल आणि हालचालीत धडपड असते, तसेच काहीसे कुतूहल उराशी बाळगून यशवंतराव जगले, यशस्वी धडपड केली. जीवनातील प्रत्येक प्रसंगातून आशेच्याच किरणाकडे पाहात राहिले. वेणूताई जोपर्यंत हयात होत्या तोपर्यंत निराशा कधी त्यांना शिवली नाही. वेणूताईच्या निधनानंतर मात्र ते हताश झाले आणि थोड्याच दिवसांत हे न भूतो न भविष्यति असे व्यक्तिमत्त्व लोप पावले.

○ ○ ○

नेतृत्वाची उभारणी

महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्याही राजकारणात आपले वेगळेपण सांभाळून अनेक महत्त्वाच्या भूमिका यशंवतरावांनी पार पाडल्या. त्यांचे नेतृत्व हे बहुजन समाजातून वर आलेले होते. त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वात अतुलनीय अभिजात गुणांची जाणीवपूर्वक जोपासना केली होती. त्यांच्या नेतृत्व- उभारणीमध्ये अनुवंशाचा भाग अजिबात नव्हता. पुढारीपण करण्यासाठी कौटुंबिक वातावरण, पैसा, प्रतिष्ठा, परंपरा वगैरे पोषक ठरणाऱ्या बाबी यशवंतरावांच्या वाट्याला आलेल्या नव्हत्या. त्यांचे नेतृत्व स्वकष्टार्जित होते. त्यांनी हेतुपूर्वक आपल्या राजकीय व्यक्तिमत्त्वाची उभारणी केलेली होती. त्यामुळेच त्यांच्या या नेतृत्वाचा विकास कसा झाला हे संक्षिप्तपणे पाहणे महत्त्वाचे वाटते. या नेतृत्वउभारणीमध्ये कुटुंबातील माणसे, सहकारी, मित्र, यांनी त्यांना कसे सहकार्य केले तेही स्वत: यशवंतरावांनी आठवणींच्या रूपाने अथवा लेख, भाषणांच्या माध्यमातून सांगितले आहे. या आधारभूत साहित्यातून त्यांच्या नेतृत्वाची उभारणी, पायाभरणी कशी झाली हे पाहणे महत्त्वाचे आहे.

यशवंतरावांनी राजकारणाची धुरा समर्थपणे सांभाळून साहित्य क्षेत्रातही आपली सेवा रुजवली आहे. यशवंतरावांमधील राजकीय नेतृत्वगुण आणि त्यांचे लेखकगुण असलेले व्यक्तिमत्त्व ग्रामीण परिसरातून उदयाला आले होते. अशा या ग्रामीण मातीतून आकारास आलेल्या राजकीय नेत्याच्या कर्तृत्वाची उभारणी कशी झाली हे विस्ताराने मांडण्यापेक्षा त्यांच्या या राजकीय जीवनाचा आणि जडणघडणीचा संक्षिप्त आढावा घेणे उचित आहे. शालेय जीवनामध्ये असताना त्या काळात म. गांधींजींची दांडीयात्रा आणि मिठाचा सत्याग्रह आदी आंदोलने झाली होती. या काळात कृष्णेच्या घाटावर अनेक नामवंत वक्त्यांची भाषणे होत. ती भाषणे ऐकण्यासाठी यशवंतराव तास न् तास

थांबत असत. त्याचा त्यांच्या राजकीय जीवनावर परिणाम घडत होता. १९२७ च्या सुमारास श्री. भास्करराव जाधव हे तेव्हाच्या मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे उमेदवार म्हणून सातारा जिल्ह्यातून उभे होते. त्यांनी प्रतिनिधी व्हावे अशी यशवंतरावांची इच्छा होती. त्यामुळे या निवडणुकीत एक स्वयंसेवक म्हणून त्यांनी काम केले. या संदर्भात ते म्हणतात, ''त्या निवडणुकीत मी एक स्वयंसेवक म्हणून काम करू लागलो आणि त्यासाठी कराड शेजारच्या चार-दोन गावी जाऊन आलो. निवडणुकीशी माझा जो संबंध आला, तो इतक्या लहान वयात आला आणि तेव्हापासून तो आजतागायत टिकला आहे.'' यशवंतराव विद्यार्थी दशेत असताना अशा नवनवीन विचार प्रवाहांचा संस्कार त्यांच्या मनावर होत होता. १९२९ ला लाहोर येथे रावी नदीच्या तीरावर राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन भरले. त्यानुसार २६ जानेवारी १९३० रोजी स्वातंत्र्यदिन साजरा करण्याचे ठरले. म. गांधींजींचे यासंबंधीचे आव्हान देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचले. कराडलाही हा सोहळा साजरा करण्याचे ठरले. टिळक हायस्कूलच्या आवारातील लिंबाच्या झाडावर काँग्रेसचा झेंडा लावून झेंडावंदन झाले. या मंगल सोहळ्यात वाचण्याचे यशवंतरावांनीच तयार केले होते. भारावलेल्या परिस्थितीत ते पत्र त्यांनी वाचून दाखवले आणि यशवंतरावांचे राजकीय जीवन सुरू झाले. यशवंतरावांचे वय यावेळी अवघे १६ वर्षांचे होते. वयाच्या १६व्या वर्षी राष्ट्रीय विचारांचा झेंडा त्यांनी खांद्यावर घेतला. या काळात शिक्षणाबरोबरच स्वातंत्र्य चळवळीत ते आघाडीवर होते. सातारा, सांगलीमध्ये ते तरुणांचे नेतृत्व करू लागले आणि स्वातंत्र्यचळवळीत कसलीही तमा न बाळगता त्यांनी स्वत:ला झोकून दिले. त्यानंतर १९३२ मध्ये सरकारविरोधी बुलेटीन वाचण्याचे काम यशवंतरावांनी केले व ह्या गुन्ह्याबद्दल त्यांना १८ महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली. याच काळात त्यांच्या विचाराला एक तात्त्विक बैठक प्राप्त झाली. फेब्रुवारी १९३२ मध्ये एक वर्ष ते येरवडा जेलमध्ये होते. आणि नंतरचे ३ महिने त्यांना विसापूरच्या जेलमध्ये ठेवले होते. १९३३ च्या मे महिन्यात ते तुरुंगातून सुटून बाहेर आले. अशा पद्धतीने १९३० आणि १९३२ च्या कायदेभंगाच्या चळवळीत उडी घेऊन त्यांनी कारावास भोगला. १९३० ते १९४५ या कालखंडात यशवंतरावांनी अनेक वेळा कारावासाच्या शिक्षा झाल्या. त्यावेळी त्यांनी राजकीय व सामाजिक तत्त्वज्ञानाचे अध्ययन केले.

ब्रिटिश सरकारने केलेल्या १९३५ च्या राजकीय सुधारणा कायद्याप्रमाणे १९३७च्या फेब्रुवारी मार्च मध्ये भारताच्या अकरा राज्यांत विधानसभेच्या निवडणुका झाल्या. पैकी आठ राज्यांत काँग्रेस बहुमताने निवडून आली. या निवडणुकीत सातारा

मतदारसंघातून यशवंतरावांच्या प्रयत्नांमुळे आत्माराम पाटील यांना तिकिट मिळाले होते. हे तिकीट मिळविण्यासाठी सरदार वल्लभभाई पटेल यांची भेट घेऊन त्यांना तिकीट मिळणे कसे महत्त्वाचे आहे हे त्यांच्या कानांवर घातले. सातारा काँग्रेसच्या तरुण-कार्यकर्त्यांच्या भावना सांगितल्या. आणि आत्माराम पाटील बोरगावकर यांना तिकीट मिळाले, तेव्हा त्यांचा प्रचार यशवंतरावांनी सुरू केला. त्याचे वर्णन ते असे करतात, ''दिवस रात्र निवडणूक प्रचाराचे व्यवधान असे. मी सायकलवर बसत असे यावर आज कोणी कदाचित विश्वासही ठेवणार नाही. पण १९३७ च्या निवडणूक मोहिमेत मी निम्मा जिल्हा तरी सायकलवरून हिंडलो असेन. बहुतेक वेळा सोबतीला जोडीदार कार्यकर्तेही सायकलवर असत. गप्पा मारत मारत एका गावाहून दुसऱ्या गावाला जावे.'' अशा रीतीने त्यांनी निवडणुकीच्या प्रचारात सहभाग घेतला. या प्रचारासाठी मित्रांच्या सहाय्याने 'लोकक्रांती' या नावाचे एक मुखपत्रही त्यांनी चालविले होते. त्याकाळात ३२ रु. किंवा अधिक सारा देणाऱ्यालाच मतदानाचा अधिकार होता. त्यामुळे सरंजामी वृत्तीच्या लोकांचा भरणा अधिक होता. अशांना तोंड देण्याचे काम त्यांनी व त्यांच्या मित्रांनी केले. आणि महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकाने त्यांचे उमेदवार ३७१२० मते मिळवून विजयी झाले. या निवडणुकीच्या संदर्भात ते आपल्या प्रतिक्रिया अशा व्यक्त करतात, ''या निवडणुकीच्या निमित्ताने मी समाजाच्या सर्व थरांमध्ये अगदी खोल उतरू शकलो. माझ्यापेक्षा तरुण असलेल्या नव्या मुलांच्या ओळखी झाल्या आणि या जिल्ह्याच्या सार्वजनिक जीवनात माझे स्वत:चे असे स्थान निर्माण झाल्याची जाणीव मला झाली.'' यशवंतराव चव्हाण सातारा जिल्ह्यातील एक महत्त्वाचे घटक बनले. या निवडणुकीमुळे त्यांना उमेद, प्रोत्साहन तर मिळालेच पण ही घटना त्यांच्या मनाला प्रसन्न करणारी होती. कारण त्यांनी भाग घेतलेली ही पहिली निवडणूक मोहीम होती. १९३९ मध्ये यशवंतरावांच्या पुढाकाराने सातारा जिल्ह्याची राजकीय परिषद तासगाव येथे घेण्यात आली. पण ती परिषद विरोधी मंडळींनी उधळून लावली. जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदासाठी त्यांनी उभा केलेल्या उमेदवारांचा पराभव झाला. या घटनेमुळे त्यांना दु:ख होणे साहजिकच होते. कारण मोठ्या परिश्रमाने त्यांनी ही परिषद भरवली. या परिषदेचे अध्यक्ष म्हणून रॉय साहेबांनाच बोलावले होते. या घटनेमुळे सातारा जिल्ह्यात उघडउघड दोन गट पडले. यशवंतरावांचे जवळचे मित्र आत्माराम पाटील यांच्याशी असलेली राजकीय मैत्री संकटात आली होती. तरीही या काळात यशवंतराव चव्हाणांची राजकीय नेतृत्वाची उभारणी मात्र होत होती.

मुंबईच्या काँग्रेसच्या सभेनंतर ९ ऑगस्टला 'ऑगस्ट क्रांती' सुरू झाली. 'जिंकू किंवा मरू' हा मंत्र जनमनात रुजला. माणसे पेटून उठली. ब्रिटिश खवळले. यशवंत-

रावांनी इंदोलीत जाऊन स्वातंत्र्यसंग्रामाची पार्श्वभूमी कार्यकर्त्यांना समजावून सांगितली. आणि येथून यशवंतरावाच्या भूमिगत जीवनाचा श्रीगणेशा झाला. १९४२ सालच्या 'भारत छोडो' या अखेरच्या आंदोलनात त्यावेळच्या विशाल सातारा जिल्ह्याचे नेतृत्व केले. भूमिगत राहून कार्यकर्त्यांना त्यांनी लढ्याचे मार्गदर्शन केले. राजकारण आणि राजकारण यासाठीच पुढे कार्य करण्याचा त्यांच्या मनाचा निश्चय झाला. ''ही चळवळ तुरुंग भरतीची नाही. 'करू किंवा मरू' या इर्षेने हा स्वातंत्र्यलढा लढवायचा आहे. ब्रिटिश सत्तेविरूद्ध आपणास आम जनतेची क्रांती करावयाची आहे. या क्रांतीच्या होमकुंडात प्रसंगी स्वत:चीही आहुती द्यावी लागेल, एवढी ज्यांची तयारी असेल त्यांना मी काय करावयाचे ते सांगेन.'' अशा रीतीने भूमिगत चळवळीतील भूमिका पार पाडण्याचे काम त्यांनी सुरू केले. कराड, पाटण, तासगाव, वडूज आणि इस्लामपूर या ठिकाणी झालेले १९४२ च्या स्वातंत्र्यचळवळीतील मोर्चे हे इतिहासातील एक सोनेरी पान आहे. पुढे चव्हाणांना पकडण्यासाठी सरकारने एक हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले. वेणूताईना भेटण्यासाठी फलटणला गेलेल्या यशवंतरावांना पोलिसांनी १७ मे १९४३ रोजी अटक केली.

या चळवळीच्या काळानंतर १९४६ मध्ये सार्वजनिक निवडणुका झाल्या. काँग्रेस पक्षातील एक कार्यकर्ता म्हणून त्यांना तिकीट मिळाले ''आणि १९३७ च्या निवडणुकीत सातारा जिल्हा काँग्रेसचा एक युवक कार्यकर्ता म्हणून काम केलेला मी १९४६ च्या निवडणुकीत एक उमेदवार म्हणून उभा राहिलो होतो.'' या निवडणुका जिंकून दक्षिण सातारा मतदार संघातून यशवंतराव निवडून आले. त्यावेळी 'मुंबई प्रांत' होता. गुजरात, विदर्भ, महाराष्ट्र आणि कर्नाटक अशी या प्रांतांची मर्यादा होती. यावेळी खरे मंत्रिमंडळात त्यांना पार्लमेंटरी सेक्रेटरीचे पद देण्यात आले. या निवडणुकीच्या संदर्भातील त्यांची आठवण पुढीलप्रमाणे, ''स्वातंत्र्याची चाहूल लागलेली ती निवडणूक होती. माझी स्वत:ची ती पहिलीच निवडणूक होती. आयुष्यात सगळ्यात पहिल्या गोष्टीचे महत्त्व असते. राजकारणातल्या माझ्यासारख्या व्यक्तीला पहिल्या निवडणुकीचे महत्त्वही असणारच.'' त्यांचे भाऊ गणपतराव व मित्रांचा आग्रह त्यांना टाळता आला नाही. ते उभे राहिले आणि यशस्वी झाले. जिल्ह्याच्या राजकारणातून महाराष्ट्राच्या राजकारणात सामील झाले.

१९४७ च्या ऑगस्टमध्ये स्वातंत्र्य मिळाले. पण सहा महिन्यांच्या आतच महात्मा गांधीजींची हत्या झाली. ब्राह्मणांविषयीची चीड आणि त्यातून निर्माण झालेला उद्रेक, जाळपोळ यांना तोंड देण्याचे काम गृहखात्याचे चिटणीस म्हणून चव्हाणांनाच करावे लागले. यावेळी त्यांनी आपले उत्तम कौशल्य दाखवले. ते म्हणतात, ''जेवढ्या

आकस्मिकपणे माझी पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून नियुक्ती झाली, तेवढीच ही गृहखात्याची नियुक्तीही ठरली.''

१९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुका महाराष्ट्रात मोठ्या चुरशीने लढविण्यात आल्या. मुंबई विधानसभेमध्ये कराड मतदारसंघातून ते विजयी झाले. मोरारजीभाई देसाई यांनी मंत्रिमंडळ बनविले. यशवंतरावांना नागरी पुरवठा, समाजकल्याण आणि वन ही खाती दिली. मोरारजींनी त्यांना भरघोस असा विश्वास दिला. पुरवठा खात्याचे काम पाहताना किडवाईंच्या मार्गदर्शनाचा त्यांना खूप उपयोग झाला. २ डिसेंबर १९५२ मध्ये त्यांनी नवे अन्नधान्य धोरण जाहीर केले. यशवंतरावांचे नेतृत्व आता चांगले विकसित झाले होते. अनेक प्रशासकीय गुणांनी ते तेजाळले होते. पुरोगामी ध्येयवादी नेता म्हणून त्यांचा उल्लेख होत होता.

१ नोव्हेंबर १९५६ ला द्वैभाषिक मुंबई राज्य निर्माण झाले. त्या द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाणांनी सत्ता हाती घेतली. एका संयमी नेत्याची मुख्यमंत्रीपदासाठी निवड झाली. पण हे पद कसोटी पाहणारे ठरले कारण यावेळी संयुक्त महाराष्ट्राचे भाषिक राज्य बनण्याची मागणी जोरात पुढे आली. महाराष्ट्रातील साहित्यकारांनी या कामी पुढाकार घेतला. जनआंदोलन निर्माण झाले. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाला उग्र स्वरूप प्राप्त झाले. १९४६ मध्येच बेळगावला श्री. ग.त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली बेळगावला जे साहित्य संमेलन भरले होते तेथे सर्व मराठी भाषिकांचा एक वेगळा प्रांत संयुक्त महाराष्ट्र बनवावा अशी मागणी केली होती. महाराष्ट्रभर या प्रश्नाने वातावरण तापत चालले होते. यशवंतराव म्हणतात, ''या काळातही मला निकरानं लढावं लागलं. काँग्रेस अंतर्गत आणि बाहेर ५५ ते ६० हा काळ मोठा चमत्कारिक अनुभवांचा आणि मनोवस्थेचा असा गेला. महाराष्ट्रात काँग्रेस स्थिर करणं, महाराष्ट्रातल्या जनतेचा राग विझवणं, गुजराती बंधूंचा संशय दूर करणं आणि केंद्रीय सत्तेचा विकास संपादन करणं असं चौफेर काम करायचं होतं. ते करीत होतो. ५५ ते ६० या काळात माझं पाच वर्षाचं आयुष्य कमी झालं इतका अनावर ताण पडला. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर होणाऱ्या महाराष्ट्रातील प्रचंड सभा, जनतेचा उठाव, त्यातून झालेला गोळीबार, ते सभा उधळणं, प्रतापगडाचा सामना - कितीतरी प्रसंग डोळ्यांपुढे उभे राहतात. घोडेस्वाराप्रमाणे उपाशी तापाशी मी धावत होतो.'' अशा पद्धतीने खवळलेल्या महाराष्ट्राच्या लोकमनाला आपल्या विचारसरणीने यशवंतराव तोंड देत होते. महाराष्ट्रातील माणसाला प्रश्नांचे गांभीर्य समजावून दिले तर तो उत्साहाने उठतो पण कर्तव्याची जाणीव करून दिली नाही तर तो पुन्हा झोपतो. असा मराठी माणसाचा स्वभावविशेष ठिकठिकाणी दाखवून देत होते.

बदलत्या काळाच्या प्रेरणा ते अचूकपणे ओळखू शकत होते. त्याचप्रमाणे बदलत्या काळाची आव्हानेही समर्थपणे स्वीकारत असत. म्हणूनच तर केंद्रीय नेत्यांचा विश्वास संपादन करून संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. विरोधी पक्ष्यांच्या नेत्याशी संयमाने आणि आदराने वागून लोकशाही मूल्यांचा नवीन आदर्श निर्माण केला. त्यामुळे त्यांचा सर्वसामान्यांपासून विचारवंतांपर्यंत सर्वांनी गौरव केला.

१ मे १९६० मध्ये स्वतंत्र मराठी भाषिक राज्याची स्थापना झाली. नवीन राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून त्यांचा शपथविधी झाला. यशवंतरावांचा महाराष्ट्रावर जो ठसा उमटला तो प्रत्येक क्षेत्रात चमकून उठल्याशिवाय राहिला नाही. मुख्यमंत्री म्हणून थोड्याच काळात त्यांनी अतुलनीय कामगिरी केली. एका खेड्यातल्या शेतकऱ्याचा मुलगा मुख्यमंत्री झाला याचा जनतेला आनंद झाला. नोव्हेंबर १९६२ मध्ये त्यावेळचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी मोठ्या विश्वासाने यशवंतरावांना केंद्रीय मंत्रिमंडळात आमंत्रित करून त्यांचा बहुमान केला. त्यांच्यावर संरक्षणमंत्रीपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. या घटनेचे वर्णन हिमालयाच्या संरक्षणासाठी महाराष्ट्राच्या सह्याद्रीला उत्तरेकडे धावून जावे लागले असे केले जाते. अशा पद्धतीने यशवंतरावांचे नेतृत्व अखिल भारतीय पातळीवर चमकू लागले. १९६२ मध्ये भारतावर चीनचे आक्रमण झाले होते. चीनच्या आक्रमणाने कोलमडलेल्या संरक्षणव्यवस्थेची पुनर्रचना त्यांना करावी लागणार होती. आणि यशवंतरावांनी हे आव्हान यशस्वी रीतीने पेलले. अभ्यास, आत्मविश्वास आणि आटोकाट परिश्रम या त्यांच्या अंगभूत गुणांनी ही जबाबदार नेत्याची भूमिका वठवली. ते म्हणतात, ''देशाची हाक आली आहे म्हणून मी जातो आहे. संरक्षणमंत्रीपदाची मोठी जागा चालून आली आहे म्हणून मी जातो आहे असे मात्र कृपा करून समजू नका. पण ही देशाची हाक आहे. देशाच्या नेत्याने मारलेली हाक आहे. त्याकरिता सैनिक म्हणून प्रसंग पडल्यास जान देईन या भावनेने मी तिकडे जात आहे.'' दिल्लीला जाण्यापूर्वी व आपल्या महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिपदाचा राजीनामा देण्यासाठी एक तास उरला असताना १९६२ च्या नोव्हेंबर महिन्यात मुंबईच्या चौपाटीवर जनसागरासमोर भाषण करताना त्यांनी अशा प्रकारे आपले हृद्‌गत व्यक्त केलं.

१४ नोव्हेंबर १९६६ मध्ये यशवंतरावांनी गृहमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारली. या काळात अनेक कठीण प्रसंग आले. त्यांच्या या गृहमंत्रिपदाच्या पहिल्या सहा महिन्यांच्या काळात नव्याने दहा राज्यपालांची नियुक्ती करण्यात आली. त्यांची गृहमंत्रीपदाची कारकीर्द उल्लेखनीय आहे. तसेच त्यांच्या गृहखात्याच्या कारभारामध्ये अनेक गुंतागुंतीचे

प्रश्न निर्माण झाले होते. तरीही या काळात गृहखात्याचा कारभार त्यांनी समर्थपणे हाताळला.

२६ जून १९७० ला त्यांची केंद्रीय अर्थमंत्री म्हणून नियुक्ती झाली. या काळात छोटे शेतकरी, शेतमजूर व बेकार तरुण यांचा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करू लागला होता. त्यांचे आर्थिक प्रश्न सोडवले नाहीत तर देशाच्या राजकीय स्थैर्याला देखील धोका निर्माण होण्याचा संभव होता. या नव्या अडचणीचे आव्हान स्वीकारून त्यांनी देशाच्या अर्थखात्याला योग्य ते वळण लावले. ''अर्थमंत्री या नात्याने बँकवाल्यांना त्यांनी समाजाभिमुख होण्याचा सल्ला दिला. परकीय मदतीचा नव्या दृष्टीने विचार केला, अनार्जित उत्पन्नाला वाव राहू नये आणि बहुसंख्य जनसामान्यांपर्यंत शासकीय कार्यक्रमाचे लाभ पोचावेत असे अंदाजपत्रक सादर केले. आर्थिक विकासाचा सांधा सामाजिक न्यायाशी जोडण्यावर विशेष भर दिला.'' तसेच बांगलादेशाच्या निर्वासितांच्या लोंढ्यांनाही अर्थमंत्री या नात्याने त्यांना तोंड द्यावे लागले. १९७४ मध्ये परराष्ट्र मंत्री म्हणून त्यांनी पदभार स्वीकारला. विविध देशांना त्यांनी भेटी दिल्या. पं. नेहरुंच्या अलिप्त धोरणाचा त्यांनी स्वीकार केला. अमेरिका, रशिया, पाक, चीन यांच्यामध्ये भारतीय राजनैतिक संबंध सुधारावेत व टिकावेत यासाठी त्यांनी प्रयत्न केला. हेही खाते समर्थपणे सांभाळून त्यांनी आपली प्रतिमा अधिक उज्ज्वल केली. क्युबा, लेबेनॉन, इजिप्त, पेरु, अमेरिका, अफगाणिस्तान, इराक, कुवेत, फ्रान्स इ. काही राष्ट्रांना त्यांनी भेटी दिल्या.

१९७७-७८ ला लोकसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून त्यांची निवड झाली. स्वातंत्र्यानंतरचे मान्यताप्राप्त विरोधी नेते म्हणून ते काम पाहू लागले. १५ जून १९७५ मध्ये इंदिरा गांधींनी आणीबाणी जाहीर केली. राष्ट्रपती फक्रुद्दिन अली अहंमद यांनी १५ जूनला वटहुकुम काढला व अनेक प्रकारचे निर्बंध जाहीर केले. या पार्श्वभूमीवर मार्च १९७७ मध्ये लोकसभेच्या निवडणुका झाल्या. काँग्रेस पक्षाचा पराभव झाला. जनता पक्ष सत्तेवर आला. त्यावेळी यशवंतरावांनी काँग्रेस पक्ष सोडला होता. संजीव रेड्डी काँग्रेसमध्ये ते दाखल झाले होते. १९७९ जुलैमध्ये चरणसिंग यांच्या संयुक्त मंत्रिमंडळात उपपंतप्रधान आणि गृहमंत्री म्हणून ते पद सांभाळत होते. २० ऑगस्ट १९७९ रोजी चरणसिंगांना राजीनामा देण्यास भाग पाडले गेले. २५ ऑगस्ट १९७९ रोजी लोकसभा विसर्जित झाली. १९८० मध्ये झालेल्या निवडणुकीत इंदिरा गांधी पुन्हा पंतप्रधान झाल्या. यशवंतराव त्यांच्या पक्षात नव्हते. १९८० मध्ये झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत सातारा मतदारसंघातून लोकसभेवर रेड्डी काँग्रेसचे महाराष्ट्रातील एकमेव विजयी उमेदवार म्हणून निवडून आले. कालांतराने पुन्हा १९८२

मध्ये इंदिरा काँग्रेसमध्ये त्यांनी प्रवेश केला. आणि आठव्या वित्त-आयोगाचे अध्यक्ष म्हणून काम केले. पण 'स्वगृही' परत आल्यावर त्यांच्या नेतृत्वात पूर्वीइतका उत्साह राहिला नव्हता. कारण इंदिरा गांधींच्या नव्या राजकारणात त्यांना फारसे स्थान नव्हते. ज्येष्ठ नेत्यांचा आदर वगैरे मूल्यांनी किंमत कमी होत गेली. या काळात यशवंतराव एकाकी पडले. शेवटचा राजकीय प्रवास त्यांच्या मनाला विषण्ण करणारा होता. त्यांच्या या कालखंडाबद्दल द्वा.भ. कर्णिक म्हणतात,''यशवंतरावांच्या एकंदर उज्ज्वल राष्ट्रीय जीवनाला गालबोट लावणाराच हा कालखंड होता असे आता प्रांजलपणे म्हणावयास हरकत नाही.'' या काळात यशवंतराव निस्तेज होऊ लागले आणि सत्तेच्या राजकारणात शेवटी अपयशी ठरले असे म्हणावे लागेल.

जवळपास ३० वर्षे यशवंतराव सत्तेवर होते. अनेक महत्त्वाची राजकीय पदे या काळात त्यांनी स्वीकारली. सत्तेवर नसतानाही त्यांच्या जीवनात फारसा बदल झाला नाही. पण १९७७ च्या काँग्रेस पराभवानंतर यशवंतरावजींच्या राजकीय जीवनाला जशी ओहोटी लागली तशीच त्यांच्या वैयक्तिक जीवनालाही लागली हे मात्र निश्चित. त्यांचे नेतृत्व तावून सुलाखून निघाले. त्यांची अंगभूत चिकाटी, व्यासंगी वृत्ती व कार्यनिष्ठा या गुणांच्या बळावर त्यांच्या नेतृत्वाची उभारणी होत गेली. गांधीवाद, साम्यवाद, मार्क्सवाद, सत्यशोधक चळवळ वगैरे विचारांचा, विचारसरणीचा सविस्तर व तौलनिक अभ्यास त्यांनी केला. वाचन, चिंतन, मनन आणि विचारविमर्श यामधूनच त्यांच्या राजकीय नेतृत्वउभारणीस दिशा मिळाली. राजकीय प्रेरणा हीच त्यांच्या जीवनातील सर्वात महत्त्वाची प्रेरणा होती. १९६२ ते १९८४ पर्यंतचा त्यांचा राजकीय जीवनातील सर्वात मोठा काळ राष्ट्रीय नेतृत्वात गेला. या काळात त्यांनी अनेक राजकीय पदे उपभोगली याचे एकमेव कारण आयुष्यभर ते ज्ञानाचे उपासक बनले. त्यामुळे राष्ट्रीय नेतृत्व तयार होण्यामध्ये त्यांच्या या गुणांचा मोठा उपयोग झाला.

असे हे नेतृत्व सामान्य माणसांतून, जनतेतून निर्माण झालेले होते आणि इतिहासाला नवीन वळण लावण्याचे सामर्थ्य या नेतृत्वात होते.

○ ○ ○

महाराष्ट्राच्या सहकार चळवळीचे वारकरी

महाराष्ट्राच्या सहकार चळवळीत कै. यशवंतराव चव्हाणांचे स्थान फार वरच्या दर्जाचे आहे. आपल्या राजसत्तेचा उपयोग त्यांनी वंचित अशा समाजात जागृती निर्माण करण्यासाठी केला. यामुळे सामान्य लोकांतही जागृती झाली. सत्तेचे विकेंद्रीकरण केले. सहकारी चळवळीला उत्तेजन दिले. ग्रामीण जीवनाचा कायापालट केला. माणसांचे कसब, गुण, कर्तृत्व याविषयी यशवंतरावांना अतिशय आस्था होती. तसेच समाजातल्या गोरगरीब, रंजल्या-गांजल्यांबद्दल त्यांचे मनही अवाढव्य होते. त्यामुळे समाजातील गुणी, कर्तृत्ववान जनतेस त्यांचा आधार होता. सत्ताधारी हा असा असावा लागतो. आज दुर्दैवाने भ्रष्टाचार सर्वत्र सरकारच्या आणि सहकाराच्या अनेक खात्यांतून व संस्थांतून दिसून येतो आहे. सत्ताधारी हा असा असावा लागतो. गांजलेल्यांना, पीडितांना तो अपील कोर्टासारखा वाटावा आणि कर्तृत्ववानांना त्याचा आधार वाटावा. यशवंतराव हे तसे होते म्हणून ते जनतेचे मार्गदर्शक केंद्रबिंदू बनले. लोहचुंबकाकडे लोखंडाचे कण धाव घेतात, त्याप्रमाणे लोक त्यांच्याकडे धाव घेत. यशवंतराव हे केवळ वारसा हक्काने नेते बनले नव्हते, तर लोकांचे लोकनेते होते. अशा वेळी यशवंतराव चव्हाणांचे सहकारी चळवळीविषयीचे विचार एखाद्या दीपगृहाप्रमाणे सर्व समाजाला मार्गदर्शक ठरतील.

यशवंतरावांचा जन्म सामान्य कुटुंबात झाला असला तरी आपल्या स्वकर्तृत्वाच्या बळावर व बौद्धिक सामर्थ्याच्या जोरावर त्यांनी राजकीय जीवनात विविध पदांवर काम केले. अगदी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदापासून ते देशाच्या उपपंतप्रधानांपर्यंत त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा वेगळ्या कार्यपद्धतीचा ठसा उमटविला. यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व अष्टपैलू होते. राजकारणाच्या क्षेत्रात राहून त्यांनी आपले अनेक छंद जोपासले. मराठी मुलखामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, बाळ गंगाधर

टिळकांनंतर यशवंतराव चव्हाणांच्या व्यक्तिमत्त्वाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. माणसाला व्यक्तिमत्त्व लाभतं पण विभूतीमहत्त्व लाभायला फार मोठी पुण्याई लागते. व्यक्तीचं कर्तृत्व जेव्हा बौद्धिक चिकित्सेच्या पलीकडे जाते तेव्हा ती विभूती होते. यशवंतरावांनीसुद्धा आपल्या तेजस्वी कार्यकर्तृत्वाने स्वत:चे श्रेष्ठत्व सिद्ध करून दाखविले. रूढ अर्थाने कोणत्याही प्रकारची अनुकूल पार्श्वभूमी व वातावरण नसतानाही केवळ असामान्य कलागुण, अखंड खडतर मेहनत यामुळेच ते लोकनेते व राज्यकर्ते बनले. महाराष्ट्राच्या राजकीय व सहकार क्षेत्रात त्यांचे कार्य इतके व्यापक व सर्वस्पर्शी आहे की, आज जे प्रगत महाराष्ट्राचे चित्र आपण पाहतो, अनुभवतो ते उभे करण्याचे योगदान यशवंतरावांचे फार मोठे आहे. त्यांचे हे ऋण कधीही न फिटण्याइतके मोठे आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व कृषी औद्योगिक सहकार परिवर्तनाचा नवा दृष्टिकोन त्यांनी जनतेसमोर ठेवला. ग्रामीण भागाचा कायापालट केला. कष्टकरी आणि कामगार माणसाला माणूस म्हणून विकासाच्या नव्या वाटेवर स्वबळावर उभे करण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच त्यांच्या हयातीत लोकांचे प्रेम लाभले. आजही अलोट प्रेम त्यांच्याबद्दल आहे. श्रमाइतके व घामाइतके जगामध्ये काही सुंदर नाही, अशी त्यांची ठाम भूमिका होती. श्रमिकाविषयी म्हणूनच त्यांना फार मोठा जिव्हाळा व जवळीक वाटत होती.

सहकारी प्रणालीच्या माध्यमातून महाराष्ट्रात औद्योगिक प्रगती झाली. साखर कारखाने, सूत गिरण्या, कापड कारखाने, तेल गाळणे, फळ प्रक्रिया इत्यादी उद्योगधंद्यांची निर्मिती सहकारी तत्त्वांवर झाली. हजारो सर्वसामान्य व्यक्तींनी आपले भांडवल व श्रम संघटीत केले आणि उद्योगधंद्याला चालना मिळू लागली. त्यामुळे शेतीप्रधान महाराष्ट्राचे रूपांतर औद्योगिक महाराष्ट्रात होण्यास सहकाराने मोलाची कामगिरी बजावली. महाराष्ट्राची ही सहकारी चळवळ देशात सर्वात आघाडीवर आहे. ही चळवळ अग्रेसर असण्याचे श्रेय प्रामुख्याने या चळवळीला लाभलेल्या नि:स्पृह आणि थोर नेतृत्वास द्यावे लागेल. या चळवळीतील कै. लल्लूभाई सामळदास, कै. वैकुंठ मेहता, कै. डी. जी. कर्वे, कै. भास्करराव जाधव, कै. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील, कै. धनंजयराव गाडगीळ, कै. यशवंतराव चव्हाण, कै. वसंतदादा पाटील, कै. गुलाबराव पाटील यांच्या थोर नेतृत्वाची परंपरा असलेल्या विचारवंतांना द्यावे लागेल. या विचारवंतांनी सहकारी सूत गिरण्या, सहकारी सोसायट्या, सहकार खरेदी-विक्री संघ, सहकारी बाजार समित्या, सहकारी बँका यांसारख्या सहकारी संस्थांचे जाळे विणून सहकारी चळवळ नावारूपाला आणली. या चळवळीला खरी दिशा दिली ती

कै. यशवंतराव चव्हाण यांनी.

छत्रपती शिवरायांच्या कल्याणकारी राज्याची कल्पना हाच आपल्या नव-महाराष्ट्राच्या निर्मितीमागील उद्दिष्ट असल्याचे यशवंतरावांनी वारंवार सांगितले आहे. ते म्हणतात, 'कल्याणकारी राज्यात जोपर्यंत शिक्षण, सहकार, शेती व आरोग्य या चार खात्यांच्या कामांना प्राधान्य आणि महत्त्व मिळत नाही, तोपर्यंत ते खरे लोककल्याणकारी राज्य झाले असे म्हणता येणार नाही.' असे विचार त्यांनी विदर्भ विभागातील जिल्हा अधिकाऱ्यांच्या परिषदेसमोर मांडले होते. ग्रामीण भागात सहकाराच्या माध्यमातून नवचैतन्य निर्माण झाले पाहिजे, अशी त्यांची अपेक्षा होती. तसेच सहकाराच्या माध्यमातून विकासाची कामे ग्रामीण भागात हाती घेणे महत्त्वाचे आहे, ग्रामीण भागात नवचैतन्य निर्माण करून लोकशाही पूरक असे नवे नेतृत्व निर्माण झाले पाहिजे, सहकाराच्या माध्यमातून नव्या सुधारणा देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचल्या पाहिजेत, असे ते वारंवार सांगत असत.

आपली भरभराट शेतीवर अवलंबून आहेच. एवढेच नव्हे तर आपले औद्योगिकी-करणही शेतीच्या भरभराटीवरच अवलंबून असल्याचे ते सांगत. म्हणून ते सहकारी पद्धतीने शेती करावी, असा विचार बोलून दाखवीत. एवढेच नव्हे तर शेतीला उद्योगाची जोड देऊन कृषी उद्योग निर्माण करण्याचा सल्ला त्यांनी ७ ऑक्टोबर १९६० रोजी महाबळेश्वर येथे काँग्रेस कार्यकर्त्यांच्या समोर दिला आहे. अशा सहकारी चळवळी जनतेच्या प्रयत्नांवर उभ्या राहतात. शेतकऱ्याला सहकारातून कर्जपुरवठा करता आला, त्याच्या शेतमालावर प्रक्रिया करणारे कारखाने सुरू करता आले, तर त्याची आर्थिक दुरावस्था दूर करता येईल. सहकारात उद्धाराची शक्ती आहे म्हणूनच त्यांनी मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीत सहकारी कारखानदारीला प्रोत्साहन व उत्तेजन दिले, आर्थिक सहाय्य केले. शेतकऱ्यांना कारखानदार बनविले. सामाजिक हिताची जाणीव ठेवून आणि सामाजिक बांधिलकी मानून चव्हाणांनी हे कार्य केले. महाराष्ट्रातील औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या अविकसित, ग्रामीण भागापर्यंत ही सहकार चळवळ पोहोचविण्याचे काम त्यांनी केले. महाराष्ट्रात लाखो सहकारी संस्था आज उभारल्या गेल्या. या सहकारी संस्थांनी लोकांचा मोठ्या प्रमाणावर विश्वास संपादन केल्याचे यातून स्पष्ट होते.

महाराष्ट्रात सहकारी चळवळीची वाढ मुख्यत: १९५७-५८ नंतरच मोठ्या प्रमाणावर झाली आणि याच काळात महाराष्ट्राचे राजकीय नेतृत्व यशवंतराव चव्हाण यांच्याकडे होते. त्यामुळे सहकारी चळवळीच्या वाढीत व विकासात त्यांचा वाटा महत्त्वाचा आहे. सहकार चळवळ ही जनतेची चळवळ व्हावी अशी त्यांची अपेक्षा

होती. तसे त्यांनी मार्गदर्शनही केले. ही सहकारी चळवळ सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचली नाही, तर तेथील 'हरित क्रांती' ही 'लाल क्रांती' होईल, असा इशाराही त्यांनी दिला होता. सहकार चळवळीच्या वाटचालीत त्यांचे विचार या चळवळीच्या नेतृत्वाला सागरातील दीपगृहाप्रमाणे मार्गदर्शक ठरलेले आहेत, असे डॉ. मा. प. मंगुडकर या ज्येष्ठ विचारवंताने यशवंतरावांच्या सहकारी चळवळीविषयी मत मांडले आहे.

सहकारात समाजवाद निर्माण होईल, अशी त्यांची धारणा होती. त्यासाठी महाराष्ट्रात सहकारी चळवळीला चालना दिली. शेतीसाठी कर्जपुरवठा करणे, उत्पादित शेतमालाची विक्री करणे, शेती विकास, शेती मालावर प्रक्रिया, दुग्ध उत्पादन, कुक्कुट पालन इत्यादी सहकारी संस्थांना त्यांनी चालना दिली. या सहकारी संस्थांना कर्ज पुरवठ्याची सोय सहकारी बँक, भूविकास बँकांच्या मार्फत करण्यात येऊ लागली. त्यांच्या सरकारनेच महाराष्ट्रात त्यावेळी १८ सहकारी साखर कारखान्यांची प्रथम नोंद करून सहकारात नवा विक्रम केला. आज महाराष्ट्रात १३० पेक्षा अधिक साखर कारखाने आहेत. हे यशवंतरावांच्या दूरदृष्टीपणाचे द्योतक आहे. सहकारी चळवळीमध्ये महाराष्ट्राचा विकास झाला. खेड्यापाड्यातील सामान्य माणसांचे आर्थिक जीवन बदलून गेले. १९६० साली सहकारी चळवळीला कलाटणी देणारे एक विधेयक यशवंतराव मुख्यमंत्री असताना नागपूरच्या विधानसभेच्या अधिवेशनात मांडले आणि ते संमत करून घेतले. या विधेयकामुळे सहकारी चळवळीच्या आधीच्या काळातील इतिहासाला वेगळी कलाटणी मिळाली. तसेच आर्थिक विकासाचा पाया भक्कम करण्याची तरतूदही त्यामध्ये होती असे हे विधेयक महाराष्ट्रात प्रथम पास झाले. त्याचे श्रेय यशवंतरावांनाच द्यावे लागेल.

या सहकारी कारखान्यामुळे ग्रामीण भागाचे चित्र बदललेच. शिवाय खेडेगावातील लाखो लोकांना या कारखान्यामध्ये रोजगार मिळाला. हे साखर कारखाने आता साखर कारखाने राहिले नाहीत तर ते त्या त्या भागाच्या सामाजिक, आर्थिक परिवर्तनाची केंद्रे बनली आहेत. म्हणून सहकारी चळवळ ही महाराष्ट्रात इतर प्रांतांच्या मानाने दृष्ट लागावी अशीच आहे. दुर्बलांना सामर्थ्य देण्याकरिता सहकारी चळवळीचा जन्म झालेला आहे. यामुळे प्रेरणेकडे दुर्लक्ष होणार नाही, याची काळजी घेण्याची गरज आहे. असा सल्लाही दिला आहे. विकासाची ही प्रक्रिया तळाच्या माणसांपर्यंत पोहोचवायची असेल तर विकासाची संघटना व सत्ता जनतेच्या शेवटच्या स्तरापर्यंत पोहोचली पाहिजे, असे त्यांना वाटत होते.

महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती करायची असेल, तर शिक्षणाचा प्रसार होऊन जनता

शहाणी व समजूतदार झाल्याशिवाय सहकारी चळवळीचा पाया भक्कम होणार नाही. शिवाय सतत कष्ट करण्याची आवड पाहिजे. म्हणजे श्रमावर भक्ती आणि निष्ठा पाहिजे. तरुण माणसाने नेहमी आव्हानांच्या शोधात असावे. धैर्य शाबूत ठेवावे आणि समोर काही ध्येये ठेवावी. संकटाचीसुद्धा चव घ्यावी लागते, असा सल्ला त्यांनी तरुण पिढीला देऊन जीवनातील वास्तवतेस निर्भयपणे सामोरे जाण्याचा मार्ग ते सांगतात. यशवंतरावांना सत्तेचा मोह नव्हता. पण विचारांचा मात्र जरूर होता. आपल्या बुद्धीच्या जोरावर या सहकारी चळवळीतील संभाव्य धोका देखील ते सूचित करतात, 'सहकार चळवळीत आर्थिक सत्ता आहे, याची जाणीव लोकांत आणि त्याचप्रमाणे सहकारी कार्यकर्त्यांत निर्माण झाली आहे. ही चळवळ एका अर्थाने सत्तेचे केंद्र आहे आणि सत्तेचे केंद्र म्हटले म्हणजे लोकशाहीचा अंकुश त्यावर ठेवलाच पाहिजे. तसे न केल्यास अनियंत्रित सत्तेमुळे विकासाचे हे शस्त्र दुधारी ठरेल, अशी मला साधार भीती वाटते,' असे चिंतनही ते व्यक्त करतात. सहकारी चळवळ ही मूलत: जनतेच्या स्वत:च्या प्रयत्नांवर आधारलेली असली तरी सरकारनेही त्यावर अंकुश ठेवला पाहिजे. उद्योगधंद्याची वाढ करून रोजगारी वाढवीत असताना सामाजिक न्यायाकडे दुर्लक्ष होता कामा नये. यशवंतरावांनी त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात शुद्ध शासनाची हमी दिली होती. ग्रामपंचायती, सहकारी संस्था, इतर सामाजिक स्वराज्य संस्था, अधिकाऱ्यांचे विकेंद्रीकरण यांना चालना दिली.

शेती हा महाराष्ट्रीयन लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. तो ग्रामीण विकासाचा गाभा आहे. या गाभ्याभोवती छोट्या उद्योगधंद्यांची इमारत उभारली पाहिजे. ही महाराष्ट्राच्या भूमीवर या उद्योगांचे भव्य मंदिर उभारण्यासाठी शासनाचे मार्गदर्शन, मदत आणि उत्तेजन असायला हवे. सामान्य माणसांचे अर्थशास्त्र सहकाराशिवाय सुटणार नाही.

चव्हाण साहेबांच्या जाणीवपूर्वक प्रयत्नांतून महाराष्ट्रामध्ये सहकारी चळवळीने नेत्रदीपक प्रगती केली. या नेत्याच्या विचाराप्रमाणे सहकारी संस्था या व्यावसायिक संघटना असल्या तरी सामाजिक बांधिलकी व समाज परिवर्तनाचे अंतिम उद्दिष्ट त्यांच्यासमोर होते, हे विसरता येणार नाही आणि म्हणून इतर कोणत्याही अर्थ-व्यवस्थेपेक्षा सर्वसामान्यांची हित जपणारी व जोपासणारी अर्थनीती म्हणून सहकारी चळवळीला त्यांनी प्राधान्य दिले. यशवंतरावांनी सहकाराशिवाय एकही साखर कारखाना महाराष्ट्रात काढायचा नाही, असा निर्णय घेतला. म्हणून तर आज कोट्यवधी रुपये भांडवली गुंतवणुकीचे साखर कारखाने शेतकऱ्यांच्या मालकीचे म्हणून उभे आहेत.

ग्रामीण भागात सहकाराच्या माध्यमातून उद्योगधंद्यांची उभारणी करण्यासाठी औद्योगिक वसाहती स्थापन केल्या. वीज, पाणीपुरवठा वगैरे सोयी उपलब्ध करून दिल्या. विजेवर चालणारे अनेक उद्योग प्रत्येक विभाग सुरू करण्यासाठी त्यांनी प्रोत्साहन दिले. महाराष्ट्रात विकास औद्योगिक महामंडळाची निर्मिती झाली. यामुळे तालुका पातळीपासून ते ग्रामीण भागापर्यंत उद्योगाचे विकेंद्रीकरण झाले. यामुळे शहराकडे धाव घेणारा कामगारांचा लोंढा थांबविण्यास निश्चितच या सहकारी उद्योगधंद्यामुळे उपयोग झाला. ग्रामीण भागात सहकारी तत्त्वामुळे शेतीच्या क्षेत्रात शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योगधंदे काढणे औद्योगिक विकासाची १९६१ मध्ये यशवंतरावांनी दाखविलेली दिशा आज चांगलीच रुळल्याचे आपल्या निदर्शनास येते.

यशवंतराव चव्हाणांनी बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह लॅण्ड मॉर्गेज बँकेच्या रौप्य-महोत्सवी प्रसंगी केलेल्या भाषणामध्ये आपले विचार व्यक्त करताना म्हणतात, 'सहकारी चळवळ ही काही एखाद्या पक्षाची चळवळ नव्हे. तात्त्विकदृष्ट्या सहकारी चळवळ ही मूलत: लोकशाही चळवळ आहे. हे आपण विसरता कामा नये. या चळवळीमागील हा दृष्टिकोन आपण नीट समजावून घेतला पाहिजे आणि लोकशाहीचे हे स्वरूप कोठेही डागाळणार नाही, अशी आपण काळजी घेतली पाहिजे.' यशवंतरावांची लोकशाहीवरील निष्ठा ही सजग आणि अविचल होती. हे त्यांच्या या विचारांतून स्पष्ट होते.

○ ○ ○

शैलीकार सह्याद्री

श्री. यशवंतराव चव्हाण यांना राजकारण, समाजकारणाइतकीच साहित्याविषयी ओढ होती. ललित साहित्य आणि वैचारिक वाङ्मय यांच्या वाचनाने त्यांची अभिरुची, रसिकता आणि बहुश्रुतता असे सर्व गुण वृद्धिंगत झाले होते. त्यांची वाणी आणि लेखणी प्रभावी होती. तसेच ते स्वत: एक सर्जनशील कलावंत व उत्तम समीक्षक होते. साहित्याच्या क्षेत्रात माझी भूमिका नम्र, रसिक वाचकाची आहे असे ते आवर्जून सांगतात. त्यांचा मूळ पिंडच प्रतिभावंताचा होता. आपल्या मायबोलीवर त्यांचा खूप जीव होता. कृष्णा कोयनेच्या प्रीती संगमाजवळचा भाग सांस्कृतिक दृष्ट्या समृद्ध असलेला परिसर त्यांच्यातल्या सर्जनशील उर्मींना खतपाणी घालणारा ठरला. या परिसरात त्यांच्या मनात निसर्गसौंदर्याची ओढ रुजली. यातूनच त्यांच्या विविध साहित्यकृती निर्माण झाल्या. त्यांच्या 'सह्याद्रीचे वारे', 'युगांतर', 'ऋणानुबंध', 'कृष्णाकाठ', 'भूमिका', 'शिवनेरीचे नौबती', 'यशवंतराव चव्हाण शब्दांचे सामर्थ्य', 'विदेश दर्शन' इ. काही निवडक कलाकृतींच्या माध्यमातून त्यांची साहित्यिक जाण लक्षात येते. तसेच त्यांच्या या पुस्तकांद्वारे काही प्रवास चिंतने, चरित्रलेख, वैचारिक लेख इ. च्या आधारे यशवंतरावांच्या लेखनातील साहित्यधर्माचे चिकित्सक विवेचन करायचे आहे.

यशवंतरावांच्या एकूण साहित्याचे स्वरूप पाहता त्यामध्ये विविधता आढळते. त्यांच्या साहित्याचे वर्गीकरण करावयाचे झाल्यास ते असे करता येईल. 'कृष्णाकाठ' हे यशवंतरावांचे आत्मचरित्र. 'ऋणानुबंध' हा त्यांचा आत्मपर लेखांचा संग्रह आहे. 'विदेश दर्शन' हे संपादित पुस्तक प्रवासवर्णनपर आहे. तसेच 'यशवंतराव चव्हाण-शब्दांचे सामर्थ्य' या संपादित पुस्तकामध्ये व्यक्तिचित्रण, आत्मकथनात्मक लेखन व वैचारिक चिंतन, साहित्यविषयक विचार यांसारख्या विषयाला स्पर्श करणारे लेखन समाविष्ट आहे. त्यामुळे वरील सर्व पुस्तकांतील लेखन ललित वाङ्मयामध्ये समाविष्ट

करता येईल. या लेखनामध्ये यशवंतरावांचे अंतरंग, त्या आधारे फुलत जाणारे त्यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व स्पष्ट जाणवते. तसेच स्वत:च्या मनाचे, जीवनाचे आणि स्वत:भोवती असलेल्या विश्वाचे अंतर्मुख दृष्टीने त्यांनी निरीक्षण केले. त्यामुळे त्यातूनच यशवंतरावांची कल्पकता, अंगी असणारी संवेदनक्षमता व सहानुभूती दिसून येते. याचबरोबर छोट्या मोठ्या अनुभवांशी तादात्म्य पावून त्यांच्याकडे तटस्थ वृत्तीने पाहण्याची सवय व चिंतनशील वृत्तीने जीवनातील विविध व परस्परविरोधी अनुभवांचा अर्थ लावण्याचे सामर्थ्य यांचे दर्शन घडते. हाच त्यांच्या ललित लेखनाचा गाभा आहे.

यशवंतरावांच्या वैचारिक लेखनामध्ये विविध प्रसंगी केलेल्या भाषणांचा उल्लेख करावा लागेल. ही त्यांची भाषणे वैचारिकदृष्ट्या महत्त्वाची आहेत. शिवाय साहित्यिक दृष्ट्याही त्याचे मोल महत्त्वाचे आहे. 'शिवनेरीचे नौबती', संपादित 'सह्याद्रीचे वारे', 'युगांतर', आणि 'भूमिका' हे त्यांचे भाषणांचे संग्रह होत. स्वातंत्र्योत्तर काळात यशवंतरावांच्या या वैचारिक साहित्याने समाजमनात या वाङ्मयाबाबत प्रतिष्ठा निर्माण करण्याचे काम केले आहे. यामध्ये राजनीती, सामाजिक संस्था, धर्म व अर्थ यांसारख्या जीवनविषयक प्रश्नांवर त्यांनी स्वतंत्र रीतीने व्यासंगपूर्ण विचार मांडले आहेत. अलीकडच्या काळात वैचारिक लेखन अथवा विचार दुर्लक्षित होत असताना यशवंतरावांसारखी एखादी व्यक्ती वैचारिक साहित्यात स्वयंतेजाने झळकताना दिसते. वैचारिक साहित्याला आवश्यक असणारी चिंतनशीलता, व्यासंग, जीवनदृष्टी व नवनवीन आव्हाने पेलण्याची कुवत त्यांच्याकडे होती. म्हणूनच नानाविध विषयांवर सामाजिक, सांस्कृतिक प्रश्नांवर त्यांनी उपरोक्त पुस्तकांमध्ये लेखन व विवेचन केले आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात निबंधाच्या माध्यमातून अनेक लेखक, विचारवंतांनी सामाजिक, राजकीय व धार्मिक प्रश्नांची चर्चा केली. एखाद्या प्रश्नाची विविध पातळीवर चिकित्सा करण्यासाठी या वाङ्मयप्रकाराचा उपयोग केला गेला. लोकहितवादी, म.फुले, वि. कृ. चिपळूणकर, स्वा.सावरकर, श्री.म.माटे इत्यादींपासून ते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, ना.ग. गोरे, दि.के.बेडेकर, गं.बा. सरदार, ग.प्र.प्रधान, डॉ. आंबेडकर व यशवंतराव चव्हाण यांनी ही परंपरा समृद्ध केली.

यशवंतरावांच्या या भाषणरूपी विचारातून निबंधाचा एक नवीन घाट प्रतीत होतो. त्यातूनच वैचारिक गद्य निर्माण झाले. यशवंतरावांकडे असलेली सामाजिक जाणीव व ध्येयदृष्टी यामुळे त्यांचा स्वत:चा असा एक ठसा या वाङ्मयात निर्माण झाला आहे. या साहित्यातून त्यांनी नवी उर्मी, नवा विचार व नवा दृष्टिकोन देण्याचा प्रयत्न केला

आहे. बदलत्या जीवनाचे बदलते संदर्भ, बदलत्या समस्या यांचा वेध घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. यासाठी लेखणी व वाणी ही दोन्ही साधने त्यांनी अखंड राबविली. त्यातून प्रबोधनाचे काम केले. त्यांच्या विचारांचे सामर्थ्य बुद्धिनिष्ठ व समाजनिष्ठ होते. त्यामुळेच विविध विषयांवर लेखन करणारा हा लेखक समाजातल्या अनेक प्रश्नांचा मागोवा घेत राहिला. यशवंतरावांच्या या वैचारिक भाषणांना व लेखनाला निबंधाचा दर्जा प्राप्त झाला आहे. या साहित्याचे स्थूलमानाने विषयानुसार वर्गीकरण करावयाचे आहे. यशवंतरावांनी विविध विषयांना स्पर्श करून निश्चित अशी मते मांडली आहेत. साहित्याच्या दृष्टीने त्यांच्या भाषणांचे संकलित ग्रंथ हा अनमोल ठेवा होता.

यशवंतरावांच्या साहित्याचे स्वरूप व भूमिका

जीवन आणि साहित्य यांचा परस्परसंबंध असल्याने साहित्यात जीवनाचे प्रतिबिंब दिसते, तर काही वेळा साहित्याचा जीवनावर परिणाम होतो. साहित्यात मानवी अनुभवांचे प्रतिबिंब पडलेले असते. कोणत्याही साहित्याच्या निर्मितीची बीजे जीवनातील वास्तवात असतात. मानवी मनाच्या घडणीमध्ये साहित्याचा वाटा असतो. एवढेच नाही तर समाज आणि संस्कृती यांच्या जडणघडणीमध्येही साहित्याचा वाटा असतो. याचे कारण असे की साहित्याचा निर्माता असलेला लेखक हा स्वत:च समाजाचा एक घटक असतो. प्रत्येक व्यक्तीची विचार करण्याची, विचार व्यक्त करण्यांची एक स्वतंत्र शैली असते. त्यामुळेच त्यांचे अनुभव व्यक्त होताना लेखक म्हणून त्यांची स्वत:ची एक स्वतंत्र शैली निर्माण होत असते. लेखकाच्या मनावर होणाऱ्या परिणामाचे स्वरूप जसे बदलत जाईल तसे साहित्याचे स्वरूपही बदलत जाते. म्हणून इतरांप्रमाणेच समाजातील वैशिष्ट्यपूर्ण परिस्थितीचा, परिवर्तनाचा, बदलाचा किंवा साचलेपणाचाही परिणाम त्यांच्यावर होत असतो. अशा नानाविध अभिव्यक्तीच्या प्रकारांतून साहित्याला विविध घाट प्राप्त होतात. परिणामत: प्रत्यक्ष जीवनातील स्थितिगतीचे प्रतिबिंब त्याने निर्माण केलेल्या साहित्यात उमटते. लेखकाच्या मनात उठणारी वलये, विचारवलये तो त्याच्या परीने साहित्यात नोंदवत असतो. याला यशवंतराव चव्हाणांचे साहित्यही अपवाद असण्याचे कारण नाही.

आपल्या आयुष्यातील घटनांचे आविष्कार वास्तवाच्या पातळीवरून अभिव्यक्त करण्याच्या हेतूनेच यशवंतरावांची साहित्यनिर्मिती किंवा वाङ्मयनिर्मिती झाली आहे. आजचा सर्वसामान्य माणूस काहीसा आत्मलक्षी बनत चालला आहे. आपल्या अस्तित्वाविषयी तो जागरूक आहे. स्वत:विषयी, स्वकालाविषयी, स्वकालीन वातावरणाविषयी सतर्क असणारी यशवंतरावांसारखी व्यक्ती निश्चितच लेखन करते.

प्रत्यक्ष जीवनात निर्माण होणाऱ्या समस्यांच्या अनुरोधाने ज्या चळवळी निर्माण होतात त्याचा आणि साहित्याचा जवळचा संबंध असतो. वाङ्मयीन निर्मिती ही राजकीय क्रांतीच्या प्रभावापासून अलिप्त राहू शकत नाही. आपल्या देशातही राजकीय स्वातंत्र्याचे आंदोलन प्रदीर्घकाळ चालू होते. पाश्चिमात्य संस्कृतीच्या अनुकरणाने भारतीय साहित्य संस्कृतीची परंपरा नव्याने तपासून घेण्याची गरज निर्माण झाली. सांस्कृतिक प्रबोधनाची ही चळवळ क्रांतिकारक होती. या चळवळीतून सामाजिक, धार्मिक सुधारणांचा जन्म झाला आणि आधुनिक भारतातील साहित्य या सुधारणावादी प्रयत्नांनी अर्थातच प्रभावित झाले.

साहित्यकृती ही आपल्या काळाशी संवाद करत असतानाच सर्वकालीन बनण्याची धडपड करीत असते. कोणतीही साहित्यकृती विशिष्ट काळात, विशिष्ट परिस्थितीत व विशिष्ट संदर्भात जन्म घेत असते. त्या त्या काळाच्या गरजा, वैशिष्ट्ये व अपेक्षा यांनी तिला घाट दिलेला असतो. म्हणून यशवंतरावकालीन त्यांच्या साहित्यकृतीच्या आस्वादाच्या, आकलनाच्या आणि मूल्यमापनाच्या संदर्भात तत्कालीन परिस्थितीचा, त्या काळाचा परामर्श घेणे अगत्याचे ठरते. त्या त्या काळातील वैचारिक व भावनात्मक वातावरणातून लेखकाचे व्यक्तिमत्त्व बनत असते. महाराष्ट्रात वेळोवेळी निर्माण झालेल्या वैचारिक आंदोलनांचा, सामाजिक सुधारणांच्या चळवळीचा, स्वातंत्र्य-लढ्याचाही परिणाम मराठी साहित्यात झालेला दिसून येतो. स्वातंत्र्यकाळापर्यंतचे मराठी साहित्य मध्यमवर्गीयांच्या चौकटीतूनच वावरणारे होते. पण स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्यक्षेत्रात विविध स्तरांतून लेखन करणारी मंडळी आली. मध्यमवर्गीयांच्या आकलनाबाहेरील कक्षेचे वास्तव साहित्यातून मांडू लागली. त्यातूनच ग्रामीण, दलित, समकालीन, अत्याधुनिक , जन, स्त्रीवादी असे कितीतरी साहित्याचे नवप्रवाह उदयास आले. या प्रवाहातील लेखकांनी सामाजिक बांधीलकी स्वीकारली. नवे नवे लेखक, नवे नवे आशय घेऊन लेखन करू लागले. समाज, इतिहास, राजकारण, मानसशास्त्र आदी विषयांना स्पर्श करणारे साहित्य समाजासमोर येऊ लागले.

यशवंतरावांचे साहित्य हे आपल्या काळाशी आणि त्या काळातील परिस्थितीशी जवळचे नाते सांगणारे आहे. त्या काळात घडलेल्या घटनांचे पडसाद त्यांच्या साहित्यातून उमटतात. यशवंतरावांच्या काळातील व्यक्तीच्या इच्छा, प्रयत्न, असहायता, पराभव, वेदना, विद्रोह, स्वप्ने इत्यादींच्या प्रामाणिक आविष्कार त्यांच्या लेखनातून झालेला दिसतो. त्यामुळे यशवंतरावांचे साहित्य हे समकालीन साहित्यात समाविष्ट होते. मराठीतील इ.स. १९४५ ते इ.स. १९६० आणि इ.स. १९६० ते इ.स. १९८५ या कालखंडातील साहित्याला साधारणत: समकालीन साहित्य म्हटले जाते. समकालीन

साहित्य म्हणजे जे साहित्य आपल्या काळाबरोबर आहे. ज्या काळात ते निर्माण होत असते, त्या काळाचे प्रतिबिंब त्यात उमटत असते. म्हणजेच त्या काळातील विचार, जाणिवा, मते त्या साहित्यातून व्यक्त होत असतात. समकालीन साहित्यामध्ये त्या विशिष्ट काळातील समस्या, प्रश्न, ताण, अंतर्विरोध यांचा समावेश होतो. यशवंतरावांच्या समकालीन साहित्यामध्ये तात्कालिकतेचा संदर्भ आहे आणि मनुष्याला तात्कालिक संदर्भ महत्त्वाचे वाटतात. यशवंतरावांनीसुद्धा आपल्या साहित्यामध्ये तत्कालीन काही प्रश्न, सनातन समस्या, मानवाची स्थिती, मानवाची नीती या विषयीचे विचार मांडले आहेत. यशवंतरावांच्या या समकालीन साहित्यात मानवी स्थितिगतीचे पडसाद उमटले आहेत. स्वतंत्र भारतातील राजकीय, सामाजिक, आर्थिक पातळीवरील विविध लढ्यांशी असलेली बांधीलकी त्यांच्या साहित्यातून आढळते.त्यांच्या लेखनातून व भाषणांतून तात्कालिक आणि व्यापक असे दोन्ही प्रकारचे संदर्भ आलेले आहेत. समकालीन लेखनात वास्तवाचे समग्र आणि आधुनिक दृष्टिकोनातून चित्रण केलेले असावे अशी अपेक्षा असते. नेमके तसेच लेखन आणि साहित्य निर्मिती त्यांनी केली आहे. आधुनिक दृष्टिकोन ठेवून त्यांनी समकालीन साहित्य निर्मिती केली आहे.

यशवंतरावांना सभोवतालच्या सामाजिक व राजकीय वास्तवाचे भान होते. त्यांची दृष्टी चौफेर होती, समाजाविषयी आणि राजकारणाविषयी त्यांना कुतूहल होते. त्याचबरोबर समाजातील विविध स्तरांतील माणसा-माणसांच्या परस्परातील संबंधांबद्दल त्यांना एक प्रकारची जिज्ञासा होती. त्यामुळेच त्यांचे साहित्य हे विविध स्तरांच्या समाजचित्रणामध्ये रस घेताना दिसून येते. त्यांचे साहित्य सामाजिक समस्याप्रधान अथवा राजकीय समस्याप्रधान असले तरी ते प्रचारकी थाटाचे नाही. सामाजिक वास्तव, दलित जीवन, राजकीय वास्तव, संघर्षमय जीवन, मूल्यवाद, आदर्शवाद, ध्येयवाद, संस्कार, विविध व्यक्तींची वृत्ती, प्रवृत्ती इत्यादी त्यांच्या साहित्याच्या प्रमुख प्रेरणा आहेत. याच प्रेरणेतून त्यांच्या साहित्यकृती निर्माण झाल्या.

साहित्य हा मानवी संस्कृतीचा एक अविभाज्य घटक आहे. तो एक अपरिहार्य असा सांस्कृतिक व्यवहार आहे, सांस्कृतिक उपक्रम आहे. ही जाणीव ठेवूनच यशवंतरावांनी लेखन केले. साहित्य हा जीवनाचा आरसा आहे. आरशात माणसाचे जसेच्या तसे खरे खुरे अथवा वास्तविक प्रतिबिंब उमटते. तसे यशवंतरावांच्या साहित्यात मानवी जीवनाचे, समाजजीवनाचे प्रतिबिंब उमटते. साहित्य हे संस्कृतीचे संरक्षण करते तसेच संस्कृतीचे संवर्धन करते. संरक्षण आणि संवर्धन या दोन प्रवृत्तींमुळे विकास व प्रगती शक्य होते असा त्यांचा आशावाद होता. जे साहित्य समाजात बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने म्हणजेच समाजात परिवर्तन घडवून आणण्यात अथवा समाज परिवर्तनाची

प्रक्रिया गतिमान करण्यास सहाय्यभूत होते, साधन म्हणून उपयुक्त ठरते, त्या साहित्याला सामान्यत: परिवर्तनवादी साहित्य म्हणतात. म्हणजे समाजपरिवर्तन हे साहित्याचे प्रयोजन असते आणि असे परिवर्तन घडवून आणण्यास अनुकूल व अनुरूप समाजप्रबोधन घडवून आणणे या प्रेरणेतूनच यशवंतरावांच्या साहित्याची निर्मिती झाली.

यशवंतरावांच्या साहित्याचा व्यक्तिनिष्ठ पद्धतीने विचार करता येईल. या दृष्टीने त्यांचे साहित्य म्हणजे मी लेखक म्हणून घेतलेला समाजानुभवच आहे. हा जीवनानुभव संवेदनशील, सौंदर्यशोधक अशा विशिष्ट व्यक्तिमत्त्वाने घेतलेला दिसतो. साहित्य हे केवळ एका व्यक्तीने केलेले निवेदन नसते. ती एका व्यक्तीमनाने साधलेली एका समाज अनुभवाची नवनिर्मिती असते. कल्पनाशक्तीच्या साहाय्याने व्यक्तीमनाने साधलेली एका समाजानुभवाची नवनिर्मिती हे ललित लेखनाचे प्रमुख लक्षण ठरते.

यशवंतरावांसारखा ललित लेखक आपल्या अनुभव सृष्टीचे सूचक दर्शन त्यांच्या साहित्यातून घडवित असतो. मानवी मनातील भावना ज्यावेळी शब्दांवाटे लिखित स्वरूपात कागदावर उतरतात त्यावेळी साहित्य निर्मिती होते. प्रत्येक साहित्यकृती ही स्वत:चा असा एक आकृतीबंध साधत असते. साहित्य आपला अनुभव भाषेच्या माध्यमातून व्यक्त करत असते. साहित्य हे शब्दांच्या साहाय्याने साधलेले विविध अनुभवांचे सर्जन असते. यशवंतरावांचे साहित्य म्हणजे एका अनन्यसाधारण अनुभवाने साधलेले स्वयंलेखन नसून ते एका व्यक्तिमत्त्वाने शब्दांच्या साहाय्याने घेतलेला आपल्या एका असाधारण अनुभवाचा शोध आहे. हा शोध शब्दांच्या साहाय्याने साक्षात करण्याचे काम यशवंतरावांसारखा निर्मितीक्षम व्यक्तिमत्त्व असलेला लेखकच करू शकतो. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा साहित्याच्या भाषेवर उमटलेला दिसतो. प्रत्यक्ष जीवनातील विविध अनुभवांचे चिंतन व ज्या चिंतनाच्या अनुपंगाने प्रत्यक्ष अनुभव जसे रूप घेईल तसेच रूप साहित्यात उतरविण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. थोडक्यात मनातील भावना ज्यावेळी शब्दांवाटे लिखित स्वरूपात कागदावर उतरतात त्यावेळी यशवंतरावांसारख्या लेखकाची साहित्यनिर्मिती होते. यशवंतरावांसारख्या एखाद्या राजकीय नेत्यास प्रत्यक्ष जीवन जगत असताना जे अनुभव आले त्या अनुभवांच्या आधारे त्यांनी 'ललित लेखन' केले. या लेखनामध्ये लघुनिबंध, ललित निबंध, प्रसंगचित्रे, व्यक्तिचित्रे, भाषाचित्रे, प्रवासवर्णने, आत्मनिष्ठपर लेखन, वैचारिक लेखन इ. प्रकारांना सामावून घेणारी वाङ्मयनिर्मिती त्यांनी केली. या विविध साहित्य प्रकारांतील निवडक वाङ्मयाचा आढावा, त्याचे स्वरूप, त्याचा विकास या बाबतचा विस्तृत अभ्यास आणि त्या प्रत्येकाची वैशिष्ट्ये विस्ताराने समजावून घेणे महत्त्वाचे

आहे. तसेच त्यातल्या विविध प्रकृती वैशिष्ट्यांची, त्यामागील भिन्न भिन्न प्रेरणांचा तपास करून ठळक लेखनाचा उल्लेख करणे इतकेच काय ते त्या लेखनाच्या मर्यादित बसू शकेल. हे ध्यानात घेऊनच पुढील विवेचनाकडे वळले पाहिजे.

यशवंतराव चव्हाण हे चिंतनशील लेखक असल्यामुळे तत्कालीन वैचारिक प्रवाहाचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर परिणाम झालेला होता. १९२० ते १९४५ हा कालखंड राजकीय, सामाजिक, वैचारिक आंदोलनाचा होता. भारताच्या राजकीय, सामाजिक स्थित्यांतराचा एक महत्त्वाचा कालखंड होता. साहित्य आणि कला या दृष्टीनेही हा काळ महत्त्वाचा आहे. भारताच्या स्वातंत्र्यचळवळीच्या इतिहासातले हे गांधीयुग होते. गांधीजींच्या जीवनाविषयीची विचारसरणी आणि त्यांची शांततामय असहकाराची कृती, अहिंसेवर त्यांनी दिलेला भर या विविध गोष्टींचा प्रभाव यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वावर होत होता. याचबरोबर समाजवाद, नवमतवाद, मार्क्सवाद, जीवनवाद असे विविधवाद त्या काळात निर्माण झाले. विशेषत: १९३० च्या पुढे पंधरा वीस वर्षे मराठी साहित्यसृष्टीवर पुरोगामी साहित्याच्या वादाची छाया पडली. त्याचीच परिणती म्हणून कलावाद, जीवनवाद, नवनीतीवाद, नवमतवाद अशी नवीन रूपे वादाचा विषय ठरली. यामध्ये ना.सी.फडके, आचार्य शं.द.जावडेकर, वि.स. खांडेकर, प्र. के. अत्रे, ल.रा. पांगारकर, ग.त्र्यं. माडखोलकर यांसारख्या मातब्बर लेखकांनी भाग घेतला. त्यामुळे मार्क्सचा साम्यवाद व फ्रॉईडचे तत्त्वज्ञान यांचाही परिचय व प्रसार या निमित्ताने झाला. या विविध वादांच्या निमित्ताने साहित्यक्षेत्रात पुष्कळ चर्चाचर्वण झाले. त्यात साहित्याचे प्रयोजन काय, साहित्याचे स्वरूप काय, साहित्यिक साहित्य निर्माण का करतो, कसे करतो, रसिक साहित्य का वाचतो, सत्य, शिव, सौंदर्य यांचा संबंध काय, जीवन आणि साहित्य यांचा संदर्भ काय यांसारख्या असंख्य प्रश्नांवर चर्चा झाल्या. याशिवाय असहकाराची चळवळ, अहिंसावाद, सत्याग्रह, मजूर चळवळ, दलितांचा उध्दार, स्त्रीस्वातंत्र्य, अस्पृश्यता निवारण असे अनेक प्रश्न समाजात निर्माण झाले होते. महाराष्ट्रात गांधीजींचे राजकारण खेड्यापाड्यातील ब्राह्मणेत्तर बहुजन समाज आणि स्त्रीवर्गापर्यंत जाऊन पोहोचले. सूतकताई, प्रभात फेरी, सत्याग्रह यांनी कृतीशील राजकारणात सुलभता आणली. महाराष्ट्रात बहुजन समाजातील ज्या लोकांनी गांधीवादापासून प्रेरणा घेतली त्यामध्ये यशवंतराव होते. परिणामत: यशवंतरावांच्या वैचारिक आणि साहित्यिक जडणघडणीमध्ये या सर्व घटनांचा परिणाम झालेला दिसतो. साहित्यापासून राजकारणापर्यंत त्यांनी केलेले स्फुटलेखन हे वैचारिक आणि गंभीर स्वरूपाचे आहे.

साहित्य क्षेत्रातील यशवंतरावांचे कर्तृत्व सामान्य नाही. एक सर्जनशील कलावंत

व उत्तम समीक्षक म्हणून त्यांचा उल्लेख करावा लागेल. ललित लेख, वाङ्मयीन समीक्षा, व्यक्तिचित्रे, प्रवासवर्णन, वाङ्मयीन रसग्रहण, पत्रात्मक लेखन व आत्मचरित्र अशा अनेक गद्य साहित्य स्वरूपात त्यांनी लेखन केले आहे. हे त्यांचे वाङ्मय वैविध्याने आणि गुणवत्तेनेही समृद्ध आहे. 'कृष्णाकाठ', 'भूमिका', 'युगांतर', 'ऋणानुबंध', 'विदेश दर्शन', 'शिवनेरीचे नौबती', 'शब्दांचे सामर्थ्य', 'सह्याद्रीचे वारे' विचारधारा यासारख्या कलाकृतीने यशवंतरावांनी साहित्यक्षेत्रात आपली नाममुद्रा ठळकपणे उमटवली आहे. तसा त्यांनी केवळ एखादाच वाङ्मयप्रकार हाताळला आहे असे नाही. याच्या जोडीला विविध पुस्तकांना लिहिलेल्या प्रस्तावना म्हणजे त्या पुस्तकांची समीक्षाच म्हणावी लागेल.

साहित्याच्या विविध अंगांचा वेध घेणारे लेखन त्यांनी केले आहे. त्या काळात त्यांचा ग्रामीण जीवनाशी आलेला निकटचा संबंध, पाहिलेल्या लोकविलक्षण व्यक्ती आणि घटना, संवेदनशील काव्यात्मक वृत्तीने घेतलेले अनुभव, मानवी स्वभावाच्या बऱ्यावाईट स्वरूपाबाबतचे उत्कट कुतूहल, सर्वसमावेशक स्वभाव अशा अनेक बाबींमध्ये त्यांची साहित्याची बीजे रुजलेली असावीत. त्याचबरोबर बालपणापासून जोपासलेला वाचनाचा छंद आणि भरमसाठ वाचनामुळे तयार होत गेलेली वाङ्मयप्रेमी रसिकवृत्ती यांचाही यशवंतरावांमधल्या भावी लेखकाला संस्कारित करण्यास उपयोग झाला. अशा साहित्यिकाचा मूल्य विचार आणि त्यांच्या साहित्य विचाराचे (सांगोपांग) यथार्थ आणि अभ्यासपूर्ण विवेचन करणे महत्त्वाचे वाटते.

यशवंतरावांनी साहित्याकडे केवळ रंजनवादी भूमिकेतून पाहिलेले नाही. उलट साहित्यिकाने वास्तवाचा डोळसपणे अभ्यास करावा. देश-काल-स्थितीचे त्याने चिंतन करावे. लेखकाने जीवनातल्या अंतिम सत्याचा शोध घेत राहणे आणि त्या शोधात आपणाला जे जे उत्कटतेने व अपूर्वाईने जाणवले ते सुंदरतेने व्यक्त करणे या हेतूनेच त्यांनी लेखन केले. जीवनाचे अंतिम सत्य म्हणजेच मानवतेचे मूल्य त्यांनी महत्त्वाचे मानले आहे. म्हणजेच रंजनवादापेक्षा त्यांनी जीवनवाद महत्त्वाचा मानला. त्यांच्या समग्र साहित्याचा विचार करताना केवळ रंजनात्मक मूल्य असलेले लेखन त्यांनी केले नाही. त्याचे कारण त्यांची वाङ्मयीन अभिरूची शुद्ध होती. ती वाचन-मननाने संस्कारीत झाली होती.

यशवंतरावांचे साहित्य हे रंजनप्रधान, सौंदर्यवादी अजिबात नाही. फडके, खांडेकर यांच्या रंजनप्रधान साहित्याचा त्यांच्या लेखनावर कोठेही प्रभाव दिसत नाही. परंतु त्यांचे साहित्य आस्वादक व रसिक वाटते. या काळात निर्माण झालेले बरेच साहित्य हे स्वप्नरंजनात्मक होते. अद्‌भुत वातावरण निर्माण करणारे होते. केवळ स्वप्नरंजन हाच

या साहित्याचा हेतू होता. असे असतानाही यशवंतरावांतील साहित्यिक सौंदर्यवादी कथा, कादंबरी, नाटकासारख्या रंजक स्वरूपाच्या कलाकृती निर्माण करण्यासाठी पुढे सरसावला नाही. तो प्रांत त्यांनी वर्ज्य मानला. स्त्रीपुरुष संबंध, प्रणय यावर आधारित लेखन त्यांनी केले नाही. हौस, मौज, शृंगार, मनमोकळे वागणे, कलासक्त जीवन, सुखलालसा, हास्यविलास यांसारखे वर्णन करणारे कथात्मक साहित्य त्यांनी निर्माण केले नाही. त्यांच्या कालखंडात कलावाद आणि जीवनवाद म्हणजे 'कलेसाठी कला आणि जीवनासाठी कला' असे वाद निर्माण झाले होते. या वादात प्रा. फडके, वा.म. जोशी, डॉ. केतकर, वि.स.खांडेकर, साने गुरुजी, प्र.के.अत्रे, ग.त्र्यं. माडखोलकर यांसारखे मातब्बर लेखक सहभागी झाले होते. पण अशा वादातही ते गेले नाहीत. मनोरंजनप्रधान अथवा स्वप्नाळू ध्येयवादाचे चित्रण करणारे लेखन चव्हाणांनी केले नाही. तो प्रांत त्यांना आवडला नाही. अस्सल जीवनानुभव अतिशय भेदकपणे आणि दाहकपणे व्यक्त करण्यासाठी त्यांनी वैचारिक साहित्य निर्माण केले. यामध्ये माणसाच्या अथांग मनाच्या तळाचा, तिथल्या भावना, विचार कल्पनांचा त्यांनी वेध घेतला. राष्ट्रीय अथवा जागतिक घटनांच्या पार्श्वभूमीवर मानवी जीवनाचे चित्रण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. स्वातंत्र्योत्तर काळात स्फुरलेल्या नव्या उर्मी आशा-आकांक्षा पूर्ण झाल्या की नाही हे पाहणे असे चिंतनपर लेख त्यांनी लिहिले. गांधी वधानंतर निर्माण झालेले जातीयतेचे व जाळपोळीचे प्रसंग, त्यावेळच्या जीवनातील सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विषमतेमुळे निर्माण झालेले प्रश्न, प्रादेशिक तत्त्वावर भाषावार प्रांताची मागणी अशा कितीतरी प्रश्नांचा ऊहापोह यशवंतरावांनी त्यांच्या ललित लेखनातून केला. कोणतीही घटना किंवा विचार शेवटी मानवतावादी भूमिकेला नेऊन भिडवण्याची प्रवृत्ती हे यशवंतरावांच्या ललित साहित्याचे तंत्र होते.

''ललित साहित्याने समाजकारण केले पाहिजे असे जे म्हटले जाते त्याचा अर्थ एवढाच की सामाजिक वास्तवाशी अधिक डोळसपणे, अधिक व्यापकतेने, अधिक जिज्ञासेने आणि जिव्हाळ्याने एकरूप होऊन ललित साहित्य निर्माण झाले पाहिजे.'' अशाच स्वरूपाच्या बांधीलकीतून यशवंतरावांचे ललित साहित्य निर्माण झाले आहे. त्यांनी त्यांच्या ललित साहित्यात वैचारिक व गंभीर लेखनास जास्त भर दिला आहे. त्यांच्या लेखनामध्ये त्यावेळचे समकालीन प्रश्न मांडले आहेत. त्यामुळे यशवंतरावांनी वास्तवाचे भान ठेवूनच साहित्यकृतीमध्ये प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे समकालीन वास्तवच चित्रित केले आहे. वास्तवातील मूलतत्त्वे घेऊन नवनिर्मिती करण्यात ते यशस्वी झाले आहेत. जीवनात परिवर्तन घडवून आणण्याचे जीवनाला डोळस करण्याचे कार्य असे साहित्य करू शकते. असा त्यांचा ठाम विश्वास होता. साहित्य केवळ मनोरंजनासाठी

नसते. अथवा विरंगुळ्यासाठी नसते. साहित्याची प्रत्यक्षा-प्रत्यक्षपणे अनेक बाबतीत उपयुक्तता असते. ''साहित्यात माणूस, माणसाची जाणीव, माणसाचे अनुभव व्यक्त होतात. मानवी संबंध व्यक्त होतात. कारण माणूस हा साहित्याचा केंद्रबिंदू आहे. सामाजिक संबंध मानवी संबंधात प्रतिबिंबित झालेले असतात. म्हणून साहित्यातून जेव्हा मानवी संबंध व्यक्त होतात, तेव्हा मानवी संबंधातून एका अर्थी सामाजिक संबंधच व्यक्त होतात.'' यशवंतरावांच्या साहित्याचे स्वरूप हे बरेचसे अनुभवांवर अवलंबून आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्यातून अनुभव व्यक्त होतातच शिवाय अनुभवातून जीवनदर्शनही घडते. तसेच जीवनातील गतीचे ज्ञान होते. साहित्याद्वारे समाजपरिवर्तन होते. साहित्य हे समाजाला शिक्षित करण्याचे समर्थ साधन आहे ही जाणीव लेखकाच्या विचारसरणीतून आणि जीवनसरणीतून स्पष्ट होत जाते. यशवंतराव हे समाजमन जाणणारे व समाजात मिसळणारे असे लेखक असल्यामुळे त्यांच्या वैचारिक साहित्याला अनुभवाचे अधिष्ठान मिळाले आहे. ''ज्याची समाजजाणीव मंद आहे. चिकित्सेत ज्याला रस नाही, प्रश्नांना भिडण्याची ज्याच्यात रग नाही त्याला वैचारिक प्रकृतीचे लेखन कधीच साधणार नाही.'' परंतु यशवंतरावांनी तत्कालीन समाजातील विविध अवस्थांचा, स्थितिगतीचा व आंदोलनाचा अन्वयार्थ समजून घेऊन तो विशद करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांचे हे वैचारिक स्वरूपाचे साहित्य निर्मितीशील प्रतिभेचाच सुंदर आविष्कार ठरतो. उत्कट सामाजिक भान, सखोल चिंतन आणि प्रभावी शैली इ. विविध गुण त्यांच्या साहित्यात पाहावयास मिळतात.

यशवंतराव चव्हाण हे सामाजिक प्रबोधनाच्या चळवळीत सामील झाले होते. अशा चळवळींना वैचारिक अधिष्ठान देण्याचा प्रयत्न, वैचारिक लेखनाच्या माध्यमातून त्यांनी केला. १९४७ नंतर आजपर्यंत प्रागतिक विचारांचा पुरस्कार करणारे ते महाराष्ट्रातले अग्रगण्य राजकीय नेते होते. लेखक होते. लेखणी आणि वाणी ही दोन्ही साधने प्रबोधनाच्या कामी त्यांनी अखंड राबविली. त्यांच्या विचारांचे सामर्थ्य, बुद्धिनिष्ठ, समाजनिष्ठ होते. विपुल आणि विविध लेखन करणारा हा विचारवंत समाजातल्या अनेक प्रश्नांचा मागोवा घेत राहिला आहे. वैचारिक साहित्याच्या क्षेत्रात त्यांचा सहभाग केवळ उल्लेखनीयच नाही. तो अत्यंत मौलिक स्वरूपाचा आहे. त्यांच्या मनावर आणि बुद्धीवर लहानपणापासूनच प्रसिद्ध तत्त्वचिंतक व राजकीय नेते मानवेंद्रनाथ रॉय आणि म. गांधी यांचा दीर्घ परिणाम झालेला जाणवतो. पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास आणि ज्ञान विज्ञानाचे अध्ययन तसेच आधुनिक ज्ञान यांच्या संगमातून या लेखकाचा पिंड घडत गेला. उमलत्या फुलातून जसा सुगंध ओसंडत राहावा त्याप्रमाणे

यशवंतरावांच्या गद्य लेखनाच्या मनोधर्माची प्रकाशकिरणे त्यांच्या लेखातून सतत पसरलेली दिसून येतात. जीवनातील विविध प्रसंग, व्यक्ती, स्थळे, यासंबंधीचे आपले भावविश्व कसलाही आडपडदा न ठेवता कौतुकाने ते वाचकांच्या समोर ठेवतात. ''कोणत्याही लेखकाचे साहित्य त्याच्या व्यक्तिमत्त्वापासून अलिप्त राहू शकत नाही. कधी स्पष्टपणे, तर कधी स्वत: लेखकाच्याही लक्षात येणार नाही इतक्या सूक्ष्मपणे किंवा संदिग्धपणे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे संदर्भ त्यांच्या साहित्यकृतीतून उमटत राहतात. कधी त्या साहित्यकृतीशी एकजीव होऊन तर कधी त्रयस्थपणे बाह्यजग आणि लेखकाचे अंतर्मन ह्यांच्यातील क्रिया प्रतिक्रियांची स्पंदने लेखणीतून अपरिहार्यपणे वाहत जातात. त्यातून त्यांच्या साहित्याची प्रकृती निश्चित होत जाते.'' यशवंतरावांसारख्या लेखकाच्या बाबतीत ही गोष्ट विशेष कटाक्षाने लक्षात घेण्यासारखी आहे. त्यांनी सामाजिक बांधीलकी स्वीकारूनच बरेच लेखन केले आहे. 'सह्याद्रीचे वारे' किंवा 'युगांतर' मधील काही वैचारिक लेख याची साक्ष देतात. त्यांच्या काळात हिंदुस्थानच्या एकतेच्या अनुषंगाने अनेक प्रश्न निर्माण झाले. भाषावाद, प्रांतीयवाद, विभागीय वाद, जातीयवाद या सर्व वादांना आपल्या ठाम भूमिकेतून त्यांनी उत्तर दिले. हिंदुस्थानचे ऐक्य अबाधित राहिले पाहिजे असे मत त्यांनी वारंवार मांडले. आणि हाच त्यांचा चिंतनाचा आणि चिंतेचा सर्वात मोठा विषय बनला. यशवंतराव हे प्रकृतीने विचारवंत होते. तसेच ते संवेदनशील होते. त्यामुळे दैन्य-दारिद्र्याने पोखरलेल्या समाजाचे दर्शन ते याच भूमिकेतून घेऊ शकले. या संदर्भात कामगार मैदान मुंबई येथे झालेल्या एका जाहीर सभेत ते म्हणतात, ''हिंदुस्थानात अजून उघडीनागडी हिंडणारी गरिबी ही जर अशीच हिंडत राहणार असेल तर या स्वातंत्र्याला आणि आज आपण करीत असलेल्या सर्व प्रयत्नांना काहीच अर्थ राहणार नाही. आम्हाला ही गरिबी हटविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मनाची गुलामगिरी हटविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्या समाजामध्ये प्रत्येक मनुष्य स्वाभिमानाने आपली मान उंच करून निर्भयपणे वावरू शकेल, त्याला पोटभर अन्न आणि अंगभर वस्त्र मिळेल त्याला आपल्या बुद्धीचा आणि शीलाचा विकास करण्याची संधी मिळेल अशा प्रकारचा समाज निर्माण करण्याची प्रतिज्ञा करून आपण सर्वजण वाटचाल करू या.'' अशा प्रकारे त्यांनी जीवनवादी दृष्टिकोन मांडला. त्यांची ही तळमळ खोटी किंवा दिखाऊ नव्हती. ती त्यांच्या अंत:करणापासून आलेली होती. आपल्या हाती जे आहे ते प्रामाणिकपणे समाजाला द्यावे या हेतूनेच त्यांच्याकडून विचारप्रधान ललित कृती निर्माण झाल्या.

त्यांचा स्वत:चा असा एक ठसा या वाङ्मयात निर्माण झाला आहे. या साहित्यातून त्यांनी नवी उर्मी, नवा विचार व नवा दृष्टिकोन देण्याचा प्रयत्न केला आहे. बदलत्या

जीवनाचे बदलते संदर्भ, बदलत्या समस्या यांचा वेध घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. त्यासाठी लेखणी व वाणी ही दोन्ही साधने त्यांनी अखंड राबवली. त्यातून प्रबोधनाचे काम केले. त्यांच्या विचारांचे सामर्थ्य बुद्धिनिष्ठ व समाजनिष्ठ होते. त्यामुळेच विविध विषयांवर लेखन करणारा हा लेखक समाजातल्या अनेक प्रश्नांचा मागोवा घेत राहिला. यशवंतरावांच्या या वैचारिक भाषणांना व लेखनाला निबंधाचा दर्जा प्राप्त झाला आहे. या साहित्याचे स्थूलमानाने विषयानुसार वर्गीकरण करावयाचे आहे. यशवंतरावांनी विविध विषयांना स्पर्श करून निश्चित अशी मते मांडली आहेत. साहित्याच्या दृष्टीने त्यांच्या भाषणांचे संकलित ग्रंथ हा अनमोल ठेवा होता.

आत्मचरित्र वाङ्मयाचे स्वरूप

आत्मचरित्र हा एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार असून तो अतिशय मनोवेधक आहे. तसाच तो मोठा चैतन्यमय, चित्तवेधक व जिव्हाळ्याचा वाटतो. आत्मचरित्रात आत्माविष्कार असल्यामुळे हा वाङ्मय प्रकार अधिक चटकदार व चैतन्यमय वाटतो. माणूस स्वत:स जितके ओळखतो तितके त्यास अन्य कोणीही ओळखू शकत नाही. विशेषत: त्याचे व्यक्तिगत जीवन आणि अंतरंग हे त्याच्या स्वत:कडूनच अधिक यशस्वीपणे व प्रभावीपणे प्रकट होत असते. 'स्व'त्व न सोडता स्वत:ला त्रयस्थ दृष्टिकोनातून आत्मचरित्रात न्याहाळले जाते. त्यामुळे आत्मचरित्रात सत्यकथनाला प्राधान्य असते. त्यात सत्याशी प्रतारणा होऊ नये अशी अपेक्षा असते. आत्मचरित्रकाराजवळ प्रांजळपणा हा आवश्यक गुण असायला हवा. अन्यथा असत्य-कथन व विपर्यास टाळता येणे अशक्य होते. म्हणजेच सभ्यपणा, सौजन्य, कलेच्या मर्यादा सांभाळून आत्मचरित्रकाराला सत्यदर्शन घडवावे लागते. त्यामुळे त्यात सत्य-कथनाला महत्त्व असते. अशा आत्मकथनाला कोणत्याही समर्थनाची आवश्यकता भासत नाही. आत्मचरित्रामध्ये अनुभवाची तीव्रता इतर कोणत्याही वाङ्मयप्रकारापेक्षा अधिक असते. लेखकाने आपल्या व्यक्तिगत जीवनाची स्वत:च्या शब्दांत सांगितलेली कहाणी असते. त्यामुळे यामध्ये आत्माविष्काराला आणि आत्मप्रकटीकरणाला वाव असतो. स्वत:ला विसरून स्वत:कडेच तटस्थपणे पाहात गतजीवनातील स्मृती सांगणे आणि त्याचवेळी त्यांचे कलात्मक लेखनही केले जाते. त्यामुळे मानवी व्यक्तिमत्त्वाचा शोध घेण्यासाठी आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराचा उपयोग होतो. माणसाविषयीच्या आपल्या ज्ञानात, समजूतीत आत्मचरित्र हा वाङ्मयप्रकार फार मोठी भर घालणारा आहे. कारण विविध अंगी अशा मानवी स्वभावाचे दर्शन घडविणे हाच मुळी त्याचा हेतू आहे. एखाद्या

आत्मचरित्राचा अभ्यास हा प्रामुख्याने मानवी मनाशी आणि मानवी व्यक्तीशी संबंधित असतो. तसेच एखाद्या कालखंडाचा साक्षी म्हणूनही आत्मवृत्त उपयोगी ठरू शकते.

प्रसिद्ध ग्रामीण लेखक व समीक्षक डॉ. आनंद यादव म्हणतात, ''आत्मचरित्र हा एका जिवंत हाडामासाच्या व्यक्तीने स्वत:चाच दिलेला अंतर्बाह्य स्वरूपाचा वृत्तान्त असतो. तो समग्र सर्वांगांनी अभ्यासून, पारखून दिलेला असतो. म्हणून वाचकाच्या दृष्टीने तो महत्त्वाचा असतो. समाजात जगणारी एखादी व्यक्ती कशी जगू शकते, कोणत्या गोष्टीला तिला तोंड द्यावे लागते, ती वाटचाल कशी करू शकते, तिच्या जगण्याला इतर शेकडो कोणकोणते घटक कशी मदत वा सहकार्य करतात किंवा अडथळे, विरोध विक्षेप आणतात याचा ते लेखन दस्तऐवज असते.''[६] आत्मचरित्रात मानवी स्वभावाचे दर्शन होते तसेच मानवी स्वभावाविषयी असणारे विलक्षण कुतूहल आणि उत्कंठा माणसाच्या मनात सतत असते. तिची तृप्ती आत्मचरित्र वाचनाने काही अंशी निश्चित होते. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाच्या अंतरंगाचा आविष्कार आत्मचरित्रात पाहावयास मिळतो. अ.म.जोशी म्हणतात, ''स्वत:चे अनुभव दुसऱ्यास सांगून आपले अंत:करण हलके करणे याशिवाय आपल्या अनुभवांपासून दुसऱ्यास काही बोध व्हावा हाही आत्मचरित्राचा हेतू असू शकेल.'' आत्मचरित्र लिहिताना जुन्या आठवणींना उजाळा देणे हाही हेतू असतो. सामान्यत: आत्मचरित्रे ही आपल्या समृद्ध व सफल जीवनाची गाथा म्हणूनच लिहिली जातात. 'स्वत:च्या जीवनाची स्वत:च लिहिलेली कहाणी' अशी व्याख्या बोरगावकर करतात. ''आत्मचरित्रामधून व्यक्तिगत अनुभवांचे सत्य प्रकट होत असतेच पण त्याही पलीकडे लेखक अनेक बाबी मांडत असतो. आत्मचरित्राचा लेखक भूतकाळाच्या स्मृतीचे आविष्कार प्रकट करताना वर्तमानही जगत असतो. त्यामुळे भूतकाळ आणि वर्तमानकाळाचे अनुबंध असतातच . ज्या परिसरात तो राहतो, त्या परिसराची भाषा, संस्कृती, जीवनपद्धती याचाही परिणाम होत असतो आणि या साऱ्यासोबत त्याचा 'स्व' व्यक्त होत असतो.''

आत्मचरित्रातून माणसाच्या मनाचे पापुद्रे उलगडले जाऊन जे समाधान व शांती लाभते ती अलौकिक असते. असा हा वरवर पाहता सोपा वाटणारा पण प्रत्यक्षात तितकाच अवघड असणारा वाङ्मयप्रकार आहे. त्यामुळे कलात्मकदृष्ट्या हा वाङ्मयप्रकार हाताळणे अवघड आहे कारण स्वत:संबंधी लिहावयास माणसास संकोच वाटतो. स्वत:च्या जीवनातील घटनांकडे आणि स्वत:कडे (स्वत:वरील प्रेम बाजूस सारून) तटस्थपणे पाहणे आणि त्याचे निवेदन करणे ही सामान्यांच्या शक्तिबाहेरची गोष्ट आहे. आपणास स्वत:ची कितीतरी माहिती असते आणि ती खरीखुरी असते. स्वत:च्या गतायुष्याचे सिंहावलोकन करताना गतजीवनातील स्मृतींशी आपण समरस

होतो. काही घटनांशी, व्यक्तींशी मनोमन रेंगाळणारे अनुभव, घटना यांना जसेच्या तसे शब्दरूप देणे आत्मचरित्रात महत्त्वाचे असते. पण वाटते तितके ते सोपे नसते. या संदर्भात गो.म.कुलकर्णी यांनी मांडलेले विचार महत्त्वाचे आहेत. ते म्हणतात,''यशस्वी आत्मनिवेदनात आत्मचरित्र आणि आत्मसंकोच (प्रसंगी विसर्जनही) आत्मपरता आणि आत्मनिरपेक्षता, व्यक्तिनिष्ठा व समूहशीलता, तादात्म्य आणि तटस्थ संश्लेषण आणि विश्लेषण यांचा तोल नेमकेपणाने आणि नेटकेपणाने सांभाळला जावा लागतो. एरव्ही आत्मरंगी रंगलेल्या मनाला हे आत्मरंग स्वत: वेळीच न्याहाळून त्यांची प्रत, गुणवत्ता आजमावी लागते. एकच आत्मनिष्ठ आणि वस्तुनिष्ठ भूमिका घ्यावी लागते. स्वत:च स्वत:ला प्रश्न विचारून त्यांची उत्तरे द्यावी घ्यावी लागतात. ती तपासून त्यातील संवाद, विसंवाद स्वत:च पाहावयाचे असतात. आरोपी, वकील, न्यायाधीश या साऱ्याच भूमिका स्वत:च घेऊन त्या परस्परावर अन्याय होऊ न देता स्वत:च पार पाडावयाच्या असतात. येथे आत्मदर्शनच घडवावयाचे असते पण ते आत्मप्रदर्शन न करता आत्मानुभूत वास्तवाचे आत्मनिरपेक्ष वास्तवाशी असलेले लागेबांधे येथे स्पष्ट होणे अतिशय अगत्याचे असते.'' वरील विवेचनावरून आत्मचरित्र लेखनासाठी लेखकाला कठोर आत्मपरीक्षण करता आले पाहिजे असाच सारांश काढता येईल. तरीही इतर वाङ्मयप्रकारापेक्षा आत्मचरित्राचे स्वरूप आणि सामर्थ्य वेगळे आहे. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रकटनाला आत्मचरित्रात भरपूर वाव मिळतो.

मराठीमध्ये आत्मपर लेखनाची प्राचीन परंपरा आहे. संत महंतानीं आपले अनुभव शब्दांकित केले. ते आत्मपर लेखनच ठरते. प्राचीन काळात मराठीत हेतुपूर्वक असे आत्मचरित्राचे लेखन झाले नाही. नामदेव, जनाबाई, तुकाराम, बहिणाबाई यासारख्या संतांनी आपल्या काव्यात प्रसंगानुरूप व स्वत:च्या जीवनासंबंधी त्रोटक स्वरूपाचे उल्लेख वा साक्षात्काराचे प्रसंग वर्णिले आहेत. परंतु हे सर्व आत्मचरित्रात्मक लेखन त्रोटक स्वरूपाचे आढळते.

आत्मचरित्राचे सलग लेखन हे खऱ्या अर्थाने अव्वल इंग्रजी काळात आढळते. सुरुवातीच्या काळात आत्मचरित्रे थोडीच लिहिली गेली. त्यापैकी काही सुंदर भूषणे गणली जावीत इतकी गुणसंपन्न आहेत. या संदर्भात डॉ. लुलेकर म्हणतात,''इंग्रजी वाङ्मयाच्या संपर्काने मराठी साहित्य आणि भाषा यात परिवर्तन होणे स्वाभाविक होते आणि ते घडलेही. सरंजामी दृष्टिकोन कमी होत गेला आणि लोकशाहीनिष्ठ दृष्टिकोन संवर्धित होऊ लागला. त्यामुळे व्यक्तित्वाचा 'स्व' चा शोध सुरू झाला. यातूनच आत्मचरित्र लेखनास प्रारंभ झाला.'' या काळात मराठी माणसांच्या जाणिवेतही

परिवर्तन घडले. प्रबोधनाच्या मंत्राने भारलेल्या या काळात सामाजिक जीवनात ज्ञानप्रसार, समाजजागृती, सुधारणांचा पुरस्कार करण्यासाठी अनेकांनी आपले जीवन वाहिले. आपल्या या सामाजिक कार्याच्या अनुभवातून इतरांना काही बोध व्हावा, दिशा मिळावी या हेतूने तर कधी धर्मप्रसाराच्या हेतूने आत्मचरित्रे लिहिली गेली. विष्णुबुवा ब्रह्मचारी यांचेही आत्मचरित्रपर लेखन असेच त्रोटक आहे. विष्णूभट गोडसे यांनी लिहिलेले 'माझा प्रवास' हे आत्मचरित्र रसाळ प्रवासवर्णन असून आत्मपर आहे. त्यातून तत्कालीन समाजस्थितीचे दर्शन घडते. ज्यास स्वतंत्र आत्मचरित्र म्हणता येईल अशा स्वरूपाचा मराठीतील पहिला ग्रंथ म्हणजे प्रसिद्ध व्याकरणकार दादोबा पांडुरंग यांचे ' आत्मचरित्र' हाच होय. याच काळात बाबा पद्मनजी यांनी लिहिलेले 'अरुणोदय' हे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. धर्मप्रसाराच्या हेतूनेच हे आत्मचरित्र लिहिले गेले.

या काळात स्वतंत्र अशी स्त्रियांची आत्मचरित्रे प्रसिद्ध झाली. 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' हे श्रीमती रमाबाई रानडे यांचे आत्मचरित्र उल्लेखनीय आहे. लक्ष्मीबाई टिळकांचे 'स्मृतिचित्रे' हा ग्रंथ मराठी साहित्यात उत्तम ग्रंथ म्हणून गौरवला जातो. आत्मिक प्रेरणेनेच हा ग्रंथ लिहिला गेला. पुढे पार्वतीबाई आठवले यांनी 'माझी कहाणी' या नावाने आत्मचरित्र लिहिले. आनंदीबाई कर्वे यांचे 'माझे पुराण', आनंदीबाई शिर्के यांचे 'सांजवात', लीलाबाई पटवर्धन यांचे 'आमची अकरा वर्षे' इंदिराबाई भागवत यांचे 'या सदाशिव', कमलाबाई देशपांडे यांचे 'स्मरणसाखळी', आनंदीबाई विजापूरे यांचे 'अजुनी चालतेची वाट' अशा काही तत्कालीन आत्मचरित्रांचा उल्लेख करावा लागेल. आपल्या पतीच्या विचारांच्या अंतरंगाचा समाजाला परिचय करून द्यावा. आपल्या आयुष्याचा पट समाजापुढे मांडावा या हेतूनेच ही आत्मचरित्रे लिहिली गेली.

आत्मचरित्र लेखनात विविध क्षेत्रांतील स्त्रियांनी मोलाची कामगिरी केली आहे. त्यामध्ये रोहिणी भाटे यांचे 'माझी नृत्यसाधना', गिरिजाबाई केळकर यांचे 'द्रौपदीची थाळी', शीलावती केतकर यांचे 'मीच हे सांगितले पाहिजे', उषाबाई डांगे यांचे 'पण ऐकतं कोण', सुधाताई अत्रे यांचे 'गोदातरंग', जानकीबाई फडणीसांचे 'स्मरणमाला', सुनिता देशपांडे यांचे 'आहे मनोहर तरी', माधवी देसाईंचे 'नाच गं घुमा', हंसा वाडकरांचे 'सांगत्ये ऐका', दुर्गा खोटे यांचे 'मी दुर्गा खोटे', जयश्री गडकर यांचे 'अशी मी जयश्री', मल्लिका अमरशेख यांचे 'मला उध्वस्त व्हायचंय', बेबी कांबळे यांचे 'जिणं अमुचं', गोदावरी परुळेकरांचे 'जेव्हा माणूस जागा होतो' इत्यादी काही उल्लेखनीय आत्मचरित्रांतून स्त्रियांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. या स्त्रियांनी प्रेमविषयक, विवाहविषयक जाणिवांचे कंगोरे स्पष्टपणे व्यक्त केले आहेत. पत्नीने कथन केलेल्या

पतीच्या कडूगोड आठवणी असेच या आत्मचरित्राचे स्वरूप दिसते. तसेच आपल्या व्यथा व वेदना स्पष्ट करण्यासाठी 'आत्मचरित्र' हा वाङ्मयप्रकार त्यांना जवळचा वाटला.

समाजसेवकांनी लिहिलेली आत्मचरित्रे ही लक्षणीय आहेत. उदा. महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे 'आत्मवृत्त', नाना पावगी यांचे ' आत्मवृत्त', स्वातंत्र्यवीर सावरकरांचे 'माझी जन्मठेप', न.चिं. केळकर यांचे 'गतगोष्टी' , ना.ग. गोरे यांचे 'कारागृहाच्या भिंती' यांसारख्या काही महनीय समाजसेवकांच्या आत्मचरित्रांचा उल्लेख करता येईल.

कलाकारांनी सुद्धा आपल्या कलेशी व जीवनाशी संबंधित काही आठवणी व अनुभव शब्दबद्ध केले आहेत. गोविंदराव टेंबे यांचे 'माझा संगीत व्यवसाय', गणपतराव बोडस यांचे 'माझी भूमिका', शांताराम देसाई यांचे 'मखमली पडदा', मामासाहेब वरेरकर यांचे 'माझा नाटकी संसार', चिंतामणराव कोल्हटकर यांचे 'बहुरूपी', नानासाहेब फाटक यांचे 'मुखवट्यांचे जग' अशा काही नामवंत व्यक्तींची आत्मचरित्रे ह्या काळात लिहिली गेली. 'धाकटी पाती' हे सूर्यकांत मांडरे व 'तिसरी घंटा' मधुकर तोरडमल या व यांसारख्या चित्रपट, नाटक, नट, दिग्दर्शक, संगीतकार यांनी आपल्या आयुष्यातील घटनांचा वेध आत्मचरित्रातून घेतला आहे.

विविध साहित्यिक व दलित साहित्यिक यांनीही या वाङ्मयात मोलाची भर घातली. त्यातील काही निवडक साहित्यिकांचा उल्लेख वानगीदाखल करता येईल. यामध्ये ग.त्र्यं. माडखोलकर यांचे 'माझे जीवन एक कादंबरी', काकासाहेब कालेलकर यांचे 'स्मरणयात्रा', प्रा. श्री.म.माटे यांचे 'चित्रपट', प्रा. कृ.पां. कुलकर्णी यांचे 'कृष्णाकाठची माती', श्री. विठ्ठलराव घाटे यांचे 'दिवस असे होते', आचार्य अत्रे यांचे 'कऱ्हेचे पाणी', व 'मी कसा झालो?', गो.नी. दांडेकरांचे 'स्मरणगाथा', विश्राम बेडेकर यांचे 'एक झाड दोन पक्षी', वामन चोरघडे यांचे 'जडणघडण', 'तसबीर आणि तकदीर', श्री. के. क्षीरसागर यांचे 'मातीची चूल' आनंद साधले यासारख्या काही कवी, नाट्यकलावंत, संगीत तज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, लेखक, पत्रकार यांनी आत्मचरित्रे लिहिली. ही आत्मचरित्रे या वाङ्मयप्रकारातील परंपरेला समृद्ध करणारी उल्लेखनीय अशी आहेत.

गेल्या काही वर्षांपासून दलित साहित्यिकांनी आपल्या अभिव्यक्तीसाठी 'आत्मकथन' हा प्रकार अतिशय समर्थपणे वापरला आहे. आपण जे भोगले, सोसले आणि जे जीवन जगले तेच अनुभव अभिव्यक्त करण्यासाठी या वाङ्मयाचा उपयोग केला गेला. त्यांची दु:खे, त्यांचे शोषण वगैरेचे आविष्कारण दलित आत्मकथनामधून झाले आहे. या संदर्भात 'उपरा'- लक्ष्मण माने, 'बलुतं'- दया पवार, 'मुक्काम पोस्ट

देवाचे गोठणे'-माधव कोंडविलकर, 'आठवणींचे पक्षी' - प्र.ई.सोनकांबळे, 'उचल्या' -लक्ष्मण गायकवाड, 'तराळ-अंतराळ'-शंकरराव खरात, 'गावकी' -रुस्तूम अचलखांब, 'अक्करमाशी'-शरणकुमार लिंबाळे, 'गबाळं'- दादासाहेब मोरे, 'काट्यावरची पोट'-उत्तम बंडू तुपे, 'हाडकीहाडोळ'-नामदेव ढसाळ, 'कोल्ह्याट्याचं पोर'- किशोर काळे, 'आभरान'- पार्थ पोळके इत्यादी सारख्या आत्मचरित्रांतून विविध उपेक्षित जमातीतील मंडळींनी आपली दु:खे मांडली आहेत. बहुतेकांची दु:खे सारखी आहेत. म्हणून दु:ख, दारिद्रय आणि यातून आलेल्या वेदना यांचे अनुभव सांगत त्यांची आत्मकथने येतात. दलित साहित्यिकांनी शोषित आणि वंचित जीवनाचे अनुभव दलित आत्मकथनातून प्रभावीपणे मांडले आहेत.

राजकीय व सामाजिक नेत्यांची आत्मचरित्रे

आत्मचरित्र हा व्यक्तीच्या जीवनाचा इतिहास असतो. हे खरे असले तरी ज्या समाजव्यवस्थेत, वातावरणात ती व्यक्ती वावरते त्याचा तिच्या व्यक्तिमत्त्वावर आणि जीवनविषयक जाणिवांवर फार मोठा परिणाम होत असतो. त्या लेखकाच्या मनावर कळत नकळत भोवतालच्या समाजजीवनाचे पडसाद आलेले असतात. एवढेच नव्हे तर त्यांच्या व्यक्तिगत जीवनात सामाजिकतेचाही एक पदर गुंफलेला असतो. अशी आत्मचरित्रे मुख्यत: सामाजिक कार्यकर्त्यांची व राजकीय नेत्यांची दिसतात. राजकीय, सामाजिक क्षेत्रांत वैशिष्ट्यपूर्ण कार्य करणाऱ्या अशा व्यक्तींना जीवनात विविध अनुभव येतात. त्यामुळे अशा व्यक्ती आत्मचरित्रलेखनास प्रवृत्त होतात. त्या व्यक्तींचे कार्य आणि जीवन नेहमीच समाजासमोर असते. आहिताग्नी राजवाडे, नानासाहेब चाफेकर, केशवराव भवळकर, शंकरराव देव, ही समाजातील विविध क्षेत्रांत कार्य करणारी नामवंत व्यक्तिमत्त्वे आपल्या जीवनाचे चित्र रेखाटताना आपापल्या संसाराचे दिग्दर्शन तर करतातच पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण कशी वैविध्यपूर्ण होती हेही लक्षात आल्यावाचून राहात नाही. माणूस समाजात आणि निसर्गात राहत असला आणि त्यांच्याशी घडोघडी संबंध येत असले तरी माणसाचे स्वत:शीच घनिष्ठ संबंध असतात. सामाजिक, राजकीय किंवा अशाच स्वरूपाच्या कार्यास स्वत:ला वाहून घेणाऱ्या व्यक्तींनी आत्मचरित्रे लिहिली आहेत. त्यामध्ये 'मी एस्.एम्.' मध्ये एस्.एम्. जोशी, 'माझी जीवनगाथा' मध्ये प्रबोधनकार ठाकरे, न.वि. गाडगीळ तथा काकासाहेब गाडगीळ यांचे 'पथिक', 'हे गीत जीवनाचे', सुमतीबाई शाह, मृणालिनी देसाई यांचे 'निशीगंध', ना.ग. गोरे 'कारागृहाच्या भिंती', आचार्य अत्रे यांचे 'कऱ्हेचे पाणी', कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांचे 'माझ्या आठवणी आणि अनुभव', तसेच गंगाधर

देशपांडे यांचे 'माझी जीवनगाथा' इत्यादी व यासारख्या आत्मचरित्रातून आपल्या राजकीय, सामाजिक, प्रशासकीय जीवनातील भल्याबुऱ्या अनुभवांचे चित्रण आले आहे. तसेच या आत्मवृत्तातून टिळक-गांधीजींच्या नेतृत्वाचे चित्रण आणि समकालीन राजकीय व्यक्तींची चित्रे व सामाजिक परिस्थितीचे धावते चित्र रेखाटले आहे.

या राजकीय नेत्यांच्या आत्मवृत्तांमध्ये प्रामुख्याने पारतंत्र्याचा काळ आणि स्वातंत्र्यानंतरचा काळ आला आहे. त्यातही स्वातंत्र्यपूर्व काळ हा एक झंझावाताचा काळ होता. व स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा काळ हा देश बांधणीचा काळ होता. अशा या काळातील तपशील आणि वर्णने राजकीय आत्मचरित्रांत आलेली आहेत. आपल्याकडे राजकीय इतिहास तसा फारसा लिहिला गेला नाही. तसेच राजकीय व्यक्तींची चरित्रेही फारशी लिहिली गेली नाहीत. त्यादृष्टीने आपण अजून अंधारातच चाचपडत आहोत असे म्हटले तरी चालेल. भारताच्या या स्वातंत्र्यलढ्यात जे मोठमोठाले कृतिवीर आणि नेते होऊन गेले त्यांची आत्मचरित्रे तर नाहीतच. त्यामुळे जी राजकीय नेत्यांची आत्मचरित्रे आहेत त्यामधून प्रामुख्याने त्या व्यक्तींच्या जीवनाचा इतिहास आणि आपल्या जीवनामधून ती व्यक्ती जो इतिहास घडवित असते त्या आधारे समाजाचा संदर्भ प्रकट झालेला आहे. राजकीय नेत्यांच्या आत्मचरित्रांमधून जीवनविकास आणि सभोवतालची परिस्थिती यांचे चित्र अधिक स्पष्ट होते. अशा आत्मचरित्रांमधून लेखकाचे प्रतिबिंब पाहावयास मिळते. त्यामुळे अशा प्रकारच्या आत्मचरित्रात साहित्याला जे एक रूप यावे लागते त्या रूपाचे प्रत्ययकारी दर्शनही वाचकाला सहजपणे घडते. अशा आत्मचरित्रांमध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्राचा समावेश करता येईल.

○ ○ ○

कृष्णाकाठची स्मृतिशिंपले...

'कृष्णाकाठ' आत्मचरित्र लिहिणारे यशवंतराव हे अनेक दृष्टींनी समाजात महत्त्वाचे स्थान संपादन केलेले व्यक्तिमत्त्व होते. कित्येक महत्त्वपूर्ण घटनांचे साक्षीदार होते आणि तत्कालीन घटनांना सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय महत्त्वही प्राप्त झालेले होते. त्यामुळे हे आत्मचरित्र काही अंशी इतिहासाचीच निर्मिती आहे. यशवंतरावांच्या जीवनात त्यांनी जो इतिहास घडविलेला आहे त्या इतिहासाला कालची आणि आजची पिढी साक्षी असल्यामुळे त्यांचे हे आत्मचरित्र वाचनीय झाले आहे. एक तळमळीचा कार्यकर्ता, एक राजकीय मन असलेली व्यक्ती, समाजाविषयी आणि त्यामधील व्यक्तिविषयी अहर्निश तळमळ बाळगणारा एक पुरुष म्हणून त्यांच्या जीवनाचे अवलोकन करताना यशवंतरावांविषयी ज्यांना कृतज्ञता वाटलेली नाही अशी महाराष्ट्रीय व्यक्ती शोधूनही सापडणार नाही. आपले जीवन हे सदैव आपल्यासाठीच आहे असे स्वार्थी विचार यशवंतरावांच्या मनाला कधीही शिवलेले नाहीत. त्यांच्या 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्रामध्ये लहानपणापासून इ.स. १९४६ पर्यंतचा व नंतरचा त्यांच्या जीवनाचा आलेख काढला तर त्या आलेखामध्ये त्यांनी स्वत:साठी थोडीही जागा राखून ठेवली असल्याचे दिसत नाही. त्यांचे जे जीवन आहे ते खऱ्या अर्थाने समर्पित जीवन आहे. पण आपले जीवन समर्पित आहे याचा थोडाही दर्प त्यांच्या मनाला शिवलेला नाही किंवा तसा उल्लेख आत्मचरित्रात आलेला नाही. त्यामुळे अशा व्यक्तींच्या आत्मचरित्रामधून व्यक्त झालेले कलावंताचे मन अभ्यास करण्यासारखे आहे. शिवाय तत्कालीन सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक तसेच विविध चळवळी व राजकीय जीवनाचे दर्शन यशवंतरावांच्या सूक्ष्म नजरेतून आपणास पाहावयास मिळते. गेल्या ५०-७५ वर्षांत महाराष्ट्रात व देशपातळीवर ज्या ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक, वाङ्मयीन व कौटुंबिक घडामोडी घडल्या त्यांचा

इत्यंभूत वृत्तान्त सांगण्यासाठी 'कृष्णाकाठ' आत्मचरित्र हे एक निमित्त आहे. या आत्मचरित्रात त्यांनी पाहिलेल्या आणि त्यांनी स्वत: अनुभवलेल्या अनेक व्यक्तींचे, घटनांचे, गोष्टींचे आणि अनुभवांचे हे चित्रण आहे. आत्मचरित्रामध्ये तत्कालीन घटना, प्रसंग अग्रस्थानी असले तरी 'यशवंतराव' म्हणजेच त्यातील 'मी' हाच मध्यबिंदू आहे. त्यांच्या भोवती घटना, प्रसंग व व्यक्ती आल्या आहेत. यशवंतरावांच्या 'कृष्णाकाठ'ची बैठकच मुळी स्वत:चे जीवनचरित्र रेखाटावे तसेच तत्कालीन महाराष्ट्राचे समाजचित्र स्पष्ट करावे अशी आहे. या आत्मचरित्रामध्ये व्यक्तिगत आणि समकालीन घडामोडी, राजकीय, सामाजिक घडामोडी सांगण्याकडे अधिक लक्ष आहे. 'कृष्णाकाठ' हे आत्मचरित्र लक्षपूर्वक वाचल्यावर महाराष्ट्र, त्यामधील तत्कालीन घडामोडी, महाराष्ट्राने दिलेले तेजस्वी लढे, महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांतील माणसांच्या वृत्ती, स्वभाव, त्यांच्यामधील बरेवाईटपणा, आचार-विचार, पेहेराव, शैक्षणिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन चळवळी, देशात महाराष्ट्राची मान ताठ ठेवणाऱ्या अपूर्व बुद्धीच्या, विद्वत्तेच्या आणि कर्तृत्वाच्या व्यक्ती, शिक्षणसंस्था, खेड्यापाड्यातील ग्रामजीवन, देव आणि दैव आणि दैववाद यात रुतून बसलेले ग्रामीण महाराष्ट्राचे लोकमन, स्वातंत्र्यासाठी महाराष्ट्राने उचललेला सिंहाचा वाटा, स्वत:चे व्यक्तिगत जीवन, कौटुंबिक दु:खद घटना, लहानपण, शिक्षण, मैत्री, छंद, सामाजिक कार्य, वकिली, राजकीय चळवळी अशा कित्येक चित्रविचित्र घटना, व्यक्ती यांचे मनोहारी चित्रण यशवंतरावांनी यामध्ये केल्याचे आढळून येते. त्यामुळे 'कृष्णाकाठ' हे तत्कालीन महाराष्ट्राचा वाङ्मयीन, सांस्कृतिक इतिहासच होय यात शंका नाही. राजकीय नेत्यांची आत्मचरित्रे लिहिण्याची फारशी परंपरा आपल्याकडे नाही. परंतु अलीकडे राजकीय व्यक्ती आत्मचरित्रे लिहू लागल्या आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणाला वळण लावणाऱ्या यशवंतरावांनी आपले आत्मचरित्र लिहिले. हे आत्मचरित्र राजकारणात रस घेणाऱ्यांना तर निश्चितच वाचनीय आहे. शिवाय मराठी साहित्य दरबारात अनेक गुणांनी नटलेली अशी उत्तम ललितकृती आहे.

'कृष्णाकाठ' या आत्मचरित्रामध्ये १९४६ पर्यंतचे चरित्र कथन आले आहे. त्यामुळे त्यांच्या संपूर्ण आयुष्याचा कालपट या आत्मचरित्रामध्ये पूर्ण होत नाही. नंतरच्या काळाबाबतचे कुतूहल या प्रथम खंडात निर्माण होते. 'कृष्णाकाठ'नंतर 'सागरकाठ' व 'यमुनातट' हे त्यांचे आत्मचरित्राचे दोन खंड अपूर्ण राहिले. १९४६ मध्ये मुंबईत वास्तव्य केल्यापासून ते इ.स. १९६२ पर्यंतचा काळ 'सागरकाठ'मध्ये समाविष्ट करण्याचा त्यांचा हेतू असावा व इ.स. १९६२ पासून पुढील काळ दिल्ली

मुक्कामातील आणि जगाच्या राजकारणातील त्यांचे वास्तव्य या काळातील त्यांचे विचार 'यमुनातट' या खंडातून देण्याचा त्यांचा मानस होता. हा मराठी साहित्यातील एक अनमोल ठेवा ठरला असता. स्वत:चे जीवन ते या तीन टप्प्यांतून जगले. ते इतक्या सहजपणे या शीर्षकातून दाखविण्याची त्यांची कल्पना अत्यंत अर्थपूर्ण होती. इ.स. १९६२ पासून पुढे भारताच्या राजकारणात ते सक्रिय झाले. हे तीन खंड पूर्ण झाले असते तर यशवंतरावांचे समग्र आत्मचरित्र रसिकांसमोर आले असते. मात्र ते लिहिण्याची त्यांची इच्छा अकाली निधनामुळे वास्तवात येऊ शकली नाही. 'कृष्णाकाठ'ने मात्र त्यांच्या साहित्यिक अंगाचे पूर्ण स्वरूप साहित्यक्षेत्राला दाखवून दिले यात शंकाच नाही.

कृष्णाकाठचे विशेष

'कृष्णाकाठ'मध्ये यशवंतरावांनी आपल्या गतजीवनातील आठवणी व अनुभव अगदी तटस्थपणे सांगितल्या आहेत. त्यावरून त्यांचे व्यक्तिमत्त्वही अगदी स्पष्ट व ठाशीव स्वरूपात प्रकट झाले आहे. तत्कालीन सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विविध चळवळी व राजकीय जीवनाचे दर्शन यशवंतरावांच्या सूक्ष्म नजरेतून आपणास पाहावयास मिळते. त्यामुळे हे आत्मचरित्र वैशिष्ट्यपूर्ण आहे असे म्हणावे लागेल. यशवंतराव जरी राजकीय पुढारी असले तरी त्यांचे व्यक्तिमत्त्व कसे घडत गेले याचे प्रांजळ व प्रत्ययकारी चित्रण यात आले आहे. त्यामुळे एखादा दस्तऐवज ठरण्याइतकी विश्वसनीयता यास प्राप्त झाली आहे.

यशवंतराव चव्हाण हे मराठीतील नामवंत ललित लेखक आणि मुरब्बी राजकीय नेते होते. 'कृष्णाकाठ' हे शीर्षक असलेले त्यांचे आत्मचरित्र फेब्रुवारी १९८४ मध्ये प्रसिद्ध झाले. विस्तृत अशा या आत्मचरित्रात आपल्या बाहेरच्या आणि आतल्या जीवनाची कहाणी यशवंतरावांनी सांगितली असून आत्मचरित्रातही मी घडलो कसा, हे सांगावे लागणार आहे. परंतु त्या प्रश्नांची उकल करताना सामाजिक पृष्ठभूमीचा फलक अधिक विशाल घेऊन त्याची उत्तरे शोधावी लागणार आहेत,अशी इच्छा त्यांनी प्रदर्शित केली आहे. ज्यांच्या जीवनात काही सांगण्यासारखे आहे तीच माणसे आत्मचरित्र लिहितात. हे वचन यशवंतरावांना पुरेपूर लागू पडते. राजकारणाच्या आणि साहित्याच्या क्षेत्रात त्यांनी मुक्त विहार केला. विविध प्रकारचे लेखन केले. नाना देश-परदेश पाहिलेले, अनेक माणसे भेटलेली, जीवनातल्या उंचसखलपणाचा अनुभव घेतलेला, अधूनमधून सामाजिक चळवळी जवळून पाहिलेल्या अशा या जीवनाच्या व्यापक अनुभवाने त्यांचे व्यक्तिमत्त्व संपन्न आहे.

एका बाजूने त्यांचे व्यक्तिमत्त्व जसे समाजमनस्क आहे तसे दुसऱ्या बाजूने ते आत्ममग्न आणि संवेदनशीलही आहे. चिंतनशील वृत्तीचा एक बलवत्तर धागा त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आहे. त्यामुळे त्यांनी जे या आत्मचरित्रात लिहिले आहे ते केवळ निवेदन नाही. त्याला विचाराची अनेक परिमाणे लाभली आहेत. एका राजकीय नेत्याचे, साहित्यिकाचे आणि समाजमनस्क व्यक्तीचे हे आत्मचरित्र आहे. यशवंतरावांचे हे आत्मचरित्र पाहता असे आढळून येते की यामध्ये लौकिक जीवनापेक्षा आपल्या आंतरिक जीवनाचे दर्शन घडविण्याची यशवंतरावांची इच्छा आहे. आंतरिक जीवनाचे जे काही दर्शन त्यांनी घडविले ते मात्र प्रांजळपणे घडविले आहे. आपल्या आत्मचरित्राला यशवंतरावांनी 'कृष्णाकाठ' हे शीर्षक दिले आहे. त्यामधून यशवंतरावांची निसर्गाची व आपल्या परिसराची, जन्मभूमीची ओढ स्पष्ट होते. कृष्णेच्या आसपासचा प्रदेश त्यांच्या मनोविकासाची वाढ होण्यास कारणीभूत ठरला. कराड ही त्यांची बालजीवनाची कर्मभूमी आहे. त्यामुळे या आत्मचरित्राची सुरुवातच मुळी सुप्रसिद्ध कवी, नाटककार आणि विनोदी लेखक गोविंदाग्रज यांच्या एका कवितेच्या शीर्षकापासून होते. 'कृष्णाकाठी कुंडल आता पहिले ठरले नाही' अशी काहीशी त्या कवितेची ओळ होती, असे यशवंतरावांना स्मरते. त्यांच्या काव्याने यशवंतरावांचे साहित्यिक व्यक्तिमत्त्व घडवले. साहित्यिक ओढ निर्माण केली. यावरून यशवंतरावांची काव्यात्मवृत्ती जशी स्पष्ट होते तसे आपल्या जीवनासोबत आपल्या काळाचे म्हणजे आपल्या काळातील समाजजीवनाचे त्यांना दर्शन घडवायचे आहे, हेही स्पष्ट होते. म्हणजेच 'कृष्णाकाठ' केवळ व्यक्तिगत जीवनाची कहाणी नसून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे एका व्यक्तीने तटस्थपणे पाहिलेली व सांगितलेली तत्कालीन समाजजीवनाची ती कहाणी आहे. एका व्यक्तीच्या जीवनाचे नव्हे तर एका पिढीचे, एका कालखंडांचे जीवन घडविणारे आणि तरीही वाङ्मयीन महत्त्व प्राप्त झालेले हे आत्मचरित्र आहे. यात यशवंतरावांनी आपल्या प्रतिभाशक्तीचा आणि स्मरणशक्तीचा पुरेपूर वापर केला आहे. याचबरोबर संवेदनशक्ती, कल्पकता, उत्कटता, कल्पनाशक्ती याचाही सुंदर उपयोग त्यांनी 'कृष्णाकाठ'च्या निर्मितीसाठी केला आहे. त्यांच्याकडे असलेल्या संवेदनशक्तीमुळे व उत्कटवृत्तीमुळे एखाद्या प्रसंगात ते चैतन्य निर्माण करतात किंवा एखादा प्रसंग जिवंत करतात. असे लेखन करण्यासाठी आवश्यक असणारे भाषाप्रभुत्व यशवंतरावांकडे होते. जीवनातील विविध प्रसंग मार्मिक आणि अचूक शब्दांत त्यांनी शब्दांकित केले आहेत. प्रभावी लेखनासाठी आवश्यक असणारे सर्व गुणधर्म यशवंतरावांकडे होते, हेच यावरून स्पष्ट होते. हे आत्मचरित्र लिहिताना त्यांनी

विशिष्ट दृष्टिकोन स्वीकारलेला दिसतो. यामध्ये आत्मनिष्ठा, व्यक्तिनिष्ठा, वस्तुनिष्ठा, विचारचिंतन याचे स्थान, व्याप्ती त्यांनी आपल्या 'कृष्णाकाठ' मध्ये जागोजागी निश्चित करून त्यासंबंधी तारतम्य ठेवलेले आहे. म्हणून ध्येय-आकांक्षापूर्तीचे किंवा यशवंतरावांच्या धडपडीचे सूत्र धरून त्या आत्मचरित्राची रूपरेषा आखलेली आहे. 'कृष्णाकाठ'मध्ये घटना, प्रसंग, अनुभव इत्यादींची योग्य निवड करून मांडणी केली आहे. त्यामुळे हे आत्मचरित्र प्रवाही तर आहेच शिवाय त्या प्रवाहाला आजूबाजूच्या इतर वर्णनामुळे उठावदारपणाही आला आहे. त्यामुळे या आत्मचरित्रास नीटसा आकार तर प्राप्त झालाच शिवाय त्यास धारदारपणा येऊन जीवनमूल्यात्मकता प्राप्त झाली आहे. त्यामुळे वाङ्मयाच्या इतिहासात यास स्थान द्यावे लागते. हे आत्मचरित्र म्हणजे सहज सायंकाळी शिळोप्याच्या गप्पा माराव्यात आणि एका प्रसंगातून दुसरा प्रसंग सांगावा या पद्धतीने 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्राची मांडणी झाली आहे. हेच या आत्मचरित्राचे वैशिष्ट्य होय. 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्रामध्ये एकूण तीन प्रकरणे आहेत. 'जडणघडण' (१९१३-३०), 'वैचारिक आंदोलन' (१९३०-३७) आणि निवड (१९३७-४६). जडणघडणमध्ये चरित्रनायकाचा जन्म, जन्मग्राम, जन्मकाळची त्यांच्या कुटुंबाची परिस्थिती, कुटुंबाचा विस्तार, परिवार, शेजार, त्यांच्यावर बालपणी घरात किंवा पुढे शाळेत किंवा इतरत्र झालेले संस्कार, ते संस्कार करणाऱ्या व्यक्ती किंवा परिस्थिती, शिक्षण, वाचन इ. चे संस्कार, सामाजिक किंवा इतर कार्यात पडल्यावर आलेले अनुभव, जोडले गेलेले मित्र, त्यांचा जीवनावर आणि मनावर झालेला परिणाम, जीवनात मिळालेले यशापयश, त्यासंबंधी चरित्रनायकाची भावना इत्यादीसंबंधीची माहिती पहिल्या प्रकरणात मिळते आणि यशवंतरावांचे व्यक्तिचित्र वाचकांपुढे साकारत जाते. त्यांच्या आयुष्यातील काही गोष्टी 'कृष्णाकाठ'मधून अनवधानाने वर्णन करायच्या राहून गेल्या असतील, काही विस्ताराने आल्या असे वाटेल. पण हे मुद्दे गौण आहेत. यशवंतराव ही व्यक्ती, त्यांचे व्यक्तिमत्त्व, त्या व्यक्तिमत्त्वाची घडण आणि त्याची वैशिष्ट्ये यांचे दर्शन 'जडणघडण'मध्ये होते आणि ते पुरेसे स्पष्ट आहे. त्यातल्या लहान मोठ्या सर्व आठवणींत त्यांचा प्रत्यक्ष संबंध आहे आणि बहुधा प्रत्येक आठवणीतून यशवंतरावांच्या स्वभावाचा एखादा पैलू किंवा जीवनातला महत्त्वाचा अनुभव किंवा जीवनदृष्टिकोन प्रकट झाला आहे. ते स्वत:कडे अलिप्तपणे, तिऱ्हाईतपणे पाहू शकतात. आपल्या उपकारकर्त्यांचे, सहाय्यकांचे ऋण मोकळेपणाने, कृतज्ञतेने मान्य करतात. आपल्या अपकर्त्यांवरही स्वच्छपणे, धीटपणे बोलतात.

त्यांच्या मनावर सगळ्यात खोल आणि सगळ्यात चिरस्थायी ठसा जर कोणाचा असेल तर तो त्यांच्या आजोळचा, देवराष्ट्राचा व आई विठाईचा. ते म्हणतात,''देवराष्ट्र हे माझे जन्मगाव आणि आजोळ असल्यामुळे माझ्या अगदी लहानपणाच्या आठवणी ह्या देवराष्ट्राच्या आठवणी आहेत. माझ्या जीवनातल्या पहिल्या चार-पाच वर्षांच्या ज्या आठवणी आहेत त्या देवराष्ट्र, वडगाव, कुंडल, ताकारी या गावांशी निगडित आहेत. ग्रामीण जीवनाची पार्श्वभूमी हा माझ्या जीवनाचा श्रीगणेशा आहे. पुढे मी राजकीय कामानिमित्त आणि सरकारी कामासाठी देशांतर्गत आणि सर्व जगातही खूप फिरलो. तरी पण या परिसराची ओढ माझ्या मनात कायमची राहिली आहे. असे का होते ते मला माहिती नाही. पण वस्तुस्थिती ही अशी आहे.'' अशी बालपणाची आठवण ते सांगतात. देवराष्ट्र हे खेडे त्यांच्या जीवनाचा केंद्रबिंदू आहे. कुतूहल आणि जिव्हाळा वाटावा असाच हा परिसर आहे. देवराष्ट्र या गावाशी यशवंतरावांचा लहानपणी सतत संबंध येत असल्याने तेथील सामाजिक परिस्थिती, माणसे, आलेले अनुभव हा त्यांच्या जीवनाचा अपरिहार्य भाग झाला. सर्व स्तरातील लोकांची संगत आणि निकटचा सहवास यामुळे त्यांच्या मनात त्या समाजाविषयी कायमची आपुलकी निर्माण झाली. या आजोळच्या गावातील कितीतरी आठवणी त्यांनी सांगितल्या आहेत. त्या अनुभवाची शिदोरी त्यांना एक प्रकारचे शिक्षण देत होती. कार्यकर्ता म्हणून मनाची तयारी आणि सामाजिक जाणिवांची माहिती त्यांना यातून हळूहळू मिळत गेली. या परिसराबद्दल ते लिहितात, ''देवपण घेऊनच जन्माला आलेले हे गाव. पण यांच्यात राष्ट्र ही कल्पना सामावलेली आहे. सागरोबाच्या चोहोबाजूनी आनंदवनाने भरलेल्या. धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चारही पुरुषार्थ येथे सार्थपणे वावरत असतात. सुपीक जमिनीत बी पेरले म्हणजे चांगले फोफावते. तशी इथली माणसे आणि मने ! या मातीचा गुण आणि माणसांचे मोल हिंडता-फिरता दिसू लागते.'' यावरून यशवंतरावांची देवराष्ट्र या गावाबाबतची ओढ स्पष्ट होते. कोणत्याही व्यक्तीला निसर्गापासून आणि समाजापासून अलग राहून जीवन जगताच येत नाही. यशवंतरावांनीसुद्धा या निसर्गरम्य परिसराचा लहानपणी मनमुराद आस्वाद लुटला. 'कृष्णाकाठ'मध्ये यशवंतरावांनी देवराष्ट्र व आजूबाजूच्या परिसराचे सुंदर चित्र रेखाटले आहे. ते लिहितात,''संपूर्ण कृष्णाकाठ हा माझ्या प्रेमाचा, आवडीचा आणि जिव्हाळ्याचा विषय आहे. महाबळेश्वरात उगमापासून निघावे आणि कृष्णामाईच्या काठाकाठाने थेट राजमहेंद्रीपासून तिच्या मुखापर्यंत जावे असे मला नेहमी वाटते. बदलत्या पात्राची भव्यता पाहावी, निसर्गाचे सुंदरपण मनात साठवावे, तीरावरच्या गावांना भेटी द्याव्यात, लोकांच्या ओळखी करून घ्याव्यात, पिकांनी

डोलणारी शेते पाहावीत असे अजूनही मनात येते.'' यशवंतरावांच्या जीवनाला अधिक व्यापकपणा येण्याला कृष्णाकाठचा परिसर व देवराष्ट्रातील वास्तव्य अधिक कारणीभूत ठरले. किंबहुना येथेच त्यांच्या बालमनावर अनेक संस्कार झाले. त्यामुळे कृष्णाकाठची आठवण झाली म्हणजे बालपणातील आणि ऐन तारुण्यातील जीवनाची जडणघडण करणाऱ्या काळाची आठवण येऊन मन आजही कसे हेलावून जाते असे कृष्णाकाठ व देवराष्ट्राच्या आठवणी सांगताना ते लिहितात.

यशवंतरावांसारखी एखादी व्यक्ती जीवन जगत असते तेव्हा ती विविध जीवन-प्रेरणांनी आपल्या आयुष्याला थोडा थोडा आकार देत असते. त्यांच्या जीवनाला कोणत्याही मोठ्या अगर प्रतिष्ठित घराण्याची पार्श्वभूमी अथवा परंपरा लाभलेली नाही. एका खेड्यातील अत्यंत सामान्य घरात त्यांचा जन्म झाला. कुठलेही खास संस्कार त्यांना वारसा म्हणून लाभलेले नाहीत. त्यांच्याभोवती होते फक्त त्यांचे मन आणि त्या मनाभोवती होता निसर्ग आणि अशिक्षित समाज. या पार्श्वभूमीवर यशवंतरावांना अनेक बरेवाईट अनुभव आले. त्यांच्या जीवनाला आकार देत असताना त्यांना सुखदु:खाचे, आशा-निराशेचे अनेकविध अनुभव आलेले आहेत. पण या सर्व घटनांची, परिणामांची तमा न बाळगताच त्यांच्या जीवन-विकासाचा झगडा चाललेला दिसतो. यशवंतरावांचे बालपण, कृष्णाकाठचे सौंदर्य, देवराष्ट्राचा परिसर, आजोळची माणसे, सामाजिक स्थिती, विविध जातिजमाती, ग्रामीण जीवन इ. सर्व काही तपशीलवार या आत्मचरित्रात येते. आयुष्यातील क्रमवार अनुभवावर व सामाजिक प्रवाहावर त्यांनी भाष्य केले आहे. याचबरोबर अनेक विचारप्रवाह, राजकीय आंदोलने, आत्मछंद, अवतीभोवतीच्या चळवळी यांचेही चित्रण 'कृष्णाकाठ'मध्ये येते. या सर्व घटना, प्रसंगांतून यशवंतरावांचे व्यक्तित्व साकारत जाते. तसेच त्यांचे कौटुंबिक जीवन, शिक्षण, वकिली, १९३९, १९४० आणि इ.स. १९४२ च्या चळवळीतील त्यांचे अनुभव, नाट्य, साहित्य आणि संगीत यांत असलेला रस, काही प्रमुख व्यक्तींची व्यक्तिचित्रे असे अनेक विषय या आत्मचरित्रात प्रसंगानुरूप आले आहेत. पण वैयक्तिक भावनांचा आविष्कार यशवंतरावांनी अपरिहार्य तेव्हाच केला आहे.

'कृष्णाकाठ'मधील 'वैचारिक आंदोलन' हे दुसरे प्रकरण यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनातील इ.स. १९३० ते १९३७ या कालखंडातील राजकीय घडामोडींचा आणि त्यांच्या वैयक्तिक, वैचारिक दृष्टिकोनाचा आलेख होय. यशवंतरावांनी आयुष्यातील महत्त्वाच्या प्रसंगाची एकत्र केलेली ही टाचणे आहेत. त्यांनीच म्हटल्याप्रमाणे त्यांच्या राजकीय मनाचे प्रवासवर्णन करण्याचा प्रयत्न त्यांनी या पुस्तकात केलेला आहे. शाळेत असतानाच त्यांना पहिला तुरुंगवास घडला. याबाबत ते लिहितात,''हो, मी हे सर्व

केले आहे आणि असे करत राहण्याचा आमचा निर्धार आहे.'' पोलीस अधिकाऱ्याने हेडमास्तरांना सांगितले, ''मी ह्या विद्यार्थ्याला अटक करतो आहे आणि घेऊन जातो आहे. त्याच्या पालकांना कळवा.'' आणि अशा रीतीने माझी पहिली शास्त्रशुद्ध अटक झाली.'' शाळेत असतानाच त्यांना पहिला तुरुंगवास घडला. पुढे त्यांच्या मनावर अनेक राजकीय तत्त्वज्ञानाचा परिणाम होऊ लागला. प्रथम ते कम्युनिझमकडे आकर्षित झाले. त्यानंतर ते काही काळ काँग्रेस समाजवादी पक्षाचे कार्यकर्ते झाले. त्यानंतर रॉयवादी झाले. परंतु त्याही मंडळींना त्यांनी सोडले. स्वातंत्र्यानंतर जशा त्यांनी आपल्या राजकीय भूमिका अनेक वेळा बदलल्या तसाच बदल स्वातंत्र्यापूर्वीही घडला. त्याचे स्पष्टीकरण त्यांच्याच शब्दांत सांगितले पाहिजे. ''आम्ही जेलमधून आल्यानंतर काही महिन्यांनी मला समजले की १९३२ सालीच देशातल्या काही प्रमुख तरुण नेत्यांनी जेलमध्ये एकत्र विचार करून काँग्रेस समाजवादी पक्ष स्थापन करण्याचा संकल्प सोडला होता. हा पक्षही काँग्रेस अंतर्गत पक्ष होता. परंतु स्वातंत्र्यासाठी काँग्रेस संघटनेला समाजवादी विचारांची दृष्टी देऊन शक्तिशाली बनवायचे असा या मंडळींचा विचार असावा. यावेळीच माझी जी मनोभूमिका होती ती या विचारांशी मिळतीजुळती अशी होती. त्यामुळे माझे मित्र राघुअण्णा यांनी एक दिवस मला सुचवले, हा तो नवा विचार आणि संघटना जयप्रकाश नारायण, नरेंद्रदेव वगैरे पुढाऱ्यांच्या मार्गदर्शनाने निघत आहे. त्याच्याशी आपण समरस झाले पाहिले. मी त्यांना सांगितले असेच काहीसे विचार माझ्याही मनात आहेत. मग त्यांनी विचारले, ''अडचण कोठे आहे ?'' मी सांगितले, ''माझी अडचण एवढीच आहे आपण ज्या कार्यकर्त्यांबरोबर काम करतो आहोत त्यांना हे पटविल्याशिवाय असे पाऊल उचलल्याने आपण एकाकी तर नाही पडणार ! आणि आज पन्नास वर्षांने तरीही मी हे कबूल केले पाहिजे की माझ्या आतापर्यंतच्या अनुभवाने ही कसोटी माझ्या जीवनामध्ये अत्यंत महत्त्वाची आणि व्यवहार्य कसोटी म्हणून नित्य वावरत राहिली आहे.'' यशवंतरावांच्या विचारांचा गोंधळ त्यांच्या वरील स्पष्टीकरणावरून सहज लक्षात येतो. त्या काळात अनेक राजकीय तज्ज्ञांचा प्रभाव त्यांच्यावर होत होता. त्या प्रवाहात सामील होताना त्यांची मानसिकता कशी घडत गेली याचे सुंदर विवरण त्यांनी केले आहे. त्यामुळे 'कृष्णाकाठ'मधील त्यांचा आत्माविष्कार जीवनातील सत्याशी संबंधितच ठेवला आहे. जीवनातील काही प्रसंग संकोच निर्माण करणारे असतात. पण असे प्रसंग, अनुभव, यशवंतरावांनी अहंभाव, प्रतिष्ठा, नैतिकता आड न येता सांगितले आहेत.

यशवंतरावांना ब्राह्मणेतर चळवळीच्या संकुचित दृष्टिकोनातून बाहेर पडून काहीतरी

केले पाहिजे याची सामाजिक व राजकीय जाणीव शालेय जीवनातच झाली होती आणि देशासाठी काम करण्याची भावना दृढ होत होती. पुढे जतिंद्रनाथांच्या उपोषणाच्या प्रसंगापासून तर त्यांना आयुष्याचा अर्थ समजला व जीवनाचा अर्थ गवसला असे ते लिहितात. त्यामुळे आपण देशासाठी काम करताना कोणती वैचारिक भूमिका घ्यायची हा प्रश्न त्यांनी पहिल्या पंधरा महिन्यांच्या तुरुंगवासाने सोडविला. आचार्य भागवतसारखे विद्वान तेथे त्यांना भेटले. गौतम बुद्ध, येशू ख्रिस्त, मार्क्स , फ्रॉईड यांचे विचार त्यांनी समजून घेतले. यशवंतरावांची विचार करण्याची पद्धत वेगळी होती. कोणताही विचार हा क्रियाशील होण्यापूर्वी तो भावनेने समजावून घ्यावा लागतो अशी त्यांची धारणा होती. जर भावना अपुरी असेल तर त्यातून येणारा विचार हा अपुरा आणि चुकीचा असतो. त्यामुळे यशवंतरावांनी कराड येथे काँग्रेस समाजवादी पक्षाची परिषद संपल्यानंतर आपल्या सहकाऱ्यांना सांगितले, ''परिषद संपून गेल्यानंतर आमच्या जिल्ह्यातील कार्यकर्त्यांशी माझी बरीच उलटसुलट चर्चा झाली आणि मी या मताशी आलो की काँग्रेस समाजवादी पक्षाचा सदस्य म्हणून काम करणे मला शक्य होणार नाही. यावेळी मानवेंद्रनाथ रॉय यांच्या प्रभावाखाली काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा विचार मनात अधिक होता, ही गोष्ट कबूल केली पाहिजे. त्यामुळे ही परिषद संपून गेल्यानंतर एक दोन आठवड्यांतच काँग्रेस समाजवादी पक्षाचा राजीनामा देऊन मी यातून मुक्त झालो.'' यशवंतरावांच्या मनाची अवस्था त्यावेळी कशी झाली होती याचे वर्णन ते वरीलप्रमाणे करतात. या विचारांच्या गोंधळाबरोबरच वैचारिक आंदोलने त्यांच्या जीवनाशी कशी येऊन भिडत होती याचेही त्यांनी केलेले चित्रण मोठे मार्मिक आहे. ते लिहितात, ''माझे हे वैचारिक प्रकरण इतके साधे नव्हते. गांधींच्या नेतृत्वावर निष्ठा, पंडित जवाहरलाल नेहरुंच्या विचारासंबंधी एक नवी जवळीक आणि माझ्या जिल्ह्यातल्या काही मित्रांच्या साहचर्यामुळे नाही म्हटले तरी काहीशा आपुलकीने मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचाराकडे पाहण्याचा दृष्टिकोन अशा एका वैचारिक त्रिकोणात मी यावेळी उभा होतो.'' यावरून यशवंतराव मनातील विचारांचा संघर्ष नेमक्या शब्दांत चित्रित करतातच, शिवाय त्यावर उपाय कोणता करायचा हेही त्यांना समजले होते. ते म्हणतात, ''विचारांचा गोंधळ कितीही असला तरी प्रत्यक्ष कार्यामध्ये त्यांची कसोटी लावल्याशिवाय बरोबर काय आणि चूक काय हे समजत नाही.'' अशा रीतीने या काळात यशवंतरावांची वैचारिक पार्श्वभूमी तयार होत होती. त्यांच्या मोकळ्या स्वभावामुळे कार्यकर्त्यांतही त्यांच्याविषयी विश्वास निर्माण होत होता. ह्या विश्वासामुळेच त्यांच्या कार्याला या वैचारिक गोंधळातून बाहेर काढून प्रवाहित केले होते आणि या वैचारिक आंदोलनातून यशवंतराव घडत होते.

'कृष्णाकाठ'च्या तिसऱ्या प्रकरणामध्ये १९३७ ते १९४६ या कालखंडातील सामाजिक, राजकीय व दुसऱ्या महायुद्धातील राजकीय घडामोडींचा आलेख चितारला आहे. त्यावेळी यशवंतराव कायद्याचा अभ्यास करत होते. त्यांचे लग्नही याचवेळी झाले. प्रमुख घटनाही याच काळात घडल्या होत्या. १९४६ ची निवडणूक व यश याची चर्चाही 'निवड' या प्रकरणात लेखकाने केली आहे. 'निवड' या प्रकरणात यशवंतरावांनी दुसऱ्या महायुद्धातील काँग्रेसची भूमिका मतमतांतरे अत्यंत स्पष्टपणे रेखाटली आहेत. तसेच ९ ऑगस्टची क्रांती, भूमिगत चळवळ, १९४६ ची निवडणूक, त्यात यशवंतरावांचे यश, काँग्रेसच्या वर्किंग कमिटीचा इतिहास, 'भारत छोडो' आंदोलनाचे चित्र, आंदोलनाची पूर्व पार्श्वभूमी, वर्धा येथील वर्किंग कमिटीची बैठक, अलाहाबाद येथील इ.स. १९४२ च्या एप्रिलमधल्या आयोजित केलेल्या वर्किंग कमिटीची बैठक, सर स्टॅफर्ड क्रिप्स यांचे भारतात आगमन, निवडणुकांसंबंधीची यशवंतरावांची मते, निवडणुकीतील त्यांचा सहभाग, डॉक्टर हेडगेवार यांच्याशी झालेली चर्चा, गोलमेज परिषद इत्यादी प्रसंग आणि कितीतरी व्यक्ती येतात. त्यामध्ये आई विठाई, बंधू गणपतराव, पत्नी वेणूताई या जीवाभावाच्या व्यक्ती येथे आहेत, तशा राजकीय व वैचारिक क्षेत्रांतील अनेक व्यक्ती आहेत. या व यासारखे अनेक प्रसंग, राजकीय व सामाजिक गोष्टी विश्लेषण करीत 'कृष्णाकाठ'मध्ये त्यांनी चितारल्या आहेत. या काळात एक महत्त्वाची घटना घडली, ती म्हणजे यशवंतरावांचा विवाह. पुढे त्यांनी आपल्यावरील कुटुंबाची जबाबदारी लक्षात घेऊन कराड येथे वकिलीचा व्यवसाय सुरू करण्याचा विचार केला. तेथे त्यांनी प्रॅक्टिस सुरू केली. चार पैसे मिळू लागले. पण तेथे चालणाऱ्या चर्चा ऐकून हळूहळू ते निराश झाले. या व्यवसायात आपण रमू शकणार नाही असा विचार त्यांच्या मनात आला. यासंदर्भात ते लिहितात,''या सगळ्या अनुभवातून मी जायचा प्रयत्न करीत असताना आपण फार खालच्या स्तरावर या पेशाचे काम सुरू केले, याची थोडीशी बोचणी माझ्या मनात सुरू झाली. कारण ज्या तऱ्हेची स्पर्धा तेथे चालू होती त्या स्पर्धेत मी भाग घेऊ शकत नव्हतो. लॉ कॉलेजच्या लायब्ररीत बसून कायद्याच्या तत्त्वांचा अभ्यास आणि हायकोर्टाच्या निर्णयांचा केलेला व्यासंग यांचा या दैनंदिन कामाशी कोठे संबंध येतो आहे असे मला दिसेना.'' असा त्यांचा वकिली व्यवसायातील विदारक अनुभव नोंदवला आहे. यशवंतराव चव्हाण सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीमध्ये सक्रीय सहभागी झाले होते. त्याकाळात ती चळवळ गनिमीकाव्याची सशस्त्र चळवळ होती. याच चळवळीस पुढे 'पत्री सरकार' असे संबोधिले गेले. सरकारबरोबर आणि

सरकारधार्जिण्या समाजकंटकांबरोबर लढणे हे या चळवळीने महत्त्वाचे काम मानले होते. यशवंतराव चव्हाण या चळवळीत गुंतले होते. सर्वत्र पोलिसांचे फार मोठे दडपण होते. १४ जानेवारीला संक्रांतीच्या दिवशी कराड पोलिसांनी सौ. वेणूताईंना अटक केली. सौ. वेणूताईंना या चळवळीचा अनुभव नव्हता. त्यामुळे त्यांच्या प्रकृतीवर आणि मन:स्थितीवर त्याचा परिणाम होईल असे यशवंतरावांना वाटत होते. पुढे वेणूताईंची तब्येत बिघडली. निश्चित निदान होईना म्हणून त्यांना फलटणला पाठविले. पण तेथे माहेरीही त्यांची तब्येत बिघडल्याचे कळताच यशवंतराव त्यांना भेटण्यासाठी गेले असता पोलिसांनी त्यांना पकडले व दहा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली आणि येरवडा येथील तुरुंगात रवानगी झाली. तेथे त्यांनी राज्यक्रांतीसंबंधीचे बरेच वाङ्मय वाचून काढले; पण आपण सौ. वेणूताईंची कोणतीच अपेक्षा पूर्ण करू शकलो नाही, याची जाणीव मात्र त्यांना सदैव राहिली.

इ. स. १९४२ च्या उग्र आंदोलनानंतर इ.स. १९४६ च्या निवडणुकीत यशवंतराव व काँग्रेस पक्षाचे चारही उमेदवार प्रचंड बहुमताने निवडून आले. सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले. सर्व निवडणुकांमध्ये सरळ, बिनखर्चाची, तत्त्वनिष्ठ व जनतेच्या स्वयंस्फूर्त पाठिंब्यावर निवडून आलेली ही निवडणूक होती. या यशानंतर त्यांनी आईच्या पायाला स्पर्श करून नमस्कार केला. तेव्हा सौ. वेणूताईंनी यशवंतरावांना ओवाळले. त्याविषयी ते लिहितात, ''तेव्हा माझे डोळे पाणावले. मी तिला ऐकू जाईल असे सांगितले, 'वेणूताई, या यशात तुझाही वाटा आहे.' ती किंचित हसली आणि म्हणाली, 'अशी वाटणी करायची नसते.'' या प्रसंगाच्या अनुरोधाने समीक्षक प्रा. स. शि. भावे असा अभिप्राय देतात, ''या एका प्रसंगात यशवंतराव या लेखकाची लेखनामागील वृत्ती प्रकट होते. त्यांचे डोळे पाणावतात. तथापि त्यांची लेखणी पाणावत नाही. तिच्यामुळे पुस्तकांची पाने पाणावत नाहीत. कारण या आत्मचरित्रात महत्त्व चरित्राला आहे. 'आत्म'ला नाही. यशवंतरावांची ही 'आत्म'विलोपी वृत्ती जशी आयुष्यात तशी या आत्मचरित्रातही उतरली आहे. हे 'कृष्णाकाठ'चे मोठे यश आहे.''

'कृष्णाकाठ' यशवंतरावांच्या राजकीय जीवनाचा पट उलगडून दाखवत असले तरी त्यांची कौटुंबिक कहाणी वाचत असताना वाचकांचा कंठ भरून येतो. प्रतिकूल कौटुंबिक परिस्थिती, लहानपणीच वडिलांचा झालेला मृत्यू, चळवळीच्या धामधुमीच्या काळात दोन्ही बंधूंचा मृत्यू, अशा स्थितीत आईची व पत्नीची झालेली मनोवस्था या चिंतेने यशवंतरावांची झालेली भावाकुल मन:स्थिती यांसारखे काही प्रसंग वाचले की हृदय हेलावल्याशिवाय राहत नाही. त्याचबरोबर यतिन्द्रनाथाच्या आत्मबलिदानाने

यशवंतरावांच्या मनाची झालेली सुन्न अवस्था यांसारखे कितीतरी प्रसंग रोमांच उभे करणारे आहेत.

'कृष्णाकाठ'मधील समाजचित्रण

राजकारण म्हणजे निकोप समाजकारण. चव्हाणांचे समाजकारण निरोगी होते. हे 'कृष्णाकाठ'मधील त्यांच्या विश्लेषणावरून लक्षात येते. या आत्मचरित्रात अगोदर परिसराची भौगोलिक माहिती देऊन इतिहास कथन केला आहे. ह्या ग्रामीण पार्श्वभूमीवर त्यांच्या ठिकाणी सर्वसामान्य जनतेविषयी पुढे जी कणव व कैवार दिसून आला त्याची बीजे आढळतात. यशवंतरावांचे विविध समाजाच्या संबंधाचे निरीक्षण व परीक्षण मोठे होते. यशवंतरावांच्या लहानपणातील सणगर, धनगर, मुसलमान, रामोशी यांचा त्यांना लाभलेला शेजार व सहवास हा त्यांच्या आयुष्यातील एक विशेष ठेवा होता. या संदर्भात ते लिहितात, ''आमच्या आजोळच्या घराशेजारी असणाऱ्या मुसलमान कुटुंबाशी असणारा घरोबा, त्याचप्रमाणे शेजारच्या सणगर आणि धनगर मंडळींशी असणारा जिव्हाळा, हे त्यावेळचे सगळे आठवले म्हणजे जातिजमातीतील वैमनस्य ही समस्या पुढे केव्हा, कशी निर्माण झाली हे समजत नाही. एकमेकांशी माणुसकीच्या नात्याची बांधीलकी होती.'' ब्राह्मण समाजाविरूद्ध जो उठाव झाला त्याचीही आठवण ते नमूद करतात. त्यावेळी त्यांना स्वत:ला अनुभवास आलेली विषमता, सामाजिकता, पक्षपात या बाबी त्यांनी योग्य शब्दात मांडल्या आहेत. त्यांच्यावर गांधी, नेहरु यांच्या राजकारणाचा परिणाम तरुण वयात झाला. गांधी टोपी त्यांनी शेवटपर्यंत धारण केली. यशवंतराव कराडमध्ये डुबल आळीत राहात असत. त्यांच्यावर सत्यशोधक चळवळीचा कसा प्रभाव झाला त्याचा उल्लेख त्यांनी या आत्मचरित्रामध्ये अनेक वेळा केला आहे. ''बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी सत्यशोधक चळवळ किंवा पुढे तिला राजकारणामध्ये ब्राह्मणेतर चळवळ असे स्वरूप आले. ती वळवण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे. त्यासाठी बहुजन समाजातल्या मुलामुलींनी शिक्षण घेतले पाहिजे, वाचन केले पाहिजे, सार्वजनिक कामात भाग घेतला पाहिजे. अशा तऱ्हेने मानसिक व वैचारिक वातावरण त्यावेळी तेथे होते.'' अशा तऱ्हेने ब्राह्मणेतर व सत्यशोधकीय चळवळीचे संस्कार त्यावेळी झालेले होते. त्यांचे बंधू गणपतराव यांच्यामुळे सामाजिक संस्कार झाले हे यशवंतराव मान्य करतात. गणपतरावांचा सत्यशोधकीय चळवळीशी संबंध निकटचा होता. त्यामुळे यशवंतरावसुद्धा ओघानेच या चळवळीत सक्रिय सामील झाले. या अगोदर राजर्षी शाहू महाराज या चळवळीचे नेतृत्व करीत होते. १९२२ ला ते वारले. १९२० ते १९३२ पर्यंत भास्करराव

जाधवांची सातारा जिल्ह्यावर पकड होती. १९२४ ला मुंबई कॉन्सिलवर ते सातारा जिल्ह्यातून निवडून गेले. त्यांचा प्रचार यशवंतरावांनी केला. पण १९२९ च्या दरम्यान ते खऱ्या अर्थाने राष्ट्रीय चळवळीकडे आकर्षित झाले. यशवंतरावांचे राजकारण व्यापक होते. ते कोणाचा द्वेष किंवा भेदभाव करत नसत.

लोकमान्य टिळकांच्या काळापासून सातारा जिल्ह्यात राजकीय परिषद भरत असे. १९३१ च्या अधिवेशनात भाई बागल यांना बोलावण्यात आले. बागल यांनी या परिषदेत राजकीय मागण्यांबरोबर आर्थिक स्वरूपाच्या मागण्याही सुचवल्या. यशवंतराव याबाबत लिहितात, ''परंतु पिळल्या जाणाऱ्या शेतकरी समाजाचे जे प्रश्न होते, ते या राजकीय व्यासपीठावर मांडण्याच्या कामात माधवराव व पर्यायाने आम्हीही यशस्वी झालो. याचा आम्हाला आनंद वाटला. स्वराज्याच्या चळवळीला काही अर्थ प्राप्त करून द्यायचा असेल तर सामाजिक आणि आर्थिक प्रश्न यांना स्पर्श केल्याशिवाय आपली स्वातंत्र्याची चळवळ पुढेच जाऊ शकणार नाही.'' चव्हाणांनी भाई बागलांच्या शेतकरीवादी विचारांना पाठिंबा दिला. बागल सत्यशोधकी विचारांचे होते. राजकारणात निकोप समाजकारणाचा पाठिंबा असावा लागतो. आर्थिक प्रश्न समाजकारणापासून व राजकारणापासून दूर ठेऊन चालणार नाहीत, असे चव्हाणांना वाटते. यशवंतरावांनी म. फुले यांचे विचार स्वीकारले. त्यांची त्यांनी प्रशंसा केली. तसेच जग जरी फार पुढे गेले आहे तरी मार्क्सला वाट पुसतच पुढे जावे लागेल असा विचार ते मांडतात.

हरिजन चळवळीच्या गांधीकाळात यशवंतरावांचे लक्ष हरिजनोद्धाराकडे लागले. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रांत श्री. विठ्ठल रामजी शिंदे हे त्यावेळी अग्रेसर होते. त्याकाळी कराडमध्ये हरिजनवस्तीत शाळा चालवण्यासाठी दररोज यशवंतराव चव्हाण शिक्षक म्हणून जात असत. त्यांनी विठ्ठल रामजींना व्याख्यानासाठी कराडला येण्याचे निमंत्रण दिले. त्यावेळी चव्हाणांना जो सामाजिक अनुभव आला तो आजही महत्त्वाचा आहे. देशाच्या अवनतीचे कारण विषमता हे आहे असाच अनुभव त्यांना आला. यावरून म. फुले व महर्षी शिंदे यांच्या कार्याचे मोल त्यांच्या लक्षात आले.

वर्णभेद व जातिभेद त्यावेळी होता. यशवंतराव शिकत असताना त्यांना संस्कृत शिकण्यास प्रतिबंध करण्यात आला. त्या शास्त्रीबुवांचासुद्धा त्यांनी उल्लेख केला आहे. ''मी अब्राह्मणांना संस्कृत ही देववाणी शिकवणार नाही.'' असे संस्कृत शिकविणाऱ्या शास्त्रीबुवांनी सरळ व स्वच्छ शब्दांत त्यांना सांगितले. कोट्यवधी गरीब शेतकरी मागासलेपणात बुडून गेले आहेत. त्यांचे भवितव्य काय? त्यांच्यासारखी अनेक तरुण मुले शिक्षणाची संधी न मिळाल्यामुळे अंधारात आहेत, असा विचार त्यांच्या मनात येई.

यशवंतरावांच्या जीवनावर राष्ट्रीय सभेचे व्यापक संस्कार झाले होते. त्यांना जातीयवाद मान्य नव्हता. 'मराठा' किंवा 'ब्राह्मणेतर' म्हणून त्यांनी कधीच समाजकारण केले नाही. दलितांबद्दल त्यांना सहानुभूती होती. त्यांचा मित्र श्री. उथळे यांच्याबरोबर झालेल्या चर्चेत त्या समाजाची दु:खे त्यांना समजली. महार समाजातील श्री. उथळे या मित्राचे मनोगत व्यक्त करताना ते लिहितात, ''आमच्या समाजाची दु:खे तुम्ही समजता त्याच्यापेक्षा वेगळी आहेत. महात्मा गांधी, डॉ. आंबेडकरांना का बरोबर घेत नाहीत? ते जर त्यांनी केले तर ही गोष्ट बदलून जाईल.'' हे ऐकून यशवंतराव हतबल झाले. त्यांना खिन्नता वाटली. सामाजिक प्रश्न किती अवघड असतात याची त्यांना जाणीव झाली. त्यावेळी खेरांना भेटण्यासाठी एक मोठा मोर्चा आलेला चव्हाणांनी पाहिला. जमिनीवतन म्हणून पिढ्यान् पिढ्या गावगाड्याचे काम महार समाजाकडून करून घेतले जाई. पुढे त्यांनी त्यांच्या काळात महारवतन बिल मंजूर केले, असे हे यशवंतरावांचे समाजकारण होते. सत्ता ही लोकांच्या कल्याणासाठी असते असे ते सांगत. ग्रामीण नेतृत्व पुढे यावे म्हणून जिल्हा बोर्डाचे रूपांतर पंचायत राज्यात केले. ग्रामीण नेतृत्व पुढे आले. ही एक सामाजिक क्रांतीच होती. यशवंतरावांच्या भाषणांमुळे लोकांना सामाजिक शिक्षण मिळाले. बहुजन समाजाला राष्ट्रीय दृष्टी मिळाली. त्यांनी म. फुले, छ. शाहू महाराज, कर्मवीर शिंदे यांचा विचारप्रवाह पुढे व्यापक केला. उन्नत केला. भर घातली. फुल्यांचा मानवतावादी आशय पुढे येण्यास वातावरण निर्माण केले. एकूणच त्यांच्या समाजकारणात उमदेपण, उदारपण व जातिभेदापलीकडची मानवतावादी दृष्टी दिसते.

'कृष्णाकाठ'मधील लेखनशैली

यशवंतराव चव्हाण हे केवळ राजकारणी नव्हते, तर थोर विचारवंत, तत्त्वचिंतक आणि जीवनाचे रसिक अभ्यासकही होते. त्यांच्या आत्मचरित्रात आणि इतरत्र विखुरलेल्या लेखनात राजकारण, धर्मभावना, समाजसुधारणा, साहित्य, कला, सहकार, विकासाच्या दिशा, तरुणांपुढील कार्याची दिशा, आर्थिक प्रश्न, विविध चळवळी यांसारख्या विषयांवर त्यांचे कितीतरी विचार व्यक्त झाले आहेत. 'कृष्णाकाठ' हे त्यांचे उत्कृष्ट आत्मचरित्र आहे. आपण जे जगलो, जसे जगलो ते इतरांना कळावे एवढाच त्यांचा साधा व प्रामाणिक हेतू आहे. त्यांच्या लेखनात जसा साधेपणा आहे तशी तटस्थ अलिप्त वृत्तीही आहे. ज्या कुटुंबात यशवंतराव वाढले त्या कुटुंबात सुरुवातीस फारसे वाङ्मयीन वातावरण दिसत नाही. तरीपण विविध प्रकारच्या पुस्तकांचे आणि मासिकांचे

वाचन, थोरामोठ्यांचा सहवास व पुढे साहित्यिकांचे सांनिध्य या गोष्टी यशवंतरावांची लेखनशैली घडवण्यात काही अंशी कारणीभूत असाव्यात.

'कृष्णाकाठ'मध्ये यशवंतराव बालपणाच्या आठवणींत बरेच रमलेले दिसतात. गरिबीत त्यांच्या मनाचे उन्मेष जसे फुलले तसे त्यांचे बालपणाविषयीचे लेखनही रंगले. तसेच पुढे सामाजिक कार्यातील व राजकारणातील कटू-गोड अनुभव त्यांनी गिळले. परिणामत: 'कृष्णाकाठ'मध्ये त्यांच्या जीवनाच्या पूर्वार्धाचे चित्र स्पष्ट होत गेले. विचारांचा समतोल, सहृदयता, अंतर्मुख वृत्ती, निर्भयता आणि स्पष्टवक्तेपणा हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे गुणविशेषही त्यांच्या लेखनातून उमटले आहेत. साधी, सोपी, जिव्हाळ्याची भाषा यामुळे या आत्मरित्रातील लेखनाची पद्धती सहज बोलावे तशी घडत गेली. त्यामुळे त्यात आपोआपच सहजता आणि स्वाभाविकता आली आहे. आई विठाबाई, पत्नी सौ. वेणूताई, रावसाहेब पटवर्धन, आचार्य भागवत, श्री. निकम, राघुअण्णा लिमये, मानवेंद्रनाथ रॉय, यतिंद्रनाथ दास, आत्मारामबापू, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. राम मनोहर लोहिया, आनंदराव चव्हाण, श्री. बाळासाहेब देसाई, के. डी. पाटील आदी कौटुंबिक, सामाजिक, राजकीय चळवळींतील व्यक्तींची चित्रे सहजसुलभ भाषेने नटलेली आहेत. त्यातही आई विठाई व सौ. वेणूताई यांच्या व्यक्तिरेखेला काही वेगळी झळाळी आहे. यशवंतरावांना जेव्हा पहिली अटक झाली तेव्हा त्यांना दहा बाय बाराच्या खोलीत पोलिस कस्टडीत ठेवले. तेथे त्या खोलीत अगोदरच कृष्णा धनगर हा कैदी होता. त्याचे व्यक्तिचित्रण लेखक असे करतात, ''त्याचे व्यक्तिमत्त्व फार आकर्षक होते. उणापुरा सहा फूट उंच, गोरा पान, नाक-डोळे अतिशय तरतरीत, हनुवटीवर अणकुचीदार दिसणारी बरीच वाढवलेली दाढी, हातापायात खळखळ वाजणाऱ्या त्याच्या बेड्या. हे त्याचे रूप पाहून माझी तब्येत मोठी खूश झाली. माझ्या मनात उगीचच विचार येऊन गेला की, राजसंन्यास नाटकाच्या शेवटच्या प्रवेशात बंदी असलेल्या संभाजीचे चित्र असेच काहीसे असले पाहिजे.'' अशा काही मोजक्या शब्दांत व प्रसंगानी ते एखाद्या व्यक्तीचे यथार्थ चित्रण करतात.

यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व मुळातच सहृदय आणि रसिक असल्याने त्यांच्या लेखनातही त्याचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही. साधे आणि मोजके शब्द, छोटी व सुटसुटीत वाक्ये ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत. त्यासोबत साध्या साध्या उपमाही त्यांच्या लेखनात अगदी सहजपणे येऊन जातात. यशवंतरावांवर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या वैचारिक भाषणांचा प्रभाव पडला होता. कराडच्या घाटावरील भाषणाची ते अशी आठवण सांगतात, ''तुम्ही बसला आहात तो घाट जसा गरम झाला आहे तशी तुमची बुद्धी व मने गरम झाली पाहिजेत.

देशाची तुमच्याकडे आज ही मागणी आहे.'' अशा साध्या पण भावपूर्ण शब्दांचा ते सहज उपयोग करतात. आचार्य भागवतांबद्दल यशवंतराव लिहितात, ''आचार्य भागवत हे सर्वंकष बुद्धीचे गृहस्थ होते. प्रखर विद्वत्ता आणि तितकीच परखड वाणी ही त्यांची दोन मोठी आयुधे होती. ते अनेक विषयांवर तासन्तास बोलत असत आणि ते ऐकूनसुद्धा कोणी मनुष्य बहुश्रुत, ज्ञानी झाला असता!'' अशा या व्यक्तीची आठवण ते सहज सांगून जातात. या त्यांच्या आठवणी उत्कट व प्रत्ययकारी आहेत, शिवाय सूचकही आहेत.

यशवंतराव आयुष्यामधल्या विविध सामाजिक, राजकीय चळवळीत सक्रिय सहभागी झाले. या चळवळीत एक कार्यकर्ता म्हणून त्यांनी केलेल्या लेखनातील आवेश, जिद्द आणि शब्दफेक 'कृष्णाकाठ'मध्ये ठायीठायी पाहावयास मिळते. लेखकाच्या मनातील आशय प्रकटीकरणासाठी शब्दांची हेतुत: केलेली मांडणावळ म्हणजेच त्या कलाकृतीची वाङ्मयीन शैली आणि त्या कलाकृतीला सहाय्यभूत होणारी शब्दकला म्हणजेच शैली यशवंतरावांनी आशय व्यक्त करण्यासाठी वापरली आहे. एक वाणी म्हणजेच वाचा. दुसरे त्यांचे लेखन. यशवंतराव लिहितात किंवा बोलतात ते स्वत:साठी नव्हे तर विराट जनसमुदायासाठी. ते व्यासंगी आणि अभ्यासू ललित लेखक आहेत. त्यांची भाषाशैली मऱ्हाटमोळी आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व जसे प्रसन्न, उमदे विविध अंगी आहे त्याचप्रमाणे त्यांच्या लेखनशैलीचे सामर्थ्य तिच्या पारदर्शक प्रामाणिकपणात आहे. यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वातून आणि जीवनातून त्यांच्या शैलीचा उगम झाला आहे. छोट्या मोठ्या व्यक्तिमत्त्वाचे ठसे त्यांच्या लेखनशैलीवर उमटलेले आहेत. त्यामुळेच यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार त्यांच्या 'कृष्णाकाठ'मधील शैलीवर उमटलेला आहे असे म्हणता येईल.

'कृष्णाकाठ'मधील भाषाशैली

यशवंतरावांनी सामान्य कार्यकर्ता म्हणून आपल्या आयुष्याची सुरुवात केली, पण पुढे स्वकर्तृत्वाने ते मोठे झाले. भरपूर लोकप्रियता मिळाली. कायदा आणि राजकारण, समाजकारण यांसारख्या क्षेत्रांत त्यांनी काम केले. असे असले तरी त्यांचे जीवन अगदी सरळ बिनगुंतागुंतीचे होते. त्यांचे लिहिणे-सांगणे हे सुतासारखे सरळ, मऊ-मुलायम आहे. त्यामुळे त्यांना जे सुरेख रीतीने समजले आहे किंवा समजावून घेतले आहे ते तितक्याच समर्थपणे मांडण्याकडे यशवंतरावांचा कल राहतो. विनाकारण गुंतागुंतीची लेखनशैली ते वापरत नाहीत. त्यांच्या विविध आणि संमिश्र व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब त्यांच्या भाषाशैलीत उमटलेले दिसते. भाषाशैली प्रांजळ, प्रामाणिक, निष्कपट, सरळ

इ. गुणांनी समृद्ध आहे. यशवंतरावांच्या भाषाशैलीला वक्तृत्वशैलीचा बाज आहे. प्रवाहीपणा हा यशवंतरावांच्या शैलीचा विशेष म्हणता येईल. कोट्या, छोट्या छोट्या गोष्टी, किस्से, विनोद, सुभाषितवजा वाक्ये, वाक्प्रचार, म्हणी, सहज बोलीतील सुंदर अन्वर्थक शब्द इ. गुणसंपत्तीने यशवंतरावांची भाषाशैली नटलेली आहे. अगदी सरळपणाने यशवंतराव हे सारे मांडतात. साजश्रृंगार नाही की नखरे नाहीत. जे काही यशवंतरावांनी लिहिले ते सर्वसामान्यांच्या उद्‌बोधनासाठी. त्यामुळे आपली लेखनशैली संवादी, बोलघेवडी, प्रसन्न आणि सोप्या विणीचीच असली पाहिजे अशी जाणीव दिसते. त्यामुळे मनातील तळमळ सामान्य लोकांच्या भाषेत त्यांच्यापुढे मांडण्याची यशवंतरावांची हातोटी विलक्षण आहे.

'कृष्णाकाठ'चे लेखन म्हणजे यशवंतरावांच्या बालपणापासून ते जीवनात मोठ्या पदापर्यंत पोहोचण्याच्या काळापर्यंतचा एक आलेखच होय. या आत्मचरित्रात सर्व काही सांगण्यासाठी जी गद्यशैली वापरली आहे ती अतिशय ओघवती आणि प्रसंगानुसार वळणे घेणारी आहे. त्यासाठी लेखकाने आपल्या अकृत्रिम भाषाशैलीचा वापर केला आहे. एखादा प्रसंग सांगताना त्यांच्या शब्दसामर्थ्याला भरती येते. लेखक जणू आपल्याशी बोलतो आहे असा भास आपल्याला होतो. ''कृष्णाकाठी जसे कुंडल नव्हते व आजही नाही त्याचप्रमाणे देवराष्ट्रही कृष्णाकाठी नव्हतेच व आजही नाही; पण तरीसुद्धा आम्ही सर्वजण स्वत:ला कृष्णाकाठची माणसे समजतो त्याला कारण आहे. कृष्णेत आणि कुंडल किंवा देवराष्ट्र यांच्यामध्ये चार दोन मैलांचे अंतर आहे. पण कृष्णाकाठच्या सुबत्तेची निदान सोबत तरी लाभली आहे, असा एक दिलासा आम्हा मंडळींना वाटत असे आणि म्हणून कृष्णेबद्दलचे प्रेम हे बाळकडूसारखे माझ्या मनात आहे.'' असे हे निवेदन सरळ, सहज आणि मनाला भिडणारे आहे. 'कृष्णाकाठ'मध्ये कितीतरी सुभाषितवजा वाक्ये आली आहेत. कारण त्यांचे व्यक्तिमत्त्व संस्कारशील होते. जे चांगले ते उचलावे असा त्यांचा पिंड होता. त्यामुळे अर्थातच त्यांच्या शैलीत सुभाषितांची पखरण दिसते. ''माझी आई निरक्षर होती पण मनाने अतिशय सुसंस्कृत होती.'' असे उद्‌गार ते आईबद्दल काढतात. तर ''मोठी माणसे आपल्या कर्तृत्वाने मोठी झालेली असतात.'' असा विचार ते सहज प्रकट करतात. ते स्वत:संबंधी लिहितात, ''माझे राजकीय शिक्षण माझ्या जीवनाच्या शाळेत होत होते.'' ''तर्क आणि जीवन नेहमीच हातात हात घालून चालते हे खरे नाही'' किंवा ''आयुष्यात काही गोष्टी केव्हा केव्हा आपणहून चालत येतात, तेव्हा त्यांना नकार न देता सामोरे जावे लागते. त्या पुन्हा अशा येतीलच याची खात्री नसते.'' अशी कितीतरी विचारगर्भ व चिंतनशील सुभाषिते 'कृष्णाकाठ'मध्ये सहज येतात.

संवादांचा वापर व विनोदी वृत्ती तर यशवंतराव चव्हाणांच्या भाषाशैलीचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य. एखादा प्रसंग, त्या प्रसंगातील सर्व नाट्य, मानवी जीवनाचा संदर्भ आणि स्वत:च्या मनात उठलेले भावतरंग तेवढ्याच सहजतेने आणि परिणामकारकपणे ते प्रकट करतात. एकदा यशवंतराव तमाशा पाहण्यासाठी पाच-सहा मित्रांना घेऊन जात असताना समोरून त्यांच्या शाळेचे शिस्तप्रिय ड्रिल मास्तर येताना दिसले. या मुलांना पाहिल्यानंतर मास्तरांनी त्यांना विचारले, ''कोठे चाललात रे एवढ्या संध्याकाळी? 'मी पुढे होऊन सांगितले, ''आम्ही स्टेशनवर चाललो आहोत. तेथे टॉम शॉ येणार आहे. त्यांना बघायचे आहे.''

ड्रिल मास्तरांनी आम्हाला विचारले,

''हा कोण टॉम शॉ ?''

मी त्यांना सांगितले,

''हा बर्नार्ड शॉ चा भाऊ आहे.''

आमचे उत्तर मास्तरांना पटलेले दिसले. आणि ते म्हणाले,

''जा, जा. चांगले आहे.''

ते पुढे निघून गेल्यानंतर आम्हाला हसू आवरले नाही. हसत खिदळत त्या मित्राच्या घरी पोहोचलो आणि त्याला ही कहाणी सांगितली. तेव्हा फारच मजा आली.'' वरील संवादावरून यशवंतरावांची विनोदी वृत्ती तर दिसतेच शिवाय तेवढ्याच मिस्किलपणे ते शब्दकोट्या करताना दिसतात.

यशवंतराव लहान असताना ते वारंवार आजोळी देवराष्ट्राला जात. तेव्हा तेथे त्यांचा मित्र श्री. सखाराम म्हस्के व यशवंतराव यांच्यात वारंवार संवाद होत असे. यशवंतराव ती आठवण अशी सांगतात, ''ते मला नेहमी म्हणायचे

''तू किती शिकणार आहेस?''

मी सांगत असे

''जितके जास्त शिकता येईल, तितके मी शिकणार आहे.''

ते मला म्हणायचे

''मामलेदार होण्याइतके तू शिकशील का?''

मी त्यांना उत्तर देई

''हो, इतके तर नक्कीच शिकेन.''

मग पाणावलेले डोळे करून ते मला म्हणायचे, ''हो, जरूर हो मामलेदार. मामलेदार झाल्यानंतर विट्याला बदली करून घे. मग पाटील आणि सगळी मंडळी जमली असताना

तू मला नावाने हाक मारून आपल्या जवळ बोलावून घे. माझी गावात केवढी मोठी इज्जत वाढेल !'' हा प्रसंग संवादामुळे आपल्या नजरेसमोर जसाच्या तसा उभा राहतो. आणि त्यातून त्या व्यक्तीचे स्वभावही कळण्यास मदत होते. निवडणूक जिंकल्यानंतर यशवंतराव घरी येतात तेव्हा ते व त्यांची पत्नी या दोघांमधील संवादही त्यांनी मार्मिकपणे वर्णन केला आहे. एखादा प्रसंग, त्या प्रसंगातील सर्व नाट्य, मानवी जीवनाचा संदर्भ आणि स्वत:च्या मनात उठलेले भावतरंग यशवंतराव तेवढ्याच सहजतेने प्रकट करतात.

'कृष्णाकाठ'मधील काव्यात्मक वृत्ती

यशवंतरावांच्या काव्यात्मक वृत्तीचे दर्शन 'कृष्णाकाठ'मध्ये अनेक वेळा होते. यशवंतराव कृष्णा, कोयना, वेण्णा या नद्यांच्या उगमाचे वर्णन पुढीलप्रमाणे करतात, ''महाबळेश्वरात एकाच ठिकाणी पाच नद्या उगम पावतात. डोंगराच्या वळचणीतून वेगवेगळ्या अंगांनी वाट काढीत सपाटीवरून धावताना दिसतात. या पाच बहिणींचे परस्परावरचे प्रेम मोठे अमर्याद. जन्मस्थळापाशी त्यांचे वेगवेगळे अस्तित्व दिसते. पण ते तेवढ्यापुरतेच. फुगडीचा फेर त्यांनी धरला आहे, असे दिसावे तोच त्या हातात हात घालून, गोफ विणून एकजीव होऊन जातात आणि गोमुखातून बाहेर उडी घेतात. मग मात्र यातील कृष्णा कोणती, कोयना कोणती, वेण्णा कोणती? दिसते ती एक धार. गोमुखातून ही शुभ्र धार कुंडात उडी घेते आणि पुन्हा जमिनीच्या खालून वाटा काढीत वेगवेगळ्या वाटांनी या बहिणी निघून जातात.'' अशा स्वरूपाचे यशवंतरावांचे काव्यात्मक वृत्तीचे सूक्ष्म दर्शन येथे घडते. एवढेच नव्हे तर या काव्यात्मक आणि संवेदनक्षम वृत्तीचे दर्शन 'कृष्णाकाठ'मध्ये ठायी ठायी घडते. देवराष्ट्राच्या विशाल आणि प्रसन्न वातावरणाचे वर्णन ते या गावाबद्दल वाटणाऱ्या प्रेमापोटी करतात. हे गाव ऐतिहासिक अवशेषांनी भरलेले आहे. इथे लेणी आहेत. देवळे आहेत. सर्वात जुने मंदिर म्हणजे समुद्रेश्वराचे. म्हणजेच महादेवाचे गाव. त्याला सागरोबा म्हणतात. आसपासच्या टेकड्या, ऋषीमुनींच्या गुहा यासारखे वातावरण त्यांना प्रसन्न वाटे. त्यामुळे सोनहिरा व त्या परिसराची आठवण सांगताना ते लिहितात, ''समुद्रात स्नान केले की त्रिलोकातील तीर्थक्षेत्राचे पुण्य मिळते, अशी जुनी माणसे म्हणतात. त्याचप्रमाणे अमृतसेवनामुळे सर्व जीवनरसांचे सेवन घडते, असेही म्हणतात. इथे मात्र साक्षात समुद्रेश्वरच कुंडात उभा आहे आणि त्याच्याच प्रेमामृताने 'सोनहिरा' वाहतो आहे. या लहानशा नदीला लोक ओढा म्हणतात. तिथे डुंबण्यात माझे बालपण गेले. त्यातील अमृतमय पाणी माझ्या पोटात आहे ! 'सोनहिऱ्या'ची ही अमृतभूमी म्हणजेच माझे हे आजोळ. माझा अंकुर अवतरला तो

इथेच.'' असे बालपणातील ते मोरपंखी दिवस यशवंतरावांनी आपल्या मनात जपून ठेवले आहेत. अशा या काव्यात्मकतेसोबत एक रसिकतेचा धागाही यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वात दिसतो.

'कृष्णाकाठ'मधील चिंतनशीलता

काव्यात्मकतेप्रमाणे चिंतनशीलता हा यशवंतरावांच्या प्रकृतीचा धर्म आहे. शिक्षण, छोट्या मोठ्या चळवळी, वकिली व्यवसाय, राजकारणानिमित्त पाहिलेल्या वेगवेगळ्या प्रदेशांनीही दिलेला अनुभव यांची समृद्धी, बहुश्रुतता, वाचन, चिंतनातून मनाचा झालेला विकास, चौफेर निरीक्षण, लोकसंग्रहामुळे झालेले मनुष्यस्वभावाचे विपुल ज्ञान अशा अनेक गोष्टींमधून चव्हाणांची चिंतनशीलता संपन्न झाली आहे. ते म्हणतात, ''या पार्श्वभूमीवर माझे विचारविश्व बनत होते. केव्हा केव्हा असे होई, की ज्यांचे म्हणणे ऐकावे, त्यांचे म्हणणे बरोबर आहे असे वाटे, पण मग सगळ्यांचेच म्हणणे बरोबर कसे असेल? कोणते तरी एकच म्हणणे बरोबर असेल. पण ते कोणते? याचा निर्णय आपण आपल्या मनाशी केला पाहिजे. शेवटी मी मनाशी ठरविले की कोणताही निर्णय, कोणी सांगितले म्हणून आपण स्वीकारायचा नाही. विचारांच्या क्षेत्रातील निर्णय हा आपला आपणच केला पाहिजे आणि त्यासाठी आपण वाचन केले पाहिजे. चिंतन केले पाहिजे.'' अशा प्रकारे चिंतनशील वृत्तीने यशवंतराव स्वत:ची ओळख करून देतात. मुलभूत मानवी मन आणि सामाजिक प्रेरणा सर्वत्र एकसारख्या असल्याने आपण या सर्वांत कुठे बसू शकतो याची जाणीव ते व्यक्त करतात.एवढेच नव्हे तर स्वत:ला सुंदर रूपात मांडण्याचा त्यांचा हा प्रयत्न आहे.

एकदा यशवंतराव, त्यांची आजी आणि आई असे तिघे मिळून पंढरपूरला गेले. त्यावेळी त्यांना पंढरपूरच्या विठोबाचा आलेला अनुभव व नंतर त्यांनी केलेले भाष्य अतिशय महत्त्वाचे आहे. ते म्हणतात, ''मी कुठल्या एका दगडाच्या मूर्तीत ईश्वर आहे असे कधी मानत नाही. परमेश्वर म्हणून कुणी एक व्यक्ती कुठे बसून आहे आणि सर्व जग चालविते आहे असे माझे मत नाही. परंतु आपल्याला न समजणारी अशी एक जबरदस्त शक्ती आहे व तिचे अस्तित्व मानणे आवश्यक आहे. त्याशिवाय अनेक गोष्टींचा उलगडाच होत नाही. बुद्धिवादाने ईश्वर आहे, हे सिद्ध करता येत नाही. तसेच तो नाही हेही सिद्ध करता येत नाही. म्हणून ज्या ठिकाणी शेकडो वर्षे समाजपुरुष नतमस्तक होत आला तेथे नतमस्तक होणे मी श्रेयस्कर मानतो. मंदिराला जाण्याच्या पाठीमागची माझी भावना हीच आहे. याच भावनेने मी तुळजापूरला जातो. प्रतापगडला जातो. यामध्ये देवभोळेपणाचा भाग नसतो. परंतु हे करण्याने माझ्या मनाला एक प्रकारचे आंतरिक समाधान लाभते. ही गोष्ट मी कबूल केली पाहिजे.'' अशी ही

चव्हाणांची चिंतनशीलता आत्मानुभवी व वास्तवाधिष्ठित आहे.

यशवंतराव चव्हाण १४ एप्रिल १९४६ साली जेव्हा सातारहून मुंबईला नवा पदभार सांभाळण्यासाठी डेक्कन क्वीनने निघाले तेव्हाचे त्यांचे विचार फार महत्त्वाचे आहेत. ते म्हणतात, ''गाडीत निवांत बसल्यानंतर माझ्या मनात विचारांचे काहूर उठले. भूतकाळातील सुखदु:खांची धूसर क्षणचित्रे डोळ्यांपुढे येऊ लागली. त्याचप्रमाणे अनोळखी पण रंगतदार भविष्याची बोटेही आपल्याला पालवताहेत, असे वाटले. माझ्या मनात येऊन गेले, की माझ्या जीवनात मोठा बदल झाला आहे. कृष्णाकाठी वाढलो, हिंडलो, फिरलो, झगडलो, अनेक नवी कामे केली, मैत्री केली, माणसे जोडली, मोठा आनंदाचा आणि अभिमानाचा काळ होता. आता मी कृष्णाकाठ सोडून नव्या क्षितिजाकडे चाललो आहे. आता ती क्षितिजे रंगीत दिसत आहेत परंतु प्रत्यक्षात तेथे पोहोचेपर्यंत ती तशीच राहतील का? कोण जाणे ! आणि आमची डेक्कन क्वीन खंडाळ्याच्या घाटातून एकापाठोपाठ एक बोगदे मागे टाकत वेगाने चालली होती. कधी अंधार तर कधी प्रकाश असा खेळ खेळत आमचा प्रवास चालला होता. पुढच्या जीवनाचे हे प्रतीक तर नव्हते?'' यशवंतरावांनी येथे जे जीवनाचे प्रतीक वाटले ते अत्यंत सूचकतेने मांडले आहे आणि आपल्या भावी आयुष्याच्या पटाचा निर्देश केला आहे. अशा स्वरूपाची विचारचिंतने 'कृष्णाकाठ'मध्ये आली आहेत. 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्राबाबत कृष्णराव सरडे असा अभिप्राय देतात, ''प्रकाशित झालेल्या पहिल्या खंडात त्यांच्या लेखणीला कुंचल्याचे सामर्थ्य आले आहे. शब्दांनी आकार साधले आहेत. रंगसंगती बेमालूम जुळली आहे. वाणीने लेखकाचे व लेखणीचे वाणीचे रूप ल्याले आहे. अशा रीतीने 'One who touches the book, touches the man' याची अनुभूती देणारे यशवंतरावांचे आत्मचरित्र हे जणू सरस्वतीच्या खजिन्यातील एक अमोल चित्र बनले आहे. राजकारणाच्या रणधुमाळीतून फुरसतीच्या वेळात यशवंतरावांनी दिलेले साहित्याचे सुवर्ण आणि विचारसंपदेचे लावण्य ज्येष्ठ साहित्यिकांनी मराठी शारदेच्या दरबारी गौरव करण्याजोगेच आहे.''

'कृष्णाकाठ'चे वाङ्मयीन मूल्यमापन

'कृष्णाकाठ' या आत्मचरित्राचे मूल्यमापन करताना काही गोष्टींची नोंद करणे महत्त्वाचे वाटते. आत्मचरित्रकाराजवळ प्रांजळपणा हा आवश्यक गुण असला पाहिजे. तसेच प्रामाणिकपणा, निष्कपटपणा, सरळपणा इ. गुण असणे गरजेचे असते. याचबरोबर सभ्यपणाच्या व सौजन्याच्या मर्यादा सांभाळून सत्यदर्शन घडवावे लागते. प्रांजळपणे

केलेल्या आत्मकथनाला अन्य कोणत्याही समर्थनाची आवश्यकता नसते. उदा. तमाशा पाहण्यासाठी निघालेल्या यशवंतराव व त्यांच्या मित्रांनी शाळेतील शिस्तप्रिय असलेल्या ड्रील मास्तरला सफाईदारपणे चकवल्याचा प्रसंग. रघुअण्णा यांच्याबरोबर तळकोकणात गेल्यानंतर जेवण घेताना मराठा म्हणून आलेला अनुभव ''तेव्हा त्यांच्या घरात सोप्यात माझ्यासाठी जेवणाची वेगळी व्यवस्था केली होती आणि त्या मंडळींची आत स्वतंत्र व्यवस्था होती. हा प्रकार पाहून राघुअण्णा काहीसे ओशाळले. त्यांनी आपल्या लिमये नातेवाईकांना सांगितले, तुम्ही आत जेवा, मी आणि यशवंत बाहेरच जेवायला बसू.''

तसेच यशवंतरावांनी संस्कृत शिकवण्यासाठी अनंतराव कुलकर्णी यांच्यामार्फत शास्त्रीबुवांकडे शिक्षण घेण्याचे ठरवले व तशी शास्त्रीबुवांना विचारणा केली तेव्हा ''मी अब्राह्मणांना संस्कृत देववाणी शिकवणार नाही.'' हे ऐकून यशवंतरावांना अतिशय दु:ख झाले. असे काही निवडक प्रसंग ज्यातून यशवंतरावांना अपमान, दु:ख सहन करावे लागले ते त्यांनी प्रांजळ आणि प्रामाणिकपणे सांगितले आहेत. कोणताही आडपडदा न ठेवता त्यांनी असे कितीतरी प्रसंग सांगितले आहेत. त्यामुळे 'कृष्णाकाठ' हे आत्मचरित्र यशस्वी झालेले दिसते.

यशवंतरावांनी त्यांच्या जीवनात घडलेल्या घटना, प्रसंग, अनुभव, व्यक्ती यांच्या आधारे आपल्या जीवनाचा अन्वयार्थ मांडला आहे. पण काही प्रसंगी पुरेशी तटस्थता पाळली नाही. शिराळा तालुक्यातील बिळाशी गावात झालेल्या इ.स. १९३० सालच्या बंडाविषयी सविस्तर माहिती देण्याऐवजी त्यांनी स्वत:ला करावा लागलेला खडतर प्रवास याचेच सविस्तर वर्णन केले आहे. यशवंतरावांचे बंधू गणपतराव इंदूरला शेती करण्यासाठी गेल्यानंतर आणि त्यांच्या अनुपस्थितीत यशवंतराव व त्यांच्या मातोश्री यांची झालेली अवस्था ते अधिक हळवेपणाने स्पष्ट करतात. ''आईचा जीव बेचैन झाला आणि ती बेचैन झाली म्हणजे मी खूप निराश होई. कधी कधी डोळ्यांत पाणी उभे राही. माझा भाऊ दूरच्या प्रदेशात एकटा काय करेल या चिंतेने मन व्याकुळ होई. बाबूरावांच्याकडून पत्ता घेऊन गणपतरावांना मी एक लांबलचक पत्र लिहिले. पत्र भावनाप्रधान होते. त्यामध्ये विचार असे काही असतील असे मला वाटत नाही. आई किती दु:खी आहे हे मात्र मी त्यांना कळविले आणि परत या, असे विनवले.'' त्यांच्या या हळवेपणामुळे या आत्मचरित्राला भाव विवशतेचा दोष प्राप्त होतो. याचबरोबर प्रति-सरकारासंबंधीचे अधिक विवेचन येणे अपेक्षित होते. पण त्याविषयीचे यशवंतरावांचे फारसे भाष्य येत नाही. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्याबद्दलची माहिती तपशीलाने फारशी येत नाही. तुलनेने इतर सामान्य

कार्यकर्त्यांची व नेत्यांची अधिक माहिती येते. सातारा जिल्ह्यातील जुन्या सहकाऱ्यांचा फक्त एखाद्या वाक्यातच जरुरीपुरताच उल्लेख केला आहे. अधिक लिहिण्याचे टाळले आहे. म्हणूनच त्यांना काटेकोरपणा व तटस्थपणा पाळता आला नाही, असे म्हणता येईल. या संदर्भात गंगाधर पानतावणे लिहितात, ''दूरच्या रत्नागिरीला गेल्यावर सावरकरांची भेट घेण्यासाठी त्यांची जी अनावर उत्सुकता दिसते, ती क्रांतिसिंह नाना पाटील किंवा ब्राह्मणेतर चळवळीतील नेत्यांविषयी दिसत नाही. ते मनाने राष्ट्रीय चळवळीशी बांधले गेले आणि पं. लक्ष्मणशास्त्री जोशी, काकासाहेब गाडगीळ यांच्यासारख्यांच्या देशभक्तिपर भाषणांनी अधिक प्रभावित झाले असे दिसून येते. एका अर्थी फुले की टिळक या संभ्रमातून त्यांची सुटका झाली असेच म्हणता येईल.'' हा पानतावणेसरांचा अभिप्राय अतिशय बोलका आहे. 'कृष्णाकाठ'मध्ये यशवंतरावांनी तरीही खऱ्या गोष्टी सरळ सहज पद्धतीने तपशीलवार सादर केल्या आहेत. याशिवाय त्यांच्या मनात ज्यांच्याविषयी मतभेद आहेत, दुराग्रह आहेत. ज्यांच्याविषयी स्वच्छ मत नाही अशा काही व्यक्तिचित्रणावर फारसे विवेचन येत नाही. उदा. क्रांतिसिंह नाना पाटील, वसंतदादा पाटील, जी. डी. लाड वगैरे समकालीन व्यक्तींवर लेखकाने अस्पष्ट भाष्य केले आहे.

'कृष्णाकाठ'मध्ये यशवंरावांनी माणूस म्हणून स्वत:चे गुण दोष समतोलपणे चितारले आहेत. आपल्या जीवनाशी निगडित असलेल्या प्रसंगास अथवा एखाद्या दोषावर मात करण्यासाठी पदोपदी तटस्थपणाची, मूल्यदृष्टीची गरज असते. या कसोटीवर 'कृष्णाकाठ' पुरेपूर उतरले आहे. यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलू आपणास येथे पाहावयास मिळतात. संस्कारक्षम कृतीतून जडणघडण, जिद्द, चौकसपणा, धाडस, धडपड, वास्तवाचे भान, अपरिमित देशभक्ती, उपक्रमशीलता, माणुसकीचा ओलावा, संयमशीलता, ध्येयवाद, आपल्या वाणीने विरोधकांवर विजय मिळविण्याची कृती, समाजाचे गुणदोष ओळखायची कृती, साहित्य-कलाविषयी अभिरुची, निरपेक्ष मैत्री, दूरदर्शीपणा, चिंतनशीलता, प्रभावी वक्तृत्व, कुशाग्र बुद्धिमत्ता, महत्त्वाकांक्षा, मातृभक्ती, विकासाचा ध्यास, नीतिमूल्यावर श्रद्धा, गुणपूजकता, वाङ्मयप्रेम यासारखे अनेक व्यक्तित्वगुण आपणाला पाहावयास मिळतात. शिवाय रसिक यशवंतराव व माणूस यशवंतराव यांचा एकात्म साक्षात्कार होतो.

या आत्मचरित्रात बालपणापासून संस्कार, जडणघडण, वैचारिक आंदोलन, आदर्श व्यक्ती, कौटुंबिक जीवन, रसिकता यांसारख्या अनेक घटनांचा, प्रसंगांचा, विचारांचा नेमकेपणाने उल्लेख केलेला आहे. याचबरोबर राजकीय क्षेत्रात प्रवेश केल्यापासून अत्युच्च पदाला पोहोचेपर्यंत त्यांनी केलेली धडपड, प्रयत्न यांचे सुंदर

चित्रण वाचकांस भुरळ घालणारे आहे. स्तिमित करून टाकणारे आहे. म्हणून एक वाङ्मयीन आत्मकथन म्हणून 'कृष्णाकाठ'ला मराठी साहित्यात महत्त्वाचे स्थान आहे.

'कृष्णाकाठ'मधून तत्कालीन रीतीरिवाज, त्या काळातील वाङ्मयीन अभिरुची, समाजव्यवस्था, सांस्कृतिक जीवन, महाराष्ट्र चळवळी, राजकीय इतिहास इत्यादींच्या विशेष नोंदी, उल्लेख आल्याने या आत्मचरित्रास ऐतिहासिक मूल्यही प्राप्त होते. तसेच भूतकाळातील घटना, प्रसंग त्यांनी शक्यतो कालक्रमानिष्ठ व चढत्या क्रमाने मांडले आहेत. आणि या सर्व मांडणीतून यशवंतरावांनी व्यक्तिविकास साधलेला आहे. त्याचबरोबर स्वानुभवातील नाट्य, त्यांनी केलेला मूल्यसंघर्ष, त्यांनी घेतलेला सत्याचा ध्यास, त्यांची भावनात्मक अवस्था, त्या त्या वेळची त्यांची वैचारिक मन:स्थिती, त्यांना लाभलेल्या यश-अपयशाच्या वेळची मन:स्थिती, संभाव्य ध्येये किंवा साध्य यांच्याविषयीची मनातील व्याकुळता, मधूनच मनात येणारे मोहाचे, स्वार्थाचे, आकर्षण या व यासारख्या कितीतरी प्रसंगांची मांडणी त्यांनी अतिशय चैतन्यपूर्ण केली आहे. त्यामुळे 'कृष्णाकाठ'मधील घटना, प्रसंग, अनुभव आणि व्यक्ती जिवंत साकारल्या आहेत. 'कृष्णाकाठ'मधील यशवंतरावांची आत्मशोधकाची आणि जीवनसत्यशोधकाची वृत्ती आणि कलात्मकता येथे पूर्णपणे पणाला लागली आहे. या सर्व गुणसमृद्धतेमुळे 'कृष्णाकाठ'ला वाङ्मयीन मूल्यात्मकता प्राप्त झाली आहे, असेच म्हणावे लागेल.

○ ○ ○

बंध-अनुबंध

यशवंतरावांचे आत्मकथनपर स्फुटलेखन निरनिराळ्या नियतकालिकांतून सुरुवातीस प्रसिद्ध झाले. हे स्फुटलेख 'महाराष्ट्र टाईम्स', 'केसरी', 'सह्याद्री', 'सकाळ', 'राजस' आदी नियतकालिकांतून प्रकाशित झाले आहेत. तसेच 'ऋणानुबंध', 'यशवंतराव चव्हाण : शब्दांचे सामर्थ्य', 'युगांतर', 'विदेश दर्शन' यासारख्या त्यांच्या काही पुस्तकांत आत्मकथनपर लेख संग्रहित झाले आहेत. या आठवणींमध्ये सुरेख वीण गुंफली आहे. या विविध लेखांमध्ये अनुभवांचा, भाषणांचा, समावेश होतो. त्याचप्रमाणे सहवासात आलेल्या व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वांचाही समावेश होतो. यातून यशवंतरावांचे बहुमुखी, बहुश्रुत व चिंतनशील व्यक्तिमत्त्व प्रकट होत जाते. तसेच यशवंतरावांचे व त्यांच्या लेखनशैलीचे विविध पैलू व वैशिष्ट्ये प्रकट होतात. त्यातून त्यांच्यातील साहित्यिक अंगाचे स्वरूप जाणवल्याशिवाय राहात नाही. त्यामुळेच या आत्मकथनपर लेखांचे मोल हे वाङ्मयीनदृष्ट्या लक्षणीय आहे.

आत्मकथनपर लेखाची जातकुळी ही इतर वाङ्मयप्रकारापेक्षा वेगळी आहे. कारण काल्पनिक वातावरणापेक्षा वास्तवपूर्ण जीवनाचे सत्यकथन या लेखनात असते. यामधून प्रकट होणारे जीवन अपरिचित किंवा असंभाव्य वाटत नाही. म्हणून 'स्व'च्या जीवनातील कुतूहल व आस्था निर्माण करते. त्याचबरोबर या स्फुटलेखनातील 'कडूगोड' आठवणींचा सूर साधारणपणे रम्य, गहिरा, खेळकर व मोकळा असतो. तसेच लेखकाच्या जीवनासंबंधीचे हे लेखन तारतम्याची जाणीव ठेवून, शोधक बुद्धीने केलेले असते. त्यामुळे या लेखनातील सूर गंभीर व सघन असतो. पण अशा आत्मकथनपर लेखनातून व्यक्तीच्या जीवनाचे समग्र आणि यथार्थ चित्रण साकारणे कठीण असते. याला कारण हेतुभिन्नता व सुटसुटीतपणा हेच होय. या स्फुटलेखनामध्ये विशिष्ट, मोजके व लक्षणीय

वाटणारे घटना-प्रसंग निवडून त्यांची गुंफण केली जाते.

आत्मकथनपर स्फुट लेखनाचा मुख्य हेतू आपले विचार, भावना यांना वाट करून देणे हा होय. प्रत्येक माणसाला आपल्या मनातील विचारांना आणि भावनांना वाट करून दिल्याने बरे वाटते. मग ते विचार, भावना सुखाचे असो अथवा दु:खाचे असो. आपली सुखदु:खे कुणाला तरी सांगावीत आणि ती कुणीतरी मन लावून ऐकावीत असे प्रत्येकाला वाटत असते. जीवन जगत असताना जे दु:खाचे अनुभव माणसाला येतात ते कुणाजवळ तरी मोकळेपणाने सांगून टाकले पाहिजेत म्हणजे मनावरील भार हलका होतो. सुखात्मक अनुभव सांगितले तर आपल्या आयुष्यातील सुखद प्रसंगात कुणीतरी वाटेकरी झाला याचा आनंद माणसाला निश्चित मिळत असतो. हे सारे कुणाला तरी सांगणे शक्य नसते. तेव्हा आपली जीवनकथा लिहून हा आनंद माणसाला मिळवता येतो. यासाठीच आत्मकथनपर स्फुट लेखनाचा उपयोग केला जातो.

यशवंतरावांसारखी व्यक्ती साहित्यिक असल्याने त्यांच्या या निवेदनात साहित्यिक म्हणून असलेल्या भूमिकेला महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. यशवंतरावांसारख्या साहित्यिकांची समाजात निर्माण झालेली प्रतिमा, वाचकांचे या व्यक्तीच्या जीवनाबद्दलचे व वाङ्मयीन निर्मितीबद्दलचे असलेले कुतूहल याची नेमकी जाणीव आत्मकथनपर लेखन करणाऱ्या या लेखकाला आहे. या पूर्ततेसाठी घटना व प्रसंग यांची सुंदर गुंफण करून त्यांनी आत्मकथनपर लेखन केले आहे. 'माझ्या आयुष्यातील आशा-निराशेचे क्षण', 'जीवनाचे पंचामृत', 'सातव्या मजल्यावरील चढ', 'नियतीचा हात', 'भाषण म्हणजेच संवादच', 'सोनहिरा', 'स्वातंत्र्याचा पहिला दिवस', 'शांतिचितेचे भस्म', 'केल्याने देशाटन', 'माझी जीवननिष्ठा' इत्यादी यशवंतरावांच्या आत्मकथनपर लेखांची शीर्षके जरी डोळ्यांखालून घातली तरीसुद्धा या लेखनाची प्रचिती येते. यशवंतरावांनी जीवनातील पुष्कळ वेळ विशिष्ट ध्येयाच्या पूर्तीसाठी, साहित्य निर्मितीसाठी घालवला आहे. त्यामुळे त्यांच्या या आत्मनिवेदनात वाङ्मयविषयक विषयांना आवर्जून स्थान मिळाले आहे. तसेच लेखक म्हणून, व्यक्ती म्हणून आपल्या जीवनाचे अवलोकन ज्या लेखांमध्ये त्यांनी केले आहे त्या लेखांतील निवेदनाचा सूर बराच मोकळा आहे. समंजस व गंभीर वस्तुनिष्ठतेचा प्रत्ययही त्यातील काही लेखांमधून येतो. उदा. 'नियतीचा हात' हा त्यांचा लेख त्यांच्यावर घडलेल्या संस्कारांचा व नियतीने आणि योगायोगाने त्यांना कशी साथ दिली याचा प्रांजळ असा पुरावा आहे. यशवंतरावांच्या जीवननिष्ठा व वाङ्मयीन निष्ठा ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जीवन जगणे आणि वाङ्मयनिर्मिती करणे यात ते फरक करत नाहीत. प्रत्यक्ष जीवन

जगत असताना त्याचा जो अर्थ लागत गेला, लावला गेला त्याची अपरिहार्य परिणती वाङ्मयनिर्मितीच्या रूपाने होत गेली.

आत्मकथनपर लेखनाचे स्वरूप

यशवंतराव चव्हाण यांचे आत्मकथनपर लेखन विविध स्वरूपाचे आहे. त्यामध्ये जीवनाला मिळालेल्या निरनिराळ्या वळणांचा, झालेल्या संस्कारांचा, घडलेल्या घटनांचा त्यांच्या वाङ्मयीन निर्मितीवर तसेच वाङ्मयीन संस्कार व अभिरुची यावर कसा व कोणता परिणाम झाला याचे सविस्तर वर्णन त्यांनी या लेखांत केले आहे. ''यात उल्लेखिलेली माणसे, स्थळे, भावना व विचार यांच्याशी माझा एक प्रकारचा ऋणानुबंध निर्माण झाला आहे.'' असा ते उल्लेख करतात. यशवंतरावांच्या जीवनातील आनंदाच्या, वैफल्याच्या, हुरहुरीच्या, अभिमान जपून ठेवण्याच्या, कृतज्ञतेच्या क्षणांचे, प्रसंगांचे निवेदन या आत्मकथनपर लेखात आहे. सोनहिरा, कुलसुमदादी, नियतीचा हात, आवडनिवड, नाट्याचार्य खाडिलकर प्रकाशाचा लेखक, असे काही आत्मकथनपर लेख व व्यक्तिचित्रणात्मक लेख त्यातील भावोत्कट निवेदनामुळे भावस्पर्शी झाले आहेत. व्यक्तिचित्रप्रधान लेखांना आत्मपरतेचा स्पर्श झाल्यामुळे तसेच यशवंतरावांच्या जीवनाच्या जडणघडणीत त्या व्यक्तींचा विशेष वाटा असल्यामुळे त्यांचाही अंतर्भाव आत्मकथनपर लेखात करता येईल. कारण या लेखात व्यक्तींना महत्त्व असले तरी निवेदनाचा रोख यशवंतरावांच्या जीवनाभोवती केंद्रित झाला आहे. आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत सर्वाधिक महत्त्व त्यांनी आपल्या आईला दिले. आईचे जीवन त्यांना नेहमीच दीपज्योतीसारखे वाटले. ते लिहितात, ''दिवा जळत असतो. त्याच्या प्रकाशात माणसे वावरत असतात. पण आपण लोकांच्या उपयोगी पडत आहोत हे त्या ज्योतीला, त्या प्रकाशाला माहिती नसते ते दीपज्योतीचेच जळणे आईचे होते.'' एका खेड्यात मुलांना घेऊन राहणारी ही स्त्री मनाने अतिशय मोठी होती. तिचीच प्रशंसा यशवंतराव करतात. 'कुलसुमदादी' या लेखातून त्यांनी मुस्लिम समाजातील या स्त्रीचे चित्र अत्यंत प्रत्ययकारी रेखाटले आहे. यशवंतरावांच्या आजीची मैत्रीण, लहानपणी मामाच्या गावी गेल्यानंतर या कुलसुमदादीविषयी जो जिव्हाळा निर्माण झाला तो अंत:करणापासून रेखाटला आहे. ''भिंतीवरूनच खाली पाठीमागच्या अंगणात उडी घ्यायची नि तीरासारखे धावत घरासमोरील कुलसुमदादीच्या घरी चक्कर टाकायची. ती चुलीपुढे काहीतरी करत बसलेली असावयाची. ती उठून जवळ येई. तोंडावरून हात फिरवी नि माझ्या आईची विचारपूस करण्यासाठी म्हणे, ''बेटा येसू, इटाक्का अच्छी है?'' आणि मी म्हणे, ''छान!'' असे हे देवाघरचे नाते. शेवटी यशवंतरावांनी म्हटले

की ती गेली असली तरी अजूनही गावाकडे तिचा आवाज घुमतो. ''अबई, येसू कुठे है, मैं दूध लाया हूँ ।'' असे खेड्यातील माणसांचे एकमेकांबद्दल स्नेहाचे, प्रेमाचे, माणुसकीचे, आपुलकीचे संबंध. ना तेथे जात असते ना धर्म. असतो फक्त जिव्हाळा. तोच यशवंतराव नेमकेपणाने चित्रित करतात.

यशवंतरावांनी मुस्लिम समाजातील कुलसुमदादीच्या प्रेमाचे, जिव्हाळ्याचे आणि यशवंतरावांवरील तिच्या वात्सल्यपूर्ण प्रेमाचे हृदयस्पर्शी चित्र रेखाटले. व्यक्तिरेखांचे वर्णन करतानाही यशवंतरावांनी व्यक्तिचित्रांच्या पूर्णतेपेक्षा त्या त्या व्यक्तीशी त्यांचा आलेला संबंध आणि त्यांचा यशवंतरावांवर झालेला संस्कार यांनाच अधिक प्राधान्य दिले आहे. 'माझा विरंगुळा' या लेखात आत्मनिष्ठा व आत्मपरता हे दोन गुण प्रकर्षाने जाणवतात. आपल्या आयुष्यात आलेले कडूगोड अनुभव ते हळुवार हाताने भावनेच्या पातळीवर जाऊन व्यक्त करतात. कराडच्या प्रीतिसंगमावर ते आपल्या आई व भावंडांसह अनेक वेळा गेले आहेत. तरीही त्या मधुर स्मृती त्यांच्या भावनेला स्पर्श करून जातात. ''मी कितीही थकलेला असलो तरी घरातील आणि कुटुंबातील प्रेमळ व निर्मळ वातावरणाने माझे मन उल्हसित होते. देवघरातील नंदादीपाच्या मंद प्रकाशामध्ये भाविकांच्या मनात ज्या सुखद लहरी उठतात त्यांचे वर्णन नुसत्या शब्दांनी कसे करता येणार? भावनेची भाषा भावनेलाच समजते.'' यावरून कुटुंबियांच्या व स्वकीयांच्या बाबत त्यांच्या मनात असलेली ओढ ते व्यक्त करतात. जीवनात जे सुखाचे क्षण येतात ते थोडावेळ टिकणारे असतात. अशा वेळी त्यांचा आनंद घेण्यास विलंब करू नये. जे सापडेल, मिळेल, त्यात रस घ्यावा, आनंद मानावा म्हणजे जीवनात सर्व काही आनंदी होईल. यशवंतरावांनी आपली जीवनविषयक भूमिका रसिकतेच्या दृष्टिकोनातून अशा लेखांतून मांडली. त्यातून त्यांच्या विचारांची दिशा आपणास उलगडत जाते. यशवंतरावांच्या या आत्मपर लेखांतून त्यांची वैचारिक कोंडी, कल्पना सौंदर्य, त्यांच्यावर झालेल्या राष्ट्रपुरुषाच्या चरित्राचा परिणाम, त्यांच्या मन:स्थितीचे दर्शन, त्यांची संभ्रमित मनोवस्था, जीवनातील योगायोगाचे प्रसंग, नियतीची साथ, यशवंतरावांचे जीवनविषयक चिंतन, प्रवासवर्णने, त्यांची आवडनिवड, साहित्याबाबतचे चिंतन, सत्संगतीचा परिणाम, स्वातंत्र्याच्या पहिल्या दिवसाच्या आठवणी अशा कितीतरी विषयावर त्यांनी 'मी'च्या दृष्टिकोनातून भाष्य केले आहे. 'मी'ला केंद्रवर्ती ठेवून हे आत्मानुभव त्यांनी मांडले आहेत. जीवनाच्या एका विशिष्ट अवस्थेतील यशवंतरावांच्या मनातील संघर्षाचे, होणाऱ्या घालमेलीचे, जिवंत चित्रण या लेखांतून केले गेले आहे. काही वेळा प्रतिकूल

परिस्थितीचे, गोंधळून टाकणाऱ्या, हतबल करणाऱ्या प्रसंगांचे घाव बसूनही यशवंतरावांचे आदर्शवादी व्यक्तिमत्त्व कसे आकारले जात होते याची स्थूल पण निश्चित कल्पना या लेखांवरून करता येते. तसेच जीवनमूल्यांवरील अढळ व अपार श्रद्धा त्यांच्या जीवनात कशी निर्माण झाली याचीही काही उत्तम स्थाने या लेखांत आढळतात. उदा. 'जीवनाचा अर्थ' शोधण्यात वर्षामागून वर्षे गेली. सारिपाटावर अनेक अर्थ उद्‌भवले, चमकले आणि अंतर्धान पावले. जीवनाचा शोध मात्र संपला नाही. या शोधकाळात अनेकविध अनुभवांची, अवस्थाभेदांची संख्या वाढली. परंतु संपन्नता वाढल्याची साक्ष अंतर्मनात उमटत राहिली नाही. ती तेव्हाच उमटते आणि मला वाटते की जेव्हा अनुभवाला संग्रह, संबद्धता, विशालता, समन्वय आदीची गुणवत्ता वाढत राहते. संपन्नतेची, मन मोठे बनल्याची साक्ष तेव्हाच उमटते.'' माणुसकीचा गहिवर कसा फुटतो व माणसा-माणसांमधील नाती अधिक पक्की कशी होतात याचेही प्रत्ययकारी दर्शन या लेखांतून घडते.

यशवंतरावांच्या आत्मकथनपर लेखनातील जीवनविषयक चिंतन

यशवंतरावांच्या या विविध आत्मपर लेखांतून प्रकट असे जीवन चिंतन आले आहे. ते लिहितात, ''जीवनाची धडपड ही काहीतरी प्राप्त करण्यासाठी असते. माणूस हा काही तत्त्व, ध्येय, अर्थ जीवनात जोडत असतो. ते प्राप्त करण्यासाठी जीवन धडपडत असते. ती तत्त्वे, ध्येय, अर्थ या सर्वांचे महत्त्व अशासाठी असते की त्यांची जीवनावर काही प्रतिक्रिया निर्माण होत असते.'' अशा पद्धतीने यशवंतराव आपली जीवनविषयक भूमिका मांडतात. ''माणसाने आपल्या जीवनातील वास्तवता लक्षात घ्यावयास हवीच. निव्वळ स्वप्नसृष्टीत काही आपण वावरू शकत नाही. ध्येयवादी वृत्तीने कार्य करत असताना स्वप्नाळू श्रद्धा उपयोगी पडत नाही. जीवनातील कटू सत्यावर प्रकाश टाकणाऱ्या व वास्तवतेची झळ कमी करणाऱ्या हास्यरसाची जोड त्याला हवीच. गंभीर गोष्टीकडे सुद्धा काहीशा स्मितवदनाने पाहता येण्याएवढा सोशिकपणा अंगी असावयास हवा. रोजच्या व्यवहारात अशा वृत्तीने जर आपण काम करू शकलो तर क्षणाक्षणाला जीवनाचा आनंद आपणास लुटता येईल.'' यशवंतराव माणसांच्या सुखदु:खाकडे कळवळ्याने पाहात. माणसाचे दु:ख हे सर्वत्र सारखेच असते. या दु:खाला जात, धर्म काही नसते. हे त्यांनी पूर्णपणे ओळखले होते. म्हणून जीवनातील कटू प्रसंगाला सामोरे जाण्यासाठी जीवनात ते प्रसन्नतेला महत्त्व देतात. ''जीवनात जे सुखाचे क्षण येतात ते सूर्याच्या कोवळ्या किरणासारखे सोनेरी व सतेज असतात. ते क्षणभर राहतात आणि नंतर कडक होतात.'' असे ते लिहितात. जीवन हेच मुळी जुन्याचा बोध व नव्याचा

शोध आहे. त्यामुळे जीवन जगत असताना जगण्याचा आनंद लुटणे हे महत्त्वाचे आहे.

'शांतिचितेचे भस्म' या प्रवासवर्णनपर आत्मलेखात त्यांची जीवन-दृष्टी आणि चिंतनपर विचार त्यांनी काव्यात्मक शैलीत मांडले आहेत. ''लहानपणी मी संगमावर बसत असे. कोठून तरी येणारे आणि कोठे तरी जाणारे ते 'जीवन' मी रोज पाहात असे. कोणासाठी तरी ते धावत होते. त्यात खंड नव्हता. त्या 'जीवनाला' एक लय होती. पण ते लयाला गेलेले मी कधीच पाहिले नाही. ते जीवन नित्य नवे होते. त्याचा जिव्हाळा कधी आटला नाही. जीवन पराकोटीचे समर्पित असेल, तर ते कधीच जीर्ण होत नाही. चंद्र कधी जुना होत नाही. सूर्याला म्हातारपण येत नाही. दर्या कधी संकोचत नाही. यातील प्रत्येकाच्या जीवनात पराकोटीचे समर्पण आहे. पण अनंत युगे लोटली तरी विनाश त्यांच्याजवळ पोहोचलेला नाही. काळाने त्यांना घेरलेले नाही. त्यांचा कधी कायापालट नाही. स्थित्यंतर नाही. ते निश्वसन अखंड आहे.'' असे विचार त्यांनी रशियाच्या दौऱ्यावर असताना तेथील मातीत हिंडत असता दिग्:मूढ मन:स्थितीत काढले आहेत. यशवंतरावांना स्वत:ला आलेले अनुभव ते अशा पद्धतीने चिंतनशीलतेने मांडतात. आपले अनुभव या आत्मकथनपर लेखात आधुनिक भावकवितेमध्ये ते उत्कट भावस्थितीच्या स्वरूपात व्यक्त करतात. ही भावस्थिती व्यक्त करताना त्यांच्यातील 'मी' हा 'मी' च्या स्वैरमुक्त पातळीवर अवतरत असताना दिसतो. या वरील विचारातून त्यांच्या मुक्त मनाचा आणि जीवन-चिंतनाच्या अनुभवाचा मुक्त आविष्कार प्रकट होताना दिसतो. या आत्मकथनपर लेखांतून अशी असंख्य जीवनचिंतने रमणीय काव्यरूप घेऊन अवतरतात आणि समर्पित जीवनावर सहज भाष्ये करतात. विचारांच्या पातळीवरील त्यांची ही जीवनचिंतने अत्यंत प्रेरणादायी आहेत. या लेखांतून त्यांनी जीवनातील भावनांची गुंतागुंत उकलून दाखवली आहे.

यशवंतरावांच्या या आत्मकथनपर लेखांतून साहित्यिक गुणांबरोबर चिंतनशीलता दिसते. एखाद्या गंभीर समस्येचे विश्लेषणही ते सहज साध्या परंतु रोचक अशा उपमांनी करतात. माणसाला नियतीच कधी कधी कठोर बनायला लावते तर नियतीच कधी कधी त्याला साथही देत असते. या संदर्भात ते लिहितात, ''थोरांचे उलगडे लहानांना होऊ लागले, तर जगातील बाल्यच नाहीसे होईल. नियतीची तशी योजना नाही. नियतीला हे जग केवळ सुखीही ठेवायचे नाही आणि दु:खीही बनवायचे नाही. श्रीखंडाच्या जेवणातही हिरव्या मिरचीची चटणी लागतेच, तरच जेवणाला रुची येते आणि सुखाचे श्रीखंड पोटभर खाता येते.'' असे जीवनभाष्य यशवंतराव सहज करतात.

आईची ओढाताण, घरची गरिबी आणि मातेच्या चिंतेचे वर्णन करताना जीवनातील सुखदु:खावर सहज बोलून जातात. एवढेच नव्हे तर ''मला असे नेहमी वाटते की माणसाचे जीवन फुलवायचे असेल तर त्याला अशी काहीतरी सोबतीची सांगड पाहिजे. माझा तरी तो अनुभव आहे. माझ्या आयुष्यात जर काही घडल्याचे दिसत असेल तर ते माझ्या सोबत्यांनी घडवले, असे माझे प्रांजळ मत आहे. प्रत्येक मनुष्य स्वत:चे जीवन स्वत:च घडवितो, असे मी तरी मानीत नाही. प्रत्येकाने काही तत्त्वे जरूर न्याहाळलेली असतात. पण तेवढाच त्याच्या कर्तृत्वाचा भाग असतो. त्यातून मनुष्य जो घडतो, तो भोवतालचे वातावरण, सामाजिक परिस्थिती आणि काही अंशी योगायोग याचाच तो परिणाम असू शकतो. असे स्पष्ट चिंतन मानवाच्या जडणघडणीबाबत ते व्यक्त करतात. यशवंतरावांची ही जीवनभाष्ये व जीवनचिंतने त्यांच्या आत्मकथनपर लेखांत इतस्तत: विखुरलेली पाहावयास मिळतात. त्यापासून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची सहज ओळख होते. त्यांचे जीवनचिंतनाचे विषय आणि रूपे वेगवेगळी आहेत. तरीही प्रदीर्घ आणि मूळ विषयापासून दूर नेणारे त्यांचे जीवनचिंतन हे काही वेळा विलक्षण काव्यात्म बनते. त्यांच्यावर नमूद केलेल्या बऱ्याच आत्मकथनपर लेखांत काव्यात्मकता आणि चिंतनशीलता आहे. त्यांना लाभलेली अनुभवाची समृद्धी, बहुश्रुतता, वाचन, चिंतनातून त्यांच्या मनाचा झालेला विकास, चौफेर निरीक्षण, लोकसंग्रहामुळे झालेले मनुष्य स्वभावाचे विपुल ज्ञान अशा अनेक गोष्टींतून चव्हाणांची जीवनचिंतनशीलता संपन्न झाली आहे.

○ ○ ○

काही जीवनादर्श

चरित्र हा एक लोकप्रिय असा मराठीतील समृद्ध ललितेतर वाङ्मय प्रकार आहे. इतर वाङ्मयाच्या तुलनेत चरित्रवाङ्मयाची संख्या तशी कमी आढळते. तरीही फक्त स्वातंत्र्योत्तर काळात चरित्रग्रंथांची संख्या जवळजवळ बाराशे ते तेराशेच्या आसपास झाल्याचे दिसते. या वाङ्मय प्रकाराचा स्वतंत्रपणे विचार करण्याइतकी ही संख्या लक्षणीय आहे. प्राचीन काळात चरित्रे मुख्यत: पद्यमय होती. तर अर्वाचीन काळात चरित्रांची निर्मिती गद्यात झालेली दिसते. चरित्रे सर्वसाधारणपणे स्मृती टिकवणे, उद्‌बोधनासाठी, स्फूर्ती देण्यासाठी, अर्थ प्राप्तिसाठी किंवा विशिष्ट व्यक्तीच्या व वाचकांच्या तृप्तीसाठी लिहिलेली दिसतात. चरित्रलेखनात व्यक्तीचे जीवनदर्शन, स्वभावदर्शन, जीवनसंघर्षाचे चित्रण, व्यक्तीच्या भावजीवनाचा आविष्कार चित्रित केला जातो. त्यामुळे असे लेखन वाचनीय तर होतेच शिवाय त्याला वाङ्मयीन महत्त्वही प्राप्त होते.

चरित्रलेखनामध्ये व्यक्ती व व्यक्तीच्या जीवनावर प्रकाश टाकला जातो. त्यामुळे चरित्राचा पट व्यक्तीच्या जीवनावर अवलंबून असतो. चरित्रकाराचे बालपण, शिक्षण, जीवनातील भले बुरे अनुभव, कौटुंबिक सुखदु:खे यांची माहिती येते. शिवाय व्यक्ती जर सार्वजनिक क्षेत्रातील असेल तर त्या व्यक्तीची सामाजिक, राजकीय माहितीही दिली जाते. त्यामुळे मोठ्या सन्माननीय व्यक्तीच्या चरित्रात त्या काळाचा इतिहासही येत असतो. व्यक्ती हा चरित्राचा केंद्रबिंदू आहे. या लेखनातून त्या व्यक्तीच्या भावजीवनालाही स्थान मिळत असते. म्हणून ''चरित्रकार चरित्र लिहितो तेव्हा तो कालक्रम वृत्तान्त सांगत नसतो. तर चरित्रनायकाच्या जीवनातले असे नाट्यही तो व्यक्तरूप करीत असतो.'' म्हणून थोर पुरुषांची चरित्रे ही राष्ट्राची बहुमोल संपत्ती असते. अशा थोर लोकांचा आदर्श ठेवून सामान्य लोकांना आपला मार्ग चोखाळता

येतो. चरित्रलेखनातून नव्या पिढीला नैतिक शिक्षणही मिळत असते. चरित्रातून व्यक्तीच्या जीवनाचे हुबेहूब दर्शन घडवणे हाच प्रधान हेतू असतो. याचबरोबर तत्कालीन चालीरीती, पेहराव, पदार्थ, दळणवळणाची साधने इ. ची कल्पना चरित्रवाचनाने येते. तसेच त्या काळातील भाषेच्या लकबी व तिचे स्वरूप लक्षात येते. प्राचीन काळात महानुभाव वाङ्मयातील 'लीळाचरित्र', 'स्मृतिस्थळ', 'गोविंदप्रभू चरित्र', 'पूजासवर' तसेच महिपतीबुवा ताहाराबादकर यांचे 'भक्त लीलामृत', 'संतलीलामृत' यांसारख्या प्राचीन चरित्रांतून तत्कालीन बोलीभाषा व समाजदर्शन होते. याशिवाय बखर वाङ्मय हाही चरित्राच्या वाङ्मयाचा नमुना आहे. 'सभासदांची बखर', 'भाऊसाहेबांची बखर', मल्हार रामराव चिटणीस कृत 'शिवाजी', 'संभाजी', 'राजाराम' इ. मधून चरित्रे आली आहेत. इंग्रजी राजवटीपूर्वीच्या चरित्रलेखनाकडे जर पाहिले तर इतिहास आणि चरित्र यांची एकरूपता प्रत्ययास येईल.

अव्वल इंग्रजी काळात मात्र सुरुवातीस परकीयांची चरित्रे लिहिली गेली. मराठीतील पहिल्या चरित्रलेखनाचा मान 'राजा प्रतापदित्याचे चरित्र' या चरित्राला दिला जातो. पंडित रामराव बसू यांच्या इ.स. १८०१ मध्ये बंगालीत लिहिलेल्या या चरित्राचा अनुवाद पं. वैजनाथ शर्मा यांनी इ.स. १८१६ मध्ये केला. तद्नंतर मराठीमध्येच तीस बत्तीस वर्षानंतर इ.स.१८४९ मध्ये महादेवशास्त्री कोल्हटकर यांनी 'कोलंबसचा वृत्तान्त' हे अनुवादित पुस्तक लिहिले. म्हणजेच अव्वल इंग्रजी काळातील चरित्र-लेखनाची सुरुवात निराशाजनकच दिसते. पुढे मात्र भाषांतरित आत्मचरित्रे लिहिली गेली. उदा: कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी सॉक्रेटीसचे चरित्र लिहिले. रोम बादशहाचा इतिहास, पृथ्वीराज चव्हाण यांच्यासारख्या चरित्रांची निर्मिती झाली.

१८७४ ते १९२० या काळात चरित्रवाङ्मयाची निर्मिती काही प्रमाणात झाली. विष्णूशास्त्री चिपळूणकर मराठीतील प्रभावी चरित्रलेखक. त्यांनी डॉ. जॉन्सनचे चरित्र निबंधमालेतून प्रसिद्ध केले. या काळाच्या अखेरीस राजकीय व सामाजिक जागृतीची प्रचंड लाट आली. या लाटेतून देशाभिमान व्यक्त होत होता. यातून समाजसुधारकांची व राजकीय नेत्यांची भरपूर चरित्रे लिहिली गेली. तसेच ल.रा.पांगारकर व अजगावकर यांनीही संत चरित्राचे विपुलतेने लेखन केले आहे. याचबरोबर ऐतिहासिक चरित्रलेखनही प्रामुख्याने या काळात झाले. ना.वि.बापट यांचे थोरल्या बाजीरावांचे चरित्र, वासुदेवशास्त्री खरे-पारसनीस, लोकहितवादी, नातू, देव यांसारख्या कित्येक लेखकांनी चरित्रवाङ्मयात भर घातली.

१९२० नंतर गांधीयुग सुरू झाले. विशिष्ट तत्त्वज्ञान संपूर्ण देशात पसरले गेले.

त्यामुळे या काळात अनेक चरित्रे लिहिली गेली. टिळक, गांधी, नेहरु, मालवीय, सुभाषचंद्र बोस, न.चि. केळकर यांनी लिहिलेले लो. टिळकांचे चरित्र दीर्घ स्वरूपाचे असून तीन खंडात आहे. न.र.फाटक यांनी न्या.रानडे यांचे, श्री.दा.ना. शिखरे व आचार्य जावडेकर यांनी गांधीजींचे चरित्र लिहिले. पुढे स्वातंत्र्यवीरांची, क्रांतिकारकांची चरित्रे लिहिली गेली. उदा: वासुदेव बळवंत फडके, भगतसिंग, सेनापती बापट, बॅ. सावरकर, भाई परमानंद, डॉ. वासुकाका जोशी, तात्या टोपे इ. राजकीय चरित्रेही मोठ्या प्रमाणात लिहिली गेली. तसेच धर्मकारण, राजकारण, साहित्य, खेळ, संशोधन, उद्योग, कला, संगीत, नाट्य, चित्रपट आदी क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या लोकांची चरित्रे लिहिली गेली. देवादिकांची आणि संतांची पारंपरिक पद्धतीनेही चरित्रे लिहिली गेल्याचे दिसते. याचबरोबर स्त्रियांच्या चरित्रांनीही या दालनात मोठीच भर घातली आहे. अलीकडच्या काळात तर या वाङ्मयाने चांगलेच बाळसे धरले आहे. त्यामुळे यास वाङ्मयीन महत्त्व प्राप्त झाले. स्वातंत्र्योत्तर काळात अनेक महनीय व्यक्तीचरित्राचा विषय झालेल्या आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात यशवंतरावांच्या आयुष्यात अविस्मरणीय ठरलेल्या अशा अनेक व्यक्तीचरित्रलेखांचे विषय झाले आहेत. तसेच वंदनीय, मान्यवर अथवा पूजनीय व्यक्तीबद्दलही पूज्यभाव चरित्रलेखनाच्या माध्यमातून त्यांनी व्यक्त केला आहे.

यशवंतरावांचे चरित्रलेखन

यशवंतरावांची ओळख प्रामुख्याने आत्मचरित्रकार व भाषाप्रभू म्हणून सर्वसामान्य रसिकांना परिचित झालेली असली तरी त्यांचे लेखन गुण अन्य प्रासंगिक लेखनातूनही प्रकर्षाने जाणवत राहतात. आणि शब्दप्रभू यशवंतराव चव्हाण यांची वैचारिक उंचीही लक्षणीय आहे याची साक्ष पटते. पण यशवंतरावांनी हे चरित्रलेखन करायचे म्हणून केलेले दिसत नाही. त्यांनी चरित्रलेखन केले असले तरी त्यामध्ये ठरवून, निश्चित करून, बेतून, फार कमी लिहिले आहे. यातील काही पुस्तकांमध्ये यशवंतराव यांनी लिहिलेले चरित्र विषयांचे प्रासंगिक लेख आहेत, तर काही लेख म्हणजे त्यांनी पूर्वी केलेली भाषणे आहेत. रूढार्थाने ज्यांना आपण चरित्र म्हणतो तशा प्रकारची ही चरित्रे नाहीत. चव्हाण यांना त्या त्या वेळी चरित्रनायकांचे दर्शन जसे घडले, त्यांना ते ते चरित्रनायक जसे दिसले, त्याप्रमाणे त्यांनी त्या चरित्ररेखा रंगवल्या आहेत. स्थूलमानाने राजकीय, सामाजिक, वैचारिक अशा रीतीचे काही स्फुटलेखन करताना मनाशी काही निश्चय बाळगून यशवंतराव लिहित असल्याचे आढळते. पण असे प्रसंगही फार नाहीत. क्वचितच आहेत. साहजिकच थोरामोठ्यांचे

चरित्रलेखन करावे ते अमुकच एका हेतुसिद्धीसाठी असावे अशा दृष्टीने त्यांनी अजिबात लेखन केले नाही. लेखनाची हौस आणि आपल्याला सांगावेसे वाटते ते सांगण्याच्या उर्मीतून हे लेखन झालेले आहे. तरीही यशवंतरावांनी एकही चरित्रग्रंथ लिहिला नाही. जे चरित्र लेखन झाले आहे ते स्फुट स्वरूपाचे आहे. त्यांचे चरित्र लेखन सलग नाही. ते प्रसंगानुसार झालेले आहे. जयंत्या, षष्ट्यब्द्या, मृत्यूचा करुण प्रसंग किंवा विविध लढ्यांच्या वेळी उल्लेखनीय कार्याबद्दलची एखाद्या व्यक्तीची केलेली प्रशंसा, सत्कार समारंभ, अशा करुण, दु:खद व गौरवपर प्रसंगानुसार यशवंतरावांनी चरित्रलेखन केले. तसेच यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वावर ज्यांच्या विचारांच्या आणि आचारांच्या दृष्टीने चिरस्थायी ठसा उमटलेला आहे, अशा अनेक थोर विभूतींचे चरित्रलेख त्यांनी लिहिले आहेत. यातून राष्ट्रीय पुरुषांबद्दलचे यशवंतरावांचे विचार पाहावयास मिळतात.

यशवंतरावांच्या चरित्रलेखाचा विवेचक मागोवा घेण्याआधी त्यांचे चरित्रलेखन कोणते याची समग्र नोंद करणे महत्त्वाचे आहे. 'सह्याद्रीचे वारे' या ग्रंथात 'शिवछत्रपतींचे पुण्यस्मरण', 'मला झालेले लोकमान्यांचे दर्शन', मानवतेचे पुजारी महाकवी रवींद्रनाथ टागोर, डॉ. आंबेडकरांच्या विचारपरंपरेचा वारसा, 'ऋणानुबंध'मध्ये 'महात्माजी व महाराष्ट्र', (महात्मा गांधी) 'बुद्धिवंत मुत्सद्दी (डॉ. राधाकृष्णन्) अलौकिक नेता (पं. नेहरु), लालबहादूर शास्त्रींजींच्या सहवासात, पुण्यवंत नीतीवंत जाणता राजा (छ. शिवाजीमहाराज), लोकमान्य राजर्षी (राजर्षी श्री शाहू महाराज), 'सेवाव्रती' (महर्षी वि.रा.शिंदे), 'लोकशिक्षक काकासाहेब' (काकासाहेब गाडगीळ), 'तत्त्वचिंतक रचनाकार' (डॉ. धनंजयराव गाडगीळ), 'नाट्याचार्य खाडिलकर' (काकासाहेब खाडिलकर), 'उदारमतवादी केळकर' (तात्यासाहेब केळकर), 'प्रकाशाचा लेखक' (वि. स. खांडेकर), 'ग.त्र्यं.माडखोलकर', 'पापण्यांत गोठविली मी नदी आसवांची' (ग.दि.माडगूळकर) इ. चरित्रपर लेख ऋणानुबंधमध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत. युगांतरमध्ये 'सोन्याचा सोहळा' (य.दि. पेंढारकर), 'सामाजिक प्रगतीच्या प्रेरणा' (दादासाहेब गायकवाड) इ. यशवंतराव चव्हाण शब्दांचे सामर्थ्यमध्ये, 'डॉ. राजेंद्रप्रसाद', 'नाना पाटील', 'बाबू जगजीवनराम', 'शंतनूराव किर्लोस्कर', 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी', 'कवी सुधांशु' (ह.न. जोशी) इ. व यासारखे अनेक चरित्रलेख संपादित केलेले आहेत. अशा विविध कार्यक्षेत्रांतल्या महनीय विभूतींसंबंधी यशवंतरावांनी चरित्रात्मक लेख लिहिले आहेत. यापैकी बरेच चरित्रलेख नियतकालिकांतून व मासिकांतून प्रकाशित झालेले आहेत. तरीही त्या लेखांना महत्त्वाचे अक्षरवैभव प्राप्त झाले आहे. पण यावरून एक महत्त्वाची गोष्ट लक्षात येते ती म्हणजे यशवंतरावांच्या

या चरित्ररेखा जीवनाच्या विविध क्षेत्रांतल्या आहेत. समाजसुधारक, पत्रकार, कलावंत, राजकारणी नेते, साहित्यिक, समीक्षक, शिक्षणतज्ज्ञ असे अनेक क्षेत्रांतल्या महान व्यक्तींचे चरित्रविषयक लेख यशवंतरावांनी रेखाटले आहेत. यशवंतरावांच्या एकूणच चरित्रलेखांचा आढावा घेतला तर सर्वच लेख वाङ्मयीन कसोटीवर मान्यता प्राप्त आहेत. त्यामुळे यशवंतराव चव्हाण यांचा चरित्रलेखन विस्तार या पार्श्वभूमीवर लक्षात घेण्यासारखा आहे.

यशवंतरावांनी रेखाटलेल्या चरित्ररेखा

यशवंतरावांचे हे चरित्रलेखन आकाराने छोटे पण गुणाने मोठे आहे. ही चरित्रे लहान असली तरी त्यात 'साहित्यिक महानपणा' मात्र भरपूर आहे. आपल्या चरित्रनायकांवर यशवंतरावांनी प्रामुख्याने गौरवपर लिहिले आहे. त्यांनी चित्रित केलेले चरित्रनायक सामान्य नाहीत. काही वेळा असामान्याला भेद पाडून पुढे जाणारे असे अति असामान्यांच्या कोटीत बसणारे आहेत. जीवनाची आणि समाजाची विविध अंगे व्यापून उरणारे उत्तुंग व्यक्तिमत्त्व या चरित्रनायकांना लाभलेले आहे. यशवंतरावांना मानवतावादी महापुरुष आवडतात. शिवाजीमहाराज हे त्यांचे श्रद्धास्थान होते. शिवनेरीवरील शिवजन्माच्या प्रसंगाचा अर्थ सांगताना यशवंतराव लिहितात, ''युगायुगातून येणारा आजचा हा दिवस आहे. तीनशे वर्षांपूर्वी तो एकदा आला आणि या शिवनेरीत शिवाजीमहाराजांचा जन्म झाला. केवळ एका व्यक्तीचा एका बालकाचा तो जन्म नव्हता, तर त्या बालकाच्या रूपाने महाराष्ट्राचा नवा इतिहास जन्माला येत होता. शिवजन्माने आमचा हा इतिहास त्यावेळी गडावर सुरू झाला.'' असा शिवजन्माचा प्रसंग ते 'भाग्यवती शिवनेरी' या लेखात सांगतात. मुंबई येथे दि. २६ जानेवारी १९६१ रोजी शिवछत्रपतींच्या पुतळ्याचे अनावरण करताना ते पुढील विचार प्रकट करतात, ''छत्रपती शिवाजी महाराजांची ही मूर्ती त्यांची निव्वळ प्रतिमा आहे असे आम्ही मानीत नाही, तर भारतामध्ये जी तेजस्विता आहे, भारताची जी अस्मिता आहे, भारताचा जो स्वाभिमान आहे, त्या तेजस्वितेचे, त्या अस्मितेचे आणि त्या स्वाभिमानाचे ही मूर्ती एक प्रतीक आहे अशी आमची तिच्या पाठीमागे एक भावना आहे.'' महाराजांविषयी यशवंतरावांच्या मनात असलेली निर्मळ भावना ते येथे व्यक्त करतात. छ. शिवाजीमहाराज हे राष्ट्रीय इतिहासातील अभिमानाचे, गौरवाचे तसेच भारतीय जीवनमूल्यांचे आणि सद्‌गुणांचे सगुण रूप आहेत, असाही ते त्यांचा उल्लेख करतात. शिवाजीमहाराजांचे सुंदर शब्दचित्र मोजक्या शब्दांत साकार करतात. समर्थ रामदासांच्या दोन उक्तींचे

उदाहरण ते देतात. ''निश्चयाचा महामेरू । बहुत जनासी आधारू'' ही आणि ''पुण्यवंत नीतीवंत। जाणता राजा'' ही दुसरी. यामधून छ. शिवाजीमहाराजांच्या अलौकिक गुणांचे दर्शन घडते. या लेखात छ. शिवाजीमहाराज निश्चयाचे महामेरू कसे ठरतात याबाबत ते लिहितात, ''शिवाजीमहाराजांचा स्वातंत्र्याचा प्रयत्न हा एक पराक्रमी पुरुषाचा राज्य बळकाविण्याचा प्रयत्न नव्हता. त्याला राष्ट्रीय उद्दिष्ट होते. नैतिक प्रेरणा होती. 'बहुजनांना' आधार देण्याची इच्छा होती. उदंड आत्म-विश्वास होता. 'हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा आहे' असे महाराजांना वाटत होते. ही त्यांची प्रतिज्ञेची पार्श्वभूमी होती. म्हणून 'निश्चयाचा महामेरू या प्रतिकूल परिस्थितीतही टिकला. हे राज्य समकालीन राज्यापेक्षा वेगळे व्हावे, गुणवान व्हावे ही त्यांची दुसरी मनीषा होती. म्हणून ते स्वत: श्रीमंत योगी झाले, पुण्यवंत, नीतीवंत झाले. ''राजा हा राज्याचा उपभोगशून्य स्वामी आहे'' हा आदर्श त्यांच्यापुढे होता आणि सर्वात महत्त्वाचा शब्द म्हणजे 'जाणता राजा'. हा राजा ज्ञानी होता, उमजणारा होता, समंजस होता, त्याला जनतेची जाण होती. शिवाजीमहाराजांचे कार्य आणि व्यक्तित्व अनेक पिढ्यांना प्रेरक ठरले आहे. ठरणार आहे.'' शिवाजी-महाराजांच्या राज्याभिषेकाच्या त्रिशताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने यशवंतरावांनी जे चिंतन केले आहे ते मोलाचे आहे. त्यांच्या आदर्शाचे संस्कार नव्या पिढीवर होणे आवश्यक आहे असे यशवंतरावांना वाटते. म्हणूनच त्यांनी महाराजांच्या कार्याविषयी, राजनीती-विषयी, धर्मनीतीविषयी या लेखात मतप्रदर्शन करून त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. व्यक्तिनिरपेक्ष राजकारणाचा पायंडा त्यांनी पाडला. संकुचित धर्मनिष्ठा त्यांना मान्य नव्हती. राजनीतीत रयतेला स्थान होते. साहस, पराक्रम, निष्ठा आणि शुद्धाचार यामुळे त्यांचा सैन्यात दरारा होता. त्यांची राजनीती, गनिमी कावा, युद्धनीती, स्वराज्यनीती, शत्रूला अचानक घेरण्याचे तंत्र, चपळाई करून निसटण्याचे कौशल्य, भौगोलिक ज्ञान आदी गुणवैशिष्ट्ये सांगितली आहेत. ते लिहितात, ''शिवाजी महाराजांच्या रूपाने अतिभव्य असे एक चरित्र इतिहासाने आम्हाला दिले आहे. त्या चरित्राची मांडणी करण्याचे काम इतिहासकार आपल्या शब्दांनी करत आहेत. आणि कादंबरीकारही आपल्या शब्दांनी करतील, पण प्रतिभावान कवींच्या शब्दामध्ये ते चरित्र रंगल्याशिवाय त्यातला खरा जिव्हाळा आपल्याला समजणार नाही आणि म्हणून हे एवढे सुंदर चरित्र एका महाकवीची वाट पाहात उभे आहे, असे मी नेहमी मानत असे.'' असे हे शिवाजीमहाराजांचे चरित्र आदर्श महापुरुषाचे चरित्र असल्याचे ते सांगतात. ''ते जे तेजस्वी, पराक्रमी, कर्तृत्ववान असे जीवन जगले त्याने आमच्या मनाला विलक्षण ओढ लावली. त्या जीवनातून

एक तेजस्वी शक्ती आमच्या मनामध्ये घराघरामध्ये सतत तेवत राहिली आणि अद्यापही ती तेवत आहे.'' त्यामुळेच छ. शिवाजी महाराजांचे कार्य आणि व्यक्तित्व अनेक पिढ्यांना प्रेरक ठरले आहे, ठरणार आहे असा आत्मविश्वासही यशवंतराव व्यक्त करतात. 'मी जसा आहे तसेच माझे चित्रण करा' असा चरित्रलेखनाचा संकेत असतो. चरित्र लेखनाची ती एक चौकट असते. चौकटीत जी मोकळी जागा असते, ती मुक्तपणे वापरण्याचे स्वातंत्र्य लेखकाला असते. पण चौकट मोडून बाहेर डोकावण्याचे स्वातंत्र्य घेतले तर चरित्र हा साहित्यप्रकार असंबद्ध ठरतो. यशवंतराव चव्हाणांना या चौकटीचे तंत्र माहीत होते. म्हणूनच चरित्र लेखामध्ये चरित्रनायकाचा जो पैलू ज्या प्रमाणात त्यांना भावत असे त्या प्रमाणात त्या पैलूचे झगझगीत दर्शन यशवंतराव घडवत असत. यशवंतरावांनी राजर्षी श्री शाहूमहाराजांचे 'लोकमान्य राजर्षी' या लेखात मोजक्या शब्दांत त्यांची चरित्ररेखा उभी केली आहे. ''कसब, गुण, कर्तृत्व याविषयी शाहूमहाराजांना अतिशय आस्था होती आणि समाजातल्या रंजल्यागांजल्यांबद्दल कणव होती. त्यांचे शरीर जसे अवाढव्य होते तसेच त्यांचे मनही होते. त्यामुळे समाजातील गुणी, कर्तृत्ववान यांना महाराजांचा आधार होता. त्याचप्रमाणे लहानशा खेड्यातील लहानशा माणसालाही आधार होता. सत्ताधारी हा असा असावा लागतो. गांजलेल्यांना, पीडितांना तो अपील कोर्टासारखा वाटावा आणि कर्तृत्ववानांना त्यांचा आधार वाटावा. शाहू महाराज तसे होते आणि म्हणून ते एक केंद्रबिंदू बनले होते आणि लोहचुंबकाकडे लोखंडाचे कण धाव घेतात, त्याप्रमाणे लोक त्यांच्याकडे धाव घेत.'' यशवंतरावांनी छ. शाहू महाराजांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे कर्तृत्व, सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप, त्यांच्या कार्याचे महत्त्व, त्यांनी कलेला दिलेला आश्रय, त्यांची सहकारी चळवळीची प्रेरणा, गुणग्राहकतेची कदर करणारा राजा, शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी केलेले कार्य, विद्येला त्यांनी दिलेले प्रोत्साहन, अस्पृश्यता निवारणासाठी केलेले कार्य, त्यांनी मल्लविद्येला केलेले सहाय्य अशा स्वरूपाची अनेक गुणवैशिष्ट्ये यशवंतराव सांगतात. त्यावरून त्यांचे कर्तृत्व कसे थोर होते हे या छोट्याशा चरित्रलेखातून सहज स्पष्ट होते.

यशवंतराव चव्हाणांनी 'लोकमान्य बाळ गंगाधर टिळक' या सह्याद्री मासिकात प्रकाशित झालेल्या लेखात त्यांच्या जीवनचरित्रावर संक्षिप्त प्रकाशझोत टाकला आहे. ते लिहितात, ''लोकमान्य टिळक हे नुसते कल्पनावादी नव्हते, ते मुत्सद्दी राजकारणी होते. ते जनतेशी वैचारिक देवाण-घेवाण करणारे जननेते होते. आपली वृत्तपत्रे सुरू करताना जी परिस्थिती होती, तिचे राजकीय विश्लेषण करून त्यांनी आपले राजकीय

डावपेच ठरविले होते.'' १९ व्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये अखिल भारतीय पातळीवर अनेक समाजसुधारक, राजकीय नेते आणि पत्रकार होऊन गेले. त्या सर्व क्षेत्रातील एक अग्रगण्य व्यक्तिमत्त्व म्हणूनच यशवंतराव त्यांच्या कार्याचा गौरव करताना दिसतात. अन्यायाविरुद्ध कडक भाषेत प्रहार करण्याची 'केसरी' ची भूमिका वाखाणण्याजोगी होती. या लेखनावरून त्यांच्या स्वभावातील बंडखोर वृत्तीचे दर्शन होते असेही ते स्पष्ट करतात. लोकमान्यांचे कर्तृत्व अलौकिक होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व अतिशय अष्टपैलू होते. ''संपादकी लोकमान्य, गृहस्थ लोकमान्य, नेता लोकमान्य, वक्ता लोकमान्य, लेखक लोकमान्य, संशोधक लोकमान्य, विद्वान लोकमान्य, तत्त्वज्ञ लोकमान्य असे अनेक दृष्टींनी त्यांचे आपणास दर्शन होते.'' लोकमान्यांच्या व्यक्तिमत्त्वातले असे कितीतरी पैलू यशवंतराव सांगतात. शिवाय प्रत्येक क्षेत्रात त्यांनी तेवढेच मोलाचे व महत्त्वाचे कार्य केलेले आहे त्यामुळे ते लोकमान्य ठरले असे ते सांगतात. लो. टिळकांनी आपले सबंध जीवन सातत्यपूर्वक देशाच्या कामाकरिता व्यतीत केले. त्यामुळे लोकमान्य हा अत्यंत स्फूर्तिदायी असा एक संदेश, असा एक विचार आहे. असे सांगून वैयक्तिक जीवनामध्ये माणसाने कसे वागावे, संकटांशी जिद्दीने कसे लढावे इ. मार्गदर्शन त्यांच्या जीवनाकडे पाहिल्यानंतर आपणास मिळत असल्याचे यशवंतराव सांगतात. तसेच संकटास कसे तोंड द्यावे हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून शिकण्यासारखे आहे. या चरित्रलेखात टिळकांचे वैयक्तिक गुण, त्यांचे खंबीर व्यक्तिमत्त्व, करारी स्वभाव, त्यांचे बौद्धिक सामर्थ्य, तत्वचिंतनात मग्न होणारा माणूस इ. गुणांचा उल्लेख करून महाराष्ट्राच्या इतिहासात अत्यंत थोर व पूजनीय ज्या व्यक्ती आहेत त्यात लोकमान्य हे अत्यंत महत्त्वाचे नाव असल्याचे ते सांगतात. यशवंतरावांच्या प्रासंगिक लेखनाला साहित्यरूप प्राप्त करून देण्याची किमया त्यांच्या उत्कट शैलीत आहे. 'सेवाव्रती महर्षी' या लेखात यशवंतरावांनी महर्षी अण्णासाहेब शिंदे यांच्या चरित्रावर प्रकाश टाकला. त्यांचा जन्म जरी कर्नाटकात झाला असला तरी त्यांनी मराठीची उत्तम सेवा केली. कोणतेही काम त्यांनी सेवा म्हणूनच केले. म्हणूनच यशवंतरावांनी त्यांना 'सेवाव्रती महर्षी' म्हटले आहे. ते लिहितात,''पुण्यामध्ये असताना हृदय हेलावून सोडणारे प्रसंग त्यांच्यावर आले. पुणे हे विद्येचे माहेरघर. म्हणून जमखिंडीसारखे लहानसे गाव सोडून ते या शहरामध्ये विद्या प्राप्त करण्याकरता आले. अक्षरश: मित्रांपुढे पदर पसरून शिक्षणाला मदत करावी अशी अपेक्षा ते करत आले. विद्येसाठी याचना करण्यात काही कमीपणा आहे असे मानण्याचे कारण नाही. त्यांच्या चरित्रामधील त्या गोष्टीचा उल्लेख वाचताना हृदय भरून येते. मदतीसाठी ते प्रिन्सिपॉल आगरकरांकडे गेले. न्यायमूर्ती रानड्यांकडे गेले.'' एका थोर सहृदय व्यक्तित्वाच्या जीवनाचा संघर्षमय इतिहासच यशवंतराव या

चरित्रपर लेखात सांगतात. अस्पृश्योद्धारासाठी आणि समाजसेवेसाठी ज्यांनी आपले सबंध आयुष्य वाहिले अशा एका थोर पुरुषाचे जीवन नित्य वाहत राहणाऱ्या जिवंत झऱ्यासारखे होते. त्याला थांबविण्याचा प्रयत्न कुणाला शक्य नव्हता. कधी लोकांनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. तरी त्याची पर्वा त्यांनी केली नाही. स्वत:चे विचार, संस्कार व व्यासंग यांच्या आधारे त्यांची मते बनली होती. आणि ती त्यांनी अत्यंत निर्भीडपणे मांडली. स्वत: अत्यंत प्रामाणिक. जी गोष्ट मनाला पटेल ती स्वच्छपणे बोलावी आणि त्यानंतर त्यासंबंधी चिंता करू नये, असा त्यांचा स्वभाव होता.'' असे जीवनचित्रा-बरोबरच, स्वकालीन सामाजिक जीवनविषयीचे अनेक उल्लेख त्यांनी या लेखात केले आहेत. स्पष्टवक्तेपणा, मनाचा प्रांजळपणा, जीवनाकडे पाहण्याची त्यांची वृत्ती, शुद्ध तत्त्वांचे पालन, अस्पृश्योद्धाराचे कार्य, मराठी-कानडी संबंधी विचार, महर्षी शिंदे यांचे मूलग्राही विचार, त्यांची भारतीय संस्कृतीची मीमांसा, अण्णासाहेब व यशवंतराव यांचा सहवास अशा अनेक घटना, प्रसंग, आठवणी सांगितल्या आहेत. तसेच अण्णासाहेबांच्या संशोधक वृत्तीचा व अभ्यासू वृत्तीचा वेध घेतला आहे. ''ते उपासना करीत असत. परंतु ते काही धर्मभोळे नव्हते. संशोधक होते. परंतु पढीक पंडित नव्हते. राष्ट्रभक्त होते. परंतु राजकारणी नव्हते. असा वरवर विरोधी वाटणारा मोठा विलक्षण व्यक्तिमत्त्वाचा माणूस होता.'' अशा विविध पैलूंमधून अण्णासाहेबांचे चरित्र स्पष्ट करतात. शिवाय अशी बुद्धिनिष्ठ, ध्येयनिष्ठ, सेवानिष्ठ, कर्तृत्ववान, प्रतिभावान आणि पराक्रमी माणसे महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या शाखेमध्ये निर्माण झाल्यामुळे महाराष्ट्राची अस्मिता टिकून आहे. असाही ते त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख करतात.

यशवंतराव चव्हाण गांधीजींच्या विचारांनी प्रभावित झाले होते. त्यामुळे गांधीजींच्या चरित्राकडे भक्त आणि शिष्याच्या भूमिकेतून ते पाहत असत. अशा वेळी आपल्या गुरुचे चरित्र रेखाटन करताना त्यामध्ये तटस्थता असणे आवश्यक असते. अलिप्त राहून चरित्रलेखकाला चरित्रनायकाचे कर्तृत्व तपासणे महत्त्वाचे असते. त्यामुळे म. गांधीजींच्या विचारांचे, व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू त्यांनी शब्दांकित केले आहेत. गांधीजींचे जीवन व विचार, नामदार गोखल्यांच्या सूचनेवरून तब्बल बावीस वर्षांनंतर आफ्रिकेतून भारतात आगमन, राकारणातील उदय, कस्तुरबा गांधींचा मृत्यू, टिळक-गांधी यांच्या विचारातील व कार्यपद्धतीतील तफावत, गांधीजींच्या विविध चळवळी, 'सत्य व अहिंसा' यांचा वापर, ग्रामीण भागाच्या विकासाचा ध्यास या सर्व व्यक्तिमत्त्व वैशिष्ट्यांचे, प्रसंगांचे चित्रण यशवंतराव चव्हाण यांनी अत्यंत समर्थपणे केले आहे. म.गांधीजींच्या राजकारणाची व समाजकारणाची झेप आणि त्यांच्या मानसिकतेचे

अंत:प्रवाह यांचे विवेचन याचे चित्रण त्यांनी 'महात्माजी व महाराष्ट्र' या लेखात केले आहे. त्यांच्या साधेपणाबद्दल ते लिहितात, ''पोशाखातला थाट, इंग्रजी भाषेचा वापर, राहणीमानाचा दर्जा इ. ज्या गोष्टी सुधारणेची लक्षणे बनत होती त्यांना गांधीजींनी कटाक्षाने रजा दिली. स्वत: ते इतका साधा पोशाख घालू लागले की बॅरिस्टर असून ते एखाद्या शेतकऱ्याप्रमाणे पोशाख घालत. या गोष्टीने गांधी व बहुजन समाज यांच्यातील अंतर एकदम कमी झाले. पुढे तर ते पंचाच नेसू लागले व त्यामुळे रविंद्रनाथ टागोर यांच्या शब्दांत सांगायचे म्हणजे 'भारतातील कोट्यवधी दरिद्री बांधवांच्या हृदयाचे दार त्यांनी सताड उघडले.'' अशा स्वरूपाचे म. गांधींचे संस्कारचित्र ते प्रभावीपणे मांडतात.

यशवंतराव चव्हाण चढत्या क्रमाने राजकीय क्षेत्रात उच्च पदावर गेले. तसा त्यांना पं. नेहरू, लालबहादूर शास्त्री यांच्यासारख्यांचा सहवास लाभला. त्यामुळे या व्यक्तींचे व्यक्तिमत्त्व विकसित कसे होत गेले, त्यांच्या जीवनात कोणते आंगिक गुण होते, त्यांचे जीवन कसे फुलत गेले, त्यांच्या जीवनातील चित्तवेधक संघर्ष, त्यांच्या जीवनानुभूती इ. गुणवैशिष्ट्ये त्यांना जवळून न्याहाळता आली. त्यामुळे या व्यक्तींचे जीवन स्फूर्तिदायक व स्फूर्ती देणारे आहे. शिवाय या दोघांचे व यशवंतरावांचे संबंध जवळचे असल्याने सूक्ष्म जीवनदर्शी तपशील उपलब्ध होतो. या निकटच्या सहवासामुळे कल्पिताचा आधार न घेता त्यांच्या चरित्रावर वास्तवपूर्ण प्रकाश टाकला आहे. माणसांच्या गुणांची पारख करण्याची त्यांची कला, पं. नेहरुंचा मोकळा स्वभाव, प्रश्न निकाली काढण्याचे त्यांचे कौशल्य, त्यांची पुरोगामी दृष्टी, यशवंतरावांच्या त्यांच्यासंबंधी काही आठवणी ते स्मृतिरूपाने या लेखात सांगतात, ''धाकट्या भावावर प्रेम करावे तसे त्यांनी माझ्यावर प्रेम केले. माझ्यावर अत्यंत महत्त्वाच्या प्रसंगी विश्वास टाकला. ते प्रेमाचे व विश्वासाचे अनंत क्षण माझ्या स्मृतिपटलावर तेजस्वी ताऱ्यासारखे लखलखत आहेत.'' अशी आठवण ते सांगतात. याशिवाय त्यांच्या संदर्भातील अनेक प्रसंगांची नोंदही ते सहज करतात.

यशवंतराव चव्हाणांच्या चरित्रलेखांची शीर्षके नुसती वाचली तरी भक्तिभावातून निर्माण होणारा त्यांचा स्तुती विलास लक्षात येतो. 'मानवतेचे पुजारी महाकवी रविंद्रनाथ टागोर', 'प्रकाशाचा लेखक (वि.स. खांडेकर), 'नाट्याचार्य खाडिलकर, 'तत्त्वचिंतक रचनाकार' (डॉ. धनंजयराव गाडगीळ), 'डॉ. आंबेडकरांच्या विचार-परंपरेचा वारसा'(डॉ. बाबासाहेब आंबेडकर), 'पापण्यांत गोठविली मी नदी आसवांची' (ग.दि. माडगूळकर) यांसारख्या चरित्रलेखांच्या शीर्षकावरून ते चरित्रनायकाचे स्तुतिपाठक नाहीत मात्र शिष्यभावाने किंवा भक्तिभावनेने लिहिलेले

हे चरित्र लेख आहेत, हे लक्षात येते.

महाकवी रवींद्रनाथ टागोर यांचे जीवन थोर, उदात्त आणि सर्वस्पर्शी असल्याचे सांगून त्यांची प्रखर बुद्धिमत्ता व संवेदनक्षमता या गुणांचा उल्लेखही ते करतात. थोर कवी, थोर कादंबरीकार, थोर कलोपासक, चित्रकार असा त्यांचा गौरवपर उल्लेख ते या लेखात करतात. तसेच या महाकवीबद्दल व काव्याबद्दल आपले मत व्यक्त करताना लिहितात,''कुठलाही महाकवी किंवा कुठलाही कवी निव्वळ शब्दांचा जुळारी होऊन कवी होऊ शकत नाही. नादमाधुर्य म्हणजेच काव्य असे आपणाला म्हणता येणार नाही. आपल्या मराठी वाङ्मयामध्येही असा एक काळ होता की ज्यावेळी शब्दलालित्य म्हणजेच साहित्य असे समजून अशा साहित्यामागे लोक धाव घेत. परंतु निव्वळ नादमाधुर्यातून निर्माण होणाऱ्या काव्यात जनतेचे मन काबीज करण्याचे सामर्थ्य निर्माण होऊ शकत नाही. त्या जुळणाऱ्या सुंदर नादमधुर शब्दांच्या पाठीमागे एक नवा सामर्थ्यवान संदेश देणारे मन आणि विचार असल्याशिवाय कवी किंवा महाकवी निर्माण होऊ शकत नाही. आमच्या मराठीचे भाग्य असे आहे की तिचा पहिलाच कवी एवढा मोठा महाकवी होऊन गेला की त्याच्या काव्यशक्तीला स्पर्श करणारे सामर्थ्य अजून मराठीत निर्माण झालेले नाही.'' ज्ञानेश्वरांच्या 'ज्ञानेश्वरी'नंतर टागोरांच्या 'गीतांजली'बद्दल त्यांची स्वत:ची मते ते नोंदवतात. ते काव्य वाचल्यानंतर प्रथम समजले नाही. जीवनाचा अर्थ समजल्याशिवाय हे कवी समजणार नाहीत, असे याविषयी ते सांगतात. मानवतेचा पुजारी हा एक संदेश रवींद्रनाथांनी आपल्या साहित्यातून दिला. एवढेच नव्हे तर उतारवयात त्यांनी कुंचला हातात घेऊन चित्रे रंगविली. शब्दांशिवाय आणि भाषेशिवाय त्यांनी मनातील भावना आणि कल्पना व्यक्त करण्यासाठी चित्रांचा छंद जोपासला. शिक्षणाशिवाय ज्यांना डोळे आहेत त्या सर्वांना मनातील भावना व्यक्त करण्यासाठी त्यांनी चित्रे रंगवली आहेत. ''ते कसेही असो रवींद्रांच्या रूपाने एक अत्यंत सुसंस्कृत, अत्यंत हळवे, अत्यंत थोर असे मन भारतामध्ये निर्माण झाले, पण ही आमची परंपराच आहे. ऋषीमुनींची आणि महाकवींची. रवींद्रांची मूर्तीच या महान परंपरेतल्या जुन्या थोर ऋषीमुनींची आपणाला आठवण करून देते. भारताला पुराणपुरुषाची उपमा देऊन रवींद्रनाथांसारखे रत्न आम्हाला सापडल्याचे यशवंतराव सांगतात. 'गीतांजली' या काव्याचा यशवंतरावांच्या मनावर फार मोठा प्रभाव पडल्याचे जाणवते. या काव्यातील काही ओळी त्यांच्या मनावर कायमच्या ठसल्या आहेत. ''जिथे चित्त निर्भय झाले आहे आणि जिथे ज्ञान मुक्त झाले आहे अशा स्वातंत्र्याच्या स्वर्गात भारताला देवा जागृती येऊ दे. जिथे ज्ञान

मुक्त झाले असेल आणि जिथे चित्त निर्भय झाले असेल अशा प्रकारची परिस्थिती ज्याच्या साहित्यात, संस्कृतीत, विचारात आणि समाजात निर्माण झाली असेल असा नवभारत आपणाला निर्माण करावयाचा आहे ही प्रार्थना ज्या कविमनातून निर्माण झाली ते कविमन केवळ एका तत्त्वज्ञाचेच होते असे नव्हे तर एका अत्यंत थोर अशा मानवाचे ते मन होते.'' ज्ञानामुळे अज्ञानाचे भय निघून जाते. अशा देशात अशा समाजात आणि अशा संस्कृतीत नवभारत जागा होऊ दे अशी प्रार्थना रवींद्रनाथ देवाजवळ करतात. यातून या महाकवींचे अनेक पैलू या लेखात उजेडात येतात.

त्यादृष्टीने 'सह्याद्रीचे वारे' मधील 'डॉ. आंबेडकरांच्या विचारपरंपरेचा वारसा' हा यशवंतरावांचा लेख आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे देदिप्यमान दर्शन करून देणारा आहे. बाबासाहेबांच्या भारताच्या राजकीय, धार्मिक आणि सामाजिक इतिहासातील अमर कामगिरी विशद करणारा हा लेख आहे. ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही हिंदुस्थानच्या राजकारणात अतिशय महत्त्वाची अशी व्यक्ती होऊन गेली. त्यांच्या मतांशी सहमत नसणाऱ्या माणसांनासुद्धा त्यांच्याबद्दल आदर बाळगावा लागला. त्यांचे सहकार्य घ्यावे लागले. त्यांची मदत घ्यावी लागली.'' असे आंबेडकरांचे मोठेपण ते सांगतात. या लेखात यशवंतरावांनी डॉक्टरसाहेबांचे उभे केलेले कर्तृत्व बव्हंशी सत्याला, प्रामाणिकपणाला आणि प्रांजळवृत्तीला साक्ष ठेवणारे आहे.

लालबहादूर शास्त्रींच्या सहवासातील अनेक आठवणी यशवंतराव सांगतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील गोडवा, माणसांना आपलेसे करण्याची जादू, त्यांच्या स्वभावातील अकृत्रिमता, त्यांची विश्वास देण्याची आणि घेण्याची पद्धत, उमेदीने काम करण्याची हातोटी, माणसांची अचूक पारख, त्यांच्या मनाचा खंबीरपणा, एखादा मुद्दा मांडण्यासाठी सौम्य शब्दांचा वापर, कुशल संघटक, माणसाचे मन जिंकण्याची कला, त्यांच्याकडे असलेला माणुसकीचा गहिवर इत्यादी शास्त्रींजींच्या स्वभावातील विविध गुणवैशिष्ट्ये यशवंतराव सांगतात. या गुणवैशिष्ट्यांतून शास्त्रींजींचे भावचित्र त्यांनी अतिशय देखणेपणाने उभे केले आहे. ते सार्थच आहे यशवंतरावांना. ''त्यांचे खंबीर मन दिसते. पोलादी वृत्ती अनुभवली. अंत:करणाचा पीळ पाहिला. आता कधी सुगंधाने मन भरावे, कधी स्नेहाने ते आर्द्र व्हावे, कधी त्यांच्या सहवासाच्या आठवणींनी उमाळा यावा अशी ही शास्त्रींजींची मला होणारी आठवण आहे. ती मी जपून ठेवतो. अत्तराच्या कुपीसारखी.'' ही यशवंतरावांची अत्यंत अन्वर्थक व बोलकी अशी आठवण त्यांच्या चरित्राची उत्तम साक्षच होय.

यशवंतरावांनी डॉ. राधाकृष्णन यांच्यावर लिहिलेल्या छोटेखानी लेखात त्यांची

सुबोध चरित्ररेखा चित्रित केली आहे. यामध्ये डॉ. राधाकृष्णन यांची ज्ञानोपासना, भारतीय तत्त्वज्ञानाचे भाष्यकार व मीमांसक, शिक्षणतज्ज्ञ, त्यांची स्थितप्रज्ञता, मुत्सद्दीपणा, ऋजू व्यक्तिमत्त्व, स्वभावातील मनमोकळेपणा, त्यांच्या वक्तृत्वाची खास शैली, इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व, 'सुभाषित वाणी,' शब्द लावण्य, विचार गांभीर्य व अर्थघनता आणि सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची कला इत्यादी खास वैशिष्ट्ये ते नमूद करतात. ''डॉ. राधाकृष्णन् यांचे जीवन प्रशांत होते. त्यात खळाळ नव्हता. पण त्याला आतूनच एक ओढ होती. त्यामुळे ते गतिमान होते.'' अशा अचूक शब्दांत त्यांची चरित्ररेखा उभी करतात. डॉ. राधाकृष्णन्सारख्या थोर व्यक्तींच्या चरित्ररेखेमध्ये त्यांच्या वैयक्तिक जीवनातील खाचखळगे, आनंद-दु:ख यांचे काही प्रसंग रेखाटले. त्याचप्रमाणे या चरित्रनायकाच्या कार्यकर्तृत्वाचे योग्य व साधार रेखाटनही केले आहे. डॉ. राधाकृष्णन यांच्या कार्यकर्तृत्वाचा व विचारांचा आमूलाग्र प्रभाव यशवंतरावांच्यावर पडत होता याचीही जाणीव होते.

मराठी साहित्यक्षेत्रात मुळात चरित्रलेख प्रपंच अत्यंत मर्यादित असताना यशवंतरावांनी आपल्या लेखनशैलीच्या जोरावर अनेक चरित्ररेखा साक्षात चित्रित केल्या. स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांची चरित्ररेखा ते अशीच रेखाटतात. ''संयम, समन्वय, सात्विकता, सौम्यता इ. त्यांच्या स्वभावाचे अविभाज्य घटक होते. त्यांच्या उच्चशिक्षणाने यात अधिकच भर घातली. त्यांच्यातील तपी आणि त्यागी वृत्तीने जीवनाला अधिक विकसित केले. यातूनच त्यांनी देशसेवेची शोभा वाढवली. ओजस्वी प्रतिभा, उदार प्रवृत्ती, नम्रता, सरळपणा, सहिष्णुता यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली.'' अशा संक्षिप्त शब्दात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची अनेक वैशिष्ट्ये ते विशद करतात. खरे तर हे चरित्रलेखांचे स्वरूपच संक्षिप्त असल्यामुळे त्यात विस्तृत चित्रणाला वाव कमी आहे. असे असतानाही यशवंतरावांनी डॉ. राजेंद्रप्रसादांचे व्यक्तिमत्त्व जीवनात घडलेल्या अनेक घटना, प्रसंग व ऐतिहासिक दाखल्यांनी सतत खुलवित नेले आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या व्यक्तिमत्त्वाचे मोठेपण, महाराष्ट्राच्या शैक्षणिक जडणघडणीत कर्मवीर भाऊराव पाटील यांचा असणारा सिंहाचा वाटा, त्यांचे विचार यांचा प्रभाव नंतरच्या काळात अनेकांवर पडला. ''आपल्या देशातील सामाजिक दोषांची मार्मिक जाणीव असलेल्या भाऊरावांचे व्यक्तित्वच अत्यंत चित्रदर्शी होते. ते प्राचीन काळातील ऋषीसारखे दिसत आणि तसेच त्यांचे जीवन साधे आणि काटकसरीचे असे. बहुजनांच्या शिक्षणासाठी त्यांनी आयुष्यभर अथक परिश्रम केले. कर्मवीर पाटील यांचा लढा हा लोकशिक्षणावर अवलंबून होता. म्हणूनच अनिष्टतेचा रोग नष्ट होण्यासाठी

शिक्षण हेच औषध आहे हे जाणून त्यांनी काम चालवले,'' असे विचार त्यांच्या कार्याबद्दल यशवंतराव व्यक्त करतात. यशवंतरावांचे बहुसंख्य चरित्रलेख हे प्रसंगानुरूप असल्याने अशा चरित्रलेखात मर्यादित चरित्र चित्रण झालेले आहे. त्यामुळे चरित्रात्मक साहित्य लेखनाचे मानदंड येथे लावणे गैर आहे. किंबहुना त्यांनी सलग असे चरित्रलेखन केलेले नाही. पण हे छोटेसे जे चरित्रलेख लिहिले आहेत ते मात्र सुबोध आहेत. लेखनशैली गुणयुक्त आहे पण एखाद्या चरित्रनायकाच्या दर्शनातून जीवनदर्शन घडविण्याचा चमत्कार चांगल्या चरित्रात घडतो आणि वाचकांच्या जाणिवेला विस्तृत परिमाण लाभते. तसे मात्र यशवंतरावांच्या चरित्रलेखात घडते किंवा नाही हा चर्चेचा विषय ठरेल. तरीही यशवंतरावांनी लिहिलेली ही प्रासंगिक चरित्रे वाचकाला विचार करावयास लावणारी आहेत, असे म्हणण्यापेक्षा ती वाचकाला भारावून टाकणारी आणि मंत्रमुग्ध करणारी आहेत, असे म्हणणे अधिक संयुक्तिक होईल. आपल्या चरित्रनायकाविषयी अत्यंत उत्कटतेने लिहिणे हे यशवंतरावांचे वैशिष्ट्य जागोजागी आढळते.

यशवंतराव चव्हाणांनी त्या काळात अनेक राजकीय नेत्यांवर चरित्रलेख लिहिले. त्यामध्ये 'लोकशिक्षक काकासाहेब गाडगीळ', तत्त्वचिंतक रचनाकार डॉ. धनंजयराव गाडगीळ, बाबू जगजीवनराम, क्रांतिसिंह नाना पाटील, किसन वीर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे त्यातील काही लक्षात राहण्याजोगे चरित्रलेख आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्यानंतरच्या काळातील या चरित्रनायकांच्या जीवनावर प्रकाश टाकण्याचे काम या लेखात यशवंतरावांनी केले आहे. या चरित्रनायकांविषयीची उपलब्ध झालेली अधिक अस्सल माहिती यशवंतराव या लेखांतून देतात. या राजकीय नेत्यांचा त्यांच्या आयुष्यात घनिष्ठ संबंध आला. त्यातील काही त्यांचे आयुष्यभर जिवलग मित्र राहिले, तर काही जण यशवंतरावांपासून दूर गेले. अशा व्यक्तींबाबत त्रयस्थपणे, प्रांजळपणे, अभिनिवेशविरहित चरित्रलेखन यशवंतरावांनी केलेले आहे. त्यामुळे त्यांच्या या चरित्रलेखनात व मूल्यमापनात वा व्यक्तिविश्लेषणात अधिक स्पष्टता दिसते. असे असले तरी या चरित्रलेखनातून चरित्रनायकाच्या कर्तृत्वक्षेत्राचे ज्ञान होत असले तरी त्यांचे विशिष्ट अपेक्षित रूप हाती लागतेच असे नाही. कारण येथे चरित्रनायकाचे व्यक्तिमत्त्व, त्याचे त्या क्षेत्रातील वेगळेपण चित्रित करणे हे क्रमप्राप्त असते. स्वातंत्र्यकाळातील या चरित्रनायकांची चरित्रे लक्षात राहण्याजोगी व स्फूर्तिदायक अशीच चित्रित केली आहेत. यातून यशवंतरावांची स्फुट चरित्रलेखनाविषयी भूमिका स्पष्ट होत जाते. शिवाय चरित्रलेखकाविषयीचे गैरसमज दूर व्हावेत तसेच नवे गैरसमज निर्माण होऊ नसेत यासाठी यशवंतरावांनी या लेखात केलेले प्रयत्न निश्चितच खास उल्लेखनीय आहेत.

यशवंतराव चव्हाण यांनी त्यांच्या चरित्रलेखनात कल्पकता आणि सत्यदर्शन यांच्यात समतोल राखला आहे. काकासाहेब गाडगीळ यांच्यासंदर्भात ते लिहितात, ''काकासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू होते. उत्कृष्ट वक्तृत्व, सुबोध लोकशिक्षणात्मक लेखन, ग्रंथकर्ते, राज्यकर्ते अशा विविध स्वरूपात त्यांचे व्यक्तिमत्त्व महाराष्ट्रातील जनतेपुढे आहे आणि सर्व क्षेत्रांत त्यांनी ज्या सहजतेने आणि कुशलतेने कार्य केले आहे ते पाहिले म्हणजे त्यांच्या यशस्वी जीवनाचा अर्थ समजू लागतो.'' अशा विविध पैलूंचे वर्णन ते श्रोता, कार्यकर्ता, तरुण सहकारी, मित्र या नात्याने करतात. स्वत:च्या वाणीच्या शक्तीवर प्रचंड आत्मविश्वास असलेला त्यांच्यासारखा राजकीय पुढारी क्वचितच पाहण्यास मिळतो असाही त्यांच्या वक्तृत्वाचा ते गौरव करतात.

यशवंतरावांच्या चरित्रलेखनातील चरित्रनायक समकालीन असावा, परिचित असावा आणि तोही व्यापक सहानुभूती, तत्त्व, जिज्ञासू बुद्धी यांनी मंडित असावा हा योग यशवंतरावांच्या चरित्रलेखन संबंधात अमृतयोगच म्हणावा लागेल. 'तत्त्वचिंतक रचनाकार' या लेखात डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या कृतार्थ जीवनाचा आलेखच ते वाचकांसमोर मांडतात. ''कोणतीही निर्मिती करण्यासाठी लागणारे चातुर्य, कौशल्य दूरदृष्टी व संघटनकौशल्य गाडगीळांनी दाखविले म्हणून गाडगीळ आधुनिक महाराष्ट्राचे द्रष्टे पुरुष, तत्त्वचिंतक व रचनाकार होते हे नि:संशय आहे.'' असा त्यांच्या गुणांचा सार्थ गौरव करतात. बहुजन समाजाच्या हितासाठी त्यांनी केलेले कार्य म्हणजे 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या थोर तत्त्वाचे प्रतीक होते. त्यांची लोकशाहीवर मात्र निष्ठा होती. गरिबांच्या प्रश्नांची त्यांना कणव होती. लोकहित जपण्याचे सापेक्षी धोरण त्यांनी अवलंबिले होते. या सर्व त्यांच्या जीवनाच्या मूलभूत निष्ठा होत्या. त्यांनी सहकारी संस्था उभारल्या, चालविल्या, त्यासाठी लागणारे सुजाण नेतृत्व त्यांच्या अंगी होते. या विविध कार्यांतून त्यांचे जीवनकार्य साकार झाल्याचे यशवंतराव सांगतात.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्याबद्दल यशवंतराव आदरभाव व्यक्त करतात. ''त्या व्यक्तिमत्त्वाला तीक्ष्ण बुद्धिमत्तेची व समतोल विचाशक्तीची झालर लागली आहे.'' असा त्यांचा यथोचित गौरवपूर्ण उल्लेख करतात. शास्त्रीबुवांचे व्यक्तिमत्त्व हे एक आकर्षक व्यक्तिमत्त्व होते. उघड्या अंगावर खादीची शाल, चेहऱ्यावर विद्वत्तेचे प्रखर तेज, साहित्य, तत्त्वज्ञान यांचे गाढे, व्यासंगी अभ्यासक, करुणा आणि मानवतावाद यांवर आधारलेली राष्ट्रीयता, भोगलेला कारावास, रॉयवादाच्या काळात नशिबी आलेली अप्रियता, मराठी भाषेच्या विकासाचे त्यांनी केलेले कार्य तसेच उत्तम गृहस्थ, प्रेमळ मित्र, विचारवंत वक्ते अशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची अनेक गुणवैशिष्ट्ये

यशवंतराव सांगतात.

यशवंतराव चव्हाणांनी तात्यासाहेब केळकरांचे जीवन अनेक अंगांनी व मोठ्या जिव्हाळ्याने न्याहाळले. यातूनच यशवंतरावांनी या श्रेष्ठतर व्यक्तीची जीवनदृष्टी, त्यांच्या जीवनासंबंधीच्या प्रतिक्रिया, त्यांच्या जीवनाचा आशय नि अर्थ, एका सहृदय तत्त्वजिज्ञासू मनाने टिपला आहे आणि यातूनच केळकरांवर चरित्रलेख लिहिला आहे. केळकरांच्या साहित्य वाचनाने त्यांच्याबद्दलचा आदरभाव द्विगुणित झाला. वाचलेला व अभ्यासलेला त्यांच्या संबंधीचा सर्व इतिहास पुढील पिढ्यांसाठी नोंदवून ठेवावा या इच्छेमुळेच केळकरांच्या जन्मशताब्दी महोत्सवात ते सहभागी झालेले असावेत. यशवंतरावांचा समतोलपणा व प्रांजळपणाही या चरित्रलेखात पाहावयास मिळतो. केळकरांच्या साहित्यिक भव्य कामगिरीबद्दल यशवंतराव लिहितात,''बुद्धी हे केळकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे विलोभनीय वैशिष्ट्य होते. पण केवळ त्या बुद्धिबळावरच केळकरांनी एवढे प्रचंड साहित्य निर्माण केले नाही तर अखंड वाचन, मनन व लेखन केल्यामुळेच दहा हजार पृष्ठे भरतील, एवढे प्रचंड साहित्य त्यांनी लिहिले. वाङ्मयीन समीक्षा आतापर्यंत अनेकांनी केली आहे. त्यांची सरळ भाषा, तिचा डौल, नर्म विनोद, खेळकरपणा युक्तिवादप्रधानता या सर्व गुणांचा तो एक गुच्छ होय. पण केळकरांनी वृत्तपत्राचे व मासिकाचे संपादन म्हणून जी कामगिरी केली ती आजही आदर्श आहे.'' यशवंतरावांनी केळकरांच्या साहित्य व व्यक्तिमत्वातील वास्तव आणि सत्य येथे प्रकट केले आहे. केळकर साहित्यिक म्हणून जसे येथे परिचित होतात तसे केसरीचे संपादक म्हणूनही त्यांनी केलेल्या कामाची नोंद यशवंतराव घेतात. केळकरांची कल्पकता, नवमताबद्दलची त्यांची जिज्ञासा, गुणी माणसांना जवळ करण्याची, उत्तेजन देण्याची त्यांची रीत, प्रतिपक्षाबद्दल त्यांच्या मनात असलेली न्यायबुद्धी, व्यवहारी दृष्टिकोन, वैचारिक कर्तृत्व, लो.टिळकांचे विश्वासू सहकारी इ. गुणांमुळे ते पुण्याच्या बुद्धिवैभवाचे प्रतीक होते. ते लिहितात, ''केळकरांचे व्यक्तित्व, त्यांचे मन, त्यांची बुद्धी, त्यांचे जीवनकार्य, अत्यंत सुसंगत व सुधारित होते.'' या लेखात यशवंतरावांनी केळकरांचे साहित्यिक, व्यक्तिगत, राजकीय जीवन चित्रित केले आहे. यशवंतरावांनी केळकरांच्या या बहुविध घटकांकडे लक्ष देऊन त्यांचे जीवनचित्रण अतिशय समर्थपणे केले आहे. म्हणूनच यशवंतराव जसजसे त्यांच्या जीवनाची एकेक अवस्था मांडतात तसतसा नवा नवा देखावा दृष्टिसमोर सरकत असल्याचा भास हे चरित्रलेख वाचत असताना होत राहतो.

चरित्रात्मक लेखन हा माणसांचा इतिहास असतो. त्यामुळे इतिहासाप्रमाणे चरित्रलेखनही प्रत्यक्ष घटनेला धरूनच असावे लागते. तसेच चरित्रात्मक लेखनामध्ये

घटना-वर्णनांची नुसती साखळी असून चालत नाही तर त्या चरित्रलेखकांचे त्या घटनांमागील मन बघितले पाहिजे. यासाठी चरित्रलेखकांनी चरित्रनायकांची मने जाणून घेतली पाहिजेत. 'प्रकाशाचा लेखक' या लेखात वि.स.खांडेकरांचा व्यक्तिविमर्श असाच त्यांचे मन जाणून घेऊन यशवंतरावांनी केलेला आहे. वि.स.खांडेकर यांच्या खासबाग येथील ज्ञानपीठ पुरस्कार सत्कार समारंभाच्या वेळी यशंवतरावांनी जे कृतज्ञतेचे भाषण केले आहे त्यात भाऊसाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे कंगोरे स्पष्ट होत जातात. मराठी लेखकात वि.स.खांडेकर हे त्यांचे आवडीचे लेखक होते. त्यांची जवळपास सर्वच साहित्यकृती यशवंतरावांनी वाचली होती. त्यातूनच त्यांनी कृतज्ञतेने 'प्रकाशाचा लेखक' म्हणून संबोधिले होते. त्यांच्या साहित्याबद्दल ते लिहितात, ''त्यांच्या शब्दचमत्कृती, त्यांच्या कल्पनाचमत्कृती यांच्यामुळे त्यांचे लिहिणे मला आकर्षित करीत होते. भाऊसाहेबांच्या कथा कादंबरीतील नायकाला आठवण झाली म्हणजे ती वाऱ्याच्या आल्हाददायक झुळकीसारखी असायची. भाऊसाहेबांच्या नायिकेला भीती वाटली तर ती भीती संध्याकाळच्या वेळी अंधारामध्ये पायामध्ये जसे काहीसे वळवळते वाटते, तशी ती भीती असायची. भाऊसाहेबांच्या नायकाने एखाद्या तरुणीच्या उजव्या गालावरची खळी पाहिली म्हणजे आपण लहान असताना तळ्यात खडा मारल्यानंतर जे पाण्यात भोवरे फिरत फिरत जातात, त्यांची त्यांस आठवण व्हायची. भाऊसाहेबांचे वाङ्मय वाचायला घेतले म्हणजे बिजेची कोर आली नाही किंवा चवथीचे चांदणे आले नाही, असे कधी व्हायचे नाही. भाऊसाहेबांच्या वाङ्मयात निदान मी कधी अमावस्या पाहिली नाही. ती बिजेची कोर असेल किंवा चवथीचा चांद असेल किंवा अष्टमीचा चंद्रमा असेल किंवा पुनवेचा चंद्र असेल, असा हा चांदण्यांचा लेखक आहे, प्रकाशाचा लेखक आहे. पण नुसता सहृदय लेखक नाही. भाऊसाहेबांच्या लेखनामध्ये स्वप्नाळू सहृदयतेबरोबर निर्धारित क्रियाशीलताही आहे. भाऊसाहेबांना फुले व चांदणे फार आवडते. पण पुढे ते जसे लिहित गेले, तसे त्यांचे वाढते वाङ्मय सातत्याने १९४० पर्यंत मी नियमाने वाचले.'' यशवंतराव भाऊसाहेबांच्या लेखनशैलीचाच हळुवारपणे मागोवा घेतात. त्यांच्या 'ययाती' या कादंबरीने दिल्ली आपलीशी करून भाऊसाहेबांची कीर्ती अमर झाल्याचेही सांगतात. भविष्याचा वेध घेणारी प्रतिभा लाभलेला, थोर मानवतावादी कलावंत, द्रष्टा लेखक, मध्यमवर्गीय जीवनातील संघर्षाचे चित्रण करणारा लेखक, भावनांना स्पर्श करणारी सामर्थ्यवान लेखणी, विषमतेचे 'दोन ध्रुव' नाहीसे होण्याची उत्कट इच्छा अशी भाऊसाहेबांच्या व्यक्तिमत्त्वातील व साहित्यातील अनेक रूपे यशवंतराव सांगतात. ''लेखक या नात्याने भाऊसाहेब तसे बहुरूपी आहेत. त्यांनी गुजगोष्टी लिहिल्या आहेत.

कथा लिहिल्या आहेत. भाषणे केली आहेत. टीकाकार म्हणूनही ते प्रसिद्ध आहेत. त्यांची किती रूपे आहेत ! कादंबरीकार ते नंतर झाले. कादंबरीकार म्हणून 'ययातीकार' म्हणून ते आज सर्वांच्या डोळ्यापुढे आहेत. मानवतावादी कलाकार हे जे त्यांचे रूप आहे, ते माझ्या मनाने अतिशय महत्त्वाचे असे रूप आहे.'' यशंवतरावांनी मराठीतील एका थोर साहित्यिकाच्या वाङ्मयीन व्यक्तित्वाचा वेध येथे घेतला आहे. तसेच खांडेकर, नोबेल प्राईज मिळविण्यापेक्षा तसूभरही कमी नाहीत, असे यशवंतराव गौरवाने म्हणतात.

खांडेकरांच्या साहित्याच्या विचारानंतर त्यांनी स्वीकारलेल्या जीवनवादी भूमिकेचा यशवंतरावांनी विचार केला आहे. मराठी वाङ्मयात कला-जीवनवाद खूपच गाजला. त्यात खांडेकरांची जीवनवादी भूमिका होती. खांडेकरांनी साहित्याकडे केवळ रंजनवादी भूमिकेतून पाहिले नाही, वास्तववादी दृष्टिकोन ठेवून, देश-काल, स्थितीचे चिंतन त्यांनी साहित्यातून केले. अंतिम सत्याचा शोध घेत त्यांना जे उत्कटतेने व अपूर्वाईने जाणवले ते ते त्यांनी सुंदरतेने साहित्यातून व्यक्त केले.

यशवंतरावांचे चरित्रलेख प्रामुख्याने प्रत्यक्ष परिचयातून वाटणीस आलेल्या आठवणीतून साकारले आहेत. एखादी गोष्ट सांगावी तसे यशवंतराव लिहितात, स्वाभाविकपणे यशवंतरावांचे हे लेख कुठे कथासदृश निबंध आहेत, कुठे लघुनिबंधात्मक लेख आहेत. कुठे शब्दचित्रातील स्वभावचित्रे आहेत, कुठे जीवनदृष्टी मांडणारी क्षणचित्रे आहेत. कुठे वेचलेल्या आयुष्याचे अनुभवकथन आहेत. असे या लेखांचे विविध स्वरूपी रंग रूप आहे. यशवंतरावांनी प्रसंगानुरूप हे चरित्रलेख लिहिले आहेत. कधी त्या त्या व्यक्तीच्या आयुष्यातील एखाद्या स्मरणीय घटनेच्या निमित्ताने, कधी साठ वर्षांच्या परिपूर्तीच्या सोहळ्याच्या निमित्ताने तर कधी बऱ्याच वर्षांच्या भेटीगाठीच्या संबंधाने, कधी अचानक कानी आलेल्या एखाद्या वार्तेच्या निमित्ताने. व्यक्ती जशा अनेक तशी लेखनाची निमित्तेही वेगवेगळी.

नाट्याचार्य काकासाहेब खाडिलकरांच्या जन्मशताब्दीनिमित्त लिहिलेल्या लेखात खाडिलकरांच्या नाट्यकलेची व स्वभाववैशिष्ट्यांची नोंद करताना यशवंतरावांनी म्हटले आहे, ''खाडिलकर हे ध्येयवादी होते. उदात्त गुणांचे त्यांना आकर्षण होते. काही जीवनमूल्यांवर त्यांची निष्ठा होती. एक प्रकारे त्यांच्या मनाची घडण आध्यात्मिक होती. त्यांच्या नाटकातील अनेक पात्रे या गुणांचे दर्शन घडवितात. तसेच खाडिलकरांच्या सगळ्या नाटकात कै. तात्यासाहेब केळकरांनी म्हटल्याप्रमाणे 'ओज हा गुण आहे, त्यांचे श्रृंगार आणि करुण रससुद्धा ओज गुणान्वित असतात व त्यामुळे त्या रसाभोवती एक प्रकारचे उदात्त वातावरण निर्माण होते.'' या नाटककाराने मराठी रंगभूमीचे सौंदर्य आणि सामर्थ्य वाढवले. तसेच खाडिलकरांकडे अचूक नाट्यदृष्टी होती. नाटकासाठी

सुटसुटीत व पूर्वपरिचित अशी कथानके त्यांनी निवडली. त्यांची पौराणिक, ऐतिहासिक व कल्पनारम्य अशी नाटके आहेत. पौराणिक कथानके निवडण्यातही खाडिलकरांची दृष्टी ध्येयदर्शी होती. मानवजातीला उपकारक असे उदात्त आदर्श या कथांच्या द्वारे त्यांनी दिले. सहेतुकता किंवा जनजागृती हा त्यांच्या लेखनाचा अविभाज्य घटक आहे. विशिष्ट गुणावगुणांबद्दल प्रीती किंवा अप्रीती निर्माण करणे, राष्ट्रनिष्ठा व प्रियत्वांचे दिग्दर्शन यांचा परिणाम साधणे हा त्यांच्या लेखनाचा हेतू होता. असे त्यांच्या नाट्यसेवेचे समीक्षण यशवंतराव करतात.

'सोन्याचा सोहळा' कवी यशवंत (य.दि. पेंढारकर) यांच्याविषयी यशवंतराव लिहितात, ''कवी यशवंत आणि मी एका जिल्ह्यातले आहोत. हे तर त्यांचे माझे एक नाते आहेच. पण त्यांचे माझे दुसरे नाते म्हणजे त्यांचे व माझे नाव एक आहे. त्यांच्या व माझ्या नावातले हे साम्य, त्या काळी माझ्या अभिमानाचा एक विषय होता. मला आठवते त्यांच्या कवितांमध्ये मनाला नित्य ओढ लावणाऱ्या अशा कितीतरी कविता होत्या. मला चांगला आवाज असता तर त्यातल्या काही मी आज म्हणूनही दाखविल्या असत्या. आईवर प्रेम न करणारा माणूस दुनियेमध्ये कुठे सापडेल? पण कवी यशवंतांना आईची आठवण झाली आणि घराघरातली आई जागी झाली. देशभक्तीवरही त्यांनी अनेक कविता लिहिल्या आहेत. त्या वेळच्या संसारातल्या बारीकसारीक दु:खांची त्यांनी आपल्या कवितेतून इतक्या नाजूकपणे मांडणी केली आहे की, जणू काही या माणसाला आपले मन कळले होते की काय, तो आपलेच दुखणे रस्त्यावर मांडतो आहे की काय, आपली कहाणी त्याला कोणी जाऊन सांगितली की काय, असे घराघरातल्या स्त्री पुरुषांना वाटावे. जिव्हाळ्याने ओतप्रोत भरलेली अनेक अतिसुरेख चित्रे त्यांच्या कवितांमध्ये आपणास पाहावयास मिळतात.'' यशवंतरावांचा या कवींशी प्रत्यक्ष संबंध आला आहे त्यामुळे या कवींच्या काव्यावर अकृत्रिम जिव्हाळ्याने ते लिहितात, बोलतात. यशवंतरावांचे हे चरित्रलेखन वेगळ्या वैशिष्ट्यांमुळे उठून दिसते, कारण या लेखातील लेखन आकर्षक आणि हृदयंगम आहे. यशवंतरावांनी आपल्या चरित्रलेखांना वेगळे रूप दिले. ते आपल्या साहित्यिक, राजकीय किंवा अन्य मित्रांची कुळकथा सांगत नाहीत. जन्मतारखा अथवा तत्सम कंटाळवाणा तपशील ते कटाक्षाने टाळतात. त्यांच्या चरित्रलेखात भावनेचा ओलावा असतो. वर्ण्य विषयाची वैशिष्ट्ये रेखीव शब्दांत ते अचूकपणे टिपतात. या चरित्रलेखामधील ह्या व्यक्ती भेटल्या केव्हा, स्नेह वाढीस लागला कसा, प्रभाव आणि परिणाम काय झाला, संबंधित व्यक्तीच्या कार्याचे, विचारांचे मोल काय, तत्कालीन परिस्थिती कशी होती अशा अनेक गोष्टींची चर्चा ह्यामध्ये आहे. माणूस, त्या माणसाचे मन, त्याचे कार्य, त्याचा प्रभाव आणि स्वत:शी असलेला त्या

त्या संबंधित व्यक्तीचा संदर्भ हा अनुबंध यशवंतराव आवर्जून रेखाटतात. या चरित्रलेखातून यशवंतराव अनंत दिलखुलास गोष्टी, किस्से, चुटके, आठवणी, तत्त्वसूत्र इत्यादींचा खजिना उघडा करताना दिसतात.

यशवंतरावांच्या चरित्रलेखातील नायक हे तुलनेने अधिक भारतीय व महाराष्ट्रीय आहेत. या चरित्रनायकावर प्रसंगपरत्वे केलेल्या चरित्रलेखनातून कर्तृत्वसंपन्न चरित्रनायकाबद्दल यशवंतरावांच्या मनातील प्रेमाचे, भक्तीचे, अभिमानाचे आणि आदराचे उमाळे खळबळून उचंबळले आहेत. या चरित्रनायकांच्या प्रचंड कार्याचे आणि देशाच्या इतिहासामधल्या अमर कामगिरीचे त्यांनी योग्य शब्दांत मूल्यमापन केले आहे. या चरित्रनायकांनी सामाजिक विचारांत आणि तत्त्वज्ञानात घातलेली मोलाची भर विशद करून सांगितले आहे. यशवंतरावांचे हे छोटेखानी चरित्रलेखन हे या महापुरुषांचे दर्शन घडविणारे आहे. प्रसंगानुरूप लेखन झालेली ही चरित्रे मोठ्या चरित्रलेखनाची सुरेख रंगीत तालीमच आहे. कारण ही चरित्रे महापुरुषांच्या जीवनाचे उत्कट, भव्य, विचारपरिलुप्त आणि उदात्त चित्र शब्दांकित करणारी आहेत. चरित्रांच्या चौकटीत काटेकोरपणे बसणारी नसली तरी रम्य आहेत.

यशवंतरावांच्या चरित्रलेखाइतकेच त्यांचे मृत्यूलेख स्मरणीय आहेत. अभ्यासनीय आहेत. सर्वसाधारण परिचितांवर मृत्यूलेख लिहिणे तसे अवघड काम आहे, तसेच मान्यवर अथवा सर्वज्ञात व्यक्तीवर लिहिणे ही कठीण आहे. दुःखद प्रसंगाच्या वेळी शब्दाला वाचा फोडणे तसे अवघडच. त्यासाठी मनाची मूस वेगळी असावी लागते. मनाजवळ स्थितप्रज्ञतेची एक कडा असणे इष्ट असते. अशी व्यक्तीच असे लेखन करू शकतात. अशा लेखांमध्ये त्या व्यक्तीच्या जीवनाचे आणि कार्याचे मूल्यमापन करताना केवळ त्यांच्या चरित्रामधल्या प्रसंगांची जंत्री देऊन भागत नाही, तर तो ज्या राजकीय, सामाजिक अथवा वाङ्मयीन प्रवृत्तींचा प्रतिनिधी असेल त्याचे अत्यंत रसपूर्ण आणि मार्मिक विश्लेषण लेखकाला करावे लागते. यशवंतरावांनी त्या अनुषंगाने मृत्यूलेखांची मांडणी केली आहे. यशवंतरावांचे काही मृत्युलेख 'करुण रम्य काव्य' बनतात. 'पापण्यात गोठविली मी नदी आसवांची' हा त्यांचा लेख असाच आहे. या लेखात ग.दि.माडगूळकरांच्या जीवनकार्याचा परामर्श घेतला आहे. ''सिनेमाच्या लखलखत्या दुनियेत राहूनही ज्याने आपली शालीनता, संस्कृती सोडली नाही, राजकारणात असूनही ज्याने पक्षबाजी केली नाही, आपत्तींना तोंड देतानाही ज्याने कटुता येऊ दिली नाही, धार्मिक परंपरांचा अभिमान बाळगूनही ज्याने गायन, संगीत, सिनेमा आदी कलाक्षेत्रातून मनाने संचार केला, असा एक श्रेष्ठ साहित्यिक, निखळ आनंद देणारा मित्र गेला. फार लवकर गेला, न सांगता सवरता गेला. त्याचे दुःख न संपणारे, न ओसरणारे आहे.''

यशवंतरावांनी नेमक्या शब्दांत ग.दि. माडगूळकरांचे वर्णन येथे केलेच आहे शिवाय यातून त्यांची चरित्ररेखाही साक्षात केली आहे. ग.दि. माडगूळकरांचे प्रिय व्यक्तिमत्त्व, त्यांची शब्दसिद्धी, शब्दसृष्टीतील त्यांचे कर्तृत्व, रसाळ शब्द, लेखणीतील सहजता, सामाजिक जबाबदारी सांभाळणारा कार्यकर्ता, कौटुंबिक जबाबदारी पार पाडणारा कुटुंबप्रमुख, उत्तम मित्र, उत्तम कवी, गीतकार अशी नानाविध रूपे यशवंतराव स्पष्ट करतात.

यशवंतरावांनी विपुल प्रमाणात मृत्युलेख लिहिले आहेत. छोट्या-मोठ्यांची गणती करणे थोडे कठीणच जावे एवढी त्यात विपुलता आहे. ग.त्र्यं. माडखोलकरांच्या संदर्भात ते लिहितात,''भाऊसाहेब पहिल्या श्रेणीचे साहित्यिक, टीकाकार, पत्रकार आणि साहित्य व समाजजीवनाच्या क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते होते. त्यामुळे त्यांच्या निधनाने झालेले नुकसान भरून येण्यासारखे नाही. विशेषत: भाऊसाहेब खांडेकरांच्या निधनानंतर भाऊसाहेब माडखोलकरांच्याही निधनाने महाराष्ट्र सारस्वताचा रत्नकोश जास्तच दरिद्री झाल्यासारखा भासतो आणि माडखोलकरांच्या निधनाचे दु:ख जास्तच जाणवते.'' यशवंतरावांना ही माणसे हयात असायला हवी असे वाटते. मृत्यूने त्यांच्यावर घाला घालायला नको होता असे वाटते. यातूनच माडखोलकरांच्या संबंधी त्यांच्या आठवणी ते सांगतात. शिवाय त्यांचे चरित्रही ते स्पष्ट करतात. मराठी राजकीय कादंबरीकार, राजकीय नेत्याशी असणारा त्यांचा घनिष्ठ संबंध, लेखनाला असलेली अनुभूतीची जोड, एखाद्या विषयाला हात घालण्याची हातोटी, दलित समाजाबद्दलची त्यांची आस्था, बोलण्याचालण्यातला दिलदारपणा, त्यांचे रसिकत्व, संगीताची आवड, विविध कलांची आस्वादकता, स्पष्टवक्तेपणा अशी विविध स्वभाववैशिष्ट्ये ते स्पष्ट करतात. यशवंतराव भाऊसाहेब हिरे यांच्याबद्दल लिहितात,''कै. भाऊसाहेब हिरे यांचे जीवन अनेक कामांनी भरलेले आहे. त्यांच्या कोणत्या कामाला महत्त्व द्यावे आणि कोणत्या कामाला गौण लेखावे हेच समजत नाही. त्यांनी महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये फार मोलाची कामगिरी केली आहे.'' माजी राज्यपाल डॉ. सुब्बरायन यांच्या दु:खद निधनाबद्दल लिहितात, ''कै. डॉ. सुब्बरायन हे जुन्या पिढीतील एक अत्यंत कर्तबगार आणि बुद्धिमान ॲडव्होकेट.'' असा त्यांचा उल्लेख करतात. डॉ. श्रीधर बाळकृष्ण मांजरेकर, श्री. महादेव तुकाराम ठाकरे, माजी दारूबंदी उपमंत्री डॉ. भास्कर पटेल यांसारख्या कर्तृत्वपूर्ण व्यक्तींच्या कारकीर्दीबाबत यशवंतराव गौरवोद्‌गार काढतात. यशवंतरावांनी या मृत्युलेखातून त्या व्यक्तिमनाला महत्त्व दिलेले आहे. शिवाय घटना प्रसंगातून, अनुभव कथनातून या चरित्ररेखा अधिक गडद केल्या आहेत. या चरित्रलेखातून भावस्पर्शी असे त्या चरित्रनायकाच्या जीवनाचे दर्शन घडवतात. म्हणून

यशवंतरावांच्या या लेखांबद्दल असे म्हणता येईल की सहृदयतेने, उत्कटतेने, लिहिणारा यशवंतरावांसारखा साहित्यिक अपवादानेच आढळेल. यशवंतरावांच्या या चरित्रलेखनाची थोरवी कोणत्या मापन पद्धतीने मोजता येईल? किंवा या चरित्रलेखांची महती कशी ठरवता येईल याबाबत मतमतांतरे असू शकतात. पण एक महत्त्वाची बाब अशी की या चरित्रलेखनात वास्तव लेखनाचे पूर्ण पथ्य पाळले आहे. शिवाय काव्यविरहित चरित्रलेखन केल्याने या लेखनास एक वेगळेपणा प्राप्त झाला आहे. यशवंतरावांच्या या चरित्रलेखापासून बोध मिळतो हा अगदी प्राथमिक हेतू झाला. चरित्रलेख वाचनाने बोध व्हावा की आनंद व्हावा की दोन्हीही व्हावे याविषयी खूप चर्चा करता येईल. पण या लेखातील चरित्रनायकाची थोरवी कोणत्या महत्त्वाच्या वैशिष्ट्यांवर अवलंबून आहे? चरित्रनायक जगला कसा, त्याचे कर्तृत्व कोणत्या हिमतीवर आधारलेले आहे ? त्याचे जीवनविषयक तत्त्वज्ञान कोणते ? या प्रश्नांची उत्तरे शोधता येणे आवश्यक आहे. चरित्रनायकाच्या जीवनाचे धागेदोरे उलगडून दाखवताना चरित्रनायकाच्या अंतर्मनातली विविध आंदोलने, खळबळ, त्याचे दृष्टिकोन यांचा मागोवा घेता आला पाहिजे. यशवंतरावांनी त्यांच्या या चरित्रलेखनाद्वारे असा मागोवा घेण्याचा निश्चित प्रयत्न केला आहे.

चरित्रात्मक लेखनशैली

यशवंतरावांनी हे चरित्रलेख अंत:प्रेरणेतून लिहिले आहेत. तसेच जागोजागी सुभाषितांचा वापर केला आहे. सुंदर व प्रत्ययकारी शब्दांचा उपयोग आणि वाक्प्रचार-म्हणींचा चपखल वापर हे यशवंतरावांच्या लेखनशैलीचे वैशिष्ट्य जागोजागी आढळते. छ. शिवाजीमहाराजांच्या राजनीती व युद्धनीतीबद्दल क्रमश: लिहितात,''रयतच राज्याचे रक्षण करते. कारभार ऐसा करावा की मातीच्या देवासही हात न लावणे. नाहीतर लोक बोलतील मोंगल बरे. शत्रूला ओळखा, स्वत:ला ओळखा म्हणजे शंभर लढाया झाल्या, तरी शंभर विजय मिळतील.'' राजर्षी शाहू महाराजांच्या लोकप्रियतेबद्दल यशवंतराव लिहितात, ''लोहचुंबकाकडे लोखंडाचे कण धावत येतात, त्याप्रमाणे लोक त्यांच्याकडे धाव घेत.'' वि.रा.शिंदे यांचे जीवन ''नित्य वाहात राहणाऱ्या जिवंत झऱ्यासारखे होते.'' डॉ. धनंजयराव गाडगीळ ''एका अर्थाने 'बहुजनहिताय बहुजनसुखाय' या थोर तत्त्वाचे प्रतीक होते.'' लालबहादूर शास्त्रीजी अवघड वाटणाऱ्या समस्या आपल्या रेशमी स्पर्शाने व मुलायम वागणुकीने सहज सोडवीत. माणसाचे मन जिंकण्याचे, ते उकलण्याचे त्यांच्याजवळ अपूर्व कौशल्य होते.'' तात्यासाहेब केळकर हे टिळकांचे विश्वासू सहकारी होते. त्यांच्या या निष्ठेबद्दल व

कार्याबद्दल यशवंतराव लिहितात, ''तर इंद्रधनुष्यातला एक रंग संपून दुसरा कोठे सुरू होतो हे जसे समजत नाही तसे टिळकांचे राजकीय अनुयायित्व संपून केळकरांचे वैचारिक नेतृत्व कुठे सुरू होते हे कळत नाही.''.... लोकप्रियता ही चलनी नाण्यांची व्यवहारातील किंमत ठरविते. ''व्यासंगासाठी मेहनत तर लागतेच, पण बौद्धिक कुतूहलही कायम राहावे लागते.'' अशा कितीतरी सुभाषितवजा वाक्यांचा ते वापर करतात. 'दोन ध्रुव' ही खांडेकरांची कादंबरी पहिल्यांदा यशवंतरावांनी वाचली. त्या संदर्भातील त्यांची प्रतिक्रिया फार बोलकी आहे. ''ते पुस्तक आपल्या हातात घेऊन कसे कुरवाळले, हे आईला आपले पहिले मूल झाल्यावर कुरवाळताना कसे वाटले असे विचारा, म्हणजे कळेल..... शब्दांचे सामर्थ्य फार आहे. मी शब्दांना फार मानतो. त्यांच्यात अस्त्रांचे सामर्थ्य आहे तसेच प्रकाशाचे तेज आहे.'' यशवंतरावांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाला अनुसरूनच त्यांची जीवनशैली आणि त्यांची लेखनशैली होती हे वरील त्यांच्या काही वाक्यरचनेवरून प्रतीत होते. अशी असंख्य वाक्ये त्यांच्या या लेखांत आलेली आहेत. यशवंतरावांना जीवनाविषयीचे विलक्षण कुतूहल होते. ही जिज्ञासा, हे कुतूहल त्यांना सतत सजग ठेवण्यास कारणीभूत होत होते. ही जिज्ञासा अखेर जीवनविषयक चिंतनात परावर्तित झालेली दिसते. आणि स्वाभाविकपणे यशवंतरावांच्या लेखनशैलीला नकळत चिंतनाची डूब प्राप्त होते. यशवंतरावांनी चरित्रलेखामध्ये ज्या वेळी, ज्या प्रसंगी, ज्या चरित्रनायकाचे रूप जसे भावले तसेच रेखाटले आहे. त्यामुळे हे चरित्रलेखन हे त्यांच्या मनाचे प्रांजळ आरसे आहेत. त्यांनी रेखाटलेल्या प्रतिमांमध्ये चेहरा चरित्रनायकाचा असला तरी दर्शन यशवंतराव चव्हाणांच्या उत्कटतेचेच असते.

○ ○ ○

भावलेल्या व्यक्ती

मराठी ललित गद्यामध्ये आणखी एक समाविष्ट केलेला वाङ्मय प्रकार म्हणजे व्यक्तिचित्रांचा. हा वाङ्मयप्रकार मराठीमध्ये साधारणत: इ.स. १९३५-४० नंतरच पाहावयास मिळतो. मराठीमध्ये लक्ष्मीबाई टिळकांच्या 'स्मृतिचित्रां'पासून व्यक्तिचित्रणास प्रारंभ झाला असे मानले जाते. व्यक्तिचित्रासाठी शब्दचित्र, स्वभावचित्र इ. वेगवेगळे शब्द प्रचलित आहेत. साहित्यामध्ये साहित्यिक जेव्हा नवनिर्मिती साधतो तेव्हा तो आपल्या अभिव्यक्तीसाठी वेगवेगळी माध्यमे शोधत असतो. यामध्ये व्यक्तिचित्र किंवा शब्दचित्र हे एक प्रभावी असे माध्यम आहे. कुमार रघुवीर यांचा 'हृदय' हा व्यक्तिचित्रसंग्रह. व्यक्तिचित्रात शब्दांनी काढलेले चित्र हवे. कथानक पार्श्वभूमीसारखे येते. व्यक्ती व प्रसंग यांचे सूचक शब्दांत परिणामकारक व थोडक्यात काढलेले चित्र येते. त्यामुळे अशी शब्दचित्रे भावगीतासारखी असतात. रेखाचित्रामध्ये चित्रकार आपल्या पेन्सिलच्या उभ्या-आडव्या रेषांनी एखाद्या वस्तूचे किंवा व्यक्तीचे जिवंत चित्र उभे करतो. त्याचप्रमाणे साहित्यकार शब्दांच्या साहाय्याने असे संपूर्ण व जिवंत चित्र साकार करतो. म्हणून याला व्यक्तिचित्र किंवा शब्दचित्र असे म्हटले जाते. ''व्यक्तिचित्र हे प्रथम शब्दांनी काढलेले चित्र असते. नंतर ते कथानक वगैरेमुळे कदाचित लघुकथेतही मोडेल पण त्यात कथानक असले तरी किंवा नसले तरी ते अगदी गौण होय. म्हणजेच कथानकाला व्यक्तिचित्रात पार्श्वभूमीचे स्थान असते. एखादी व्यक्ती, एखादा प्रसंग किंवा एखादे दृश्य आणि त्यामुळे उद्‌भूत झालेले मनोविकार यांचे सूचक शब्दांत परिणामकारक व थोडक्यात काढलेले चित्र तेच व्यक्तिचित्र.'' असे व्यक्तिचित्राचे स्वरूप कुमार रघुवीर यांनी व्यक्त केले आहे. व्यक्तिचित्रामध्ये व्यक्तीच्या स्वभावावर अधिक भर दिला जातो. तसेच या वाङ्मयप्रकारात

वास्तवाविष्काराला अधिक महत्त्व असते. व्यक्तीच्या स्वभावाला आणि 'भाव' दर्शनाला महत्त्व असते. 'व्यक्तिचित्र' हे कथा व कादंबरी, नाटक, निबंध इ. प्रकारचे अल्प- विकसित रूप आहे. कारण या वाङ्मयप्रकारात काल्पनिकताही असू शकते. व्यक्तिचित्र हे इजिप्तच्या चित्रलिपीप्रमाणे आहे. ते प्रभावशाली व सांकेतिक असते. कारण त्याच्यामध्ये थोड्याशा शब्दात पुष्कळ काही सांगण्याची शक्ती असते. कोणत्याही एका दृश्य चरित्र किंवा घटनेला प्रकट करणारी सरळ व सुघटित लघु रचना म्हणजे शब्दचित्र होय. अशी शब्दचित्राची परिभाषा 'ए हँडबुक टू लिटरेचर' या ग्रंथात दिली आहे. शब्दचित्र हा शब्द इंग्रजी 'स्केच' या शब्दाला पर्यायी म्हणून मराठीमध्ये रूढ झाला असावा. हिंदीमध्ये 'स्केच' साठी 'रेखाचित्रे' हा शब्द प्रचलित आहे.

स्वभावचित्रलेखन चरित्रलेखनापेक्षा कठीण काम आहे. स्वभावचित्रासाठी लेखकाजवळ सूक्ष्म निरीक्षणशक्तीची आवश्यकता असते. स्वभावचित्र चरित्रापेक्षा आकाराने छोटे असते. याच्यामध्ये वस्तुनिष्ठतेबरोबर वैयक्तिकता महत्त्वाची असते. ''शब्दचित्रात लेखक हा अधिक वस्तुनिष्ठ असतो. आपली आत्मपरता तो त्यात सूचकतेने व्यक्त करतो हे खरे; पण लघुकथेने त्याच्या आत्मनिष्ठेला जेवढा अवसर मिळतो तेवढा तो शब्दचित्रात मिळू शकत नाही. शब्दचित्रात वातावरणाला जात्याच महत्त्व प्राप्त झालेले असते आणि सभोवतालच्या परिस्थितीशी समरस होण्याची शक्ती ज्या लेखकात विशेष असेल तो अशी शब्दचित्रे उठावदार रीतीने लिहू शकतो. लघुकथेला काव्य प्रकारातील भावगीत म्हटले तर शब्दचित्रे ही त्यातील नाट्यगीतेच होय. असे आहे म्हणूनच एक प्रकारे लघुकथेपेक्षाही जिवंत शब्दचित्रे निर्माण करणे हे कलेच्या दृष्टीने अवघड काम आहे.'' असे व्यक्तिचित्राबाबत मराठीतील प्रसिद्ध समीक्षक डॉ. वामन भार्गव पाठक लिहितात. व्यक्तिचित्रणामध्ये एखाद्या प्रसंगाचे, स्थळाचे किंवा व्यक्तीचे तटस्थपणे चित्रण केले जाते. ''या वाङ्मयप्रकारात व्यक्ती, व्यक्तीचा लोकविलक्षण स्वभाव आणि तो स्वभाव व्यक्त करणारे मोजके पण प्रभावी प्रसंग, यांचीच विशेष गरज असते. म्हणून हा वाङ्मयप्रकार म्हणजे कथेच्या पोटात सामावण्याची शक्यता असलेला प्रकार आहे. म्हणून व्यक्तिचित्र कथेच्या धाकट्या भावंडासारखे असले तरी त्यास कथा संबोधता येणार नाही.'' मराठी साहित्यामध्ये व्यक्तिचित्र व कथा यांचा घनिष्ठ संबंध आहे. व्यक्तिचित्राचा संबंध हा नेहमी वास्तव जीवनाशी असतो. तसेच व्यक्तिचित्रणात व्यक्तीच्या जीवनातील चढ-उतारांचे चित्रण अधिक केले जाते. व्यक्तिचित्रणामध्ये व्यक्ती, स्थान, घटना, दृश्य यांचे असे वस्तुगत वर्णन असते की ज्यामध्ये बाह्यवैशिष्ट्यांचा परिचय होतो. व्यक्तिचित्रांचा आकार

आणि स्वरूप असे संदिग्ध असते की त्यामध्ये कथा, निबंध, आठवणी, चरित्र, रिपोर्ट या सर्वांची झलक कमी अधिक प्रमाणात पाहावयास मिळते. लेखकाच्या मनातील भावना ज्यावेळी शब्दांद्वारे लिखित स्वरूपात कागदावर उतरतात, त्यावेळी साहित्याची निर्मिती होते. काव्य, कथा, कादंबरी, नाटक इ. अनेक प्रकारांतून या भावनांचा आविष्कार होत असतो. पण काही भावना अशा असतात की त्यांच्या प्रकटीकरणासाठी वरीलपैकी कोणताही प्रकार योग्य वाटत नाही. निर्मितीच्या तंत्रामध्ये भावना अडकून पडतात. त्यामुळे त्यांच्या आविष्कारात प्रामाणिकपणा येईलच असे सांगता येत नाही. त्या आविष्कारात कृत्रिमता येण्याची शक्यता असते. म्हणूनच कोणतेही संस्करणाचे ओझे न घेता जे आहे तसे लिहावे, अशा विचारसरणीचा जन्म झाला. त्यातूनच मराठीतील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ साहित्यकारांनी हा वाङ्मयप्रकार मोठ्या कौशल्याने हाताळला असल्यामुळे त्याला अल्पावधीतच प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

व्यक्तिचित्रे, शब्दचित्रे यांच्याच पंक्तीस बसणारे आणखी काही नवे प्रकार मराठी साहित्यात रूढ होऊ पाहात आहेत. एकसष्टी, अमृतमहोत्सव, श्रेष्ठ व्यक्तींच्या गौरवार्थ ग्रंथ प्रकाशन यांसारख्या नैमित्तिक प्रसंगानुसार लेखक प्रत्यक्ष जीवनातील एखाद्या व्यक्तीचे विविध अनुभवांचे चिंतन व त्या चिंतनाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष अनुभव, जसे रूप होईल तसेच रूप साहित्यात उतरविण्याचा प्रयत्न करतो. यशवंतरावसुद्धा प्रत्यक्ष जीवन जगत असताना ज्या व्यक्ती भेटल्या, जे अनुभव आले, त्या अनुभवांच्या आधारे त्यांनी व्यक्तिचित्रणात्मक लेखन केले आहे. अशा कितीतरी व्यक्तिचित्रणात त्यांनी विविधता आणि सजीवता निर्माण केली आहे. ''व्यक्तिचित्र म्हणजे व्यक्तीच्या कार्याचा कोरडा परिचय किंवा तिच्या कार्याचे विवेचनात्मक वर्णन नव्हे. कार्याचा परिचय हवाच, पण तो केवळ माहितीवरून नसावा. त्याची मांडणी एखाद्या शलाकाचित्राप्रमाणे कलात्मक पद्धतीने केलेली, आटोपशीर व सुबक असावी. यशवंतरावांच्या व्यक्तिचित्रात्मक लेखनाचे स्थान असेच अनन्यसाधारण आहे. यशवंतरावांनी लिहिलेली ही व्यक्तिचित्रे सामान्य उपेक्षित व्यक्तिपासून ते महान श्रेष्ठ विभूतींची आहेत. समाजसेवक, स्वातंत्र्यसैनिक, साहित्यकार, राजकारणी, अध्यापक, लेखक आणि तळागाळातील उपेक्षित या सर्वांना यशवंतरावांच्या लेखणीने सारखाच न्याय दिला आहे.

यशवंतरावांनी रेखाटलेली व्यक्तिचित्रे

यशवंतरावांचे संपूर्ण जीवन हे लोकसमुदायात, माणसांच्या गोतावळ्यात गेले. त्यामुळे थोरामोठ्यांचे भेटीगाठीचे प्रसंग, माणसांच्या स्वभावाचे विविध नमुने,

माणसांच्या जीवनातील सुखदु:ख, माणसांचा विक्षिप्त स्वभाव, माणसांचा रागलोभ, ध्येय-मूल्ये इत्यादींची सूक्ष्मनिरीक्षणे, त्यांच्या व्यक्तिचित्रणात येतात. पण हे व्यक्तिचित्रात्मक लेखन प्रसंगोपात झालेले आहे. विशेषांक, दैनिके, ग्रंथ, प्रस्तावना, शताब्दीनिमित्त, वाढदिवसानिमित्त, स्मरणग्रंथासाठी, षष्ट्यब्दीपूर्तिनिमित्त, स्मृतिदिनानिमित्त, शिबिरातील भाषणे, सत्कारसमारंभातील केलेले अध्यक्षीय भाषण, ग्रंथप्रकाशन समारंभप्रसंगी केलेले भाषण, कधी त्या त्या व्यक्तीच्या आयुष्यातील एखाद्या स्मरणीय घटनेच्या निमित्ताने, कधी दु:खद प्रसंगाच्या वेळी तर आयुष्यात कळत नकळत त्यांच्या मनावर प्रभाव टाकणाऱ्या व आयुष्य समृद्ध करून गेलेल्या अशा अनेक व्यक्तींची चित्रणे यशवंतरावांनी चितारली आहेत. व्यक्ती जशा अनेक तसेच लेखनाचे निमित्तही वेगवेगळे आहे. त्यांच्या जीवनात ज्या व्यक्ती आल्या आणि ज्यांना पाहिले, ज्यांचा प्रत्यक्ष सहवास लाभला, ज्यांच्यासंबंधी वाचले अशांसंबंधी स्वत:च्या अनुभूतीतून आणि विचारांच्या सहाय्याने यशवंतरावांनी भावना चित्रित केल्या आहेत.

यशवंतरावांचे व्यक्तिचित्रात्मक स्वरूपाचे लेखन त्यांच्या ऋणानुबंध, सह्याद्रीचे वारे, कृष्णाकाठ, विदेश दर्शन, युगांतर, यशवंतराव चव्हाण : शब्दांचे सामर्थ्य, यशवंतराव चव्हाण विधिमंडळातील भाषणे खंड - १ ला तसेच नियतकालिके, मासिके, विशेष अंक इत्यादीतून प्रकट झालेली आहेत. यामध्ये विविध क्षेत्रांतील माणसांची स्वभाव वैशिष्ट्ये त्यांच्यात आहेत. यामध्ये विविध क्षेत्रांतील माणसांची स्वभाव वैशिष्ट्ये त्यांच्या गुणावगुणांसह स्पष्ट केली आहेत. असे असले तरी यशवंतरावांचा स्वतंत्र असा व्यक्तिचित्रात्मक संग्रह त्यांच्या नावे एकही नाही. पण इतस्तत: विखुरलेल्या स्वरूपातील त्यांचे या वाङ्मयप्रकारातील लेखन मात्र पुष्कळ आहे. त्याचीच गोळाबेरीज त्यांच्या व्यक्तिचित्रात्मक साहित्यप्रकारामध्ये करता येईल. व्यक्तिचित्रणाचा विचार करताना मागील चरित्रात्मक-आत्मकथनात्मक लेखनातील प्रसंग आणि घटना यांची पुनरावृत्ती होण्याची शक्यता आहे. कारण यशवंतरावांनी काल्पनिक पात्रांची निर्मिती करून व्यक्तिचित्रण केलेले नाही. आप्तांच्या जीवनात घडलेल्या घटनाधारे, भेटलेल्या संस्मरणीय व्यक्तींची चित्रे त्यांनी रेखाटली आहेत.

यशवंतरावांनी काही घटना, प्रसंगांच्या साहाय्याने मोजक्या शब्दसंगतीच्या आधारे माणसाच्या स्वभावाचे दर्शन घडविले आहेच; पण त्याहीपेक्षा पुढे जाऊन त्या त्या व्यक्तीमधील 'माणूस' आणि त्याला घडविणारी किंवा त्याभोवती असलेली 'परिस्थिती' या दोहोंचे उत्कट दर्शनही देतात. 'कुलसुमदादी'सारख्या सामान्य व्यक्तीचेही अत्यंत

प्रत्ययकारी असे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. यशवंतराव चव्हाणांच्या आजोळच्या देवराष्ट्र गावची ही मुसलमान कुटुंबातील यशवंतरावांच्या आजीच्या वयाची स्त्री. ती त्यांच्या आजीची मैत्रीण होती. त्या एकमेकींचा खूप जिव्हाळा होता. जातीपातीची बंधने त्या ठिकाणी गौण होती आणि प्रेमाचा झरा त्यांच्या हृदयात ओतप्रोत भरलेला असे. यशवंतरावांचे लहानपण आपल्या मामाच्या गावी खेळण्याबागडण्यात घालवताना त्यांना या कुलसुमदादीविषयी जे प्रेम निर्माण झाले, जो जिव्हाळा निर्माण झाला, जी स्वभाववैशिष्ट्ये दिसली ती त्यांनी शब्दांत अंत:करणापासून रेखाटली आहेत. कुलसुमदादी मनाने प्रेमळ होती, पण वाईटाला वाईट म्हणून फटकारण्यास ती कमी करत नसे. यशवंतराव लिहितात,''माझी आजी तिला सांगायची, कुलसुम आपण गरीब माणसे, दुसऱ्याबद्दल असं कशाला बोलायचं? तर ती म्हणे, ''तो क्या हुआ? अगं आवई जे वंगाळ ते वंगाळच.'' आणि माझ्याकडे वळून म्हणायची,''क्यू बेटे, अपनेकू किसका डर है?'' आणि जशी यायची तशी वाऱ्यासारखी निघून जायची.'' अशा प्रकारे यशवंतरावांनी कुलसुमदादीच्या बिनधास्त स्वभावावर प्रकाश टाकला आहे. ती गेली तरी गावाकडे अजूनही तिचा आवाज घुमतो आहे, असे यशवंतरावांनी कुलसुमदादीच्या प्रेमाचे, जिव्हाळ्याचे, तिच्या फटकळ स्वभावाचे आणि यशवंतरावांवरील तिच्या वात्सल्यपूर्ण प्रेमाचे हृदयस्पर्शी व्यक्तिचित्र रेखाटले आहे. खेड्यातील माणसांचे एकमेकांबद्दल स्नेहाचे, प्रेमाचे, माणुसकीचे, आपुलकीचे संबंध, ना तेथे जात असते ना धर्म असतो. फक्त जिव्हाळा. यशवंतरावांनी तो नेमका चित्रित केला आहे. या व्यक्तिचित्रणात करुणरम्य प्रसंग, उदात्त, उत्कट, माहितीच्या तपशीलांनी परिपूर्ण चित्रित केलेल्या घटना. यामुळे हे निर्व्याज व निष्पाप व्यक्तिचित्र दीर्घकाळ स्मरणात राहणारे आहे.

यशवंतरावांच्या हातून इतर माध्यमातून जीवनानुभवाचे विचार मांडत असताना त्यांच्या जीवनात ज्या व्यक्ती आल्या त्यांचे चित्र रेखाटण्याचे प्रयत्न त्यांनी केले आहेत. यशवंतरावांनी ज्या व्यक्ती साकार केल्या आहेत त्यांच्यापैकी पुष्कळांशी त्यांचा जवळचा संबंध आला आहे, काहींचा त्यांना सहवासही लाभला आहे, तर काही कुटुंबातील आहेत. आई विठाबाई, सौ. वेणूताई, यतींद्रनाथ दास, अहमद कच्छी, श्री. निकम, राघुअणा लिमये, रावसाहेब पटवर्धन, आचार्य भागवत, मानवेंद्रनाथ रॉय, साने गुरुजी, श्री. आनंदराव चव्हाण, श्री बाळासाहेब देसाई, डॉ. देशपांडे, श्री. यशवंतराव पार्लेकर, राजाजी, के.डी. पाटील, श्री. भुस्कुटे, श्री. विठ्ठलराव पागे, व्यंकटराव ओगले, श्री. सदाशिवराव पेंढारकर, श्री. केशवराव पाटील, श्री. आत्माराम बापू, बंधू गणपतराव, कृष्णा धनगर या

सर्वांची व्यक्तिरेखा अगदी मोजक्या शब्दात 'कृष्णाकाठ'मध्ये ते साकार करतात. या व्यक्तींच्या जीवनातील 'काव्य' आणि 'नाट्य' स्पष्ट करतात. यशवंतरावांना चिरपरिचित असलेल्या अनेक थोरा-मोठ्यांची शब्दचित्रे वा व्यक्तिचित्रे 'कृष्णाकाठ'मध्ये आत्मानुभव कथनाच्या माध्यमातून सहज येऊन जातात. महाराष्ट्रातील राजकारणी स्त्री पुरुषांची स्वभावचित्रे सुबकपणे रेखाटलेली दिसतात. एस्. एम्. जोशी, वसंतराव नाईक, तुळशीदास जाधव, रत्नाप्पा कुंभार, भाऊसाहेब वर्तक, उद्धवराव पाटील, भाऊसाहेब बांदोडकर, यशवंतराव मोहिते, मधुकरराव चौधरी, वसंतदादा पाटील, नरुभाऊ लिमये, विठ्ठलराव विखे पाटील, दादा उंडाळकर, शंतनुराव किर्लोस्कर, बाबूराव शेटे, ह.न. जोशी, कृ. भा. ऊर्फ अण्णासाहेब बाबर, डॉ. बिधनचंद्र रॉय, श्री. पुरुषोत्तम दास टंडन, श्री. लक्ष्मण गोविंद पाटील, भाऊसाहेब हिरे, सर रेजिनाल्ड स्पेन्स, श्री. एल्. एन्. भोईर, डॉ. एम्. यू. मस्कारेन्यास, डॉ. एस. बी. मांजरेकर, डॉ. सुब्बरायन, श्री. एम्.टी. ठाकरे अशी राजकारण, पत्रकारिता, साहित्यिक इत्यादी विविध क्षेत्रांतील अतिशय वेधक अशी व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. व्यक्तींचा गुणगौरव, त्यांची एकसष्टी, त्यांचा सन्मान, त्यांची ध्येयपूर्ती अशा विविध निमित्तांनी यशवंतरावांनी ही व्यक्तिचित्रे लिहिली आहेत. या व्यक्ती समाजातील विविध स्तरांतील आहेत. ''सर्वांच्याच जीवनात अशा अनेक व्यक्ती येऊन जातात की ज्या फक्त येतात आणि जातात एवढेच नव्हे तर काही सांगून व काही देऊन जातात. माझ्या जीवनात अशा अनेक अविस्मरणीय व्यक्ती आल्या आणि गेल्या. त्यांची स्मृतिचित्रे रेखाटावी असे मनात होते आणि आहे.'' अशाच व्यक्तींच्या माध्यमातून लेखकाने मनुष्यस्वभावातील विविधता, विसंगती, स्वभाव, कर्तृत्व, दोष यावर प्रकाश टाकला आहे. या व्यक्तींबद्दल त्यांच्या मनात जसा आदर आहे तसा जिव्हाळाही आहे. यातील काही व्यक्ती वयाने त्यांच्यापेक्षा मोठ्या आहेत, काही समवयस्क आहेत, तर काही मरण पावलेल्या आहेत. त्यामुळे या व्यक्तींच्या चित्रणात काही वेळा मित्रत्वाचा हक्क आणि सलगीही येऊन मिसळते तर केव्हा जुन्या आठवणींना उजाळा देणे आणि त्या व्यक्तींबद्दल आदरभाव व्यक्त करणे एवढेच शिल्लक राहते.

यशवंतरावांच्या या व्यक्तिचित्रणांची भूमिका ही नानाविध स्वरूपाची आहे. यशवंतरावांची ही व्यक्तिचित्रणे मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी आहेत. मानवी स्वभावांच्या विविध गुणदोषांचे आविष्कार करणारी आहेत. त्यातील जटिलता प्रकट करणारी आहेत. त्यामुळे त्यातून घडणारे चिरंतन जीवनमूल्य हे वाचकांच्या जीवन

जाणिवा समृद्ध करावयास साहाय्यभूत अशाच स्वरूपाचे आहे. यशवंतराव त्या त्या व्यक्तींच्या गुणांबरोबर त्यांचे दोष किंवा त्यांच्या मर्यादाही ओळखतात आणि तितक्याच स्पष्टपणे ते सांगतात.

या व्यक्तींची व्यक्तिमत्त्वे कोणत्या ना कोणत्या गुणांनी उजळून निघालेली आहेत. त्यांच्या त्या वैशिष्ट्यांनी लेखक प्रभावित झाला आहे. म्हणून त्या वैशिष्ट्यांचे कधी गौरवाने, कधी मित्रत्वाच्या प्रेमाने, कधी त्या व्यक्तीच्या अलैकिक गुणांनी दिपून जाऊन, तर कधी कौतुकाने वर्णन करतो आणि आपल्या लेखनात भाष्याच्या रूपाने प्रकट करतो. यशवंतरावांच्या एकूण संस्कारांमध्ये महत्त्वाचा वाटा असलेल्या त्यांच्या आईची, विठाईची व्यक्तिरेखा त्यांनी अत्यंत प्रभावीपणे साकार केली आहे. अनेक प्रसंगी त्यांनी जी व्याख्याने दिली, लेख लिहिले अशा ठिकाणी मातोश्री विठाबाईचे व्यक्तिचित्र उत्कटपणे आले आहे. विठाईच्या व्यक्तिचित्रणांमध्ये सलगता जरी नसली तरी विविध ठिकाणी यशवंतरावांनी आईच्या आठवणीतून तिचे सुंदर व्यक्तिचित्र उभे केले आहे. ''माझी आई तशी शाळेतली सुशिक्षित नव्हे. पण देवराष्ट्राच्या सगुण मातीचे गुण घेऊन ती वाढलेली होती. ती घरातली मोठी, तशी मनानेही मोठी ! तिने आयुष्यात कोणाचा राग केला नाही. रखरख केली नाही. द्वेष केला नाही. मनाने धार्मिक आणि वृत्तीने सरळ. आयुष्यात तिच्या वाट्याला दु:खच फार आले आणि तरी ती सोशिक राहिली.'' असे यशवंतराव आईचे व्यक्तिचित्रण करतात. अत्यंत सोशिक, काटकसरी स्वभावाची, शांत, गंभीर तसेच मनाने, संस्काराने, स्वभावाने मात्र अतिशय श्रीमंत होती. ही श्रीमंती मुलांवर बिंबविण्याचा तिचा नेहमी प्रयत्न असे. ''बाबा तू वाचतोस, हिंडतोस, फिरतोस, - हे सगळे चांगले आहे. पण कुणा वाईटाच्या नादाला लागू नकोस. आपण गरीब असलो तरी आपल्या घरची श्रीमंती आपल्या वागण्यात, बोलण्यात आहे, रीतीरिवाजात आहे. ती कायम ठेव, तुला कोणाची नोकरी चाकरी नसली, तरी माझी हरकत नाही. मी कष्ट करून तुझे शिक्षण पुरे करीन. पण तू ह्या शिक्षणामध्ये हयगय होईल असे काही करू नकोस. तुम्ही शिकलात तर तुमचे दैव मोठे होईल.'' अडचणीच्या काळातही तिने यशवंतरावांचे शिक्षण पूर्ण करण्याचा ध्यासच घेतला. शिक्षण ही शक्ती आहे असे समजून तिची धडपड होती आणि तिने ती पूर्णत्वाला नेलीही. विठाईचे तिन्ही मुलांवर असलेले आंतरिक प्रेम, कोणत्याही परिस्थितीत राहण्याची तिची तयारी, भावाभावांमधील प्रेम आणि विश्वास यांना तडा जाऊ नये म्हणून तिने घेतलेली खबरदारी, देवाधर्मावरील श्रद्धा, संकटकाळात मुलांच्या पाठीशी उभे राहून आत्मबळ वाढविण्याची तिची हातोटी, मुले जीवनात यशस्वी झाल्यानंतर आनंद व्यक्त

करणारी, अशी ही मुलांच्या यश आणि अपयशामध्येही सहजपणे सहभागी होणारी आणि त्यांना जीवनात ठामपणे उभे करण्याचे सामर्थ्य देणारी ती माता होती. असे आईचे मोठेपण ते वर्णन करतात,''माती आणि माता यांच्याशी एकरूप होणे हा माझा जन्मजात स्वभाव आहे. तीर्थतुल्य मातेच्या दर्शनाने माझे अष्टसात्त्विक भाव जागृत होतात. अंतर्मन निथळू लागते. पौर्णिमेच्या चंद्रातून अमृतबिंदू ठिबकावेत, तशी तिची प्रेमळ दृष्टी माझ्यावर वर्षाव करते आणि नकळत पायगत झालेल्या पापण्या, हृदयाच्या चौफाळ्यावरील पावले धुंडाळू लागतात. ही ध्यानधारणा माझ्या अंगवळणी पडली आहे.'' अशा काव्यमय शब्दांत यशवंतराव वर्णन करतात. नागपूर येथे दि. ३० मार्च १९६१ रोजी यशवंतरावांच्या सत्तेचाळीसाव्या वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला. त्या सत्काराला उत्तर देताना ते म्हणतात,''म्हाताऱ्या आईची आज मला आठवण येते. आपल्या या सगळ्या प्रेमाला पोचविण्याचे श्रेय माझ्या त्या अशिक्षित आईला आहे. आज दुनियेमध्ये काय चालले आहे ह्याचे तिला फारसे ज्ञान नाही. मी तिचा धाकटा मुलगा आज मुख्यमंत्री आहे. पण मुख्यमंत्री म्हणजे काय हे आजही तिला माहीत नाही..... तिची पुण्याई, तिचे साधेपण, तिचे प्रेम, तिने शिकविलेले लहानपणचे चार दोन छोटे छोटे गुण हेच माझ्या जीवनामध्ये मला उपयोगी पडले आहेत.'' या वर्णनातून आईची साक्षात मूर्तीच ते उभी करतात. आई ही आम्हा सर्वांची शक्ती होती. आमची खरी शाळा आमची आईच होती, अशी लेखक आपल्या आईबद्दल कृतज्ञता व्यक्त करतात. ''मातीच्या आणि मातेच्या सानिध्यात मला या सर्वांचा साक्षात्कार घडतो. तिच्या अंत:करणाच्या अवकाशात मी स्थिरावतो, प्रशांत मनोभूमीवर पहुडतो, आत्मतेजाने तेजाळून निघतो. प्रेमामृताने ओलाचिंब होतो आणि श्वासात श्वास मिसळून जातो.'' अशा स्वरूपाचे भावानुभव यशवंतराव आईच्या संदर्भात व्यक्त करतात.

यशवंतरावांच्या कार्यात अप्रत्यक्षपणे पण निगर्वीपणे सतत ४० वर्षे साथसंगत करणाऱ्या वेणूताईविषयी त्यांनी फारसे लिहिले नाही. प्रसंगानुसार जे थोडे फार लेखन झाले आहे त्यातून वेणूताईंची सुंदर व्यक्तिरेखा चित्रित होते. यशवंतरावांच्या कर्तृत्वात, संस्कारात जेवढा त्यांच्या आईचा महत्त्वाचा वाटा आहे तेवढाच मोठा वाटा वेणूताईंचा आहे. यशवंतरावांच्या जीवनाशी समरस होऊन एकरूप होऊन वेणूताईंनी संसार केला. अशा या गृहिणीस यशवंतराव घरी नसताना जेव्हा अटक झाली त्या प्रसंगाबद्दल ते लिहितात,''नव्या संसाराची स्वप्ने रंगवण्याच्या वयात तिला तुरुंगाची हवा चाखावी लागली. तीही तिने माझ्याशी लग्न केले या एकाच अपराधाबद्दल ! मला जास्त वाईट

वाटले ते तिच्या लग्नानंतरच्या पहिल्याच कौतुकाच्या संक्रांतीवर तुरुंगाची संक्रांत आली म्हणून. पण तिने निराशेचा कडवटपणा कधीही जीभेवर येऊ दिला नाही ही गोष्ट यशवंतरावांच्या मनाला लागली. त्यात विवाहानंतर जवळपास दहा वर्षे त्यांना कौटुंबिक संकटांचा सामना करावा लागला. त्यात वेणूताईंचा गंभीर आजार, आर्थिक दुरवस्था याबद्दल यशवंतराव लिहितात,''लग्न झाल्यापासून तिला सुखाचे दिवस असे दिसलेच नव्हते. सतत मनस्ताप आणि काळजी. तिच्या संसाराची सुरुवातच अशी दु:खमय झालेली. त्यात तुरुंगवासाचा त्रास. माझ्या मोठ्या बंधूंचा मृत्यू.... माझे मलाच अपराध्यासारखे वाटू लागले.'' असे भावनावश होऊन नंतर यशवंतराव सांगतात,''तुझ्या संगतीची साथ ही ईश्वराने दिलेली मोठी देणगी आहे. त्याच्या या कृपेच्या जाणिवेने माझे मन आकंठ भरलेले आहे. तुझ्या उदार अंत:करणामध्ये माझ्या या जाणिवेला जागा राहू दे.'' अशी भावना व्यक्त करतात. यशवंतराव वेणूताईंच्या संपूर्ण जीवनाचा शोध, त्यांचे कार्यकर्तृत्व, स्वत:ला आलेला पदोपदीचा अनुभव, वेणूताईंच्या आयुष्यातील अनेक लहान मोठ्या घटना, प्रसंग, त्यांचा समतोलपणा अशा विविध गुणवैशिष्ट्यांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न वेणूताईंच्या प्रसंगानुरूप केलेल्या लेखनातून करतात.

वेणूताईंचे हे व्यक्तिचित्र आकर्षक आणि परिणामकारक आहे. यशवंतरावांनी वेणूताईंच्या अंतर्मनाचा नेमका ठाव घेतला आहे. त्यांच्या या लेखनाच्या 'अल्पाक्षरत्व' या गुणामुळे ही चित्रे मनाला स्पर्श करणारी आहेत.

यशवंतरावांनी 'कृष्णाकाठ'मध्ये स्वत:च्या एका खास शैलीत व्यक्तिचित्रे लिहिली आहेत. गणपतराव या त्यांच्या बंधूबद्दल त्यांच्या मनात जसा आदर आहे तसा जिव्हाळाही आहे. तो त्यांच्यापेक्षा वयाने मोठा आहे. अशा या व्यक्तिचित्राच्या देहरूपाचे व गुणांचे वर्णन यशवंतराव करताना लिहितात,''या बंधूचे माझ्यावर मोठे प्रेम होते. उंचीने मध्यम, काळासावळा वर्ण, चेहऱ्याची धाटणी थोडी फार माझ्यासारखीच, डोक्याला रंगवलेला फेटा, हातामध्ये छत्री आणि डुलत डुलत चालण्याची सवय. हे त्यांचे विद्यार्थिदशेपासूनचे नजरेसमोर असलेले चित्र अखेरपर्यंत कायम राहिले. माणसांची ओळख करून घेण्यात व मैत्री जमवण्यात ते अतिशय पटाईत असत.'' असे गणपतरावांचे यथोचित वर्णन करतात.

येरवडा तुरुंगातील पंधरा महिन्यांचे यशवंतरावांचे जीवन म्हणजे त्यांच्या आयुष्यातला एक उत्तम काळ होता. तेथे त्यांना चांगले विचारवंत भेटले. कार्यकर्ते भेटले. अशा विचारवंतांमधील आचार्य भागवतांच्या व्यक्तिमत्त्वाचा ते असा उल्लेख करतात, ''आचार्य भागवत हे सर्वंकष बुद्धीचे गृहस्थ होते. प्रखर विद्वत्ता आणि

तितकीच परखड वाणी ही त्यांची दोन मोठी आयुधे होती आणि ते अनेक विषयांवर तास न् तास बोलत असत, आणि ते निव्वळ ऐकून सुद्धा कोणी मनुष्य बहुश्रुत, ज्ञानी झाला असता !'' मानवेंद्रनाथ रॉय हे त्या काळातील राजकीय क्षेत्रातले महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व. ''सहा फुटापेक्षा जास्त उंची असलेला, चेहऱ्यावर बुद्धिमत्तेचे तेज सहजदर्शनी दिसणारा हा पुरुष प्रकृतीने काहीसा खालावलेला होता. पण स्वभावाने गंभीर म्हणून प्रभावी वाटला.'' अशा व्यक्तिमत्त्वाने यशवंतरावांना आकर्षित करून घेतले. कराड मतदारसंघातून त्यावेळी निवडून आलेले आत्माराम बापू पाटील हे नव्या पिढीमधल्या कार्यकर्त्यांचे प्रतिनिधी होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल यशवंतराव लिहितात, ''आत्माराम बापू पाटील हे मध्यम शेतकरी कुटुंबातील होते. तीन भावांपैकी ते मधले बंधू होते. त्यांना लहान शेतकरी कुटुंबातील म्हणता येणार नाही. एवढी त्यांची शेती होती. ते मध्यम शेतकरी होते..... त्या वेळी ते अविवाहित होते. ..... आत्माराम बापू हे उंचीने किंचितसे कमी, परंतु रेखीव चेहऱ्यामुळे मनात भरणारी व्यक्ती होती. त्यांचे खोल डोळे आणि अणकुचीदार असलेले गरुडासारखे नाक हे त्यांच्या चेहऱ्याचे वैशिष्ट्य होते. त्यांचे मॅट्रिकपर्यंत शिक्षण झालेले होते. कोल्हापूरला शिक्षण झाल्यामुळे वागणे बोलणे सुसंस्कृत होते. भाषण उत्तम करीत आणि माणसे जोडण्याचे कर्तृत्व त्यांच्यात होते.'' या यशवंतरावांच्या व्यक्तिदर्शनात किती सूक्ष्मता आहे याचा अनुभव त्यांच्या या व्यक्तिचित्रणातून येतो.

रघुअण्णांच्या सहकार्याने यशवंतरावांची आणि वि.दा.सावरकरांची भेट झाली. या लोकोत्तर महापुरुषाचे दर्शन घडले यासारखे भाग्यच नाही. याचा आनंद व्यक्त करताना त्यांचे वर्णन करतात,''मध्यम उंचीचे काहीसे किरकोळ बांध्याचे, डोळ्यांवर चष्मा आणि त्या पलीकडून पाहणारी त्यांची भेदक नजर अशी ती मूर्ती समोर आली. अंगात स्वच्छ पांढरा सदरा आणि तितकेच स्वच्छ पांढरे सैलसे धोतर. पायात साध्या वहाणा अशा या घरगुती वेषात होते.... आणि सागर आणि सावरकर हे रत्नागिरीत एकाच वेळी पाहण्याचे भाग्य लाभले. अशा भारतीय क्रांतिकारक कुलपुरुषांबद्दलचा आदर आणि जिव्हाळा येथे साक्षात चित्रित करतात.

स्वातंत्र्यसैनिक तुळशीदास जाधव हे महाराष्ट्रातील स्वातंत्र्यसैनिकांत अग्रगण्य मानले जावे या तोलाचे कार्यकर्ते. ''....पराभव हा शब्द त्यांना माहीत नव्हता. पराभावाने ते कधी थकणार नाहीत. विचार मांडण्याचा कधी कंटाळा आला नाही. सर्वांना भेटून आपले विचार सांगण्याची टाळाटाळ नाही. त्यांच्या स्वभावातील हे महत्त्वाचे गुण आहेत.'' असे यशवंतराव सांगतात. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांच्या एकसष्टीनिमित्त लिहिलेल्या अभीष्टचिंतनपर लेखात लिहितात,

''एक यशस्वी शासनकर्ता या नात्याने आवश्यक असलेले गुण तर त्यांच्या अंगी आहेतच. पण शिवाय एक माणूस म्हणूनही त्यांच्या अंगी जी मनाची ऋजुता, सहृदयता, उमदेपणा, शौर्य, चिकाटी, जिद्द, व्यवहारी दृष्टी आणि कष्ट उपसण्याची तयारी आहे....श्री. वसंतरावजींचा पिंड शेतकऱ्याचा आहे. मातीचा सुगंध किंवा पिकांचा बहर त्यांना सर्वात अधिक सुखद वाटतो. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सुज्ञता व समयज्ञता आहे..... उत्तम गृहस्थ व शहाणा शासक या शब्दांनी मी त्यांचे व्यक्तिमत्त्व रेखाटेन.''

क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पंच्याहत्तराव्या वाढदिवसानिमित्त स्मरणिकेसाठी लिहिलेल्या लेखात त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर असा प्रकाश टाकतात.....१९४२ चा लढा म्हणजे स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासातील एक सोनेरी पान ! नानांनी हा लढा गाजवून सोडला. चव्वेचाळीस महिने त्यांनी भूमिगत राहून ब्रिटिश सरकारला नामोहरम केले व भूमिगत चळवळ प्रभावीपणे चालवली.....पुढे त्यांच्या वक्तृत्वशैलीबद्दल सांगतात,''ही शैली ग्रामीण जीवनातील जिव्हाळ्याच्या अनुभवांनी घडलेली आहे. जिव्हाळा, तळमळ, निर्भयता, स्पष्टवक्तेपणा, कुणाला न झोंबणारा पण विषय स्पष्ट करणारा विनोद हे त्यांच्या वक्तृत्वाचे गुणविशेष ! कोणतीही सभा ते सहजासहजी जिंकतात.'' यशवंतराव चव्हाण आवडलेल्या माणसांच्या बाह्य व्यक्तिमत्त्वाचे जे चित्र रेखाटतात तेही मोजक्या शब्दात. त्यामुळे नाना पाटीलसारखी व्यक्ती तिच्या वैशिष्ट्यांसह वाचकांसमोर उभी राहते. अर्थात देहयष्टीसोबतच त्या व्यक्तीच्या प्रवृत्तीही यशवंतराव सहजपणे प्रकट करून जातात.

एस्. एम्. जोशी हे एक स्फटिकासारखे स्वच्छ व्यक्तिमत्त्व आहे असा मोजक्या शब्दांत त्यांचा उल्लेख यशवंतराव करतात. राघुअण्णा यांच्यासंबंधी लिहितात, ''इतका मनमोकळा, प्रेमळ, ग्रामीण जनतेशी शंभर टक्के एकरूप झालेला असा कार्यकर्ता मी कधीच पाहिला नाही.'' यशवंतराव त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने फार प्रभावित झाले. स्वत: जाऊन त्यांनी त्यांची ओळख करून घेतली आणि नंतर मसूरचे रहिवासी असलेले हे रघुअण्णा यशवंतरावांचे जवळचे मित्र बनले.

कोल्हापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्यसैनिक रत्नाप्पा कुंभार यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल लिहितात, ''संपूर्ण जीवन त्यागाने व काही निश्चित कामासाठी वाहून घेणाऱ्या महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांत रत्नाप्पा हे महत्त्वाचे गृहस्थ आहेत.''

भाऊसाहेब वर्तक यांच्या षष्ट्यब्दीपूर्तिच्या निमित्ताने 'जीवनधार' या गौरवग्रंथात लिहिलेल्या लेखात त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा असा उल्लेख करतात. ''कर्तृत्व हे माणसाला चिकटवता येत नाही. चिकटवलेले कर्तृत्व फार वेळ टिकत नाही. कर्तृत्व हे कार्यातूनच फुलावे लागते. ते तसे फुलत असल्याचा प्रत्यय यावा लागतो. भाऊसाहेबांच्या बाबतीत

मला हा प्रत्यय प्रकर्षाने आला आणि महाराष्ट्रात एक जिद्दीचा प्रखर कार्यनिष्ठा असलेला कार्यकर्ता उदयास येत आहे अशी भाऊसाहेबांचे त्यावेळचे कार्य पाहून माझी खात्री झाली.''

शेतकरी कामगार पक्षाचे त्यावेळचे विरोधीपक्षनेते उद्धवराव पाटील यांच्या चरित्र व गौरवग्रंथ स्मरणिकेसाठी लिहिलेल्या लेखात त्यांच्या स्वभावाविषयी लिहितात, ''तसा त्यांचा स्वभाव अतिरेकी नाही. आपल्या म्हणण्याला काही तात्त्विक बाजू आहे, अशा पद्धतीने ते आपले विचार मांडीत असत. ते परखड बोलत असले तरी त्यात कडवटपणा व वैयक्तिक टीकेचा भाग दिसून आला नाही. अत्यंत नेकीचा आणि पक्षाच्या कार्याला वाहून घेतलेला कार्यकर्ता व नेता हे उद्धवरावांचे वर्णन उचित ठरेल.'' गोव्याचे माजी मुख्यमंत्री भाऊसाहेब बांदोडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त लिहिलेल्या लेखात त्यांचे व्यक्तिमत्त्व चित्रण करताना लिहितात, ''कै. भाऊसाहेब बांदोडकरांची आठवण झाली की त्यांचे हसरे, उमदे व राजबिंडे व्यक्तिमत्त्व डोळ्यांसमोर येते..... त्यांच्यात महाराष्ट्राच्या आणि गोव्याच्या मातीच्या गुणांचा मिलाफ होता. जिद्द, करारीपणा, स्पष्टवक्तेपणा आणि गरिबांविषयी आस्था या गुणांत ईश्वरभक्ती, कला, साहित्यप्रेम, संगीत, नाटक यांचे वेड आणि अनौपचारिक जिव्हाळा यांचे इतके बेमालूम मिश्रण झाले होते की त्यामुळे त्यांचे वेगळेपण नजरेत भरे.'' यशवंतराव आपण पाहिलेल्या व्यक्तीचे अंतर्मन बारकाईने तपासतात. तसेच त्या व्यक्तित्वातील जगाच्या लक्षात न येणारी सूक्ष्म धाग्यांची गुंतागुंत आणि त्यांच्या वृत्तींची संमिश्रता यशवंतराव अशीच उकलून दाखवतात आणि आपल्याला दिसलेल्या माणसाचे रूप वाचकांसमोर मांडतात. साकार करतात.

यशवंतरावांनी कृ.भा. ऊर्फ अण्णासाहेब बाबर यांच्याबद्दल लिहिले आहे, ''अण्णांचा सहवास म्हणजे एक विचारांची उत्तम शिदोरी होती.''यशवंतराव चव्हाणांनी किसन वीर यांचे व्यक्तिचित्रण फार हळव्या मनाने केलेले आहे. एका ध्येयाने वेडे झालेले, भावनेने झपाटलेले, अशा या व्यक्तीची प्रथम ओळखीची आठवण लिहिताना ''माझी त्यांची प्रत्यक्ष अशी भेट ३४-३५ च्या सुमारास झाली. उंच व बांधीव शरीर, मिशीचे आकडे आणि हसरा चेहरा ही त्यांची तीन वैशिष्ट्ये प्रथम मी जेव्हा पाहिली तेव्हाच माझ्या मनात खिळून राहिली. हळूहळू आमच्या ओळखीचे रूपांतर मैत्रीत होऊ लागले '..... ज्याने स्वत:च्या आयुष्यात स्वत:साठी काही मिळविले नाही; परंतु इतरांना मिळत राहावे यासाठी प्रयत्न केले, कष्ट केले, अखेरपर्यंत ज्याने आपले राहण्याचे ठिकाण वा घर सोडले नाही असे कार्यकर्ते देशात हाताच्या बोटांवर मोजण्याइतके आहेत. त्यात आबांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल.'' यशवंतराव चव्हाण व किसन वीर या

दोन कुटुंबातील परस्परसंबंध घरोब्यातले होते. यशवंतरावांच्या वैयक्तिक घडामोडींच्या प्रसंगामध्ये ते ज्या थोड्याच मित्रांवर विश्वास टाकत. त्यामध्ये किसन वीराचे स्थान महत्त्वाचे होते. अशी वरून दिसणारी कणखरमूर्ती हृदयाने कोमल होती; पण कॅन्सरच्या आजाराने १९८० मध्ये त्यांचा मृत्यू झाला. त्यावेळी स्मृतिविशेष अंकासाठी लिहिलेल्या लेखात आपल्या वरील भावना ते व्यक्त करतात. यशवंतरावांनी जी व्यक्तिचित्रे लिहिली त्यात या व्यक्तिरेखेला सर्वात वरचे स्थान आहे.

वसंतदादांचे मोठेपण सांगताना यशवंतराव लालित्यपूर्ण काव्यमय शैलीद्वारे सांगतात.''सांगली जेलमधून हत्यारे घेऊन किल्ल्याच्या भिंतीवरून केलेले उड्डाण हा दादांच्या कर्तृत्वाचा श्रीगणेशा होता. किंबहुना त्यांच्या सर्व जीवनाचे व पुढे घडलेल्या सर्व कर्तृत्वाचे ते एक प्रतीक होते.'' पुढे पद्माळे या दादांच्या गावी गेल्यानंतर तेथील लिफ्ट इरिगेशनचे काम यशवंतरावांनी पाहिल्यानंतर त्यांच्या कामाचे मूल्यमापन, गौरव करताना जुनी आठवण सांगतात...''नदीच्या पात्रातून वाहणाऱ्या कृष्णेच्या पाण्याला शतकानुशतके आपल्या काठावर असलेल्या व तहानलेल्या काळ्या बहिणीची आठवण आज झाली. कृष्णाकोयनेचा प्रीतिसंगम हा निसर्गाने दिलेला संगम आहे. पण काळी जमीन व कृष्णा नदी यांचा झालेला आजचा संगम हा माणसाच्या कर्तृत्वाने घडलेला संगम आहे आणि म्हणून त्याला जास्त महत्त्व आहे. या कर्तृत्वाचे प्रतीक आमचे वसंतराव आहेत. दादांसारखी पाच-दहा माणसे साथीला असली तर महाराष्ट्राच्या कर्तृत्वाला सोन्याचे पीक येईल.'' यशवंतराव वसंतदादांच्या व्यक्तिमत्त्वाचे, त्याच्या कर्तृत्वाचे, माणसांची पारख आणि पारखून मित्र केलेल्या माणसांची जपणूक, संघटना चातुर्य, प्रेम, जीवनातील प्रत्यक्ष अनुभव, विधायक स्वभाव, निर्धारी स्वभाव, तडजोडी वृत्ती, सार्वजनिक जीवनाची प्रतिष्ठा ठेवण्यासाठी धडपड, पक्षनिष्ठा अशा विविध गुणवैशिष्ट्यांचे वर्णन करतात.

यशवंतराव चव्हाणांची व्यक्तिचित्रे आकर्षक आणि परिणामकारक झाली आहेत. ती मनाला स्पर्श करून जातात. ही चित्रे प्रदीर्घ जरी नसली तरी त्यातील वर्णने प्रत्ययकारी वाटतात. वसंतदादांना १९७६ साली मंत्रिमंडळातून काढले व प्रथम ते दिल्लीस भेटले तेव्हाच्या प्रसंगाची आठवण यशवंतराव सांगतात. ''जेव्हा त्यांची माझी भेट झाली, तेव्हा का कोण जाणे, माझे डोळे भरून आले आणि पुष्कळ प्रयत्न करूनही मला ते आवरता आले नाहीत. १९६५ साली आई गेली तेव्हाही असेच आवरणे अवघड झाले होते. पण तरीही मी ते सावरले होते. पण आज असे का होत आहे हे माझे मला सांगणे शक्य होईना..... सोन्यासारख्या या माणसाचा असा अवमान का झाला व कशासाठी ? आणि मी हे थांबवू शकलो नाही यात आमच्या सर्वांच्या कामाचा पराभव

आहे, अशी एक प्रकारची असहायतेची भावना मनात तयार झाली होती.''

पत्रकार नरूभाऊ लिमये यांचे व्यक्तिचित्र यशवंतराव असेच रेखाटतात.''ह्या माणसात तल्लख बुद्धी, तळमळ, संघटना चातुर्य आणि जिद्द आहे. आणखी एक गोष्ट ध्यानात आली ती ही की तात्त्विक मतभेदांच्या गदारोळात स्नेहाचे निर्मळ झरे न ढवळले जाण्यासाठी, मैत्रीचा नाजूक बंध सुरक्षित राखण्यासाठी आवश्यक तो हळुवारपणा ह्या माणसात आहे.'' त्यामुळे यशवंतराव व त्यांच्यात संघर्ष होऊनही त्यांची मैत्री अतूट राहिली. या व्यक्तिमत्त्वातील अनेक गुण यशवंतरावांनी पाहिले. त्यांची बुद्धिमत्ता, जनकल्याणाची तळमळ, जिद्द, स्वत:शी, मनाशी इमान राखण्याची हिंमत, जुटून काम करण्याची वृत्ती अशा कितीतरी गुणांचा सार्थ गौरव यशवंतराव करतात. यशवंतरावांनी अशा कितीतरी व्यक्ती पाहिल्या त्या त्यांच्या बाह्यचित्रणासह साकारल्या आहेत. शांतारामबापू इनामदार, पांडुरंग अण्णा शिराळकर, म्हातारबा रामोशी कोतावडेकर, भेटलेले अनेक विद्वान पंडित अशी कितीतरी विचारधारांची माणसे यशवंतरावांनी पाहिली व त्या त्या वेळी प्रसंगानुसार योग्य, समयोचित वर्णन करून त्यांचे दर्शन घडविले. माणसं समजून घेण्यासाठी हवा असणारा मनाचा मोठेपणा आणि हळुवारपणा यशवंतरावांच्या जवळ आहे. त्यांच्याच शब्दात ते असे चिंतन प्रकट करतात, ''आयुष्यात माणसे भेटतात, पांगतात, काहींची तर पुन्हा गाठभेटही होत नाही, पण काही पुन: भेटतात. त्यांच्याशी संबंध निर्माण होतात आणि ते संबंध शक्तिशाली बनतात. परस्परांच्या जीवनाचा सहारा बनतात. ते जीवन समृद्ध आणि संपन्न बनवतात. माणसामाणसांतले संबंध नाजूक असतात. ते शब्दांनी वर्णून सांगायचे समर्थ प्रयत्नही पुष्कळदा मागे असमाधान ठेवून जातात. तरीही प्रसंगानुरूप माणसांना माणसांबद्दल बोलावे, लिहावे लागते. हे अवघड असते. पण म्हणून ते टाळावे, हे काही खरे नाही. मिळालेली भावव्यक्तीची संधी आपल्याला नीट वापरता आली, तर समाधान वाटते. ज्यांच्याबद्दल आपण बोलतो, त्यांनाही त्यातल्या प्रामाणिकपणाचा प्रत्यय आला तर बरे वाटत असावे, असा अंदाज मी माझ्या अनुभवावरून बांधतो.'' यशवंतरावांनी बाह्यसौंदर्यासोबतच व्यक्तीच्या अंतरंगाचे सौंदर्य स्पष्ट केले आहे. त्यांची ही व्यक्तिचित्रे सौंदर्यलक्षी, संवेदनशील, चिंतनशील आहेत. समोरच्या व्यक्तीला आरपार पाहता येईल अशी भेदक दृष्टी असणाऱ्या लेखकाचे व्यक्तिमत्त्व या चित्रणातून सतत डोकावत राहते.

यशवंतरावांच्या व्यक्तिचित्रणात्मक लेखनाचे विशेष

यशवंतरावांची ही व्यक्तिचित्रे प्रसंगपरत्वे लिहिली आहेत. या ना त्या निमित्ताने

काही मान्यवर व्यक्तीसंबंधी लिहिलेली ही व्यक्तिचित्रे वाचत असताना नानाविध क्षेत्रांतील व्यक्तींचा अनोखा परिचय घडतो. त्यांच्या अपरिमित पैलूंचे दर्शन घडते. गुणांनी व स्वभावविशेषांनी नटलेली ही माणसे जशी मान्यवर आहेत तशीच अप्रसिद्धही आहेत. या व्यक्तिचित्रणात्मक लेखांचा बारकाईने अभ्यास करताना एक गोष्ट तत्क्षणी उमगते की, किती विविध क्षेत्रांतल्या व्यक्तींशी यशवंतरावांचे निकटचे संबंध होते. त्यांची लेखणी ह्या व्यक्तिमधल्या माणुसकीचे सतत वेध घेत असते. त्यांच्या जीवनातल्या लहानसहान प्रसंगातूनही मोठा आशय मांडते. यशवंतराव चव्हाणांच्या व्यक्तिदर्शनात किती सूक्ष्मता असते याचा अनुभव त्यांच्या प्रत्येक व्यक्तिचित्रणातून येतो. तुरचीचा कृष्णा धनगर, कुलसुमदादी, गणपतराव चव्हाण, आत्माराम पाटील, किसन वीर, वसंतदादा पाटील, आई विठाई इत्यादींच्या स्वभावाचे, त्यांच्या आयुष्याचे, लेखकाने केलेले वर्णन असेच आहे. किसन वीर यांच्याबद्दल लिहितात,''किती लोकांना माहीत आहे की वरून दिसणारी कणखर मूर्ती हृदयाने कोमल आहे. मित्रांसाठी व गरिबांसाठी कारुण्याचे अश्रू त्यांच्या डोळ्यात उभे राहतात किंवा भाऊसाहेब बांदोडकर हे रसिक होते, जिज्ञासू ग्रंथप्रेमी होते आणि विद्याप्रेमी सरस्वतीभक्त होते.'' वसंतदादांच्या कर्तृत्वाबद्दल लिहितात, ''कृष्णाकोयनेचा प्रीतिसंगम हा निसर्गाने दिलेला संगम आहे. पण काळी जमीन व कृष्णा नदी यांचा झालेला आजचा संगम हा माणसाच्या कर्तृत्वाने घडलेला संगम आहे.'' एकेक मिताक्षरी वाक्यातून व सर्वसामान्य घटनांतून त्या व्यक्तीच्या असामान्यत्वाचे दर्शन घडवतात. मनुष्यजीवनातील काही निष्ठांवर, आदर्शावर व मंगल मूल्यांवर यशवंतरावांचा नितांत विश्वास आहे. ह्या व्यक्तिचित्रणातील पुष्कळशा लेखांना त्यांच्या अस्सल भारतीय तत्त्वचिंतनाचा परिसस्पर्श झालेला आहे. भाऊसाहेब वर्तकांच्या व्यक्तिचित्रणातील चिंतनशील विचार महत्त्वाचे आहेत. ''अनुभव हा कार्यातून मिळवायचा असतो. त्यासाठी मनाची एक विशिष्ट बैठक, तो ग्रहण करण्याची पात्रता व कार्यपद्धतीची निश्चित दिशा असावी लागते. या गुणांनी युक्त भाऊसाहेबांचे व्यक्तिमत्त्व आहे.'' अशा रीतीने नावीन्यपूर्ण आणि कसदार अनुभव उचित चिंतनशील वृत्तीने कलात्मक स्वरूपात व्यक्त करतात. यशवंतरावांनी एखाद्या व्यक्तीच्या स्वभावाला केंद्रस्थानी मांडून त्याचे रसरशीत आणि स्पष्ट चित्र निर्माण केलेले आढळते.

यशवंतरावांनी त्यांच्या व्यक्तिचित्र रेखाटनात समाजप्रबोधनाची भूमिका स्वीकारलेली आहे. याचबरोबर व्यक्तिदर्शनालाही महत्त्व दिलेले आहे. व्यक्तीचा आपणास अज्ञात असलेला एखादा स्वभाव पैलू मोठ्या कौशल्याने यशवंतरावांनी

रेखाटला आहे. जीवनात लौकिक अर्थाने मोठी असणारी माणसेच यशवंतरावांच्या व्यक्तिचित्रणात आहेत. त्यामुळे दु:खाच्या खाईत होरपळून गेलेल्या व्यक्तींची चित्रणे कमी आढळतात. यशवंतरावांच्या व्यक्तिचित्रणाचे आणखी वैशिष्ट्य म्हणजे आपल्या लेखणीत चित्रित केलेल्या व्यक्तींच्या स्वभावविशेषावर ठळक स्वरूपात दिलेला भर तसेच व्यक्तिचित्रण परिणामकारक व कलात्मक करण्यासाठी वेगवेगळ्या प्रसंगांचा केलेला उपयोग. अशी व्यक्तिचित्रे वाचकांची सहानुभूती प्राप्त करतात. पण त्यांना सखोलता व परिपूर्णता प्राप्त होत नाही. त्या त्या व्यक्तिचित्रणातील एखादी दुसरी बाजू दाखवल्याने त्या व्यक्तिचित्रणाला अपूर्णता आल्यासारखे जाणवते. तरीही यशवंतरावांनी काही व्यक्तिचित्रांच्या माध्यमातून जीवनमूल्यांचा साक्षात्कार घडविण्यावर भर दिलेला दिसतो. सदाचार, सद्विचार, त्याग, सेवा, प्रेम, सहानुभूती इ. गुणांचा साक्षात्कार त्या व्यक्तिचित्रणात केला आहे. त्यामुळे आचार आणि विचारालाच त्यांच्या व्यक्तिचित्रणात अधिक महत्त्व लाभलेले आहे.

यशवंतरावांनी अधूनमधून वेगवेगळ्या क्षेत्रांतल्या प्रवृत्तीवर सतत भाष्ये केली आहेत. जीवनाचे तत्त्वज्ञानही सांगितले आहे. व्यक्तीतील अलौकिक गुणांची, प्रवृत्तीची, मोठेपणाची, अनेक वर्णने चित्रित केली आहेत. सामान्यांची ही दु:खे सहजच यशवंतरावांच्या लेखणीत सामावली आहेत. ती दु:खे व्यक्त होताना त्या दु:खांना एक तीव्र धार चढते. वाचकांस ती जाणवल्यावाचून राहत नाही. त्यामुळे या व्यक्तिचित्रणाला सजीवता प्राप्त होते. त्यांच्या व्यक्तिचित्रणात स्वभावगुणांचा कलात्मक आविष्कार झालेला आहे. अशा वैशिष्ट्यांनी नटलेली ही आदर्श व्यक्तिचित्रे साक्षात चैतन्यरूप धारण करतात.

○ ○ ○

केल्याने देशाटन

प्रवासवर्णन हा ललितवाङ्मयाचा वैशिष्ट्यपूर्ण प्रकार आहे. हा वाङ्मयप्रकार मानवी मनाच्या स्वाभाविक प्रवृत्तीतून निर्माण झाला. व्यक्तीने पाहिलेला प्रदेश, त्या प्रदेशातील संस्कृती, तेथील निसर्ग, प्रवासात आलेले सुखदु:खांचे प्रसंग याची माहिती सांगण्याची माणसांची सहजवृत्ती असते. तीच प्रवासवर्णनपर वाङ्मयाच्या निर्मितीला प्रेरणा देते. ''प्रवासवर्णन एक ललित वाङ्मयाचा प्रकार म्हणून त्याचे रूप शोधावयाचे झाल्यास प्रवासवर्णनकाराने आपल्या स्वत:च्या शरीराने आणि मनाने केलेल्या प्रवासाचा, प्रवासात घेतलेल्या, आलेल्या अनुभवांचा आणि स्थळादी गोष्टींच्या झालेल्या संस्कारांचा स्मृतिरूपाने केलेला जागर, स्मृतिरूपाने घेतलेला पुनर्शोध शब्दरूपात सजीव करण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे प्रवासवर्णन असे करता येईल.'' अशा स्वरूपाची या वाङ्मयाची व्याख्या केली आहे. पूर्वी प्रवास वर्णनांचा एक ठराविक साचा होता. ज्या देशाला, स्थळाला भेटी दिल्या त्याचे सौंदर्य, समाजजीवन अथवा रीतीरिवाज रेखाटण्यासाठी काही प्रवासवर्णने लिहिली गेली किंवा पुण्यप्राप्तीच्या हेतूने जो काय प्रवास झाला त्याची माहिती देणारी काही प्रवासवर्णने आढळतात. अशा प्रवासवर्णनात लेखकांची भूमिका केवळ वाचकांना आपण पाहिलेला प्रदेश समजावून सांगावा त्याला ठाऊक नसलेल्या प्रदेशाची व ठिकाणांची माहिती द्यावी अशीच आढळते.

या प्रवासवर्णनांनी ललित गद्याची पातळी गाठलेली आहे. अशा स्वरूपाच्या अनेक सर्जनशील कलावंतांनी या वाङ्मयात लक्षणीय कामगिरी केली आहे. परंतु १९२० पर्यंतची प्रवासवर्णनांची संख्या सुमारे ८०-८५ एवढी मर्यादित आढळते. यामध्ये पंडिता रमाबाई व गोडसे भटजी यांचा अपवाद वगळता प्रवासवर्णनांची पूर्वपरंपरा फारशी वेगळी आणि नावीन्यपूर्ण अशी नाही. १९२० नंतरच्या काळातील प्रवासवर्णनांचा प्रवाह विविध स्वरूपाचा दिसतो. माहिती देणारी, धार्मिक महात्म्य

सांगणारी, ज्ञानदानाच्या भूमिकेतून काही प्रवासवर्णने लिहिली गेली आहेत. आज जवळपास साडेतीनशेपर्यंत प्रवासवर्णने लिहिली गेली आहेत आणि हा वाङ्मयप्रकार लक्षणीय स्वरूपाचा झाला आहे. डॉ. वसंत सावंतांच्या मतानुसार ''प्रवासी, प्रवास व प्रदेश या मूलभूत घटक तत्त्वांनीच मुळात प्रवासवर्णन साकारते.'' याचाच उपयोग बहुतेक सर्व प्रवासवर्णनांत केलेला दिसतो.

प्रवासवर्णनात प्रवासातील अनुभवांचे आलेखन असते. त्यामुळे प्रवासात ज्या घटना घडल्या असतील, जे अनुभव आले असतील किंवा बघणाऱ्या 'मी' ला जे भावले असेल तेच चित्रण प्रवासवर्णनात येते. त्यामुळे अशा वर्णनात भाषेचा फुलोरा, प्रतीकात्मकता यांसारख्या गोष्टी वापरता येत नाहीत. प्रांजळ, स्वाभाविक, सरळकथन, हेच प्रवासवर्णनामध्ये येते.''प्रवासवर्णनकार हा वाचकाला बसल्या जागेवरून आपला प्रवास घडवून आणत असतो. वेगवेगळ्या स्थळांची वैशिष्ट्ये त्याला सांगता येणे महत्त्वाचे असते. तसेच ती स्थळे यथातथ्य वर्णनातून वाचकांच्या डोळ्यांसमोर उभी करण्याचे कौशल्यही लेखकाजवळ असावे लागते.'' म्हणून प्रवासवर्णनात स्थळांची, नगरांची, संस्कृतीची माहिती घ्यावी लागते. ठिकठिकाणचे रीतीरिवाजही नोंदवावे लागतात. म्हणून इतिहास, भूगोल, संस्कृती आणि समाज या प्रमुख गोष्टींवर प्रवासवर्णन अवलंबून असते. तसेच ''प्रवासात 'प्रवासी' हा घटक जसा महत्त्वाचा असतो तसाच 'प्रदेश' ही महत्त्वाचा असतो. आपला अनुभव आपण सांगण्यात मौज असते. प्रवासवर्णनासाठी लेखकाने कोणता प्रदेश निवडला आहे आणि निवडलेल्या प्रदेशामध्ये त्याने कशावर भर दिलेला आहे, यावरही त्या लेखनाचे वाङ्मयीन स्वरूप अवलंबून असते.'' म्हणून प्रवास वर्णन केवळ भौगोलिक प्रदेशाची आणि नगरांची नोंद नव्हे; तर त्या त्या वास्तू, भूप्रदेश लेखकाला कसा दिसला, त्याचा लेखकाच्या मनावर काय परिणाम झाला, त्यामधून मानवी जीवनाचे कोणते दर्शन घडले यालाच अधिक महत्त्व असते. अशाच लेखनातून लेखकाचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व प्रकट होत असते.

यशवंतरावांनी भरपूर प्रवास केलेला असला तरी तुलनेने प्रवासचित्रणात्मक लेखन मात्र विपुल केले नाही, ते अल्प आहे. त्याचे कारणही तसेच असावे. प्रवासवर्णन लिहायचे म्हणून त्यांनी असे लेखन केलेले नाही. म्हणजे ज्याप्रमाणे प्रा. अनंत काणेकरांच्या 'धुक्यातून लाल ताऱ्यांकडे' किंवा पु.ल. देशपांडे यांच्या 'अपूर्वाई' यामध्ये प्रवासवर्णनांचा म्हणून जो एक 'दृष्टिकोन' असतो तसा यशवंतरावांच्या अशा लेखनात दिसत नाही किंवा अलीकडच्या प्रवासवर्णनात दिसणारी लेखकाची वेचक दृष्टीची विलक्षणता यशवंतरावांच्या प्रवासलेखनात दिसत नसली तरी त्यांची म्हणून एक 'खास'

दृष्टी पाहावयास मिळते. ती दृष्टी यशवंतरावांच्या प्रवासलेखनाला अवीट वाचनीयता प्राप्त करून देते. साहजिकच त्यांच्या प्रवासलेखनातील त्यांचे मोल दृष्टिआड करता येत नाही.

यशवंतरावांच्या प्रवासवर्णनात्मक लेखनाची भूमिका केवळ वाचकांना आपण पाहिलेला प्रदेश समजावून सांगावा, त्याला ठाऊक नसलेल्या प्रदेशाची व ठिकाणाची माहिती द्यावी अशीच आढळते. पण हे लेखन प्रवासचित्रणात्मक 'फॉर्म'पेक्षा वेगळे आहे. प्रवासवर्णन लिहिण्याच्या अनेक पद्धती आहेत. ''प्रवासवर्णन जसे दैनंदिनी लिहिण्याच्या पद्धतीने लिहिले जाते तसे संभाषणातूनही फुलत जाऊ शकते. कधी ते व्याख्यानातून साकार होते तर कधी अभंगासारख्या काव्यरचनेतूनही प्रकट होते. कुणी पत्ररूपाने, तर कुणी बातमीपत्राच्या रूपाने ते लिहितो.'' यशवंतरावांचे लेखन हे लेख व पत्ररूपाच्या चौकटीमध्ये अधिक बसणारे आहे. या दृष्टीने त्यांचे ऋणानुबंधातील 'शांतीचितेचे भस्म' , 'केल्याने देशाटन' हे लेख व 'विदेश-दर्शन' हे पत्रात्मक संग्रह असलेले प्रवासवर्णन उल्लेखनीय आहे. यशवंतरावांच्या प्रवासवर्णनावर नजर टाकल्यास त्यांचे निसर्गप्रेम लक्षात येते. त्यांच्या रसिकमनाला निसर्गाचे खूप अप्रुप होते. निसर्गाच्या ओढीचे रसाळ वर्णन त्यांच्या काही प्रवासलेखांत पाहावयास मिळते. अशा प्रकारच्या लेखनात वैभवशाली निसर्गाचा, त्यातील सूक्ष्म तपशीलाचा, तेथील माणसे, पशुपक्षी यांच्याशी असलेला सूक्ष्म व तरल अशा भावसंबंधाचा वेध यशवंतरावांनी इतक्या चपखलपणे व तपशीलानिशी टिपला आहे की सारे निसर्गजीवन डोळ्यांसमोर उभे राहते. ज्या देशाला, स्थळाला, वास्तूला भेट दिली तिचे तपशीलवार चित्र त्यांनी रेखाटले. ही चित्रे रेखाटत असताना स्थळाऐवजी, वास्तूऐवजी ती बघणाऱ्या 'मी'ला ते अधिक महत्त्व देतात. त्यांच्या लेखनातून त्यांच्या निसर्ग जाणिवा स्पष्ट होतात. माणूस व निसर्ग यांच्यातील नाते, निसर्गाचे, पर्यायाने पर्यावरणाचे मानवी जीवनातील स्थान तसेच मानवेतर घटकांचे निसर्गातील स्वतंत्र स्थान या नव्या जाणिवा यशवंतरावांच्या प्रवासलेखनात ठळकपणे दिसतात. या नव्या जाणिवांमुळे लेखनाच्या केंद्रस्थानी निसर्ग व माणूस हाच दिसतो.

यशवंतराव सत्तास्थानी असताना अनेक ठिकाणी प्रवास करण्याचा योग त्यांना आला. त्या प्रवासात त्यांनी निसर्गाचा आस्वाद घेतला आणि आपले अनुभव शब्दबद्ध केले. ते लिहितात,''माझ्या स्वभावात निसर्गाची ओढ, एकटे हिंडावे, डोंगरकडे चढावेत-उतरावेत, नदीच्या संगमावर बसावे आणि एकमेकात मिसळून जाणारे आणि पुढे एकोप्याने, संथ गतीने चाललेले जीवन पाहावे असा एक छंद.'' यशवंतराव देशांतर्गत हिंडले, तिथल्या माणसांमध्ये मिसळले, त्यांनी विविध स्थळे पाहिली.

त्यांच्या संवेदनशील मनाने या प्रवासात त्यांना आलेले अनुभव नुसतेच टिपून घेतले असे नव्हे तर ते कोरून घेतले. ते लिहितात, ''दुनियेच्या सफरीत मी अनेक लहानमोठे देश पाहिले, परंतु त्यातील काही देशांची स्मृती, विशिष्ट कारणामुळे, तेथे जे पाहिले, अनुभवले, ऐकले, त्यामुळे कायमची टिकून राहिली आहे. सामान्यत: मी जेथे जातो, तेथील इतिहासप्रसिद्ध स्थळे पाहतो आणि सांकृतिक जीवन समजून घेण्याचा प्रयत्न करतो.'' त्यांच्या या सूक्ष्मनिरीक्षणामुळेच अशा स्वरूपाच्या ललित गद्याला गुणात्मक दर्जा प्राप्त झालेला आहे. तसे यशवंतराव सर्जनशील प्रतिभा लाभलेले लेखक आहेत. त्यामुळेच त्यांच्या प्रवासलेखांना, स्थलवर्णनांना लालित्यपूर्ण आविष्काराचे परिमाण मिळालेले आहे. यशवंतरावांनी 'टॉलस्टॉय' समाधी पाहिली. त्या समाधीचे भावपूर्ण वर्णन ते असे करतात, ''जीवनमुक्ताची समाधी असावी तर अशी ! दवबिंदूंनी निथळावी, सुगंधी वायूने रुंजी घालावी, आणि वृक्षांनी चामरें ढाळावी !! सर्वांपासून दूर.... अगदी मुक्त !!..... 'टॉलस्टॉय' हे 'वांझोटे' शब्द लिहिणारे लेखक नव्हते, तर मानवता प्रेमाने ओल्याचिंब झालेल्या लेखणीतून अंत:करणातील शब्दांना सहानुभूतीचे रूप देऊन त्यांच्या द्वारे मानवतेचा अमर संदेश देणारे ते दैवी प्रतिभेचे साहित्यिक होते. त्या प्रतिभेचा साक्षात्कार मला तेथे घडला. टॉलस्टॉयची ही समाधी वरकरणी नामहीन आहे, मौनरूप आहे; पण अंतर्यामी बोलकी आहे. साक्षात्कारी आहे.'' अशा प्रकारे टॉलस्टॉयच्या समाधीचे, त्यांच्या समाधी स्थानाचे वर्णन करून टॉलस्टॉयच्या व्यक्तिमत्त्वावर हा प्रकाश टाकला आहे. या रशियाच्या दौऱ्यात मॉस्को, लेनिनग्राड, यस्ना-पलाना, वोल्गागार्ड, अस्माखान, सिफलपोल, फ्रुन्झेन्सको, सॅनिटोरियम, याल्टा इ. ठिकाणी भेटी दिल्यानंतर त्या भेटीत त्यांना जे दिसले त्याचे भावस्पर्शी चित्र उभे केले आहे.

प्रवासवर्णनात्मक लेखांतून मानवी जीवन आणि निसर्ग यांचे अंतर्बाह्य चित्रण यशवंतरावांनी केले आहे. हे चित्रण बहुधा त्रयस्थाची जाणीव ठेवूनच केलेले आहे. चित्रणाचा विषय झालेल्या प्रसंग, भावविचार किंवा वातावरण, तसेच यशवंतरावांच्या निरीक्षणाचा दृष्टिकोन, अमूर्त कल्पनांचा उपयोग करून त्यांनी निसर्गवर्णने केली आहेत. 'केल्याने देशाटन' या लेखातील डोंगरावरून दिसणाऱ्या शेतांचे, सृष्टीचे असे वर्णन करतात. ''कृष्णाकाठ धुंडाळावा, डोंगरदऱ्यात हिंडावे, निसर्गशोभा लुटावी, हा माझा छंद जुना आहे. या छंदापायी तरुणपणी कराडच्या जवळचे आणि लांबचे अनेक गड, किल्ले चढलो. वसंत गड, सातारचा अजिंक्यतारा, परळीचा सज्जनगड, कोल्हापूरचा पन्हाळा या किल्ल्यांवरूनही सफरी केल्या. प्रतापगड, रायगडाची मजल केली. गड

आणि किल्ले चढण्याचा एक वेगळाच अनुभव असावयाचा. किल्ला चढताना आणि चढून गेल्यावर त्या किल्ल्याचा निसर्ग आणि इतिहास यांचे तर दर्शन घडतेच. परंतु एखाद्या किल्ल्यावर चढून उभे राहिले आणि अवतीभोवती सभोवार नजर टाकली म्हणजे खालून वाहणाऱ्या नद्या, पाण्याने भरलेली त्यांची पात्रे, नागमोडी वळणांचा त्यांचा तो मार्ग आणि तीरावरील वृक्षांच्या रांगा पाहून मन हरखून जात असे..... शेतांची शोभा वेगळीच. काही शेतातली पिके निघालेली, काहीतली उभी. मध्येच एखादे गवताचे, सरमडाचे, कडब्याचे बुचाड शिखरासारखे दिसायचे. एकाच गालिच्यावर निरनिराळ्या रंगांचे आणि आकारांचे पट्टे काढून गालिचा आकर्षक बनवितात, तसा हा शेतीचा अंथरलेला गालिचा उंचावरून मोठा सुंदर दिसतो. सृष्टीच्या रूपाने अशा वेळी मला वारकऱ्यांचेच दर्शन घडायचे. कराडहून पंढरपूरला जाणारे वारकरी मी पाहत असे. वारकऱ्यांची पताका, गळ्यातली वीणा, खांद्यावरची फडशी, हातातले टाळ, गळ्यातील माळ, डोक्यावरचे मुंडासे, प्रत्येकाचा रंग वेगळा. चेहऱ्यांचेही तसेच. कपाळावर बुक्क्याचा टिळा आणि इतरत्र गोपीचंदन. निरनिराळ्या रंगांच्या मुद्रा उठविलेल्या, पाहताक्षणीच निरागसता लक्षात यावी, पवित्र वाटावे अशी एकूण ठेवण. डोंगरावरून शेतांचे, सृष्टीचे दर्शन असेच व्हावयाचे. जीवनातले ते दिवस सुगीचे वाटत असत.'' लेखकाने या ललित गद्य लेखनाने सांगली, सातारा, कोल्हापूरमधील परिसर. तेथील ग्रामीण जीवन, तिथला निसर्ग, तिथले गड, किल्ले, तिथला साधा भोळा माणूस, ग्रामीण संस्कृती यांचे दर्शन आपल्या लेखनातून अतिशय उत्कटतेने घडविले आहे. हे ललित गद्य लेखन येथील मातीतून निर्माण झालेले असल्याने, काळ्या मातीसारखेच कसदार आहे. ग्रामीण परिसराचा पुन:प्रत्यय घडविणारे आहे. यशवंतरावांचे हे लेखन कधी आनंदाने देहभान विसरायला लावते, कधी सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात हरवून अंतर्मुख बनवून विचार करायला लावते, तर कधी व्यथित मनाचे हुंकार चित्रित करते. केव्हा चिंतनशील गूढ, गंभीर मुद्रेने पाहते, तर कधी आकाशाला मुक्तपणे गवसणी घालू पाहणाऱ्या पाखराप्रमाणे येते. जे पाहिले, अनुभवले, जे ऐकले त्याचे प्रत्ययकारी चित्रण त्यांनी केले आहे.

'विदेश दर्शन' हा रामभाऊ जोशी यांनी संपादित केलेला यशवंतरावांच्या पत्रात्मक प्रवासवर्णनाचा संग्रह आहे. यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या पत्नीला श्रीमती वेणूताईंना परदेशातून लिहिलेली ही पत्रे आहेत. १३ नोव्हेंबर १९६४ ते १९ जानेवारी १९७७ या कालखंडात संरक्षणमंत्री, अर्थमंत्री आणि परराष्ट्रमंत्री म्हणून भारताचे राजकारण आणि अर्थकारण अथवा विविध कामांसाठी त्यांचा प्रवास घडला. पण वेणूताईंची प्रकृती नेहमीच अस्वस्थ होती. त्यांची प्रकृती बरी नसल्यामुळे त्या परदेश

प्रवासास जाऊ शकल्या नाहीत. शिवाय यशवंतरावांच्या कार्यक्षमतेला ताण पडू नये म्हणून त्यांनी तो प्रवास इच्छा असूनही नाकारला. ''ही स्थिती यशवंतरावांना अस्वस्थ करणारी होती. परंतु नाइलाज होता. वेणूताई आपल्या प्रवासात सहभागी नसल्या, तरी त्यांना पत्राद्वारे विदेश-दर्शन व्हावे अशी त्यांची उत्कट इच्छा या पत्रलेखनाच्या रूपाने साकार झाली. रसिक वाचकही वेणूताईंप्रमाणेच हा पत्रसंग्रह वाचत असताना विदेश दर्शनात रमतो,'' अशा स्वरूपाचा अभिप्राय तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दिला आहे. या संपूर्ण पत्रात्मक प्रवासवर्णनात - साहित्यिक, रसिक, कलाप्रेमी असे यशवंतरावांचे दर्शन सर्वांनाच घडते. यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व किती विविधांगी होते याची जाण ज्यांना असेल त्यांना या विदेश दर्शनचे विशालत्व समजून येईल. राजकारण, साहित्यकारण, व्यक्तिकारण व रसिककारण अशा अनेक 'कारणांचे' हे हृदय संमेलन या पत्रसंभारातून प्रकट होते. त्यात यशवंतरावांच्या कौटुंबिक वातावरणापासून ते देशातील सामाजिक, राजकीय व साहित्यिक वातावरणापर्यंत सर्वांचेच प्रतिबिंब या संग्रहात पाहावयास मिळते. जवळ जवळ सत्त्याण्णव पत्रांच्या संग्रहावरून यशवंतरावांच्या विविध भावना व विचार व्यक्त झालेले तर आढळतातच, शिवाय त्यांनी आपले अंत:करण निर्हेतुकपणे उघड करणारी पत्रेही लिहिली आहेत. या पत्रातून लेखकाचे व्यक्तिमत्त्व म्हणजेच प्रवासी लेखकाचे व्यक्तिमत्त्व प्रत्ययास येते.

ही सर्व पत्रे कोणत्याही टपालाने परदेशातून पोहोचविली नाहीत. यशवंतरावांचा ज्या हॉटेलात मुक्काम असेल तेथील सुंदर लेटरहेडवर ते पत्रे लिहित असत. हॉटेलच्याच लिफाक्यात ठेवत असत आणि परत मायदेशी येताना स्वत:बरोबर बॅगेतून आणत असत. घरी येताच ती वेणूताईंना देत असत. वेणूताई ती पत्रे वाचत बसत. 'साहेब' कुठे जाऊन आले, कुणाला भेटले हे त्यावरून समजत असे. यशवंतरावांच्या या प्रवासवर्णनात्मक लेखनामध्ये त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आगळेपणाही सूचित होतो. लेखकाच्या खाजगी गोष्टी, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांच्या सवयी, त्यांचे दोष, त्यांचा भलेबुरेपणा यांसारख्या काही गोष्टींचे आकलन होते आणि समाजामधला इतर माणसांसारखा एक माणूस म्हणून त्यांचे अपूर्व दर्शन घडते. या माणसाबद्दलची जिज्ञासा तृप्त व्हायला या यशवंतरावांच्या प्रवासवर्णनात्मक वाचनापासून एक प्रकारची मदत होते. त्यामुळे यशवंतरावांची 'प्रवासवर्णने' या वाङ्मयप्रकाराचे 'एक वेगळा वाङ्मयप्रकार' म्हणून मूल्य वाढते. आशय आणि अभिव्यक्ती या दृष्टीने यशवंतरावांचे हे लेखन निश्चितपणे वेगळेपणा दाखवते.

यशवंतराव खऱ्या अर्थाने राजकीय नेते असल्याने त्यांच्या प्रवासाचा हेतू व प्रेरणा

वेगवेगळ्या आहेत. केवळ स्वांत-सुखाय फिरणे त्यांना शक्य नव्हते. यशवंतरावांनी ते केले नाही. पण प्रवासातील अनुभव विश्वाचे दर्शन सौ. वेणूबाईंना घडविण्यासाठी प्रवासात पाहिलेल्या अनुभवलेल्या, घडलेल्या, आकळलेल्या घटना प्रसंगांचे शब्दमय अनुभव त्यांनी चित्रित केले आहेत. सगळा प्रवास अगदी प्रवासाला निघण्यापूर्वीपासून ते प्रवासाहून परतल्यानंतर त्याचे वर्णन यशवंतराव या पत्रात्मक प्रवासवर्णनात करताना दिसतात. ते लिहितात, ''दररोज इतकी ठिकाणे पाहून होतात, इतकी वेगवेगळी माणसे भेटतात की, त्या सर्वांची एक जंत्री ठेवतो म्हटले तरी ते अवघडच. या पत्रांच्या रूपाने यांची जी काय अस्पष्टशी का होईना, परंतु स्मृती राहील ती सुद्धा काही कमी नाही.'' अशी या प्रवासवर्णनामागची हेतूसिद्धता ते स्पष्ट करतात.

यशवंतरावांचा या 'विदेशदर्शन' मधील प्रवास म्हणजे एक पृथ्वीप्रदक्षिणाच होय. या प्रवासामध्ये त्यांना अनेक देशांचा, नगरांचा, बेटांचा प्रवास करावा लागला. हा प्रवासवृत्तांत त्यांनी पत्रांच्या रूपाने शब्दबद्ध केला आहे. त्यामुळे त्यांच्या या ग्रंथाने प्रवासवर्णनाच्या साहित्यात नवीन भर घातली आहे. या प्रवासात त्यांनी निसर्ग, वस्तुसंग्रहालये, रंगमंदिरे व त्या त्या प्रदेशातील कलावस्तूंचा व कलाकृतींचा आस्वाद घेतला. ऐतिहासिक घटनांच्या नोंदी केल्या. वैशिष्ट्ये सांगितली. यशवंतरावांच्या प्रवासवर्णनातील अनुभवाची तत्त्वे, रुची वेगळी आहे. त्यांच्या प्रवासवर्णनातील अनुभवविश्व, आशय व अंतरंग वेगळे वाटतात. त्यांचे अनुभवविश्व प्रामुख्याने वास्तव जगाशी निगडित आहे. उझबेकीस्तान या घटकराज्याची राजधानी ताश्कंद या ठिकाणावरून १९६६ ला जे पत्र लिहिले त्यात ते लिहितात, ''अफगाणिस्तानच्या प्रदेशात प्रवेश केल्यानंतर मात्र डोंगरी मुलूख, बर्फाच्छादित छोटी छोटी शिखरे यांचे दर्शन झाले. कंदाहारवरून काबूलवर विमान आले. सुरेख पहाडी प्रदेश वाटला. अर्ध्या तासानंतर सोव्हिएट भूमीवर आलो.'' यशवंतराव ज्या गावापासून प्रवासाला निघतात त्यावेळी त्यांच्या मार्गामध्ये जी अनेक स्थळे आलेली आहेत, त्या स्थळांचे वेगळेपण व वैशिष्ट्ये स्वाभाविकपणे व अचूकपणे आपल्या डोळ्यांसमोर उभी करतात. ताश्कंदला जाताना त्यांनी जे पाहिले त्याचे रसभरीत वर्णन केले आहे.

आसाम राज्याच्या पूर्वेला जोरहाट जिल्हा आहे. या जिल्ह्याच्या ठिकाणी जाण्यासाठी अलाहाबाद ते जोरहाट हा जो प्रवास विमानाने त्यांनी केला, त्या सुरेख प्रवासाचे वर्णन यशवंतराव असे करतात, ''आम्ही १७ हजार फूट उंचीवरून चाललो होतो. आकाश अगदी स्वच्छ होते. ऐन दुपारची १२॥ ची वेळ. सूर्यप्रकाशाने अस्मान एकदम उजळून गेले होते. त्यावेळी उत्तरेकडे हिमालयाच्या हिमाच्छादित शिखरांची एक रांगच रांग उभी होती. जगप्रसिद्ध सर्व उंच शिखरे कवायतीसाठी जणू काय एका ओळीने शिस्तीत

उभी आहेत काय, असे माझ्या मनात येऊन गेले. विशेषत: धवलगिरी, माऊंट एव्हरेस्ट (गौरीशंकर) आणि कांचनगंगा यांचे स्पष्ट दर्शन झाले. विशेष म्हणजे या सर्वांचे एकसमयावच्छेदे करून एकदम दर्शन !'' अशा स्वरूपाची माहिती यशवंतराव प्रवासात पाहिलेल्या स्थळांची व तेथील वैशिष्ट्यांची देतात.

यशवंतरावांनी पॅरिसचा प्रवास १९७१ मध्ये केला. त्यावेळी प्रत्यक्ष समोरचे उभे असलेले वास्तव आणि यशवंतरावांची कल्पकता यांचे मिश्रण त्यांच्या प्रवासवर्णनपर लेखातून जागोजाग प्रत्ययास येते. ''नंतर आम्ही ढगांवर चढलो. पांढऱ्या शुभ्र ढगांनी आसमंत भरून गेले होते. त्यावरून आमचा राजवाडा तरंगत चालला होता. सूर्याच्या कोवळ्या किरणांनी आमच्या विमानाची प्रतिछाया ढगावर फार सुरेख पडली होती. सप्तरंगी वर्तुळाकार व त्याच्यामध्ये माशाच्या आकाराची विमानाची पडछाया, वेगाने पुढे पुढे चालली होती. जणू काही भला मोठा देवमासा समुद्रातून वेगाने पाणी तोडीत चालला होता !... ढग मोकळे झाले आणि खाली पुन्हा युरोपची भूमी दिसू लागली. जिनेव्हा आणि भोवतालची रेखीव हिरवीगार शेती. घनदाट आखीव बने.'' असे आकाशातील ढगाळ वातावरणाचे व एअर इंडियाच्या जम्बो विमानास राजवाडा संबोधित. त्याचे वर्णन त्यांनी केले आहे. विमानप्रवासात त्यांना दिसणारा विस्तीर्ण समुद्र, एल्बा बेट किंवा त्या विमानातील राजस्थानी रंगीबेरंगी पोशाखातील देखण्या हवाई सुंदरींची राधेशी केलेली तुलना. या वर्णनातून यशवंतरावांच्या कल्पकतेबरोबर काव्यात्मक शैलीचा प्रत्यय येतो.

यशवंतरावांनी व्हिएन्ना येथून २३ एप्रिल १९७२ मध्ये लिहिलेल्या पत्रात डॅन्यूबच्या खोऱ्याची सफर सांगताना त्याचे वर्णन ते असे करतात,''डॅन्यूबच्या काठचा हा प्रासाद दुर्ग आणि त्याच्या जवळून वाहणारी विशाल डॅन्यूब पाहून मन प्रसन्न झाले. सुमारे दीड-दोन तास ही मोनॅस्ट्री आम्ही पाहात होतो. नंतर मोटारबोटीवर चढून डॅन्यूब ओलांडली व डॅन्यूबच्या काठाकाठाने जाणाऱ्या रस्त्याने परतीचा प्रवास सुरू केला. नदीकाठाने निसर्गसौंदर्याने बहरून गेलेल्या या प्रदेशातून प्रवास करताना अनेक आठवणींनी मन भरून आले. कवींनी व लेखकांनी वर्णिलेली मध्ययुगीन निळीभोर डॅन्यूब आज राहिलेली नाही.'' असे त्या प्रदेशाचे वर्णन केले आहे. यशवंतरावांचे प्रवासात्मक लेखन हे दोन अंगांनी फुलत राहते. त्याचे एक अंग असते तपशील पुरविणे हे; दुसरे अंग असते प्रवासात पाहिलेले, ऐकले, अनुभवले त्या संबंधी स्वत:ला काय वाटले हे सांगणे. तसेच आपल्या प्रवासलेखनात माहिती देण्याची आणि ती देताना, त्या संदर्भात काय वाटले ते सांगण्याची अशा दोन्ही जबाबदाऱ्या स्वीकारल्या आहेत.

डॉ. वसंत सावंत लिहितात, ''प्रवासी लेखक जसा या वाङ्मयप्रकारात कलात्मकरीतीने दर्शन देतो, तितकाच त्याच्या प्रत्ययाला आलेला प्रदेशही सजीव व कलात्मक होऊन अवतरतो. अशी किमया इतर कोणत्याही वाङ्मयप्रकारात घडत नाही. प्रवासवर्णनातील प्रदेशाचे चालतेबोलते चित्र हा प्रवासवर्णन या वाङ्मयप्रकाराचा एक प्राणभूत घटक आहे.'' असेच वास्तववादी व चित्रणात्मक लेखन यशवंतरावांनी केले आहे.

यशवंतरावांनी या देशात पाहिलेल्या वा अनुभवलेल्या गोष्टींशी स्वदेशातील त्यांच्या अनुभवाला आलेल्या, पाहिलेल्या गोष्टींशी सहज तुलना केली आहे. लंडनपासून जवळपास साठ मैल दूर असलेल्या इंग्लंडच्या दक्षिण समुद्रकिनाऱ्याची तुलना करताना लिहितात, ''समुद्रकिनाऱ्यावर मैल नि मैल सुरेख रस्ता आहे. एका बाजूला जुन्या विविध तऱ्हेच्या शानदार इमारतींची रांग आहे. या रस्त्यांवरून जाताना मुंबईच्या मरीन ड्राईव्हची आठवण झाली. या रस्त्यालाही येथे मरीन ड्राईव्हच म्हणतात. परंतु दोन्हीमध्ये फरक फार जाणवला. मुंबईच्या मरीन ड्राईव्हवरची घाईगर्दी, गोंधळ एकीकडे आणि येथील प्रशांत वातावरण दुसरीकडे. नवीन म्हणून का असेना हा मरीन ड्राईव्ह काही दिवस येऊन राहण्यासारखा वाटला.'' यशवंतरावांना परदेशात अनुभवाला येणारी प्रत्येक गोष्ट नव्याने जाणवत असल्याने त्यांच्या विचारशील व संवेदनाशील मनात काही भावनिक प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे हा लेखक प्रसंगी आत्मपरीक्षण करतो. स्वत:च स्वत:ला काही प्रश्न विचारत असतो आणि यातूनच पूर्वी पाहिलेल्या व अनुभवलेल्या गोष्टींची तुलना केली जाते. या तुलनेच्या दृष्टीने यशवंतराव चव्हाणांनी 'बामियान' येथील भगवान बुद्धांचे दोन भव्य कोरीव पुतळे पाहिले. तेथील काही प्राचीन सांस्कृतिक लेणी पाहिली व सहजपणाने म्हटले आहे, ''त्या डोंगरकपारीत असंख्य लेणी आहेत. त्यांच्या समोरून बामियान नदीचे पात्र जाते. या दिवसात लहानसा प्रवाह आहे. नदीच्या अलीकडच्या तीरावरून लेणी असलेली डोंगरभिंत पाहिली म्हणजे अजंठा-वेरूळची आठवण येते. काही गुहांमध्ये अजंठासारखी चित्रेही असली पाहिजेत याचा पुरावा दिसतो.'' या स्वरूपाची सहज प्रतिक्रिया ते व्यक्त करतात.

यशवंतरावांनी प्रदेश निरीक्षणाबरोबरच राजकीय, आर्थिक, सामाजिक परिस्थितीचे दर्शन घडवण्याचा प्रयत्न या प्रवासात्मक लेखनातून केला आहे. यशवंतरावांनी ज्या देशांना भेटी दिल्या तेथील राजकीय डावपेचांचे चित्रण केलेले आहे. तसेच तेथील जनतेची अवस्थाही चित्रित केली आहे, प्रेसिडेंट अयुबबद्दल स्पष्टपणे लिहितात, ''प्रेसिडेंट अयुबला व्यक्तिमत्त्व आहे. उंचापुरा पठाण, चेहऱ्यावर नाटकी हास्य भरपूर. बोलणेही अघळपघळ आणि गोड माणूस. प्रामाणिक नाही वाटत. चलाख वाटतो.

त्याच्या शब्दांवर भरवसा ठेवणे अवघड आहे. नव्हे धोक्याचे आहे.'' असे सांगतात. किंवा अमेकिन सरकारचे धोरण भारताला अनुकूल नाही तेही मत तेवढ्याच निर्भीडपणे नोंदवतात....''सामान्यपणे अमेरिकन धोरण भारताला अनुकूल नाही. त्यांच्यामध्ये किंतू आहे. त्यांच्या अर्थमंत्र्यांना मी आज भेटलो. त्यानंतरही माझ्या मनावर तोच परिणाम राहिला. त्यांच्या जागतिक डावपेचांच्या आखाड्यामध्ये भारताला महत्त्वाचे स्थान नाही. मोठी काळजी वाहाण्यासारखी परिस्थिती निर्माण करण्यास हे लोक मागेपुढे पाहतील असे वाटत नाही. फार सावधानतेने राहिले पाहिजे.'' अशा काही लेखनाच्या मागे यशवंतरावांच्या आत्माविष्काराची प्रेरणा ठळकपणे दिसते.

यशवंतरावांच्या प्रवासवर्णनात्मक लेखनात अनेक लोकांची शब्दचित्रे, व्यक्तिचित्रे आली आहेत. प्रसंगपरत्वे यशवंतरावांचा परदेश दौऱ्यात परदेशातील उच्च अधिकारी, प्रथितयश व्यक्तींशी संबंध आला. त्यामुळे अशा व्यक्तींमध्ये भारतासंबंधी उदासीन कोण आहे, विरोधी कोण, सहानुभूती वगैरे कोणाची आहे याविषयी ते स्पष्टपणे लिहितात. त्यामध्ये त्यावेळचे जागतिक बँकेचे अर्थसचिव मॅक्नामार तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणातील पट्टीचे मुत्सद्दी किसिंजर वगैरेच्या संदर्भात मोजक्या शब्दांत लिहितात. प्रवासात अनेक नमुन्याची व विविध स्वभाव विशेषांची माणसे भेटतात. त्यामुळे त्यांच्या स्वभावाचे दर्शन प्रवास वर्णनात होते. त्यांच्या या पत्रात्मक लेखनातून राजकीय स्थितिगतीचे वर्णन अधिक आढळते. त्यामुळे या प्रवासवर्णनात्मक लेखनाचे स्वरूप संमिश्र असे आहे. तसेच स्थलवर्णन, व्यक्तिचित्रण, प्रसंगवर्णनेही आलेली आहेत. असे त्यांचे लेखन केवळ मार्ग व स्थळ यांच्या भौगोलिक नकाशाचे स्वरूप न होता त्यांच्या प्रवासात आलेल्या मानवी जीवनाशी संबंध व त्यातून घडलेली अनुभूती यांचे वास्तवचित्रण आले आहे. यामध्ये व्यवहारनीती, तत्त्वज्ञान, श्रद्धा, संगीत, नृत्य, नाटक, कला, धर्म, अंधश्रद्धा, व्यवसाय, राजकीय स्थिती, शेतीभाती, शिक्षण आदी सर्व अंगांनी प्रसंगानुसार विचार केला आहे. याची अनेक उदाहरणे त्यांच्या या लेखनात रेखाटलेली आहेत.

यशवंतरावांनी पॅरिस, लंडन, रोम, जिनिव्हा, ताश्कंद, वॉशिंग्टन, मॉस्को, नैरोबी, फ्लोरेंस, न्यूयॉर्क या शहरांप्रमाणेच इटली, जर्मनी, जपान, व्हिएन्ना, स्वित्झर्लंड, स्वीडन, फ्रान्स, अफगाणिस्तान, पकिस्तान अशा अनेक देशांचा प्रवास केला. या प्रवासातील घटना, अनुभूती, नियोजित कार्य, त्यातील समस्या आणि त्यांची उकल, झालेल्या चर्चा, विदेशी धोरण, जागतिक अर्थकारण, राजनीती, त्यामध्ये भारताची भूमिका यासारख्या असंख्य बाबींचा उल्लेख या पत्रात्मक लेखांत आलेला आहे. त्यामुळे या

लेखनास वैविध्य प्राप्त होते.

यशवंतरावांचे प्रवासवर्णनात्मक लेखन यामुळेच लक्षणीय आहे. प्रवास आणि प्रदेश साऱ्याची गुण-दोष वैशिष्ट्यासह ही वर्णने चित्रित केली आहेत. साहित्यापासून राजकीय नेत्यापर्यंत साऱ्याचा प्रत्यय कुठे ना कुठे का होईना त्यांच्या प्रवासवर्णनात मिळतो. माणूस, प्रदेश, माहिती आणि अनुभव यांचा सुंदर मिलाफ त्यांच्या या लेखनात दिसतो. यशवंतरावांचे हे प्रवासात्मक लेखन दैनंदिनीचा वापर करून लिहिले आहे. त्यामुळे अनावश्यक अद्‌भूतरम्य आणि काव्यमय न लिहिता त्यांना आवडलेल्या, न आवडलेल्या गोष्टी वास्तववादी दृष्टिकोनातून चित्रित केल्या आहेत. त्यामुळे या लेखनात रोखठोकपणा दिसतो. सत्यनिष्ठता तर आहेच शिवाय खोटी काव्यात्मकता, खोटा अनुभव आलेला नाही. स्मरणशक्तीवर भर द्यावा लागलेला नाही. जे प्रदेश पाहिले तेच सत्य पूर्ण अनुभवाच्या आधारे व्यक्त केले आहे.

यशवंतरावांनी ज्या राष्ट्रांना अथवा शहरांना भेटी दिल्या तेथील इतिहास, भूगोल, ऐतिहासिक स्थान, शिल्पकला, कलादालन, वस्तूसंग्रहालये, प्रबोधिका, प्रशिक्षण संस्था, विद्यापीठ, उद्योगधंदे, शेती, विश्वविद्यालये, निसर्ग, जीवनपरंपरा, प्रसारमाध्यमे, धर्म, आहार, राजवाडे, संस्कृती अशा अनेकविध गोष्टींचे चित्रण यात आले आहे. या चित्रणातील अनुभव ताजे वाटतात. ही सर्व पत्रे प्रवासाशी निगडित अशी आहेत. तसेच त्या त्या शहराचे वर्णन करणारी आहेत. त्यामुळे ही वर्णने खेळकर आणि प्रसन्न वाटतात. प्रवासात घेतलेली भोजने, पाश्चात्य स्त्रियांचे मुक्त वागणे, मुक्त क्लब, त्यांच्यात असलेली फॅशन, तेथील चकित करणारे आचारविचार, पद्धती इ. गोष्टींचे त्यांनी खेळकर आणि मोकळेपणाने वर्णन केले आहे. यशवंतराव मॉंटेगोबे (जमेका) येथील बीचवर प्रधानमंत्री श्री. मॅनली यांनी दिलेल्या पार्टीचा प्रसंग सांगताना लिहितात, ''जमेकाच्या संगीताची पार्श्वभूमी आणि सागराच्या लाटांच्या तालबद्ध चढउताराची लय यांची साथ यामुळे पार्टी लगेच जमून गेली. गप्पांचा कलकलाट, अधूनमधून हास्यांची उडणारी कारंजी, हातात हात घालून मोकळेपणाने इकडेतिकडे भटकणारी जोडपी-सगळे वातावरण कसे मोकळे होते. कॅनडाचे प्रधानमंत्री श्री. आणि श्रीमती ट्रयूडो हे जोडपे विशेष खूष दिसले. संगीत अधिक तेज होताच या जोडप्याने नृत्याचा श्रीगणेशा केला. बहुतेक सर्व जोडपी त्यात सहभागी झाली. अशा तऱ्हेने हा आनंद समारोह रात्री ११ वाजेपर्यंत चालू होता. अशा रीतीने यशवंतरावांनी रंगलेल्या पार्टीचे रंगतदार शैलीत केलेले वर्णन आहे. 'आम्ही पिणारे नाही' हे तेथील व्यवस्था ठेवण्यासाठी असलेल्या लोकांना कळताच त्यांची झालेली निराशाही यशवंतरावांनी तेवढ्याच मिस्किलपणे वर्णन करून सांगितली आहे. त्यामुळे यशवंतरावांच्या प्रवासात्मक

लेखनातील 'मी' अधिक पारदर्शकपणे स्पष्ट होतो.

प्रवासवर्णनात लेखक आत्मचरित्राप्रमाणे स्वत: अनेक अंगांनी त्यात व्यक्त झालेला जाणवतो. यामुळे प्रवासवर्णनात्मक लेखनात आत्मनिवेदन येणे स्वाभाविक असते. प्रवासात आलेले नाना तऱ्हेचे अनुभव तो आत्मनिवेदनाच्या माध्यमातूत व्यक्त करतो. आत्मपरतेच्या प्रकटीकरणास या वाङ्मयात पूर्ण मोकळीकता असते. पण अशा प्रकटीकरणात 'मी' पणाचे भान असावे लागते. आत्मप्रौढी आणि आत्मप्रदर्शन त्यात येता कामा नये. पाहिलेल्या भूप्रदेशाचे आलेल्या अनुभवाचे व आपल्या मनावर झालेल्या परिणामाचे वर्णन त्यात येणे क्रमप्राप्त असते. कोपनहेगला यशवंतराव गेले असता एका स्नानगृहातील ब्रह्मा, विष्णू, महेश यांच्या शिरविरहीत मूर्ती पाहून ते सुन्न झाले. काही ख्रिश्चन धर्मवेड्यांनी हे कृत्य केले होते. हे ऐकून त्यांच्या मनात विचार आला की फक्त इस्लामच्या राजवटीत अशी कृत्ये केली जात होती, पण ख्रिश्चनही त्यास अपवाद नाहीत. अशी प्रतिक्रिया नोंदवतात. फामागुस्ता बंदर पाहताना ते म्हणतात, ''नव्या धर्मवेड्यांनी जुन्या धर्मप्रतिकावर विध्वंसक हल्ले करावेत असा जणू काय नियमच होता. ''आमच्याबरोबर एक प्रौढ ग्रीक स्त्री मार्गदर्शक म्हणून होती. ती म्हणाली, ''धर्माच्या नावाखाली किती शतकापासून मानव अत्याचार सहन करीत आहे . त्यांचे दु:ख अजून संपलेले नाही. आजच्या मानवाची करुण कहाणीच तिच्या वाणीतून जणू बाहेर पडली. या बंदराची समुद्राकाठची तटबंदी ! याला Othello Tower असे म्हणतात. शेक्सपिअरच्या ऑथेल्लो नाटकाची कहाणी येथे घडली आहे. डेस्डिमोनिया ही गौर सुंदरी आणि ऑथेल्लो हा काळा सरदार यांचे प्रेमप्रकरण या सागरतटाच्या पार्श्वभूमीवर रंगले आणि याच सागराच्या किनाऱ्यावर, एका उंच तटावर संशयाने वेडा झालेल्या ऑथेल्लोने आपल्या प्रेयसीचा गळा दाबून खून केला. या तटावर विमनस्क स्थितीत उभा राहून समोर उसळणारा समुद्र मी पाहात होतो. मानवी जीवनातील अनंत काळ चालणाऱ्या संघर्षाचे जे कालचित्र या नाटकात शेक्सपिअरने उभे केले आहे त्याला किती विलक्षण आणि रोमांचकारी पार्श्वभूमी त्याने निवडली आहे ! हा तट राहील किंवा जाईल. मशिदी आणि चर्चेसही कदाचित राहतील किंवा जातील. पण माणसाच्या जीवनातील प्रीती आणि असूया, भक्ती आणि विद्वेष यांचे खेळ असेच अखंड चालू राहतील - जशा समुद्राच्या या लाटा किनाऱ्याला चाटून जात आहेत.'' यशवंतरावांचे हे विचार चिंतनशील आणि अंतर्मुख करावयास लावणारे आहेत. अशा वर्णनातून त्या त्या स्थळांना आलेले महत्त्व त्या स्थळामागील परंपरेचा, संस्कृतीचा इतिहास यशवंतरावांना भारून टाकतो. तिथला प्रत्येक कण न् कण त्यांच्याशी बोलू लागतो. ते स्थळ यशवंतरावांच्या मनात जणू शिल्प बनते आणि यशवंतरावांच्या

संवेदनशील व्यक्तिमत्त्वातून अशा चिंतनशील विचारांचे धुमारे निघू लागतात. तेव्हा त्या स्थळाबाबत, घटनाबाबत, व्यक्तीबाबत त्यांच्यावर झालेला परिणाम, क्रिया, प्रतिक्रिया त्यांनी ताबडतोब नोंदवल्या आहेत.

यशवंतरावांच्या प्रवासवर्णनात ज्या व्यक्ती, स्थळ, घटना, प्रदेश, प्रसंग यांचा उल्लेख आलेला आहे त्याचा यशवंतरावांच्या मनावर निश्चित परिणाम झालेला दिसतो. या संदर्भात त्यांची काबूलहून १९७५ मध्ये लिहिलेल्या प्रवासवर्णनात्मक पत्रातील प्रतिक्रिया फारच बोलकी व गंभीर स्वरूपाची आहे. ते लिहितात, ''बामियानाच्या खोऱ्यात चेंगीझखानाच्या क्रौर्याचे काही अवशेष पाहिले. बुद्ध मूर्तीच्या खालच्या बाजूलाच एका उंच टेकडीवर 'स्केर गुलगुल' म्हणून शहर आहे. चेंगीझखानाने त्या शहराचा संपूर्ण विध्वंस केला. स्त्री-पुरुष-मुले सर्वांचा संहार केला. आताही ते उद्ध्वस्त शहर या अमानुष क्रौर्याची साथ देत उभे आहे. करुणेची मूर्ती भगवान बुद्धही उभे आहेत आणि चेंगीझखानचे क्रौर्यही शेजारीच उभे आहे. इतिहासात क्रौर्य आणि करुणा यांची जणू काही स्पर्धा चालू आहे. कुणाचा विजय होतो आहे? करुणेचा की क्रौर्याचा? मन कधी कधी साशंक होते. आजच्या जगाकडे पाहिले की हा प्रश्न भेडसावू लागतो....अर्थात पुरुषार्थ करणाऱ्यांनी करुणेचाच मार्ग पत्करला पाहिजे आणि याच श्रद्धेने मी बामियानाहून आज परतलो.'' या वरील यशवंतरावांच्या आत्मनिवेदनावरून त्यांची चिंतनशीलता ही अनुभवाच्या प्रवृत्तीनुसारच तयार होताना दिसते. यशवंतरावांचे प्रवासातील विचार हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलू व ध्येयवाद दाखवतात. तसेच अशा छोट्या लेखनातून जीवनाचे चिंतनही सहजगत्या येते. अशा चिंतनाचे व तात्त्विक विचारांचे अस्तर या लेखनास लाभल्याने एक प्रगल्भ वाङ्मयीन कलाकृती म्हणून या प्रवासवर्णनात्मक लेखनाचे मूल्य महत्त्वाचे आहे. या प्रवासवर्णनात्मक लेखनात यशवंतरावांनी पाहिलेल्या स्थळांचे आलेल्या अनुभवांचे, भेटलेल्या व्यक्तींचे, झालेल्या प्रसंगांचे, खाण्यापिण्याचे, त्यांच्या मानसिक स्थितीगतीचे, उत्साहाचे, आनंद-खिन्नतेचे, मनाच्या अस्वस्थतेचे, हुरहुरीचे, गर्दीचे, एकाकीपणाचे वर्णन या लेखनातून केले आहे. या लेखनाचे स्वरूप पत्रलेखनाचे असल्याने पाल्हाळ अजिबात आढळत नाही. आवश्यक तितके व मोजक्या शब्दांत वरील बाबींचा ते उल्लेख करतात.

यशवंतरावांच्या 'विदेश दर्शन' या ग्रंथाला प्रवासवर्णनाचे केवलरूप नाही. तो राजकीय अहवालाच्या स्वरूपाकडे वळणारा काहीसा पत्रात्मक ग्रंथ वाटतो. त्यात प्रवासवर्णन आणि राजकीय पत्ररूपातील अहवाल याचे मिश्रण झालेले दिसून येते. यशवंतरावांची दृष्टी ही राजकीय घडामोडींवर जास्त केंद्रभूत आहे. या पत्ररूप

प्रवासवर्णनावरून लेखकाने पाहिलेल्या प्रदेशाचे खास चित्र दिसतेच असे नाही. अगर लेखकही खास जाणवत राहतो असा नाही. केवळ 'राजकीय इतिहास' म्हणूनच या ग्रंथास अधिक महत्त्व देता येईल. राजकीय आणि सामाजिक जीवनाला महत्त्व देऊन विवेचन केलेले आहे. तरीही त्यांनी निसर्गाचे केलेले चित्रण आणि त्या चित्रणातून व्यक्त होणारे तत्त्वज्ञान आणि चिंतनशीलता याचा अनोखा साक्षात्कार लेखनात जाणवतो. त्यामुळे त्यांच्या लेखनाला तात्त्विक चिंतनाची एक किनार लाभली आहे.

यशवंतरावांची सर्व पत्रे व्यक्तिगत आहेत. पतीने आपल्या पत्नीला पाठविलेली पत्रे आहेत. असे असूनही या पत्रांना केवळ खाजगी संदर्भ नाही. प्रत्येक पत्रामध्ये देशपरदेशाविषयीच्या अनेक प्रश्नांचे चिंतन आढळते. या पत्राचे स्वरूपच घरगुती गप्पा माराव्यात अशा साध्या-सोप्या भाषेत आणि कमी शब्दात असे आहे. यात त्यांनी प्रवासातील अनुभव सांगितले आहेत. एखादा प्रसंग किंवा एखाद्या व्यक्तीचा गुणविशेष मोजक्या शब्दांत सांगितला आहे. मराठीतील अनेक लेखकांनी म्हणजे साहित्य सम्राट न.चिं. केळकर यांचे 'विलायतेची बातमीपत्रे' किंवा ले. डॉ. पांडुरंग दामोदर गुणे यांचे 'माझा युरोपातील प्रवास', पंडिता रमाबाई यांचा 'इंग्लंडचा प्रवास' या पत्रात्मक प्रवासवर्णनासारखे यशवंतरावांचे 'विदेश दर्शन' तेवढेच महत्त्वाचे आहे. विशेष म्हणजे जे जाणवले तेच चित्रित झाल्याने व नेमके त्या प्रसंगाचे चित्रण केल्याने या ग्रंथातील तपशीलाला बरीच काटछाट बसते आणि त्याची कलात्मकता वाढते.

○ ○ ○

ये हृदयीचे ते हृदयी...

यशवंतरावांच्या समग्र साहित्याचा अभ्यास करताना त्यांनी लिहिलेल्या पत्र-लेखनाचा विचार करणे आवश्यक वाटते. आपल्या सत्तर-एकाहत्तर वर्षांच्या सार्वजनिक जीवनात त्यांनी अनेक समकालिनांना, मित्रांना व साहित्यिकांना, राजकीय नेत्यांना अथवा जिज्ञासू वाचकांना पत्रे लिहिली. या पत्रांची संख्या विपुल किंबहुना असंख्य आहे. या पत्रात यशवंतरावांनी आपल्या व्यक्तिगत सुखदु:खाची जशी चर्चा केली आहे त्याचप्रमाणे तत्कालीन राजकीय प्रश्नांचे अगर इतर विषयाचे मनमोकळेपणाने विवरणही केलेले आहे. त्यांच्याजवळ असलेली चतुरस्र बुद्धिमत्ता, जीवनाबद्दलचे जाणते कुतूहल, चौफेर नजर या गोष्टींमुळे ते महाराष्ट्राबाहेर गेले तरी महाराष्ट्रातील लेखक, विचारवंत नेते, पत्रकार यांच्याशी संपर्कामधून आपले विचार पत्राद्वारा व्यक्त करीत असत. त्या पत्रात यशवंतरावांनी तेवढ्याच तत्परतेने उत्तरे दिली आहेत. आलेल्या पत्रांना उत्तर देण्याची त्यांची सवय फार चांगली होती. आपले विचार आणि आपल्या भावना व्यक्त करण्याचा साधा, सोपा आणि उत्तम मार्ग म्हणजे पत्रलेखन. याचा ते पुरेपूर उपयोग करत असत. ही त्यांची पत्रे अगदी सर्वसामान्य माणसापासून ते अतिमहत्त्वाच्या व्यक्तींपर्यंत लिहिलेली आहेत. या पत्रातून त्यांची पत्र लिहिण्याची भाषा आणि जिव्हाळा, कौटुंबिक स्नेह आणि आत्मीयता दिसते. म्हणून त्यांची पत्र लिहिण्याची पद्धत आणि लेखनशैली इ. गोष्टींचे आकलन होण्यासाठी या पत्रलेखनाचे विशेष पाहणे आवश्यक वाटते.

यशवंतरावांच्या पत्रांना साहित्यसृष्टीत व जनमानसात विशेष असे महत्त्व होते. त्यांनी नामवंत व्यक्तींना केलेला पत्रव्यवहार म्हणजे एक प्रकारचे साहित्यधन आहे. ही पत्रे त्या त्या व्यक्तींनी जीवापलीकडे जपून ठेवली आहेत. काहींनी या पत्रांना प्रसिद्धी दिली आहे. तर काही पत्रे अप्रकाशित स्वरूपाची आहेत. या पत्रातून त्यांचे

नितळ विचार, उत्कृष्ट पण विवेक नियंत्रित भावना, त्यांच्यां अंत:करणातील अकृत्रिम जिव्हाळा, त्यांची पुरोगामी विचारसरणी, त्यांचे निर्व्याज व निरागस मन, सौंदर्यदृष्टी, तत्कालीन राजकारणाबद्दलचे अल्पशब्दातील मन, एखाद्या हिडीस कृत्याबद्दलची त्यांना वाटणारी चीड याचे प्रतिबिंब त्यांच्या या पत्रात आढळते. या पत्रामधून नि:संकोचपणे आणि मोकळेपणाने आपल्या भावना व्यक्त केल्या. परस्परांशी संवाद साधण्यासाठी 'पत्र' या माध्यमाचा त्यांनी उपयोग केला आहे. ही पत्रे लिहित असताना थोडक्यात पण अचूक शब्दात योग्य तो शिष्टाचार पाळून लिहिली आहेत. जनमानसात जवळीक निर्माण करण्याची भूमिका या पत्रांनी बजावली आहे. ही बहुसंख्य पत्रे आज अनेक लेखकांच्या कलाकृतीमध्ये पाहावयास मिळतात. तशीच काही पत्रे 'वेणूताई चव्हाण चॅरिटेबल ट्रस्ट-कराड' मध्ये अप्रकाशित स्वरूपात पाहावयास मिळाली. त्यांची सर्व पत्रे म्हणजे स्वतंत्र संशोधनाचा विषय होण्याइतपत श्रेष्ठ दर्जाची आहेत. पण विस्तारभयास्तव त्यांच्या काहीच नमुना दाखल पत्रांचा स्थूल विचार प्रस्तुत ठिकाणी केला आहे.

पत्रलेखन हा अत्यंत जिव्हाळ्याचा असा भावनात्मक स्फुट प्रकार असल्याने त्यात पत्रलेखकाने आपापल्या प्रकृती आणि प्रवृत्ती यांना अनुसरूनच आपले मनोगत व्यक्त केलेले असते. अशा काही पत्रांचे संग्रह प्रकाशित झालेले आहेत. त्यामध्ये हरिभाऊ मोटे यांनी प्रकाशित केलेला 'विश्रब्ध शारदा' या पत्रलेखनाचे दोन भाग महत्त्वाचे आहेत. गो.वा. कानिटकर व काशीताई कानिटकर यांना आलेली 'हरिभाऊंची पत्रे', ना.सी.फडके यांची 'कमलपत्रे' किंवा आ.रा.देशपांडे आणि कुसुमावती देशपांडे यांचा पत्रव्यवहार 'कुसुमानिल' नावाने प्रसिद्ध झाला आहे. गांधीजींची 'तुरुंगातील पत्रे', साने गुरुजींची 'सुंदर पत्रे', य.दि. पेंढारकरांची 'प्रापंचिक पत्रे', ना.ग. गोरे यांचा 'करवंदे'सारखा पत्रसंग्रह अशा काही पत्रसंग्रहांचा उल्लेख करता येईल. तसेच पु.भा.भावे यांना आलेल्या निवडक पत्रांचा संग्रह 'पत्रसेतू' या नावाने प्रकाशित झालेला आहे. 'विलायतेहून डॉ. बाबासाहेबांची पत्रे', नेहरुंची 'इंदिरेस पाठवलेली पत्रे' असे कितीतरी पत्रसंग्रह प्रकाशित झालेले आहेत. यशवंतरावांचाही स.मा. गर्गे यांनी संपादित केलेला पत्रसंग्रह, रामभाऊ जोशी यांनी प्रकाशित केलेला विरंगुळा, त्याचप्रमाणे त्यांचा 'विदेश दर्शन' हा प्रवासवर्णनात्मक पत्रसंग्रह उल्लेखनीय आहे. अशा पत्रांचे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व वाङ्मयीन दृष्टीने विशेष महत्त्व आहे. ''मानवी मनाचे स्वच्छ प्रतिबिंब पत्रात व्यक्त होते. पत्रांना साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक वा राजकीय महत्त्व लाभलेले असल्याने त्यांच्या संग्रहाने मोल चढते, असे डॉ. प्र.न. जोशी म्हणतात. आधुनिक काळात

अनेक मान्यवर लेखकांनी या स्फुट लेखनात महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे.

यशवंतरावांनी स्थूलमानाने वैयक्तिक, निमशासकीय, शासकीय, हस्तपोच, शुभेच्छा, अभिनंदन, गोपनीय, तातडीचे, शिफारसपत्र इ. स्वरूपाची पत्रे लिहिली आहेत. यातील काही खाजगी पत्रातून त्यांनी वाङ्मयाची चर्चा केली. काही पत्रातून आपल्या नेतृत्वाविषयीच्या भावना व्यक्त केल्या आहेत. काही पत्रातून काँग्रेस पक्षाबाबतचे त्यांचे मत मांडले आहे, तर काही पत्रातून महाराष्ट्राच्या विकासाबाबत अनेकांनी दिलेल्या पत्रांना उत्तरे दिली आहेत. काही पत्रातून मराठी भाषिकांच्या व्यापक हिताचा दृष्टीकोन व्यक्त केला आहे. काही पत्रातून यशवंतरावांशी विविध लोकांनी विविध हेतूसाठी पत्रव्यवहार केला आहे. त्यामध्ये आशीर्वाद मागणारी, नातेवाईकांना नोकरी मिळविण्यासाठी, काही परदेश दौऱ्यासाठी आर्थिक साह्यासाठी, काहींनी 'मानसन्माना'सारखी पदवी मिळविण्यासाठी, तर 'फेलोशिप' मिळावी व आर्थिक मदत मिळावी म्हणून त्यांना पत्रे पाठविली आहेत. काहींनी पुस्तक प्रस्तावनांसाठी आग्रह करणारी पत्रे पाठविली आहेत. काही लेखक पत्रकारांनी लेखनासाठी आशीर्वाद व लेखनासाठी प्रोत्साहन द्यावे असा आग्रह केलेला आहे. अशा विविध स्तरावरील नाना तऱ्हेच्या पत्रांना त्यांनी तेवढ्याच सूचकतेने उत्तरे दिली आहेत. यातील काही आस्थेवाईक मंडळींनी यशवंतरावांची काही महत्त्वाची पत्रे जपून ठेवली आहेत. अशा काही पत्रातून यशवंतरावांतील माणुसकी, सच्चेपणा, माणसांना समजून घेण्याची कला, एखाद्याचा झालेला गैरसमज दूर करण्याची त्यांच्या अंगी असणारी कुवत, मनातील विचार पटवून देण्याची क्षमता यांसारख्या त्यांच्या अनेक गुणवैशिष्ट्यांचे दर्शन या पत्रातून होते.

यशवंतरावांनी खाजगी पत्रातून अनेक वाङ्मयीन चर्चा व मतमतांतरे व्यक्त केली आहेत. यशवंतरावांसारखा एखादा रसिक वाचक जेव्हा एखाद्या प्रथितयश लेखकास वाङ्मयीन मते पत्राद्वारे कळवितो तेव्हा त्या पत्रांना वाङ्मयीन महत्त्व आपोआप प्राप्त होते. यामध्ये प्रामुख्याने ग.त्र्यं. माडखोलकर, ना.धों. महानोर, द्वा. भ. कर्णिक, मुकुंदराव किर्लोस्कर, शिवाजी सावंत, म.द.हातकणंगलेकर, ॲड. ग.ना. जोगळेकर, डॉ. धोंडिबा कदम, माधवराव बागल, अरुण शेवते, सौ. वेणूताई, बाबूराव कोतवाल, द.र.कोपर्डेकर, संभाजीबाबा थोरात, पी.डी. पाटील, विनायकराव पाटील, रा.तु. पाटील, गोविंद तळवलकर, पां.वा. गाडगीळ, बाबूराव ठाकूर, माळगी, अप्पासाहेब देशपांडे यांसारख्या असंख्य सामान्य व असामान्य लोकांशी त्यांनी विविध विषयांवर पत्रलेखन केले आहे. पत्रलेखनाच्या संदर्भात वा.रा.ढवळे लिहितात, ''खाजगी पत्रे लिहिताना ती काटेकोरपणाने लेखकही लिहित नसतो. त्यामुळे त्यांच्याकडून वाङ्मयीन

निबंधांची अपेक्षा नसते. त्यांचे जे अनौपचारिक स्वरूप असते. त्यामुळचे त्या पत्रांना महत्त्व प्राप्त झालेले असते. पत्रलेखक व ज्याला पत्र लिहिलेले असते तो पत्र-वाचक या दोघांमधील ते एक हितगुज असते. हे हितगुज ज्याच्याशी केले गेले असते त्याने ते फोडेपर्यंत, म्हणजे जाहीर करेपर्यंत एक गुह्यच असते.'' यशवंतरावांची पत्रे ही अशीच समंजस व उदार मनाची निदर्शक आहेत. यशवंतरावांच्या या पत्रामुळे तत्कालीन राजकीय, सामाजिक स्थितीचे दर्शन होण्यास मदत होते.

यशवंतरावांनी आपल्या समकालीन लेखक, कवींना, संपादकांना अथवा मित्राला लिहिलेल्या पत्रात अनेक वाङ्मयीन स्वरूपाचा मजकूर लिहिला आहे. या संदर्भात ना.धों. महानोर यांना २० मे १९७५ रोजी जे पत्र पाठविले त्यामध्ये लिहितात, ''पत्र लिहीन-लिहीन म्हणत होतो; परंतु एकामागून एक अनेक प्रवास करावे लागल्यामुळे तसेच राहून गेले. आपण पाठविलेला 'वही' काव्यसंग्रह मिळाला. आठवणीनं पाठविल्याबद्दल आभारी आहे. तुम्ही 'गांधारी' दिल्यानंतर मी त्याचवेळी ती वाचून काढली होती. पुस्तकातली कथा ओळखीची वाटली, ग्रामीण जीवनातला गुंता स्पष्टपणे निर्भीडपणे त्यात मांडला आहे. व्यक्तिचित्रे रेखीव वाटली. खरं सांगायचं तर तुमच्या कवितांतच माझे मन रमते. त्यामुळे तुमच्या कादंबरीहून माझे मन तिकडेच जास्त वळले हे मला कबूल केले पाहिजे. अर्थात तुम्ही गद्यही त्याच जिव्हाळ्याने व सहजतेने वापरू शकता - 'गांधारीने' सिद्ध केले आहे, यात शंका नाही. मानवी जीवनातला संघर्ष, त्यातील सामाजिक असमतोल जिथे जिथे असेल तो जसा तुम्ही 'गांधारी' मध्ये व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे तसा 'गोदावरी काठच्या' प्रदेशाच्या पार्श्वभूमीवर अनेकविध तऱ्हेने रेखाटता येण्याची शक्यता आहे.

माडगुळकरांची 'माणदेशी माणसे' किंवा पेंडश्यांची 'कोकणची माणसे' त्यांच्या कथा-कादंबऱ्यात जशी जिवंत उभी राहिली आहेत तशीच मराठवाड्यातील जिवंत प्रतिमा तुमची लेखणी उभी करू शकेल असा विश्वास 'गांधारी' ने उत्पन्न केला आहे. अर्थात यासाठी मराठवाडाभर व त्याच्या बाहेरही भटकावे लागले यात शंका नाही. अनेकविध थरातील जीवनाचा जागता परिचय करून घेतला पाहिजे. हिंदुस्थानच्या इतर भागांतही अधूनमधून जाण्याचा प्रयत्न करीत राहिले पाहिजे म्हणजे वैविध्यपूर्ण विशाल भारतीय जीवनाचा अनुभव तुमचे साहित्य संपन्न करील. अनुभवांची संपन्नता प्रतिभेला साहाय्य करते असे मला वाटते. 'वही' अजून वाचायचा आहे. पुढच्या आठवड्यात प्रवासात जाताना बरोबर घेऊन जाणार आहे. पुन्हा भेटलो तर सांगेन किंवा जमले तर कधी तरी लिहीन. रानातल्या कविता वाचत

असताना बालकवींची आठवण येत होती. परंतु ह्या कवितांमध्ये बालकवींच्या कवितांपेक्षाही काही अधिक आहे असे मला वाटत होते. कविता किंवा कवी यांची तुलना करणे योग्य नव्हे, परंतु फरक काय आहे हे समजून घेण्याचा मी प्रयत्न करीत आहे. काही आठवड्यांपूर्वी दिल्लीला नागपूर येथील मराठीचे तरुण व विद्वान प्राध्यापक सुभेदार 'मराठीतील नव्या वाङ्मयासंबंधी बोलण्यासाठी आले होते तेव्हा त्यांचे व्याख्यान ऐकण्यास गेलो होतो. ऐकायला गेलो म्हणून अध्यक्ष झालो. त्यावेळी त्यांनी तुमच्या कवितांचे विश्लेषण करताना मी जे शोधायचा प्रयत्न करीत होतो ते एका वाक्यात सांगितले व मला वाटते ते खरेही आहे. त्यांचे व्याख्यान इंग्रजीत झाले. त्यांनी सांगितले की बालकवींच्या कविता म्हणजे 'It reflect nature' आणि महानोरांच्या कविता 'It springs from nature' अकारण तुमची स्तुती करावी म्हणून काही लिहिले नाही. परंतु जे गुण आहेत ते सांगितले पाहिजेत. ते टिकावेत, वाढावेत असा अनौपचारिक सल्ला देणे कितपत बरोबर आहे मला माहीत नाही, परंतु तसे घडावे अशी इच्छा मात्र जरूर आहे. दिल्लीलाही अवश्य या. पार्लमेंटमध्ये सेशन सुरू असताना या म्हणजे मराठी खासदारांना एकत्र जमवून तुमच्या कविता ऐकवता येतील. कुसुमाग्रजांनी दिल्लीकरांबद्दल तुम्हाला जे सांगितले ते सर्वांशाने खरे आहे हे कबूल केले पाहिजे. परंतु दिल्ली देशाची राजधानी आहे. तुमच्यासारख्या प्रतिभावान माणसाने हे सर्व पाहिले पाहिजे, अनुभवले पाहिजे.

पत्र फार लांबले. पुन्हा केव्हातरी.

कळावे.''

यशवंतरावांनी या पत्रात लेखकांची निर्मिती आणि वाचकांचा आस्वादक दृष्टिकोन, निरीक्षणाने जाणवणारे सत्य तेवढ्या स्पष्टतेने अभिव्यक्त केले आहे. आपला महानोरांच्या 'वही' आणि 'गांधारी' या कलाकृतीबाबतचा अनुभव अनुरूप माध्यमातून आविष्कृत करण्यासाठी त्यांनी पत्राचा चांगला उपयोग केला आहे. मुक्त आविष्कारासाठी 'बंदिस्त' साहित्यप्रकाराकडून पत्रासारख्या लवचिक साहित्यप्रकाराकडे ते सरकत गेलेले दिसतात. अशा पत्रातून कधी जाणीवपूर्वक, तर कधी अंत:प्रेरणेने यशवंतराव नवनव्या साहित्यप्रकाराचा वेध घेतात. म्हणून ना.धों. महानोरांना आलेल्या अनेक पत्रापैकी वरील एकाच पत्राचा उदाहरण म्हणून जसा आहे तसा मजकूर दिला आहे. यावरून यशवंतरावांसारखा बलदंड माणूस किती हळूवार मनाचा साहित्यिक होता याचे चित्र उभे राहते.

यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाने निरनिराळ्या क्षेत्रातील असंख्य व्यक्ती भारावून गेल्या. साहित्य, राजकारण, समाजकारण इ. नी बहरलेल्या चव्हाणांच्या आयुष्याबद्दल

अनेकांना आकर्षण होते. ते भेटले की त्यांना ऐकवावे असे अनेक वाटे. भेट होत नसली की त्यांना लिहावेसे वाटे. त्यांच्याशी मन मोकळे करणाऱ्या साहित्यिकांमध्ये ग.त्र्यं. माडखोलकर व यशवंतराव यांच्यात अनेक पत्रोत्तरे झाली. या साहित्यिकांबद्दल त्यांना ओढ असे. ग.त्र्यं. माडखोलकरांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, ''मी पाहिलेली अमेरिका पुस्तक आपण पाठवले होते व त्याची पोचही आपणास पाठवण्याची मी व्यवस्था केली होती. त्यानंतर आपले पुस्तक बहुतांशी मी वाचले आहे. बहुतांश अशासाठी लिहिले आहे की एका पुठ्ठ्यापासून दुसऱ्या पुठ्ठ्यापर्यंत संपूर्ण पुस्तक वाचणे मला शक्य होत नाही. तुमच्यासारखा मान्यवर वृत्तपत्रकार अमेरिका पाहात आहे, त्यादृष्टीने महत्त्वाची वाटणारी 'अमेरिकेतील स्थानिक दैनिके', 'श्रमिक पत्रकार संघटना', 'मी पाहिलेल्या दोन पत्रपरिषदा-नॅशनल प्रेस क्लब', प्रादेशिक मुखपत्र ही प्रकरणे अधिक काळजीने वाचली. त्याचबरोबर इंडियन जमात व निग्रो जात यासंबंधीची तुमची प्रकरणे मला अधिक हृद्य वाटली. अमेरिकेच्या सामाजिक जीवनातील संघर्ष व्यक्त करणारे हे दोन प्रश्न आहेत. हे प्रश्न समजून घेण्याची आशियातील कोणत्याही व्यक्तीची इच्छा असणे स्वाभाविक आहे. त्या दृष्टीने मी ही प्रकरणे वाचली. तुमच्या नित्याच्या सहजसुंदर शैलीने लिहिलेली ही प्रकरणे वाचत असताना तुम्ही हल्ली ग्रंथलेखन कमी करता हा विचार मनात आल्याशिवाय राहिला नाही. तुम्ही तुमच्या लेखनाचे काम ग्रंथलेखनाने सुरू केले आहे याची मला आठवण आहे. मला वाटते तुमच्या जीवनात जेव्हा अनुभवाने परिपक्वता आली आहे तेव्हा मराठी वाचक तुमच्याकडून ग्रंथलेखनाची अपेक्षा करील अशी माझी कल्पना आहे. मला हे लिहिण्याचा अधिकार नाही. परंतु तुम्ही ज्या मित्र भावनेने मला वागविले त्याचा फायदा घेऊन मनात आलेले विचार मोकळेपणाने लिहिले.''

यशवंतरावांनी या पत्रात श्रेष्ठ पत्रकार व साहित्यिक माडखोलकर यांच्या प्रवासवर्णनाबाबतचा स्पष्ट अभिप्राय नोंदवला आहे. यशवंतरावांसारखा लेखक जेव्हा त्यांच्या समकालीन लेखकाला अथवा पत्रकारांना किंवा रसिक मित्राला लिहिलेल्या पत्रात वाङ्मयीन स्वरूपाचा मजकूर लिहितो तेव्हा त्या पत्राला ओघानेच वाङ्मयीन दर्जा प्राप्त होतो.

यशवंतरावांनी वैयक्तिक स्वरूपाच्या पण सामाजिक आशय असलेल्या अनेक विषयांवर पत्रलेखन केले आहे. अशा काही पत्रातून यशवंतरावांच्या निर्मळ स्वभावाचे प्रतिबिंब पाहावयास मिळते. किर्लोस्कर मासिकाचे संपादक श्री. मुकुंदराव किर्लोस्कर यांनी १ ऑगस्ट १९६६ ला शेती, सहकार, व्यापार, उद्योग इ. विषयाचा अंक

यशवंतरावांना पाठवला होता. या अंकाची पोच देताना यशवंतराव लिहितात, ''आपले पत्र व स्वतंत्र पोस्टाने पाठविलेला किर्लोस्कर मासिकाचा अंक मिळाला. महाराष्ट्राच्या शेतीविषयक धोरणासंबंधी सर्वांगीण स्पष्टीकरण करणारी पुरवणी मी वाचली. आपला उपक्रम लोकशिक्षणाच्या दृष्टीने प्रशंसनीय आहे. शासनाने आखलेले धोरण प्रत्यक्ष व्यवहारात आणताना समाजाच्या सर्व थरातील प्रतिक्रिया लोकांना माहीत असणे आवश्यक आहे. किंबहुना शासनाला सुद्धा आपल्या योजना यशस्वी करण्यासाठी या प्रतिक्रिया उपयुक्त ठरतील.'' या पत्रावरून यशवंतरावांच्या विचारसरणीवर चांगलाच प्रकाश पडतो. व्यक्तिश: यशवंतरावांनी लिहिलेल्या पत्रात्मक वाङ्मयात सामाजिक परिवर्तनाला प्रेरक ठरतील अशा प्रसंगांचे, घटनांचे व व्यक्तींच्या स्वभावचित्रणाचे अनेक पुरावे काढून दाखवता येतील. किंबहुना सामाजिक विकास अगर परिवर्तन घडवून आणणे हाच त्यांच्या पत्रात्मक लेखनाचा हेतू दिसतो.

यशवंतराव चव्हाण व गोविंदराव तळवलकर या दोघांमध्ये अधिक निकटचा संबंध होता. हे या दोघांमध्ये झालेल्या पत्रव्यवहारामधून लक्षात येते. गोविंदराव तळवलकर यांनी महाराष्ट्रातील विशिष्ट घटनाबाबत आपली स्पष्ट मते यशवंतरावांना कळविली आहेत. त्या पत्रांना यशवंतरावांनी तेवढ्याच सूचकतेने उत्तरे पाठविली आहेत. दि. ९ जुलै १९६२ ला त्यांना पाठविलेल्या पत्रात यशवंतराव लिहितात, ''तुमचे दि. २७ जूनचे पत्र व कात्रण मिळाले. तुमच्या पत्रात तुम्ही ज्या सूचना केल्या आहेत त्या सर्वांच्या पाठीमागे माझ्या संबंधीचा जिव्हाळा आहे. ५२-५३ सालातील घटना सांगून आपण जुन्या आठवणींना उजाळा दिला आहे. माझ्या प्रकृतीची मी काळजी घेत असतो. थोडाफार व्यायाम घेण्यास मी सुरुवात केली आहे. श्री. दि.वि. गोखले व तुमच्या भेटीसंबंधी यापूर्वी मला कल्पना नव्हती. आता मी जरूर चौकशी करीन. श्री. विद्याधर गोखले यांच्याबद्दल मी ऐकलेले वाईट आहे. त्यांच्यासारख्या गुणी माणसाला होणारा त्रास ऐकून वाईट वाटते. मुंबईस मुक्काम असताना त्यांच्याशी बोलण्याची माझी इच्छा आहे. केव्हाही मनातील विचार लिहून कळवावेसे वाटले तर ते कळविण्यास संकोच मानू नका. त्याचे मी जरूर स्वागत करीन.'' यशवंतरावांनी तळवलकरांच्या पत्रांना उत्तरे देताना अतिशय सावधतेने प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. अशा पत्रातून दोन व्यक्तिमत्त्वांचे दर्शन होते. पहिले यशवंतरावांचे आणि दुसरे गोविंदराव तळवलकरांचे. यशवंतरावांचे होणारे दर्शन हा या पत्राचा महत्त्वाचा भाग आहे.

व्यक्ती ही समाजाची एक घटक असते. त्यातूनही यशवंतरावांसारखी महत्त्वाची व्यक्ती ही समाजाची प्रातिनिधिक अशी घटक समजली जाते. त्या व्यक्तीच्या

विचारांनीच सामाजिक इतिहास घडत असतो. पुष्कळवेळी असे विचार व्यक्तीच्या खाजगी पत्रातून व्यक्त केले जातात. कोल्हापूरच्या माधवराव बागल यांना त्यांच्या वयाला २८ मे ला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल लिहिलेल्या पत्रात आपले मनोगत असे व्यक्त करतात. ''आपल्या विचारांशी अत्यंत प्रामाणिक राहून त्यागमय जीवन जगणाऱ्या फार थोड्या पुरुषांत तुमची गणना आहे. म. ज्योतिराव फुल्यांची विचारांची परंपरा खऱ्याखुऱ्या अर्थाने जागृत ठेवण्याची तुम्ही आजही पराकाष्ठा करीत आहात, लोकप्रिय घोषणांचा झेंडा हाती घेऊन काम करणाऱ्या राजकारणी पुरुषांचे जीवन वेगळे. परंतु पुरोगामी विचारांचा पुरस्कार करीत असताना टीकास्त्र सहन करीत निर्धाराने पाऊल टाकणारे तुमच्यासारखे विचारवंत हीच माझ्या मताने महाराष्ट्राची खरी संपदा आहे.

तरुण भारत या लोकप्रिय दैनिकाचे प्रमुख संपादक व विद्वान ह.रा. महाजनी यांच्या वयाला १ जून १९६७ रोजी ६० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने लिहिलेल्या पत्रात लिहितात,''आपल्या साठ वर्षांच्या जीवनातील जवळजवळ निम्म्यापेक्षा जास्त माझा आपला निकटचा परिचय व स्नेह आहे. स्वातंत्र्य चळवळीतील एक व्यासंगी व लढाऊ कार्यकर्ता म्हणून व नंतर बुद्धिवादी विचारवंत म्हणून मी आपणास वेगवेगळ्या भूमिकांमध्ये काम करताना पाहिले आहे. तुमच्या या सर्व गुणांचा विकास पूर्णत: तुमच्या जीवनात पाहावयास सापडतो. तुम्हाला आठवते की नाही हे मला माहीत नाही. पण १९३२ साली आपल्या त्या १२ नंबरच्या बराकीमध्ये शाळकरी मुलांच्या स्लेट पाटीवर तुम्ही आपल्या मोत्यासारख्या हस्ताक्षरात लिहिलेले लेख व अग्रलेख वाचलेले मला आठवतात. त्यानंतर १५-२० वर्षांच्या कालावधीत तुम्ही महाराष्ट्रातील एका प्रमुख दैनिकाचे कर्तृत्ववान संपादक बनला आणि ही संपादकीय खुर्ची तुम्ही मोठ्या तोलामोलाने सांभाळली आहे. आपल्या विशिष्ट शैलीदार लिखाणाने व नि:स्पृह विचारांनी तुम्ही तुमचे स्वत:चे असे एक विशिष्ट स्थान वृत्तपत्र जीवनात निर्माण केले आहे. तुमचा मित्र म्हणून तुमच्या या यशाबद्दल मला नेहमीच आनंद वाटत राहिला आहे. आज आपणास साठ वर्षे पूर्ण होत आहेत. अशा वेळी तुमचा एक हितचिंतक म्हणून मी प्रार्थना करीन की आपणास कर्तृत्वाचे शतायुष प्राप्त होवो.'' द्वा.भ. कर्णिकसारख्या विचारवंत व पत्रकाराला लिहितात, ''तुम्ही तुमच्या कार्यक्षेत्रात सतत क्रियाशील राहिलात हे खरोखरच तुम्हाला गौरवास्पद आहे आणि आमच्यासारख्या मित्रांना त्याचा आनंदही आहे. कधी या बाजूला आलात तर तपशीलवार बोलण्याची संधी मिळेल. कसे घडेल माहीत नाही, पण अपेक्षा करणे तर चूक नाही.'' या पत्रांवरून हे स्पष्ट होते की यशवंतरावांना विद्वान माणसांची

कदर आहे. आपण जे लिहिले ते कितपत औचित्यपूर्ण आहे याचा ते बारकाईने कसा विचार करतात याचा पुरावा म्हणून त्यांच्या वरील पत्रांचा उल्लेख केला आहे. या पत्रातून या व्यक्तींची तत्त्वनिष्ठा किती, कार्यनिष्ठा किती, कार्यसिद्धीसाठी श्रमले किती, कसे याचे सोदाहरण स्पष्टीकरण देता देता त्या व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाची खरीखुरी ओळख या पत्रातून करण्यात यशवंतरावांचा सतत प्रयत्न दिसतो. अंगीकारलेले कार्य आणि त्याच्या सिद्धीसाठी केलेल्या प्रयत्नात आलेल्या अडचणींना या व्यक्तींनी कशा प्रकारे तोंड दिले, समाजाला कसे मार्गदर्शन केले. आपल्या कृतीने इष्ट हेतू कसा साध्य केला किंवा त्यात कसे अपयश आले. झालेल्या पीछेहाटीतून पुन्हा उभे राहण्याचे प्रयत्न कसे केले याचे साक्षात विवेचन मोजक्या शब्दांत यशवंतराव करताना दिसतात. अशा कितीतरी व्यक्तींची रूपवैशिष्ट्ये, गुणवैशिष्ट्ये, स्वभाव वैशिष्ट्यांचे विविध पैलू उलगडून दाखवण्यासाठी या पत्रांचा उपयोग होतो. त्यामुळे ही पत्रे वाचकाला यशवंतरावांच्या काळात ओढून नेतात.

यशवंतराव चव्हाण यांना त्यांच्या सार्वजनिक जीवनात जे स्थानिक कार्यकर्ते सहकारी म्हणून लाभले आणि अखेरपर्यंत त्यांना साथ देत राहिले अशाच राजकीय नेत्यांपैकी कराडचे माजी आमदार संभाजीराव थोरात हे एक होते. यशवंतराव व संभाजीबाबा या दोघांचा एकमेकांशी सतत संपर्क होता. त्यांना दि. १ सप्टेंबर १९७४ रोजी लिहिलेल्या पत्रात म्हणतात, ''नव्या पिढीतील कार्यकर्त्यांना लोकांची मने प्रेमाने सांभाळण्याचे समजले तर किती बरे होईल? राजकारणात डावी-उजवी नेहमी होत राहते. परंतु कष्टाने बांधलेले प्रेमाचे संबंध राखणे ही महत्त्वाची गोष्ट आहे, असे मी नेहमीच मानीत आलो आहे. आपण सहभावी आहात. अधिक काय लिहू?'' कराड परिसरात चव्हाणांच्या पाठीशी अविचल निष्ठेने सारी पंचक्रोशी उभी करण्यात त्यांनी धन्यता मानली. अशा आपल्या जवळच्या कार्यकर्त्याला अनुभवातून आलेले विचार व भावना पत्रातून कळवण्यात आल्या आहेत. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाच्या संघर्षमय पार्श्वभूमीवर संभाजीबाबांना लिहिलेल्या पत्रात त्यांची मानसिकता अशी विशद करतात, ''परवा कराड येथील माझ्या घरी आपली भेट झाली. खूप गरमागरम चर्चा होऊन आव्हाने व प्रतिआव्हानेही झाली. आपणास व मलाही या गोष्टीचा मनस्ताप झाला आहे, असे मी मानतो. या संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या प्रश्नावर काँग्रेस पक्षात खूप वैचारिक गोंधळ आहे. महाराष्ट्रात तर संयुक्त महाराष्ट्र मागणीच्या चळवळीने उग्र रूप धारण केले आहे. मला एका बाजूला खवळलेला अरबी समुद्र दिसतो आहे, तर दुसऱ्या बाजूला पेटलेली मुंबई दिसते आहे. मला आज तरी समजत नाही की या वादळी वातावरणात माझी

राजकीय जीवननौका कोठे जाईल ? काय होईल अशा अवस्थेत मी उभा आहे. आपल्या कराड भेटीत या माझ्या मानसिक अवस्थेचा परिणामही झाला असेल. मला आपणा सर्वांचे प्रेमच या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी उपयोगी पडेल. पुन्हा भेटू या.'' अशासारख्या काही पत्रातून यशवंतरावांच्या मनातील सारे भाव प्रकट झाले आहेत. या पत्रातून चव्हाणांच्या मनातील द्विधा अवस्था प्रकट होते. शिवाय त्यांच्या स्वतंत्र व्यक्तित्त्वाची छाप दिसते. अशा उत्कट, रसरशीत, जीवनस्पर्शी पत्रलेखनाने पत्रलेखकाचे मन, व्यक्तित्व उघडे होते आणि वाचकाला ते मोहिनी घालू शकते. यशवंतरावांच्या प्रेमळ नि निरागस अंत:करणाचे नि वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचे दर्शन मनमोकळेपणाने ज्यात घेता येते असा आरसा म्हणजेच त्यांची ही खाजगी पत्रे होत, असे म्हटले तरी अतिशयोक्ती होणार नाही. परनिंदा करण्याचा त्यांचा स्वभावच नव्हता. त्यामुळे तो त्यांच्या पत्रात कसा प्रकटणार ? वैयक्तिक व सामाजिक, राजकीय चारित्र्याचा व नीतीमत्तेचा आदर्शच जणू त्यांनी आपल्या वागणुकीने निर्माण करून ठेवलेला आहे. त्याचे पुरावे त्यांच्या अनेक पत्रात ठिकठिकाणी त्यांनी जे विचार व्यक्त केले आहेत. त्यावरून मिळाल्याशिवाय राहात नाहीत. 'छावा'कार शिवाजी सावंत यांच्यासंबंधीच्या पत्रात लिहितात, ''परवा २९ मे ला शिवाजीरावांची प्रतापगडावर भेट झाली. 'छावा' माझ्या हस्ते भवानी मातेच्या चरणी अर्पण करावा म्हणून मुद्दाम आले होते. मला त्यांचा प्रश्न माहीत आहे. तुम्ही कळविलेल्या कामात किंवा त्यांच्या इतर दुसऱ्या कामात माझा उपयोग झाला तर मला आनंद वाटेल.'' मनोहर मराठे यांच्या 'फुलोरा' या काव्यसंग्रहास अभिप्राय देताना लिहितात, ''तुझ्या कविता आज चाळून पाहिल्या. कवी जन्मावा लागतो असे जे म्हणतात ते तुझे वय व तुझ्या कविता वाचल्यानंतर खरे वाटू लागते. जन्मजात प्रतिभेला व्यासंगाची जोड मिळाली तर तुझ्या हातून (Classic) अक्षरवाङ्मय निर्माण होईल असा विश्वास वाटतो. तुझ्या भोवतालच्या जगाकडे सहानुभूतीने पाहून तू तुझे जीवन अनुभूतीने समृद्ध करशील, तर भारताला हवी असलेली जिवंतवाणी तुझ्या कवितेतून ऐकावयास मिळेल यात मुळीच शंका नाही.''

प्रा. बा.ह. कल्याणकर यांनी यशवंतरावांना अनेक वेळा पत्रव्यवहार केला. त्यांची अनेक पुस्तके त्यांनी यशवंतरावांकडे अभिप्रायासाठी पाठवली होती. त्यातील काही कलाकृतींना त्यांनी सुंदर असा अभिप्राय पत्राने कळवला तर काहींना त्यांनी स्पष्ट शब्दात नकार सुद्धा कळवला. ३ जून १९८० च्या पत्रात त्यांनी त्यांचा 'उठाव' हा काव्य संग्रह वाचला व तो त्यांना अतिशय आवडला म्हणून त्यांचे अभिनंदन

करतात; तर 'जागल' या कविता संग्रहाबद्दल १ एप्रिल १९८२ च्या पत्रात त्यांनी सुंदर असा अभिप्राय पाठवला. ''तुमवा 'जागल' वाचला. ज्या ग्रामीण जीवनात तुम्ही वाढलात त्याचे इतके वास्तव आणि भावनाशील काव्यात झालेले व्यक्तिकरण मी प्रथमच पाहिले. कविता पुन्हा पुन्हा वाचाव्याशा वाटल्या. पुन्हा वाचल्या म्हणजे अर्थ लक्षात येतो. कवितांचे जे समीक्षक आहेत त्यांनी तुमच्या कवितांचे समीक्षण केले की नाही माहीत नाही. त्या समीक्षकांची सर्व परिमाणे थिटी आहेत....'कृष्णाकाठ'चे लिखाण गतीने नाही तर संथ गतीने चालले आहे....त्यांच्या 'दिशा आणि दृष्टी' या पुस्तकास यशवंतरावांनी प्रस्तावना नाकारली. त्या संदर्भातील १५ एप्रिल १९८३ च्या पत्रात लिहितात, ''तुमचे दि. ९ एप्रिलचे पत्र आणि 'दिशा आणि दृष्टी' या पुस्तकाची मुद्रणप्रत मिळाली. मी हाती घेताच ती वाचून काढली. शिवाजीमहाराज व महात्मा फुले यांच्याबद्दलचे तुमचे लेख निरपवाद व उत्तम आहेत. परंतु चालू राजकीय परिस्थिती आणि त्यावरील तुमची निदाने हे वाचल्यानंतर माझ्या हे लक्षात आले की, तुमच्या पुस्तकावर मी प्रस्तावना लिहिणे हे अशक्य आहे. प्रस्तावना लिहायची म्हटली म्हणजे तुमच्या विचारावर सपाटून टीका करावी लागेल आणि अशा प्रस्तावना लिहिण्याची माझी इच्छा नाही. कारण मला तुमच्याबद्दल लोभ आहे व तुमच्या साहित्यगुणाबद्दल कौतुक आहे. स्पष्ट लिहिल्याबद्दल राग मानू नका, असेच प्रेम असू द्यावे.'' यशवंतरावांच्या पत्रातील हे विचार त्यांची या कलाकृतीबाबतची भूमिका स्पष्ट करतात.

मराठी माणसावर व महाराष्ट्राच्या मातीवरच यशवंतरावांचे प्रेम होते. कितीही कामाचा व्याप असला, ताण असला तरी मराठी साहित्यिक, विद्वान, कलावंत यांना ते स्वत:च्या हस्ताक्षरात पत्र लिहित. त्यांच्या अडीअडचणी समजावून घेत. त्यांना सहकार्य करत. डॉ. कोंडीबा गेनू कदम, राहणार वडशिंगे, ता. माढा, जि. सोलापूर या छोट्याशा खेड्यातील व्यक्तीने पीएच.डी. च्या संशोधनासाठी आर्थिक मदतीसाठी पत्र पाठविले होते. त्यास त्यांनी ३१ मार्च १९७४ रोजी उत्तर लिहिले. त्या पत्रात ते लिहितात, ''तुमचे २३ मार्चचे पत्र मिळाले. तुम्ही पीएच.डी. साठी हिंदीत प्रबंध लिहित आहात हे वाचून आनंद वाटला. मुख्यमंत्र्यांच्या निधीतून काही मदत देता येईल की नाही याची मलाही शंका आहे. त्यामुळे श्री. नाईकसाहेबांना लिहिण्याबाबत मला माझाच संकोच वाटतो. परंतु व्यक्तिश: मी या कामासाठी थोडीफार मदत जरूर करू शकेन. पत्रोत्तराने सुचवा.'' यशवंतरावांनी शोषित, सर्वसामान्य लोकांच्या गरजेनुसार त्यांना आर्थिक सहकार्य केले. त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी आवश्यक ती मदत केली. यावरून त्यांच्याकडे असलेला कणवेचा महापूर स्पष्ट दिसतो. ते कमी बोलत...चर्चेत, सभेत

आणि सभागृहातही आवश्यक तेव्हाच बोलत. वृत्तपत्र प्रतिनिधींशी कमीच संपर्क ठेवत. पण आलेल्या पत्रांना मात्र तत्परतेने उत्तरे देत. अशा या पत्रातून त्यांच्या अनेकविध मनोभावांचे पैलू उघड होतात.

यशवंतरावांची पत्रे डोळ्याखालून घातली तर असे लक्षात येते की त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य सर्वसामान्यांना माणुसकी मिळवून देण्याकरिता खर्ची घातले. सर्वसामान्यांच्या हिताबरोबरच त्यांनी 'व्यक्ती' प्रमुख मानून त्यांना महत्त्व दिले. पत्रांमधून आपल्या परीने लोकांची समजूत घालून गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या पत्रव्यवहारातून यशवंतरावांच्या अंतर्मनात उठलेल्या भावलहरीचे हृदयंगम दर्शन घडते. त्यांच्या निर्मळ स्वभावाचे प्रतिबिंब अशा पत्रातून पाहावयास मिळते.

यशवंतराव चव्हाणांना अरुण शेवते यांनी अनेक पत्रे पाठवली. त्यांच्याकडे दिल्लीला जाऊन काही दिवस राहिलेसुद्धा. अमृता प्रीतमची त्यांनी मुलाखत घेतली. ते कवी, पत्रकार व लेखक असल्याने यशवंतरावांचा त्यांच्यावर लोभ होता. त्यांना २३ जुलै १९८४ रोजी पाठवलेल्या पत्रात लिहितात, ''तू जिज्ञासू व परिश्रमी आहेस. ज्याला सतत सर्जनशील जगायचे असते, त्याने असेच केले पाहिजे. तुझ्याबरोबर मी बाहेर फिरावयास आलो नाही याचे तुला दु:ख होणे स्वाभाविक आहे. मी कुणाबरोबर कधीच फिरावयास गेलो नाही. अपवाद फक्त माझ्या पत्नीचा. मी काहीसा मोकळा असलो म्हणजे ती मला तिच्या बाजाराची ठिकाणे, पुजेची श्रद्धास्थाने व इतर महत्त्वाच्या जागा आग्रहाने नेऊन दाखवत असे. मलाही त्यात एक प्रकारचा आनंद होता. या प्रवासाखेरीज मी दिल्लीत फारसा भटकलो नाही आणि आज एकाकी फिरावयास जाण्याची माझी मन:स्थितीही नाही. त्यामुळे राग मानू नकोस.'' यशवंतरावांच्या आयुष्याचा अखेरचा कालखंड निराशा आणि दु:खे यांनी भरलेला दिसतो. अनेक संकटामागून संकटे आली. राजकारणातही अपयश येत गेले. कौटुंबिक जीवनातही अनेक आपत्ती आल्या. शत्रू-मित्रांनी केलेली जीवघेणी टिंगलटवाळीही निर्धाराने सहन केली. त्यामुळे यशवंतरावांची शेवटची ५-१० वर्षे मोठी वादग्रस्त गेली. आयुष्यातल्या ज्या काळात आपल्या जीवनाशी सर्वप्रकारे एकरूप झालेल्या सहधर्मचारिणीच्या सोबतीची सर्वात जास्त आवश्यकता असते, त्याच काळात सौ. वेणूताईंचा मृत्यू झाला आणि यशवंतरावांचा आधार गेला.

या संदर्भात ॲड. ग.नी. जोगळेकर यांना जुलै ८३ मध्ये लिहिलेल्या पत्रात सांगतात, ''येथे आल्यापासून तुम्हाला पत्र लिहावे असे सारखे वाटत होते. कै. सौ. वेणूताईवरील तुमचा लेख वाचला. तुम्ही तिला चांगले समजून घेतले होते, असा त्याचा अर्थ आहे. आभारी आहे. हे औपचारिक नव्हे. तुम्हास येण्यास कोणता

महिना सोयीचा आहे, ते कळविले म्हणजे मी माझे येथील ओळीने हजर असणारे दिवस तुम्हाला कळवीन. कमिशनचे दौरे सुरू झाले आहेत. या कामात काही वेळ जातो, म्हणून बरे. एकटा असलो की आठवणींनी माझे सगळे जागेपणाचे जग भरून जाते. तुम्ही चार-दोन दिवस आलात म्हणजे तेवढेच माझे दिवस बरे जातील. नेहमीच्या कामाखेरीज दुसरे अनेक प्रश्न तुमच्याशी बोलावयाचे आहेत.'' यशवंतरावांचे सारे जीवन म्हणजे नुसती मखमलीच्या पायघड्यावरील वाटचाल नव्हती. सुखाबरोबर दु:ख त्यांच्या वाट्याला आले. मानाबरोबर अपमान त्यांना सहन करावा लागला. अशा वेळी ते आपल्या जवळच्या जीवाभावाच्या मित्राला बोलावत असत व आपले मन मोकळे करत असत.

यशवंतरावांसारख्या व्यक्तीच्या जीवनाला किती भिन्न भिन्न रूपे प्राप्त होऊ शकतात हे पाहताना मानवी जीवन किती विविधतेने नटलेले आहे याचा प्रत्यय येतो. पत्रात्मक वाङ्मयाच्या आधारे हाच अनुभव नाना अंगांनी येतो. यशवंतरावांसारख्या बुद्धिवान व मनाने परिपक्व असलेल्या कर्तृत्ववान व्यक्तीने आपल्या सहचारिणीस लिहिलेले पत्र असेच वाचनीय आहे. १८ डिसेंबर १९५८ ला दिल्लीहून लिहिलेल्या पत्रात ते लिहितात, ''गेल्या १६ वर्षाचा चित्रपट डोळ्यापुढून जात आहे. अनेक संकटे आपण एकत्र भोगली. हृदये करपून जावीत अशा आपत्ती आपल्यावर आल्या. ११ वर्षांपूर्वी गणपतरावांच्या मृत्यूच्या वेळी मी आता मोडून जाईन अशी माझी मलाच भीती वाटत होती. त्या सर्व यातनांना तुझ्या संगतीमुळे मी कसेतरी तोंड देऊ शकलो. तुझ्या त्यानंतरच्या आजारामुळे पुन्हा वैराण वाळवंटात शिरतो की काय असा धाक निर्माण झाला होता. पण तू धैर्याने त्यालाही तोंड दिलेस आणि माझी हिंमत वाढविलीस. पुन्हा नव्या आशेने मी आयुष्यात पुढे जाऊ लागलो. १९५२ ते १९५५ च्या कठीण राजकीय काळातही तू माझी खरी सोबती म्हणून मला साथ केलीस. कितीतरी कठीण काळात माझ्या सल्लागाराचे व जिवाभावाच्या मित्राचे काम केलेस. तुझी साथ नसेल तर मी एकटा काही करू शकेन अशी माझी मन:स्थिती नाही. तुझ्या नेहमीच्या निरागस सोबतीशिवाय मी अगदीच निरर्थक व्यक्ती ठरण्याचा संभव आहे. माझ्या वाढत्या जबाबदाऱ्याबरोबर तुझी वाढती साथ नसेल तर आयुष्य अर्थशून्य गोष्ट बनेल. येत्या वर्ष-सहा महिन्यांचा काळ राजकीय परिस्थितीमुळे अत्यंत आणीबाणीचा आणि कसोटीचा ठरणार आहे, असे निश्चित वाटू लागले आहे.'' यशवंतरावांच्या या पत्रावरून पती-पत्नी प्रेम सहज लक्षात येते. तसेच त्यांच्या जीवनातील आशा-निराशेची ऊनसावलीही समजते. त्यांच्या जीवनात विरहाचे कापून टाकणारे ऊन

आहे, कौटुंबिक सुखदु:खाचे प्रसंग आहेत.

व्हिएन्नाहून २२ एप्रिल १९७२ ला लिहिलेल्या पत्रात ते पुढीलप्रमाणे आठवण सांगतात, ''आजचा सर्व दिवस फारच मजेत गेला. या सुंदर प्रदेशाच्या विस्तीर्ण रस्त्यावरून प्रवास करीत असताना एकदम तुझी आठवण झाली. इतकी सुंदर स्थळे निव्वळ तुझ्या प्रकृतीमुळे तू पाहू शकत नाहीस याची खंत वाटते. मला वाटते तू निर्धाराने हे प्रवास करण्याची तयारी केली पाहिजेस. प्रकृतीची कथा तर नेहमीचीच आहे. मी तेथे नसलो म्हणजे त्यामुळेच एकाकीपणाच्या भावनेतून तू आजारी पडतेस. त्यापेक्षा बरोबर राहून काहीसा त्रास झाला तरी त्याची तीव्रता कमीच भासेल. माझ्या पुढच्या प्रवासात तुला येण्याचा आग्रह मी करणार आहे, हे आताच कळवून ठेवतो.'' प्रकृती अस्वास्थ्यामुळे वेणूताई प्रवासास जात नसत. त्यामुळे यशवंतरावांची झालेली मनोवस्था या पत्रावरून दिसून येते. ''तू धैर्याने साथीला मनापासून असलीस म्हणजे मला कशाची पर्वा नाही. आयुष्यातली शेवटली जी काही वर्षे आता राहिली आहेत ती तेजोभंग करून घेऊन काढण्यात अर्थ नाही.'' असे मॉंटेगो बे (जमेका) येथून ४ मे १९७५ च्या पत्रात लिहितात.

सौ. वेणूताईंनी पत्नी, सखी, घरातील निजी साहाय्यक म्हणून यशवंतरावांना आयुष्यभर साथ दिली. यशवंतरावांचा खाजगी पत्रव्यवहार त्या व्यवस्थित ठेवत. सांसारिक जीवनात त्यांची योग्य ती काळजी घेत. १ जून १९८३ ला सौ. वेणूताईंचा मृत्यू झाला आणि ते अधिकच हळवे झाले. त्यानंतर ४ महिन्यांनी ७.१०.१९८३ ला त्यांनी जे इच्छापत्र लिहिले त्यात ते लिहितात, ''माझी पत्नी कै. सौ. वेणूताई हिचे स्मरणार्थ मी एक सार्वजनिक न्यास (Puclic Trust) करणार आहे. तिने मला खाजगी व सार्वजनिक जीवनात अमोल साथ दिली. त्यासाठी तिची आठवण जागती ठेवणे हा माझ्या जीवनातील उरलेला एकच आनंद आहे. त्या दृष्टीने माझ्या हालचाली सुरू झाल्या आहेत. माझ्या गावी कराड येथे एखादी जमीन विकत घेऊन त्यावर एखादी वास्तू बांधावी व अशा वास्तूत माझ्या स्वत:चे ग्रंथालयातील अनमोल ग्रंथ ठेवावेत. तसेच माझ्या जीवनात अनेक व्यक्तींनी व संस्थांनी अनेक वस्तू मला प्रेमाने भेट म्हणून दिल्या आहेत. त्यांचेही संरक्षण व्हावे व वस्तुसंग्रहालयाच्या रूपाने त्यांचे जतन व्हावे, अशी माझी इच्छा आहे आणि हे ग्रंथालय व वस्तुसंग्रहालय माझ्या पत्नीची स्मृती म्हणून व त्यांच्या दैनंदिन जपणुकीची आणि वाढीची योजना करावी असा संकल्प आहे. या स्मृती-मंदिरासाठी जी रक्कम लागेल त्यापैकी शक्य तो भाग मी देणार आहे. देणगी म्हणून माझ्या पत्नीचे दागदागिने आहेत, त्यांचे रूपांतर करून जी रक्कम उभी राहील ती सारीच्या सारी

या स्मारकास द्यावी. शिवाय मौजे उरळीकांचन येथील बागायत जमीन विकून जी रक्कम येईल ती सारीच्या सारी वरीलप्रमाणे या न्यासास द्यावी.'' अशा स्वरूपाचे इच्छापत्र यशवंतरावांनी लिहिले आहे. आणि ९ जानेवारी १९८४ ला सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना झाली. पुढे २५ नोव्हेंबर १९८४ ला यशवंतरावांचे निधन झाले. नंतर स्मारक भवनाचे उद्‌घाटन २५ नोव्हेंबर १९९२ रोजी त्यावेळचे महाराष्ट्राचे राज्यपाल सी.सुब्रमण्यम् यांच्या हस्ते झाले.

यशवंतरावांच्या पत्रात ठिकठिकाणी सुभाषिते, सुविचार, सहज सुचलेली रूपके, उपमा सहजपणे येतात. पण त्यात कोठेही कृत्रिमता दिसत नाही. लिहिण्याच्या ओघात जे सहज सुचते तेच ते लिहितात. ''जगाच्या पाठीवर दोन्ही तऱ्हेचे लोक असतात. कोणी कोणाला चांगले म्हणतात तर कोणी वाईटही म्हणतात. आपण आपल्या चांगल्या बुद्धीने काम करीत पुढे गेलो की सर्व ठीक होते.... राजकारण हा एक जीवघेणा खेळ आहे. वाट पाहावी लागत आहे. मला खूप धीर आहे व मनाने मी स्थिर आहे. श्री. बापूजी साळुंखे हे थोर गृहस्थ आहेत. मी त्यांना कित्येक वर्षे ओळखतो व मित्र म्हणून मानतो.'' अशी कितीतरी विचारप्रवण वाक्ये सहज येऊन जातात. त्यांच्या पत्रातील भाषा आत्मियतेची दिसते. कोणत्याही व्यक्तीला साध्या शब्दानेही दुखविणे त्यांच्या स्वभावाला शक्य होत नसे. उलट मनापासून कौतुक करण्याचा मनाचा मोठेपणा त्यांच्या पत्रात दिसतो. त्यांच्या पत्रातील भाषा साधी सरळ असल्याचे दिसते. इंग्रजी भाषा अगर इंग्रजी शब्द यांचा पत्रात ते क्वचितच वापर करताना आढळून येतात. त्यांच्या पत्रातील विचार हे सुस्पष्ट आहेत. ते नवीन माहिती आणि नवीन संदर्भासाठी उपयुक्त ठरतात.

○ ○ ○

विचारशिल्प

ललित गद्यात्मक लेखन हा काही स्वतंत्र वाङ्मय प्रकार म्हणता येणार नाही. गुजगोष्टी, लघुनिबंध, ललित निबंध या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या या वाङ्मय प्रकाराला 'ललित गद्य' असे नाव मिळाले आहे. तसेच समाजदर्शन, अध्यात्मचिंतन, तत्त्वचर्चा, व्यक्तिचित्रण, विनोदात्मकता, धर्मविचार, इतिहास, भाषा विषयाचा अभ्यास, साहित्य चर्चा इ. विविध हेतूसाठी या गद्याचा वापर करण्यात येत होता. यशवंतरावांनीही त्यांच्या काळात प्रबोधनाच्या आणि वैचारिक तत्त्वचर्चेच्या आविष्कारासाठी या गद्याचा वापर प्रामुख्याने केला. तशी या गद्याची प्रकृती पूर्णपणे आत्मनिष्ठ अशी असते. हे ललित लेखन वास्तवाच्या पातळीवर लेखकाने केले आहे. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, त्यांच्या अनुभवांचा त्या अनुभवातून झालेल्या संस्कारांचा तसेच त्या अनुभवातून लागलेल्या अन्वयार्थाचा परिपाक त्यांच्या या ललित गद्यात्मक लेखनात पाहावयास मिळतो. तसेच त्यांच्या प्रत्यक्ष जीवनातील विविध अनुभवांचे चिंतन व त्या चिंतनाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष अनुभव या ललितगद्यात्मक लेखामध्ये मांडले आहेत. यातूनच त्यांचे वैचारिक गद्यात्मक लेखन निर्माण झाले आहे. अशा या वैचारिक गद्यपरंपरेची पूर्वपीठिका समजून घेणे महत्त्वाचे असते.

ललित गद्य हा एक वाङ्मयाचा संमिश्र प्रकार म्हणून प्र.न. जोशी या वाङ्मयाचा उल्लेख करताना लिहितात, ''कोणत्याही बंदिस्त प्रकाराच्या चौकटीत सामावण्याची त्यांची तयारी नसते. विनोदी वाङ्मय, प्रवास वर्णने, शब्दचित्रे, व्यक्तिचित्रे लघुनिबंधाच्या धर्तीवरील ललित निबंधासारखे स्वैर लेख, आठवणी, संस्मरणे, पत्रात्मक वाङ्मय, नाट्यछटेसारखे आरक्षित प्रकार इत्यादींची नोंद करण्यासाठी अलीकडे ललित गद्य असा एक नवा साहित्यप्रकार स्थूलमानाने कल्पिला जाऊ लागला असून त्याच्या पोटात अनेक लहानमोठे उपप्रकार येऊन स्थिरावतात. ललित गद्य हा असा एक संमिश्र

प्रकार आहे.'' कोणत्याही वाङ्मयप्रकारात न बसणारे असे ललित लेखन म्हणजे ललित गद्य अशी साधारण कल्पना आहे किंवा कोणतेही संस्करणाचे ओझे न घेता 'जे आहे तसे लिहावे' अशा विचारसरणीतूनच या गद्यात्मक लेखनाची निर्मिती झाली असावी. म्हणून कोणताही प्रकार नसलेला हा प्रकार मानला जातो. तसा तो मानला गेल्यामुळे मूळ अनुभवाला जो आकार तोच त्याचा आकार होऊन बसतो. लेखकाला प्रत्यक्ष जीवन जगत असताना, जे अनुभव आले त्या अनुभवांच्या आधारे ते जे लेखन करतात त्यास ललित गद्य म्हणता येईल. अशा सर्वसमावेशक ललित गद्य या ललित वाङ्मयप्रकारातील यशवंतरावांच्या निवडक लेखनाचा स्थूलपणे परिचय करून घेणे महत्त्वाचे आहे.

यशवंतराव चव्हाणांनी साधारणत: १९५० नंतरच्या काळात वैचारिक गद्यात्मक लेखन केले आहे. त्यांचे हे लेखन संग्रह स्वरूपात अजिबात आढळत नाही. त्यांनी जे लेखन केले ते मासिके, दिवाळी विशेषांक, वर्तमानपत्राच्या आवृत्या, स्मृतिग्रंथ, लोकराज्य यासारखे पाक्षिक इ. मध्ये छापले गेले आहे. संख्येने त्यांचे हे लेखन कमी असले तरी गुणांनी विशेष आहे. त्यांच्या या वैचारिक गद्य लेखनाने या वाङ्मयाच्या समृद्धीत भर घातली. स्वातंत्र्योत्तर काळात देशात अनेक आव्हाने निर्माण झाली. बदलत्या काळात ही आव्हाने स्वीकारण्यासाठी यशवंतरावांनी अनेक विषयांवर आपले मूलगामी विचार मांडले आहेत. धर्म, अर्थ, शिक्षण, संस्कृती, राजकारण, व्यापार, उद्योग, कला आणि साहित्य इत्यादी. या यशवंतरावांच्या स्वातंत्र्योत्तर काळातील वैचारिक साहित्यात कोणकोणत्या विचारांच्या लाटा आल्या आणि त्यांच्या या वैचारिक साहित्य लेखनाला कसकसा आकार मिळत गेला याचा विचार करणे महत्त्वाचे आहे. यशवंतराव चव्हाणांच्या या वैचारिक गद्यवाङ्मयाने मराठीच्या ललित विचारप्रधान लेखनाची उंची वाढविली.

यशवंतरावांनी विचारांचे वेगवेगळे पैलू प्रकट करून वाचकांच्या जीवनदृष्टीला प्रगल्भता आणण्यासाठी तसेच त्यांना विचार प्रवृत्त करण्यासाठी हे लेखन केले आहे. यामध्ये 'संयुक्त महाराष्ट्राची साध्ये'- (संयुक्त महाराष्ट्र विशेषांक १९६०), 'सामाजिक जबाबदारी', (शतायुषी दिवाळी विशेषांक-१९८१), 'बांधिलकी कलम करता येत नाही'-('पुस्तक पंढरी', दिवाळी विशेषांक १९८३), 'आज आणि उद्या' (सातारा, साप्ताहिक समर्थ १९४७), 'राष्ट्रीय ऐक्याची समस्या- (पुणे, केसरी दिवाळी अंक - १९६७), आजचे तरुण व सैनिकी शिक्षण, (यशवंत महाविद्यालय स्मृती ग्रंथ, नांदेड १९६३), 'माझ्या आयुष्यातील आशा निराशेचे क्षण', ('रविवार सकाळ पुणे, दिवाळी अंक १९७८), भारताची सद्यस्थिती (केसरी दिवाळी अंक पुणे

१९६८), 'जीवनाचे पंचामृत', ('रविवार सकाळ' पुणे, दिवाळी अंक, पुणे १९७२), इत्यादी काही निवडक यशवंतरावांच्या वैचारिक गद्य लेखाचा विचार येथे केला आहे. हे सर्व लेख 'शब्दांचे सामर्थ्य' या ग्रंथात संपादित केले आहेत.

यशवंतरावांचे ललित लेखन विशेषकरून हे दैनिके किंवा विशेषांकामध्ये आले आहे. यामध्ये आलेले लेखन हे चिरस्थायी स्वरूपाचे नसते. असा एक समज आहे किंवा 'आजची वृत्तपत्रे ही उद्याची रद्दी असते' असे वृत्तपत्राबाबत म्हटले जाते. त्यामुळे सर्जनशील प्रतिभेच्या लेखकाने अशा स्वरूपाचे वृत्तपत्रीय अथवा विशेषांकामध्ये लेखन करू नये असे अनेक आक्षेप या संदर्भात घेतले जातात. तरीही यशवंतरावांसारखा अस्सल प्रतिभा लाभलेला लेखक या प्रकारच्या लेखनाकडे आकृष्ट झालेला दिसतो. त्यांनी यामध्ये केलेले लेखन उत्तम स्वरूपाचे आहे. त्यांची संकलने, वाचताना सहज लक्षात येते. या लेखनावरून या लेखकाची कुवत, ताकद, जीवनानुभव घेण्याची त्यांची शक्ती, लेखनाची जातकुळी सहज लक्षात येते.

यशवंतरावांच्या वैचारिक गद्य लेखनाचे स्वरूप हे आशय, विषय, आविष्कार या सर्वच बाबतीत अधिक वाचनीय असे बनले आहे. यातून यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाचा सकस व संपन्न बाज त्यामधून सतत जाणवत राहतो. यशवंतरावांनी आपले आंतरिक सौंदर्य वाचकापुढे प्रकट करण्यासाठी अशा लेखांचा उपयोग केला आहे. 'भारत सेवक महाराष्ट्र' या लेखामध्ये भारताच्या राष्ट्रीय ऐक्याची बाजू महाराष्ट्राने सांभाळावी. त्यासाठी बुद्धिवंतांचे जाळे महाराष्ट्रात निर्माण झाले पाहिजे. कसदार जमीन असणाऱ्या शेतकऱ्याला जसा आपल्या शेतीचा अभिमान असतो तसा महाराष्ट्राचा अभिमान सर्वांना असला पाहिजे. भारताचा पुरोगामी व कणखर ध्येयवाद असलेल्या महाराष्ट्राने नम्र सेवक व्हावे, अशा सेवकांची देशाला गरज आहे, अशी अपेक्षा यशवंतराव महाराष्ट्राकडून व्यक्त करतात. शासनाची कसोटी व कार्यक्षम कारभार याबद्दल यशवंतराव लिहितात, ''राज्य ही काही उपभोग्य वस्तू नाही. ती समाजपरिवर्तनाची यंत्रणा झाली पाहिजे. केवळ नियोजनातील आकडेवारीने हे होणार नाही. पैसा खर्चून समाजनिर्मिती होत नाही. त्याला सर्वांगीण व जनतेच्या हृदयाला हात घालणारा ध्येयवाद लागेल व तो पेलवणारे तळमळीचे नेतृत्व लागेल. राजकारण हा सत्तास्पर्धेचा आखाडा करणे हे या दरिद्री असलेल्या देशात महापातक आहे. ही अवस्था फार काळ टिकू शकणार नाही. म्हणून कोणत्याही शासनाला लोकाभिमुख राहावेच लागेल. या ध्येयवादामुळे चारित्र्य शुद्धी होईल. नवी ईर्ष्या निर्माण होईल. क्षुद्र आकांक्षा वितळून जातील.'' राजकारण अगदी सामान्यांपर्यंत जाऊन पोहोचले आहे. त्यामुळे त्यांच्यात स्पर्धेचे वातावरण निर्माण

होत आहे. अशा वेळी बदलत्या परिस्थितीचा तटस्थतेने वेध घेऊन शासन, समाजव्यवस्था आणि सत्तास्पर्धेचा त्यांनी या लेखात मांडलेला विचार महत्त्वाचा आहे.

यशवंतरावांनी या वैचारिक लेखनातून राष्ट्रीय विचार आणि ज्ञाननिष्ठा या विषयावर अधिक चिंतन व्यक्त केले आहे. राष्ट्रीय ऐक्याच्या समस्यांबाबत यशवंतरावांनी विविध विचार व्यक्त केले आहेत. जातीय ऐक्य, धर्म, भाषा, प्रदेश यांची भिन्नता, भाषिक, प्रादेशिक वाद इ. प्रश्नांवर ते चिंतनशील विचार मांडतात. प्रादेशिकता हे अंतिम मूल्य असता कामा नये. स्वहित दृष्टी व संकुचित भावना नसावी. विशालता व उदारताही शिकवावी लागते. भाषिक वादाबाबत ते लिहितात, ''आसामी ही भाषा मला येत नसली तरी ती भारतीय भाषा आहे. म्हणून ती माझी भाषा आहे. असे मला वाटू लागले, तर भाषिक तंट्याचे मूळ उखडले जाईल.'गंगा माझ्या प्रदेशात नसली, हिमालय माझ्या गावाजवळ नसला, तरी त्यांचा मला अभिमान आहे.' असे सर्व भारतीयांना वाटते. तसेच ममत्व सर्व भाषांविषयी व सर्व भाषिक प्रदेशांविषयी भारतीय नागरिकांत निर्माण झाले पाहिजे व ते संस्काराने निर्माण करता येईल. असे झाले तर बहुभाषी भारत हा शाप न ठरता ते वैभव ठरेल.'' यशंवतरावांनी येथे राष्ट्रीय ऐक्याचा आणि भाषिक तंट्याबाबत महत्त्वपूर्ण विचार समाजाला आग्रहपूर्वक दिला आहे. यशवंतरावांनी वाचकांच्या भावशक्तीलाही आवाहन केले आहे. म्हणूनच यशवंतरावांचे असे विचारशील लेख बुद्धीला आणि भावजाणिवेला साद घालणारे आहेत. समाजाच्या व राष्ट्राच्या जीवशक्तीला चालना देणारी विचारधाराच त्यांच्या या लेखात आहे.

'केसरी'च्या प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रकाशित केलेल्या संयुक्त महाराष्ट्राच्या विशेषांकामध्ये 'संयुक्त महाराष्ट्राचे साध्य' या लेखात त्यांनी महाराष्ट्राच्या संस्कृतीवर, साहित्यावर, सामाजिक आणि राजकीय कर्तृत्वावर, शिक्षणावर आपले चिंतन व्यक्त केले आहे. महाराष्ट्रात विद्येच्या क्षेत्रात जुनी थोर परंपरा आहे, असे सांगून विद्येची उपासना महाराष्ट्रात टिकली पाहिजे, वाढली पाहिजे. पूजा गुणांची केली पाहिजे, जातीची नाही असे ते सांगतात.

यशवंतरावांच्या ललित लेखनामध्ये विविधता आढळते. 'बांधिलकी कलम करता येत नाही' या लेखामध्ये साहित्यिकाने बांधिलकी स्वीकारावी काय? या विषयावर त्यांनी विचार मांडले आहेत. अनेक साहित्यिकांच्या बदलत्या लेखनाची रूपे या लेखकाने संवेदनशील वृत्तीने टिपली आहेत. डोळसपणे न्याहाळली आहेत. याची जाणीव त्यांच्या या लेखातून होते. शंकरराव खरातांच्या साहित्यात त्यांना बांधिलकी दिसते. तसेच भालचंद्र नेमाडे, चि.त्रं. खानोलकर, विजय तेंडुलकर, प्रभू देसाई, ग. त्र्यं. माडखोलकर, केशवसुत यांच्या साहित्यात प्रेरणांच्या व जीवनाच्या अनुभवावर अधिष्ठित बांधिलकी

आहे तर राजकीय कादंबरीमध्ये अरुण साधूंच्या कादंबऱ्या प्रचारकी थाटाच्या आहेत. कानेटकरांच्या नाटकात अभिप्रेत असलेली बांधिलकी नाही असे स्पष्टपणे नमूद करतात. मनाची प्रौढता, उंची वाढविण्यासाठी वैचारिक वाङ्मयाची गरज आहे या संदर्भात ते लिहितात, ''वैचारिक बांधिलकी ललित लेखकाच्या लिखाणातून उतरावीच असा माझा आग्रह नाही. परंतु लेखकाची वैचारिक बांधिलकी खरीखुरी असेल, तिच्याशी तो प्रामाणिक असेल - चांगले साहित्य निर्माण करणारा स्वत:शी प्रामाणिक असतोच, तेव्हा ही बांधिलकी त्याच्या लिखाणात स्पष्ट रूपाने व्यक्त झाल्याशिवाय राहीलच कशी? बांधिलकी हा लादून घेण्याचा प्रश्न नाही, तर तो असण्याचा प्रश्न आहे; आतून येण्याचा प्रश्न आहे. बांधिलकी उत्स्फूर्त असावी लागते, उत्स्फूर्त वाङ्मयाच्या निर्मितीला ती प्रेरणा कारणीभूत होते, त्यात बांधिलकीची बीजे असतातच. तेव्हा 'बांधिलकी' ही 'कलम' करता येत नसते. प्रतिभेइतकीच ती उपजत असावी लागते.'' लेखन हे सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतूनच लिहिले पाहिजे. समाजप्रबोधनाचे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवूनच यशवंतरावांनी येथे वरील विचार मांडले आहेत. समाज हा यशवंतरावांचा प्रेमाचा व सर्वांगीण चिकित्सेचा विषय आहे. लेखनासाठी आवश्यक असलेली तात्त्विक बैठक आणि कृती यामुळे त्यांचे हे वैचारिक लेखन भारदस्त झाले आहे.

यशवंतरावांच्या समग्र साहित्याची मूळ पीठिका समाज चिंतन व समाजप्रबोधन हीच आहे. कोणतातरी महत्त्वपूर्ण विचार समाजाला देणे हेच त्यांच्या या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. सामाजिक जबाबदारी या लेखात ते लिहितात,''आपणही समाजाचे घटक आहोत, समाजाचं आपल्यावर ऋण आहे. ही भावना मनात आणली , तर तुम्हाला या समाजासाठी कितीतरी गोष्टी करता येतील. समाजऋण हे केवळ पैसा देऊनच फेडायला लागतं, असं नाही, तर काही प्रेमाचे शब्द, आपुलकीची भावना, थोडे फार कष्ट आणि याबरोबरच समाजाविषयीची तळमळ असली, तरी कितीतरी कामं करता येणं सहज शक्य आहे.'' ज्या समाजात, ज्या देशात आपला जन्म झाला त्यासाठी आपण माणूस म्हणून काहीतरी सामाजिक कार्य केलं पाहिजे. ते कार्य कोणत्या रीतीने करायला हवे त्याचा वेध घेतला पाहिजे. त्यासाठी विचारांचे आंदोलन उभे केले पाहिजे. त्यासाठी समाजात भक्कम वैचारिक बैठक असणे अगत्याचे आहे.

यशवंतरावांच्या काळात मराठी पत्रकारितेला मोठा बहर आला होता. महाराष्ट्रातील फार मोठी माणसे त्या काळात वृत्तपत्रात अत्यंत तेजस्वी लेखन करत होती. साहजिक पत्रकारितेचे महत्त्व यशवंतरावांना उमगले होते. त्यांनी 'मराठी वृत्तपत्रांचे स्वातंत्र्यलढ्यातील कार्य' या विषयावरील लेखात पत्रकारितेचे महत्त्व विशद केलेच

शिवाय अनेक वृत्तपत्रांचा व वृत्तपत्र लेखकांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. सुबुद्ध मराठी समाजाच्या वैचारिक घडणीचे कार्य या काळात वृत्तपत्रांनी केले. या काळात अनेक वाद निर्माण झाले. पण त्यामुळे वैचारिक सहिष्णुता वाढली. सहिष्णुता व राजकीय जागरुकता लोकशाहीत रुजविण्यासाठी आवश्यक असते. हे कार्य मराठी पत्रांनी केले. वृत्तपत्रांना आणखीही एका दृष्टीने महाराष्ट्रात महत्त्व आहे. त्यांनी ज्ञानाच्या खिडक्या उघडल्या. त्यातून पुरोगामी विचार समाजापुढे आले. वैचारिक, आर्थिक, सामाजिक विचारांची मूलभूत चर्चा त्यांनी केली, अशा समर्पक शब्दात ते वृत्तपत्रांचे कार्य स्पष्ट करतात.

ललित गद्यात स्वैर आत्माविष्काराला अधिक महत्त्व असते. यामध्ये 'मी' ला जास्त महत्त्व असते. 'मी' ने जे पाहिले, अनुभवले, 'मी' ला जे आवडले, नावडले, भावले त्या 'मी' चा हा निखळ आविष्कार असतो. म.द. हातकणंगलेकर या संदर्भात लिहितात, ''ललितलेखन हे मूलत: आत्मरंगांनी बहरलेले लेखन असते. हे आत्मरंग किती गाढ आणि ताजे, किती संवेदनतत्पर व हळूवार आणि व्यक्तिगत असूनदेखील किती प्रमाणात जीवनाची सनातन स्पंदने स्वीकारणारी आहेत यावरच या लेखनाची सार्थकता व गुणवत्ता अवलंबून असते.'' या व्याख्येप्रमाणेच यशवंतरावांनीसुद्धा आपल्या ललितलेखनात वैचारिकतेचा उपयोग करून जीवनविषयक तत्त्वज्ञान व चिंतनशीलता याचा वापर केला आहे. तसेच 'मी' चे राग-लोभ, रीती, सवयी, नाद, छंद इ. प्रकटीकरण त्यांनी या लेखातून केले आहे. यशवंतरावांच्या ललित गद्याचे खरे सामर्थ्य त्यांना आलेले अनुभव वैविध्यपूर्ण रीतीने मांडण्यातच आहे. त्यांच्या ललित लेखनाला कोणत्या विषयाचे वावडे नाही. अनुभवांच्या कुठल्याही प्रांतात ते संचार करू शकते. 'माझ्या आयुष्यातील आशा निराशेचे क्षण' या लेखात त्यांनी वैयक्तिक जीवनातील अनेक आत्मगत आठवणी सांगितल्या आहेत. राजकारणातील अनुभव कथनही केले आहे. राजकारणामध्ये माणसे जोडणे व स्नेहसंबंध टिकवणे महत्त्वाचे असते. असंख्य लोकांची मने जपावी लागतात. पण काही लोकांच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण न झाल्यास ते वैर स्वीकारतात. अशा स्वभावाची माणसे पाहिल्यावर ते निराश होतात. ते लिहितात, ''मला राग येत नाही, पण निराशेचा मात्र तीव्र अनुभव होता. मला वाटते, कदाचित हा जीवनाच्या खेळातील आवश्यक भाग असेल. राजकारणात निदान सरळरेषेत काहीच चालत नाही. कदाचित इतर क्षेत्रातही चालत नसावे. सरळ रेषेची ही संकल्पना फक्त भूमितीतच पाहायची. वास्तव जीवनात दिसतात त्या अनेक समांतर रेषा किंवा एकमेकांना छेदून त्रिकोण, चौकोन करणाऱ्या रेषा. हेही खरे आहे की आकर्षक वळसे घेत मनोरम चित्रलेखा उभ्या करणाऱ्या रेषाही असतात. त्यांना विसरून चालत नाही.

जीवनाची ही वास्तविकता गृहीत धरून चालावे लागेल व ती हसतमुखाने स्वीकारल्याने मनुष्य निराशेच्या कक्षेबाहेर पडू शकेल.'' यशवंतरावांनी येथे प्रतिमांचा वापर करून सुंदर असे अनुभव कथन केले आहेत. यशवंतरावांना समाजव्यवहारात वावरताना अनेक व्यक्तींशी निगडित असे भल्याबुऱ्या प्रवृत्तींनी युक्त असे जे अनुभव आले ते आपल्या स्मृतिकोशात वाङ्मयीन पातळीवर अनुभवून अशा स्वरूपाचे विचार व्यक्त केले आहेत. 'भारताची सद्यस्थिती', 'विकसित आणि अविकसित राष्ट्रांचे आर्थिक संबंध', 'लोकशाहीतील प्रशासन' यांसारख्या लेखातून त्यांचे राजकीय विचार समाविष्ट झाले आहेत. हे लेख त्यांच्या स्वतंत्र, निर्भय व निर्मितीशील विचारांची साक्ष देण्यास पुरेसे आहेत. त्यांच्या या लेखनातील वैचारिकता कोठेही विचलित झालेली दिसत नाही.

यशवंतराव चव्हाणांच्या विचारांची खोली व्यापक आहे. सामाजिक समस्यांकडे ते किती सूक्ष्मतेने केवळ चिंतनाच्या पातळीवरून पाहू शकतात याची अनेक उदाहरणे देता येतील. त्यांचे चिंतनाचे क्षेत्र विस्तृत आहे. जीवनाच्या महत्त्वपूर्ण अंगांना स्पर्श करणाऱ्या अनेक विषयावर आपला स्वतंत्र विचार ते व्यक्त करतात. ''जीवनाची धडपड ही काहीतरी प्राप्त करण्यासाठी असते. माणूस हा काही तत्त्व, ध्येय, अर्थ जीवनाला जोडत असतो. ते प्राप्त करण्यासाठी जीवन धडपडत असते. ती तत्त्वे, ध्येय, अर्थ या सर्वांचे महत्त्व अशासाठी असते की त्यांची जीवनावर काही प्रतिक्रिया निर्माण होत असते.'' असा विचार ते मांडतात. त्यांच्या या लेखनाला जीवनविषयक चिंतनाचा आणि व्यासंगाचा भक्कम आधार आहे. त्यांच्या या विचारातून वाचकांना एक नवी दिशा दाखवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यांच्या विधानांना सुभाषितांचे सामर्थ्य प्राप्त होते. 'जीवनाचे पंचामृत' या लेखात त्याची अनेक उदाहरणे पाहावयास मिळतील. उदा. ''सुखाचा क्षण असो अगर दुःखाचा, संकटाचा असो, साथीदाराचे बोट धरून ठेवलेच पाहिजे. सुखाच्या वेळी एकत्र यायचे आणि संकटाच्या वेळी बोट सोडून दिसेल त्या मार्गाने निसटून जायचे.'' जीवन हाच जीवनाचा अर्थ. वैयक्तिक जीवन हेच त्याचे ध्येय. लोकसत्ताक जीवनाचा अर्थही वैयक्तिक जीवन असाच करावा लागतो..... सत्तेचा उगम मानवातून होतो. माणूसच या सत्तेचा उत्कर्ष साध्य करू शकतो आणि या सत्ताशक्तीचा उच्छेदही माणूसच करू शकतो.'' ''विचार म्हणजे वाचनाने, अध्ययनाने, व्यासंगाने मेंदूत साठविलेले विचार.''''क्रांतीचा विचार असो वा शांतीचा, तो रक्तापर्यंत पोहचवावाच लागतो. तरच तो जीवनाला ऊब आणतो. विधायक विचाराचे बी रक्तात भिजत घातले, रुजवले तरच त्याला कोंब फुटतात आणि कालांतराने मूळ धरते. अशी इतिहासाची साक्ष आहे.''..... परंतु पुढे-पुढे बोलून विचार करावा,

यापेक्षा विचार करून बोलावे.'' ''खरे म्हणजे लोकांना योग्य तऱ्हेने, योग्य ठिकाणी नेतो, तो नेता. उदात्त उदाहरण घालून देणे, प्रगल्भ प्रात्यक्षिक निर्माण करणे म्हणजे नेतृत्व करणे होय.'' ''नेता हा नीतीमान असावा लागतो तसा तो असलाच पाहिजे.''... ''श्रद्धा ही शक्ती आहे. सत्य धारण करते, ती श्रद्धा. सत्याचा पाठपुरावा हा त्या अर्थाने श्रद्धेचाच पाठपुरावा असतो.'' अशा काही उदाहरणांवरून यशवंतरावांची वैचारिकता लक्षात तर येतेच. यशवंतरावांच्या लेखनातील आशयाचा आविष्कार कसा होता हे वरील त्यांच्या शैलीवरून सहज लक्षात येते.

'सातव्या मजल्यावरील चढ' या लेखात यशवंतराव भूतकाळाविषयीचे चिंतन प्रकट करतात. आठवणीच्या माध्यमातून अनेक प्रसंग सांगतात. राजकीय, सामाजिक क्षेत्रातले अनेक अनुभव ते कथन करतात. १९४६ पासून ते १९७२ पर्यंतच्या राजकीय व सामाजिक घडामोडींचा पट ते मांडतात. हे सांगत असताना ते स्वत:बद्दलही सांगतात, ''पण आज मनाला शांतता आहे. समाधान आहे. सत्तेत असलो किंवा सत्तेच्या बाहेर असलो, तरी माझी वैचारिक संगत कधी सुटणार नाही. जीवनाची लढाई संपलेली आहे, असं नव्हे. अंतापर्यंत ती चालू राहणार आहे. त्यासाठीच जीवन समर्पित आहे.'' या लेखात लेखकाने भावनाविष्कार व्यक्त केला आहे, याचबरोबर भावोत्कट प्रसंगाने निर्माण झालेल्या भावनात्मक प्रतिक्रिया तितक्याच तीव्रतेने येथे नोंदवल्या आहेत. माणसाचे विचार, चिंतन, तात्त्विक दृष्टिकोन, उत्कट-तीव्र झाले की तिचे भावमूल्य सिद्ध होते. यशवंतरावांच्या विचारांना असेच भावमूल्य प्राप्त होते. यामधून यशवंतरावांच्या विचारांतील भावमूल्यांचे स्वरूप पाहावयास मिळते.

यशवंतरावांनी राजकारण व समाजकारण या आव्हान देणाऱ्या विशाल क्षेत्रात प्रभावी व अभूतपूर्व अशी कामगिरी केली. त्याचप्रमाणे एक खंबीर आणि प्रभावी नेता म्हणून तितकीच प्रभावी आणि बहुमोल कामगिरी राजकीय क्षेत्रात केली. या नेतृत्वास त्यांच्या प्रभावी वक्तृत्वाने फार मोठा हातभार लावला. अत्यंत साधी, सोपी भाषा, लोकांना कळेल, पटेल आणि रुचेल असा युक्तिवाद, त्यांची मनं भारून टाकणारं चैतन्य, त्यांना स्फुरण चढवणारी ओजस्विता आणि त्यांना सतत प्रसन्न ठेवणारे विचार यांनी त्यांचं वक्तृत्व नटलेलं असे. गर्दी खेचून घेण्याचं आणि तिला खिळवून ठेवण्याचं विलक्षण सामर्थ्य त्यात होतं. अशा या वक्तृत्वाबद्दल 'भाषण म्हणजे संवाद' या लेखात विचार मांडले आहेत. ते लिहितात, ''भाषण रंगविण्यासाठी काही प्रसंगी काही आडाखे जरूर बांधावे लागतात. परंतु मला त्याची पूर्वतयारी करावी लागत नाही. आडाखे, मी भाषणाला उभा राहिलो, म्हणजे मला सुचतात, हा दैवी योग आहे. याबाबत प्रमुख गोष्ट म्हणजे, भाषणास उभे राहिले म्हणजे मनात विचारांची स्पष्टता असायला पाहिजे.

आत्मविश्वास असायला हवा..... वक्तृत्वासाठी वक्तृत्व मी कधी केले नाही. त्यामुळे कधी माझी भाषणे चांगली होतात तर कधी सामान्य होतात. पण ती कधी पडत नाहीत..... मी जेव्हा साहित्यविषयक प्रश्नांसंबंधी माझे विचार मांडण्याचा प्रयत्न करीत असतो, तेव्हा त्या क्षेत्रातील मी अधिकारी माणूस नाही. परंतु बहुश्रुत आहे, असा माझा दावा आहे. त्यामुळे या विषयांवर बोलण्याचा मला नेहमीच आनंद वाटतो.'' हा लेख आत्मविश्लेषणात्मक असल्याने यामध्ये त्यांच्या भाषणाची वैशिष्ट्ये ते स्वत:च सांगतात. भाषण कसे व किती लांब करावे, त्यामधील मुद्दे, भाषणाच्या विषयावरील वाचन व चिंतन, विषयाची मांडणी इत्यादीबाबतचा त्यांचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. यशवंतरावांनी निरनिराळ्या प्रसंगी व्यक्त केलेल्या विचारावरून त्यांचे विचार किती चौफेर व परिपक्व होते, याचे दर्शन घडते.

यशवंतराव अभिजात साहित्यिक होते. मराठी भाषेचा एक नम्र पाईक या नात्याने मराठी भाषेचा आणि साहित्याचा त्यांनी आदर केला. त्यांनी मराठी साहित्यामध्ये विविध प्रकारचे लेखन केले. ललित आणि आत्मलेखनात्मक तसेच चरित्रात्मक, व्यक्तिचित्रणात्मक आठवणी, प्रवासवर्णनपर, स्फुट, वैचारिक, समीक्षात्मक, पत्रात्मक इ. स्वरूपातील लेखन त्यांनी केले आहे. त्यांच्या 'कृष्णाकाठ', 'ऋणानुबंध', 'युगांतर', 'भूमिका', 'शिवनेरीचे नौबती', 'विदेश दर्शन', 'सह्याद्रीचे वारे', 'यशवंतराव चव्हाण-शब्दाचे सामर्थ्य' इ. ग्रंथातून त्यांच्या ललित प्रकृतीचा आपल्याला परिचय होतो. या साहित्यकृतीतून आपली दीर्घकालीन वाङ्मयीन अशी साहित्य संस्कृती जपण्याचा प्रयत्न केला. ते प्रथम राजकारणी होते. पण त्यांच्यामधील सामाजिक विचारवंत हा मात्र साहित्यिकाबरोबरचा असल्याचे स्पष्ट जाणवते. एक सर्वसाधारण माणूस म्हणून साहित्यिकाने कसे जगावे व विचारसंपन्न कसे असावे याचा एक नमुना म्हणून त्यांच्या साहित्यिक कलाकृती लक्षवेधक असल्याचे दिसून येते. यशवंतरावांच्या 'कृष्णाकाठ' या खंडामध्ये त्यांचे १९४६ पर्यंतचे चरित्र दिसते. त्यातून त्यांच्या अभिरुचीसंपन्न व सुसंस्कृत अशा एका मनाचे दर्शन होते. कृष्णाकाठ, भूमीविषयी प्रेम, अनेक छंदांची जोपासना, वैचारिक आंदोलन, विश्वास आणि मैत्रीचे, स्नेहाचे नाते जिवाभावाने जपणारे मन, वैचारिक मतभेद, गांधीवाद, समाजवाद, मार्क्सवाद इ. विविध विचारसरणीतून त्यांच्या मनाचा प्रवास कसा झाला हे स्पष्ट होते. अनेक व्यक्तींचे मार्गदर्शन त्यांना कसे लाभले, संस्कारक्षम आणि संवेदनक्षम अशा व्यक्तित्त्वाची जडणघडण बालजीवनापासून ते प्रौढजीवनापर्यंत कशी झाली याचा पट 'कृष्णाकाठ'मध्ये साकारला आहे. त्यामध्ये त्यांच्या आयुष्यातील अनेक प्रसंगांचे प्रत्ययकारी चित्रण दिसते. यशवंतरावांचा विवाह, १९४२ चा लढा, भूमिगत चळवळ, पहिले स्वातंत्र्याचे आंदोलन, निवडणूक,

प्रभावशाली व्यक्ती, विविध चळवळीतील सहभाग यांचे चित्रण त्यांनी केले आहे. मात्र 'सागरकाठ' व 'यमुनातट' या त्यांच्या संकल्पित आत्मचरित्राचे खंड मात्र अपूर्ण राहिले. 'कृष्णाकाठ' मधील भाषा, विचारगर्भ व चिंतनशील सुभाषितवजा विधाने आपले लक्ष वेधून घेतात. याची अनेक उदाहरणे या आत्मचरित्रात आहेत.

यशवंतरावांचे आत्मकथनपर स्फुट लेखन विविध नियतकालिकातून प्रसिद्ध झाले आहे. त्यांच्या 'ऋणानुबंध' या पुस्तकातील बरेच लेख आत्मकथनपर आहेत. अशा लेखातून स्वत: यशवंतराव प्रकट होणे स्वाभाविक आहे. या सर्व लेखनाला वैयक्तिक अनुभवाचे अधिष्ठान आहे. अशा स्वरूपाच्या त्यांच्या लेखनात आत्मपरता आढळते. या लेखनातून यशवंतरावांच्या समृद्ध व्यक्तिमत्त्वाचा परिचय होतो. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेक अंगांचे दर्शन होते. त्यांच्या या विविध आत्मपर लेखातून प्रकट असे जीवनविषयक चिंतन आले आहे. त्यांच्या अशा लेखातून त्यांच्या मुक्त मनाचा आणि जीवनविषयक अनुभवाचा मुक्त आविष्कार प्रकट होताना दिसतो. या आत्मकथनपर लेखातून असंख्य जीवनचिंतने रमणीय काव्यरूप घेऊन अवतरतात. विचारांच्या पातळीवर ही जीवनचिंतने आपल्याला प्रेरणादायी अशीच आहेत. या लेखनातून त्यांच्या अनुभवाची समृद्धी, बहुश्रुतता, वाचन, चिंतनातून त्यांच्या मनाचा झालेला विकास, चौफेर निरीक्षण, लोकसंग्रहामुळे झालेले मनुष्य स्वभावाचे विपुल ज्ञान इ. गोष्टी पाहावयास मिळतात.

यशवंतरावांचे चरित्रात्मक लेख आकाराने छोटे पण गुणाने मोठे आहेत. ही चरित्रे लहान असली तरी त्यात 'साहित्यिक महानपण' आहे. या चरित्रात्मक लेखनातून विविध व्यक्तींचा त्यांच्या वैचारिक वैशिष्ट्यासह त्यांनी मागोवा घेतला आहे. उदा. छत्रपती शिवाजी, लोकमान्य टिळक, रवींद्रनाथ टागोर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पं. नेहरु, लालबहादूर शास्त्री, कृ.प. खाडिलकर, वि.स. खांडेकर, ग.त्र्यं. माडखोलकर, ग.दि. माडगूळकर आदींचा उल्लेख आवर्जून केला पाहिजे. या चरित्रनायकांच्या आयुष्यात डोकावून, त्यांची जडणघडण, त्यांचा व्यक्तित्वविकास, त्यांचे कर्तृत्व आणि त्यांची विचारसृष्टी समजावून घेऊन या चरित्ररेखा साकारल्या आहेत. या चरित्ररेखा उगवत्या, संस्कारक्षम पिढीला आपल्या राष्ट्राची व राष्ट्रपुरुषांची थोरवी समजण्यास नेहमीच उपयुक्त आहेत. चरित्रनायकाच्या जीवनातील वृत्तींचा व घटनांचा अन्वयार्थ लावून वास्तवाशी इमान राखून या चरित्ररेखा चितारल्या आहेत. यशवंतरावांना चरित्रनायकाचे जे रूप जसे भावले तसेच रेखाटले आहे. त्यामुळे हे चरित्र लेख म्हणजे त्यांच्या मनाचे प्रांजळ आरसे आहेत.

यशवंतरावांच्या आत्मकथनपर लेखनात अनेक व्यक्तिचित्रणे आली आहेत. आई

विठाबाई, पत्नी वेणूताई, आचार्य भागवत, कुलसुमदादी, कृष्णा धनगर, आत्माराम पाटील, अहमद कच्छी यांसारखी अनेक उठावदार व्यक्तिचित्रे त्यांनी साक्षात उभी केली आहेत. ही व्यक्तिचित्रे सामान्य उपेक्षित व्यक्तीपासून ते महान श्रेष्ठ विभूतींची आहेत. या व्यक्तिचित्रणात माणसांच्या स्वभावाचे विविध नमुने, व्यक्तींच्या जीवनातील सुखदु:ख, त्यांच्यातील विक्षिप्त स्वभाव, त्यांचा रागलोभ, ध्येय-मूल्ये इत्यादींची सूक्ष्म निरीक्षणे येतात. ही त्यांची व्यक्तिचित्रणे काल्पनिक नाहीत. या लेखनातून यशवंतरावांनी घटना, प्रसंगांचा शोध घेतला आहे. त्यांचे व्यक्तिचित्रण म्हणजे एका अर्थाने मानवतेचा शोध होता.

यशवंतरावांच्या प्रवासवर्णनातही आत्माविष्कार व अनुभव कथन हीच प्रेरणा आढळते. 'केल्याने देशाटन', 'शांतिचितेचे भस्म', 'विदेश दर्शन' या प्रवासवर्णनात्मक लेखातून व ग्रंथातून त्यांचे जीवन चिंतन प्रकटते. या प्रवासवर्णनामधून प्रदेश आणि प्रकृती यांचा समन्वय साधत त्यांनी केलेले लेखन मोलाचे वाटते. या प्रवासवर्णनात त्यांची रसिकता, त्यांची चिंतनशीलता व संवेदनशीलता दिसते.

यशवंतरावांच्या समग्र साहित्याचा अभ्यास करताना त्यांनी लिहिलेल्या काही उदाहरणादाखल पत्रलेखनाचा उहापोह केला आहे. या पत्रात्मक लेखनातही त्यांचा जिव्हाळा आणि अंतरंगातील भाव याचा प्रत्यय येतो. या पत्रातून त्यांची पत्र लिहिण्याची भाषा आणि जिव्हाळा, कौटुंबिक स्नेह आणि आत्मीयता दिसते. म्हणून या पत्रांना साहित्यसृष्टीत व जनमानसात विशेष असे महत्त्व आहे. त्यांनी केलेला पत्रव्यवहार म्हणजे एकप्रकारचे साहित्यिक धन आहे.

यशवंतरावांचा पिंड ललितलेखकाचा होता. त्यामुळे त्यांनी केलेले गद्यात्मक लेखन लालित्याचा धर्म घेऊन येते. त्यांच्या वैचारिक गद्य लेखनात त्यांच्या सकस आणि संपन्न विचाराचे दर्शन घडते. यशवंतरावांचा साहित्य संसार समाजप्रबोधन आणि समाजचिंतन या अंगाने जात असल्यामुळे त्यांच्या ललित लेखनात देखील समाजचिंतनच आढळते. अनुभव कथन व आत्माविष्कार ही प्रेरणा स्वीकारून त्यांचे हे लेखन झाले आहे. हे लेखन आशय, विषय व आविष्कार या सर्वच बाबतीत अधिक वाचनीय असे आहे. यशवंतरावांच्या वाङ्मयात एवढी विविधता आहे की कधीकधी हे वाङ्मयप्रकार परस्परात कधी मिसळून गेले हे कळतही नाही.

○ ○ ○

दिनांक : १ डिसेंबर १९७४

शिवाजी विद्यापीठ

माननीय नामदार

श्री. यशवंतराव बळवंतराव चव्हाण

परराष्ट्र मंत्री, भारत सरकार यांना

डॉक्टर ऑफ लॉज्

ही सन्मान्य पदवी द्यावी अशी

कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार

यांनी

कुलपती डॉ. नवाब अली यावर जंग

यांना

विनंती करताना सादर केलेले

गौरवपत्र

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील
पदवीदान समारंभप्रसंगी

माननीय कुलपती महोदय,

भारताचे मान्यवर परराष्ट्रमंत्री व अग्रगण्य लोकनेते, लोकशाहीचे समर्थ पुरस्कर्ते, भारतीय राजकारणातील अभ्यासू, दूरदर्शी मुत्सद्दी, सर्व सामान्य जनतेच्या सुखदु:खाशी एकरूप होऊन तिच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी अविश्रांत परिश्रम घेणारे श्रेष्ठ समाजसेवक, ध्येयनिष्ठ स्वातंत्र्यसैनिक आणि समाजवादी तत्त्वांचा अभ्यासपूर्वक प्रचार करीत राहिलेले एक क्रियाशील विचारवंत श्री. यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांना शिवाजी विद्यापीठाच्या विधिसभेने व कार्यकारिणीने एकमताने ठराव करून 'डॉक्टर ऑफ लॉज्' ही सन्मान्य पदवी प्रदान करावी अशी इच्छा व्यक्त केली आहे. ती पदवी ग्रहण करण्यासाठी मी त्यांना आपल्यासमोर सादर करीत आहे.

श्री. यशवंतराव चव्हाणांचा जन्म सातारा जिल्ह्यात, देवराष्ट्र या गावात एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. ग्रामीण भागातील साधारण जनतेच्या जीवनाला नानाविध संकटांनी कसे वेढलेले असते याचा प्रत्यक्ष अनुभव त्यांनी घेतला. प्रतिकूल शिक्षण चालू असताना महात्मा गांधींच्या विचारांचा त्यांच्यावर संस्कार होत होता. वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी गांधीजींच्या आदेशाला प्रमाण मानून त्यांनी असहकाराच्या आंदोलनात स्वत:ला झोकून दिले आणि अठरा महिन्यांचा कारावास कोवळ्या वयात हसतमुखाने पत्करला. स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेत घेत त्यांनी आपले शिक्षण कोल्हापुरात पूर्ण केले. इतिहास आणि अर्थशास्त्र घेऊन ते पदवीधर झाले. कायद्याची परीक्षाही ते उत्तीर्ण झाले. १९४२ च्या स्वातंत्र्य संग्रामात भूमिगत होऊन त्यांनी त्या आंदोलनाला संघटितरूप देऊन त्याचे नेतृत्व केले. या वेळीही दोन वर्षांचा बंदीवास त्यांना सहन करावा लागला. या काळात व विद्यार्थीदशेत साहित्याचा, भिन्न भिन्न काळात व विद्यार्थीदशेत साहित्याचा, भिन्न भिन्न राजकीय-सामाजिक विचार प्रणालींचा त्यांनी मन:पूर्वक अभ्यास केला असल्यामुळे त्यांचा वैचारिक पिंड समृद्ध बनला. दृष्टिकोन विस्तारला. व्यक्तित्व आणि नेतृत्व यांच्या उभारणीचा पाया याच काळात घातला गेला. १९४६ मध्ये मुंबई विधानसभेवर त्यांची निवड झाली. सांसदीय चिटणीसापासून ते मुख्यमंत्रीपदापर्यंत आणि केन्द्रीय मंत्रिमंडळात संरक्षण गृह,अर्थ व आता परराष्ट्र अशा अत्यंत महत्त्वपूर्ण पदावर राहून अवघड जबाबदाऱ्या लोकहिताच्या दृष्टीने पेलून त्यांनी राष्ट्राच्या प्रशासनाचे व बांधणीचे जे भरीव कार्य केले ते भारताच्या इतिहासात सदैव संस्मरणीय ठरेल. विरोधाच्या वादळी लाटा छातीवर झेलून अनुकूल वातावरण निर्माण करण्याची त्यांची विलक्षण कार्यकुशलता द्वैभाषिक मुंबई राज्याचे सूत्रसंचालन करताना व इतरत्रही गुंतागुंतीचे प्रश्न सोडवताना अनेक वेळा दिसली. संयुक्त महाराष्ट्राची प्रतिष्ठापना होण्यास ज्या शक्तीचे साहाय्य झाले. त्यात त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण धोरणाला

व दृष्टीला सर्वाधिक श्रेय द्यावे लागेल. या अनुभवसंपन्न प्रशासकाने व दूरदृष्टीच्या नेत्याने जेव्हा जेव्हा राष्ट्रीय आपत्ती उद्‌भवली तेव्हा तेव्हा मार्ग काढून आपल्या कणखर, तत्त्वनिष्ट क्षमतेचे प्रत्यंतर आणून दिले आहे. भारताच्या अभ्युदयाचे एक आशास्थान म्हणून या महाराष्ट्राच्या सुपुत्राकडे यथार्थपणे पाहिले जाते याचा प्रत्येक मराठी माणसाला विलक्षण अभिमान वाटतो.

श्री. चव्हाण यांचे व्यक्तित्व आणि कर्तृत्व एकारलेले नाही. महात्मा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या क्रांतिप्रवण, सामाजिक कार्यातून व विचारातून त्यांची प्रगमनशील जीवनदृष्टी फुलत गेली. कोणताही सांप्रदायिक, संकुचित विचार त्यांनी कधीच स्वीकारला नाही. व्यक्तीची मूलभूत प्रतिष्ठा व स्वातंत्र्य यांच्यावरील आपला विश्वास त्यांनी कधीही ढळू दिला नाही. ज्ञानाच्या उपासनेतूनच सामाजिक क्रांतीला चालना मिळू शकते या जाणिवेने बहुजनसमाजापर्यंत विद्येचा प्रकाश पोहोचविण्यासाठी त्यांनी अनेक शिक्षणसंस्थांच्या उभारणीला सक्रिय साहाय्य केले. शिवाजी विद्यापीठाच्या निर्मितीमागे श्री. चव्हाणांची प्रेरणा, प्रतिभा आणि प्रयत्न ठामपणे उभे आहेत याची कृतज्ञ जाणीव सर्वांना आहेच. कोल्हापूरसारख्या इतिहाससमृद्ध नगरीत त्यांनी लावलेले विद्यापीठाचे इवलेसे रोप आता चांगलेच रुजून विस्तार पावत आहे.

महाराष्ट्रीय जीवनाच्या सर्वांगीण प्रगतीत श्री. चव्हाणांचे श्रेय केवळ उल्लेखनीय नसून अविस्मरणीय आहे. येथील सांस्कृतिक वातावरण विकसित करण्यासाठी, तसेच साहित्य आणि कला यांच्या अभिवृद्धीसाठी त्यांनी अनेक योजना आखल्या व कार्यवाहीत आणल्या. राजकीय आणि सामाजिक जीवनात नेतृत्व करणारा हा लोकप्रिय नेता प्रकृतीने बुद्धिनिष्ट आहे याची प्रचिती त्यांनी आजपर्यंत केलेल्या सहस्रावधी भाषणांतून आली आहे. 'शिवनेरीच्या नौबती', 'सह्याद्रीचे वारे', 'युगांतर' आणि 'विंडस् ऑफ् चेंज' हे त्यांच्या प्रकाशित भाषणाचे संग्रह त्यांच्या वक्तृत्वाची व चिंतनशील प्रकृतीची साक्ष देतात. राजकारणाच्या जटिल, अनिश्चित क्षेत्रात दीर्घकाल राहूनही उदात्त जीवन-मूल्यांच्या जपवणुकीत रमलेले हे चारित्र्यशुद्ध व्यक्तित्व आपल्या सहजसौजन्याला, रसिकतेला व प्रसन्न हास्याला कधी पारखे झाले नाही. भारतीय समाजाच्या अस्मितेचे, सुजाण सुसंस्कृत प्रवृत्तीचे, प्रगतीचे, प्रगल्भ आणि प्रगत अस्मितेचे, समाज-परिवर्तनासाठी उद्युक्त असलेल्या आत्मप्रज्ञेचे, सुदृढ विश्वासाचे, हृदयाशी कवटाळणाऱ्या माणुसकीचे हे चालतेबोलते प्रतीक आहे, असे म्हणण्यात कसलीच अतिशयोक्ती नाही.

श्री. यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांना 'डॉक्टर ऑफ लॉज्' ही सन्मान्य पदवी आपण अर्पण करावी अशी मी आपल्याला नम्र विनंती करतो.

○ ○ ○

दिनांक : २४ मार्च १९८४,
भारती सौर १९०६

पुणे विद्यापीठ

मा. खासदार यशवंतरावजी चव्हाण यांना सन्माननीय 'डॉक्टर ऑफ लेटर्स' पदवीदान

माननीय खासदार श्री. यशवंतराव चव्हाण –

पुणे विद्यापीठ कार्यकारिणीने आणि विद्यापीठाच्या विधिसभेने आपल्याला सन्माननीय 'डॉक्टर ऑफ लेटर्स' ही पदवी प्रदान करण्याचा निर्णय केला आणि ही पदवी आजच्या मंगलदिनी आपणास सादर करीत आहोत. याबद्दल आम्हाला आनंद आणि अभिमान वाटत आहे. या पदवीचा आपण स्वीकार करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल एअर मार्शल लतिफ यांचे हस्ते
पुणे विद्यापीठाची डी.लिट् पदवी स्वीकारताना

माननीय श्री. यशवंतराव -

महाराष्ट्राच्या समाजजीवनाचे आपण एक शिल्पकार आहात. मराठी जनसामान्यांची अस्मिता आपल्या रूपाने साकार झाली आहे. महाराष्ट्रात कर्तबगार कार्यकर्ते निर्माण झाले आणि महाराष्ट्राला प्रदीर्घ काल स्थिर आणि प्रगतिशील शासन लाभले. एक कार्यक्षम लोकाभिमुख राज्य म्हणून महाराष्ट्र राज्याने लौकिक संपादिला, हे आपल्यामुळे. याचा मराठीजनांना सार्थ अभिमान वाटतो.

कृष्णाकाठचे देवराष्ट्र ही आपली जन्मभूमी. प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देत आपण विद्याभ्यास केलात. राजकीय जाण आणि साहसी वृत्ती आपल्या शालेय जीवनातच अभिव्यक्त झाली. मॅट्रिकच्या वर्गात असतानाच आपण वंदे मातरम्‌ची घोषणा देत कराड नगरपालिकेवर तिरंगी झेंडा फडकविलात आणि त्यासाठी कारावासही सोसलात. यथाकाल पदवीधर होऊन विधिज्ञही झालात.

स्वातंत्र्य आंदोलनात जनसामान्यांचे नेतृत्व केलेत. झुंजारवृत्तीने लढे लढविलेत. प्रसिद्ध बेचाळीसच्या क्रांतियुद्धातील आपला वाटा रोमहर्षक होता. मराठी राज्याच्या राष्ट्रीय शासनात आपण प्रारंभापासून सहभागी होता.

भाषिक राज्याची निर्मिती ही भारतीय लोकशासनाच्या वाटचालीतील एक निर्णायक टप्पा. या वाटचालीतील आपला सहभाग लक्षणीय होता. अत्यंत कठीण अशा परिस्थितीत महाराष्ट्र आणि गुजरातचे द्वैभाषिक राज्य आणि नंतरचे संयुक्त महाराष्ट्र राज्य या राज्यांचे प्रशासन आपण अतीव कुशलतेने केलेत.

महाराष्ट्राला पहिले मुख्यमंत्री म्हणून आपण लाभलात हे मराठीजनांचे मोठे भाग्य होय. सामान्य जनतेचा प्रथम क्रमांकाचा सेवक ही आपली भूमिका विलोभनीय होती.

सर्वजनहित ही दृष्टी, समन्वय आणि सामंजस्य ही रीती, संयम आणि स्वच्छ प्रशासन ही नीती याचा प्रत्यय आपण मराठीजनांना दिलात. अल्पावधीत आपल्या लोकाभिमुख कुशल प्रशासनाची कीर्ती भारतात सर्वदूर पसरली.

हिमालय संकटात आला आणि केंद्राने आपणास हाक दिली. आपण भारताचे संरक्षणमंत्री झालात. पाकिस्तान युद्धातले यश हे आपले यश होते. ओघाने केंद्रशासनातील आपली जबाबदारी चढत आणि वाढत गेली. भारताचे गृहमंत्री, अर्थमंत्री आणि परराष्ट्रमंत्री म्हणून काम केलेत. भारतीय कीर्तीचा लोकनेता आणि एक कुशल प्रशासक म्हणून आपण संपादिलेल्या लौकिकाचा सर्वांना अभिमान वाटतो.

व्यक्तीजीवन असो वा समाजजीवन असो. स्वातंत्र्य आज साध्य असले तरी ते उद्या विकासाचे साधन राहते. म्हणून राजकीय स्वातंत्र्य आणि राष्ट्रीय शासन या गोष्टी समाजविकासाची साधने ठरतात ही जाणीव आपण नेहमी ठेवलीत. जनहितदक्ष व्यापक

राष्ट्रीय वृत्तीचे प्रभावी लोकनेतृत्व, सुसंस्कारी विद्येचा सार्वत्रिक प्रसार आणि आर्थिक विकास यातून लोकशासन संपन्न होते ही आपली धारणा होती आणि आपल्या प्रशासनात मराठीजनांना त्याचा प्रत्यय आला.

महाराष्ट्रात आज शिक्षण सार्वत्रिक आहे. विद्येच्या क्षेत्रात सर्वांना मुक्त प्रवेश आहे. याचे श्रेय आपल्या उदार शिक्षणनीतीला, ज्ञानभाषा म्हणून इंग्रजी महत्त्वाची. तथापि लोकभाषा आणि म्हणून सामान्यजनाची ज्ञानभाषा या दृष्टीने मराठीचे स्थान अनन्य राहील असे आपण आग्रहाने प्रतिपादिले. मराठवाडा विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ या प्रादेशिक विद्यापीठांची स्थापना आपल्या कारकीर्दीत झाली. या विद्यापीठातून ज्ञानसाधना, ज्ञानप्रसार आणि समाजप्रबोधन व्हावे ही आपली सार्थ अपेक्षा आहे.

समाजाच्या आर्थिक विकासाचे महत्त्व आपण नेमके जाणले होते. ज्या समाजाचे आर्थिक जीवन संपन्न वा समृद्ध असेल त्या समाजात अर्थार्जन, कर्तृत्व, प्रतिष्ठा यासाठी अमाप क्षेत्रे उपलब्ध होतात हे जाणून आपण सहकार, साखर-उद्योग या द्वारा महाराष्ट्रात कृषि-उद्योग-क्रांती (Agricultural-Industrial-Revolution) प्रत्यक्षात आणली.

जिल्हापरिषदा व पंचायत समित्या स्थापून विकेंद्रित लोकशाहीचा मोठा व्यापक प्रयोग आपण महाराष्ट्रात कार्यवाहीत आणलात. या प्रयोगातून सुप्त स्थानिक कर्तृत्व आणि स्थानिक नेतृत्व फुलून येण्यास अनुकूल भूमी निर्माण झाली. आपल्या लोकाभिमुख प्रशासनदृष्टीची ही फलश्रुती आहे.

ना. यशवंतराव -

एक थोर पुरोगामी विचारवंत म्हणूनही आपला लौकिक आहे. साऱ्याच मराठी विचारवंतांना संतसाहित्याचा वारसा लाभला त्याचा आपणास सार्थ अभिमान वाटतो. महात्मा फुले, न्या. रानडे, लो. टिळक, आगरकर, म. गांधी आणि आंबेडकर यांनी केलेले विचारमंथन, त्यातून निर्माण झालेले प्रबोधन आपण आत्मसात केले. समाजवाद, साम्यवाद या नव्या विचारप्रवाहाचेही आपण परिशीलन केले. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या रॅडिलक ह्यूमॅनिझमचे प्रवक्ते म्हणूनही आपली ख्याती आहे. आपल्या लोकाभिमुख प्रशासनाला ही समर्थ वैचारिक बैठक होती.

साहित्य, संगीत, चित्र, नृत्य, नाट्य, कला, वादसंवाद - यांनी बहरलेले सांस्कृतिक जीवन - यात साऱ्या विकासाचा आशय सामावलेला असतो. रसिकवृत्तीने हे स्वप्न आपण मनात पाहिले आणि प्रत्यक्षात साकारही केले. हे महाराष्ट्राचे मोठे हेवा करण्यासारखे भाग्य होय.

वाचन आणि लेखन, ग्रंथ आणि ग्रंथकार, साहित्य आणि साहित्यिक यावरचे आपले अकृत्रिम प्रेम विलोभनिय आहे. मराठी भाषा, मराठी साहित्य, मराठी संस्कृती यांच्या अभिवृद्धीसाठी आपल्या कारकीर्दीत महाराष्ट्र शासनाने केलेले कार्य केवळ निरुपण आहे. भाषा संचालनालयाला आकार दिलात. ग्रंथपुरस्काराची योजना कार्यवाहीत आणलीत. चित्रपट नाटक आदी ललितकलांना आपण उत्तेजन दिलेत. साहित्य संस्कृती मंडळाची निर्मिती आपल्या प्रशासनाची.

आपले आर्जवी पण प्रभावी वक्तृत्व आपल्या संयमी लोकनेतृत्वाला शोभणारे आहे. आपल्या प्रसन्न लेखनातून आपल्या संपन्न जीवनाचे मनोहर दर्शन होते. विविध साहित्य संस्थांतून विभिन्न व्यासपीठावरून आपण केलेली भाषणे, प्रसंगाने केलेले आपले लेखन आणि आपले 'कृष्णाकाठ' आत्मचरित्र यांना मराठी साहित्यात मानाचे स्थान राहील.

अकृत्रिम राष्ट्रप्रेम, उत्कट देशाभिमान, निस्वार्थ लोकसेवा, प्रखर पुरोगामी विचार, निरभिमान संयतवृत्ती, निरलस क्रियाशीलता आणि सर्वांत महत्त्वाचे - निष्कलंक चारित्र्य या साऱ्या गुणसमुच्चयाने जनसामान्यांच्या अंत:करणात आपल्याविषयी नितांत प्रेम आणि आदर वसत आहे.

समर्थांनी श्री शिवछत्रपतींना जाणता राजा म्हणून गौरविले आहे. त्याच रीतीने एक जाणता नेता म्हणून आपल्याविषयी आम्हा सर्वांना सादर अभिमान वाटतो. आपणास डॉक्टर ऑफ लेटर्स ही सन्माननीय पदवी प्रदान करून विद्यापीठ आपला यथार्थ गौरव करीत आहे. पुणे विद्यापीठाच्या इतिहासात आजचा दिवस ऐतिहासिक महत्त्वाचा ठरेल अशी आमची श्रद्धा आहे.

○ ○ ○

यशवंतरावांचे हस्ताक्षर

V. B. Chavan

1, RACE COURSE ROAD
NEW DELHI, 11

श्री.

इच्छापत्र (will) मजकूर

हे इच्छापत्र आज रोज शुक्रवार आश्विन शुद्ध १ शके १९०५
दिनांक ७ ऑक्टोबर १९८३.

माझी पत्नि कै. सौ. वेणुबाई हिने स्वखर्चाने
मी एक सार्वजनिक न्यास (Public Trust) स्थापन केला.
तिने मला स्वतःची व सार्वजनिक जीवनात उपयोगी पडेल
असे. त्याप्रमाणे तिची आठवण जागती ठेवणे हे माझ्या
जीवनातील प्रमुख आनंद आहे. त्या दृष्टिने मला
हालचाली सुरू झाल्या आहेत. माझ्या गावी कऱ्हाड येथे
एकरभर जमीन विकत घेऊन त्यावर एक सुंदर वास्तू बांधावी
व अशा वास्तूत माझ्या स्वतःचे ग्रंथालय तसेच उपयोगी
ग्रंथ ठेवावेत. तसेच माझ्या जीवनात अनेक व्यक्तींनी व
संस्थांनी अनेक वस्तू मला प्रेमाने भेट म्हणून दिलेल्या
आहेत. त्यांचेही संरक्षण व्हावे व वस्तुसंग्रहालयाच्या रूपाने
त्यांचे जतन व्हावे अशी माझी इच्छा आहे. आणि हे
ग्रंथालय व वस्तुसंग्रहालय हे माझ्या पत्नीची स्मृती
म्हणून व त्यांच्या दैनंदिन जनपयोगीपणी आणि वाढीची
वेळच्या मदतीची अशा संकल्प आहे.

या स्मृति मंदिरासाठी जी रक्कम खर्चाचे
ठरवली आहे ती सौ. रक्कम तोपाय मी देणार आहे. देणगी म्हणून
माझ्या दिवंगत पत्नीने दागदागिने आहेत त्यांचे
रूपांतर करून जी रक्कम उभी राहील ती सातीच्या
सारी या स्मारकासाठी. सुदैवाने माझे मुलगे
कीर्तन येथील व्यावसायाने जमीन विकून जी रक्कम
येईल ती सातीच्या सारी वरील प्रमाणेच ट्रस्ट
व्यवस्थेत घेणार. माझे व्यक्तिगत मी हे काम पूर्ण
करण्याचा प्रयत्न करीत आहे. ते न झाल्यास माझ्या
या इच्छापत्राच्या एक्झीक्यूटरनी ते करावे.

We, the Chancellor, Vice-Chancellor and Members of the Court of the **Marathwada University** certify that

the Honorary Degree of

Doctor of Laws

has been conferred on

Shri Yeshwantrao Balwantrao Chavan

at **Aurangabad**, on the tenth day of the month of February in the year one thousand nine hundred and seventy.

In Testimony whereof are set the Seal of the said University and the Signature of the said Chancellor.

Chancellor

केसरी-मराठा संस्था

साहित्यसम्राट न.चिं.केळकर पारितोषिक

केळकर पुण्यतिथी १९८४

श्री.यशवंतराव चव्हाण यांच्या

'कृष्णाकांठ'

या ग्रंथास समारंभपूर्वक दिले आहे.

७ ऑक्टोबर १९८४

विश्वस्त,केसरी-मराठा संस्था, गायकवाडवाडा पुणे - ३०

MARATHWADA AGRICULTURAL UNIVERSITY

PARBHANI

We the Chancellor, Pro-Chancellor, Vice-Chancellor, and the members of the Court of the University on the recommendation of the Academic Council confer the degree of

DOCTOR OF PHILOSOPHY

(HONORIS CAUSA)

on YESHWANTRAO BALWANTRAO CHAVAN

on this Seventeenth day of January, Nineteen Hundred Seventy Six

Vice-Chancellor

कानपुर विश्वविद्यालय

डॉक्टर ऑफ़ लॉज

प्रमाणित किया जाता है कि

यशवन्तराव बलवन्तराव चह्वाण को

विश्वविद्यालय दीक्षान्त-समारोह १९९८

के अवसर पर डॉक्टर ऑफ़ लॉज

(ऑनरिस कॉजा) की उपाधि प्रदान की

गयी।

कानपुर विश्वविद्यालय :

२३ फरवरी, १९९९

कुलपति

We, the Chancellor, Vice-Chancellor and Members of the Senate of the Shivaji University, certify that the Honorary Degree of

Doctor of Laws

has been conferred on the Honorable Shri Yeshwantrao Balvantrao Chavan Minister for External Affairs, Government of India.

at Kolhapur, on the first day of the month of December in the year one thousand nine hundred and seventyfour.

In Testimony whereof we set the Seal of the University and the Signature of the Chancellor.

Chancellor

पुणे विद्यापीठ

मा. आदरणीय यशवंतरावजी चव्हाण यांना सन्मानीय "डॉक्टर ऑफ लॉज्" परदान

दि. १२ डिसेंबर १९८८, आदरणीय श्री. यशवंतराव चव्हाण—

पुणे विद्यापीठ कार्यकारी मंडळाचे आणि विद्यापीठाच्या विविधांगांचे आपल्याला सन्मानीय डॉक्टर ऑफ लॉज् ही पदवी प्रदान करण्याचा निर्णय घेता आणि ती पदवी प्रदानाचा समारंभही आपल्या करवी करावा, याबद्दल आपलाच आदेश आणि अनिवार्यता मानत आहे. या सन्मानाचा आपण स्वीकार करावा.

आदरणीय श्री. यशवंतराव—

—महाराष्ट्राच्या सामाजिकांमध्ये आपण एक विलक्षण आहात. आपली आपल्यासारखीच अनिवार्य आपल्याच्याच सारखा आपली आहे. महाराष्ट्राच्या कर्तेसवरे कार्यकर्ते म्हणून आणि आणि महाराष्ट्राच्या प्रतिनिधी म्हणून विचार आणि अभिनिवेश दाखवत राहिलेले. एक कार्यक्षम लोकाभिमुख नाव म्हणून महाराष्ट्र राज्याचे लौकिक संपादिलेत, हे आपलेपणाही. आपण आपल्यासारखे कार्य नव्हिलाच आहेत.

इतरांबरोबरी देशाच्या ही आपली स्थानदायी. स्वातंत्र्य चळवळीतली तुरुंग देत आपण विद्यार्थ्यांच्या देखील, राजकीय क्षेत्र आणि आघाडी पुढी आपल्याच प्रतीक लोकप्रियतेचा प्रतिनिधित्व झाली. लोकशाहीचा कार्यक्षम आपल्याच आपण लोकशाहीची योजना देत असता आपल्यासारखेच हिंदी देश पक्षपातिकांचा आणि राज्याची राजकारणाची लोकप्रियता, सत्तास्थान परदोन देखील विविधांनी झालाच.

सर्वसामान्य आणि लोकांच्या प्रश्नाकडेच केंद्रस्थ केलेले. मुख्यमंत्रीपदे आणि मंत्रीपदे, संसदेत केंद्रसरकारच्या कार्यांच्या आपल्या सारा लोकहितच दिसत. आपली राष्ट्रीयच्या राष्ट्रीय दायित्वाच आपण सांभाळण्याचा सदासर्वदा दिसत.

आणि राज्याची विधिमंडळ हा आपलेच लोकप्रतिनिधीच्या सदस्यांतील एक विशेषच घडा. या सदस्यांतील आपला सहकाराच सहकारच दिसत. आपल्या मंत्रीच्या आणि परिस्थितीत महाराष्ट्र आणि मुख्यमंत्रीचे हितसंबंध राखत आणि दोघांचे संतुलन सहकारातून राखत या राज्याचे आपल्याच आपल्या आणि मुख्यमंत्रीचे केलेत.

महाराष्ट्राच्या सीमेने मुख्यमंत्री म्हणून आणि राष्ट्रपतीने ते मंत्रीमंडळाने सोपे आपल्याच होत. सहकारच्या सर्वच सहकारांच्या विकास ही आपली मुख्यतेने विशिष्टतेने होती.

कर्तेसवरे ही राष्ट्रीय, राष्ट्रहाच आणि मानुषतेच्या ही रिती, संयम आणि स्वतंत्र प्रशासन ही सीमेच्या-चाच सकल आपल्या आपलीच्याच दिसत. केंद्रमंत्रीच आपलाच लोकप्रियतेच मुख्यत्व महाराष्ट्राची सीमेने आपलाच कर्तेपणा.

देशाच्या संरक्षण आणि आणि देशाने आपलाच दक्ष दिसे. आपण भारताने संरक्षणाची प्रधान, सशिक्षणाच मुख्यांतले पद हे आपले पद होते. जोपासे वेदाशास्त्रातील आपली प्रधानपदी चहात आणि राष्ट्रात दिसे. आपलाने सुसंबंध, आणि आणि परराष्ट्रांशी व्यापार साध केलेत. आपलेच दोनदिवा लोकप्रेम आणि एक मुख्यत्व सरकारचे मुख्यत्व आपल्या संसदीयच्या दोनदिवस संसदेच्या अधिवेशन घडले.

लोकशाहीच्या आणि विकासाचे मुख्यत्व आपल्या संसदीयच्या आणि आपल्याच आणि आपल्याच राहिले. महाराष्ट्र राजकीय स्थानांच आणि राष्ट्रीय प्रवाहात या सोबती सहकारीकामांची सारखे प्रयत्न ही आपलेच आपल्या नेहमी केलेत. लोकशाहीच्या स्थान राष्ट्रीय पुनर्बांधणे प्रक्रांती लोकहितात, पुनर्बांधणी विशेषच सांगितले. समाज आणि आर्थिक विकास राष्ट्रात लोकहितास संघर्ष होतो. ही आपली भावना होती. आणि आपलाच सहकारच आपलेच्याच त्याच प्रयत्न आणा.

महाराष्ट्रात आज विकास सांगितले आणि विशेषच प्रयत्न सर्वांना मुख्य प्रेरक आहे. यामे प्रेम आपलाच स्वतः विकासाचे-दोन. सामान्यता महाराष्ट्र पुढची महाराष्ट्राची. सामाजिक आणि समाज सामान्य प्रगतीची प्रेमाचाच या महाराष्ट्राने स्थान आपल्याच राहिल असे आपल्या आपलेसे प्रतिपादिले. आपलाच विचारांचे आणि विचारांची विचारांचे या सांस्कृतिक विचारांचांची स्वतःचा आपलाच सांस्कृतिक झाली. या विचारांतून सामान्यता, प्रगतीचाच आणि सहकारच्याच यांचे ही आपली सर्वच प्रतिष्ठा आहे.

सहकारच्या आणि विकासाचे मुख्यत्व आपल्या पेक्षे आपलेच होते. तसा सहकारचे आणि जीवन संघर्ष व समाज आणेल या सहकारच्या आणि, संघर्ष, संस्था यासाठी आपल्या प्रेमे उपयोग होतात हे मानून आपल्या सहकार, सहकार-उद्योग या द्वारा महाराष्ट्रात कृषि-उद्योग कामांची (Agro-Industrial Revolution) झाली आणली.

शिक्षणविषयी व उच्चतर संशोधन मानवाच्या मुख्यत्व विशेषित लोकशाहीच्या सोबत स्वतंत्र प्रयोग आपल्या महाराष्ट्रात कार्यकारीत आणलाच. या कार्यांमुळे, मुख्य स्थानिक संस्थेत आणि स्थानिक नेतृत्व पुढील केलेल्या मुख्यत्व पुढी निर्माण झाली. आपल्या लोकशिक्षण प्रसारकरणीची ही पावतीही आहे.

श्री. यशवंतराव

एक थोर पुरोगामी विचारवंत म्हणूनही आपला दीपक आहे. सामान्य आणि विचारवंतांना लोकांशिवाच्या आपला प्रयत्न लोकांच्या आपलाच सारखे अधिकार वापरले. महाराष्ट्र पुणे, रत्ना, राजगडी, सी. दिवाळ, आणलाच या सारखी आणि आपलेच्या पाणी पेक्षे विचारवंतांच, त्यांतून विशेष झाले ते प्रयोगच आपल्या आपलाच केले. महाराष्ट्रात, मानवतेच्या या सारा विचारवंतांच्यांची आपल्या पोलीसांच केले. आपलेच्याच रोष सांगत [illegible]

[illegible] आणि आणि आणि आणि आणि [illegible] आणि आणि आणि [illegible] आणि आणि आणि आणि आणि [illegible] आणि आणि आणि आणि आणि [illegible]

[illegible] आपलाच [illegible] आपलाच [illegible] आपलाच [

यशवंतरावांची समग्र ग्रंथसंपदा

- 'आपले नवे मुंबई राज्य' - प्रकाशक पुणे एस्. एस्. १९५७
- 'विचारधारा' - सागर प्रकाशन, मुंबई, १९६०
- 'महाराष्ट्राची धोरण सूची'- प्रकाशन विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई, १९६०
- 'महाराष्ट्र राज्य निर्मिती विधेयक' - प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९६०
- 'महाराष्ट्र - म्हैसूर सीमा प्रश्न' - महाराष्ट्र राज्य प्रसिद्धी खाते, मुंबई, १९६०
- 'शिवनेरीच्या नौबती'- व्हीनस प्रकाशन, पुणे, १९६१
- 'सह्याद्रीचे वारे'- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, १९६२
- 'युगांतर' - कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७०
- 'Winds of change' - Somayya Publications, Bombay, 1973.
- 'ऋणानुबंध' - प्रेस्टीज प्रकाशन, पुणे, १९७५
- 'India's foreign Policy' - Somayya Publications, Bombay, 1978.
- 'भूमिका' - प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे, १९७९
- 'The Making of India's foreign Policy' - Pub.New Delhi, Allied Publications Pvt. Ltd, 1980
- 'कृष्णाकाठ' - प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे, १९८४
- 'विदेश दर्शन' - यशोदा प्रकाशन, पुणे, १९८८
- 'यशवंतराव चव्हाण : शब्दांचे सामर्थ्य - यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, २०००

○ ○ ○

ग्रंथाधार

१) अत्रे प्र.के., ललित वाङ्मय, २ री आ., पुणे, देशमुख आणि कंपनी, १९५२

२) अत्रे प्र.के., सिंहगर्जना, प्रथम आ., मुंबई, ग.पा.परचुरे प्रकाशन, १९५७

३) अत्रे प्र.के., आषाढस्य प्रथम दिवसे, प्रथम आ., मुंबई, परचुरे प्रकाशन मंदिर, १९६९

४) इनामदार हे.वि., रेळेकर वि.ना., मिरजकर नि.धों. (संपा.), नामदेव दर्शन, प्रथम आ., कोल्हापूर, नामदेव समाज उन्नती प्रकाशन, १९७०

५) कदम कोंडिबा गेनू , निवडुंग, प्रथम आ., मुंबई, मायबोली प्रकाशन, १९९९

६) कऱ्हाडे सदा, साहित्य विश्लेष., प्रथम आ., औरंगाबाद, स्वरूप प्रकाशन, १९९९

७) कऱ्हाडे सदा, चरित्र आणि आत्मचरित्र, प्रथम आ., मुंबई, प्रकाशक लोकवाङ्मयगृह, गिरगाव, १९७६

८) कल्याणकर बा.ह. (संपा.) युगंधर नेते : यशवंतराव चव्हाण, औरंगाबाद, प्रकाशक बा.ह.कल्याणकर

९) कायंदे-पाटील गंगाधर वि., यशवंतराव चव्हाण, प्रथम आ., नाशिक, प्रकाश पब्लिकेशन्स, २०००

१०) काळे बाबूराव, यशवंतराव चव्हाण, मुंबई, प्रकाशक नारायण दत्तात्रय रेगे, कृष्ण कमल, माहीम

११) काळे भगवान (संपा.), संयुक्त महाराष्ट्र काल आणि आज, प्रथम आ., जालना, संकेत प्रकाशन, १९८८

१२) कुलकर्णी अनिरुद्ध अनंत (संपा.), प्रदक्षिणा खंड २ रा (इ.स.१९४७ ते २०००), २री आवृत्ती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९९८

१३) कुलकर्णी गो. म., वाटा आणि वळणे, प्रथम आ., बेळगाव, नवसाहित्य प्रकाशन, १९७५

१४) कुलकर्णी व.दि., कुलकर्णी गो.म. (संपा.), मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड सहावा, पुणे, महाराष्ट्र साहित्य परिषद.

१५) कुलकर्णी व. दि., मराठी साहित्य : विमर्श आणि विमर्शक, प्रथम आ., पुणे, पद्मगंधा प्रकाशन, २००१

१६) कुलकर्णी रंगनाथ, साहेब यशवंतरावजी चव्हाण, नाट्यरूपांतर, मुंबई, शुभा प्रकाशन, २०००

१७) केळकर भा.कृ. (संपा.) यशवंतराव राष्ट्रीय व्यक्तिमत्त्व, प्रथम आ., मुंबई, प्रकाशक महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, १९८५

१८) कोतापले नागनाथ, साहित्याचा अन्वयार्थ, प्रथम आ., पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९९६

१९) खेर भा. द., अमृतपुत्र, प्रथम आ., पुणे, श्रद्धा प्रकाशन, १९९१

२०) खेर भा.द. , हिरोशिमा, प्रथम आ., पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९८४

२१) खोब्रेकर व्हि.जी. (संपा.), यशवंतराव चव्हाण विधिमंडळातील निवडक भाषणे (१९४६ ते १९६८), प्रथम आ., मुंबई, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, १९८९

२२) खांडेकर वि.स., रेषा आणि रंग, दुसरी आवृत्ती, पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९९७

२३) गणोरकर प्रभा, वाङ्मयप्रकार आकलन आणि रसास्वाद, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

२४) गोखले द.न., चरित्र चिंतन, प्रथम आ., मुंबई, मौज प्रकाशन गृह, २०००

२५) चव्हाण यशवंतराव, कृष्णाकाठ, प्रथम आ., पुणे, प्रेस्टीज पब्लिकेशन्स, १९८४

२६) चव्हाण यशवंतराव, ऋणानुबंध, २ री आवृत्ती, पुणे, प्रेस्टीज पब्लिकेशन्स, १९८६

२७) चव्हाण यशवंतराव, सह्याद्रीचे वारे, ३ री आवृत्ती, मुंबई, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, १९९२भ

२८) चव्हाण यशवंतराव, युगांतर, प्रथम आ., पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९७०

२९) चव्हाण यशवंतराव, भूमिका, प्रथम आ., पुणे, प्रेस्टीज पब्लिकेशन्स, १९७९

३०) चव्हाण यशवंतराव, शिवनेरीचे सोबती, प्रथम आ., पुणे, व्हिनस बुक, १९६१

३१) चव्हाण यशवंतराव, विचारधारा, मुंबई, सागर प्रकाशन, १९६०

३२) चव्हाण शिवाजीराव, यशोदीप, प्रथम आ., वाई, सुशिपांज प्रकाशन, २०००

३३) जाधव पंजाबराव, यशवंतराव चव्हाण जीवनदर्शन, पुणे, कर्मवीर प्रकाशन, १९७०

३४) जाधव रा.ग., साहित्य आणि सामाजिक संदर्भ, प्रथम आ., पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९७५

३५) जोशी अ.म., चरित्र आत्मचरित्र, २ री आवृत्ती, पुणे, सुविचार प्रकाशन मंडळ, १९६५

३६) जोशी प्र.न., मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, प्रथम आ., पुणे, प्रसाद प्रकाशन, १९७२

३७) जोशी रामभाऊ (संपा.), विदेश दर्शन, प्रथम आ., पुणे, श्री यशोदा प्रकाशन, १९८८

३८) जोशी रामभाऊ, इतिहासाचे एक पान, पुणे, केसरी प्रकाशन, १९७६, जोशी रामभाऊ, सह्याद्रीवरील सूर्यास्त, सातारा, समर्थ प्रकाशन

३९) जोशी रामभाऊ, ही ज्योत अनंताची, प्रथम आ., पुणे, यशोदा प्रकाशन, १९८४

४०) ठकार निशिकांत, साहित्याचे परीघ, प्रथम आ., औरंगाबाद, स्वरूप प्रकाशन, २००१

४१) ठाकूर रविंद्र, यादव आनंद, व्यक्ती आणि वाङ्मय, प्रथम आ., पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९९३

४२) थोरात संभाजीबाबा, यशवंतराव चव्हाण झुंजार नेतृत्वाचा शोध आणि बोध, कऱ्हाड, आगाशिव प्रकाशन, १९८८

४३) पवार गो.मा. , हातकणंगलेकर म.द. (संपा.), मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, १९५० ते १९७५, प्रथम आ., मुंबई, पॉप्युलर प्रकाशन, १९८६/१९८७

४४) पाटील अनंतराव, यशंवतराव चव्हाण, प्रथम आ., मुंबई, यशंवतराव चव्हाण प्रतिष्ठान, १९९७

४५) पाटील दिनकर, पवार जे.के., - प्रस्तावनाकार यशंवतराव चव्हाण, प्रथम आ., पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९९७

४६) पाटील वसंत केशव, पाटील विठ्ठल (संपा.), यशंवतराव चव्हाण विचार आणि वारसा, प्रथम आ.,कराड, प्रकाशक दीपक वि.पाटील, १९८९

४७) पाटील विनायक (संपा.), यशोधन, (यशवंतराव चव्हाणांचे निवडक विचार), २ री आवृत्ती, औरंगाबाद, साकेत प्रकाशन, १९८६

४८) पाटील विठ्ठलराव (संपादक/संग्राहक), यशवंतरावांच्या प्रस्तावना, प्रथम आ., पुणे, अमेय प्रकाशन, १९९८

४९) पाटील विठ्ठल, यशवंतराव चव्हाण विविधांगी व्यक्तिमत्व, प्रथम आ., औरंगाबाद, साकेत प्रकाशन, १९९४

५०) पाटील विठ्ठल, यशवंतराव चव्हाण विविधांगी व्यक्तिमत्व, प्रथम आ., औरंगाबाद, साकेत प्रकाशन, १९९४

५१) पाटील रा.तु., यशवंतराव चव्हाण : एक कर्तबगार पण वादग्रस्त मुत्सद्दी, प्रथम आ., कोल्हापूर, राजे-देसाई प्रकाशन, १९८६

५२) पारगावकर वि.श., आस्वाद आणि समीक्षा, प्रथम आ., पुणे, प्रतिमा प्रकाशन, १९८९

५३) पोतदार वसंत ब., हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम, २ री आवृत्ती, आष्टा कासार, प्रकाशक पोतदार, १९८४

५४) प्रधान राम, यशवंतराव चव्हाण (संपा.), शब्दाचे सामर्थ्य, प्रथम आ., मुंबई, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, २०००

५५) प्रधान राम, बंधनाचे ऋण, प्रथम आ., पुणे, अमेय प्रकाशन, २००१

५६) प्रधान राम, वादळमाथा, प्रथम आ., पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९७०

५७) प्रभुणे रा.गो., (संपा.), जोकमानसातील यशवंतराव, प्रथम आ., पुणे, प्रकाशक इंद्रायणी साहित्य, १९८५

५८) फकीर राम, श्री यशवंतराव चव्हाण एक रसग्रहणात्मक अभ्यास, प्रथम आ., सांगली, अद्वैत प्रकाशन, १९७१

५९) फडके ना. सी., असे वक्ते ! अशी व्याख्याने, प्रथम आ., पुणे,

व्हीनस प्रकाशन, १९६०

६०) फडके ना. सी., साहित्य आणि संसार, ३ री आवृत्ती, कोल्हापूर, प्रकाशक दा.ना. मोघे, स्कूल अॅन्ड कॉलेज बुकस्टॉल, १९६४

६१) फडके य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड ५ वा, प्रथम आ., पुणे, श्रीविद्या प्रकाशन, १९९७

६२) बागल भाई माधवराव, माझे यशवंतराव, कोल्हापूर, समाज प्रकाशन

६३) बाबर कृ.भा., (संपा.), यशवंतराव चव्हाण : व्यक्ती व कार्य, प्रथम आ., पुणे, ठोकळ प्रकाशन, १९६०

६४) बाबर सरोजिनी (संपा.), मी पाहिलेले यशवंतराव, प्रथम आ., मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, १९८८

६५) बेणारे गोपाळ, यशवंतरावांचे उत्तराधिकारी, प्रथम आ., पुणे, राम प्रकाशन, १९९३

६६) भागवत श्री.पु., सुधीर रसाळ, मंगेश पाडगावकर, शिल्पा तेंडुलकर, अंजली कीर्तने (संपा.), साहित्य : अध्यापन आणि प्रकार, प्रथम आ., मुंबई, मौज प्रकाशन गृह, १९८७

६७) भोसले एस्. एस्. (संपा.), साहित्यिक खांडेकर, प्रथम आ., कोल्हापूर, अजब पुस्तकालय, १९८०

६८) भोसले एस्. एस्., प्र.के.अत्रे, साहित्य आणि समीक्षा, प्रथम आ., कोल्हापूर, अजब पुस्तकालय, १९८०

६९) भोळे भास्कर लक्ष्मण, यशवंतराव चव्हाण राजकारण आणि साहित्य, औरंगाबाद, साकेत प्रकाशन

७०) महानोर ना.धों. , यशवंतराव चव्हाण, प्रथम आ., औरंगाबाद, साकेत प्रकाशन, १९९१

७१) मालुंजकर मच्छिंद्र, माझा प्रवास, १८५७ च्या बंडातील हकीकत. आस्वादन व मूल्यमापन, प्रथम आ., नगर, स्फुर्ती प्रकाशन, १९९४

७२) माखाडे नरेंद्र, कृष्णाकाठ एक आस्वाद, प्रथम आ., औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन्स, १९९८

७३) माखाडे नरेंद्र, ऋणानुबंध एक आस्वाद, प्रथम आ., औरंगाबाद, नाथ प्रकाशन, वरळीबाग, १९९५

७४) मुलाटे वासुदेव, दलितांची आत्मकथने संकल्पना व स्वरूप, प्रथम आ., औरंगाबाद, स्वरूप प्रकाशन, १९९९

७५) मंगुडकर मा.प., यशवंतराव चव्हाण : प्रेरणा व कार्य, प्रथम आ., पुणे, प्रकाशक सौ. सुवर्णा मंगुडकर, चित्रे बंगला, सदाशिव पेठ, १९८६

७६) यादव आनंद, आत्मचरित्र मीमांसा, प्रथम आ., पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९९८

७७) रावते ग. की., मराठी चरित्र मूलतत्त्वे व समीक्षा, प्रथम आ., मुंबई, प्रकाशक सौ. सरोज रावते, समर्थ प्रकाशन, १९८५

७८) लुलेकर प्रल्हाद जी., वेदनांचा प्रदेश (मराठवाड्यातील दलित आत्मकथने), औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन्स

७९) लेले ना.बा., भारतीय विचार साधना, प्रथम आ., पुणे, २००१

८०) शेवते अरूण, कृष्णाकाठचा माणूस, प्रथम आ., मुंबई, ऋतुरंग प्रकाशन, १९९३

८१) शेवते अरूण, साहेब संध्याकाळी भेटले, पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९९२

८२) शिंदे विठ्ठल रामजी, माझ्या आठवणी व अनुभव, पुणे, ३ री आवृत्ती, रा.वा.आंद्रे प्रकाशन, १९५८

८३) सरडे कृष्णराव, सरडे मोहन, रत्ने आणि मोती, कराड, व्हरायटी स्टोअर्स,

८४) साबळे तुकाराम लिंगोजी, भारतीय मल्लविद्याशास्त्र, प्रथम आ., कोल्हापूर, राजर्षी शाहू मल्लविद्या प्रकाशन, १९७४

८५) सावंत वसंत, प्रवासवर्णन एक वाङ्मयप्रकार, प्रथम आ., मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, १९८७

८६) साळुंखे पी.बी., राजर्षी शाहू गौरव ग्रंथ , मुंबई, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग सचिवालय, १९७६

८७) सूर्यवंशी उत्तम दीपाजी, मराठी मातीचे वैभव, प्रथम आ., नांदेड, सांगाती प्रकाशन, १९८९

○ ○ ○

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या एकूणच जीवनाकडे पाहताना त्यांची उपक्रमशीलता, त्यांची मानवतावादी वृत्ती लक्षात येते. भाषा, कल्पनाशक्ती, वाङ्मयनिर्मिती व जीवन तत्त्वज्ञान यांचे परस्परांशी असणारे नाते आणि त्यांचा संस्कृतीशी असणारा अनुबंध प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख यांच्या 'शैलीकार यशवंतराव' या ग्रंथाच्या निमित्ताने जाणून घेता येईल.

''यशवंतरावांचा पिंड ललितलेखनाचा होता. त्यामुळे त्यांनी केलेले गद्यात्मक लेखन लालित्याचा धर्म घेऊन येते. त्यांच्या वैचारिक गद्य लेखनात त्यांच्या सकस आणि संपन्न विचाराचे दर्शन होते. यशवंतरावांचा साहित्य संसार समाजप्रबोधन आणि समाजचिंतन या अंगाने जात असल्यामुळे त्यांच्या ललित लेखनातदेखील समाजचिंतनच आढळते. अनुभव कथन व आत्माविष्कार ही प्रेरणा स्वीकारून त्यांचे लेखन झाले आहे.'' प्रस्तुत ग्रंथात डॉ. देशमुख यांनी यशवंतरावांच्या साहित्याच्या संदर्भात असे विचार नोंदवले आहेत. त्यातून त्यांच्या लेखनातील प्रगल्भता लक्षात येते.

मा. चव्हाणसाहेबांच्या भाषणात आणि लेखनात समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेला गती देण्याचे विलक्षण सामर्थ्य आहे. या सामर्थ्याचा शोध घेणे हे संशोधकांनासुद्धा एक आव्हान आहे. कारण त्यांचे साहित्य वर्तमानकाळाशी निगडीत असले तरी त्यात भूतकाळाचे अनेक संदर्भ असतात आणि उज्जवल भविष्यकाळाची दृष्टी दिसते. या ग्रंथाच्या रूपाने त्यांच्या साहित्यिक जडणघडणीचा एक वैचारिक ठेवा आपल्या हाती पडत आहे, ही अतिशय आनंदाची बाब आहे. वाचक आणि अभ्यासक या ग्रंथाचे स्वागत करतील अशी मला आशा आहे. डॉ. शिवाजीराव देशमुख यांच्या या ग्रंथास मी मनःपूर्वक शुभेच्छा देतो.

आर. आर. पाटील (आबा)
माजी उपमुख्यमंत्री, गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य
अध्यक्ष : श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर